४८५

भू. प्रवास १४९ ९-८१

ले. जनार्दन बाळाजी मोडक

पु. ठाणे जिल्ह्याचा इतिहास

(सरकारी गॅझिटिअरच्या आधारे)

[illegible] ( दी प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, ठाणे )

संग्रहालय/वाचनालय [illegible]

| | | |
|---|---|---|
| अनुक्रम नं. [illegible] | विभाग प्रवास | क्रमांक १४९ |

पुस्तकाचें नांव ठाणे [illegible]

लेखक [illegible]

सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.

सदर्भ
भू प्रवास
१४९

मुंबई ... महालक्ष्मी ठाणे
१६४०९

भूप्रवास
१

भूप्रवास वर्णन २/१

ठाणे जिल्ह्याचे वर्णन
ले. जनार्दन बाळाजी मोडक.
मुंबई सरकारच्या आधाराने.

# प्रस्तावना.

सृजति तावदशेषगुणाकरं ।
पुरुषरत्नमलङ्करणं भुवः ॥
तदपि तत्क्षणभङ्गि करोत्यहो ।
अहह कष्टमपण्डितता विधेः ॥ १ ॥

अलीकडे आमच्या या भरतखंडांतील प्राचीन विद्यांचें पुनरुज्जीवन करण्याविषयीं पुष्कळ लोकांचा अविश्रांत उद्योग सुरू आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. मुंबईइलाख्यांत विश्वविद्यालयाची स्थापना होऊन अर्ध शतकही झालें नाहीं तोंच गीर्वाणवाणीच्या अभ्यासास उत्तेजन मिळून त्या रमणीय भाषेचें ज्ञान आपल्या लोकांत वायुगतीनें प्रसार पावत चाललें आहे व त्याच्या योगानें [illegible] भाषेची [illegible] सुधारणा होऊन तीमध्यें अनेक विषयांवर ग्रंथ लिहिण्या [illegible] यथें झपाट्यानें [illegible] याचेर अगदीं निकट संबंध आहे हें आपल्या भावि उन्नतस्थितीचें सूचक सु [illegible] मानण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. देशभा [illegible] ताचा [illegible] विचारानें, अनेक मार्ग आहेत हें जाणून कित्येक जण [illegible] करून, [illegible] प्रसार पंखांच्या साह्यानें गरुडपक्ष्याप्रमाणें अनंत [illegible] वर्षांचे सिद्ध होतात; कित्येक लोक आपल्या [illegible] च्या बळावर या अफाट जडसृष्टीचें [illegible] विषयांवर गहन ग्रंथ लिहितात; व [illegible] धिक [illegible] घेऊन व मानवी विकारांचे व विच [illegible] ऱ्यानें रा [illegible] व लोकमान्य इतिहास लिहून [illegible] दे अनेक [illegible]

कोणता उपयोग होतो हें हल्लींच्या काळीं तरी कोणास सांगावय
पाहिजे असें नाहीं. ग्रीक व रोमन लोक ज्याप्रमाणें पुढील पिढ्यांच्या
मनोरंजना करितां व उपयोगा करितां खरे व सुरस इतिहास लिहून
ठेवीत असत त्याप्रमाणें आपल्या पूज्य प्राचीन पूर्वजांनीं कांहीं विशेष
करून ठेवलें नाहीं यामुळें आपल्या देशाचें बरेंच नुकसान झालें आहे.
आपल्या पूर्वजांनीं हें जें एक आपल्या प्राचीन विद्येचें व्यंग राहू दिलें तें
स्वसामर्थ्यानुरूप भरून काढावें ह्मणून अनेकांचे अनेक तऱ्हेचे प्रयत्न
चालू आहेत. पुढील ग्रंथ हा अशा तऱ्हेच्या प्रयत्नांचेंच फल आहे,
सांगितलें पाहिजे असें नाहीं. कोणत्याही काळचा व कोणत्याही देशाचा
इतिहास वाचल्यापासून अनेक फायदे होतात. त्याचप्रमाणें हा ग्रंथ
वाचला असतां सर्व लोकांस, व विशेषतः ठाणें जिल्ह्यांतील लोकांस, येथील
आपल्या प्राचीन पूर्वजांचें अपूर्व बुद्धिवैभव व चातुर्य यांविषयीं खात्री
लायक माहिती मिळून ती त्यांना फारच उपयुक्त होईल अशी आमची
पूर्ण खात्री आहे. प्राचीनकाळीं पश्चिम हिंदुस्थानचा परकीय देशांशी
जारीनें व्यापार चालत असून त्या संबंधानें सोपारें ( शूर्पारक ), कल्याण
संजाण व मुंबई हीं बंदरें वेळोवेळीं फार प्रसिद्धीस आलेलीं आहेत
या जिल्ह्याच्या इतिहासांत एक ध्यानांत ठेवण्यासारखी विशेष
आहे. त्यावेळचे हिंदु लोक हे मलबारांतील अध्यान जातींतील
प्रमाणें ... परकीय देशांशी ...
अ... ...करून व ...कीनें व जलमार्गानें प्र
... धैर्य व अप्रतिम साहस यांचे संबंधानें त्यावेळ
...ते मिळविली होती हें वाचून कोणत्या देशाभि
...च्या आपल्या गचाळ स्थितीबद्दल दुःख, व
... अभिमान, उत्पन्न होणार नाहीं ? आप
...गणें चालू असे ही गोष्ट ही ध्यानांत
...गांस आपल्या पूर्वींच्या स्थितीचें

...राजांच्या ... वेळीं ह्मणजे ... स.
...तील हिंदुलोक, आपलीं

दारें सोडून, व समुद्रोल्लंघन करून, बाहेरदेशीं व्यापाराकरितां जात असत. या शिलाहार राजांना इमारती बांधण्याचा मोठा नाद असे. १३ व्या शतकाच्या आरंभीं मुसलमानांनीं, व १६ व्या शतकांत पोर्टुगीज लोकांनीं, त्यांनीं [ शिलाहारराजांनीं ] फार परिश्रम करून बांधलेलीं अनेक सुंदर देवालयें आणि चिरेबंदी धरणें यांचा अविचारानें विध्वंस केला असें वाचलें म्हणजे आपल्या पायांची आग मस्तकांत जाते व मूढधर्मविश्वास हा किती भयंकर व अनर्थमूलक आहे हें आपल्या चांगलें प्रतीतीस येतें.

मुंबईंतील वाळुकेश्वर, व लोनाड, येथें इमारतींचे जे अवशेष अजून पर्यंत सर्वभक्षक काळाच्या तडाक्यांतून राहिले आहेत त्यांवरून, उत्तम घडींव दगडांचें कळाशीदार काम करणारे हुपार गंवडी, आणि दगडावरील खोदींव काम करणारे कुशल कारागीर, या जिल्ह्यांत पुष्कळ होते असें दिसतें. या वरून व इतर पुष्कळ प्रमाणांवरून, शिल्पकला व मूर्तिकरणकला या दोन, चित्तवृत्ति उल्हसित करणाऱ्या कलांचें येथील लोकांस प्राचीनकाळीं सुद्धां बरेंच चांगलें ज्ञान होतें असे अनुमान करण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. तसेंच कोकण प्रांताचा पश्चिमेकडील देशाशींही पूर्वीं मोठा व्यापार चालत असे; व अनेक सुगंधि पदार्थ, पाणीदार व सतेज मोत्यें, शोभिवंत व अमूल्य रत्नें, उबदार व सुरेख रेशमी कापड, व भरजरी नक्षीदार वस्त्रें, या जिनसांचा व्यापार येथें झपाट्यानें चालत असून हिंदुस्थानचा चीनदेशाशीं पुरातनकालापासून अगदीं निकट संबंध आहे असें दिसतें.

कोणत्याही धर्माचा, धर्मपंथाचा, किंवा धर्ममताचा [illegible] विचारानें, फाजील खटपट करून, व लोकमताचा अनादर करून, [illegible] प्रसार करणें हें किती हानिकारक आहे; येथील [illegible] वर्षांचे [illegible]
व मुसलमान यांना फार कडक रीतीनें व[illegible]
गीज लोकांचें या प्रांतांतलें राज्य कसें [illegible]
संतोपाकडे अगदीं दुर्लक्ष्य करून अधिक[illegible]
गार करण्याकडे फार लक्ष्य दिल्यानें रा[illegible]
अनर्थपरंपरा ओढवते; इत्यादि अनेक [illegible]

होऊन त्याच्या योगानें या देशाचा राज्यशकट कोणत्या धोरणानें चालविला पाहिजे हें कोणाही समंजस मनुष्यास सहज समजून येणार आहे.

सोपारें येथील एका श्रीमंत सावकाराचा दासीपुत्र **पूर्ण** या नांवाचा होता. त्याला **गौतमानें** बौद्धधर्माची दीक्षा दिल्यावर मला कोंकणच्या लोकांना हा पवित्र धर्म शिकवण्या करितां पाठवा अशी त्या पट्टशिष्यानें आपल्या परमपूज्य गुरूची विनंति केली. त्यावेळीं बुद्धगौतम व त्याचा शिष्य पूर्ण यांच्यामध्यें झालेला प्रश्नोत्तररूपी संवाद वाचण्यासारखा आहे. त्या वरून कोणताही धर्मपंथ प्रसृत करण्याची कोणाची इच्छा असल्यास त्या कामीं 'सत्प्रेम प्यारा' जो जीव त्याच्यावर सुद्धां कित्येकवेळां त्यास उदार व्हावें लागतें या महातत्वाच्या सत्यते बद्दल आपली पूर्ण खात्री होते. अशा तऱ्हेचे या ग्रंथा पासून अनेक फायदे आहेत. **डाक्टर जॉनसन** सारखे जे इतिहासास नाक मुरडणारे नसतील; मनुष्याच्या मनास अत्यंत स्वाभाविक अशी जो जिज्ञासा, ती या जिल्ह्याची माहिती मिळवून कांहीं अंशीं तरी तृप्त करून घेण्याची ज्याची इच्छा असेल; हजारों मनुष्यांचा हजारों वर्षांचा अनुभव थोडक्या काळांत ज्यांस मिळवावयाचा असेल; मानवी बुद्धीचा प्रभाव केवढा आहे हें पहावें असें ज्यांना वाटत असेल; व शिवाजी सारख्या शूरवीरांच्या पराक्रमांची हकीकत वाचण्याची ज्यांस हौस असेल; त्यांनीं हा ग्रंथ एक वेळ तरी अवश्य वाचावा; म्हणजे "**इतिहास हें दृष्टांत देऊन ज्ञान प्राप्त करून देणारें तत्वज्ञान आहे**" हीजी प्रसिद्ध इंग्लिश ग्रंथकार लॉर्ड मेकॉले यांची उक्ति ती [illegible]रीं अक्षरशः खरी आहे असें त्यांस कळून आल्यावांचून रहाण[illegible] असो.

[illegible]हासासारख्या महत्वाच्या विषयावर कांहीं तरी एखादा [illegible]षेचें आपण उतराई व्हावें असें कै. जनार्दन मोडक यांच्या मनांत येऊन त्यांनीं [illegible]तकाच्या दोन भागांचें भाषांतर करण्याला [illegible]ोदय पत्रांत ता. १५ आगस्ट सन १८८६ [illegible]याचें सुरू केलें; तें ता. १ जुलई सन

१८८८ इसवी रोजीं समाप्त झालें. पुढें कांहीं दिवसांनीं हें भाषांतर पुस्तकरूपानें छापून काढा अशी त्यांच्या मित्रमंडळीनें त्यांना विनंति केल्यावरून सदरहू भाषांतर पुस्तकरूपानें छापण्याला परवानगी मिळण्याविषयीं मुंबई इलाख्याचे गव्हरनर-साहेबांचे जनरल डिपार्टमेंटचे सेक्रेटरी यांस ता. २६ नवंबर सन १८८८ इसवी रोजीं त्यांनीं एक पत्र लिहिलें; त्यांच्या कडून उत्तर आल्याबरोबर तें पुस्तकरूपानें छापण्यास सुरुवात करून त्याप्रमाणें छापण्याचें काम बहुतेक आटपत आलें होतें; इतक्यांत दुष्ट काळानें त्यांच्यावर अकस्मात् घाला घातल्यामुळें छापण्याचें काम पुरें न होतां तसेंच पुष्कळ दिवस अर्धवट राहिलें. रोमन लोकांचा इतिहास लिहिणारा प्रसिद्ध **आरनोल्ड** हा अकस्मात् मृत्युमुखीं पडल्यामुळें त्याचा ग्रंथ अपुराच राहिला ही गोष्ट इतिहासज्ञांस माहीत आहेच. त्याचप्रमाणें आपल्या इकडे अनेक गुणांनीं रमणीय झालेल्या **कादंबरी**ची ही गोष्ट सांगतात. **बाणभट्टानें** अंतकाळीं अगदीं घाईघाईनें सांगितलेल्या संविधानकावरून त्याच्या मुलानें ती अद्वितीय व मनोरम कथा परिपूर्ण केली. तीच स्थिति कांहीं अंशीं प्रकृत पुस्तकाची झाली आहे हें सुज्ञ वाचकांस सांगणें नकोच. या व अशा अनेक उदाहरणांवरून इह लोकींचा सर्व पसारा व्यर्थ असून या नरदेहाचा मुळींच भरंवसा नाहीं हें जें आपल्या इकडील साधूंच्या उपदेशाचें मुख्य तत्व त्याच्या खरेपणाविषयीं आपल्याला मुळींच शंका रहात नाहीं.

या ग्रंथाचे एकंदर पांच भाग केलेले आहेत; प्रत्येक भागांत काय विषय आहेत हें पुढें दिलेलेंच आहे. या पांच भागांशिवाय या ग्रंथाला आणखीं ३ परिशिष्टें जोडलेलीं आहेत. त्यांपै[illegible] परिशिष्टांत [illegible]या जिल्ह्यांतील जव्हार संस्थानचा संक्षिप्त इति[illegible] परिशिष्टांत ११ वा शिलाहार ( शेलार ) रा[illegible] जवळच्या नाऊर गांवांतील शेत दान दिल[illegible] एक कोरींव लेख आहे. तो संस्कृत भाषे[illegible] झालेला आहे. तिसऱ्या परिशिष्टांत या[illegible] समाप्त केलेला आहे.

प्रस्तुत ग्रंथांत सुमारें २००० वर्षां[illegible]

कन आहे. येथील प्राचीन काळचे रीतरिवाज, व मुसलमान, पोर्तुगीज, फ्रेंच इत्यादि परदेशांतून इकडे आलेल्या लोकांनीं दुर्दशा करून सोडण्याच्या पूर्वीचें या जिल्ह्याचें जें वैभव होतें त्याचें हा ग्रंथ वाचून बरेंच ज्ञान होण्याचा संभव आहे असें आह्मांस वाटतें. निदान ज्या कोणास प्राचीन ... व ... वैभव यांची साक्ष पाहिजे असेल त्यानें या पुस्तकाचा पहिला भाग वाचावा ह्मणजे त्याची खात्री होईल. भाषापद्धति प्रौढ व झोंकदार असल्यामुळें हा ग्रंथ लोकप्रिय होईल अशी आम्हांस पूर्ण आशा आहे.

सदरहू ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्याच्या कामीं श्रीमंत महाराज पतंगशहा विक्रमशहा राजसाहेब संस्थान जव्हार यांनीं १०० रुपये देण्याचें अभिवचन दिलें आहे. अशा रीतीनें आपल्या जन्मभाषेच्या अभिवृद्ध्यर्थ श्रीमंत राजसाहेब यांनीं द्रव्यद्वारें मदत करण्याचें कबूल केलें ही गोष्ट त्यांस फार भूषणावह आहे. आणि या त्यांच्या सत्कृत्याबद्दल आह्मी त्यांचे फार आभार मानतों.

अशा तऱ्हेचें पुस्तक छापवणें म्हणजे केवळ खर्चाचें काम आहे. आमच्या लोकांत व्हावा तसा विद्याप्रसार अजून ही झाला नसल्यामुळें सुरस कादंबऱ्यां शिवाय इतर ग्रंथ, ते कितीही महत्वाचे व उपयुक्त असले तरी, लोकाश्रयास पात्र होत नाहींत. यामुळें असे ग्रंथ प्रसिद्ध करणें सर्वस्वी राजाश्रयावरच अवलंबून असतें; असें जाणून आम्हीं सदरहू पुस्तक श्रीमंत संपतराव गायकवाड यांस समर्पण करण्याचा विचार केला; व त्याप्रमाणें त्यांस पत्रद्वारें विनंति केली. ती त्यांनीं मोठ्या आनंदानें मान्य केली ... त्यांचे मनःपूर्वक आभार प्रदर्शित केल्यावांचून ... असो.

... ... हासारु ... करण्याच्या कामीं आमचे मित्र रा. रा. ... ... गोदय पत्राचे मालक व एडिटर, यांनीं ... ... म सुरेखरीतीनें तडीस गेलें हें कळवि-

... ... . आर. डी. लेमॉस, येथील हायस्कू- ... ... ... ... लीनें आपला अमूल्य वेळ मोडून

पुढें दिलेल्या ठाणें जिल्ह्याच्या नकाशाची मूलप्रत काढून दिली याबद्दल आह्मीं त्यांचे फार आभारी आहों.

सरते शेवटीं पित्यानें अकालीं टाकून दिल्यामुळें अप्रसिद्ध राहिलेल्या या पुस्तकरूपी बालकाची चांगली प्रसिद्धि होऊन तें सर्व लोकांच्या आदरास व आश्रयास पात्र होवो अशी जगन्नियंत्याची प्रार्थना करून ही लांबलचक प्रस्तावना पुरी करितों.

**रामकृष्ण नीलकंठ बडे.**

ठाणें,
ता० २८ माहे जून सन १८९१ इसवी.

भा.भू.प्र. २
१

# ठाणें जिल्ह्याचा इतिहास.

———000———

ठाणें जिल्ह्याच्या इतिहासाचे पांच भाग केले आहेत. पहिल्या भागांत सुमारें इ. स. पू. २७० वे वर्षापासून सुमारें इ. स. १३०० पर्यंत प्राचीन हिंदु राजांचे कारकीर्दीचें वर्णन आहे. या भागांतील कांहीं गोष्टी पौराणिक व कांहीं खऱ्याखुऱ्या ऐतिहासिक आहेत. दुसऱ्या भागांत इ. स. १३०० पासून इ. स. १५५० पर्यंत मुसलमानी कारकीर्दीचें वर्णन आहे. तिसऱ्यांत इ. स. १५५० पासून इ. स. १६७० पर्यंत पोर्चुगीज ऊर्फ फिरंगी यांच्या कारकीर्दीचें वर्णन आहे. चवथ्यांत इ. स. १६७० पासून इ. स. १८०० पर्यंत मराठ्यांचे कारकीर्दीचें वर्णन आहे. पांचव्यांत इ. स. १८०० पासून इ. स. १८८२ पर्यंतच्या इंग्लिशांच्या कारकीर्दीचें वर्णन आहे.

# भाग १ ला.

—000—

## प्राचीन हिंदु राजांची कारकीर्द.

इ. स. पू. २७०–इ. स. १३००

अति प्राचीन काळीं पश्चिम हिंदुस्थानाचा परकीय देशांशीं जो व्यापार चालत असे त्याचे संबंधानें सोपारें, चौल, कल्याण, संजाण, व मुंबई यांतून वेळोवेळीं कोणतें तरी एक बंदर प्रमुख असे, ही ठाणें जिल्ह्याचे इतिहासांत एक ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट होय. (हिंदुमहासागराच्या पलीकडच्या देशांशीं ठाणें जिल्ह्याच्या किनाऱ्यावरील स्थळांचा संबंध फार प्राचीन काळापासून आहे.) ईजिप्त व्हा. मिसर देश फिनिशिया, व बाबिलोन यांच्याशीं व्यापाराचे संबंधानें इ. स. पूर्वी २५००वे वर्षापासून इ. स. पूर्वी ५००वे वर्षापर्यंत ह्या किनाऱ्याचा संबंध होता या विषयीं दाखले आढळण्यांत येतात. इ. स. पूर्वी २५०वे वर्षापासून इ. स. नंतर २५०वे वर्षापर्यंत ग्रीक व पर्शियन लोक यांच्याशीं व्यापार ह्या किनाऱ्याचा चालत होता. इ. स. २५० पासून ६४० पर्यंत इराण देशाशीं ह्या किनाऱ्याचा संबंध असून तेथील लोक येथें येऊन राहिलेलेही आढळतात. इ. स. ७०० पासून १२०० पर्यंत मुसलमानांशीं व्यापाराचा संबंध या किनऱ्याचा असून आरबस्थान व इराण येथील लोकही येथें येऊन राहिलेले आढळतात. पुढें इ स. १५३० त पोर्चुगीज लोकांनीं ह्या किनाऱ्याचा कांहीं भाग जिंकून घेतला व इ. स. १६६४ त इंग्लिशांची वसाहत येथें झाली. ह्या अनेकविध परकीय लोकांशीं जो हिंदूंचा संबंध येत गेला त्यांत येथील लोकांनीं मूल्यवान पदार्थ पुरविण्याचे कामाचे संबंधानें मात्र ख्याति मिळविली असें नाहीं, तर व्यापार करणें, वसाहती करणें, खुषकीनें व

४ जलमार्गानें प्रवास करणें ह्या सर्व कामांत हिंदिमहासागराच्या किनाऱ्यावर राहणाऱ्या इतर जातीच्या लोकांची जशी धैर्य व साहस यांचे संबंधानें ख्याति आहे तशीच हिंदूंचीही ख्याति असल्याचे दाखले आढळतात.

तळघाट, नाणेंघाट, माळसेजघाट, बोरघाट ह्या ज्या सह्याद्रि वलांडून घाटावरील मुलखांत जाण्याच्या वाटा आहेत त्यांचे द्वारें इ. स. पूर्वी २२५वे वर्षापासून ठाणें जिल्ह्यांतील बंदरीं मोठा व्यापार चालत आलेला आहे. इ. स. पूर्वी २२५वर्षांपासून आजपर्यंत [इ. स. १८८२]सुमारें२००० वर्षे गेलीं. इतक्या काळांत कधीं कधीं ह्या जिल्ह्याचा परकीय देशांशीं व्यापार मोठ्या भरभराटीनें चाले व कधीं कधीं जिल्ह्यांतल्या जिल्ह्यांत मात्र जुजबी व्यापार चाले. ज्या वेळीं ठाणें जिल्हा व घाटावरचा मुलूख हे एकाच राजाच्या सत्तेखालीं असत तेव्हां ह्या जिल्ह्याचा परकीय देशांशीं व्यापार जारीनें चाले आणि जेव्हां हा जिल्हा व घाटावरचा मुलूख ह्यांवर निरानिराळ्या राजांची सत्ता असे, तेव्हां ह्या जिल्ह्याचा व्यापार जिल्ह्यांतले जिल्ह्यांत मात्र चाले.

वसईच्या उत्तरेस सुमारें सहा मैल अंतरावर सोपारें ह्मणून गांव आहे. तेथें दगडांवर कोरलेले लेख आहेत. त्यांत अशोकवर्धननामक बौद्धमतानुयायी राजानें आपल्या प्रजेस फरमाविलेले हुकूम आहेत. ठाणें जिल्ह्याचे इतिहासांतील पक्षेपर्णी माहित असलेली अशी ही अति प्राचीन गोष्ट होय. ही इ. स. पूर्वी ३ ऱ्या शतकांत घडलेली आहे. कारण अशोकवर्धनराजा सुमारें इ. स. पूर्वी २६५ पासून इ. स. पूर्वी २२५ पर्यंत सिंहासनावर होता. त्या वेळीं सोपारें गांव ह्या प्रांताच्या राजधानीचें शहर होतें व तेथें व्यापारही मोठा चालत असे. ह्या काळाचे पूर्वीचीही सोपाऱ्याविषयींची माहिती मिळते. परंतु ती तितकी विश्वसनीय नाहीं. गौतम बुद्ध हा इ. स. पूर्वी ४७७ वे वर्षापर्यंत हयात होता तेव्हां त्याच्या हयातींत सोपारें राजधानीचें शहर होतें व तेथें व्यापार मोठा चालत असे असें बौद्ध धर्मानुयायांचे ग्रंथांत आढळतें. तथापि ह्या संबंधाची जी गोष्ट त्यांचे ग्रंथांत आढळते ती निदान कांहीं अंशीं तरी मिथ्या असावी असें वाटतें. असो. यात्रा करीत असतां दक्षिण काठेवाडांतील प्रभास ऊर्फ सोमनाथपट्टण येथें येतांनां वाटेत शूर्पारक

ऊर्फ सोपारें ह्या पवित्र तीर्थाचे ठायीं अर्जुन आला होता व ब्राह्मण धर्माचीं ज्यांत अनेक देवळें होतीं अशा एका स्थळीं तो तेथून गेला होता असें महाभारताचे वनपर्वाचे २१८ वे अध्यायांत लिहिलें आहे. हें स्थळ कान्हेरीच्या लेण्याजवळ असावें किंवा खुद्द कान्हेरीचें लेणें हेंच तें स्थळ असावें असें दिसतें.

इ. स. पूर्वी १०००वे वर्षाचे सुमारास सालोमन ह्मणून एक यहुदी होता. त्याणें ओफीर नामक शहर त्या काळीं व्यापाराविषयीं मोठें प्रसिद्ध होतें असें लिहिलें आहे. हें ओफीर व सोपारें यांच्या नांवांत कांहींसें साम्य असल्यामुळें सालोमन यानें ज्याचा उल्लेख केला आहे तें ओफीर हें सोपारेंच होय असें कोणी म्हणतात. प्राचीन ब्राह्मणी व बौद्ध ग्रंथांत सोपारें प्रसिद्ध असल्यामुळें या वरील समजुतीस कांहीं बळकटीही येते. सालोमनचें ओफीर व सोपारें हीं एकच असल्यास या किनाऱ्याचा इजिप्त ह्म. मिसर देशाशीं व्यापार इ. स. पूर्वी २५०० पासून इ. स पूर्वी १६०० पर्यंत चालत होता व नंतर खराखुरा इतिहास ज्या काळचा माहीत आहे तेथपर्यंत ठाणें जिल्ह्याच्या किनाऱ्याचा व्यापार इराण, आरबस्थान, व आफ्रिका या देशांशीं चालत होता असें ह्मणावें लागेल.

सोपारें व सालोमनचें ओफीर हीं दोन्हीं एकच असणें ही गोष्ट असंभवनीय नाहीं, तरी उपलब्ध माहितीवरून ती संशयात्मक वाटते. ह्मणून अशोकवर्धनराजाचे शिळेवर कोरलेले [ इ. स. पूर्वी २२५ ] सोपारें येथें हुकूम आहेत हीच गोष्ट ठाण्याच्या इतिहासांतील अति प्राचीन होय. 'महावंसो' ह्मणून एक बौद्धग्रंथ आहे. त्यांत असें लिहिलें आहे कीं, अशोकवर्धनराजानें धर्मरक्षित नांवाचा एक यवन ह्म. ग्रीक गृहस्थ अपरान्त ऊर्फ कोंकण या प्रांतांत बौद्धधर्माचा उपदेश करण्याकरितां पाठविला होता. त्यानें ७०,००० लोकांना बौद्धधर्मावर व्याख्यान दिलें. तेव्हां त्याच्या श्रोत्यांपैकीं १०००पुरुष व १०००हून अधिक बायका यांनीं बौद्धधर्माचा जोग घेतला. हीं सर्व माणसें क्षत्रिय जातीचीं होतीं. त्यावेळीं कोंकणप्रांत खुद्द अशोकवर्धनाच्या राज्यांत होता किंवा त्याच्या एकाद्या स्नेही राजाच्या अमलांत होता याचा निर्णय करण्यास कांहीं साधन नाहीं.

इ. स. १०० पासून ४०० पर्यंत बौद्धधर्माचा महायाननामक पंथ चालू होता. सोपारें येथील पूर्णनामक बौद्ध साधूची जी कथा प्रसिद्ध आहे ती या पंथाच्या लोकांची आहे. तींत अनेक अद्‌भुत चमत्कार आहेत. ती इ. स. च्या ३ऱ्या किंवा ४ थ्या शतकाहून जुनी नसावी असें अनुमान आहे.तींत लिहिलेल्या गोष्टी एकाद्या विशेषकाळास अनुलक्षून आहेत असें नाहीं. बौद्धधर्माची प्रवृत्ति कोंकणांत कशी झाली व त्यावेळीं सोपाऱ्याची स्थिति कशी होती या गोष्टींचें त्या कथेंत निरूपण असल्यामुळें व अलीकडे सोपारें येथें ज्या प्राचीन वस्तु सांपडल्या आहेत त्यांच्याशीं त्या कथेंतील पुष्कळ गोष्टींचा मेळ असल्यामुळें ती कथा येथें दिली आहे.

इ. स. च्या ३ऱ्या किंवा ४ थ्या शतकांतले नेपाळ व तिबेट येथें जे बौद्धग्रंथ मिळाले त्यांचें भाषांतर बर्नुफनामक फ्रेंच ग्रंथकारानें केलें आहे. त्यांत त्यानें असें लिहिलें आहे कीं, सोपारें हें एक राजधानीचें शहर होतें. त्यांत लक्षावधि लोक होते. त्याला अठरा वेशी होत्या. त्यांत एक बुद्धाचें देऊळ होतें. त्या देवळाला चंदनाचे नक्षीदार खांब होते. त्याचा विस्तार १००० चौरस यार्ड होता. त्यांतील इमारती व बुरूज यांची उंची ९०० फूट होती. तेथें व्यापार मोठा चालत असे. काशीक्षेत्राजवळच्या श्रावस्तीनगरींतून सावकारांचे काफले व्यापाराकरितां तेथें येत असत. या देशांतले व परदेशांतले शेंकडों व्यापारी ज्यांवर असत अशीं मोठमोठीं गलबतें सोपारें एथून दूरदेशीं व्यापाराकरितां जात. व्यापाराकरितां हें जलपर्यटन करण्याचें काम त्यावेळीं मोठें धोक्याचें होतें म्हणून व्यापारी सुखरूप घरीं परत आला म्हणजे जिकडे तिकडे आनंदीआनंद होऊन जातें असे. दोन तीन सफरी ज्या उदम्यानें केल्या असतील त्याची मोठी ख्याति होई. ज्यानें साहा सफरी केल्या तो सातवी सफर करून आपल्यावर संकट ओढून आणण्याचें कधींही मनांत आणीत नसे. निळें, पिंवळें, तांबडें, व पाढरें, बारीक आणि जाडेंभरडें कापड याचा व्यापार चालत असे. गोशीर्षनामक चंदनी लांकडाचाही व्यापार होत असे. चंदनाच्या ओंडक्याचा आकार गाईच्या डोक्यासारखा असल्यामुळें हें नांव त्यास पडलें असावें असें

वाटतें. हीं चंदनी लांकडें मलबारच्या किनाऱ्यावरून आणीत असत. येथें सोन्याचें नाणें चालत असे व व्यापारी मातबर असत. सोपारें शहरचा व्यापार तेथील व्यापाऱ्यांच्या एका वजनदार मंडळीच्या हातीं होता.

यावेळीं या देशांत ब्राह्मणीधर्म चालू होता. मठ होते त्यांत धर्माचरणानें कालक्षेप करणाऱ्या विधवा व ऋषि असत. ते फळें व फुलें यांच्या बागांत सुखानें राहात आणि वल्कलें धारण केलेले साधु डोंगरांच्या उघड्या माथ्यांवर राहात. शिव, वरुण, कुबेर, शक्र, ब्रह्मा, हरि, शंकर, आणि माता यांचा धांवा संकटसमयीं गृहस्थलोक करीत. खेरीज, असुर, महोरग [सर्प], यक्ष, व दानव यांचे द्वारें मनुष्यांचें बरें वाईट होत असतें असेंही ते मानीत असत.

सोपारें येथें एका श्रीमंत सावकाराचा दासीपुत्र पूर्ण या नांवाचा होता. तो आपल्या चातुर्याच्या व शहाणपणाच्या योगानें तेथील प्रमुख सावकारांत मोडूं लागला. ह्या पूर्ण नामक सावकारानें वर वर्णन केलेल्या ब्राह्मणी धर्मावरची व देवांवरची कोंकणांतील लोकांची श्रद्धा उडवून ती बौद्धधर्मावर बसविली. बनारस [काशी] एथील कांहीं व्यापाऱ्यांबरोबर गलबतांत बसून तो चंदनीलांकडांचे देशांत जात असतां ते सावकार लोक सकाळ संध्याकाळ जीं चमत्कारिक गाणीं ह्मणत तीं ऐकून त्याला मोठा आनंद झाला.तेव्हां हीं गाणीं नव्हत तर बुद्धाचीं पवित्र वचनें आहेत असें त्यांनीं त्याला सांगितलें. पुढें सोपाऱ्यास परत आल्यावर पूर्णानें उदीम सोडून दिला व बनारसेस प्रयाण केलें. तेथें गेल्यावर गौतमानें त्यास बौद्धधर्माची दीक्षा दिली. नंतर मला कोंकणांतल्या लोकांना हा धर्म शिकविण्याकरितां पाठवा अशी त्यानें विनंति केली. त्यावेळीं क्रौर्य, रानटीपणा,व भयंकरपणा यांविषयीं कोंकणच्या लोकांची ख्याति होती त्यामुळें पूर्णासारख्या तरण्याताठ्या चेल्यास तेथील लोकांनीं केलेला अपमान सहन होणार नाहीं अशी बुद्ध गौतमाला भीति पडली आणि तो पूर्णाला ह्मणाला, चेल्या, त्यांनीं तुला शिव्या॰ दिल्या तर तूं काय करशील ? तेव्हां तो ह्मणाला गुरुजी, मला मुष्टिमोदक न देतां व दगड न मारितां जर त्यांनीं नुसत्या वाईट शिव्या दिल्या तर ते मोठे मायाळू आहेत असें

मी समजेन. बरें, तुला त्यांनीं मुष्टिमोदक चारले किंवा दगड मारिले तर मग पूर्णा, तूं काय करशील? सोटगे व तरवारी घेऊन माझे अंगावर न येतां फक्त त्यांनीं मला मुष्टिमोदक चारले किंवा दगड मारिले तर ते मोठे मायाळू आहेत असेंच मी समजेन. बरें त्या रानटी कोंकण्यांनीं तुला सोटग्यांनीं मारिलें व तरवारींनीं काटलें तर पूर्णा कसें होईल? मला तात्काळ जीवानिशीं न मारितां त्यांनीं सोटग्यांनीं बडविलें किंवा तरवारींनीं माझें आंग त्यांनीं कापिलें तर मी ते मोठे दयाळू आहेत असेंच समजेन. पूर्णा, त्यांनीं तुला तात्काळ जिवानिशीं ठार केलें तर कसें बरें होईल? त्यांनीं मला ठार मारिलें तर ते मोठे मायाळू आहेत असेंच मी समजेन. कारण त्या योगानें त्यांनीं मला या विनाशी शरीरापासून सोडविल्यासारखें होईल. शाबास! पूर्णा शाबास! तुझ्यासारखा सहनशील चेला कोंकणांत धर्मप्रसारार्थ जाण्यास व तेथें निरंतर राहण्यासही योग्य आहे. इतकें ह्मणून गौतमानें पूर्णास कोंकणांत धर्मप्रसार करण्याकरितां जाण्याची आज्ञा दिली त्यावेळीं तो ह्मणाला ' पूर्णा, स्वतः क्लेशमुक्त होत्साता इतरांस क्लेशमुक्त कर; स्वतः दुःखसागरातीत होत्साता इतरांस दुःखसागरांतून उद्धर; स्वतः सुखी होत्साता इतरांस सुखी कर; आणि स्वतः पूर्णविश्रांतिसुखानुभव घेऊन इतरांसही त्याचा अनुभव येईल असें कर.'

याप्रमाणें गुरूची आज्ञा घेऊन पूर्ण कोंकणांत आल्यावर भिक्षेकरितां फिरत असतां त्यानें एका खेडेगावांतील एक पारधी पारध करण्यास जात आहे असें पाहिलें. हा मुंडण केलेला जोगी त्याचे दृष्टीस पडतांच आपणांस मोठा अपशकून झाला असें समजून त्याला तीर मारण्याकरितां त्यानें हातांत तिरकमठा घेतला. तेव्हां पूर्णानें आपल्या आंगावरची सैली फेंकून दिली आणि त्या पारध्याला ह्मटलें कीं, मला तीर मार, मी आपला जीव बळी देण्याकरितां ह्या कोंकणांत आलों आहें. त्याचा हा धीटपणा पाहून त्या पारध्याला मोठें आश्चर्य वाटलें आणि पूर्णाचे एका केंसालाही धका न लावतां उलटा तो पूर्णाचा चेला बनला. पुढें हा धर्म कोंकणांत पसरत चालला. पुष्कळ पुरुष व बायका ह्यांनीं हा धर्म स्वीकारिला. तेव्हां धर्मप्रसारकांनीं ५०० मठ बांधिले आणि त्यांत बिछाने,

बैठका,नकशीदार पडदे, नकशीदार गाद्या, व नकशीदार पादपीठें ह्यांचा भरपूर पुरवठा केला.

पुढें पूर्ण हा फार प्रसिद्धीस आला. एकदां गलबत बुडूं लागलें ह्मणून त्यावरच्या उदम्यांनीं पूर्णाचा धांवा केला तेव्हां पूर्ण लागलाच प्रकट होऊन त्यानें वदळाची शांति केली. नंतर ते सावकार सोपाऱ्यास परत आल्यावर त्यांनीं तेथें एक बौद्ध देवालय बांधलें. ह्या देवळास आपली पायधूळ लागावी अशी पूर्णानें बुद्धास विनंति केली तेव्हां तो आपल्या मुख्य शिष्यांसहवर्तमान आकाशमार्गानें तेथें आला. येत असतां मार्गांत अनेक स्थळीं तो उतरत असे. एका स्थळीं ५०० विधवा स्त्रिया होत्या त्यांना बुद्धानें दर्शन दिलें व त्यांजकडून बौद्धधर्म स्वीकारविला. नंतर त्यांनीं मागितल्यावरून बुद्धानें आपले कांहीं केंस व नखें त्यांना दिलीं. त्यांवर त्या बायांनीं एक स्तूप (समाध) बांधिला. बनारसेहून बुद्धाबरोबर लोटवन नामक वनांतला एक पिशाच आला होता त्यानें त्या स्तूपासमोरचे अंगणांत एक बकुलवृक्षाची फांदी लाविली. कोणी कोणी ह्या स्तूपाची पूजा 'विधवांचा स्तूप' या नांवानें करीत व कोणी कोणी 'बकुलस्तूप' या नांवानें करीत. सोपाऱ्याचे दक्षिणेस सुमारें एका मैलावर बकाल उर्फ ब्रह्मटेंकडी ह्मणून एक पवित्र स्थान आहे त्याच्या नांवांत व ह्या बकुलस्तूप शब्दांत बरेंच साम्य असल्यामुळें हें ह्या स्तूपाचें दुसरें नांव बरेंच महत्वाचें होय. ह्या टेंकडीवर जिकडे तिकडे समाधि बांधलेल्या आहेत व शिळांवर कोरलेले पुष्कळ लेख आहेत. त्यांची भाषा 'पालि' ह्मणून आहे व ते लेख ख्रिस्तीशकाच्या पूर्वींच्या दुसऱ्या शतकाच्या सुमारास कोरलेले आहेत. यावरून ते दोन हजार वर्षांहून जुने आहेत असें होतें.

त्या ५०० विधवा बरोबर घेऊन बुद्ध दुसऱ्या एका आश्रमांत गेला. तेथें फुलें, फळें, व पाणी यांची विपुलता असून ५०० ऋषि राहात होते. ऐहिकविषयोपभोगमत्त झाल्यामुळें हे ऋषि परलोकपराङ्मुख होते. ह्मणून बुद्धानें तेथील फुलांचा व फळांचा विध्वंस केला, पाणी आटवून टाकिलें, व हिरवें गवत करपविलें. आपल्या सुखसाधनांचा नाश करून टाकिल्यामुळें निराश होऊन त्या ऋषींनीं भगवान बुद्ध याला

बील लाविला. तेव्हां बुद्धानें आपल्या सामर्थ्याच्या योगानें फळें व फुलें हीं पुनः हिरवीं गार केलीं. हें पाहून ते ५०० ऋषि बुद्धाचे चेले झाले आणि बकुलच्या ५०० शिष्यांसह बुद्धाबरोबर आकाश मार्गानें मुसल डोंगरावर गेले. ह्या मुसलडोंगरावर एक वल्कली साधु राहात होता. त्यानें दुरून बुद्धास पाहातांच त्याचे मनांत बुद्धाविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. नंतर तो आपल्याशींच ह्मणाला कीं, मी ह्या डोंगराखालीं उतरून बुद्धाला सामोरा जाऊं काय? तो मला बौद्धधर्मदीक्षा देण्याकरितां खचीत इकडे येत आहे. ह्या डोंगराच्या माथ्यावरून मी आपलें शरीर खालीं कां बरें टाकूं नये? असें ह्मणून त्यानें तेथून खालीं उडी टाकिली व बुद्धानें त्यास वरच्यावर झेललें त्यामुळें त्याला इजा मुळींच झाली नाहीं. नंतर त्याला बौद्ध धर्मशास्त्र बुद्धानें शिकविलें व तो आपल्या ह्या नव्या गुरूचा अति विश्वासु शिष्य झाला. सोपाऱ्यापासून सुमारें अठरा मैल दक्षिणेस गोरेगांव ह्मणून एक रेल्वेचें स्टेशन आहे. त्या स्टेशनाजवळ पडण ह्मणून एक डोंगर आहे. त्या डोंगराचे माथ्यावर मुसल ह्मणून एक साधु राहात असे त्याला अनुलक्षूनच वरील हकीकत बौद्ध ग्रंथांत लिहिलेली असावी असें दिसतें. नंतर मुसलडोंगरावरून बुद्ध निघाला तो सोपारें येथें आला. तो येणार ह्मणून तें शहर स्वच्छ करून सुशोभित केलें होतें व त्या शहराचे अठरा वेशींपैकीं प्रत्येकीवर त्याच्या सन्मानार्थ शिपाई ठेविले होते. अठरा वेशींपैकीं एकींतून आपण शहरांत शिरलों तर आपल्या सन्मानार्थ बाकीच्या वेशींवर ठेविलेल्या लोकांना बरें वाटणार नाहीं असें समजून बुद्ध कोणत्याही वेशीनें शहरांत न शिरतां आकाशमार्गानें जाऊन शहराच्या मध्यभागीं उतरला. नंतर त्याला नवीन बांधलेल्या देवळांत नेलें. त्या देवळाला चंदनी लांकडाचें नक्षीदार काम केलेलें होतें. तेथें गेल्यावर बुद्धानें आपलें शास्त्र लोकांना शिकविलें व लक्षावधि लोकांनीं बौद्धधर्म स्वीकारिला. बुद्ध सोपाऱ्यांत असतांना कृष्ण व गौतम असे दोन नागराजे त्या शहरासमीप येत आहेत असें त्याला समजलें. ते राजे ५०० नाग बरोबर घेऊन समुद्राचे लाटांवरून येत होते. हे नागराजे सोपारें शहरांत शिरले तर

ह्या शहराचा विध्वंस होईल असें समजून बुद्ध त्यांना सामोरा गेला व त्यांजकडून बौद्ध धर्माचा स्वीकार त्यानें करविला.

सोपारें येथील स्तूपांत बौद्धधर्मविषयक प्राचीन वस्तूंचे अवशिष्ट भाग सांपडले आहेत [इ. स. १८८२] ह्यांवरून असें दिसून येतें कीं, इ. स. च्या दुसऱ्या शतकांत सोपारें शहरांत फार कुशल कारागीर होते. ह्या स्तूपांत सांपडलेल्या विटा उत्तम पदार्थांच्या केलेल्या आहेत व त्यांतील मोठी दगडी पेटी फार कुशलतेनें केलेली आहे. तिजवरच्या रेघा स्पष्ट व सरळ असून तिचा पृष्ठभाग मोठ्या कुशलतेनें गुळगुळीत केलेला आहे. तेथें सांपडलेला बिलोरी डबा मोठ्या चातुर्यानें केलेला असून त्याचा घाटही चांगला आहे. तेथें सांपडलेल्या पितळेच्या मूर्ति उत्तम ओतीव कामानें घडलेल्या आहेत व अर्वाचीन काळच्या हिंदूंनीं केलेल्या पितळेच्या वस्तूंपेक्षां त्यांत खांचाखोंचा अधिक असून त्या विशेष सुबकही आहेत. तेथें सांपडलेल्या रूप्याच्या नाण्यांचा सुरेखपणा, तऱ्हे तऱ्हेच्या फुलांचा सुबकपणा, आणि स्तूपाच्या मध्यभागीं सांपडलेल्या धाकट्या सोनेरी डबीची आकृति व नकशी यांवरून सोपारें शहरांतील त्यावेळचे सोनार व रूप्याचें सामान करणारे कारागीर यांचें कौशल्य दिसून येतें.

सोपाऱ्यापासून सुमारें दोन मैलांचे अंतरावर वकाल ऊर्फ ब्रह्मटेंकडी ह्मणून एक डोंगर आहे असें वर सांगितलें आहे. त्या डोंगरावर पालीभाषेंत लिहिलेले जे शिलालेख आहेत त्यांवरून इ. स. पूर्वीं २०० वर्षांचे सुमारास कोट्ट ऊर्फ कोड जातीचे लोक त्यावेळीं मिरतशहराजवळचे मुलखांत राज्य करीत होते व पुढें इ. स. १९० चे सुमारास ते पाटणा येथें राज्य करीत होते असें दिसून येतें. ह्या लोकांची एक वसाहत सोपारें येथें त्या वेळीं होती.

अशोकवर्धनराजाचे कारकीर्दींत पश्चिमेस ईजिप्त ऊर्फ मिसर देशाशीं हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्याचा साक्षात् व्यापार सुरू झाला व पूर्वेस दक्षिणेंतील व्यापाराचें मुख्य पीठ जें तगर शहर त्याच्याशींही सुरू झाला. त्यामुळें हा किनारा विशेष मातबर होऊं लागला. तथापि पश्चिमेस मिसर देशाबरोबर साक्षात् चालणारा व्यापार फारसा जारीनें चालत नव्हता व त्याचा उत्कर्ष सोपारें येथें न होतां भडोच येथें झाला होता.

अशोकवर्धनराजानंतर ठाणें जिल्ह्यावर शतकर्णीवंशीय राजांचा अंमल झाला. ह्या वंशाला सातवाहनवंश व अंध्रभृत्यवंश अशींही दोन दुसरीं नांवें होतीं. ह्या शतकर्णीराजांचा एक शिलालेख नाणेघाटांत आहे. त्यावरून इ. स. पूर्वी शंभर वर्षांचे सुमारास कोंकणांत त्यांचा अंमल होता असें दिसतें. ह्यांची राजधानी गंतूरप्रांतांत होती तिचें नांव धरणीकोट असें होतें. पहिल्या मिथ्रिडेटीस राजानें पार्थियाप्रांतांत आपलें राज्य स्थापिलें [ इ. स. पूर्वी १७४–१३६ ] व रोमच्या बादशाहानें मिसरदेश जिंकिला ( इ. स. पूर्वी ३० वें वर्ष ) त्यावेळीं पश्चिमेकडील देशांशीं कोंकणच्या किनाऱ्याचा जो व्यापार सुरू झाला त्याची अभिवृद्धि या अंध्रभृत्य राजांचे कारकीर्दींत झाल्यामुळें कोंकणाची विशेष चलती झाली. रोमच्या बादशहाचे अमलाखालीं मिसरदेश असतांना हिंदुस्थानाबरोबर त्या देशाचा व्यापार जितका जारीनें चालू लागला तितका त्यापूर्वी तेथें टालेमीवंशीय राजे असतांना कधीं चालला नव्हता. ह्या बादशहानें मिसरदेश घेतल्यास पांच वर्षें झालीं न झालीं तोंच, ह्मणजे इ. स. पूर्वी २५ वर्षांचे सुमारास, हिंदुस्थानाबरोबर व्यापार करण्याकरितां पूर्वी जीं थोडींशीं मिसरदेशचीं गलबतें तांबड्यासमुद्रांत असत त्यांची संख्या १२० पर्यंत वाढली. मिसरदेशीलोक इराणी आखातांतून कराचीस येत त्याच रस्त्यानें आरंभीं रोमनलोक येऊं लागले. पुढें इ. स. ४७ चे सुमारास पावसाळ्यांत मोसम नांवाचे वारे वाहात असतात असें हिपालस याचे नजरेस आलें. तेव्हां ह्या वाऱ्यांच्या साहाय्यानें रोमनलोकांनीं मिसरदेशाहून प्रथमतः गलबतें झिजेरस व मुसिरीस या गांवीं आणिलीं. झिजेरस हें जंजिऱ्याचें व मुसिरिस हें मलबारच्या किनाऱ्यावरील मुरियीकोट्टा या गांवाचें नांव असावें असें अनुमान आहे. रोमनलोकांना मसाल्याचे पदार्थ फार आवडत ह्मणून ते कोंकणापेक्षां मलबारच्या किनाऱ्यावर फार खेपा करीत असें दिसतें. तथापि मलबारापेक्षां कोंकणांत येणें विशेष सोईवार होतें. कारण आरबस्थानच्या किनाऱ्याचे बाजूनें फार्टक भूशिरापर्यंत व तेथून समुद्रांतून कोंकणापर्यंत जाण्याचा रस्ता चांगला माहीत होता. मिसरदेशीय व्यापारी कोंकणांतल्या कोणत्या बंदरीं फार येत हें चांगलेंसें

कळत नाहीं. तरी चौल व जंजिरा किंवा राजपुरी एथें या व्यापाराचा विशेष फैलाव झाला असावा असें दिसतें.

इराणांत इ. स. पूर्वी २५५ पासून इ. स. नंतर २३५ वर्षेपर्यंत पार्थियाचे राजांचा अमल होता. त्यावेळीं इराणाचा हिंदुस्थानाबरोबर व्यापार कितपत चालत असे ह्याविषयीं फारशी माहिती मिळत नाहीं. समुद्रांत सफरी करणें व व्यापार करणें ह्या गोष्टी इराणी लोकांना आवडत नव्हत्या असें ह्मणतात. तथापि रेनाड या ग्रंथकाराचें असें मत आहे कीं, पार्थियांतल्या आरासिडीवंशीय राजांचा इराणांत अंमल होता तेव्हां ते इराणी लोक पूर्वेकडील देशीं जलमार्गानें जाऊं लागले, व हिंदुस्थानांतील माल इराणी आखातांतून जलमार्गानें आणून पुढें पाल्मिराशहरापर्यंत खुषकीनें ते नेऊं लागले. पार्थियाच्या राजांचा इराणांत अंमल असतांना इराणी लोक समुद्रास पूर्वी भीत असत ते भीतनासे झाले व पूर्वेकडील देशांशीं व्यापार मोठ्या जोरीनें करूं लागले. इ. स. च्या पहिल्या शतकाच्या उत्तरार्द्धांत शतकर्णी ऊर्फ अंध्रभृत्य वंशांतल्या राजांना म्लेच्छांनीं कोंकणांतून व दक्षिणापथाच्या उत्तरभागांतून घालवून दिलें. हे म्लेच्छ उत्तरहिंदुस्थानांत राहाणारे होते व हे शक किंवा पार्थियन असावे असें अनुमान आहे. म्हणून इराणीआखाताच्या मार्गानें, इराणावर अंमल करणाऱ्या पार्थियन राजांचा, ठाणेजिल्ह्याच्या किनाऱ्याशीं व्यापार चालत असे ही गोष्ट इतिहासदृष्ट्या महत्वाची आहे. ह्या म्लेच्छांचे पुढारी नहपान व त्याचा जांवई उषवदात हे होते. उषवदात हा आपला सासरा नहपान ह्याचे वतीनें, कोंकण व दक्षिणापथदेशाचा उत्तरभाग ह्यांजवर, सुभेदार होता. नहपान हा प्रथमतः उत्तरहिंदुस्थानांतील राजाचा सेनापति होता. पुढें तो स्वतंत्र झाला आणि क्षत्रपवंशीय राज्याची स्थापना त्यानें केली. हा क्षत्रप शब्द इराणी सत्रप शब्दाचेंच रूपांतर होय. याचा त्या भाषेंत 'राजाचा प्रतिनिधि' असा अर्थ आहे. ह्या क्षत्रपवंशाला सिंह किंवा साह असेंही नाव आहे. ह्या क्षत्रपांचा अंमल काठेवाडांत इ. स. ७८ पासून इ. स. ३२८ पर्यंत होता. उत्तरहिंदुस्थानांत असतांना उषवदात व त्याचें कुटुंब ह्यांनीं बौद्धधर्माचा स्वीकार केला होता असें दिसतें. या म्लेच्छांनीं अंध्रभृत्य राजांना

र्जिकल्यावर त्यांचें म्लेच्छत्व नष्ट झालें, ते हिंदूंशीं विवाहसंबंध करूं लागले, व म्लेच्छनांवांचा त्याग करून हिंदु नांवें धारण करूं लागले. त्यांनीं बौद्ध धर्माच्या अभिवृद्ध्यर्थ पुष्कळ खटपट केली व ब्राह्मणांनाही उदारपणें द्रव्यसाह्य केलें. इ. स. च्या दुसऱ्या शतकाच्या मध्यापर्यंत ( इ. स. १२४ ) नहपानाच्या वंशांतल्या पुरुषांचे हातीं उत्तरकोंकण होतें. नंतर शतकर्णीवंशांतला प्रबल राजा गौतमीपुत्र याने या क्षत्रपवंशी राजांना कोंकणांतून, दक्षिणापथांतून, व कृष्णगिरि ऊर्फ कान्हेरी या डोंगरांतून हाकून लाविलें. साष्टीबेटांतील कान्हेरी एथील लेणीं, तळघाटातलीं नाशकाकडे जाण्याचे मार्गांतलीं लेणीं, नाणेघाट, बेडसें, भाजें, कारली व बोरघाटांतील कोंडाणें येथील लेणीं, सोपारें एथील स्तूप [ समाध ] व घारापुरी आणि कल्याण एथील लेणीं या चमत्कार उत्पन्न करणाऱ्या त्यावेळच्या कृत्यांवरून शतकर्णीराजांचा अंमल असतांना कोंकणप्रांत मोठा मातबर होता असें दिसून येतें. तसेंच ह्या प्राचीन कामांच्या अवशिष्ट भागांवरून असें दिसून येतें कीं त्यावेळचे राजे व व्यापारी हे मोठे गबर होते आणि हीं लेणीं कोरणारे व इमारती बांधणारे कारागीर मोठे कुशल असून परदेशीय होते. ह्या राजांचा अंमल कृष्णेच्या मुखापर्यंत होता. बंगालच्या किनारा व त्याचे पलीकडचे पूर्वेकडील प्रांत ह्यांतील मूल्यवान पदार्थ मच्छलीपट्टण, तगर, व पैठण या शहरांमधून ठाणेंजिल्ह्यांतील बंदरीं आपल्या अमलाचे योगानें आणण्यास ते समर्थ असत. ह्मणून कोंकणप्रांत त्यावेळीं फार गबर झाला होता.

कोंकणप्रांताचा पश्चिमेकडील देशांशीं मोठा व्यापार चालण्यास ह्या जुन्या काळीं विशेष सवडी होत्या. कारण पार्थियाचे बादशहा (इ. स. पूर्वी २५९–इ. स. २२९ पर्यंत) प्रथमतः जरी आडाणी होते तरी पुढें ते मोठे श्रीमान, चैनी, व व्यापारवृद्धीच्छु असे झाले होते. स्ट्राबो बादशाहाच्या ( इ. स. पूर्वी ३० वें वर्ष ) कारकीर्दीतच ही स्थिति येऊन ठेपली होती. नंतर खिस्तीशकाच्या दुसऱ्या शतकाच्या पूर्वार्धांत, ह्मणजे खुसरूबरोबर हाड्रियनबादशाहानें तह केल्यानंतर ४० वर्षेपर्यंत (इ. स. ११६–१५०), पार्थियाची बादशाही व रोमची बादशाही या परस्परांमध्यें व्यापार फार वाढला होता. पाल्मिराशहरच्या बाजारांत बाल्हेनजीकच्या

गेऱ्हा शहरांतून आरबस्थानामधून माल येत असे इतकेंच नव्हे, तर इराणी आखाताच्या वरच्या भागापासून युफ्रेटीस नदीच्या द्वारानें बाबिलोन व क्टेसिफान यांच्यामधून व्होलोजिसोसरटा ह्या नवीन वसलेल्या ( इ. स. ६० ) पेठेंतही माल येत असे. पाल्मिरा येथील इ. स. च्या दुसऱ्या शतकाच्या सुमाराच्या शिलालेखांवरून दिसून येतें कीं, पार्थियाप्रांतामधून व्यापारी सुखरूपपणें पार जात असत व व्होलोजेसोसरटयामधून व्यापाराचा एक मुख्य मार्ग जात असे. सुवासिक पदार्थ, मोत्यें, रत्नें, कापड, मूल्यवान रेशमीकापड, जांभळा रंग दिलेलीं रेशमी उंची वस्त्रें, व भरजरी नक्षीदार वस्त्रें या जिनसांचा व्यापार वरील स्थळीं चालत असे. यावरून त्यांचा हिंदुस्थानाशीं व हिंदुस्थानाच्या द्वारें चीनदेशाशीं निकट संबंध होता असें दिसतें. इ. स. २७३ त पाल्मिरा शहरचा पाडाव केल्यावर आरेलियननामक रोमनबादशहानें, आपला विजय दाखविण्याकरितां, जे बंदीवान आपल्या स्वारीबरोबर घेतले होते, त्यांत पुष्कळ हिंदुलोक होते. यावरून ते हिंदुलोक पाल्मिराशहरांत व्यापाराकरितां जाऊन राहिलेले होते असें दिसतें. हात्रा ऊर्फ अलहाद्रा या शहराचे जे जुने अंश अवशिष्ट राहिले आहेत त्यां खेरीज हिंदूंच्या देशांत पार्थियांतील लोकांनीं बांधिलेल्या इमारतींच्या खाणाखुणा फारच थोड्या आढळतात. तथापि ख्रिस्तीशकाच्या आरंभापूर्वीं व नंतर खुद्द ठाणें जिल्ह्यांत व त्याच्या आसपास जीं लेणीं कोरलेलीं आहेत तीं पार्थियांतील किंवा इराणांतील कारागिरांनीं कोरलीं असावीं असें दिसतें. कारली येथील एका शिलालेखांत अबूलामा एथील हरफारन या नांवाच्या एका कारागिराचें नांव आढळतें. हा हरफारन बहुधा पार्थियांतील किंवा इराणांतील कारागीर असावा. कारली, बेडसें, व नासिक येथील खांबांच्या माथ्यावरचीं जनावरांच्या आकाराचीं उथळीं, आणि इराणांतील परसीपोलीस व सुसा या शहरांतील खांबांच्या माथ्यावरचीं उथळीं, या उभयतांमध्यें फार साम्य असल्यामुळें, फार्ग्यूसन याचें असें मत आहे कीं, पश्चिम हिंदुस्थानांतील प्राचीनकाळचे बौद्धलोक इराणीबादशाहींतले असावे, किंवा निदान इमारती बांधणारे कारागीर तरी त्यांनीं त्या बादशाहींतून आणिलेले असावे.

विष्णुपुराणांत, आणि इ. स. च्या पहिल्या व दुसऱ्या शतकांत कोरलेल्या नासिक येथील व जुनागड येथील शिलालेखांत, शक व यवन लोकांच्या उल्लेखाबरोबर आ पल्हवलोकांचा उल्लेख केलेला आहे, व जे इ. स. च्या पांचव्या व सातव्या शतकाच्या दरम्यान दक्षिणापथ देशांत राज्य करीत होते, ते पल्हवलोक इराणांतील किंवा पार्थियांतील असावे, या मतास वरील हिंदुस्थान व इराण यांमधील निकट संबंधावरून बळकटी येते. इतर म्लेच्छांप्रमाणेंच हे पल्हवही हिंदु बनले होते, व अनेक जातींच्या मिश्रणाच्या योगानें यांच्या मूळच्या जातीचा मागमूस नाहींसा झाला होता.

शातकर्णी ऊर्फ अंध्रभृत्य राजे यांच्या कारकीर्दींत इराणीआखाताच्या मार्गाप्रमाणेंच तांबड्या समुद्राच्या द्वारेंही कोंकणांतील बंदरीं व्यापार चालत असे.

टालेमीनामक भूगोलविद्यावेत्याच्यावेळीं ( इ. स. १३९–१९० ) ग्रीकलोकांना कोंकणाइतकी हिंदुस्थानच्या किनाऱ्याच्या दुसऱ्या कोणत्याही भागाची माहिती नव्हती. जे ग्रीकलोक चौल शहराबरोबर बहुत वर्षें व्यापार करीत असत त्या ग्रीकलोकांपासूनच टालेमी यानें पश्चिम हिंदुस्थानाविषयीं पुष्कळ माहिती मिळविली होती. कान्हेरी, नासिक, कारली, व जुन्नर येथील कोरींव लेण्यांत यवनांनीं देणग्या दिल्याचा उल्लेख आढळतो. यावरून कांहीं ग्रीकलोक या देशांत येऊन राहिले होते व त्यांनीं बौद्धधर्म स्वीकारिला होता असें दिसतें. त्याप्रमाणेंच कांहीं हिंदुलोकही अलेक्झांड्रिया शहरीं गेले होते. त्यांचेपासूनच बहुशः या देशांतील हिंदुक्षेत्रांविषयीं अपूर्व माहिती टालेमी यास मिळाली असावी असें दिसतें. हिंदुस्थानच्या किनाऱ्याची लांबी उत्तरदक्षिण नसून पूर्वपश्चिम आहे अशी टालेमी याची चुकीची समजूत असल्यामुळें त्यानें दिलेलें स्थळांचें वर्णन गोंधळाचें आहे. तथापि त्यानें सांगितलेलीं स्थलांचीं नांवें बिनचूक आहेत. तो हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्याचे सुरास्ट्रेने, लारिके, आरिएके, व दामुरिके असे चार विभाग होते असें म्हणतो. यांपैकीं पहिला हा सौराष्ट्रदेश होय. यांत कच्छ, काठेवाड, व उत्तरगुजराथ यांचा समावेश होतो. दुसऱ्यांत लाटदेश ऊर्फ दक्षिण गुजराथदेश याचा समावेश होतो. तिसऱ्यांत मराठीभाषा बोलणाऱ्या लोकांच्या देशाचा समावेश होतो. कलादगी जिल्ह्यांतील

कानडे लोक मराठे लोकांना अजूनही ' आरे लोक ' असें ह्मणतात. चवथ्यांत दामीळ ऊर्फ तामीळ लोकांच्या देशाचा समावेश होतो. तसेच तो आरिएके प्रांताचे मुख्य आरिएकेप्रांत, सादनचा आरिएके प्रांत, व चांचेलोकांचा आरिएकेप्रांत, असे तीन पोटविभाग सांगतो. त्यांपैकीं पहिल्यांत दक्षिण हिंदुस्थानच्या मुंबईइलाख्यांत येणाऱ्या भागाचा समावेश होतो; दुसऱ्यांत उत्तरकोंकणाचा व तिसऱ्यांत दक्षिणकोंकणाचा समावेश होतो. ह्यानें केलेल्या वर्णनांत सोपारें व चौल हीं किनाऱ्यावरचीं शहरें, सह्याद्रीजवळचें नासिक शहर, आणि पैठण व तगर हीं दोन किनाऱ्यापासून फार दूर असणारीं व्यापाराचीं मुख्य शहरें यांचीं नांवें व त्यांच्या आसपासच्या ठाणेंजिल्ह्यांतल्या सात स्थळांचीं नांवें आढळतात. त्या सात स्थळांचीं हल्लींचीं नांवें कोणतीं हेंही ओळखतां येण्यासारखें आहे. नसरीप, गोआरिसनदी, दुंग, बिंद, सेमुल, बालेपटूना, व हिपोक्यूरा हीं तीं सात स्थळें होत. ह्यांपैकीं पहिलें हें नवसरीचें नांव आहे. जीच्या कांठीं गोरें हें शहर आहे त्या वैतरणानदीचें नांव दुसरें होय. तिसरें हें तुंगार डोंगराचें किंवा वज्रेश्वरीच्या उन्हाळ्याजवळचें दुगाड हें असावें. चवथें वसईच्या खाडीचें नांव होय. तिजवर भाईंदर गांव असल्यामुळें हें नांव तिला दिलेलें आहे. पांचवें हें चौलशहराचें नांव आहे. साहावें महाडाजवळच्या पाल या गांवाचें नांव आहे. व सातवें हें कुलाबाजिल्ह्यांतील घोडेगांवाचे नांव होय.

चौल एथील पेठेंत कोणत्या जिनसांचा व्यापार करण्याकरितां ग्रीकलोक येत असत हें टालेमी यानें सांगितलें नाहीं. तथापि शातकर्णिवंशीयराजांचा अंमल कोंकणांत व दक्षिणेंत असतांनां, सुमारें शंभर वर्षानंतर, भडोच येथें ज्या जिनसांचा व्यापार होत असे ह्मणून रक्तसमुद्रपर्यटननामक ग्रंथाच्या कर्त्यानें सांगितलें आहे, त्याच जिनसांचा व्यापार यावेळेच्या सुमारास चौल एथें होत असावा, असें मानणें सयुक्तिक दिसतें. पश्चिमेकडे तांबडा समुद्र व मिसरदेश यांजबरोबर, आणि पूर्वेस किनाऱ्यापासून फार दूर असणारीं तगर व पैठण शहरें ह्यांचे द्वारें, बंगालच्या उपसागराचे किनाऱ्यापर्यंतचा मुलूख, त्या उपसागरापलीकडचा मलाकादेश ऊर्फ सुवर्णद्वीपकल्प, व चीनदेश, यांच्याशीं मुख्यतः

या कोंकणप्रांताचा व्यापार चालत असे. मिसरदेशांत इकडून तीळ, तेल, साखर, तांदूळ, व आलें हे खायचे पदार्थ; दक्षिणेंतून आलेलीं नानातऱ्हेचीं वस्त्रें, पूर्वकिनाऱ्यावरून आलेले रेशमाचे दोरे, व रेशीम हे प्रावर्णाचे पदार्थ; जटामांसी, गुग्गूळ, व पिंपळी हे मसाल्याचे व औषधाचे जिन्नस; लाख व नीळ हे रंग; हिरे, क्षीरस्फाटिक, पैठणाजवळ विपुलतेनें आढळणारे गोमेद, पाच, वैडूर्यमणी, व मोत्यें, हे शरीरभूषविण्याचे पदार्थ; आणि लोखंड किंवा पोलाद व सोनें हे धातु व्यापाराकरितां जात असत. इटाली व आरबस्थान एथील नानातऱ्हेचीं मद्यें; कापड व चित्रविचित्र कांच्ये हे प्रावर्णाचे पदार्थ; धूप, गोंद, डोळ्यांत घालण्याचा सुरमा, व शिलारस हे मसाल्याचे व औषधाचे पदार्थ; पितळ अथवा तांबें, कथील, शिसें, व सोन्यारुप्याचीं नाणीं हे धातु; पोंवळीं, चांदीचीं नानातऱ्हेचीं मूल्यवान भांडीं, ताटें, व कांच हे पदार्थ; व या देशच्या राजाचे उपभोगार्थ सुंदर दासी विकरीकरितां परदेशांतून इकडे येत असत.

ठाणेंजिल्ह्यांतील बंदरोबंदरीं जे व्यापारी त्यावेळीं होते ते हिंदु होते. बौद्धधर्म व्यापारास अनुकूल असे. त्यामुळें त्या धर्माच्यासंबंधाच्या उत्कृष्ट उत्कृष्ट इमारती कोंकणांतल्या व्यापाऱ्यांनीं बांधिलेल्या होत्या. हिंदूंखेरीज ग्रीक व आरबही प्रमुख व्यापारी असत. त्यांतून कांहीं एथले स्थायिक राहाणारे होते व कांहीं परदेशांतून आलेले असत. इराणीअखातापासून आलेले कांहीं ख्रिस्ती व्यापारीही कल्याण व सोपारें एथें येऊन राहिले होते असें दिसतें. तिरंदाज शिपाई या नात्यानें मात्र रोमनलोक त्यावेळीं हिंदुस्थानांत आलेले होते.

किनाऱ्याचे बाजूनें चालणाऱ्या लहान होड्या, इराणांत जाणारीं मध्यमप्रतीचीं गलबतें, व येमेन आणि मिसरदेश एथें व्यापाराकरितां जाणारीं हिंदुस्थानांतलीं, आरबस्थानांतलीं, व ग्रीसदेशांतलीं, मोठमोठीं गलबतें हीं त्यावेळीं ठाणेंजिल्ह्याच्या बंदरीं आढळत असत. ग्रीस किंवा मिसरदेश एथील गलबतें प्रशस्त व मजबूत असत. तसेंच त्यांजवर माणसें भरपूर असून चांच्यांपासून रक्षण करण्याकरितां तिरंदाजही त्यांचेवर असत. लढाऊ गलबतांहून तीं अधिक वाटोळीं व प्रशस्त

असत आणि तीं व्यापाराचीं गलबतें आहेत असें समजावें लागून डोल- काठीला एक टोपली टांगून ठेवीत. त्यांच्या तळ मजल्याला मेण चोपडलेलें असे व त्यांजवर देवांचीं चित्रें काढलेलीं असत. त्यांत मुख्यतः वरामाचे ठिकाणीं गलबताच्या रक्षकदेवतेचें चित्र असे. या गलबतांचे मालक ग्रीक, हिंदु, व आरब असत आणि वाटाड्ये व खलाशी हिंदु व आरब असत.

इ. स. च्या दुसऱ्या शतकाच्या अखेरीच्या सुमारास ( इ. स. १७८ ) गुजराथच्या क्षत्रपवंशीय प्रख्यात राजांपैकीं रुद्रदामा या नांवाच्या राजानें, आपण एका शतकर्णीवंशीय राजाचा पराभव दोन वेळा केला व उत्तर कोंकणदेश त्याजकडून परत घेतला, असा एक लेख लिहविलेला आढळण्यांत आला आहे. रक्तसमुद्रपर्यटननामक ग्रंथाचा कर्ता बहुशः इ. स. २४७ च्या सुमारास असावा असें अनुमान आहे. ह्या ग्रंथ- कारानें असें लिहिलें आहे कीं, तिसऱ्या शतकाच्या आरंभीं शतकर्णीवं- शीय राजांपैकीं ज्येष्ठ शरगणी राजानें कल्याण गांव मोठी व्यापाराची पेंठ बनवून टाकिली. ज्यावेळीं पूर्वोक्त ग्रंथकारानें आपला ग्रंथ लिहिला त्यावेळीं शतकर्णीवंशीयराजांचा ठाणेंजिल्ह्याच्या किनाऱ्यावरचा अंमल पुनरपि नष्ट होऊन सांदानीज नांवाच्या राजाकडे तो आला होता व त्यानें परदेशांशीं व्यापार अगदीं बंद करून टाकिला होता. त्यामुळें त्यावेळीं ग्रीक गलबतें जर चुकूनमाकून एकाद्या कोंकणच्या बंदरीं आलीं तर त्यांजवर पहारा ठेवून तीं भडोच एथें रवाना करीत असत.

रक्तसमुद्रपर्यटननामक ग्रंथाच्या कर्त्यानें, सोपारें, कल्याण, चौल, व महाडाजवळची पाल, ह्या कोंकणांतल्या स्थळांचा आपल्या ग्रंथांत उल्लेख केला आहे. वरील कलमांत सांगितल्याप्रमाणें मिसरदेशाबरोबर कोंक- णच्या बंदरांचा साक्षात् व्यापार चालणें बंद झालें होतें तरी तो अगदीं बुडाला नव्हता. किनाऱ्याचे जवळून चालणारीं गलबतें या देशांतून निघून, मिसरदेशाहून येणाऱ्या गलबतांना मिळण्याकरितां, मलबार किना- ऱ्यावरील मुसिरिस व नेलकिंडा या बंदरांपर्यंत, व कधीं कधीं त्याहूनही दक्षिणेस सिंहलद्वीपापर्यंत जात. कधीं कधीं तीं कारोमांडेल [चोलमंडल] किनाऱ्यावरील बंदरांत जात व तेथून मच्छलीपट्टणचीं उंचीं वस्त्रें भरून

परत येत. इराणीअखाताच्या पूर्वकिनाऱ्यावरील गेड्रोशिया बंदराबरोबर या देशाचा मोठा व्यापार चालत असे. त्याप्रमाणें आपालोगास शहराबरोबरही व्यापार चाले. इराणीअखाताच्या शिरोभागीं असणारें ओबोला शहर हेंच हें आपालोगास असावें असें दिसतें. इमारतीचीं लांकडें, सागवान, ताशींव लांकडें. व टेंभुर्णीचे ओंडे इकडून गेड्रोशियेस नेत व तिकडून पिण्याची दारू, खजूर, कापड, जांभळें कापड, सोनें, मोत्ये, व दासदासी इकडे आणीत. आरबस्थानचा पूर्वकिनारा, जेथें हिंदुस्थानांतले पुष्कळ लोक जाऊन स्थायिक होऊन राहिले होते तें सोकोत्रा नांवाचें बेट, एडन बंदर, व मोचाजवळचें मुसा शहर या ठिकाणीं इकडून मलमल, धान्य, तेल, कापूस, व दासी विक्रीकरितां जात. त्याप्रमाणेंच झांजीबार व आफ्रिकेंतील बंदरें एथें इकडून धान्य, तांदूळ, लोणी, तीळ, कापूस, कांच्ये, साखर व लोखंड हे जिन्नस जात आणि तिकडून इकडे दासदासी, कांसवाची कंवटी, व जायपत्री आणीत. आबिसिनिया देशांतल्या आडुलीबंदरीं इकडून कापड, लोखंड, कापूस, कांच्ये, मलमल, व लाख नेत आणि तिकडून इकडे हस्तिदंत व गेंड्याचीं शिंगें आणीत.

कान्हेरी एथील नंबर ३ च्या लेण्या समोरच्या धातुगोपांत [ समाधींत ] इ. स. १८३९ त डा. बर्ड यांस एक ताम्रपट सांपडला. तो त्रिकूटकांच्या २४५ वे वर्षी कोरला असा त्यांत उल्लेख आहे. इ. स. च्या पांचव्या शतकांतल्या कोरींव लेखांत ज्याप्रकारची लिपि आढळते त्याच रखी ह्या ताम्रपटाची लिपि आहे. म्हणून, ज्याचा आरंभ इ. स. च्या १७६ व्या वर्षी झाला त्या गुप्तशकाचे २४५ वे वर्षी, ह्मणजे इ. स. ४२१ त, तो लेख कोरविला असावा असें डा. बर्जेस ह्यांचें मत आहे. रघुराजानें कोंकण जिंकलें तेव्हां त्यानें "त्रिकूट पर्वत" हा आपल्या जयाचा स्तंभ केला असें कालिदासानें (इ. स. ५००) रघुवंश काव्यांत सांगितलें आहे.* त्रिकूट याचेंच दुसरें नांव "त्रिगिरि" असें आहे. त्याचें

---

* टीप—मत्तेभरदनोत्कीर्णव्यक्तविक्रमलक्षणम् ।

त्रिकूटमेव तत्रोच्चैर्जयस्तंभं चकार सः ॥ ५९ ॥

रघुवंश—सर्ग ४.

प्राकृत रूप "तगर" असें होतें. पंडित भगवानलाल ह्यांचें मत असें आहे कीं, पुण्याच्या पश्चिमेस उच्चस्थानीं शिवनेरी, गणेशलेणें, व मानमोडी या तीन डोंगरांच्या मध्यें असणारें जें "जुन्नर" शहर तेंच हें तगर शहर होय. इ. स. १८८१त मुंबईबेटांत कांहीं नाणीं सांपडलीं व इ. स. १८८२च्या जून महिन्यांत साष्टीबेटांतील मूळगांव या ठिकाणीं कांहीं नाणीं सांपडलीं. त्यांवर "कृष्णराज" याचें नांव आहे. यावरून ज्याचीं नाणीं नासिकजिल्ह्यांतील बागलाण प्रांतीं सांपडलीं आहेत असा जो प्राचीन राष्ट्रकूटवंशीय राजा कृष्णराज [ इ. स. ३७५–४०० ] त्याचा अंमल उत्तरकोंकणावरही होता असें दिसतें.

या काळाचे सुमारास [ इ. स. २३०–६५० ] इराणांत सासेनियन्‌वंशीयराजांचा अंमल होता. हे इराणचे राजे व पश्चिमहिंदुस्थानांतील राजे यांचें फार सख्य असे आणि ते पूर्वेकडील समुद्रांत व्यापार करणाऱ्यांमध्यें प्रमुख असत. इ. स. च्या साहाव्या शतकाच्या आरंभीं [ इ. स. ५२५ ] मिसरदेशांतून इकडे आलेल्या कास्मास इंडिकोप्ल्युस्टिस नांवाच्या गोसावी व्यापाऱ्यानें, पश्चिमहिंदुस्थानांत त्यावेळीं जे पांच मुख्य राजे होते त्यांपैकीं कल्याणचा राजा हा एक होता व त्याच्या संग्रहीं पांचसाडेहारों हत्ती होते, असें लिहिलें आहे. त्यावेळीं कल्याण व सिंहलद्वीप यांमध्यें मोठा व्यापार चालत असे आणि कल्याण हें पूर्वेकडील व्यापाराचें एक मुख्य स्थान झालेलें होतें. तांबें, पोलाद, टेंभुर्णीचें लांकूड, व कापड हे जिन्नस तेथून सिंहलद्वीपांत जात आणि रेशीम, लवंगा, बोळ, व चंदनीलांकूड तेथून इकडे आणीत. इराणी अखाताजवळच्या क्यूफानजीकच्या हिरा व ओबोले या शहरांबरोबर या प्रांताचा व्यापार पुष्कळ चालत असे. इमारतीचें लांकूड, मिऱ्यें, आलें, मसाल्याचे पदार्थ, कापसाचीं वस्त्रें, व रेशीम हे जिन्नस इकडून इराणीअखाताकडे विक्रीकरितां जात असत. तिसऱ्या शतकाचे अखेरीस या प्रांताचा मिसरदेशाबरोबर चालणारा व्यापार कमी होऊं लागला व साहाव्या शतकाच्या सुमारास तो अगदींच बंद झाला. तथापि, आफ्रिकाखंडांतील बंदरांशीं व्यापार जारीनें चालत असे, व तिकडून इकडे सोनें फार येत असे. हा व्यापार करणारे उदमी जातीनें हिंदु, आरब, इराणी, व

इराणांतले ख्रिस्तीलोक असत. ग्रीसदेशाबरोबर या प्रांताचा व्यापार चालत असे तेव्हां हिंदुलोक जसे दूरदूरच्या प्रदेशीं मुशाफरी करीत त्याप्रमाणें याकाळीं ही करीत असत. त्यामुळें इराण, अलेक्झांड्रिया, सिंहलद्वीप, जावाबेट ( यवद्वीप ), व चीनदेश या ठिकाणीं ते व्यापाराकरितां स्थायिक होऊन राहिलेले असत.

चालुक्यवंशीय राजा " कीर्तिवर्मा " ( इ. स. ५५०–५६७ ) यानें कोंकणांवर प्रथम हल्ला केला त्यावेळीं तो नळ व मौर्य [ मोरे ] यांना कालरात्रीसारखा दुःखद होता असें:—

नलमौर्यकदंबकालरात्रिस्तनयस्तस्य बभूव कीर्तिवर्मा ।
परदारनिवृत्तचित्तवृत्तेरपि धीर्यस्य रिपुश्रियानुकृष्टा ॥ १ ॥

या शिलालेखांतील पद्यांत आहे. यावरून कारमास यानें कल्याणच्या ज्या राजाचें वर्णन केलें आहे तो नलवंशीय किंवा मौर्यवंशीय असावा असें दिसतें. कीर्तिवर्म्याचा नातू दुसरा पुलकेशि (इ. स. ६१०–६४०) याचे कारकीर्दीत चालुक्य [चाळके] राजांनीं कोंकणप्रांत हस्तगत करून घेतला तेव्हां त्याचा सेनापति चंडदंड या मोठ्या लाटेनें मौर्यरूपी डबक्यांचा पराभव केला असें:—

कोंकणेषु यदादिष्टचंडदंडांबुवीचिभिः ।
उदस्तास्तरसा मौर्यपल्वलांबुसमृद्धयः ॥ १ ॥

या पद्यांत आहे. या चालुक्यराजांच्या सेनापतीनें, त्यावेळीं शेंकडों गलबतें बरोबर घेऊन, पश्चिम सागराची केवळ लक्ष्मीच अशी पुरीनामक नगरी मौर्यराजांची राजधानी होती तिजवर हल्ला केला, असें पुढील शिलालेखपद्यांत आहे:—

अपरजलधेर्लक्ष्मीं यस्मिन् पुरीं पुरभित्प्रभे
मदगजघटाकारैर्नावां शतैरवमृद्नति ।
जलदपटलानीकाकीर्णं नवोत्पलमेचकं
जलनिधिरिव व्योम व्योम्नः समोऽभवदंबुधिः ॥ १ ॥

ठाणेंजिल्ह्याच्या उत्तरभागीं वाडें ह्मणून गांव आहे तेथें एक शिलालेख सांपडला आहे. तो इ. स. च्या ३ ऱ्या किंवा ५ व्या शतकांतला असावा. त्यांत लिहिलें आहे कीं, तो लेख कोरला त्यावेळीं

कोकणांत मौर्यवंशीय राजा सुकेतुवर्मा याचा अंमल होता. भिवंडीच्या आग्नेयी दिशेस साहा मैलांवर लोनाडचें लेणें आहे तें इ. स. च्या साहाव्या किंवा सातव्या शतकांत कोरलेलें असावें. त्यांत जीं चित्रें कोरलेलीं आहेत तीं एका मौर्यवंशीय राजाचे दरबारी मंडळीचीं असावीं असें अनुमान आहे.

इराणांत नौशिरवान नामक प्रख्यात राजा (इ. स. ५३१-५७८) होता तेव्हां पूर्वेकडील समुद्रांत व्यापार करणाऱ्यांत इराणीलोक प्रमुख होते. त्यासमयीं पश्चिमहिंदुस्थान व इराण यांचा व्यापाराचे द्वारें अतिनिकट संबंध होता. इराणचा शेवटचा सासेनियनवंशीय राजा तिसरा येजदेजर्द याचा आरबांनीं [इ. स.६२५ व ६३८] पराभव केला तेव्हां पुष्कळ इराणीलोक[पारसी] आश्रयाकरितां ठाणेंजिल्ह्याचे किनाऱ्यावर आले. त्यासमयीं संजाणचा जाधव राणा (हा बहुशः यादववंशीय राजा असावा) यानें मोठ्या कृपालुपणानें त्यांचें आगतस्वागत केलें. इराणदेश घेतल्यानंतर आरबांनीं पश्चिमहिंदुस्थानच्या किनाऱ्यावर पुष्कळ-वेळा हल्ला केला. त्यांपैकीं एका प्रसंगीं [इ. स. ६३७त] इराणीअखा-ताजवळचे बाऱ्हें व ओमन एथून जे आरब आले होते त्यांनीं ठाण्याज-वळ या कोंकण प्रांतांत लुटालूट केली.

या काळानंतर, या प्रांतांत शिलाहार [शेलार] वंशीय राजांचा अंमल होईपर्यंत, या प्रांताच्या इतिहासाची फारशी माहिती मिळत नाहीं. आजपर्यंत जी माहिती मिळाली आहे तिजवरून शिलाहार[शेलार] वंशीय वीस राजांचीं नावें समजलीं आहेत. सुमारें इ. स. ८१० पासून इ. स. १२६० पर्यंत, ह्मणजे एकंदर ४५० वर्षेपर्यंत, उत्तरकोंकणांत या राजांचा अंमल होता.

उपलब्ध माहितीवरून या वीस राजांची वंशावळ अशी आहे:—

(१) कपर्दी

(२) पुलशक्ति

(३) दुसरा कपर्दी ऊर्फ लघुकपर्दी (शके ७७५–७९९

(४) वप्पुवन्न

(५) झंज (इ. स. ९१६) — (६) गोग्गि

लस्थियव्वा कन्या (हिचा चांदूर एथील यादव वंशीयराजा चवथा भिल्लम याच्याशीं विवाह झाला होता) — [(५) झंज यांची]

(७) वज्जददेव (वज्रदेव) — [(६) गोग्गि यांचा]

(८) अपराजित (शक ९१९)

(९) दुसरा वज्जदेव (वज्रदेव) — (१०) अरिकेसरी (शक ९३९)

(११) चित्तराज (शक ९४८) — (१२) नागार्जुन — (१३) मुम्मुनि (शक ९८२)

(१४) अनंतदेव (शक १००३ व १०१६)

(१५) अपरादित्य (शक १०६०)

(१६) हरिपालदेव (शक १०७१, १०७२, १०७५)

(१७) मल्लिकार्जुन (शक १०७८ व १०८२)

(१८) दुसरा अपरादित्य (शक ११०६ व ११०९)

(१९) केशिदेव (शक ११२५ व ११६१)

(२०) सोमेश्वर (शक ११७१ व ११८२)

या वंशावळींतल्या अनंतदेवापर्यंत परस्परांच्या संबंधाची पक्की माहिती आहे. त्यानंतरच्या साहा राजांपैकीं पुढचा मागच्याचा पुत्र होता अशी

खातरी नाहीं. फक्त मागच्यानंतर पुढचा पुरुष राजा झाला एवढें मात्र पक्कें माहीत आहे. दक्षिणकोंकणांत एक व कोल्हापूर प्रांतांत एक असे दुसरे दोन शिलाहारराजवंश होते. दक्षिणकोंकणांतल्या शिलाहारांची राजधानी खारेपाटणाजवळ होती व कोल्हापूर प्रांतांतल्या शिलाहारांची राजधानी पन्हाळगडकिल्ला एथें होती. दक्षिणकोंकणांत या शिलाहारवंशाचे दाहा राजे असून इ. स. ८०८ पासून इ. स. १००८ पर्यंत त्यांचा तेथें अंमल होता असें उपलब्ध असलेल्या एकाच कोरींव लेखावरून दिसतें. परंतु हे दक्षिणकोंकणांतले दाहा राजे स्वतंत्र नव्हते. ते प्रथमतः राष्ट्रकूटवंशीय राजांचे मांडलिक होते व नंतर चालुक्य राजे त्यांचे यजमान झाले. कोल्हापूरच्या शिलाहारांचे अकरा कोरींव लेख सांपडले आहेत त्यांवरून असें दिसून येतें कीं, इ. स. ८४० पासून ११९० पर्यंत सोळा राजे झाले. या कोल्हापूरच्या शिलाहारांपैकीं विजयार्क [ इ. स. ११९१ ] ह्मणून एक राजा होता. त्यानें ठाणें व गोवें एथील पदच्युत राजांना पुनः गादीवर बसाविलें असें एका कोरींव लेखांत लिहिलेलें आहे.

शिलाहार हे कोण होते याविषयीं खातरीलायक माहिती मिळत नाहीं. शिलाहार, शैलाहार, श्रीलार, शिलार, सिलार, अशीं अनेक रूपें या नांवाचीं आढळतात. एकाच शिलालेखांतही एकाहून अधिक रूपें आढळतात. एका शिलालेखांत तर सिलार, शिलार, व श्रीलार अशीं तिन्ही रूपें आहेत. लासेननामक जर्मन पंडित शिलाहार हे मूळचे अफगाण असावे असें म्हणतो. कारण सांप्रतही आफगाणि-स्थानांत सिलारकाफर ह्मणून लोक आढळतात. उत्तरकोंकणांतील बहुतेक शिलाहारराजांच्या प्रधानांच्या नांवाचे शेवटीं अय्या हा द्राविडी प्रत्यय आढळतो व कांहीं राजांचीं नांवेंही संस्कृताहून भिन्न भाषेंतलीं दिसतात. यावरून ते द्राविड असावे असें दिसतें.

मराठ्यांमध्यें "शेलार" हें उपनांव आढळतें. शिलाहार हें त्या मराठी नांवाचेंच संस्कृतरूप असावें असेंही संभवनीय दिसतें. या शिलाहारवंशाचे उत्पत्तीविषयीं पुराणांत अशी कथा आढळते कीं, जीमूतवाहन ह्मणून एक विद्याधर होता. तो शाप झाल्यामुळें मानव

योनींत जन्मास आला. इकडे, गरुडानें सर्पांचा राजा वासुकी यांचा पराजय करून, त्याच्यापासून दररोज एक सर्प बळी घेण्याची सुरुवात केली. कांहीं दिवस लोटल्यावर, शंखचूडनामक सर्पाची पाळी गरुडाकडे जाण्याची आली, व नित्य नियमाःप्रमाणें तो नेमलेल्या शिळेवर जाऊन बसला. तेव्हां जीमूतवाहनाला त्याची कींव येऊन, तो त्याच्या जागीं जाऊन बसला. नंतर गरुड येऊन, त्यानें मस्तकाखेरीज त्याचें सर्व शरीर भक्षिलें. इतक्यांत जीमूतवाहनाची स्त्री तेथें आली, व आपल्या पतीस गरुडानें भक्षिलें असें पाहून, तिनें त्याची निंदा केली. तेव्हां गरुडानें जीमूतवाहनास जिवंत केलें, व त्याच्या स्त्रीच्या विनंतीवरून, प्रत्यहीं एका सर्पाचा जीव घेण्याचा क्रम त्यानें बंद केला. याप्रमाणें परोपकार करण्याकरितां, शिळेवर बसून जीमूतवाहन हा गरुडाचा आहार झाला; ह्मणून त्याच्या वंशाला "शिलाहार" असें नांव प्राप्त झालें. हीच कथा श्रीहर्षकृत "नागानंद" नामक नाटकांत नाटककारानें वर्णिलेली आहे.

हे उत्तरकोंकणांतील शिलाहार राजे, प्रथमतः राष्ट्रकूट [ राठोड ] वंशीय राजांचे, मांडलिक होते. पुढें, दाहावे शतकाचे अखेरीस ( इ. स. ९९७ ); अपराजितराजा स्वतंत्र झाला. हल्लीं ठाणें व कुलाबा या दोन जिल्ह्यांत जितका मुलूख आहे; त्यांतील बहुतेक मुलूख, ठाणें एथील शिलाहारांचे अमलाखालीं होता. त्यांची राजधानी "पुरी" नामक नगरी होती. त्यांच्या कारकीर्दींत, डहाणू तालुक्यांतलें हमजमन ह्मणजे संजाण, ठाणें [ श्रीस्थानक ], सोपारें [ शूर्पारक ], चौल [ चेमुली ], लोनाड [ लवणतट ], व उरण, हीं प्रख्यात स्थळें होतीं. याखेरीज भादाणें, पडघें, व बावगांव, हीं लहान गांवें; भिवंडीतालुक्यांतली कुंभारी नदी; वसई तालुक्यांतलें कण्हेर, व उरणाजवळचें चांजें ( चाडिचें ) गांव, या अप्रसिद्ध स्थळांचाही उल्लेख त्यांच्या कोरींव लेखांत आढळतो. घारापुरीबेटांतलें मोरें बंदर हीच शिलाहारांची पुरीनामक राजधानी असावी असें दिसतें. यादव [ जाधव ] वंशीय राजे आपणांस द्वारवतीपुरीश्वर ह्मणवीत, व कदंब ( कदम ) वंशीयराजे आपणांस वनवासीपुरीश्वर ह्मणवीत, त्याप्रमाणें शिलाहारराजे आपणांस तगरपुरेश्वर ह्मणवीत असत असें, "शिला-

हाराख्यवंशीयं तगरेश्वरभूभृताम्," या कोरींव लेखांतील पद्यार्द्धावरून दिसून येतें. तगर शहर अमुक ठिकाणीं होतें, अशी खातरीलायक माहिती असती तर, तिच्यावरून या शिलाहारांच्या उत्पत्तीविषयीं विशेष छडा लावण्यास मदत झाली असती. परंतु, तगर शहर कोठें होतें, याविषयीं मतभेद फार आहे. विल्फोर्ड हा देवगिरि ऊर्फ दवलताबाद हेंच तगर शहर असें ह्मणतो; दौलताबादेपासून चार मैलांवर 'रोझा' ह्मणून जें स्थल आहे तें तगर असें डा. बर्जेस ह्मणतो; लासन व यूल कलबुर्गी हें तगर असें ह्मणतात; पंडित भगवानलाल जुन्नर हें तगर असें ह्मणतात; गोदावरीच्या कांठावरचें बीड हें तगर असें ग्रांट डफ ह्मणतो; कोलापुराजवळ तगर होतें असें फ्लीट ह्मणतो; व निजामाच्या राज्यांतलें धारूर हें प्राचीन तगर शहर होय असें डा. भांडारकर ह्मणतात. सारांश, ह्या तगर शहरच्या स्थळाविषयीं पंडितांचें एक मत नाहीं. शिलाहारांच्या कोरींव लेखांत तगर शहराचा उल्लेख येतो. या खेरीज, इ. स. ६१२ तला चालुक्य राजांचा एक ताम्रपट हैदराबादेजवळ सांपडला आहे, त्यांत मात्र या तगर शहराचा उल्लेख आहे. टालेमीच्या ग्रंथांत, व रक्तसमुद्रपर्यटन नामक ग्रंथात, या तगर शहराचे जे जे उल्लेख आलेले आहेत, त्यांवरून पैठणच्या पूर्वेस, फार अंतरावर, तगरशहर होतें असें दिसतें. तसेंच, किनाऱ्यावरच्या स्थळांहून तगर एथें आणिलेल्या पुष्कळ वस्तु, बैलगाड्यांतून, भडोच [भृगुकच्छ] येथें पाठवीत, असें मार्गे सांगितलें आहे. त्यावरून, बंगालच्या उपसागरावरील स्थळांशीं तगर शहराचें दळणवळण होतें, व पूर्वेकडील प्रांतांतून मालखेट, कल्याण, बेदर, गोंवळकोंडें, व हैदराबाद येथें, जे व्यापाराचे जिन्नस पुढें येऊं लागले, ते पूर्वी तगर शहरीं येत असत, असें दिसतें.

ठाणें एथील शिलाहार शैव होते असें त्यांच्या ताम्रपटांवरून व कोरींव लेखांवरून दिसतें. पहिला शिलाहार राजा कपर्दी, हा जिमूतवाहनाच्या वंशांतला होता, या खेरीज त्याचे विषयीं दुसरी माहिती मिळत नाहीं. त्याचा पुत्र पुलशक्ति, हा कोंकणांतल्या मंगळपुरी नगरीचा सुभेदार होता, व राष्ट्रकूटराजा अमोघवर्ष याचा तो अतिनम्र सेवक होता, असें कान्हेरी एथील ७८ नंबरच्या लेण्यांतल्या एका कोरींव

लेखांत लिहिलेलें आहे. तिसरा राजा व दुसरा कपर्दी हा पुलश. क्तीचा पुत्र होता व त्याला लघुकपर्दी म्हणत. कान्हेरी एथील नंबर १० व ७८ या दोन लेण्यांत, इ. स. ८५३ व ८७७ तले, दोन कोरीव लेख आहेत. त्यांत लिहिलें आहे कीं, हा कपर्दी राजा राष्ट्रकूट राजांचा मांडलिक होता. दुसऱ्या कपर्दीचा मुलगा वप्पुवन्न हा या वंशांतला चवथा राजा होता, व त्याचा मुलगा झंज हा पांचवा राजा होता. इ. स. ९१६ त सेमूर ( चौल ) एथें झंज राजा राज्य करीत होता, असें, आरब इतिहासकार मसुदी, यानें आपल्या ग्रंथांत लिहिलें आहे. इ. स. १०९४ तल्या एका ताम्रपटांत, झंज यानें शंभूचीं बारा देवळें बांधिलीं, असें सांगितलें आहे. त्यावरून तो मोठा कडकडीत शैव होता असें दिसतें. यादवांच्या एका ताम्रपटांत पुढील पद्य आहे:—

> भार्या यस्य च झंजराजतनया श्रीलस्थियव्वाह्वया
> धर्मत्यागविवेकबुद्धिसगुणा श्रीराष्ट्रकूटान्वया ।
> या जाता नवबालजन्मसमये यद्वन्वयाधारिता
> सप्तांगोद्यतराज्यभारधरणाद्राज्यत्रयाद्यां ततः ॥ १ ॥

त्यावरून, चांदूर एथील यादववंशीय राजा चवथा भिल्लम, याच्याशीं झंज राजाची कन्या लस्थियव्वा [ लक्ष्मीबाई ] इचा विवाह झाला होता, असें दिसतें.

झंजानंतर त्याचा भाऊ गोग्गि हा गादीवर बसला, व त्याच्या नंतर त्याचा पुत्र वज्जदेव हा राजा झाला. आठवा राजा अपराजित ऊर्फ विरुदकर्मा हा वज्जदेवाचा पुत्र होता. ह्याच्या कारकीर्दींतला, शक ९१९ तला, एक ताम्रपट, भिवंडीच्या उत्तरेस दाहा मैलांवर भरें ह्मणून एक गांव आहे, तेथें आलीकडे सांपडला आहे. त्यावरून असें दिसतें कीं, या अपराजिताचे कारकीर्दींत, त्याचा यजमान राष्ट्रकूट वंशीयराजा कर्कराज ऊर्फ कक्कल याचा, चालुक्य राजा तैलप यानें पराभव करून वध केला, व इ. स. ९७२ आणि ९९७ यांचे दरम्यान अपराजित स्वतंत्र झाला. हा ताम्रपट श्रीस्थानक ऊर्फ ठाणें एथें, शक ९१९ आषाढ वद्य ४ थीस, कोरविला. ह्यांत, भिवंडीच्या पूर्वेस आठ मैलांवर भादाणें ह्मणून गांव आहे तें, लोनाड [ लवणतट ] एथील लोणादित्य देवाचे पूजे-

करितां, दक्षिणायनदान म्हणून इनाम दिलें, असा उल्लेख आहे. संगलय्या व सिंहापय्या असे ह्या अपराजिताचे दोन प्रधान होते. संगलय्याचा पुत्र अनपय्या यानें हा ताम्रपटावरचा लेख लिहिला होता.

चवदावा शिलाहारराजा अनंतदेव याचा, इ. स. १०९४ तला, एक ताम्रपट सांपडला आहे. त्यांत लिहिलें आहे कीं, अपराजितानें गोम्म याचा आदरसत्कार केला, ऐयप्पादेव याचें सिंहासन डळमळूं लागलें होतें तें स्थिर केलें, व भिल्लमाम्ममनंबुद्ध यास निर्भय केलें. यांपैकीं गोम्म व ऐयप्पादेव यांविषयीं कांहींएक माहिती मिळत नाहीं. तिसऱ्या नांवापैकीं झंझराजाचा जांवई भिल्लम याचे नांवाएवढा भाग मात्र उमगतो. बाकीचें कांहींएक कळत नाहीं. अपराजिताचा पुत्र वज्जदेव हा त्याच्या मागें गादीवर बसला. तो निवर्तल्यावर त्याचा भाऊ अरिकेसरी हा राजा झाला. त्याचा एक ताम्रपट, इ. स. १०९७ तला, उपलब्ध आहे. त्यांत असें लिहिलें आहे कीं, ज्यांत १४०० गांव होते अशा, कोंकणाचा तो अधिपति होता. त्या ताम्रपटांत श्रीस्थानक, पुरी, व हम्यमान ( संजाण ), या शहरांच्या नांवांचाही उल्लेख आहे. ठाणें येथील किल्ल्यांत, इ. स. १७८७ त, पाया खणीत असतांना, हा ताम्रपट सांपडला. वासप्पय्या व वर्धापय्या हे अरिकेसरीचे प्रधान होते. श्रीस्थानक एथील चिनप्पय्या ज्योतिषी, याचा पुत्र टिकप्पय्यानामक उपाध्याय यास, या ताम्रपटाचे द्वारें, अनेक गांव दान दिलेले आहेत. शक ९३९ पिंगलसंवत्सरांत, कार्तिकशुद्ध १५ भेस, खग्रास चंद्रग्रहण होतें, त्याप्रसंगीं हें भूमिदान केलेलें आहे. नागलय्यानामक एक मोठा भाट होता, त्यानें या ताम्रपटावरील मजकूर लिहिला, व वेदप्पय्याचा पुत्र मांधारप्पय्या, यानें तांब्याच्या पत्र्यांवर तो मजकूर कोरला. वज्जदेवाचा पुत्र चित्रराजदेव हा अकरावा शिलाहारराजा होता. शके ९४८ [ इ. स. ११२६ ] तला, एक ताम्रपट मिळाला आहे, त्यांत असें लिहिलें आहे कीं, कोंकणांतील १४०० गांवावर त्या राजाचा अंमल होता, व त्यांत पुरी आणि हम्यमान ( संजाण ) हे गांव मुख्य होते. सर्वाधिकारी नागनय्या, संधिविग्रह [तह व लढाई] कर्ता सिंहप्पय्या, व कर्णाटकां [कानडाप्रांतां] तील संधिविग्रहकर्ता कपर्दी, हे त्याचे

तीन प्रधान होते. शक९४८ [इ. स. १०२६] क्षयसंवत्सरांत, कार्तिक शुद्ध १९ मेस रविवारीं, हा ताम्रपट कोरलेला आहे. श्रीस्थानकांतर्गत षटषाष्टि (साष्टि) तालुक्यापैकीं नौर [हें सांप्रत भांडुपच्या उत्तरेस असलेलें नाऊर गांव होय] गांवांतील एका शेतांतील जमिनीचें दान केल्याचा मजकूर यांत आहे. सामवेदाच्या एका शाखेचें अध्ययन करणारा विप्रनोदमय्या,याचा पुत्र आमदेवय्या ब्राह्मण, हा या दानाचा प्रतिग्रह करणारा होता. चित्तराजदेवाचा कनिष्ठ बंधु नागार्जुन बारावा शिलाहारराजा होता. त्याच्या मागें त्याचा धाकटा भाऊ, मुम्मुनि ऊर्फ मामवानी, हा राजा झाला. इ. स. १०६० [ शके ९८२ ] तल्या एका कोरींवलेखांत याच्या नांवाचा उल्लेख आढळतो. कल्याणाजवळ, अंबरनाथाचें देऊळ आहे, त्यांत हा लेख कोरलेला आहे. त्यांत, या राजाचें नांव मामवानी-राजदेव होतें असें सांगून, विन्तप्पय्या, नागनय्या, वकदय्या, जोगलय्या, पाधिसेन, व भैलय्या, हे त्याचे प्रधान होते, ह्मणून सांगितलें आहे. चित्रराजदेवानें एक देवालय बांधिल्याचाही मजकूर या लेखांत आहे. चवदावा राजा, मुम्मुनी ऊर्फ मामवानी याचा पुत्र,अनंतपाळ ऊर्फ अनंतदेव, याच्या नांवाचा उल्लेख, इ. स. १०८१ व इ. स. १०९६ तल्या, दोन दानलेखांत आहे.यांपैकीं पहिला शिलालेख साष्टीतालुक्यांतील विहाडगांवीं सांपडला, व दुसरा रत्नागिरी जिल्ह्यांतील देवगड तालुक्यांतल्या खारेपाटणगांवीं सांपडला. पहिला दगड विहाड एथें १८८१ त सांपडला. त्यांत, शक १००३ ( इ. स. १०८१ ) त, अनंतदेवानें दिलेल्या दानाचा उल्लेख आहे. त्यावेळीं त्याचा प्रधान रुद्रपय्या हा होता. व्यादिक उपनावाच्या, मात-य्यानामक पुरुषाच्या, अजपालय्या नांवाच्या पुत्राचाही, या कोरींव लेखांत उल्लेख असून, खारासान ( ? ) मंडळीस कांहीं द्रम्म नांवाचीं नाणीं दिल्याचा मजकूर यांत आहे. खारेपाटणचे ताम्रपट फार वर्षांपूर्वीं सांपडले असून त्यांत अनंतदेवापूर्वींच्या सर्व तेराही शिलाहारराजांचीं नांवें आहेत. इ. स. १०९६ तल्या कोरींव लेखांत असें लिहिलें आहे कीं, कोंकणातल्या १४०० गांवांवर अनंतदेवाचा अंमल चालत होता, व त्यांत पुरी हेंशहर मुख्य असून,त्याचे खालोखाल हंजमन [ संजाण ] हें शहर होतें. वैर करणाऱ्या आप्तांच्या अधिकारोदया-

मुळें उद्भवलेल्या संकटसमयीं, ज्यांनीं देवब्राह्मणांस त्रास देऊन सर्व कोंकण उद्ध्वस्त केलें होतें असे पापरूपीपर्वत, आपल्या खड्गधारारूपी सागरांत, अनंतदेवानें फेंकून दिले, असेंही त्यांत लिहिलें आहे. नौविंतक वासदय्या. ऋषिभट्ट, पाधिसेन महादेवय्या प्रभु, व सोमनय्या प्रभु, हे त्याचे प्रधान होते. शक १०१६ ( इ. स. १०९४ ) भावसंवत्सरीं, माघ शु. प्रतिपदेस, हा लेख कोरलेला आहे. वालीपत्तन ( हें बहुधा कुलाबा जिल्ह्यांतील महाड तालुक्यांतलें पाल नांवाचें गांव असावें) एथील महाप्रधान दुर्गाशेट, याचा पुत्र महाप्रधान भाबण्णाशेट, व बंधु धनमशेट, यांच्या मालाच्या गाड्यांवर जकात घेऊं नये, अशाबद्दल हा कोरींव लेख आहे. श्रीस्थानक, नागपूर ( हें बहुधा नागोठणें असावें ), शूर्पारक ( सोपारें ), चेमुली [ चौल ], आणि कोंकणांतल्या १४०० गांवापैकीं इतर सर्व बंदरें, यांतून कोणतेही ठिकाणीं येण्यास त्यांचे गाड्यांस प्रतिबंध नसावा, व नौरिका (?) चा उदीम करणाऱ्यांचें या प्रांतीं येणें व बाहेर जाणें यांवरही जकात नसावी, असे यांत सांगितलें आहे.

जमिनीच्या देणग्यांचा ज्यांत उल्लेख आहे, अशा शिलालेखांवरून, अनंतदेवामागून झालेल्या साहा राजांचीं नांवें उपलब्ध झालीं आहेत. ह्या शिलालेखांत वंशावळ नसल्यामुळें, ह्या साहा राजांचा परस्पर शरीरसंबंध काय होता, हें कळत नाहीं.

ह्या साहा राजांपैकीं पहिला राजा अपरादित्य ह्याचे नांवाचा उल्लेख, इ. स. ११३८ ( शक १०६० ) तल्या, शिलालेखांत आहे. करंजें पेट्यांतील उरण गांवानजीकच्या चांजें गांवीं हा दगड इ० स० १८८१ त सांपडला. अपरादित्याची आई लीलादेवी, इला पुण्यप्राप्ति व्हावी ह्मणून, नागूम [ हें बहुधा उरणाच्या पश्चिमेस सुमारें चार मैलांवर असलेलें नागांव असावें] गावांतील एक शेत दान दिल्याचा उल्लेख यांत आहे. काश्मीर एथें पंडितांची सभा भरली होती तेव्हां, तेथें कोंकणच्या अपरादित्य राजानें तेजकंठ नांवाचा पंडित शूर्पारक (सोपारें) एथून पाठविला होता, असें मंखककवीनें आपल्या श्रीकंठचरित नामक काव्यात लिहिलें

आहे, तोच हा अपरादित्य राजा होय.* ह्या काव्यांत काश्मीरांत भरलेल्या पंडित सभेचें सविस्तर वर्णन केलेलें आहे. इ० स० ११३५ ते ११४५ पर्यंतच्या मुदतींत हें काव्य रचलें असावें असें डा० बूल्हर ह्यांचें मत आहे.$ अपरादित्यानंतर हरिपालदेव राजा झाला. इ. स. ११४९, ११५०, ११५३, म्ह. शक १०७१, १०७२, १०७५, ह्या सालच्या तीन शिलालेखांत ह्याचें नांव आढळतें. सोपारें एथील जयराम भास्कर सोनार, याच्या घराच्या मागच्या पडवीच्या जोत्याला, ११४९ तल्या शिलालेखाचा दगड, लाविलेला आहे. त्यांत लिहिलेलें राजाचें नांव संदिग्ध आहे. कुरपालदेव असेंही तें होऊं शकेल. इ. स. ११५० तल्या लेखाचा दगड, इ. स. १८८१ त, आगाशीगांवाजवळ सांपडला. शके १०७२ प्रमोदसंवत्सर, मार्गशीर्ष प्रतिपदा, या दिवशीं तो कोरलेला आहे. वेसुपडवळ, लक्ष्मण प्रभु, पद्मशिव राऊळ, व वासुगी नायक, हे हरिपालदेवाचे प्रधान होते. शूर्पारकां [ सोपारें ] तर्गत वट्टारक ( वटार ) गांव आहवमल्ल नामक राजपुत्राकडे होतें. त्या राजपुत्रानें, गोवर्धनभटाचा नातू, व दिवाकरभटाचा मुलगा, ब्रह्मदेव भट, याला राजनामक पट्टकील [ पाटील ] याचे ताब्यांत असलेल्या, श्रीनेवडी गांवचें उत्पन्न दिलें, असें ह्यांत लिहिलें आहे. वट्टारक गांवचा मुख्य ( पाटील ) ऋषि ह्यातार, नागूजी ह्यातर, अनंतनायक, व चांगदेव ह्यातर, असे चार, या दानपत्रावर साक्षीदार आहेत. वसई तालुक्यांतील करजाण गांवीं हरिपालदेवराजाचा आणखी एक शिलालेख सांपडला आहे. त्यांत तेरा ओळी आहेत. परंतु तो वाचण्याची मारामार पडते. तिसऱ्या व चवथ्या ओळींत, महामंडळे-

* वचोभिर्नुनुदे दंतद्युतिश्रीखंडपांडुभिः ।
वादिनां वाददर्पोष्मा येन शूर्पारकाध्वसु ॥ १०९
यं श्रीमदपरादित्य इति दूत्यप्रसिद्धये ।
प्रजिघाय घनश्लाघः काश्मीरान् कोंकणेश्वरः ॥ ११०
तेन श्रीतेजकंठेन सोत्कंठमनुबध्नता ॥
इति सोधिकवैशद्यमिरवद्यमगद्यत ॥ १११ ॥
श्रीकंठचरित–सर्ग २५

$ टीप—सुस्सल राजाचा पुत्र जयसिंह इ. स. ११२७ पासून इ. स. ११४९ पर्यंत काश्मीरचे गादीवर होता. त्याचे कारकीर्दीत मंखककवीनें हें काव्य रचिलें.

श्वरांतील प्रमुख, व सर्व राजकीय किताबांनीं विभूषित, अशा हरिपाल-देवाचें नांव, संदिग्ध दिसतें. इ. स. ११५३ तल्या लेखाचा दगड, इ. स. १८८२ त, बोरिवलीजवळ सांपडला. ह्या लेखाच्या नऊ ओळी आहेत. शके १०७५ श्रीमुखसंवत्सर, व हरिपालदेव राजा, ह्यांचा उल्लेख त्यांत आहे.

पुढचा राजा मल्लिकार्जुन ह्याचेविषयीं दोन कोरींव लेख मिळाले आहेत. एक इ. स. ११५६ ( शक १०७८ ) तला, हा रत्नागिरी जिल्ह्यांतल्या चिपळूण गांवीं सांपडला, व दुसरा इ. स. ११६० [१०८२] तला, हा वसईस सांपडला. गुजराथचा राजा कुमारपाल सोळंकी, [इ.स.११४३–११७४], याचा सेनापति आंबड, ह्यानें, बलसाडाजवळ ज्या मल्लिकार्जुन नामक कोंकणच्या राजाचा पराभव केला,तो हाच असावा.* नागलय्या, व लक्ष्मणय्याचा पुत्र अनंतुगी, हे याचे प्रधान होते. वसई एथें सांपडलेल्या दगडावरील लेखांत, शक १०८२ विश्वसंवत्सर असून, राजाचे प्रधान प्रभाकर नायक व अनंतपय्या प्रभू हे होते, असें सांगितलें आहे.

मल्लिकार्जुनाच्या मागून दुसरा अपरादित्य राजा गादीवर बसला. या राजाचे चार शिलालेख जमिनीच्या देणगीविषयींचे सांपडले आहेत. त्यांपैकीं एक दगड इ. स. ११८४ [ शक ११०६ ] तला आहे, दोन इ. स. ११८७ [ शक ११०९ ] तले आहेत, व एकावर शक नाहीं. ११८४ तला दगड, इ. स. १८८२ चे फेब्रुवारी महिन्यांत, भिवंडी तालुक्यांतल्या लोनाड गांवापासून नैऋत्य दिशेस, सुमारें अर्ध मैलावर, सांपडला. शक ११०९ तल्या दोन दगडांपैकीं एक परळ एथें गव्हर-नरच्या बंगल्याजवळ सांपडला. त्यावरील लेखांत असें लिहिलें आहे

---

* श्रीसोमेश्वरदेवकृत कीर्तिकौमुदी काव्याच्या २ ऱ्या सर्गाच्या ४७ व्या व ४८ व्या श्लोकांत या राजाचा उल्लेख आढळतो:—

चूडारत्नप्रभाकम्रं नम्रं गर्वादकुर्वता ॥
कणशः कोंकणेशस्य यश्चकार शरैः शिरः ॥ ४७ ॥
रागाद् भूपालवल्लालमल्लिकार्जुनयोर्मृधे ।
गृहीतौ येन मूर्धानौ स्तनाविव जयश्रियः॥ ४८॥

र्की, दर्भावतीश्वर वैद्यनाथ या देवाच्या पंचोपचार पूजेकडे, षट्षष्टि ( साष्टी ) बेटाशीं ज्याचा संबंध आहे असें, अनंतपण्या प्रभूच्या ताब्यांत असलेलें, माहुली ( हें बहुश: कुर्ल्याजवळचें माहूल गांव असावें ) गांव, यांतील एका वाडीचें नियमित उत्पन्न, व द्रम्म नामक २४ नाणीं, हीं, कोंकणचा राजा अपरादित्य, यानें लावून दिलीं. याखेरीज कांहीं कर माफ केल्याचाही त्यांत उल्लेख आहे. या शिलालेखाच्या शेवटच्या ओळीवरून असें दिसून येतें कीं, त्यांतील मजकूर वालिगपंडित नामक कायस्थानें लिहिला होता. शके ११०९ तला दुसरा दगड रॉयल एशियाटिक सोसैटीच्या, मुंबई एथील शाखेच्या, पदार्थसंग्रहालयांत आहे. त्याच्यावरील लेखांत, शक ११०९ विश्वावसुसंवत्सर असून, मिति चैत्र शु. ६ रविवार ही आहे. भास्करनायक याचा पुत्र, लक्ष्मणनायक महाप्रधान, हा या लेखांतील देणगीचा दाता आहे. सुराष्ट्र देशांतील सोमनाथ [ सोरटी सोमनाथ ] देवाविषयीं ही कांहीं मजकूर यांत आहे. ज्यावर शक नाहीं असा चवथा दगड, इ. स. १८८२ त, वसई तालुक्यांतल्या कलंभोम गांवाजवळ, सांपडला. यावरील लेखांत अपरादित्याचें नांव आहे. यांतील लिपीचें वळण अर्वाचीन असल्यामुळें, तो या अपरादित्याच्या वेळचाच असावा, असें दिसतें. आलीकडे या राजाचा पांचवा शिलालेख वसईजवळ सांपडला आहे. त्यावरचा शक संदिग्ध आहे. ११०७ सारखा त्यांतील शकाचा अंक दिसतो.

पुढचा राजा केशिदेव हा अपरार्क ह्मणजे दुसरा अपरादित्य याचा पुत्र होता. याचे दोन जमिनीच्या देणगीविषयींचे शिलालेख सांपडले आहेत. त्यांपैकीं एक इ. स. १२०३ [ शक ११२५ ] तला आहे, व दुसरा इ. स. १२३८ [ शक ११६१ ] तला आहे. पहिला, इ. स. १८८१ त, वसई तालुक्यांतल्या मांडवीगांवीं, सांपडला. त्यांत केशिदेवाच्या राज्यांत, लक्ष्मीनारायणदेवाच्या नैवेद्याकरितां, कांहीं देणगी दिल्याचा मजकूर आहे. शके ११६१ तला शिलालेख, इ. स. १८८२ त, भिंवडीतालुक्यांतल्या लोनाडगांवीं, सांपडला. त्यांत माघ वद्य १३ ही मिति आहे. शोपेश्वर महादेवाचा पुजारी, कवि सोमण, यास ब्रह्म-

पुरीगांव, अपरार्काचा पुत्र केशिदेव यानें, इनाम दिला असा मजकूर यांत आहे. शिवाच्या देवालयांच्या योगानें अन्नपुरीगांव फार रम्य झाला होता असेंही यांत लिहिलें आहे. शोंपेश्वर देवाच्या चार पुजाऱ्यांना, बापग्रामां [ हें सांप्रतचें लोनाडाजवळचें बावगांव असावें ] तील माजसपल्ली शेत, केशिदेवानें दिलें असेंही यांत आहे. केशिदेवाचा बाप अपरार्क यानें याज्ञवल्क्यस्मृतीवर अपरार्क नांवाची एक टीका केलेली आहे. त्या टीकेच्या प्रायश्चित्ताध्यायाच्या शेवटीं, विद्याधरवंशीय जीमूतवाहनकुलोत्पन्न शिलाहारराजा अपरादित्य,यानें तो ग्रंथ केला असा लेख आहे.तेराव्या शतकांतल्याएका ग्रंथकाराच्या ग्रंथांत अपरार्काच्याग्रंथांतील उताराआढळतो.

पुढचा राजा सोमेश्वर याचे दोन शिलालेख उपलब्ध आहेत.त्यांपैकीं एक इ. स. १२४९ ( शक ११७१ ) तला, व दुसरा इ. स. १२६० [ शक ११८२ ] तला, आहे. पाहिला उरणाजवळच्या रानवडगांवीं सांपडला. पापापासून मुक्त होण्याकरितां, उरण परगण्यांतील पडिवसें गांवांतली जमीन, शिलाहारराजा सोमेश्वर, यानें दिली असें यांत लिहिलें आहे. दुसरा उरणाजवळच्या चांजें गांवीं सांपडला. कोंकणचा राजा सोमेश्वर यानें, उरण परगण्यांतील चांजें [ चाडिचें ] गांवांपैकीं, कोंथळस्थानांतील बागेचें उत्पन्न, पारुत्थ [पार्थियन?] द्रम्म नांवाचीं १६२ नाणीं, हीं श्रीस्थानक (ठाणें)एथील उत्तरेश्वर* महादेव, यास दिलीं असा यांत उल्लेख आहे.यांत सदहू बागेची पश्चिमसीमा राजमार्ग लागलेली आहे. झांपदप्रभु, मैनाकू, बेवलप्रभु, परंदेपंडित, व पाधिगोवेनाकू, हे पांच सोमेश्वराचे प्रधान होते.

थोडीं खेरीज करून बाकीच्या ठाणें एथील सर्व शिलाहारराजांचीं नांवें संस्कृत आहेत. तरी त्यांच्या बहुतेक प्रधानांचीं व त्यांच्या दानांचा प्रतिग्रह करणाऱ्यांपैकीं पुष्कळ जणांचीं नांवें तेलंगी किंवा कानडी दिसतात, यावरून हे राजे दक्षिणेकडील प्रांतांत राहणारे होते, व यांच्या

---

* ठाणें एथील प्रसिद्ध कौपिनेश्वर महादेव याच्या आवारांत नैऋत्य दिशेस या उत्तरेश्वराचें एक लहानसें देऊळ आहे. कौपिनेश्वराचें टोलेजंग देऊळ व प्रचंड लिंग ह्यांच्या सान्निध्यानें ह्या देवाचें लहान देऊळ व लिंग हीं दीपून गेल्यामुळें ह्यांच्या विषयीं सांप्रत ठाणें एथें असणाऱ्या फारच थोड्या लोकांना माहिती आहे.

दरबारीं अथवा ह्मणजे द्रविड ब्राह्मणांचें फार चालत असे, असें दिसतें. सांप्रतच्या प्रभूंचे पूर्वज कायस्थ यांचाही या राजांच्या लेखांत उल्लेख आढळतो.

या राजांचे उपलब्ध असलेले लेख सर्व संस्कृत भाषेंत आहेत. त्यां पैकीं कांहींची भाषा शुद्ध आहे व कांहींची अशुद्ध आहे. उपलब्ध लेखां. पैकीं एकाच्या शेवटच्या तीन ओळींवरून असें दिसतें कीं, त्यावेळीं, या प्रांतांतल्या सर्व लोकांची भाषा, सांप्रतच्या मराठी भाषेची माता जी प्राकृत भाषा, ती होती. हीच गोष्ट त्या काळच्या स्थलनामांसही लागू आहे. श्रीस्थानक, शूर्पारक, हंजमान किंवा हम्यमान, इत्यादि स्थल नामांचीं संस्कृत रूपें जरी शिलालेखांत आढळतात तरी, ठाणें, सोपारें, व संजाण हीं सांप्रतचीं त्या स्थळांचीं नांवें त्या वेळींही चालू होतीं, असें त्यावेळच्या आरब मुशाफरांच्या लेखांवरून दिसतें.

शिलाहारराजांच्या राज्यांत देशाची व लोकांची स्थिति कशी होती हें त्यांच्या कोरींव लेखांवरून मुळींच कळत नाहीं. तथापि, महाप्रधान पद धारण करणारा एक मुख्य मंत्री, एक संधिविग्रहकारी (तह व लढाई यांच्या सं. बंधीं विचार करणारा) प्रधान, दोन खजिन्यावरचे अधिकारी, व असल्यास एक मुख्य चिटणीस, इतक्यांच्या मदतीनें राजा राज्यकारभार चालवीत असे असें दिसतें. राज्याचे मुख्य विभाग केलेले असत त्या प्रत्येकास "राष्ट्र" ह्मणत, व प्रत्येक राष्ट्राच्या पोटभागास "विषय" ह्मणत. विषयाच्या पो. टविभागांस शहरें व गांव ह्मणत. या विभागांवरील अधिकाऱ्यांस अनुक्रमें राष्ट्र पति, विषयपति, नगरपति अथवा ग्रामपति ह्मणत. भांडूपच्या किंचित् उत्तरेस असणाऱ्या गोमवाणी गांवाच्या पश्चिमच्या बाजूस एक राजमार्ग त्यावेळीं होता. तो सांप्रत मुंबईपासून ठाण्यापर्यंत असणाऱ्या राजमार्गाहून फारसा भिन्न नव्हता असें दिसतें. उरणाजवळ दुसरा एक राजमार्ग होता. त्या काळच्या बंदरांत सोपारें, ठाणें, चौल, व नागोठाणें यांच्या नांवांचा उल्लेख आहे. या बंदरीं मालावर जकात घेत असत. द्रम्म या नांवाचें नाणें त्यावेळीं चालू होतें. हें नाणें अजूनही कोंकणांत आढळतें, व तें गध्धा पैसा या नांवानें प्रसिद्ध आहे. शिलाहार राजांनां इमारती बांधण्याचा मोठा शौक होता असें दिसतें. तेराव्या

शतकाच्या आरंभीं मुसलमानांनीं, व सोळाव्या शतकांत पोर्टुगीज लोकांनीं, या शिलाहारांनीं बांधलेलीं अनेक देवळें, आणि चिरेबंदी घाणें, यांचा विध्वंस केला. मुशाफरांच्या लेखांवरून आणि अंबरनाथ, पेलार, आटगांव, पारोळ, मुंबईंतील वालुकेश्वर, व लोनाड, एथें इमारतींचे जे अवशेष अजून पर्यंत राहिले आहेत त्यांवरून, उत्तम घडींव दगडांचें कळाशीदार काम त्या काळचे गंवडी करीत असत, आणि दगडावरील खोदींव काम मोठ्या चातुर्यानें कारागीर करीत असत, असें दिसून येतें. या खोदींव चित्रांपैकीं कांहीं चित्रें, ग्राम्य किंवा असभ्य चित्रांच्या मिश्रणामुळें, बिघडलेलीं आहेत. कांहीं शिलाहार राजांनीं विद्येस उत्तेजन दिल्याचेंही आढळून येतें. या राजांपैकीं दुसरा अपरादित्यराजा ( इ. स. ११८७ ) हा स्वतः ग्रंथकार होता, व पहिला अपरादित्यराजा (इ. स. ११३८) यानें, काशमीरांतील पंडितसभेंत, कोंकणांतून एक पंडित पाठविला होता.

कोंकणांत शिलाहारांचा अंमल असतांना देशाची जी स्थिति होती, तिजविषयींच्या माहितीचा शिलालेखांत असणारा उणेपणा, मुसलमान ग्रंथकारांनीं आपल्या लेखांनीं नाहींसा केला आहे, असें त्यांच्या लेखांवरून दिसून येतें.

ठाणें, चौल, संजाण, व सोपारें हीं त्याकाळीं व्यापाराचीं मुख्य स्थानें होतीं व त्यांपैकीं ठाणें हें मोठें पेठेचें गांव होतें असें, नवव्या व दहाव्या शतकांतल्या आरब ग्रंथकारांनीं, लिहिलें आहे. बाराव्या शतकांत तें लहानसें टुमदार शहर बनलें होतें, आणि तेराव्या शतकाच्या आखेरीस, तें एका राजाच्या राजधानीचें शहर असून, तेथें व्यापार मोठा चाले, व गलबतें पुष्कळ असत, असेंही त्यांनीं लिहिलें आहे. चौल ( सैमूर ) हें, दहाव्या व अकराव्या शतकांत मोठें शहर असून व्यापाराचें स्थळ होतें, आणि बाराव्या शतकांत, ज्यांत उत्तम इमारती आहेत असें, मोठें शहर तें झालें होतें. दहाव्या शतकांत संजाण हें मोठें शहर व उतारपेठेचें स्थळ होतें, आणि बाराव्या शतकांत, तें मोठें भरभराटीचें शहर झालें होतें. दहाव्या व अकराव्या शतकांत सोपारें हें मोठें उतारपेठेचें स्थळ होतें, आणि बाराव्यांत हिंदुस्थानांतल्या मुख्य उतारपेठांत त्याची गणना होत असे. मलबार किनाऱ्यावरील कुलम ऊर्फ किलान व कालिकोट हीं बंदरें;

गुजराथेंतील भडोच, खंबायत, व सोमनाथपट्टण हीं बंदरें; सिंध प्रांतांतलें दिहवाळ बंदर; इराणी आखातावरील बस्रा, ओबोला, सिराफ, कीस, व ओर्मुझ हीं बंदरें; आरबस्थानाच्या किनाऱ्यावरील कालाटू ऊर्फ कल्हट, डुफार, शहर, व एडन हीं बंदरें; तांबड्या समुद्राच्या मुखा जवळचें सोकोत्रा बेट; तांबड्या समुद्रांतलें जिड्डा बंदर; आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील झेला, माकडाशू, मोंबाझा, व किलान हीं बंदरें; मलाई द्वीपकल्पांतील काला बंदर; आणि जावा, मलाका, व चीन या देशांतील बंदरें; या सर्वांशीं ठाणें जिल्ह्याच्या किनाऱ्यावरील बंदारांचा व्यापार शिलाहार राजांच्या कारकीर्दींत चालत असे.

ठाणें जिल्ह्यांतील बंदरांत पुढें सांगितलेल्या खाण्याच्या जिनसांचा व्यापार होत असे. कोंकणांत उत्पन्न झालेले तांदूळ आरबस्थान व आफ्रिका खंड यांतील बंदरीं जात असत. ठाणें जिल्ह्यांतील खाड्यांत पिकलेलें मीठ पोत्यांत भरून देवगिरि ( दवलताबाद ) व दक्षिणेंतील दुसरीं व्यापाराचीं मुख्य स्थळें येथें पाठवीत. नारळ, आंबे, लिंबें, ठाणें जिल्ह्यांत उत्पन्न झालेलीं विड्याचीं पानें, व सुपारी हे जिन्नस किनाऱ्यापासून दूर असणाऱ्या प्रांतीं खुषकीनें, आणि इराणी आखात, सिंध, व आरबस्थानाचा किनारा एथें जलमार्गानें, पाठवीत. आरबस्थानांतून व इराणी आखाता कडून खारिक व खजूर आणीत. त्यापैकीं कांहीं मालाचा एथें कोंकणांत खप होई व कांहीं घाटावर पाठवीत. ह्याप्रमाणेंच ठाणें जिल्ह्यांत उत्पन्न झालेला मध, आणि इराण व आरबस्थान एथून आणिलेलें मद्य, यांचाही थोडा बहुत व्यापार होत असे. मिऱ्यें, सुंठ, तेडमुळाची साल, जायपत्री व लवंगा हे मसाल्याचे पदार्थ जावा बेटांतून व सिंहलद्वीपांतून चिनी गलबतांत भरून येत व मलबार किनाऱ्याकडूनही येत. पोषाखाच्या जिनसांपैकीं खानदेश व दक्षिण या प्रांतांतून कापूस आणून त्याचीं एथेंच वस्त्रें करीत, किंवा तसाच कच्चा कापूस इथियोपिया प्रांतांत पाठवीत. कोंकणांत किंवा दक्षिणेंत तयार झालेलें उत्तम विणकरीचें कापड सिंहलद्वीप, स्ट्रेट्स सेटलमेंट, व चीन एथें जात असे. बऱ्हाणपूर व पैठण एथील मलमलीसारखें बारीक सुरेख कापड कालिकोट आणि प्रायः इराण व आरबस्थान एथें जाई. रेशमी कापड या जिल्ह्यांत तयार

होत असे,व इराण आणि आरबस्थान एथूनही बहुत करून कांहीं आणीत असत. सोपारें व संजाण एथें फीत लावलेले पायांत घालण्याचे जोडे तयार करण्याचा मोठा कारखाना होता. तेथून उत्तम कमावलेलें कातडें बाह्यप्रदेशीं व विशेषत: आरबस्थानांत फार जात असे. शरीरें भूषविण्याच्या रत्नादि पदार्थांपैकीं मोत्यें हीं सोपाऱ्या जवळच्या खाडींत सांपडत आणि त्रावणकोर, सिंहलद्वीप,व आफ्रिकेंतील सोफाला शहर एथूनही आणीत. उत्तम ढाळाचे व रंगाचे फार वजनशीर व कठीण असे पद्मराग माणि संजाण येथून बाहेर जात. पोंवळीं तांबड्या समुद्राकडून इकडे आणीत. सोफाला व मादागास्करबेट एथून हस्तिदंत आणीत. ह्याचा खप देशांतल्या देशांत होऊन बाकी राहिलेला माल इराणी आखाताकडे पाठवीत. औषधी व सुगंधी पदार्थांपैकीं तवकिलाविषयीं ठाण्याची फार ख्याति होती. हें तवकील (सं. त्वक्क्षीर) बांबूच्या [ कळकाच्या ] अंतर्सालीपासून तयार करीत आणि पूर्वेकडील व पश्चिमेकडील सर्व व्यापाराच्या मुख्य स्थळीं पाठवीत. ठाणें जिल्ह्यांतील रानांत गुग्गुळ जमा करून आरबस्थान व चीन एथें पाठवीत. पांढरा धूप हा आरबस्थानच्या किनाऱ्याकडून इकडे आणीत. चंदन व अंबर, सोकोत्रा बेट आणि आफ्रिकाखंडाचा किनारा, एथून इकडे आणीत. वेळ, कापूर, चंदन, रक्तचंदन [ पतंगाचें लांकूड ], अगरु, व जटामांसी हे पदार्थ, खुद्द सियाम [सुह्म] देश, जावाबेट [यवद्वीप] व बोर्निओबेट एथून आणीत, किंवा ह्या स्थळांहून सिंहलद्वीपांत आलेले हे जिन्नस त्या द्वीपांतून इकडे आणीत. शस्त्रें व घरांत लागणारीं भांडींकुंडीं यांपैकीं मातीचीं उत्तम भांडीं चीन देशांतून आणीत. त्यांपैकीं कांहीं एथच्याएथें खपत व कांहीं घाटावर जात. पश्चिमेकडील देशांतून इराणांत येणाऱ्या तरवारी इकडे आणीत. चलनी पैशापैकीं कवड्या मालदीवबेट [मलयद्वीप] व आफ्रिकेंतील सोफाला एथून आणीत. खुरासन एथून द्रम्म नाणीं, सिंधप्रांतांतून दीनारनाणीं,सोफाला एथून सोन्याची माती,आणि मलाक्का द्वीपकल्प,सुमात्राबेट, व चीनदेश, एथून सोनें व रुपें इकडे येत असे. इतर धातूंपैकीं सोफाला एथून लोखंड आणून त्याचें पोलाद करीत. चीन व इराण एथून निरनिराळे रुपानें पुष्कळ तांबें

आणीत. शिसें व कथील हीं मलाका एथून येत. इमारतींच्या लांकडांपैकीं साग व बांबू [ कळक ] संजाण एथून इराणी आखाताकडे जात व तेथे त्यांचा इमारतींच्या कामाकडे उपयोग होत असे. चंदन व रक्तचंदन यांवर केलेलें नकशीदार काम मलाई द्वीपकल्पांतील काला ह्या स्थळाहून इकडे येत असे. ह्या शिलाहारांच्या कारकीर्दीच्या अखेरीच्या सुमारास [ इ. स. ११९० ] घोडे इराणी आखात व आरबस्थान एथून पुष्कळ येत. ठाणें एथें येणाऱ्या कोणत्याही गलबतावर घोडे नाहींत असें कधींच होत नसे. ठाणें एथील त्यावेळचा राजा आपणांस घोडे प्राप्त व्हावे ह्मणून इतका उत्सुक असे कीं, जे चांचेलोक मिळविलेल्या लुटींतून आपणांस घोडे देतील, त्यांना आपण उपसर्ग लागूं देणार नाहीं, असा त्यानें ह्या चांच्यांशीं करार केला होता. मुसलमान लोकांचे घोडेस्वार पाहून दक्षिणेंतील हिंदु राजांना मोठी भीति पडल्यामुळें, हें घोडे संग्रहीं ठेवण्याचें वेड, त्यावेळीं पिकलें होतें, असें दिसतें. प्रतिवर्षीं दहा हजार घोडा इकडे येई असें म्हणतात. मानवी प्राण्यांपैकीं स्त्रिया, खोजे, व मुलगे यहुदीलोक इराणी आखाताकडून इकडे विक्रीकरितां आणीत. आफ्रिकेंतील सोफालाएथून दासदासीही इकडे विक्री करितां येत.

ठाणें जिल्ह्यांत त्या काळीं व्यापार करणाऱ्या उदम्यांपैकीं कांहीं एथलेच हिंदु, मुसलमान, व पारशी असत आणि कांहीं गुजराथ व मलबार किनारा एथील हिंदु व मुसलमान असत. इराणी लोक, आरबलोक, ज्यु ऊर्फ यहुदी लोक, युरोपियनलोक, व क्वचित् चिनी लोक हेही उदमी एथें असत. नवव्या व दहाव्या शतकांतील अनेक आरब ग्रंथकारांनीं असें लिहिलें आहे कीं, त्यावेळीं ठाणें जिल्ह्यांतील बंदरीं लार (लाट=दक्षिणगुजराथ) देशीय भाषा चालत असे. यावरून असें दिसतें कीं, सांप्रत मुंबईंत उदम्यांची भाषा गुजराथी आहे त्याप्रमाणेंच त्या वेळींही होती. तसेंच त्या काळींही बहुश: गुजराथेंतील वाणी हेच उदम्यांत मुख्य असावे असेंही वाटतें. मुख्यत: इराणी आखाताकडून येऊन जे मुसलमान व्यापारी एथील कायमचे रहिवासी झाले होते तेही उदम्यांत प्रमुख असत. इ. स. ९१६ त मासुदी हा चौल एथें गेला होता तेव्हां त्या एका ठिकाणींच, इराणी व

आरबे मिळून, १००० लोक कायमचे राहणारे झालेले त्याला आढळले. शिलाहारराजे, ज्यांना आरब लोक बलाहार ह्मणत. हे आरब लोकांवर फार कृपा करीत, व मशिदी बांधून तंटे तोडण्याकरितां त्यांच्यापैकींच एक प्रमुख नेमण्याची त्यांस परवानगी देत. दहाव्या शतकाच्या आरंभीं संजाण एथील पारशी मोठे मातबर झाले होते आणि त्यांच्या लोकांचा फैलाव चोहोंकडे होऊन त्यांनीं चौल एथें अग्याऱ्याही बांधिल्या होत्या. पूर्वीच्या कारकीर्दींप्रमाणेंच शिलाहारांच्यावेळींही हिंदु लोक खुशाल आपलीं घरेंदारें सोडून, समुद्र बलांडून, पलीकडे व्यापाराकरितां जात. इ. स. ६५० चे सुमारास हुएन त्संग ह्या चिनी यात्रेकरूनें सौरास्थान ( हें बहुधा इराणांतलें वेटेसिफान असावें ) एथें, अनेक ब्राह्मणी व बौद्ध मठ होते, असें ऐकिलें होतें. महमदाचे मागून जे खलीफ ह्मणून अधिकारी झाले त्यांच्या भरभराटीच्यावेळीं [ इ. स. ७००–९०० ] आरबस्थानांतील खलिफांच्या दरबारीं हिंदु वैद्य व ज्योतिषी राहिले होते. यावरून त्यावेळीं विद्वान हिंदूंची तेथें फार चहा असें असें दिसतें. पुढें इराणचा मोंगल राजा [ इ. स. १२९० ] अर्घून याच्या दरबारींही हिंदु वैद्य व ज्योतिषी असत. आरबस्थानांत व इराणी आखातांतल्या कीश ह्या स्थळीं हिंदुस्थानांतले व्यापारी जाऊन राहिले होते. इराणी लोक व आरब लोक यांच्या खेरीज ज्यू उर्फ यहुदी लोक हे दहाव्या शतकाच्या आरंभीं मुख्यत: माल इकडून तिकडे पोंचविण्याचें काम करणारे परदेशीय उद्यमी होते. त्यांना इराणी, ग्रीक, लाटिन, फ्रेंच, स्पानिश, व रशियन भाषा येत असत, आणि ते हिंदुस्थानांत तांबड्या समुद्रांतून येत किंवा आंटिओक व बगदाद या शहरांतून जाऊन पुढें इराणी आखाताचे द्वारें ते इकडे येत. तसेच रशिया, स्पेन, व फ्रान्स या देशाचे व्यापारीही मेसापोटेमिया ( नदीद्वयमध्यगत प्रदेश ) ह्मणजे तैग्रीस व युफ्रातिस नद्यांमधील प्रदेश यांतून हिंदुस्थानांत येत.

ठाणेजिल्ह्यांतील व्यापार शिलाहारांच्या कारकीर्दींत ज्या तारवांच्यायोगानें चालत असे तीं तारवें कोंकण, गुजराथ, मलबार, व इराणीअखात एथें बांधिलेलीं असत. क्वचित् जावाबेट ( यवद्वीप ) व चीनदेश एथीलही एकादें गलबत प्रसंगोपात्त येत असे. ठाणेजिल्ह्यांत

किंवा पश्चिम हिंदुस्थानांत इतर स्थळीं बांधलेलीं गलबतें, या जिल्ह्यांतून इराणीआखातांतलें ओमोला बंदर, आरबस्थानदेश व आफ्रिका खंड यांतील बंदरें, आणि चीन देशांतील बंदरें एथें जात. आरबांच्या गलबतांपैकीं कांहीं गलबतें, इराणी आखातांतील शिराज बंदरीं, बांधलेलीं असत. हीं आरबी गलबतें, मोठीं व लहान अशीं दोन प्रकारचीं असत. त्यांपैकीं जीं मोठीं असत तीं आफ्रिकाखंड, कलकत्ता शहर, मलाका द्वीपकल्प, व चीन देश एथें जात, व लहान असत तीं हिंदुस्थानांत येत. त्याकाळचीं इराणीआखातांतील गलबतें अगदीं भिकारी होतीं. तीं बांधण्याच्या कामीं लोखंडाचा उपयोग मुळींच होत नसे. लांकडाच्या बारीक खुंट्या व सुतळ यांच्या योगानें फळ्या जोडून तीं बांधीत. त्यांच्यावर एक डोलकाठी, एक अवजार, व एक सुकाणू असे. त्यांजवर तक्ते घालून बसण्याकरितां मजला मुळींच केलेला नसे. आंत भरलेल्या मालावर चामड्याचें आच्छादन घालून त्याजवर घोडे चढवून ते हिंदुस्थानांत आणीत. अशाप्रकारच्या तारवांत बसून जलपर्यटण करणें हें मोठें धोक्याचें असे. या तारवांपैकीं पुष्कळ तारवें सफर करतांना बुडत असत. इराणी आखातांतल्या बंदरीं बांधलेल्या गलबतांचें वर्णन मार्को पोलोनें वर लिहिल्याप्रमाणें केलें आहे. कधीं कधीं चीनदेशांतून मोठमोठीं तारवें ठाणें जिल्ह्यांतील बंदरीं येत. एकसर या गांवीं, अकराव्या किंवा बाराव्या शतकांतल्या स्मारकाच्या दगडांवर, जीं लढाऊ गलबतांचीं चित्रें काढिलेलीं आहेत, त्यांवरून असें दिसून येतें कीं, त्या गलबतांवर मोठीं अवजारें असून, एक डोलकाठी व प्रत्येक बाजूस नऊ दाहा वल्हीं असत.

या गलबतांवर खलाशाचें काम करणारे मुख्यत: हिंदु, आरब, व चिनी लोक असत. या खलाशांचें कौशल्य व धैर्य यांविषयीं त्या काळच्या युरोपियन मुशाफरांचें मत प्रतिकूळ होतें. मांटि कार्विनो एथील जान नामक मुशाफर ( इ० स० १२९२ ) म्हणतो कीं, इराणीआखातांतल्या गलबतांवरील खलाशी संख्येनें कमी असून आपल्या कामांत वाकबगार नसत. एकादें तारूं सुरक्षितपणें मुक्कामास जाऊन पोंचलें तर ती गोष्ट खलाशांचे शहाणपणामुळें न होतां परमेश्वरकृपेनें होत असे. सर्व तारवें मोठ्या अफाट समुद्रांतून सफरी करीत, तरी त्यांना

त्या सफरींपेक्षां किनाऱ्याजवळून जलपर्यटण करणें अधिक आवडत असे.

हिंदुस्थानच्या नजीकच्या समुद्रांत वादळांखेरीज इतर धोके पुष्कळ असत. देवमासे, समुद्राच्या सपाटीवर हवेंत दूरवर गेलेले शंकूच्या आकाराचे पाण्याचे स्तंभ, व रूकनामक प्रचंड पक्षी, यांची खलाशांना निरंतर भीति बाळगावी लागे. चांचे ह्मणजे समुद्रांत लूट करणारे यांच्या पासून तर फारच भीति असे. या शिलाहारांच्या कारकीर्दीच्या बऱ्याच भागांत समुद्रांत या चांच्यांचे थवेच्या थवे जिकडे तिकडे असत. आठव्या व नवव्या शतकांत सिंधदेश, कच्छ, व काठेवाड या प्रांतांच्या किनाऱ्यावरील संगार, कर्क, व मेड, हे लोक, समुद्रांतील तारवांवर हल्ले करीत. युफ्रेटिसनदीचीं तीरें, व जिड्डा इतक्या दूरच्या बंदरापर्यंत, तांबड्या समुद्राचे किनारे, यांचीही नासाडी ते करीत. सातव्या शतकांत, इराणीआखातांतील बार्‍हे नांवाचीं बेटें, अबदूल खैस नांवाच्या चांच्याच्या टोळीच्या हातीं होतीं, आणि नवव्या शतकांत ( इ. स ८८० ) समुद्रांत चांच्यांचा इतका उपद्रव होता कीं, चीनदेशांतून येणाऱ्या तारवांवर चारपांचशें हत्यारबंद माणसें व नखतेल ठेवीत तेव्हां या चांच्यांपासून बचाव होई. तेराव्या शतकाच्या अखेरीच्या सुमारास मार्को पोलो या मुशाफराला, मुंबई बंदरांत चांच्यांचा फार उपद्रव होता, असें आढळून आलें होतें. मलबार व गुजराथ यांतील बंदरांतले पुष्कळ चांचेलोक, शेंकडों गलबतें घेऊन, आपल्या बायकामुलांसह, सगळा उन्हाळा घराबाहेर काढीत. वीसपासून तीस गलबतांची एकेक टोळी. अशा अनेक टोळ्या करून, ते समुद्राचा प्रदेश दोन तीन कोसपर्यंत व्यापून टाकीत. व्यापाराचा माल भरलेलें एकादें गलबत यांच्या पैकीं एकाद्याच्या दृष्टीस पडलें ह्मणजे तो आपल्या गलबतावर धूर करी, व तो धूर ज्यांच्या दृष्टीस पडे ते एकत्र जमून त्या गलबतावर हल्ला करून तें लुटीत. नंतर परत जातांना तें गलबत पुन: आपल्या तावडींत सांपडावें ह्मणून त्या तारवास ते जाऊं देत. सोकोत्रा बेटांत चांच्यांची नेहमी गर्दी असे. ते तेथें मुकाम करून लुटींत मिळविलेला माल विकीत असत.

कोंकणांत शिलाहारांचा अमल होता तरी ते मुख्य राजे नसून मांडलिक होते. आठव्या शतकाच्या उत्तरार्धांत व सगळ्या नवव्या शतकांत या

शिलाहारांचे यजमान राष्ट्रकूटवंशीय राजे होते, व सोलापूरच्या आग्नेयीस साठ मैल दूर असणारें मालखेटशहर या राष्ट्रकूटांच्या राजधानीचें स्थळ होतें. हल्लीं गुजराथ या नांवानें जो प्रांत प्रसिद्ध आहे त्याचा बराच भाग कांहीं काळपर्यंत त्यांच्या अमलांत होता व त्या प्रांतीं भडोच हें त्यांचें मुख्य शहर होतें. सुलेमाननामक आरब व्यापारी ह्मणतो कीं इ. स. ८५० त कोंकण बल्हार ( शिलाहार ) राजाच्या अमलांत होतें व तो हिंदुस्थानांतील राजांत प्रमुख होता. हा बल्हारराजा व त्याचे लोक आरबांबरोबर अति स्नेहानें वागत. गुजरांच्या राजाबरोबर त्याची लढाई चालली होती. हा गुजरराजा घोडेस्वारखेरीज करून बाकीच्या गोष्टींत बल्हारापेक्षां फार कमी प्रतीचा होता. यानंतर साठ वर्षांनीं ह्मणजे इ. स. ९१६ च्या सुमारास चौल पासून खंबायतपर्यंत सगळा लार प्रांत ( लाटदेश ) बल्हाराच्या ताब्यांत होता, व मानकीर ( मालखेट ) हें, किनाऱ्या पासून ६४० मैलांच्या अंतरावर असणारें, कानडी देशांतलें, शहर त्याच्या राजधानीचें स्थान होतें, असें मासुदीनें लिहिलें आहे. कोंकणच्या व लार [लाट] प्रांताचा राजा हा त्याचा मांडलिक होता. त्या प्रांतात चौल, ठाणें, व सोपारें हीं शहरें होतीं, व तेथें लारीयभाषा (लाटी=गुजराथी भाषा) लोक बोलत असत. हिंदुस्थानांतील राजांत बल्हारराजाइतका मुसलमानांशीं अति स्नेहानें वागणारा दुसरा राजा नव्हता. गुजरराजाजवळ उंट व घोडे पुष्कळ असल्यामुळें तो याच्यावर हल्ले करीत असे. बल्हार हें या राजवंशाच्या संस्थापकाचें नांव होतें, व तें प्रत्येक राजा गादीवर बसतेसमयीं धारण करीत असे. मासुदी हा कोंकणांत असतांना ( इ. स. ९१६ ) लारप्रांता ( लाट देशा ) वर पांचवा शिलाहारराजा झंज हा राज्य करीत होता.

आणखी पन्नास वर्षेपर्यंत ( इ. स. ९५० ) राष्ट्रकूटवंशीय राजे कोंकण व खंबायतपर्यंत लारप्रांत यांच्या राजांचे यजमान होते. गुजराथच्या उत्तर भागाचा चौलुक्य ऊर्फ सोळंकीवंशांतला राजा मूलराज हा गादीवर बसल्यानंतर [ इ० स० ९४३–९९७ ) लवकरच, ज्यानें पुढें राष्ट्रकूटवंशीयराजांच्या अमलाचा विध्वंस केला असा, दक्षिणेंतील चालुक्यराजा द्वितीय तैलप ( इ० स० ९७३–९९७ ), याचा

सेनापति बारप ऊर्फ द्वारप, यानें या मूलराजाच्या राज्यावर हल्ला केला. गुजराथचा दक्षिणभाग, ज्याला त्यावेळीं लाटदेश ह्मणत असत, त्यांत बारपानें आपला अंमल स्थापिला. आपल्या कारकीर्दीच्या अखेरीच्या सुमारास या बारपावर मूलराजानें हल्ला करून त्याचा पराभव केला व नंतर नर्मदेच्या उत्तरतीरीं मूलराज गेला, असें गुजराथचा इतिहास लिहिणारे ह्मणतात. सोमेश्वर कवीच्या कीर्तिकौमुदी नामक काव्याच्या दुसऱ्या सर्गांतही असाच लेख आढळतो:–

> लाटेश्वरस्य सेनान्यमसामान्यपराक्रमः ।
> दुर्वारं बारपं हत्वा हास्तिकं यः समग्रहीत् ॥ ३ ॥

या लढाईंत बारपाला द्वीपांच्या राजांनीं साहाय्य केलें असें म्हणतात हे द्वीपांचे राजे ह्मणजे ठाण्याचे शिलाहारराजेच बहुशः असावे असें दिसतें. आलीकडे [इ. स, १८८१] सुरत एथे एक ताम्रपट सांपडला आहे त्यावरून, मूलराजा लाटदेशावर हल्ला करून परत गेल्या· नंतर,बारप व त्याचे पश्चात् आणखी चार राजे,यांनीं इ. स. १०५० पर्यंत लाटदेशांत राज्य केलें, असें दिसून येतें.प्रथमतः बारपानें लाटदेशाचें राज्य संपादन केलें. नंतर अग्निराज [ गोंगिराज ? ] यानें शत्रूंपासून त्या राज्याचें रक्षण केलें. पुढें कीर्तिराज हा लाटदेशचा तिसरा राजा झाला. नंतर चवथा राजा वत्सराज याच्या कारकीर्दीचा पहिला भाग· व त्याच्या पित्याच्या कारकीर्दीचा शेवटचा भाग यांत परकीय राजां बरोबर लढाया झाल्या. पुढें पांचवा राजा त्रिलोचन झाला. त्यानें इ. स. १०५० तला ताम्रपट कोराविला. याच्या राज्यांतही लढाया झाल्या असें या ताम्रपटांत लिहिलें आहे. एका तांब्याच्या कडींत या लेखाचे तिन्ही ताम्रपट अडकविलेले आहेत व त्या कडीवर राजाचें मोर्तब असून शिवाच्या मूर्तीचा ठसा उठविलेला आहे. पौष वद्य ३० शके ९७२ ही या ताम्रपटांत मिती आहे. त्रिलोचनराजानें, अगस्त्यतीर्थांत स्नान केल्यावर, एरठाणगांव दान दिला, असें या लेखांत लिहिलें आहे. सांप्रत, सुरतेच्या वायव्येस वीस मैलांवर भगवादांडी ह्मणून जें स्थान आहे तेंच हें अगस्त्यतीर्थ होय. तसेंच सुरत जिल्ह्यांतील ओलपाडच्या

ईशान्येस साहा मैलांवर सांप्रत जें एरठाण ह्मणून गांव आहे तेंच या लेखांत दान दिलेलें एरठाण होय.

मालखेट एथील राजांचा उत्तरकोंकणावरचा अंमल इ. स. ९७० त नष्ट झाला व गुजराथच्या राजांचा इ. स. ११५१ त सुरू झाला. या दोन वर्षांच्या दरम्यान, सुमारें १८० वर्षें पर्यंत, शिलाहारराजे कोंकणावर स्वतंत्रपणें अंमल चालवीत होते, व निदान ह्या कालावधीच्या कांहीं भागांत तरी, ठाणें हें राजधानीचें स्थान होतें, असा शिलाहारांच्या लेखांचा शोक आहे. तथापि चवथा पाश्चात्य चालुक्यराजा जयसिंह [इ. स. १०१८–१०४०] यानें, आपल्या इ. स. १०३४ तल्या एका कोरीव लेखांत, असें लिहिलें आहे कीं, मीं सप्तकोंकणांवर विजय मिळविला होता. यावरून या स्वातंत्र्याविषयीं थोडा संशय येतो. इ. स. ९९७ त गुजराथचा राजा मूलराज निवर्तला व इ. स. १०२२ त पहिला भीमदेव राजा तेथील गादीवर बसला. या दोन सनांमधील २५ वर्षांत गुजराथच्या राजाचें प्राबल्य वाढलें नव्हतें. भीमदेवानें [इ. स. १०२२–१०७२] आपली बहुतेक कारकीर्द आपलें राज्य उत्तरेकडे वाढविण्यांत व अजमीर एथील वीशलदेव राजाबरोबर मोठी लढाई मारण्यांत घालविली आणि "राजाधिराज" हें पद धारण केलें. परंतु या भीमराजानें किंवा त्याच्या मागून झालेल्या कर्णराजानें [१०७२–१०९४] गुजराथचें राज्य दक्षिणेकडे वाढविण्याचा यत्न केला नाहीं. गुजराथच्या राजांचा केवळ तिलकच असा जो सिद्धराज [इ. स. १०९४–११४३], ज्यानें दक्षिणापथदेश इतका व्यापून टाकिला होता कीं, त्याच्या योगानें कोल्हापूरच्या राजाला मोठी भीति पडली, त्यानेंही कोंकणावर अमल बसविण्याचा यत्न केल्याचें दिसून येत नाहीं. इ. स. ११३५ त इद्रिसीनामक मुशाफर इकडे आला होता त्यानें, त्यावेळच्या अणहिलवाड्याच्या [गुजराथच्या] राजास "राजाधिराज" असें, आपल्या ग्रंथांत ह्मटलें आहे. त्यावेळीं सिद्धराज हा गुजराथच्या गादीवर होता व गुजराथप्रांत संपन्न व भरभराटीचा होता असें त्यानें लिहिलें आहे. परंतु सिद्धराजाच्या राज्याच्या विस्ताराविषयीं त्यानें कांहींएक लिहिलें नाहीं. इद्रिसीनें आपल्या लेखांत ठाण्याचा वेगळा उल्लेख केला आहे. त्यावरून त्यावेळीं गुजराथेशीं ठाण्याचा कांहीं संबंध

नव्हता असें दिसतें. पुढें कुमारपाल राजानें [इ. स. ११४३-११७४] कोंकणावर स्वारी केली. या गोष्टीवरूनही, सिद्धराजाच्या कारकीर्दींत गुजराथेशीं कोंकणाचा संबंध नव्हता, या गोष्टीचा खरेपणा दिसून येतो. महानंदराजाचा पुत्र, कोंकणाचा शिलाहारराजा मल्लिकार्जुन, जो समुद्रानें वेष्टित अशा शतानंद नांवाच्या राजधानींत राज्य करीत होता, त्यानें "राजपितामह" ह्मणजे "राजांचा आजोबा" अशी पदवी धारण केल्यामुळें, कुमारपालानें आपला सेनापति आंबड यास मल्लिकार्जुनावर पाठविलें. आंबड हा नवसरीजवळच्या कावेरी [कालविनी] नदीपर्यंत गेला व ती नदी उतरून तिच्या दक्षिणतीरावर मल्लिकार्जुनाबरोबर त्याची लढाई झाली. तींत त्याचा पराभव झाल्यामुळें त्यास परत जावें लागलें. नंतर पुनः स्वारी केली तींत गुजराथच्या राजास यश आलें. त्याप्रसंगी या कावेरी नदीस कुमारपालानें पूल बांधला व लढाईंत प्रथम मल्लिकार्जुनाचा पराभव करून नंतर वध केला. त्याची राजधानी घेऊन लुटिली व अन्हिलवाडा एथील राजाचा अमल कोंकणावर बसविला. सोनें, रत्नें, मूल्यवान धातु, मोत्यें, हत्ती, व नाणीं यांनीं भरलेलीं गलबतें बरोबर घेऊन आंबड सेनापति गुजराथेंत परत गेला. तेव्हां कुमारपालानें आंबडसेनापतीचा फार सत्कार केला व राजपितामह हें मल्लिकार्जुनानें धारण केलेलें पद त्याला दिलें. या मल्लिकार्जुनाच्या वधाचा उल्लेख सोमेश्वरदेवाच्या कीर्तिकौमुदी नामक काव्याच्या दुसऱ्या सर्गाच्या पुढील पद्यांतही आहे:—

> रागाद् भूपालवल्लालमल्लिकार्जुनयोर्मृधे ।
> गृहीतौ येन मूर्धानौ स्तनाविव जयश्रियः ॥ ४८ ॥

शिलाहारांच्या तीन ताम्रपटांत त्यांनीं धारण केलेली "राजपितामह" ही वर सांगितलेली पदवी आढळते. कुमारपालाच्या राज्याच्या अठरा प्रांतांत कोंकण प्रांताचा समावेश केलेला आढळतो व त्याच्या अमलांतील छत्तीस जातींत शिलाहारांच्या जातीचा समावेश केलेला आढळतो. कोलापूरच्या शिलाहारराजानें, आपण इ. स. ११५१ त ठाण्याच्या पदच्युत शिलाहारराजाला गादीवर बसविलें, असें आपल्या कोरींव लेखांत मोठ्या घमंडीनें लिहिलें आहे, ती गोष्ट खरी अस-

ज्यास, गुजराथच्या सोळांकी राजांचा अंमल कोंकणांत फारच थोडे दिवस होता, असें होतें. मुंबईमाहीम एथें राज्य करणारा बिंबराजा याची हकीकत बिंबाख्यानांत लिहिलेली आहे ती, बहुतकरून इ. स. ११९० त गुजराथच्या सोळांकीराजांनीं कोंकणकिनारा घेतला, या गोष्टीला अनुलक्षूनच लिहिली असावी असें दिसतें. बिंबराजा अहमदनगराजवळच्या पैठणचा राजा होता असें बिंबाख्यानांत लिहिलेलें आहे. गुजराथच्या सोळांकीराजांची राजधानी पाटण ऊर्फ अन्हिलवाडापट्टण व अहमदनगराजवळचें पैठण या दोन नांवांच्या सादृश्यावरून बिंब पैठणचा राजा होता असा घोंटाळ्याचा लेख लिहिला गेला असावा असें दिसतें.तथापि, ज्यावेळीं देवगिरि एथील यादवांचा अमल कोंकणावर होता,त्यावेळच्या तेराव्या शतकाच्या उत्तरार्द्धांतील [इ. स. १२८६–१२९२] कांहीं ताम्रपटांत, भीमदेवराजाचा उल्लेख असल्यामुळें, बिंबराजा गुजराथच्या अन्हिलवाडा पट्टणचा राजा होता, कीं दक्षिणेंतील अहमदनगराजवळच्या पैठणचा राजा होता, याविषयीं निर्णय करणें कठीण आहे. बिंबस्थान हें भिंवडीचें जुनें नांव होतें. यावरून पाहिलें तर बिंबराजा गुजराथेंतला नसून दक्षिणेंतला असावा असें दिसतें. असो. ही गोष्ट सध्या वादग्रस्त आहे. निदान तेराव्या शतकाच्या उत्तरार्द्धांत,देवगिरि [देवगड] एथील यादवराजांचे सुभेदार, कोंकणावर आपल्या यजमानांच्या वतीनें अमल करीत होते, यांत संशय नाहीं. कनाळा व वसई एथें ह्या यादवांच्या सुभेदारांचें मुख्यठाणें होतें. ठाण्याजवळ, इ. स. १२७३ व १२९१ तले, दोन कोरींव लेख सांपडले आहेत. त्यांत देवगिरीचा पांचवा यादवराजा रामचंद्रदेव [इ. स. १२७१–१३०९], याच्या कोंकणांतील दोन सुभेदारांनीं, कल्याण तालुक्यांतलें अंजूरगांव, व साष्टी [षट्षष्टि] तालुक्यांतलें वावळेंगांव, यांची देणगी दिल्याचा उल्लेख आहे. इ. स. १२८० [शक १२०२] व इ. स. १२८८ [शक १२१०] या सनांतले दोन शिलालेख अलीकडे [इ. स. १८८२] भिवंडी व वसई या गावांजवळ सांपडले आहेत. त्यांत रामचंद्र देवाच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांनीं देणग्या दिल्याचा उल्लेख आहे. या दोन लेखांपैकीं एकांत, श्रीरामराजाच्या हुकमावरून मी श्रीकृष्णदेव, या सर्व कोंकणप्रांतावर अमल करीत आहें, असें लिहिलें आहे. त्यावरून, इ. स.

१२७० च्या सुमारास, यादवांनीं शिलाहारांचा पराभव करून, आपल्या प्रतिनिधींच्या द्वारें, कोंकणावर अमल करण्याची सुरवात केली होती, असें होतें. शिलाहारराजा सोमेश्वर यानें, इ. स. १२६० तल्या लेखांत, आपणांस कोंकणचा राजा असें ह्मटलेलें आहे. यावरून कोंकणचे मांडलिक राजे शिलाहार यांजवर, नुसता यजमानपणा चालविण्याचें सोडून, आपल्या सुभेदारांचे द्वारें, १२७० पूर्वीं किती वर्षें अंमल चालविण्याची देवगिरीच्या यादवराजांनीं सुरवात केली होती, हें ठरविणें कठीण नाहीं.

तेराव्या शतकांत, देवगिरि एथील यादवराजांचा अंमल, समुद्रकिनाऱ्यापासून दूर असणाऱ्या कोंकणांतील स्थळांवर होता तरी, किनाऱ्यावरील कांहीं स्थळांवर, अन्हिलवाडा एथील राजांचा अमल होता, असें दिसतें. रशीदउद्दीन (इ. स. १३१०) याचें असें मत आहे कीं, तेराव्या शतकाच्या अखेरीस, खंबायत, सोमनाथ, व उत्तरकोंकण, हे प्रांत गुजराथच्या राज्यांत होते. परंतु या ग्रंथकाराचे लेख घोंटाळ्याचे असल्यामुळें विश्वसनीय नाहींत. मार्को पोलो (इ. स. १२९०) म्हणतो कीं, मी मुशाफरी करीत असतां ठाणें एथें स्वतंत्र राजा होता. तसेंच एथील लोक मूर्तिपूजक असून त्यांची भाषाही स्वतंत्र होती. ठाण्याच्या बंदरीं चांचे लोकांचा फार उपद्रव असे. ह्मणून एथील राजानें त्यांच्याशीं कांहीं करार करून ठेविला होता. किनाऱ्यावरील प्रांतीं नाईक, राजे, व राव, अशीं नांवें धारण करणारे अधिकारी असत ते अन्हिलवाडा एथील राजांचे मांडलिक होते.

**पहिला भाग समाप्त.**

## भाग दुसरा.

## मुसलमानांची कारकीर्द.

### इ. स. १३००–१५००

चवदाव्या शतकाच्या अवेलीस दिल्लीचे तुर्की बादशहा ठाणें जिल्ह्यांत शिरले. अल्लाउद्दीन खिलजी [ इ. स. १२९७–१३१७ ] याचा अंमल गुजराथेंत बसविणारा अल्पखान सरदार ( इ. स. १३००–१३१८) उत्तरेकडून दक्षिणेकडे संजाणपर्यंत आला. त्या वेळीं संजाण मातबर असें व्यापाराचें स्थळ होतें. तेथील राजानें अल्प खानास मोठ्या आवेशानें शहथळा केला. आंत प्रथमतः त्यास यश आलें. परंतु अखेरीस त्याचा व त्याच्या पारशी जातीच्या प्रजांचा पराभव झाला. हा मुसलमानांनीं केलेला संजाणचा विजय इ. स. १३१२ व १३१८ यांच्या दरम्यान बहुतकरून झाला असावा.कारण देवगिरीचा यादव राजा रामचंद्र याच्या अमलाखालीं दक्षिणगुजराथ, इ. स. १३०९ पर्यंत, होती व त्यावेळीं त्या प्रांताचें नवसरी हें मुख्य स्थळ होतें. त्याच्या मरणानंतर त्याचा पुत्र शंकर याच्या हातीं तें राज्य आलें. पुढें त्यानें, इ. स. १३१२ त, दिल्लीच्या बादशहाला खंडणी देण्याचें नाकारिलें, व त्यामुळें तो मारला गेला. इ. स. १३१८ त, रामदेवराजाचा जांवई हरपालदेव यानें, मुसलमानांचें स्वामित्व नाकबूल केल्यामुळें,गुजराथेंतील मुसलमानांच्या सैन्यानें नवसरी घेतली असावी असें दिसतें. कारण, पुढें इ. स. १३२० त, व्यापाऱ्यांचा नाईक मलिकउलतुजार, याची नवसरीस नेमणूक झाली. इ. स. १३१८ त देवगिरि एथील यादवांचा पाडाव झाल्यानंतर, आपल्या कारकीर्दीच्या आरंभी थोडा वेळ पर्यंत मोठा जोम प्रगट करणारा दिल्लीचा पहिला मुबारिक बादशहा [ इ. स. १३१७–१३२१ ] यानें, कोंकणांत समुद्रापर्यंत आपल्या अमलाचीं ठाणीं बसविण्याचा हुकूम केला, आणि त्याप्रमाणें मुंबईमाहीम व साष्टी एथें ठाणीं बसविलीं गेलीं. ठाणें जिल्ह्यांतील समुद्रकिनाऱ्यावरच्या गांवीं मुसलमानांची वस्ती फार असल्यामुळें त्यांना सुलतानें या समयीं जय

मिळाला असावा असें दिसतें. कारण मुसलमानांनीं लिहिलेल्या इतिहासांत, ठाणें जिल्ह्याचा किनारा मोठया प्रयासानें जिंकल्याचा उल्लेख, कोठेंही आढळत नाहीं.

फ्रेंच फकीर जोरडानस व ओडेरिकस हे, इ. स. १३२१ व १३२४ ह्या वर्षी, ठाण्यांत होते. त्यांच्या लेखांवरूनही, दिल्लीच्या तुर्की बादशहांनीं, समुद्रकिनाऱ्याचा पट्टा जिंकून, ठाण्यांत शिबंदी ठेविली होती असें दिसतें. ह्या फ्रेंच फकिरांनीं असें लिहिलें आहे कीं, सारासेन ह्मणजे मुसलमान यांनीं नुकतेंच या प्रांताचें राज्य बळकाविलें होतें, व तें या वेळीं सगळें त्यांच्या ताब्यांतही होतें. त्यांनीं, हिंदूंच्या देवांच्या मूर्तींचीं अनेक देवालयें व ख्रिस्ती धर्माचीं पुष्कळ देवळें मोडून, त्यांच्या मशिदी बनविल्या होत्या, व त्या देवळांची मालमत्ता आणि नेमणुका, ह्यांचा अपहार केला होता. ठाणें दिल्लीच्या बादशहाच्या अमलाखालीं असून, तेथें एक मलिक ह्मणजे लष्करी अधिकारी, व एक काजी ह्मणजे मुसलमानी धर्माचा अधिकारी असे. एका प्रसंगीं काजीनें उत्तेजन दिल्यामुळें मलिकानें चार ख्रिस्ती फकिरांना ठार मारिलें, व ह्या क्रौर्याच्या कृत्यामुळें दिल्लीच्या बादशहानें, त्याला प्रथम त्याच्या कामावरून काढून टाकिलें, आणि नंतर त्याचा वध करविला. या दोन ख्रिस्ती फकिरांनीं ठाणें शहराविषयीं पुष्कळ चमत्कारिक गोष्टी आपल्या लेखांत लिहिल्या आहेत. ते म्हणतनात कीं, ठाण्यांत इतकी अतिशय उष्णता असे कीं, उन्हांत एक ख्रिस्ती स्तोत्र होई तों पर्यंत, ह्मणजे सुमारें अर्धा तास पर्यंत, उघडें डोकें ठेवून उभें राहिलें असतां, यमसदनास जाण्याचा प्रसंग येई. या प्रांतीं त्या वेळीं सोनें, लोखंड, व तृणमणि हे धातु सांपडत असत, व इतर धातु परदेशांतून आणीत. फणस, आंबा, माड, ताड, वेलीमाड, ज्याला पंचवीस तीस खोडें असतात असा वड, गोरख चिंच नांवाचें एक चमत्कारिक झाड, व अति तीक्ष्ण बाणाचाही ज्यांत प्रवेश होत नाहीं असें एक झाड ( हा बहुतकरून साग असावा ), यांनीं हा सर्व प्रांत भरलेला होता. अन्न, तांदूळ, गहूं, तीळ, लोणी, आलें, व ऊंस ह्यांची या प्रांतांत समृद्धि होती. काळे सिंह, चित्ते, काळसुंदे, गेंडे, मगर, वानर, माकड, फळें खाणारीं घारी एवढालीं वडवाघळें, आणि कुत्र्या एवढाल्या

घुशीही पुष्कळ एथें होत्या. एथें घोडे, उंट, हत्ती, ही जनावरें नव्हतीं, [illegible] भिकार गाढवें मात्र होतीं, एथील बैल, ओझें नेण्याच्या कामास व नांगरण्याच्या कामास लावीत, आणि त्यांजवर बसूनही लोक जात. हे बैल उत्तम प्रकारची जनावरें असून, त्यांचीं शिंगें भक्कम अर्ध पावला इतकीं लांब असत. उंटासारखी त्यांच्या पाठीवर मदार किंवा वशिंड ( कोळें ) असे. बैलांना पितरांप्रमाणें येथील लोक मान देत, आणि बहुतेक लोक त्यांची पूजा करीत. एथील लोक मूर्तिपूजक, हिंदु, व पारशी होते. ते अग्नि, सर्प, व वृक्ष आणि विशेषतः तुळस यांची पूजा करीत. सारासेन ह्मणजे मुसलमान लोकही एथें होते ते आपल्या धर्माविषयीं मोठे दक्ष असत. इकडे तिकडे पसरलेले थोडेसे नेस्टोरियन पंथाचे ख्रिस्तीही एथें होते ते दयाळू असत. तथापि ते अज्ञ व दुफळी पाडणारे होते. ओझीं वाहणारे व खपणारे डोंबारीही एथें होते. त्यांना धर्म मुळींच नसून ते मेलेल्या गुरांचेंही मांस खात. एथील पुरुष व बायका रंगानें काळ्या होत्या. एक लहानसा कापडाचा तुकडा ते ढुंगणाभोंवतीं वेढून घेत व त्याचा पदर उघड्या पाठीवर टाकून देत. तांदुळांची पेज, लोणी, व तेल हे त्यांचे खावयाचे पदार्थ होते. दूध व ताडी हे पदार्थ ते पीत. लढाई करणें हें त्यांना पोरखेळासारखें सोपें वाटे. ते लढाईस जात तेव्हां वाटोळी व लेंचीपेंची एक भिकार ढाल, व टोंकाशीं बारीक केलेली अशी एक लोखंडी कांब हातीं घेत. लढाईच्या वेळीं ते शरीर उघडेंच ठेवीत असत. ते निर्मळ अन्न खात, खरें बोलत, व न्याय उत्तम करीत. पूर्वापार चालत आलेले, प्रत्येक जातीचे हक्क, ते मोठ्या खबरदारीनें रक्षीत असत. मूर्तिपूजक होते ते उपदेशकाचें ह्मणणें ऐकून घेत व त्याचा धर्म स्वीकारीत. मुसलमान होते ते ख्रिस्ती उपदेशकांचा कंटाळा करीत. त्यांनीं एका प्रसंगीं चार ख्रिस्ती उपदेशकांना ठार मारिलें व पांचव्याचे फार हाल केले. मूर्तिपूजकांतील एखाद्या स्त्रीचें लग्न होऊं लागलें ह्मणजे तिला ते घोड्यावर बसवीत, व तिचा नवरा तिच्या मागें बसून तिच्या मानेजवळ एक अणकुचीदार सुरी धरी. त्या प्रसंगीं त्यांच्या अंगावर कांहीं नसे. डोक्यांत एक उंच टोपी

मात्र घालीत व तिजवर पांढरीं फुलें विणलेलीं असत. गांवांतील सर्व बायका ह्या वधूवरांच्या पुढें ओळीनें गाणें गात गात नवऱ्याच्या घरापर्यंत जात. नंतर त्या वधूवरांस एकटींच घरांत ठेवीत. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठल्यावर तीं उभयतां पूर्ववत् उघड्या अंगानेंच हिंडत. कुलीन व श्रीमंत लोक मेले असतां त्यांचीं प्रेतें जाळीत व त्यांच्या बायका मोठ्या आनंदानें त्यांजबरोबर सती जात. बाकीचे बहुतेक लोक मेल्यावर त्यांचीं प्रेतें शेतांत नेत व तेथें जनावरें आणि पाखरें यांनीं खाण्याकरितां तीं उघड्या जागीं ठेवीत. अति कडक उन्हाच्या योगानेंही तीं लवकरच भस्म होऊन जात. भडोच, मलबारकिनारा, इराणी आखात, व इथियोपिया या स्थळांशीं एथील लोकांचा व्यापार चाले. ह्या प्रांताच्या किनाऱ्यावर चांचे, ह्मणजे समुद्रावर लूट करणारे लोक, यांचा फार उपद्रव असे.

महमद तघलक(१३२५–१३५०)याच्या जोमदार कारकीर्दींत उत्तरकोंकणावर मुसलमानांचा अंमल बहुश: असावासें वाटतें. तथापि ते मुसलमान आपल्या राज्यांतील या भागाची विशेष कळकळ बाळगीत नसत. इब्न बटुटा नामक मुशाफर (इ. स. १३४२) ज्या रस्त्यानें गेला त्याचा विचार केला असतां असें दिसून येतें कीं, त्यावेळीं दौलताबाद व कोंकणचा किनारा यांच्या दरम्यान व्यापार करणारे उदमी, ठाणें जिल्ह्यांतील बंदरीं न येतां, नंदुरबार व सोनगड यांवरून खंबायतेकडे जात असत. ह्या काळीं दौलताबाद व समुद्रकिनारा यांच्या दरम्यानच्या रस्त्याच्या सभोंवतालचा मुलूख दोघां हिंदु राजांच्या अमलाखालीं होता. ह्यां पैकीं एक राजा बागलाण एथें असे व दुसरा जव्हार एथें असे. त्या बागलाणच्या राजाचें नांव मानदेव असें होतें इ. स. १३४१ त बावीस किल्ले व नऊ लक्ष उत्पन्नाचा मुलूख यांच्यावरचें जव्हारच्या राजाचें स्वामित्व दिल्लीच्या बादशहानें कबूल केलें. तेव्हां या जिल्ह्याच्या किनाऱ्याचा कांहीं भाग गुजराथच्या राजाच्या नामधारी अमलाखालीं असावा असें दिसतें. परंतु ह्या जिल्ह्याचा दक्षिणेशीं, ह्मणजे दौलताबादच्या राजाशीं, फारसा संबंध राहिला नव्हता. इ. स. १३५० त, जेव्हां नव्या ह्मणाने मोंगल सरदारांना दौलताबादेंत

वळविलें, तेव्हां कोंकणांतून कोणी तेथें गेले नाहींत. पुढें लवकरच स्वतंत्र ब्राह्मणी राज्याची स्थापना होऊन, दक्षिणची राजधानी दौलताबाद होती ती कलबुर्गे झाली. तेव्हां उत्तर कोंकणाचा दक्षिणेच्या राज्याशीं असलेला संबंध पूर्वीपेक्षांही ढिला झाला. उत्तरेस नवसरी, व दक्षिणेस चौल, हीं कलबुर्ग्यांच्या अमलाखालीं होतीं तरी, हल्लीं ठाणें जिल्ह्यांत जो मुलूख आहे त्याच्याशीं तेथील राजाचा फारच थोडा संबंध होता. इ. स. १३८०त, कलबुर्ग्यांच्या राज्यांत मुख्य मुख्य शहरीं, अनाथ मुलांकरितां शाळा घातल्या. त्या मुख्य मुख्य शहरांच्या नावांत ठाणें जिल्ह्यांतील एकाही बंदरगांवाचें नांव आढळत नाहीं. यावरून त्या वेळीं मुसलमानांचा कोंकणावरचा अंमल नामधारी होता असें दिसतें. इ. स. १४६४ तला एक शिलालेख सांपडला आहे. त्यावरून असें दिसून येतें कीं, त्यावेळीं भिवंडी एथील हिंदुराजाला, दुसऱ्यास जमीन इनाम देण्यापुरतें, स्वातंत्र्य होतें.

पंधराव्या शतकांत मुसलमान राजे उत्तरकोंकणाविषयीं पुनः विशेष कळकळ बाळगूं लागले. चवदाव्या शतकाच्या अखेरीस, गुजराथेंत एका नव्या मुसलमानी राजवंशाचें राज्य स्थापन झाल्यामुळें, कोंकण प्रांताच्या उत्तर सरहद्दीवरील मुसलानांत अधिक शौर्य व शक्ति उत्पन्न झाली. गुजराथच्या मुसलमानी राजवंशाचा संस्थापक मुजफर (इ. स. १३९० –१४१२), व त्याच्या मागून त्याच्या गादीवर बसलेला त्याचा नातू पहिला अहमद (१४१३–१४४१), या उभयतांनीं गुजराथेंतील बहुतेक रजवाड्यांवर आपला अंमल बसविला. त्या काळच्या राजपुतान्यांतील व पश्चिम हिंदुस्थानांतील सर्व राजांत हे उभयतां प्रमुख होते. इ. स. १४२९ त, गुजराथच्या राजांचीं ठाणीं मुंबईमाहीम व ठाणें एथें असून, त्या ठिकाणीं त्यांची शिबंदीही होती. त्यांपैकीं माहीम एथील शिबंदीचा मुख्य अधिकारी कुतुबखान होता. या दोन्ही ठिकाणीं राय नांवाचे हिंदु अधिकारी असून, ते गुजराथच्या राजांचे दोस्त अथवा मांडलिक असावे, असें दिसतें. नवसरीपासून मुंबईपर्यंत सर्व समुद्रकिनारा जरी हिंदु राजांच्या अमलाखालीं होता, व जमिनी इनाम देण्यापुरतें त्यांना स्वातंत्र्यही होतें, तरी गुजराथेंतून माहीमपर्यंत अटकाव न होतां फौज आण्यापुरती त्या ठिकाणीं मुसलमानांचीही सत्ता होती. त्याच वेळेच्या

सुमारास, दक्षिणचा ह्म. कलबुर्ग्याचा राजा सुलतान अहमद ब्राह्मणी ( इ. स. १४२२–१४३५ ) यानें, कोंकण आपल्या सत्तेखालीं आण-ण्याकरितां, फार श्रम केले. इ. स. १४२९ त ब्राह्मणी राजाचा प्रधान मलिकउलतुजार कोंकणांत मोठी फौज घेऊन आला, व पुष्कळ लूट घेऊन परत गेला. ह्या लुटींत पुष्कळ हत्ती होते व सोनें आणि रुपें ह्यांनीं लादलेलीं उंटें होतीं. मलिकउलतुजार ह्यानें आपल्या यजमानाची सत्ता कोंकणपट्टींत समुद्रकिनाऱ्यापर्यंत बसविली, व १४२९त गुजराथच्या राजाचा किल्लेदार कुतुबखान हा मरतांच, माहीम व साष्टी हीं ठाणीं त्यानें घेतलीं. हा आपला अपमान झाल्याची बातमी समजतांच, गुजरा-थचा युद्धप्रिय राजा अहमदशहा यानें, दिव, गोगो, व खंबायत एथून, १७ गलबतांचें आरमार माहीमास पाठविलें, आणि आपला कनिष्ठ पुत्र झाफरखान व सेनापति मलिक इफतीकारखान यांस, त्यानें जमिनीवरून, फौज बरोबर देऊन, पाठविलें. ह्या दोन सैन्यांनीं पाण्यांतुन व जमिनीवरून ठाण्यावर हल्ला केला, व दक्षिणेच्या ह्मणजे कलबुर्ग्याच्या राजाच्या सेनापतीला माहिमास परत जाण्यास भाग पाडिलें. तेथें गेल्यावर, दक्षिणच्या राजाचा पुत्र अल्लाउद्दीन हा, सैन्यासह त्याला येऊन मिळाला, व नंतर त्यानें, माहीमच्या खाडीच्या बाजूनें मेढेकोट बांधून, आपलें स्थान विशेष मजबूत केलें. नंतर कांहीं दिवस लोटल्यावर गुजराथच्या फौजेनें हिय्या करून त्यामेढेकोटावर हल्लाकेला, आणि मोठ्या निकरानें तुंबळ युद्ध करून, दक्षणी फौजेस मुंबईकडे हाकून लाविलें. तेथें ही तिचा पुन: पराभव झाल्यामुळें, तिला मुंबईबेट सोडून जवळच्या जमिनीवर जावें लागलें. पुढें त्या फौजेला दक्षिणेंतून कुमक आल्यामुळें, तिनें परत येऊन पुन: ठाण्यावर हल्ला केला. परंतु पुन: पराभव झाल्यामुळें तिला परत जावें लागलें. ह्या प्रसंगीं गुजराथच्या फौजेला जी लूट मिळाली तींत सोनेरी व रुपेरी कलाबतूचें कापड होतें. पुढें एकदोन वर्षें गेल्यावर (इ. स. १४३२), गुजराथचा राजा अहमद यानें, आपल्या पुत्राचें लग्न माहिमच्या राजाच्या मुलीशीं केलें. कलबुर्ग्याच्या राजाचा ठाणें व मुंबई घेण्याचा जसा यत्न फसला, तसाच, गुजराथच्या

राजाकडे बागलाणच्या राजाचें स्वामित्व होतें, तें आपल्याकडे आणण्याचाही त्याचा यत्न सर्वस्वी फसला.

या नंतर इ. स. १४३६त दिलावरखानाची एक, १४५३त मलिक-उत्तुजाराची एक, व १४६९त महमूद गवानाची एक, अशा तीन स्वाऱ्या दक्षिणच्या राजांनीं कोंकणप्रांत जिंकण्याकरितां केल्या. त्या तिन्ही ही स्वाऱ्या मध्य कोंकण व दक्षिण कोंकण, ह्मणजे सांप्रतचा कुलाबा जिल्हा व रत्नागिरि जिल्हा, यांजवर झाल्या होत्या. ह्या तिघां सरदारांनीं त्या मुलखाचा पुष्कळ भाग पादक्रांत केला, व तेथील रजवाड्यांना खंडणी देण्यास भाग पाडिलें. तथापि चौल व दाभोळ या दोन ठिकाणीं मात्र त्यांनीं कायमचीं ठाणीं बसविलीं. समुद्रापासून दूरच्या पट्ट्यांत तर हिंदु रजवाड्यांचाच अंमल चालू होता. ठाणें जिल्ह्यांतील माहुलीचा राव, कुलाबा जिल्ह्यांतील रायरीचा [रायगडचा] राव, व रत्नागिरींतील विशाळगडचा राव, हे त्या रजवाड्यांत प्रमुख होते. इ. स. १४६९ च्या सुमारास, महमूद बेगड यानें, उत्तर कोंकणांत गुजराथच्या राजांची सत्ता वाढविली. कोंकण व गुजराथ यांच्या दरम्यान कूच करून, बगवाडचा अलौकिक डोंगरी किल्ला त्यानें घेतला, आणि नंतर तेथून पारनेर एथें जाऊन, व तेथें हिंदूंचा पराभव करून, तेथील राजाला तो किल्ला आपल्या स्वाधीन करण्याचें त्यानें भाग पाडिलें. तेंव्हां त्या राजानें खंडणी देण्याचें कबूल केल्यामुळें, त्याचा मुलूख त्याला महमूद बेगड यानें परत दिला.

इ. स. १४८० च्या सुमारास कलबुर्ग्याच्या ब्राह्मणी राजानें आपल्या राज्याचे आठ विभाग केले. त्या आठांपैकीं एका विभागाचें मुख्य शहर जुन्नर केल्यामुळें, ब्राह्मणी राज्याचा उत्तर कोंकणाशीं विशेष निकट संबंध झाला. पुढें थोडीं वर्षें गेल्यावर (१४८९), ब्राह्मणी राज्यास उतरती कळा लागली. तेंव्हां, गोंव्याच्या सुभेदाराचा मुलगा बहादुर खान गेलाणी ह्यानें, दक्षिण कोंकणांतील दाभोळ व इतर बंदरें घेतलीं, आणि आपणास दर्याबारचा, ह्मणजे समुद्रकिनाऱ्याचा, राजा ह्मणविलें. इ. स. १४८४ त त्यानें गुजराथेंतील बंदरांना उपद्रव दिला, व इ. स. १४९० त, याकूत नांवाचा एक हबशी गुलाम, २० तारवें बरोबर देऊन, माहीम अथवा मुंबई घेण्याकरितां पाठविला. ह्या

याकुतानें गुजराथच्या राजाचीं माहीम एथील पुष्कळ तारवें घेतलीं, व गुजराथचा राजा महमूद बेगड यानें, याकुताला माहीम एथून घालवून देण्याकरितां, जें आरमार पाठविलें होतें, त्याचा वादळ उठल्यामुळें नाश झाला. नंतर महमूद बेगड यानें महमूद ब्राह्मणी यास लिहून पाठविलें कीं, तुमच्या राज्यांतून गेल्या खेरीज, आमच्या फौजेचा बहादुर खानानावर पगडा बसत नाहीं, यास्तव तुम्हींच त्याचा बंदोबस्त करावा. त्या वेळीं अदिलखान व अहमद निजामशहा, हे ब्राह्मणी राज्यांतले दोन प्रमुख सरदार, स्वतंत्र सत्ताधारी होण्याच्या बेतांत असल्यामुळें, कोंकणपट्टीचा समुद्र किनारा आपल्या हातीं घेण्याचा बहादुराचा यत्न पाहून, ते त्याचा मत्सर करूं लागले होते. ह्मणून त्यांनीं महमूद ब्राह्मणी यास त्या कामीं मोठ्या आनंदानें मदत केली, आणि, इ. स. १४९३त, कोलापुराजवळ बहादुरावर हल्ला केला. तेव्हां तो पराभव पावून ठार मारिला गेला. नंतर माहीम व तेथें असलेलीं गुजराथचीं तारवें हीं महमूद बेगड यास त्यांनीं परत दिलीं.

इ.स.१४८५पासून इ.स.१४९३ पर्यंत जो काळ गेला त्यांत, ब्राह्मणी राजाच्या मुख्य प्रधानाचा पुत्र अहमद निजाम, याच्या ताब्यांत दौलताबाद प्रांत, त्याच्या बापानें दिला. तेव्हां त्यानें जुन्नर हें आपलें राहण्याचें मुख्य ठिकाण केलें व पुणें आणि ठाणें या दोन जिल्ह्यांतले पुष्कळ किल्ले घेतले. त्यांत मनरंजन ऊर्फ राजमाची व माहुली हे दोन होते. इ. स. १४९०त त्यानें दंडाराजपुरी घेऊन कोंकणांत आपली सत्ता वाढविली, व त्याच सुमारास आपल्या बापाचा वध बेदरच्या दरबारीं झाला असें ऐकिल्यावर, मी ब्राह्मणी राजाचा ताबेदार नाहीं, असें प्रगट केलें. इकडे महमूद बेगड हा कोंकणावरचा आपला अंमल विशेष दृढ करीत होता, व १४९५च्या सुमारास, त्यानें आपल्या राज्याचे पांच विभाग केले, त्यांपैकीं एका विभागाचें ठाणें हें मुख्य स्थान केलें. पुढें कांहीं वर्षें लोटल्यावर (इ. स. १५०८), महमूद बेगड यानें वसई व मुंबई घेण्याचा आपला बेत सिद्धीस नेऊन, पूर्वीपेक्षां आपला अंमल सदृढ केला, नागोठणें एथें एक शिबंदी ठेविली, व चौलास एक फौज पाठविली. ह्याचकाळाच्यासुमारास गुजराथच्या मुसलमानी राजांच्या सत्तेचा कळस झाला होता. तेव्हां, दमण, वसई, व मुंबई, यांचा समावेश गुजराथच्या राज्यांत होत असे, असें मिराती अहमदी ग्रंथाचा कर्ता ह्मणतो.

आगाशी, केळवेंमाहिमाजवळचें दांडें, सोपारें, वसई, भिवंडी, कल्याण, मुंबई व पनवेल या बंदरांपासून गुजराथच्या राजांना वसूल मिळत असे. उत्तर कोंकणच्या समुद्रकिनाऱ्याचा इतका मोठा भाग, गुजराथच्या राज्यांत होता, असें त्या राज्याच्या इतिहासकारांचें जें ह्मणणें आहे तें, इ. स. १५०२ त इकडे आलेला इतालींतील मुशाफर वार्थेमा यानें, त्या काळच्या गुजराथच्या राज्यांत चौलाचा समावेश केला आहे त्यावरूनही, सिद्ध होतें. त्याप्रमाणेंच प्रथमतः इकडे आलेल्या पोर्टुगीज लोकांनीं, गुजराथचें राज्य व दक्षिणचें राज्य यांच्या मधील सीमा कल्याणची खाडी होती, असें जरी लिहिलें आहे तरी, इ. स. १५३० त नागोठण्यास गुजराथच्या राजाचा सुभेदार होता, व पनवेल तालुक्यांतला करनाळा किल्ला आणि पेण तालुक्यांतला सांकशी किल्ला या दोन डोंगरी किल्लयांवर गुजराथच्या राजानें नेमलेले किल्लेदार, इ. स. १५४० त, होते असें त्यांनीं लिहिलें आहे, त्यावरूनही ती गोष्ट सिद्ध होते.

मुसलमानांचा अंमल ठाणें जिल्ह्यांत झाल्यापासून पोर्टुगीज लोकांचा अंमल होईपर्यंत, जीं दोनशें वर्षें लोटलीं, त्या अवधींत ठाणें जिल्ह्यांतील बंदरांत चालणाऱ्या व्यापाराची स्थिति कशी होती, या विषयींची माहिती फारशी मिळत नाहीं. ह्या अवधीपैकीं पहिलीं चाळीस वर्षें पर्यंत दौलताबादचे मुसलमान अधिकारी ठाणें आपलें मुख्य बंदर मानीत असत. नंतर ब्राह्मणी राजांनीं आपल्या राज्याची राजधानी कलबुर्गें शहर केली [इ. १३४७] तेव्हां, ठाण्याच्या दक्षिणेकडचें चौल व रत्नागिरि जिल्ह्यांतलें दाभोळ बंदर, हीं व्यापाराचीं मुख्य बंदरें झालीं. पंधराव्या शतकाच्या अखेरीस, तळघाटानें माहीम व ठाणें एथून, बऱ्हाणपुराकडे कांहीं माल जात असे, तरी अहमदाबादच्या राजांनीं उत्तर कोंकणांतील बंदरें घेतल्यामुळें, एथील व्यापार विशेष कमी झाला होता. पंधराव्या शतकाचा शेवट होण्यापूर्वीं कांहीं वर्षें ( इ. स. १४९६ ), अहमदनगर एथें निराळ्या राज्याची स्थापना झाल्यामुळें, चौल पुनरपि व्यापाराचें मुख्य बंदर झालें. या मुसलमानी कारकीर्दीच्या काळीं इराण देशाची स्थिति भरभराटीची असल्यामुळें, इराणी अखातावरील बंदरीं व्यापार मोठा चालत असे. एथें घोड्यांचा खप निरंतर होत असल्यामुळें, या जिल्ह्यांतील बंदरें व आरब-

स्थानांतील बंदरें, यांमध्यें निकट संबंध सतत असे. झांजिबारच्या किनाऱ्यावरील बंदरांबरोबरही एथील बंदरांचा व्यापार चाले. पंधराव्या शतकांत व्हेनिस शहरचे लोक मोठे संपन्न होऊन त्यांची मत्ता वाढली, आणि इ. स. १४५३ त तुर्कांनीं कान्स्टांटिनोपल शहर घेतलें.त्यामुळें युरोप व एशिया यांच्या दरम्यान चालणारा व्यापार तांबड्या समुद्राच्या मार्गानें होऊं लागला. हा नवा व्यापार पुष्कळ अंशीं मलबार किनाऱ्यावरील बंदरीं होऊं लागला. सिंहलद्वीप, पूर्वेकडील आर्किपिल्यागो, व चीन, या स्थळांशीं ठाणें जिल्ह्यांतील बंदरांचा साक्षात् व्यापार होण्याचा बंद होऊन, तो मलबार किनाऱ्यावरील बंदरांशीं मात्र चालू झाला. ह्या दोनशें वर्षांच्या मुदतींत ठाणें मोठें शहर व व्यापाराचें स्थळ होतें; चौल व्यापाराचें मुख्य ठिकाण होतें; सोपारें संपन्न स्थळ होतें; आणि माहीम मुख्य बंदर व व्यापाराचें स्थळ होतें. मलबार किनाऱ्यावरील क्विलान व कालिकोट; गुजराथेंतील खंबायत; इराणी आखातांतलें ओर्मुझ; आरबस्थानच्या पूर्व भागांतील ढाफर, तांबड्या समुद्रावरील एडन, जिड्डा, व इथियोपिया; आणि आफ्रिकेंतील बंदरें, या स्थळांशीं मुख्यत्वेंकरून या जिल्ह्यांतील व्यापार या मुसलमानी कारकीर्दींत चालत असे. मागील हिंदु कारकीर्द व ही मुसलमानी कारकीर्द या दोन्हींत ज्या वस्तूंचा व्यापार होत असे, त्यांची तुलना केली असतां, व्यापाराच्या जिनसांत पुढें सांगितलेले फेरफार दिसून येतात. तांदूळ, गहूं, सुपारी, नागवेलीचीं पानें, हे जिन्नस पूर्वींच्या कारकीर्दीपेक्षां या कारकीर्दींत इराण व आरबस्थानचा किनारा एथें इकडून अधिक जात. दक्षिणेंत तयार झालेली मलमलही अधिक बाहेर जाई. व्हेनिस एथील उंची रेशमी कापड, इराणांतील किनखाप व जरतारी कापड, व चीन देशांतील अतलस नांवाचें रेशमी कापड, हे जिन्नस पूर्वींपेक्षां इकडे अधिक येत. तसेंच व्हेनिस एथून लोकरीचें कापड, कामलेटें, आरसे, हत्यारें, सोन्यारुप्याचे दागिने, व इतर पदार्थ हे जिन्नस इकडे पूर्वींपेक्षां अधिक येत. तांदूळ, आलें, ऊंस, लोणी, व तिळांचें तेल, हे खाण्याचे जिन्नस ठाणें जिल्ह्यांत तयार होऊन आरबस्थान व आफ्रिका एथील बंदरीं जात. गहूं ओर्मुझ व आरबस्थान एथें जात असे. ताडीमाडी, व

ताडमाडापासून केलेली साकर एथें पुष्कळ होत असे. फणस, आंबे, गोड व आंबट लिंबें, व नारळ हीं फळें एथें त्या वेळीं पुष्कळ असत. सुपारी व विड्याचीं पानें, कोंकणांत व मलबार किनाऱ्यावर, पुष्कळ उत्पन्न होत आणि आरबस्थान व ओर्मुझ येथें पुष्कळ पाठवीत. मिऱ्यें, आलें, व वेलदोडे, हे मसाल्याचे जिन्नस मलबार किनाऱ्याहून एथें येत. सिंहलद्वीपाहून दालचिनी येत असे. जावा बेटांतून जायफळें, कबाबचिनी, जायपत्री, व वेलदोडे येत. आणि सुमात्रा बेटांतून लवंगा येत. हे एथें येणारे मसाल्याचे जिन्नस घाटावर पाठवीत व आफ्रिका, आरबस्थान, इराण एथेंही बहुशः पाठवीत. ठाणें एथें तयार केलेलें कापसाचें कापड, ब्रह्माणपूर व घाटावरच्या इतर शहरीं तयार होणारी जरतारी व रुपेरी मलमल व तलम कापड, हे प्रावर्णाचे जिन्नस, इराण आरबस्थान, आफ्रिका, व चीन या ठिकाणीं जात असत. चिनांत तर तीन रेशमी आंगरख्यांची किंमत एका कापडाच्या आंगरख्यास पडत असे. ठाण्यांत मलमल तयार होत असे. घाटावरून आणि चीन, इराण, व युरोप एथून रेशमी कापड आणीत त्याचा एथें खप होऊन बाकी राहिलेलें आफ्रिका व आरबस्थान एथें जाई. युरोपांतून लोंकरी कापड तांबड्या समुद्राच्या द्वारें येत असे. उंची हिरे हिंदुस्थानांतून बाहेर जात, आणि मोत्यें व माणकें हे मूल्यवान पदार्थ हबसदेश, इराण, व सिंहलद्वीप एथून बाहेर जात. इथियोपिया एथें त्या काळीं रत्नें पुष्कळ होतीं. तांबड्या समुद्रावरील बंदरांतून पोंवळीं इकडे येत. मोत्यें व रत्नें यांचा आफ्रिकेंत फार खप होत असे. चीन देशांतून चांदी येत असे. जर्मनींतून तांबड्या समुद्राच्या द्वारेंही बहुशः इकडे चांदी येऊन ती सोफाला एथें जात असे. सुमात्रा बेटांतून व बहुशः तांबड्या समुद्राच्या द्वारें इंग्लंडांतून कथील इकडे येत असे. सोनें, लोखंड, व तृणमणि हे जिन्नस या जिल्ह्यां-त बाहेरून आणीत नसत. बांबू इकडून बाहेर जात व मलबार किनाऱ्याकडून रक्तचंदन इकडे आणीत. धूप व हिरा बोळ आरबस्थानांतून इकडे आणीत, एशिया मैनरांतून तुरटी आणीत, आफ्रिकेंतून अंबर आणीत, आणि अगरू, कापूर, व ऊद हे सुवासिक पदार्थ जावा व सुमात्रा या दोन बेटांतून

आणीत. चीन देशांतून कस्तुरी, हिरा बोळ, व रेवाचिनी आणीत, या कारकीर्दींतही तवकील ठाणें जिल्ह्यांत तयार करून बाहेर पाठवीत असत. चीन देशांतून मातीचीं उत्तम भांडीं इकडे येऊन घाटावर व इराणांत जात. भिंगे, शस्त्रें, सोन्यारुप्याचे दागिने, कांच, व इतर जिन्नस व्हेनिस एथून इकडे येत. ओर्मुझ व एडन एथून इकडे पुष्कळ घोडे येत. खुरासन व हबसदेश एथून, पुष्कळ लोक, शिपायगिरीचें काम करून पैसा मिळविण्याकरितां इकडे येत. आफ्रिकेंतून शिद्दी गुलामही इकडे येत.

बार्बोसा ( इ. स. १५००–१५१४ ) यानें चौल एथील व्यापाराची जी पद्धत वर्णिली आहे, ती ठाणें जिल्ह्यांतील बंदरांत अति प्राचीन काळापासून चालू असलेल्या व्यापाराच्या पद्धती प्रमाणेंच प्रायः असल्यामुळें, ती लक्षांत ठेवण्यासारखी आहे. बगदाद एथील खलिफांच्या कारकीर्दींत ( इ. स. ७००–१००० ) ठाणें एथें, सासेनियनांच्या कारकीर्दींत ( इ. स. ३००–६०० ) कल्याण एथें, मिसरदेशांतील ग्रीक लोकांच्या कारकीर्दींत [ इ. स. पूर्वीं १००–इ. स. नंतर २०० ] चौल येथें, आणि सालोमनच्या काळीं ( इ. स. पूर्वीं १००० वर्षें ) प्रायः सोपारें एथें, हीच व्यापाराची पद्धत चालू असावी असें दिसतें. ती पद्धत ही कीं, परदेशाशीं होणाऱ्या व्यापाराचें ह्या जिल्ह्यांतील मुख्य स्थान हें मोठें शहर असे असें नाहीं.तर एशियाच्या सर्व भागांतून दिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी, व मार्च, या चार महिन्यांत इकडे येणाऱ्या गलबतांची पुष्कळ गर्दी होत असे तेव्हां,आणि दक्षिणेंतून व उत्तर हिंदुस्थानांतून, ज्यांच्या पाठीवर मालानें भरलेल्या लांब व पांढऱ्या गोण्या चढविलेल्या असत,अशा तिसचाळीस बैलांचा एकेक असे बैलांचे अनेक तांडे घेऊन, लमाणांच्या झुंडीच्या झुंडी इकडे येत तेव्हां मात्र,अशाप्रकारच्या व्यापाराच्या मुख्य बंदरीं माणसांची गर्दी असे.परंतु इतर वेळीं तेथें फारच थोडे लोक कायमचे राहाणारे असत.हे लमाण शहरापासून कोस दीड कोसावर उतरत आणि तेथें या प्रदेशांतील सर्व शहरांतले व कसब्यांतले व्यापारी मालाचीं व कापडाचीं दुकानें घालीत. वर सांगितलेले चार महिनेपर्यंत,अशा

ठिकाणीं, जणूं काय मोठी जत्रा भरे, आणि नंतर पुढील वर्षाच्या जत्रेचा समय येई पर्यंत व्यापारी आपापल्या घरीं जाऊन राहात.

ठाणें जिल्ह्यांतील बंदरीं त्याकाळीं व्यापार करणारे व्यापारी जातीनें हिंदु, मुसलमान, व मिसरदेशी असत. त्यांत थोडेसे युरोपियनही असत. परंतु त्यांची संख्या पुढें हळू हळू वाढूं लागली होती. मागील कारकीर्दीप्रमाणेंच या मुसलमानी कारकीर्दींतही परदेशच्या बंदरीं जाण्याचा क्रम हिंदु व्यापाऱ्यांनीं चालू ठेविला होता. त्यामुळें ते ओर्मुझ, एडन, झांजिबार, व मलाका एथें आढळत असत. मागच्या कारकीर्दींत ज्या प्रकारचीं गलबतें ठाणें जिल्ह्याच्या किनाऱ्यावरील बंदरीं येत असत, त्याच प्रकारचीं गलबतें या कारकीर्दींतही येत. यावरून या गलबतांच्या बांधणींत फारच थोडा फेरफार या कारकीर्दींत झालेला होता असें दिसतें. खुद्द या देशांत बांधलेल्या गलबतांपैकीं कांहीं फार मोठीं असत तरी त्यांचें सामान दोरखंड व सुतळ यांच्याच द्वारें जोडलेलें असे. तीं बांधण्याच्या कामीं लोखंडी सामानाचा उपयोग करीत नसत, व फळ्या बसवून त्यांजवर मजले केलेले नसत. त्यांत पाणी फार येत असे. त्यामुळें त्यांतील माणसांना त्यांत उभें राहून तें उसपीत असावें लागे. तांबड्या समुद्राकडून येणाऱ्या गलबतांचें सामान दोरखंडांनीं जोडलेलें असे, व त्यांजवर लव्हाळ्याच्या हांतऱ्यांचीं अवजारें असत. एडन एथील गलबतांच्या फळ्या एकमेकींशीं जोडलेल्या असत, व त्यांजवर कापसाच्या कपड्याचीं अवजारें असत. इराणी आखातांतलीं तारवें अगदीं लेंचीफेंचीं व बेढील असत. सुतळीच्या योगानें त्यांचें सामान जोडलेलें असे, व त्यांच्या कामांत लोखंडाचा उपयोग मुळींच होत नसे. चिनी गलबतें मलबार किनाऱ्याच्या आलीकडे फारशीं येत नसत. मार्को पोलो या मुशाफरानें चिनी गलबतांचें केलेलें वर्णन मागें दिलें आहे त्याहून या कारकीर्दींतलीं चिनी गलबतें फारशीं भिन्न नसत. त्या वेळच्या युरोपियन मुशाफरांनीं पूर्वदेशीय खलाशांच्या कुशलतेची निंदा केलेलीच आढळते. त्यांचा एके ठिकाणीं असा लेख आहे कीं जो वारा आमचे खलाशी उत्तम अनुकूल मानतात तो यांना अति भयंकर वाटतो व आमचा एक खलाशी यांच्या शंभर खलाशांबरोबर आहे. हिंदुस्था-

मच्या लगतच्या समुद्रांत या मुसलमानी कारकीर्दीतही मागच्या कारकीर्दीप्रमाणेंच चांचे, ह्मणजे समुद्रावरचे लुटारू, यांचा फार उपद्रव असे. या उपद्रवाच्या निवारणार्थ एथील गलबतांवर तिरंदाज व हबशी शिपाई ठेवीत असत. इराणी अखातच कालिकोट एथें, १५ व्या शतकांत, चांचे होते असें अबदूल रझक (इ. स. १४४०) यानें आपल्या ग्रंथांत लिहिलें आहे. जे ख्रिस्ती किंवा मुसलमान नसून पाषाणाच्या मूर्तींची पूजा करीत, व ज्यांना ख्रिस्ताची माहिती मुळींच नव्हती, अशा प्रकारच्या चांच्यांचा उपद्रव समुद्रांत फार होता असें, १४४० नंतर तीस वर्षे लोटल्यावरही, निकिटिन यानें आपल्या ग्रंथांत लिहिलें आहे. या १५ व्या शतकांत अहमदाबादेच्या मुसलमान राजांनीं काठेवाडांतील द्वारकेचे चांचे, सुरत जिल्ह्याच्या दक्षिणभागांतल्या बलसाडचे चांचे, व मलबार किनाऱ्याकडून येणारे परदेशीय चांचे, यांजवर पुष्कळ वेळा स्वाऱ्या केल्या.

**भाग दुसरा समाप्त.**

## भाग तिसरा.

## पोर्टुगीज लोकांची कारकीर्द.

इ. स. १५००–१६७०

गोव्यापासून वसईपर्यंत सगळा समुद्रकिनारा, नुकताच विजापूरच्या व गुजराथच्या मुसलमान राजांच्या अमलांत गेला होता, अशा समयीं, इ. स. १४९८ त, पोर्तुगीज लोक, केप आफ् गुड् होप या भूशिरास वळसा घालून, कालिकोट एथें येऊन दाखल झाले. तेव्हां हिंदुस्थानांतील सर्व गलबतांवरील लोकांशीं व राजांशीं मित्रभावानें वागण्याचा त्यांचा उद्देश होता. मक्केंतील मूर लोक, आणि युरोप व एशिया या दोन खंडांमध्यें व्यापार करण्याचा जणूं काय ज्यांस मक्ताच मिळाला होता असे, आरब व मिसरदेशी व्यापारी, हे मात्र या पोर्टुगीज लोकांशीं प्रतिस्पर्धा करणारे या वेळीं होते. पोर्टुगीज लोकांनीं, गुजराथेंतील जीं गलबतें प्रथमतः घेतलीं होतीं, तीं कांहीं एक उपद्रव न करितां परत दिलीं, व आम्हीं तुमचे मित्र आहों असा त्यांनीं गुजराथच्या राजास निरोप पाठविला. सतत कलह चालविल्यानंतर, इ. स. १५११ त, गोवें पोर्टुगीज लोकांना मिळाल्यावरही, ते विजापूरच्या राजांबरोबर केलेला करार पाळीत होते, असा, मुसलमान इतिहासकारांनीं, त्यांच्या सचोटीविषयींचा उल्लेख, आपल्या ग्रंथांत केलेला आढळतो. अहमदनगर एथील निजामशाही राजांशींही ते मित्रत्वानेंच वागत असत. * तीन वेळां मात्र त्यांनीं, आपलें रक्षण करण्याकारितां, अहमदनगरच्या राजाच्या मुलखावर हल्ला केला. गुजराथचा मुसलमान राजा महमूद बेगड याची आपल्या धर्मावर फार श्रद्धा असल्यामुळें, त्याच्यानें या ख्रिस्ती पोर्टुगीज लोकां-

* इ. स. १५३० त गुजराथच्या राजानें पोर्टुगीज लोकांबरोबर कलह करण्यास अहमदनगरच्या राजाला भाग पाडलें तेव्हां एकदां; विजापूर, अहमदनगर, व कालिकोट एथील तिघे राजे, इ. स. १५७२त, एकदम पोर्टुगीज लोकांवर उठले तेव्हां एकदां; व चौलच्या खाडीच्या नस्ताजवळचा कोर्लेई नांवाचा डोंगरी किल्ला, इ. स. १५९४ त, तट बांधून मजबूद करण्याचा अहमदनगरच्या राजांनीं यत्न केला तेव्हां एकदां.

पर्शेवर स्नेह करवला नाहीं, व नौकानयनविद्येंत तो स्वतः निपुण असल्यामुळें, आम्हीं समुद्रावर राज्य करूं हें पोर्टुगीज लोकांचें ह्मणणें त्यानें कबूल केलें नाहीं. ह्मणून, मिसरदेशचा मामेलूक * सुलतान, व कालिकोटचा झामोरिन, या दोघांबरोबर, त्यानें, या पोर्टुगीज लोकांना हिंदुस्थानालगतच्या समुद्रांतून हाकून लावण्याकरितां, स्नेह केला आणि मिसरदेशी लोकांना आरमार तयार करण्याच्या कामीं मदत करण्याकरितां वसई एथून मक्केस यानें लांकडें पाठविलीं. नंतर, इ. स. १५०७त, मिसरदेशाहून एक बारा तारवांचें आरमार खंबाय च्या अखातांत आलें. ह्यावर १५०० लोक होते, व अमीर हुसेन हा त्या आरमाराचा नाखवा होता. तें आरमार येऊन दाखल होतांच, आपलें आरमार बरोबर देऊन, महमुदानें ह्या दोन्ही आरमारांस किनाऱ्याच्या बाजूनें दक्षिणेकडे रवाना केलें, व गुजराथेंतील एकाद्या बंदरीं पोर्टुगीज लोक आढळल्यास, त्यांच्या बरोबर लढाई करतांना ह्या दोन आरमारांस कुमक करावी ह्मणून, एक फौज बरोबर घेऊन तो स्वतः खुषकीच्या मार्गानें गेला. या प्रसंगीं चौल एथें लढाई होऊन तींत पोर्टुगीज लोकांचा पराभव झाला. परंतु पुढें लवकरच, ता. २ फेब्रुआरि इ. स. १५०९ रोजीं, दिवबंदराजवळ गुजराथ, मिसरदेश, व कालिकोट एथील एकत्र मिळालेल्या तिन्ही आरमारांचा पोर्टुगीज लोकांनीं पराभव केला. इ. स. १५०७ त महमूद बेगड, हा वसई एथील बखेडा मोडण्याच्या कामांत, व वसई आणि मुंबई हीं घेण्याचा आपला हेतु सिद्धीस नेण्याच्या कामांत, गुंतला होता. यावरून पोर्टुगीज लोकांनीं, ठाणें जिल्ह्यांतील हिंदु राजांना महमुदावर उठण्याविषयीं, उत्तेजन ह्या वर्षीं दिलें होतें असें दिसतें. इ. स. १५०९ च्या जानेवारि महिन्यांत, दिव एथें जात असतां, वाटेंत, पोर्टुगीज लोकांनीं मुंबई बंदरांतलें एक गलबत घेतलें, व माहीमच्या किल्ल्यांतून अन्नसामुग्री घेतली, तेव्हां तेथील शिबंदीचे लोक पळून गेले. पुढें दिव एथें जय

---

* ह्याचें नांव कौसु अल गौरि होतें ( इ. स. १५००–१५१६ ). हा इतिहासांत क्वांपसन गौरि या नांवानें प्रसिद्ध आहे. तुर्कांचा बादशहा सेलिम यानें आलेप्पो एथें यास ठार मारिलें.

पिळवून पोर्टुगीज लोक परत येत असतां,चौलच्या सुभेदारानें दर वर्षास खंडणी देण्याचा करार त्यांच्याशीं केला. नंतर थोड्या वर्षांनीं, ह्मणजे इ. स. १५१४ त, गुजराथच्या राज्याची दक्षिणसरहद्द चौल होती ती मुंबईपर्यंत मागें हटली.

या काळीं ठाणें जिल्ह्यांतील बंदरांचें फारसें महत्व नव्हतें असें दिसतें. कारण, कोंकण व घाटावरचा मुलूख यांच्या दरम्यान चालणाऱ्या व्यापाराचा माल, मुख्यत्वेंकरून चौल व दाभोळ एथें जाई, किंवा खुषकीनें सुरत व रान्देर या व्यापाराच्या मुख्य स्थळीं, सर्व प्रकारचा माल जाई. तथापि, वसई हें बंदर चांगलें असल्यामुळें, तेथें पुष्कळ मालाचा मोबदला होत असे. परंतु हा सर्व माल मलबार किनाऱ्याकडून आलेला असे. खंबायतच्या ह्मणजे गुजराथप्रांताच्या सरहद्दीवर, एक बंदर होतें त्याला मुंबई, माहीम, व ठाणें या तिन्ही नांवांचें मिश्रण करून, "ठानामन्यांनु" असें नांव ठेविलेलें होतें. तेथें एक किल्ला होता. त्या रमणीय शहरांत मूर लोकांची वस्ती होती. तेथें पुष्कळ बागा, मशिदी, व हिंदूंचीं देवळें होतीं. तेथें फारसा व्यापार चालत नसे व चांचे लोकांचा फार उपद्रव असे. ते समुद्रांत जाऊन, एकादें कमजोर गलबत आढळल्यास, तें घेत व लुटीत, आणि कधीं कधीं त्यावरच्या खलाशांना ठार मारीत.

इ. स. १५१६ त, डोम जोआओ डी मोनाय हा, वांद्र्याच्या खाडींत शिरला, व त्यानें माहीमच्या किल्लेदाराचा पराभव केला. त्याच वर्षी चौल एथें पोर्टुगीज लोकांनीं एक वखार घातली. चौल व दिव एथें किल्ले बांधण्याविषयीं पोर्टुगाल देशाहून, इ. स. १५२१ त, हुकूम आला. तेव्हां एक पोर्टुगीज आरमार दिव एथें जाण्याकरितां निघालें. परंतु, तेथें किल्ला बांधण्याची परवानगी न मिळाल्यामुळें, व त्या स्थळांचा उत्तम प्रकारचा बंदोबस्त गुजराथच्या राजानें केल्यामुळें, त्यावर हल्ला न करितां, ओर्मुझ एथें त्या आरमारास जावें लागलें. अहमदनगरच्या पहिल्या बुऱ्हाणराजाला, तुह्मांस आम्ही परदेशांतून इकडे घोडे आणण्यास हरकत करणार नाहीं, असें पोर्टुगीज लोकांनीं वचन दिल्यामुळें, त्यानें त्यांस चौल एथें किल्ला बांधण्याची परवानगी दिली. यावरून, दिव-

पेक्षां चौल एथें, या कामीं पोर्टुगीज लोकांना विशेष यश आलें, असें दिसतें. तथापि, दिव एथून मलिक इयाझ यानें, चौल एथील खाडीला वेढा देऊन, तेथें किल्ला बांधण्याच्या कामास हरकत करण्याकरितां, गुजराथेंतून एक आरमार पाठविलें, व या कामीं त्याला माहीमच्या मुसलमान सुभेदारानें कुमक केली. ह्मणून या प्रसंगीं पोर्टुगीज लोकांच्या आरमाराचे फार हाल झाले. तरी त्यांनीं किल्ला बांधण्याचें काम झपाट्यानें पुढें चालविलें. अखेरीस, इ. स. १५२२ त, मलिक इयाझ याला परत जावें लागलें. हें किल्ला बांधण्याचें काम, इ. स. १५२४ त, पुरें झालें. या पुढें पोर्टुगीज लोकांच्या आरमाराला मुंबई बंदरांत मोकळेपणें फिरावयास सांपडूं लागलें. इ. स. १५२६ त वसईस पोर्टुगीज लोकांनीं एक वखार बांधिली. इ. स. १५२८ त, फेब्रुवारी महिन्यांत, ज्यावर अलिशा [अलेक्षियाथ] नांवाचा एक शूर मूर नाखवा होता, असें ऐंशीं गलबतांचें एक आरमार, गुजराथेंतून चौलखाडीच्या नरतांत आलें, व त्यानें अहमदनगरच्या मुलखाला आणि पोर्टुगीज लोकांच्या व्यापाराला पुष्कळ उपद्रव केला. पोर्टुगीज लोकांच्या राजाचा प्रतिनिधि सांपायो हा, ज्यांवर १००० पोर्टुगीज लोक व पुष्कळ हत्यारबंद एतद्देशीय शिपाई होते, अशीं चाळीस गलबतें बरोबर घेऊन, गुजराथच्या आरमारावर गेला. तेव्हां अवजारानें चालणारीं गलबतें प्रतिनिधीनें आपल्या ताब्यांत ठेविलीं, व हेटार डी सिल्व्हेरा याच्या ताब्यांत वल्ह्यांनीं चालणाऱ्या होड्या दिल्या. चौल एथें येऊन पोंचल्यावर, ज्युआओ डी आव्हेलार नामक पुरुषाला, ऐंशीं पोर्टुगीज लोक बरोबर देऊन, अहमदनगरच्या राजाच्या कुमकेस त्यानें पाठविलें. त्याच्या बरोबर एक हजार एतद्देशीय शिपाईही दिले होते. त्यांच्या मदतीनें, जो त्या वेळापर्यंत अगम्य मानलेला होता अशा, एका खंबायतच्या राजाच्या किल्ल्यावर तो चढला, व तेथील शिबंदी त्यानें ठार केली. नंतर निजामशाही राजाला तो किल्ला त्यानें दिला.

ख्रिस्ती लोकांच्या लेंट नामक ४० दिवसांच्या उपासाच्या आरंभाच्या दुसऱ्या दिवशीं, बुधवारीं, दिव येथें जाण्याकरितां चौल एथून निघून सांपायो, खंबायतचें आरमार मुंबई बंदरांत होतें, त्या ठिकाणीं, अकस्मात् आला. त्यावेळीं, मोठ्या आवेशानें तो फांचा भडीमार केल्यानंतर, पोर्टुगीज

लोक शत्रूच्या गलबतांत घुसले. तेव्हां, अलिशा माहीमच्या खाडींतून निसटून जावें ह्मणून पळाला. परंतु, पोर्टुगीज लोकांनीं, बांद्रें एथें होड्या ठेविल्या होत्या त्यामुळें सात गलबतांखेरीज अलिशाचीं सर्व गलबतें त्यांच्या हातीं लागलीं. या प्रसंगीं त्यांनीं एकंदर ७३ गलबतें शत्रूपासून घेतलीं. त्यांपैकीं ३३ चांगलीं होतीं तीं त्यांनीं ठेविलीं आणि बाकीचीं जाळून टाकिलीं. खेरीज, पोर्टुगीज लोकांनीं पुष्कळांस पकडून कैद केलें, व तोफा आणि लढाईचें सामान ह्मणजे दारूगोळाही त्यांस या प्रसंगीं पुष्कळ मिळाला. या प्रमाणें जय मिळाल्यावर सांपायो गोंव्यास परत गेला. हेटार डी सिल्व्हेरा याला, वल्ह्यांनीं चालणाऱ्या २२ होड्या देऊन, गुजराथच्या किनाऱ्याला उपद्रव देण्याकरितां, त्यानें परत जातांना मागें ठेविलें. तेव्हां ज्यांत रमणीय झाडी होती अशा, मुंबई किंवा माहीम बेटांत, कांहीं काळपर्यंत, सिल्व्हेरा राहिला. त्या ठिकाणीं पारध करण्याचे प्राणी पशुपक्षी, मांस, व तांदूळ, यांची समृद्धि असल्यामुळें, तें स्थळ त्याच्या बरोबरच्या लोकांना फार आवडलें. ह्मणून, त्यांनीं, त्याला "बोआ व्हिडा" ह्मणजे सुखद जीवनसाधनांचें द्वीप, असें नांव दिलें. मुंबई एथें आपल्या बरोबरच्या लोकांना कांहीं वेळ विश्रांति दिल्यावर, सिल्व्हेरा नागोठण्याच्या खाडींतून वर गेला. नंतर जमिनीवर उतरून त्यानें गुजराथच्या राजाचीं साहा गांवें जाळिलीं. पुढें तेथून होड्यांवर चढण्याकरितां परत येत असतांना नागोठण्याच्या किल्लेदारानें त्याजवर हल्ला केला. तेव्हां सिल्व्हेरानें त्याचा पराभव केल्यामुळें त्याचें फार नुकसान झालें. मग सिल्व्हेरा वसईस गेला, तेव्हां, त्या शहराची तट बंदीनें चांगली मजबुती केलेली आहे, व रक्षणाकरितां तेथें तोफा ठेविलेल्या आहेत, असें त्याला आढळलें. नंतर रात्रीस खाडींत शिरून त्यानें तटबंदीवर हल्ला केला. दुसरे दिवशीं ३५०० लोकांनिशीं अलिशा त्याच्याशीं सामना करण्याकरितां आला. तेव्हां सिल्व्हेरानें त्यांची कत्तल उडविली, व त्यांस हाकून लाविलें. नंतर तें शहर त्यानें लुटलें व जाळिलें. हे पोर्टुगीज लोकांचे पराक्रम ऐकून भीति पावल्यामुळें, ठाणें शहरचा राजा, त्यांस खंडणी देण्यास कबूल झाला, व सिल्व्हेरा चौलास परत गेला. इ. स. १५३० त, सुरत व रान्देर लुटून परत येत असतां,

वाटेत, आंटोनिओ डी सिल्व्हेरा यानें दमण व आगाशी ह्या गांवांचा विध्वंस केला. त्या प्रसंगीं, आगाशी एथें असलेल्या शत्रूच्या गलबतां पैकीं ३०० गलबतें, त्यानें जाळून टाकिलीं. अहमदनगरचा बुऱ्हाण निजामशहा, आपला यजमान गुजराथचा राजा बहादुर शहा याच्या आग्रहामुळें, पोर्टुगीज लोकांवर झालेल्या ह्या मोहिमेंत त्याला सामील झाला होता, ह्मणून, अहमदनगरच्या राजाच्या ताब्यांत, कोंकणाचा जो भाग होता, त्यावर पोर्टुगीज लोकांनीं ह्याच वर्षीं हल्ला केला, व त्यांत त्यांना यशही आलें.

दिव घेण्याकरितां, नूनो डा कुन्हा यानें जें आरमार जमविलें होतें, त्याची मुंबई बंदरांत १५३१ त पहाणी झाली, व मुंबईच्या कोटासमोरच्या मैदानांत फौजेची कवाईत झाली. त्या आरमारांतील गलबतांवर ३६०० पोर्टुगीज सोजीर व १४५० पोर्टुगीज खलाशी होते, आणि मलबार व कानडा एथील २००० शिपाई, ८००० गुलाम, व ५००० देशी खलाशी होते. तें ४०० गलबतांचें आरमार मुंबईहून निघून दमण एथें पोंचल्यावर पहातात तों, सर्व लोक तें गांव सोडून गेले होते, असें आढळलें. नंतर, पुढें उत्तरेस जाऊन, काठेवाडाच्या दक्षिण भागीं, बेट ह्मणून एक चांचे लोकांचा किल्ला होता, तो घेतल्यावर दिव एथें तें गेले. परंतु, त्या शहरच्या तटाचा भंग होईना, ह्मणून आंटोनिओ डी सालडान्हा याला, खंबायत प्रांतांतलीं बंदरें लुटण्याकरितां, साठ गलबतांनिशीं मागें ठेवून, नूनो गोव्यास परत आला. परत दक्षिणेकडे येत असतांना वाटेत, ह्या आंटोनिओनें बलसाड, तारापूर, केळवें माहीम, व आगाशी या गांवांचा विध्वंस केला. इ. स. १५३२त, नूनो डा कुन्हा यानें, गुजराथच्या राज्याचा समुद्रकिनारा लुटण्याविषयीं, डायागो डी सिल्व्हेरा याला, हुकूम केला, व आपण स्वतः, वसईच्या तटांची विशेष मजबुती चालली होती ह्मणून, तिजवर ३००० पोर्टुगीज सोजीर, व २०० कानडा प्रांतांतील लोक, बरोबर घेऊन, १५० गलबतांनिशीं गेला. वसईस बंदोबस्ताकरितां शिबंदीचे १२००० लोक होते तरी, पोर्टुगीज लोकांनीं हल्ला करून तेथचा किल्ला घेतला, व त्या किल्ल्याचे तट जमीनदोस्त

केले. ह्या प्रसंगीं ठाणें व वांद्रें या गांवांना पोर्टुगीज लोकांस खंडणी द्यावी लागली, वसई व तारापूर यांच्या दरम्यान असलेल्या किनाऱ्यावरच्या शहरांचा त्यांच्या योगानें विध्वंस झाला, व दमणचा किल्लाही घेण्याचा यत्न झाला. नंतर आह्मांला दिव एथें किल्ला बांधण्यास परवानगी द्या, असें, नूनो डा कुन्हा यानें, पोर्टुगीज लोकांच्या तर्फेनें, गुजराथच्या राजाकडे बोलणें पुनरपि सुरू केलें. परंतु त्या कामीं त्याला या प्रसंगींही यश आलें नाहीं. नंतर लवकरच, दिल्लीचा बादशहा हुमायून व गुजराथचा राजा बहादुर शहा, या उभयतांमध्यें कलह लागल्यामुळें, पोर्टुगीज लोकांशीं आपला स्नेह असावा असें गुजराथच्या राजाच्या मनांत आलें. तथापि बहादुर शहा, दिव एथें किल्ला बांधण्याची पोर्टुगीज लोकांना परवानगी देण्यास अजूनही कबूल होईना, हें पाहून नूनो यानें हुमायून बरोबर बोलणें सुरू केलें, आणि पुनरपि गुजराथचा किनारा लुटून दमण घेतलें. दमण हातांतून गेल्यावर, हुमायून बरोबर पोर्टुगीज लोकांचें मित्रत्वाचें चाललेलें बोलणें बंद पाडावें या उद्देशानें, बहादुर शहा यानें, १५३३ त, त्यांच्याशीं तह केला. तेव्हां वसई व तिच्या सभोंवतालचा मुलूख त्यानें पोर्टुगीज लोकांस दिला. खंबायत एथून जीं गलबतें तांबड्या समुद्रांत जाण्याकरितां निघतील त्यांनीं वसईस वरवा करून जकात द्यावी, पोर्टुगीज लोकांचा परवाना जवळ असल्याखेरीज खंबायत एथून एकही गलबत बाहेर जाऊं नये, गुजराथेंत लढाऊ गलबतें बांधूं नयेत, व तुर्क लोकांबरोबर गुजराथच्या राजानें दोस्ती ठेवूं नये, अशीं या तहांतील मुख्य कलमें होतीं. इ. स. १५३५ त हुमायून यानें पराभव केल्यामुळें लाचार होऊन, बहादुर शहा यानें, तुह्मी मला मनापासून कुमक करावी असें वचन घेऊन, पोर्टुगीज लोकांना दिव एथें किल्ला बांधण्याची परवानगी दिली. पुढें तुर्कस्थानच्या सुलतानाकडे बहादुर शहानें कुमक मागण्याकरितां पत्र पाठविलें. परंतु इकडे कठीण प्रसंग गुदरल्यामुळें, उत्तराची वाट न पाहतां, त्यानें पोर्टुगीज लोकांबरोबर तह केला. ह्या नव्या तहांत असें ठरलें होतें कीं, व्यापाराचें मुख्य स्थान वसई हें नसावें तर दिव हें असावें, व पोर्टुगीज लोकांच्या गव्हर्नर जनरलास आवडेल त्या जागीं, त्यांनीं दिव एथें किल्ला बांधावा. नंतर, गेलेला मुलूख पुनः परत

मिळविण्याकरितां, पोर्टुगीज लोकांनीं, बहादुर शहास, त्याच्या राज्याचा मोबदला देण्याकरितां, पुष्कळ मदत केली. वसईवर मोंगलांनीं हल्ला केला होता त्याचें निवारण त्यांनीं केलें, व मोंगल लोकांच्या उपद्रवापासून गुजराथेचा बचाव करण्याच्या कामीं ९०० पोर्टुगीज लोक फार उपयोगी पडले. इ. स. १५३५ त त्यांनीं वसईस एक किल्ला बांधिला, व दिव एथील किल्ल्याचें काम झपाट्यानें चालवून तें समाप्त केलें.

पुनरपि बरे दिवस प्राप्त झाले तेव्हां, दिव एथें किल्ला बांधण्यास पोर्टुगीज लोकांना परवानगी दिल्याबद्दल, बहादुर शहाला पश्चात्ताप होऊं लागला, तेव्हां त्यानें, तुर्कस्थानचा सुलतान आणि एडनचा राजा यांना, पोर्टुगीज लोकांवर हल्ला करण्याकरितां बलाविलें. इ. स. १५३६ त बहादुर शहा दिव एथें आला, व पोर्टुगीज लोकांचा गव्हर्नर नूनो डा कुन्हा यानें फसून शहरांत यावें ह्मणून, त्यानें त्याच्या गलबतावर जाऊन त्याची भेट घेतली. या प्रसंगीं उभय पक्षांनीं कपटानें वर्तण्याचा बेत केलेला होता ह्मणून, बहादुर शहा जमिनीवर उतरत असतां कांहीं कटकट उत्पन्न होऊन, त्यांत तो व दिव एथील पोर्टुगीज गव्हर्नर, हे मारले गेले. बहादुरशहाकडून पूर्वीं रत्नखचित कमरपट्टा नजर मिळाला होता ह्मणून मोहित होऊन, पुढें दोन वर्षांनीं, तुर्कस्थानच्या सुलतानानें, दिव घेण्याकरितां मोठें आरमार पाठविलें. तेव्हां त्या आरमाराचा मुख्य अधिकारी सुलेमान यानें त्या बंदराला दोन महिनेपर्यंत वेढा घातला. [सप्टेंबर—नवंबर १५३८]. परंतु त्या प्रसंगीं पोर्टुगीज लोकांच्या शिबंदीनें मोठ्या शौर्यानें आपलें रक्षण केलें, व तुर्कांनीं दिव घेतलें तर, ते तें आपल्याकडेच ठेवतील आह्मांस देणार नाहींत, असा गुजराथेंतील मुसलमानांस योग्य संशय आला होता ह्मणून, तेही त्या प्रसंगीं निकरानें लढले. त्यामुळें पराभव पावून सुलेमान यास परत जावें लागलें. तुर्क लोक गेल्यानंतर, पोर्टुगीज लोक व गुजराथचा राजा, या उभयतांमध्यें शांतता राखण्याविषयीं तह झाला. इ. स. १५४० त गुजराथचा राजा तिसरा महामूदशहा यानें वसईस वेढा दिला. परंतु ती त्याचे हस्तगत झाली नाहीं. ह्याच वर्षीं, अहमदनगरचा राजा बुर्हाण निझामशहा यानें, पनवेल तालुक्यांतला कर्नाळा किल्ला, व पेण तालुक्यांतला सांकशी किल्ला, हे गुजरा-

रीस,या राजाच्या किल्लेदारांपासून घेतलें. तेव्हां, या किल्लेदारांनीं मदत मागितल्यावरून, पोर्टुगीज लोकांनीं ते किल्ले अहमदनगरच्या राजाच्या लोकांकडून परत घेतले नंतर त्यांनीं कांहीं दिवस ते किल्ले आपल्या ताब्यांत ठेविले. परंतु खर्च फार येऊं लागल्यामुळें त्यांनीं ते पुनः अहमदनगरच्या राजाच्या स्वाधीन केले.

इ. स. १५४६ त, दिव शहराचें दुसऱ्या खेपेस रक्षण करून, पोर्टुगीज लोकांनीं मोठें यश संपादिलें. गुजराथच्या सर्व बलाचा, या प्रसंगीं, त्यांनीं पूर्णपणें पराभव करून टाकिल्यामुळें, महमूद शहा यानें, इ० स० १५४८ त, तहाचें बोलणें सुरू केलें, व अखेरीस उभयतांमध्यें तह झाला, तो पोर्टुगीज लोकांना फार फायदेशीर होता. अशेरीचा मोठा डोंगरी किल्ला, व वैतरणा नदीवरचें मनोर नांवाचें महत्वाचें ठाणें, हीं, इ० स० १५५६ त, पोर्टुगीज लोकांनीं घेतलीं. चंगीझ खान नामक एका गुजराथच्या प्रमुख सरदाराला, सुरत शहर घेण्याच्या कामीं, पोर्टुगीज लोकांनीं मदत केली होती, ह्मणून त्यानें वैतरणा नदीपासून दमणपर्यंत समुद्रकिनाऱ्याची एक पट्टी त्यांना इ. स. १५६० त, दिली. तेव्हां दमणचा किल्लेदार शिद्दी बोफेटा हा तो किल्ला स्वाधीन करीना. ह्मणून, पोर्टुगीज लोकांनीं, फौज पाठवून, दमण व पारनेरा हे दोन किल्ले, आणि बलसाड बेट, हीं घेतलीं. नंतर त्यांनीं दमण येथें पुष्कळ शिबंदी ठेविली. कारण वसई प्रांताचें रक्षण करण्यास, दमण फार उपयोगाचें स्थळ आहे, असें ते मानीत असत. ह्याच वर्षीं, [ १५६० ] मोंगलांच्या ३००० घोडेस्वारांनीं, दमणावर हल्ला केला. परंतु, त्यांत त्यांचा पराभव होऊन, सामानसुमान गेलें. तथापि, त्यांनीं पारनेरा घेतला, व तेथें ते इ० स० १५६८ पर्यंत होते. नंतर पोर्टुगीज लोकांनीं त्यांस तेथून काढून दिलें. इ० स० १५६९ त, पोर्टुगीज लोकांनीं, जव्हार एथील कोळ्यांच्या राजावर हल्ला केला, व त्याच्या मुलखांतून पूर्वेस सह्याद्रीच्या पायथ्यापर्यंत ते गेले. इ० स० १५७० त, अहमदनगर, विजापूर, कालिकोट, व सुमात्रा बेटांतील आचीन, ह्या चार ठिकाणचे चार राजे, कट करून, पोर्टुगीज लोकांवर उठले. तेव्हां चौल, वसई, व दमण, हीं मिळविण्याच्या आशेनें, बहुत श्रम

करून, अहमदनगरच्या मुर्तजा राजानें चौलावर एक या करार मोठें पाठविली, व त्या शहरास त्यानें मोठ्या निकरानें वेढा दिला. [illegible] त्याचीं पुष्कळ माणसें जायां झालीं. दमण शहरांतील पोर्टुगीज लोकांनी मोठ्या शौर्यानें व कुशलतेनें, आपलें रक्षण केल्यामुळें, पुष्कळ [illegible]पर्यंत वेढ्याचें काम व्यर्थ चालविल्यानंतर, मुर्तजा राजाला तेथून परत जावें लागलें. विजापूरच्या राजानें गोव्यावर हल्ला केला होता. त्यांतही त्याचा असाच पराभव झाला. त्यामुळें पोर्टुगीज लोकांची फार कीर्ति झाली. ठाणें जिल्ह्यांतील पोर्टुगीज लोकांच्या मुलखास उपद्रव करण्याकरितां, मुर्तजा राजानें, चौल एथून ५००० घोडेस्वारांची एक टोळी पाठविली होती. तिला त्यांनीं आपल्या मुलखांतून बाहेर घालवून दिलें, व अहमदनगरच्या राजाच्या ताब्यांतल्या कोंकणांतील मुलखावर हल्ला करून, कल्याण शहरच्या वाड्या त्यांनीं जाळून टाकल्या. इ. स. १५८१ त स्पेन देशाच्या राजानें पोर्टुगाल देश घेतला. त्यामुळें, पोर्टुगीज लोकांच्या ताब्यांतला पूर्वेकडील देशांतील मुलूख, स्पेनदेशाकडे, कांहीं एक कलह न होतां, गेला. इ. स. १५८३ त अकबर बादशहानें शेवटचा हल्ला गुजराथेवर करून वसई व दमण जिंकण्याविषयीं यत्न केला. परंतु, पोर्टुगीज लोकांनीं मोंगलांबरोबर, मोठ्या निकरानें, लढाई केल्यामुळें, त्यांना परत जावें लागलें. नंतर, अकबराच्या जनानखान्यांत एक पोर्टुगीज स्त्री होती, तिनें भीड घातल्यामुळें,पोर्टुगीज लोकांबरोबर मोंगलांचा तह झाला. हा तह त्यांना फायदेशीर होता. ह्याच वर्षी, पोर्टुगीज लोकांनीं कोळ्यांच्या मुलखाला उपद्रव दिला. परंतु कोळी फार चपळ असल्यामुळें त्यांचें फार नुकसान झालें. हे कोळी, एका झाडावरून दुसऱ्या झाडावर, वानरांसारख्या उड्या मारूं शकतात, अशी त्यांच्या चपळतेची, त्या वेळीं पोर्टुगीज लोकांनीं, स्तुति केली. इ. स. १५९४ त, अहमदनगरच्या राजानें. चौल अथवा रेवदंडा यावर, हल्ला केला व वसई प्रांत उजाड करण्याकरितां एक घोडेस्वारांची टोळी त्यानें पाठविली.

या पुढें पन्नास वर्षेंपर्यंत, पोर्टुगीज लोकांचा, ठाणें जिल्ह्यांतील मुलखाचा, एकही भाग नष्ट झाला नाहीं. पुढें सोळाव्या शतकाच्या अखे-

रीस, त्यांचें प्राबल्य कमी होऊं लागलें. पोर्टुगीज लोकांचा गर्व हरण करणारे डच् लोक, इ. स. १५९७ त, हिंदुस्थानालगतच्या समुद्रांत आले. इ. स. १६०९ त, मुसलमानी चौलाच्या सुभेदारानें, समुद्रांत पोर्टुगीज लोकांवर हल्ला करून, त्यांस फार उपद्रव दिला. पुढें, दोन वर्षांनीं, अहमदनगरच्या राजाचा प्रधान मलिकंबर, यानें, वसई व साष्टी घेण्याकरितां, एक फौज पाठविली. परंतु तिला यश मिळालें नाहीं. मोंगलांच्या सुरत एथील आरमाराला इजा पोंचल्यामुळें, त्यांनीं, इ. स. १६१२ त, दमण, वसई, व चौल, यांना वेढा घातला, व पोर्टुगीज लोकांच्या ताब्यांतील मुलूख उजाड केला. तेव्हां त्यांना पैका देऊं करून मागें फिरवावें लागलें. त्याच वर्षीं, पोर्टुगीज लोकांच्या एका मोठ्या आरमाराचा, तापीनदीच्या मुखाजवळ, इंग्रजांच्या चार तारवांनीं पराभव केल्यामुळें, समुद्रावर लढाई करण्याच्या कामांत फार कुशल असल्याविषयीं त्यांची ख्याति झाली होती, तिला धक्का बसला. इ. स. १६१४ त जहांगीर बादशहाबरोबर पोर्टुगीज लोकांनीं, आपणास फायदेशीर, असा एक तह केला. या पुढें पसतीस वर्षें पर्यंत, इतर ठिकाणीं पोर्टुगीज लोकांचें फार नुकसान होत गेलें तरी, त्यांचा ठाणें जिल्ह्यांतील मुलूख जशाचा तसा शाबूत होता, व या प्रांतांत पूर्वींपेक्षांही ते गबर झाले होते. इ. स. १६४० त, पोर्टुगीज लोक, स्पेनदेशाबरोबरचा संबंध तोडून, स्वतंत्र झाले. त्यामुळें, पुढें थोडीं वर्षें पर्यंत, पूर्वेकडील देशांतील मुलखाविषयीं त्यांनीं विशेष काळजी घेतली.

ठाणें जिल्ह्याच्या दक्षिणेकडील व पूर्वेकडील भागांतल्या, समुद्रापासून दूरच्या प्रदेशाशीं पोर्टुगीज लोकांचा, सोळाव्या शतकांत, कांहीं संबंध असल्याचें आढळत नाहीं. ह्या शतकाच्या मध्यापर्यंत, करनाळा व सांकशी हे किल्ले, गुजराथच्या राजाकडे होते. हे खेरीज करून, ठाणें जिल्ह्याचा दक्षिणेकडील व पूर्वेकडील भाग, अहमदनगरच्या राजाकडे होता, आणि त्यांतील बरेच डोंगरी किल्ले, खंडणी देणाऱ्या मांडलिक राजांच्याच, ताब्यांत होते. मोंगलांनीं, इ. स. १६०० त, अहमदनगरचें राज्य घेतलें तेव्हां, हे प्रांत, त्यांच्या ताब्यांत गेले. ह्यांत कल्याण प्रांत मुख्य होता. पुढें लवकरच अहमदनगरच्या राज्यांतील प्रधान मलिकंबर

यानें ते मोंगलांकडून परत घेतलें. मलिकंबर, इ. स. १६२६ त, मृत झाला. तेथपर्यंत हें प्रांत त्याच्याकडेच होते. त्यानें एथील जमिनीची पहाणी करून वसुलाची पद्धत सुधारली असें ह्मणतात. मलिकंबराच्या मरणानंतर, ठाणें जिल्ह्याचा दक्षिण भाग, ह्मणजे कल्याण प्रांत, मोंगलांनीं दहा वर्षेपर्यंत, आपल्याकडे ठेविला, आणि मग तो विजापूरच्या राजाला त्यांनीं दिला. ईशान्य भागांतील भिवंडी व माहुलीचा डोंगरी किल्ला यांच्यापर्यंत, जंगली मुलूख, ह्या सर्व अवधींत, जव्हारच्या राजांनीं व इतर कोळी राजे, यांजकडे होता. या कोळी राजांचीं, तारार, वाशी, व दारिला, अशीं तीन मुख्य शहरें होतीं. त्यां पैकीं पहिलें दमणाच्या उत्तरेस होतें. वाशी हें वासिंद असावें. ज्यांत दगडी भिंतींचीं कवलारू घरें पुष्कळ आहेत असें, बरेंच मोठें, उंबरगांवाजवळचें घेरी गाव, हें दारिला असावें असें दिसतें.

इ.स.१५३४त वसई व साष्टी पोर्टुगीज लोकांना मिळाली. तेव्हां त्यांत असलेले मेढेकोट व तटबंदीचीं ठाणीं यांच्या योगानें, ह्या मुलखाचें चांगलें रक्षण झालेलें आहे, असें त्यांस आढळलें. जमिनीवरील धान्याचा वसूल ऐन जिनशी घेण्याची त्या वेळीं वहिवाट होती. या जमीनधान्या खेरीज खोबरेल, अफू, कापूस, ताडीमाडी, भाजीपाला, मासे, ऊंस, व विड्याचीं पानें यांवर, आणि, खाटीक, रंगारी, धीवर [कोळी], व धनगर, यांच्यावर रोकड कर घेत असत. वसईची खाडी फार बिकट असून, वादळाच्या दिवसांत लहान लहान होड्या राहण्याला तिच्या किनाऱ्याला चांगली सोय होती, असें, इ० स० १५३८त, ह्मणजे वसई पोर्टुगीज लोकांस मिळाल्यावर चार वर्षांनी, त्यांनीं तिचें वर्णन केलेलें आढळतें. वसई शहर त्यावेळीं मोठें असून त्यांत निरनिराळ्या देशाचे पुष्कळ लोक असत. तेथील जमीन सपाट, पिकाऊ, व कसदार होती. तेथें पावसाळ्यांत जमिनीवर पाणी तुंबल्यामुळें फिरण्यासंवरण्याची मुष्कील पडे. झाडांच्या पुष्कळ राया तेथें होत्या. तलाव व तळीं हीं तेथें पुष्कळ होतीं. त्यांत उतरण्याकरितां पायऱ्या बांधलेल्या होत्या. त्यांची बांधणी व नकशी फार उत्तम होती. मोठें व सुंदर असें मोडकळीस आलेलें ठाणें शहर आणि कान्हेरी [ कृष्णगिरी ] चें लेणें हीं साष्टीबेटांत असल्यामुळें त्याची फार

…भरभराटीस आलेली होती. हें साष्टी बेट फार गवर असून त्यांत अन्नसामग्री, कोंबडीं, व लहानमोठीं पारधीचीं जनावरें यांची समृद्धि होती. गलबतें व मचवे बांधण्याच्या उपयोगी पडण्यासारखीं लांकडें ह्या बेटांतील डोंगरांत पुष्कळ होतीं. पोर्टुगीज लोक व गुजराथचे राजे यांनीं ठाणें शहराची फार नासाडी केल्यामुळें, तें अगदीं निकृष्ट स्थितीस आलें होतें तरी, तेथें९०० कसबी रेशमी कापडाचे माग व १२०० पांढऱ्या कापडाचे माग होते. ज्यांत ठेंगण्या व रम्य झाडांची फार दाटी होती अशा,या प्रांतांतील, मुंबई बेटांत पारधीचीं जनावरें, खावयास उपयोगी पडणारें मांस, व तांदूळ यांची विपुलता होती. ह्या बेटांतील जमीन पिकली नाहीं असें कधीं ही होत नसे.

मुसलमानांनीं प्रथमतः हा देश जिंकला तेव्हां, त्यांनीं कोणत्याही प्रकारची नासधूळ केली असली तरी, पोर्टुगीज लोक एथें येण्याच्या पूर्वी फार वर्षें, हिंदु धर्मांत हात घालण्याचें काम त्यांनीं सोडून दिलें होतें. त्यामुळें, पोर्टुगीज लोकांना, पवित्र मानलेलीं पुष्कळ तळीं व देवळें,वसई जवळ आढळलीं. ठाणें एथील इमारतींस लावलेले दगड व विटा, चुना न लावतां जडलेल्या असून, त्या इमारती फार सुरेख होत्या, असा डी क्यास्ट्रो याचा लेख आढळतो.

वसई व ठाणें, इ. स. १५३४ त, पोर्टुगीज लोकांना मिळाल्यावर, त्यांनीं ठाणें जिल्ह्याच्या समुद्रकिनाऱ्याचा एक वेगळा प्रांत करून, त्याजवर एक अधिकारी नेमिला होता. त्याला 'जनरल आफ् दि नार्थ' ह्मणत असत. हिंदुस्थानांतील पोर्टुगीज लोकांच्या अमलांत, ज्याचा धर्माशीं कांहींएक संबंध नाहीं अशा प्रकारचा हा दुसरा अधिकारी असून, त्याची राहाण्याची मुख्य जागा वसई होती. पोर्टुगीज लोकांनीं आपल्या अमलांतील पोर्टुगीज अधिकाऱ्यांना व सोजिरांना,गांवोगांव ज्या जमिनी दिल्या होत्या, त्याबद्दल त्यांना धारा फार थोडा द्यावा लागत असे. प्रथमतः हा धारा रोकड घेत असत. परंतु पुढें त्यांतला कांहीं अंश ऐन जिनशी व कांहीं रोकड घेऊं लागले. इ. स. १५३८ च्या सुमारास, वसई व सोपारें यांच्या जवळचीं पुष्कळ गावें,या पद्धतीप्रमाणें, व्हैसराय डोम जोआओ डी क्यास्ट्रो, यानें प्रथमतः आपल्या लोकांना

दिलीं. पुढें, सुमारें बारा वर्षे गेल्यावर, कांहीं गांवांच्या उत्पन्नाचा अंदाज कपटानें फारच थोडा लावलेला आहे, असें आ... ळून आल्यामुळें, त्यांनीं सारा थोडासा वाढविला. जमिनींत जें उत्पन्न होत असे त्यापैकीं पोर्टुगीज लोक फारच थोडा अंश सरकारदेणें ह्मणून घेत असत. इ. स. १५३९त ६७६० रुपये व २४८२ तांदुळांचे मुडे वसूल आला होता तो, १५४७त, ४८९७०६पयांपर्यंत वाढला होता, असा लेख आढळतो.

इ. स. १५६० त दमणापासून करंज्यापर्यंत सगळा समुद्रकिनारा पोर्टुगीज लोकांना मिळाला. तेव्हां त्यांनीं ठाणें प्रांताचे दमण व वसई असे दोन भाग केले. दमण भागांत संजाण, डहाणू, तारापूर, व माहीम हे चार परगणे होते, आणि वसई भागांत अशेरी, मनोर, खुद्द वसई उर्फ सैवान, साष्टी, मुंबई, बेलापूर उर्फ शहाबाद, व करंजें हे सात परगणे होते. परगण्याच्या प्रत्येक विभागास ठाणेदारी ह्मणत व प्रत्येक ठाणेदारीवर एक ठाणेदार ह्मणून अधिकारी असे. प्रत्येक ठाणेदारींत कसबे, मांडव्या, खेडीं, गांवढीं [ सडेतोरें ] व पाखाड्या असत. ठिकाणें व वाड्याही तींत असत. अशेरी परगण्यांत ३८ खेडीं व साहा पाखाड्या होत्या. मनोर परगण्यांत ४२ खेडीं व एक गांवढें [ सडेतोर ] होतें. तानसा नदीच्या डाव्या ह्मणजे दक्षिण किनाऱ्यावरचें सैवान हें, वसईच्या ईशान्येस सुमारें पंधरा मैलांवर असून, साहा लहान लहान परगण्यांचें मुख्य स्थळ होतें. या साहांपैकीं पहिला वसई परगणा यांत १६ पाखाड्या, व ८ वाड्या होत्या. दुसरा परगणा कसबे आगाशी यांत वीस पाखाड्या व दहा वाड्या होत्या. तिसरा साळगें परगणा यांत १८ खेडीं व तीन ठिकाणें होतीं. चवथा विरार परगणा यांत वीस खेडीं होतीं. पांचवा कामन परगणा यांत २५ खेडीं व २ गांवढीं [ सडेतोरें ] होतीं. हें कामन गांव वसईच्या पूर्वेस सहा मैलांवर आहे. साहावा परगणा अंजूर यांत १८ खेडीं व ७ गांवढीं (सडेतोरें) होतीं. हें अंजूरगांव कामवाडी नदीच्या मुखाजवळ वसईच्या खाडीवर आहे. साष्टी भागांत दोन विभाग होते. पहिला खुद्द साष्टीबेट हा होय. यांत एक परगणा व ९९ गांव होते. दुसऱ्यांत ठाणें शहर व आठ पाखाड्या होत्या. बेला...

बेलापूरबेट उर्फ शहाबाद या भागांत तीन परगणे होते. पहिला पारसिक डोंगराच्या पूर्वेचा पंचनद परगणा यांत तीस खेडीं होतीं. ठाण्यापासून तुर्भ्यापर्यंतची किनाऱ्याची पट्टी, जिला खेरणपट्टी ह्मणतात, या दुसऱ्या परगण्यांत १७ खेडीं होतीं. तिसरा खुद्द बेलापूर उर्फ शहाबाद परगणा यांत १७ खेडीं होतीं. करंजेबेट उर्फ उरणभाग यांत करंजे कसबा, भेंडकुळें ठिकाण, व न्हावें, शेवें, आणि घारापुरी, हीं तीन बेटें होतीं.

गुजराथ, जव्हार, दिल्ली, व अहमदनगर, एथील राजांपासून कधींमधीं पोर्टुगीज लोकांच्या मुलखाला उपद्रव होत असे तरी, एकंदरीनें पहातां, जमिनीवरून किंवा समुद्रांतून त्यांच्या मुलखावर फारसे हल्ले होत नसत. तसेंच बंदोबस्त चांगला असल्यामुळें मुलखांतल्या मुलखांतही दंगेधोपे होत नसत. इ. स. १६१३ त, एप्रिल महिन्याच्या १३व्या तारखेस मात्र, एक बंड उद्भवलें होतें. त्या प्रसंगीं करंजें व इतर कसबे यांत पुष्कळ दिवसपर्यंत लढाई चालली होती, व पुष्कळ पोर्टुगीज लोक तींत जायां झाले.

इ. स. १५३३ त साष्टी व वसई प्राप्त झाल्यावर, पोर्टुगीज लोकांनीं, वसई, अशेरी, तारापूर, माहीम, दमण, व चौल एथें, विशेष मजबूत किल्ले बांधले. मुलखाच्या प्रत्येक विभागाच्या मुख्य स्थळाभोंवतीं मोठाले तट बांधून, मुलखांत येण्याच्या ज्या वाटा होत्या त्या ठिकाणीं, त्यांनीं त्यांच्या रक्षणाकरितां किल्ले व मेढेकोट बांधिले. विद्यालयें व मठ यांत राहाणाऱ्या आपल्या लोकांना त्यांनीं शस्त्रें देऊन ठेविलीं. तसेंच प्रत्येक गांवच्या पोर्टुगीज मालकानें आपापल्या गांवांत चौकीपाहाऱ्याकरितां एकेक बुरूज बांधिला, किंवा शेतांत एकेक घर बांधून, त्याच्या सभोंवतीं खंदक खणिला. अशेरीचा डोंगर स्वभावतःच मजबूद असल्यामुळें, कृतीनें त्याची मजबुती करण्याचें फारसें कारण नव्हतें. ह्मणून, इ. स. १५५६ त, अशेरी घेतल्यावर, लागलेच त्या डोंगरावर पुष्कळ शिपाई त्यांनीं ठेविले. वसई एथील किल्ला सोळाव्या शतकाच्या अखेरीच्या सुमारास त्यांनीं बांधिला. ठाणें एथील सुंदर किल्ला बांधण्याचें काम, इ. स. १७३० त, त्यांनीं आरंभिलें.

इ. स. १७३९ त मराठ्यांनीं साष्टी घेतली तेव्हां हें काम संपलें नव्हतें. खाड्यांच्या किनाऱ्यांच्या बंदोबस्ताकरितां जीं कामें करण्यांत आलीं होतीं; त्यांत, जनरल लुइस डी मेलो पेरेरा यानें, वसई प्राप्त [ इ. स. १५३४ ] झाल्यावर, सोपारें एथें जे चार मेढेकोट बांधिले, ते मुख्य होते. तट वगैरे बांधून मजबूद केलेल्या मांडव्या किंवा वखारी यांपैकीं मनोर एथील मांडवी उत्तम होती. तसेच ज्या धर्मसंबंधाच्या घरांची तटबंदीनें मजबुती केलेली होती त्यांत, वेसाव्याजवळच्या येरंगल गांवांतील घर व साष्टींतील वांद्रें एथील घर, हीं दोन धर्मगृहें मुख्य होतीं.

या प्रांताच्या ईशान्येस, अशेरी व मनोर यांच्या दक्षिणच्या बाजूस, वैतरणानदीच्या पूर्व ह्मणजे डाव्या तीरावर, एक किल्ल्यांची ओळची ओळ, त्यांनीं, जव्हारच्या कोळी राजांपासून केळवेंमाहीम प्रांताचें रक्षण करण्याकरितां, बांधिली होती. हलोळी, साकडें, दहिसर, व पारगांव या गांवांत या किल्ल्यांच्या ओळींतील कांहीं किल्ल्यांचे अवशिष्ट राहिलेले भाग सांप्रत आढळतात.

तानसानदीच्या दक्षिणच्या बाजूस, वसईच्या ईशान्येस, सुमारें पंधरा मैलांवर, मांडवीचा किल्ला होता व मांडवीच्या पूर्वेस, पांच मैलांवर, एका परगण्याचें सैवान ह्मणून मुख्य शहर होतें, तेथें एक मेढेकोट बांधलेलें ठाणें होतें. त्यामुळें तानसेच्या डाव्या ह्मणजे दक्षिण थडीवरील प्रदेशाकडून, सोपारें व वसई या प्रांतांतील सुपीक जमिनीस, होणाऱ्या उपद्रवांचें निवारण होत असे. मांडवीपासून दक्षिणेकडे जाणाऱ्या, तुंगार व कामनदुर्ग डोंगरांच्या ओळीनें, पोर्टुगीज लोकांच्या मुलखाच्या पूर्वसरहद्दीचें, कामवाडी नदी ऊर्फ भिवंडीची खाडी व वसईची खाडी यांच्यापर्यंत, रक्षण होत असे. वसईच्या खाडीच्या उजव्या ह्मणजे उत्तर तीरावरील कांबें [हें भिवंडीच्या पश्चिमेस सुमारें दोन मैलांवर आहे ], जूं नांडिकनें, गावें, फिरंगीपाडा, पैगांव, नवगड ऊर्फ साष्टी नवघर, व कामनकसव्याजवळची तटबंदीनें मजबूत केलेली उत्तम गढी, यांच्या द्वारें वसईस येण्याच्या मार्गाचा बंदोबस्त त्यांनीं केला होता. पुढें दक्षिणच्या बाजूस, कल्याणच्या समोरच्या खाडीकांठावर, ठाता कुब म्हणून एक लहानसा किल्ला होता. ठाण्यांतून निघून

...डी उतरून पलीकडे गेलें असतां, शेतांत बांधलेल्या घरां॰ अवशिष्ट भाग अजूनही दृष्टीस पडतात.त्यांवरून हीं घरेंही तटबंदीनें मजबूत केलेलीं असावीं असें अनुमान होतें. शिरगांवापासून दक्षिणेस वैतरणानदीच्या मुखावरच्या दांतिवऱ्यापर्यंत, पन्नास मैल लांबीच्या किनाऱ्याच्या रक्षणा॰ करितां, त्यांनीं आणखी एक बुरजांची ओळ बांधिली होती. तींतील प्रत्येक बुरजावर पहारेकरी असत.

जनरल् आफ् दि नार्थ,ह्मणजे उत्तर प्रांतावरील सेनापति, या नांवाच्या अधिकाऱ्याच्या हाताखालीं किल्ल्यांवरचे किल्लेदार होते. त्यांत वसई, दमण, चौल, व साष्टी एथील किल्लेदार मुख्य होते. या चौघांखेरीज, वैतरणा व करंजें यांच्या दरम्यानच्या मुलखांतील किल्ले व मेढकोट मिळून १४ ठाण्यांवर चवदा अधिकारी होते. ज्या पोर्टुगीज मान॰ कऱ्यांच्या घराण्यांचा, असल्या प्रकारच्या हुद्देदारीचीं कामें मिळण्याचा, हक्क असे, त्या घराण्यांतून उत्तम उत्तम लोक निवडून, अशा हुद्यावर पोर्टुगीज लोक नेमीत असत. प्रायः तीन वर्षेंपर्यंत हा अधिकार एका मनुष्याकडे असे. तरी करंजें एथील अधिकारी ताहाहयात आपल्या हुद्यावर होता असा लेख आढळतो. किल्ल्यावर प्रत्येक अधिकाऱ्याच्या हाताखालीं शिबंदी असे. तींत कांहीं पोर्टुगीज सोजीर, कांहीं एतद्देशीय शिपाई, व कांहीं गुलाम असत. ज्या ठिकाणीं किल्ले नव्हते अशा उघड्या मुलखाच्या रक्षणाकरितां शिपायांच्या नऊ फिरत्या कंपन्या तयार केलेल्या होत्या. पुढें, मोंगल व मराठे यांजकडून अधिक उपद्रव होऊं लागला तेव्हां,या कामाकरितां अधिक कंपन्या ठेवाव्या लागल्या. घोडेस्वारांचे दोन रिसालेही ठेविलेले होते. पैकीं एक रिसाला वसईस होता व दुसरा दमण एथें होता. प्रत्येक गांवच्या पोर्टुगीज मालका॰ कडून कांहीं लोक घेऊन,त्यांना लढाईचें काम शिकवून, हवी तेव्हां फौज जमाविण्याची सोयही केलेली होती.इकडे आल्यावर पोर्टुगीज लोकांनीं समुद्रावर आपलें वर्चस्व लवकरच बसविलेलें होतें व या देशांतील व्यापाऱ्यांना आपण दिलेला परवाना जवळ असल्याखेरीज समुद्रांत कोठेंही ते फिरूं देत नसत.एक किल्ल्यांची ओळची ओळ बांधिली होती तिच्या योगानें ते समुद्रकिनाऱ्यावरील

मुलखाचें रक्षण करीत व देशी होड्यांवर ठेवण्याकरितां गोरे एथल्या सैन्यांतील शिपाई पाठवीत असत.

समुद्रावर अंमल चालविण्याचें काम सोपें नव्हतें. व [illegible] इ. स. १५७० त, मलबारचा किनारा व इराणी आखात, या दोन ठिकाणीं, पोर्टुगीज लोकांबरोबर शत्रुत्व करणाऱ्या लोकांचीं तारवें होतीं. कांहीं ग्रंथकारांनीं 'दंगाधोपा न करितां व्यापार करणारीं गलबतें' अशी संज्ञा या प्रतिस्पर्धी तारवांच्या दोन समूहांना दिली आहे. पोर्टुगीज लोकांच्या जुलमामुळेंच, कांहीं गलबतवाले, व्यापाराचा धंदा सोडून, लुटारू बनले असतील, ही गोष्ट ही खरी आहे. तथापि सदरील दोन ठिकाणच्या गलबतवाल्यांपैकीं बहुतेक गलबतवाले मुळचेच समुद्रावर लूट करणारे यांचे होते. ते पोर्टुगीज लोकांचीं गलबतें व त्यांचे परवाने जवळ बाळगणारीं देशी गलबतें यांना लुटीत इतकेंच नव्हे, तर पोर्टुगीज लोकांच्या ताब्यांतील मुलखाच्या किनाऱ्यावर उतरून, तेथेंही लूट करीत. ह्या चांच्यांपासून फार उपद्रव होऊं लागल्यामुळें, त्याच्या निवारणार्थ, एक दक्षिणेस व एक उत्तरेस, अशा तारवांच्या दोन टोळ्या, इ. स. १५७० त, त्यांना तयार कराव्या लागल्या. डच् [ इ. स. १५९७ ] व इंग्रज लोक [ इ. स. १६०९ ], एथें सतराव्या शतकाच्या आरंभीं आल्यावर, पोर्टुगीज लोकांचें समुद्रावरचें वर्चस्व नष्ट झालें. इ. स. १६२४ पर्यंत, देशी गलबतांवरच्या लोकांनीं आपले परवाने घेतलेच पाहिजेत असें करण्यापुरता, त्यांचा अंमल होता. इ. स. १६२३ त इंग्रजांनीं ओर्मुझ घेतलें, व इ. स. १६६३ त डच लोकांनीं कोचीन घेतलें, तेव्हां समुद्रावरच्या वर्चस्वाचा आपला हक्क पोर्टुगीज लोकांना सोडून द्यावा लागला.

उत्तर प्रांताचा सेनापति, किल्लेदार, व शिबंदी यांच्या खेरीज, एक वखारीचा अधिकारी, एक माजिस्त्रेट, एक पोलीस सुपरिंटेंडेंट, एक जलमार्गाकडचा बेलिफ, एक तोफखान्याकडील लोकांना अन्नसामुग्री पुरविणारा अधिकारी, एक राजाचा वकील [ सालिसिटर ], एक मृत्युपत्र न करितां मृत झालेल्या मनुष्यांचा इस्टेटीची वहिवाट करणारा अधिकारी, एक रात्रीस पहारा करणाऱ्या लोकांचा नाईक, व एक शिल्पकार, इतके अधिकारी वसई एथें असत. वसईखेरीज ठाणें, आगाशी,

मोंडें, व करंजें एथेंही ठाणेदार होते. उत्तरेकडील किनाऱ्यावरच्या प्रांतील माजिस्त्रेटांनीं निकाल केलेल्या फिर्यादींवर अपिलें घेऊन चवकशी करण्याकरितां कधीं कधीं वसई एथें एक जड्ज्यही असे. वसई व चौल एथील माजिस्त्रेट दिवाणी व फौजदारी खटल्यांचा निकाल करीत असत. हे माजिस्त्रेट किल्लेदारांच्या हाताखालीं असल्यामुळें, त्यांना कधीं कधीं त्यांच्या मर्जीप्रमाणें न्याय करावा लागत असे. माजिस्त्रेटाच्या ठरावावर गोवें एथील सुप्रीम कोर्टाकडे प्रथमतः अपील होत असे. पुढें इ. स. १५८७ च्या सुमारास सहा किंवा आठ जड्ज्यांचें एक बेंच ( मंडळ ) वसईंत नेमण्यांत आलें. हें जड्ज्य अपिलांखेरीज मोठमोठे दिवाणी व फौजदारी अवल खटलेही तपाशीत असत. हे खटले देशी वकील चालवीत असत. या वकिलांना कायद्याचें फारसें ज्ञान नसे.

जमिनीवर जो नियमित धारा द्यावयाचा, त्यापैकीं शेंकडा चारपासून दहा टक्केपर्यंत सरकारास देत जावें, अशा करारानें, जमिनीचीं मोठमोठीं क्षेत्रें फजिनदार नांवाच्या जमिनदारांस पोर्टुगीज लोक देत असत, ही त्यांच्या जमीनवसुलाच्या पद्धतीची मुख्य विशेष गोष्ट होय. जे पोर्टुगीज लोक कृपा करण्यास योग्य आहेत असें राजाला वाटे त्यांना ह्या फजिनदाऱ्या देत असत. तीन डोयांपर्यंत फजिनदारानें आपल्या ताब्यांतील क्षेत्राचा उपभोग घ्यावा असा नियम होता. तरी पुढें पुढें फजिनदाराला तीन डोयांहून अधिक मुदतीपर्यंतही त्या क्षेत्राचा उपभोग करण्याचा अधिकार मिळूं लागला होता.

शेतकरी, ह्मणजे शेतांत खपणारे लोक, यांचा हक्क पोर्टुगीज लोकांनीं जमिनीवर मुळींच ठेविला नव्हता. शेतांत खपणाऱ्यांना जमीनजुमल्याचाच एक अंश मानीत असत, व त्यांना शेत सोडून जाण्याची मोकळीक नसे. मोठमोठे जमीनदार आपल्या कुळांकडून जमिनीची लागवड करवीत. खेरीज घरीं लागवड करण्याकरितां ह्मणून ते कांहीं जमीन ठेवीत. तींत आफ्रिका खंडांतून आणलेल्या गुलामांकडून लागवड करवीत. ज्या जमिनी कुळांकडे निरंतरचा धारा ठरवून लाविलेल्या नसत, त्या दर वर्षास पाहिजे त्या कुळाला, ह्मातर ह्मणजे गांवचे पाटील

देत असत. हीं कुळें सरकाराला ऐनजिन्नसी उत्पन्नाचा कांहीं वांटा व कांहीं, रोकड पैसा देत. अशा प्रकारच्या जमिनींवर "व्हियडोर" नांवाच्या अधिकाऱ्याकडून सरकार देखरेख करवीत असे. सतराव्या शतकाच्या अखेरीस, [ इ. स. १६८८ ] वसई प्रांताच्या वसुलापैकीं निम्मे वसूल, कुळांकडे निरंतर लावलेल्या जमिनींपासून होत असे. बाकी राहिलेला निम्मे वसूल दरवर्षी निरनिराळ्या कुळांस दिलेल्या जमिनीपासून, व दगड, मिठागर, मासे, दारू [ पिण्याची ].व दुकानें,यांवरच्या करांपासून होत असे.

ठाणें जिल्ह्यांत पोर्टुगीज लोकांचा अंमल सुरू झाल्यापासून त्याचा शेवट होई तों पर्यंत,ते लोक मोठ्या मेहनतीनें व खर्चानें हिंदूना ख्रिस्ती करण्याचा सतत यत्न करीत असत. त्या कामांत त्यांना अधिकउणें यशही येत असे. तसेंच त्या कामीं त्यांच्या अंगच्या आवेशांतही अधिकउणेपणा होत असे. इ. स. १५३४त मुख्य धर्माधिकाऱ्याची नेमणूक गोंवें एथें त्यांनीं केली, व गुजराथच्या राजानें साष्टी आणि वसई प्रांत, त्याच सुमारास, पोर्टुगीज लोकांना दिले. तेव्हां आंटोनिओ डो पोर्टो नामक फ्रान्सिस्कन पंथाच्या जोग्यानें, ख्रिस्ती धर्माचा प्रसार एथें करण्याकरितां, श्रम करण्यास आरंभ केला. इ स १४९८ त वास्को डागामा बरोबर ' ब्लेसेड ट्रिनिटी ' पंथाचे दोन जोगी आले होते. परंतु त्यांच्या हातून कोणी ख्रिस्तीधर्म स्वीकारण्या पूर्वींच ते ठार मारले गेले. या दोघांखेरीज हिंदुस्थानांत प्रथमत:आलेले सर्व ख्रिस्ती जोगी फ्रानसिस्कन पंथाचेच होते. त्यापैकीं इ. स. १५०० त आठ आले होते. त्यांच्या मागून इ. स. १५१३ त डामिनिकन पंथाचे जोगी एथें आले. परंतु फ्रानसिस्कन पंथाच्या जोग्या इतकें ह्यांचें प्राबल्य नव्हतें. इ.स.१५४२ त सेंट फ्रान्सिस झेवियर इकडे आला. तेव्हां जेजुइट पंथी, लोकांचा इकडे प्रवेश झाला. इ. स. १६८१ त ' हास्पिटलर ' पंथाचे लोक इकडे आले. हा हिंदुस्थानांत ख्रिस्ती धर्माचा चवथा पंथ होय. ह्या पंथाचे लोक या देशांत मुळींच प्रबल झाले नाहींत. तारापूर एथें ' रिकोलेट्स ' ह्मणून एक ख्रिस्ती धर्माचा पांचवा पंथ होता. परंतु तो पंथ फ्रान्सिस्कन पंथाचीच एक शाखा होय. वर सांगितलेल्या आंटोनिओ डो पोर्टोनें इ. स. १५३४ पासून १५५२

पर्यंत, अठरा वर्षांत, २०० हिंदु देवळांचा नाश केला, व दहा हजारां पेक्षा अधिक लोकांना ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली. त्यानें ख्रिस्ती धर्माचीं बारा देवळें बांधिलीं आणि अनाथबालरक्षकगृहें व मठ यांची स्थापना ही त्यानें केली. त्यामुळें एतद्देशीय पाद्री मिळण्याची अडचण दूर झाली. ज्या हिंदु देवळांचा त्यानें विध्वंस केला त्यांपैकीं कांहीं आगाशीस होतीं, व कांहीं ठाण्यास होतीं. बहुतेक तीर्थें व क्षेत्रें एथें असणारीं देवालयें त्यानें पाडिलीं. कांहीं तीर्थकुंडें मातीनें बुजवून टाकिलीं. कांहींना ख्रिस्ती तीर्थें बनविलीं. आगाशी व वसई यांच्या दरम्यान एक हिंदु तीर्थ होतें तें बाटवून तेथें 'आवर लेडी आफ् हीलिंग' या देवीचें एक देउळ त्यानें बांधिलें. तेथें ख्रिस्ती झालेले हिंदु लोक पूर्वीं प्रमाणेंच, आपले रोग बरे होण्याकरितां, यात्रेला जात असत. कान्हेरी एथील तिसऱ्या नंबरच्या मोठ्या लेण्याला 'सेंट मिचेल' चें देऊळ अशी व मंडपेश्वर एथील ब्राह्मणी लेण्यांना "आवर लेडी आफ् कन्सेप्शन" या देवीचें देउळ अशी त्यानें संज्ञा दिली. खेरीज ठाणें व वसई एथें पुष्कळ देवळें त्यानें बांधिलीं. तशींच करंजें एथें ही तीन देवळें त्यानें बांधिलीं. त्यानें बांधिलेल्या अनाथबालरक्षक गृहांपैकीं एक आगाशी एथें होतें. एक ठाणें एथें होतें त्यांत १३० मुलगे होते. एक विहाड एथें होतें त्यांत ३०० मुलगे होते. एक मंडपेश्वर एथें होतें त्यांत १०० अनाथ मुलें होतीं. पोर्टुगीज लोकांच्या प्रत्येक वसाहतींत एकेक भिक्षागृहही असे. कान्हेरी एथें दोन बौद्ध जोगी होते त्यांना त्यानें ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली. ज्यांनीं हा नवा धर्म स्वीकारला होता त्यांत हे दोन जोगी मुख्य होते. धर्म बदलल्यावर त्या उभयतांपैकीं एकाचें पालो रापोझो असें नांव त्यानें ठेविलें होतें व दुसऱ्याचें फ्रान्सिस्को डी सांटा मेरिया असें होतें. ह्या दोघांनाही मोठा मान मिळत असे. फ्रान्सिस्कोनें दुसऱ्या पुष्कळ जोग्यांना ख्रिस्ती धर्मांत आणिलें. पाल रापोझो याला सरकारानें तीन गांव दिले होते ते त्यानें मरते समयीं मंडपेश्वर उर्फ माउंट पोझियर एथील विद्यालयाला दिले. इ. स. १५४२ पर्यंत हिंदूंना ख्रिस्ती करण्याचें काम फ्रान्सिस्कन पंथाचे लोक मात्र करीत असत. इ. स. १५४२ त सेंट फ्रान्सिस

झेवियर गोंव्यास येऊन पोंचला. पुढील वर्षी जेजुइट पंथी पुष्कळ धर्मोपदेशक या देशांत आले. त्यांच्या मदतीनें सेंट झेवियर यानें ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याचें काम मोठ्या झपाट्यानें चालविलें. या सेंट झेवियराला वसईप्रांत फार आवडत असे. इ. स. १५४८ त त्यानें एक जेजुइट पंथाच्या लोकांची शाळा घातली, इ. स. १५५२ त ठाणें व चौल एथें धर्मोपदेशक पाठविले, आणि इ. स. १५४४, १५४८, व १५५२ या तीन वर्षांत तीन वेळा वसईस स्वतः तो गेला. इ. स. १५७० पासून १५९० पर्यंत वसईस जेजुइट लोकांना ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराच्या कामीं फारच यश आलें. ब्राह्मण व दुसरे उंच वर्ण या जातींतल्या लोकांना ख्रिस्ती करण्याविषयीं ते फार मेहनत करीत असत. कारण ब्राह्मण ख्रिस्ती झाले ह्मणजे खालच्या जातींचे लोक सहजच वळतील हें त्यांस चांगलें माहीत होतें. जे लोक ख्रिस्ती होत त्यांना बाप्तिस्मा देण्याच्यावेळीं ते मोठा समारंभ व उत्सव करीत असत. अशा प्रकारें ख्रिस्ती धर्माला उत्तेजन मिळत गेल्यामुळें इ. स. १५७३ त एतद्देशीय सोळाशें लोक ख्रिस्ती झालेले होते, ती संख्या वाढतां वाढतां १५८८ त ९४०० पर्यंत गेली. इ. स. १५६० च्या सुमारास जेजुइट मठावरील मुख्य जोगी गोन्साला रोड्रिग्ज यानें लहान मुलें व अनाथ मुलें विकत घेऊन ठाणें एथे ख्रिस्ती धर्म वाढविण्याविषयीं फार परिश्रम केले. तीन वर्षांत त्यानें पांचसाहा हजार लहान मोठ्या माणसांना ख्रिस्ती केलें. या पुरुषानें,सरकारांतून मिळालेल्या एका विशेष देणगीच्या मदतीनें, विहाडच्या ओसाड व दाट झाडीच्या खिंडींत एक ख्रिस्ती लोकांचें गांव वसविलें. तेथील जमीन खरेदी करून तिचे तुकडे त्यानें लोकांना वांटून दिले. थोड्याच वर्षांत या गांवची लोकसंख्या तीन हजार पर्यंत वाढली. बैलांचे शंभर नांगर, व शेतकीच्या कामाला लागणारीं पुष्कळ आवतें, यांजवर या गांवांतील लोकांची समायिक मालकी ठेविली होती. एथील गांवकऱ्यांना प्रत्यहीं धर्मशिक्षण मिळत असे, व दररोज संध्याकाळीं ते ख्रिस्तीधर्ममताचीं गाणीं गात असत. या गांवाजवळ एक त्रिमुखी दत्तात्रेयाचें प्रख्यात देऊळ होतें. तेथें गुजराथ व कानडा या देशांतून यात्रेकरू येत असत. हें देऊळ

ख्रिस्ती लोकांच्या हातीं आलें तेव्हां त्यांनीं त्यांतील मूर्ति फोडून टाकली आणि तें वाढवून त्यांत ख्रिस्ती त्रैमूर्तीची [पिता, पुत्र, व पवित्र आत्मा यांची] स्थापना केली. तेव्हां एथील ख्रिस्ती लोकांना भूतबाधा फार होऊं लागली. तें भूत त्यांच्या दृष्टीस पडे व त्यांना भेवडावी आणि कित्येकांस तें लागत असे. ज्यांच्या आंगांत हें भूत संचार करीत असे त्यांना चाबकाचा मार दिल्याखेरीज ते सोडीत नसे. जेथें हें गांव वसविलें होतें तेथील हवा रोगट असल्यामुळें तें तेथून काढून उंच जागीं वसवावें लागलें. इकडे, वसई व ठाणें एथें, जेजुइट लोकांना याप्रमाणें धर्मप्रसाराच्या कामीं फार यश मिळत गेलें, तसेंच तिकडे मान्युएल गोम्स या नांवाच्या फान्सिस्कन पंथी ख्रिस्त्यानें, साष्टीबेटांत, इ. स. १५७५ पासून १५९० पर्यंत, पुष्कळ लोकांना ख्रिस्ती केल्यामुळें [त्यांपैकीं एकट्या वांद्र्यांत ६००० होते], त्याला "साष्टीचा प्रेषित" अशी संज्ञा प्राप्त झाली, व साष्टी आणि करंजें या दोन बेटांतील सर्व गांवांत त्या पंथाचे जे लोक होते त्यांना "क्रिश्चन फादर्स" हा मोठा हुद्दा प्राप्त झाला।

एथील लोकांना किरिस्तांव करण्याचें, आणि ख्रिस्ती देवळें व मठ बांधण्याचें, काम सतराव्या शतकांत चालू होतेंच. त्या शतकांत सर्व ख्रिस्ती लोक व विशेषतः जेजुइट लोक मोठे श्रीमान व प्रबल झालेले होते. इ. स. १६३४त वसईंत ६३ ख्रिस्ती जोगी होते. त्यां पैकीं फ्रान्सिस्कन पंथाचे ३०, जेजुइटपंथाचे १५, डामिनिकन पंथाचे १०, व आगस्टाइन पंथाचे ८ होते. वसईच्या आसपासच्या भागांत पुष्कळ किरिस्तांव होते. खुद्द वसईशहरांत फ्रान्सिस्कन, डामिनिकन, व जेजुइट या तीन पंथांचीं लहान लहान देवळें पुष्कळ होतीं. ठाणें एथें एक मोठें देऊळ व पुष्कळ लहान लहान ख्रिस्ती देवळें होतीं. इ. स. १६६४ त पोर्टुगीज लोकांनीं मुंबईबेट इंग्लिशांना दिलें. तेव्हां जेजुइटपंथाच्या लोकांचें फार नुकसान झालें. तरी त्या काळीं ख्रिस्ती धर्मोपदेशक जितके श्रीमंत व प्रबल झाले होते तितके ते पूर्वीं कधींच नव्हते. इ. स. १६७३त ठाणें एथें ख्रिस्ती देवळें व पाठशाळा सात होत्या आणि वसईस साहा देवळें, चार पाठशाळा, व दोन मठ होते. त्या वेळीं साष्टीबेटांतले सगळे लोक किरिस्तांव होते आणि वांद्रें एथील

जेजुइट लोक मोठ्या डामडौलानें व थाटानें राहात असत. साष्टीबेटाचा बहुतक भाग त्यांच्याकडेच त्या वेळीं होता.

एथील लोकांचीं ख्रिस्ती होण्याविषयीं मनें वळविणें हेंच आपला धर्म दुसऱ्याकडून स्वीकारविण्याचें मुख्य साधन पोर्टुगीज लोक समजत असत. दोनशें वर्षांपूर्वीं ह्मणजे, इ. स. १३२०त, तीनचार लाटिन जोग्यांना असें आढळून आलें होतें कीं, मुसलमानांनीं छळ केला तरी, हिंदु व पारसी लोक आपलें ह्मणणें संतोषानें ऐकून घेतात व ख्रिस्ती बनतात. पहिले पोर्टुगीज जोगी झटून काम करणारे असत; ते उदारपणें धर्मादाय करीत; व अनाथ मुलांचें रक्षण मोठ्या ममतेनें करीत. त्यामुळें हा नवा धर्म जुन्याधर्मापेक्षां पुष्कळांना बरा वाटे. त्यांच्या मागून जे ख्रिस्ती झाले ते ख्रिस्ती देवळांचा भव्यपणा व ख्रिस्ती धर्मसंबंधीं संस्कारांचा डामडौल पाहून तो धर्म स्वीकारण्यास तयार होत. एथील लोकांतून जे ख्रिस्ती होत असत त्या सर्वांना, व विशेषत: उंच जातींतील जे लोक हा धर्म स्वीकारीत त्यांना, मोठी अबरू व सन्मान मिळे. जे गरीब असत, त्यांच्यापासून हा धर्म स्वीकारल्यानंतर पंधरा वर्षेंपर्यंत धर्मसंबंधीं "टाइद" व "फर्स्ट फ्रूट" हे कर घेत नसत. वांद्रें एथील लोक १५८० पर्यंत ख्रिस्ती झाले नव्हते. यावरून असें दिसून येतें कीं, पोर्टुगीज लोकांनीं पहिल्यानें ज्या लोकांना ख्रिस्ती केलें, त्यांचीं मनें वळवून व त्यांना उत्तेजन देऊन, त्यांजवर कोणत्याही प्रकारचा जुलूम न करितां तें काम त्यांनीं केलें. सोळाव्या शतकाच्या मध्याच्या अगोदरपासूनच, ख्रिस्ती होण्याविषयीं लोकांचीं मनें जशीं पोर्टुगीज लोक वळवीत असत व त्यांस उत्तेजन देत असत, त्याप्रमाणेंच हिंदु धर्मास उत्तेजन न मिळेल, व तो रसातळास जाईल, अशाविषयींही त्यांनीं नियम केले होते. इ. स. १५४६ त पोर्टुगालच्या राजानें असा हुकूम फर्माविला कीं, मूर्ति फोडून टाकाव्या, मूर्ति करणारे व हिंदु धर्माचे संस्कार चालविणारे यांना शिक्षा करावी, आणि मशिदींवर कर बसवावा. हा हुकूम अमलांत न आल्यामुळें, इ. स. १५५५ त, तो पुन: फरमाविण्यांत आला. उत्सव, संस्कार, ब्राह्मणांचा धर्मोपदेश, स्नान, या गोष्टींचा प्रतिबंध झाला. ज्याच्याजवळ मूर्ति आढळतील त्याला पकडून गुलामांसारखें तारवांवर

ण्याकरितां पाठवीत व त्यांची जिनगी जप्त करीत. कांहीं काळपर्यंत हिंदु धर्माप्रमाणें चालण्याविषयीं परवाने देऊन या हुमकाची टाळाटाळ करण्यांत आली. परंतु अखेरीस १५८१ त तो पुरा अमलांत आला.

इ. स. १५६० त गोवें एथें धर्मसंबंधानें जुलूम करणारें "इन्क्विझिशन" नांवाचें कोर्ट स्थापन झालें. पुढें इ. स १५८० हें वर्ष येई तों त्या कोर्टाचे "कमिसरी" नांवाचे हस्तक चौल, वसई, दमण, या प्रांतांत येऊन दाखल झाले होते. ते अपराधी लोकांना जमा करीत व त्यांस चौकशी होऊन शिक्षा मिळण्याकरितां गोवें एथें पाठवीत. इ. स. १७७४ त हें गोवें एथील "इन्क्विझिशन" बंद झालें. इ. स. १७७९ त तें पुनरपि सुरू झालें. व १८१२ त त्याची अखेरची बंदी झाली. सतराव्या शतकांत ख्रिस्ती धर्मोपदेशक मोठे गबर व प्रबल झाले होते. १६७३ त सगळें साष्टिबेट त्यांच्या ताब्यांत होतें. इ. स. १६९५ त राजाच्या उत्पन्नापेक्षां या धर्मोपदेशकांचें उत्पन्न अधिक होतें. १७२० त त्यांचें प्रस्थ इतकें वाढलें कीं, ते "जनरल आफ् दि नार्थ" या अधिकाऱ्यावर देखरेख करूं लागले व ह्यामुळें त्याचा कारभार सुरळीत चालेनासा झाला, आणि आपला हुद्दा कायम कसा राहातो याची त्याला मोठी भीति पडली. दंड, "टाइद" नांवाचा कर, "फर्स्ट फ्रूट" नांवाचा कर, राजाकडून मिळालेल्या रोकड देणग्या, यांच्या योगानें, व विशेषत: राजा व प्रजा यांनीं दिलेल्या जमिनीच्या देणग्या यांच्या योगानें, हे ख्रिस्ती धर्मोपदेशक फार गबर झाले होते.

एकंदरीनें पाहातां पोर्तुगीज लोकांच्या अमलापासून या प्रांताचें हितच झालें: सतराव्या शतकाच्या मध्यापर्यंत सर्व मुलखांत बंदोबस्त चांगला होता आणि वित्त व जीवित हीं बरींच सुरक्षित होतीं. मोठमोठ्या खारी व खाजणें यांची सुधारणा करून लागवड होणारी जमीन वाढविण्यांत आली होती व उत्तम उत्तम मातबर पिकें तयार करीत असत. सगळ्या प्रांतभर उत्तम इमारती पसरल्या होत्या. ख्रिस्तीधर्मोपदेशक मोठे गबर व उदार झाले होते. बडे लोक व जमीनदार हे श्रीमंत व भाग्यशाली झाले होते.

शेतांत खपणाऱ्यांना फारसें स्वातंत्र नव्हतें तरी, त्यांची स्थितीही चांगली होती. गोएझ याचा १६३० तला असा लेख आहे कीं, पोर्तुगीज लोकांनीं धर्मसंबंधानें लोकांचा छळ केल्यामुळें, ते शेजारच्या मुलखांत निघून गेले होते, व त्यामुळें वसई आणि दमण यांमधील बहुतेक जमीन लागवड न होतां ओसाड राहिली होती. हा लेख खरा असेल तर, या प्रांताला पूर्वीची भरभराटीची स्थिति लवकरच पुन:प्राप्त झाली असे ह्मटलें पाहिजे. कारण इ. स. १६३४त करंजें बेटाची स्थिति इतकी उत्तम होती कीं, खर्चवेच भागून वसुलाचा पुष्कळ पैसा शिलक राहिला. तो हिंदुस्थान व बाह्यप्रदेश यांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याच्या कामीं लावण्यांत आला.

इ. स. च्या सोळाव्या शतकांत, व सतराव्या शतकाच्या पहिल्या भागांत, ठाणें प्रांताचा ईशान्य भाग जव्हारच्या कोळी राजाकडे होता, व सतराव्या शतकाचीं पहिलीं एक दोन वर्षें खेरीज करून, बाकीच्या काळांत, ठाणें जिल्ह्याचा आग्नेय भाग, ह्मणजे कल्याण प्रांत, अहमदनगरच्या राजाच्या ताब्यांत होता. इ. स. १६२६ त, मलिकंबर मृत झाल्यावर, कल्याण प्रांत मोंगलांच्या ताब्यांत गेला. इ. स. १६३२ त, शिवाजीचा बाप शहाजी यानें, अहमदनगरच्या राजघराण्यांतील एका मुलाच्या वतीनें, नासिक, त्रिंबक, जुन्नर, संगमनेर, व कल्याण हे परगणे घेतले. इ. स. १६३५ त, शहाजीपासून कोंकण घेण्याकरितां, मोंगलांनीं एक सरदार पाठविला. त्यानें, माहुलीच्या डोंगरी किल्ल्यांत आश्रयास जाण्याविषयीं, शहाजीस भाग पाडलें, व अखेरीस शहाजीला त्या सरदाराला शरण होणें जावें लागलें. इ. स. १६३६ त, विजापूरच्या आदिलखानानें खंडणी देण्याचें कबूल केल्यामुळें, मोंगलांनीं कोंकण त्याच्या ताब्यांत दिलें, व इ. स. १६३७ त, शहाजी विजापूरसरकारच्या चाकरीस राहिला. एथून पुढें दाहा वर्षेंपर्यंत कल्याण प्रांत विजापूरसरकाराकडे होता, व त्याचा विस्तार वैतरणानदीपासून नागोठण्याच्या खाडीपर्यंत होता. जिवल [चौल] बावल किंवा पावळ [ हें बहुतकरून पनवेल बंदर असावें ], दंडाराजपुरी, व पुणेंप्रांतांतील चाकण, हीं स्थळें मोंगलांनीं विजापूरकरांस या प्रसंगीं दिल्याचा विशेष उल्लेख आढळतो. इ. स. १६४८त, शिवाजीनें कल्याण

तलें. या वर्षापासून शिवाजीनें या प्रांतास उपद्रव देण्याचा आरंभ केला. पुढें, सुमारें एक शतकपर्यंत अस्वस्थता चालू राहिल्यावर, सर्व ठाणें प्रांत, मुंबईबेट व ईशान्येकडील जंगली मुलखाचा कांहीं प्रदेश खेरीज करून, मराठ्यांच्या हस्तगत झाला. तेव्हां त्या उपद्रवाचा शेवट झाला. इ. स. १६६१ च्या सुमारास मोंगलांनीं कल्याण शहर पुनः घेतलें. तथापि, इ. स. १६६३ त शिवाजीनें कल्याणाजवळ एक फौज जमविली होती त्यावरून कल्याणप्रांताचा कांहीं भाग त्याच्याकडे त्या वेळीं होता असें दिसतें इ. स. १६६६ त ' कल्याणचा सुभेदार ' या नांवाचा शिवाजीचा अधिकारी असल्याचाही उल्लेख आढळतो.

इ. स. चा १६ वा शतक व इ. स. च्या सतराव्या शतकाचें पूर्वार्द्ध, ह्मणजे पोर्तुगीज लोकांचा या प्रांतीं प्रवेश झाल्यापासून मुंबईंत इंग्लिशांचा प्रवेश होई पर्यंत, गेलेल्या काळांत, या प्रांतांतील बंदरीं व्यापाराची एकंदरीनें पाहातां मंदीच होती. सोळाव्या शतकाच्या आरंभीं चौल व ठाणें [ विशेषतः चौल ] हीं शहरें व्यापाराचीं मुख्य स्थळें होतीं. पश्चिमेस इराणी आखात, आरबस्थानचा किनारा, मिसरदेश, व आफ्रिकेचा किनारा एथील स्थळांशीं या शहरांचा व्यापार चालत असे. दक्षिणेस सिंहलद्वीपाबरोबर व्यापार चाले. पूर्वेस चितेगांग, सुमात्रा बेटांतील आचीन शहर, व मलाका या स्थळांशीं व्यापार चालत असे. सोळाव्या शतकाच्या उत्तरार्द्धांत, उत्तरकोंकणांतील बंदरांचा युरोपखंडाबरोबर व्यापार होण्याचें बंद होऊन, यांच्याबद्दल गोंवें व दक्षिण काठेवाडांतील दिव, या स्थळांचा व्यापार युरोपाबरोबर चालू झाला. तरी वसई, माहीम, ठाणें, व चौल, या स्थळांचा मलबार, गुजराथ, व सिंध प्रांतांतील किनाऱ्यावरील स्थळें, यांच्याशीं चांगला व्यापार चालत असे. तसेंच इराणी अखात, आरबस्थानचा किनारा, व आफ्रिकेचा किनारा, ह्या हिंदुस्थानाबाहेरच्या देशांतील स्थळांशीं ही बराच चांगला व्यापार चाले. तसाच सिंहलद्वीप आणि पूर्वेकडील देश यांशींही बराच चालत असे. सतराव्या शतकांत सुरत एथें इंग्रज व डच व्यापारी येऊन राहिल्यामुळें, तें शहर युरोपाशीं साक्षात् व्यापार चालविण्याचें मुख्य स्थल बनलें. त्यामुळें कोंकणांतील बंदरांचा युरोपाशीं चालणारा व्यापार अजीच बंद झाला, व पोर्तुगीज लोकांचा अमल निरक-

ळीत झाल्यामुळें, इराण,आरबस्थान, व आफ्रिका या देशांशीं चालणारा व्यापारही मंदावला. उत्तरेस सुरत शहराबरोबर व दक्षिणेस गोव्याबरोबर मात्र काय तो किनाऱ्यावरचे किनाऱ्यावर कोंकणांतील बंदरांचा व्यापार सुरू राहिला.

पोर्टुगीज लोकांचा अंमल या प्रांतीं असतांना, इतर देशांशीं व्यापार करण्याचा हक्क, पोर्टुगालच्या राजानें, आपणाकडेच ठेविला होता. तथापि देशांतल्या देशांत चालणारा व्यापार एथील व्यापारीच करीत असत. ह्यांच्या हातांतून हा व्यापार हिसकावून घेण्याचा यत्न पोर्टुगीज सरकारानें केला होता. वसई प्रांतांतील इमारतीच्या लांकडांचा व्यापार मुख्यत्वें करून किल्लेदार व इतर सरकारी अधिकारी करीत असत.

या पोर्टुगीज लोकांच्या कारकीर्दींत चौल, ठाणें, माहीम, व वसई,हीं देशांतल्या देशांत चालणाऱ्या व्यापाराचीं मुख्य स्थळें होतीं. यांच्या खालोखाल पनवेल, कल्याण, भिवंडी, केळवेंमाहीम, आगाशी, तारापूर व मुंबई हीं स्थळें होतीं. गुजराथेंतील खंबायत, दिव, व सुरत हीं शहरें; सिंधप्रांतांतील दिवळ सिंधी हें शहर; मलबारकिनाऱ्यावरील गोंवें, कालिकोट, कोचिन, व कुलम हीं बंदरें; व बंगालच्या उपसागरावरील चित्तेगांग शहर; या हिंदुस्थानांतील सर्व शहरांबरोबर ठाणें जिल्ह्यांतील बंदरांचा, व्यापाराच्या संबंधानें, या कारकीर्दींत, संबंध होता. इराणी आखातावरील ओर्मुझ व मस्कत हीं बंदरें; तांबड्या समुद्राच्या मुखाजवळचें सोकोत्रा बेट व एडन बंदर;मोचा,जिड्डा,व आबिसीनियाचा किनारा हीं तांबड्या समुद्राच्या लगत्याचीं स्थळें; पूर्व आफ्रिकेंतील झैला,किलोआ, ब्राव्हा, मोंबासा, मेलिंदा, मेग्याडोक्षो,व सोफाला हीं स्थळें; दक्षिणेकडचें सिंहलद्वीपांतील कोलंबो शहर;व पूर्वेकडील मलाका व आचीन हीं स्थळें; या हिंदुस्थानाबाहेरच्या व्यापाराच्या स्थळांशींही ठाणें जिल्ह्यांतील बंदरांचा व्यापार होत असे. तांदूळ, डाळ, भाज्या, नारळ, व सुपारी हे खावयाचे जिन्नस या प्रांतांतील बंदरांतून गुजराथ, मलबार, इराण, आरबस्थान, व आफ्रिका एथें जात. नारळ, सुपारी, व गूळ हे पदार्थ मलबारांतून इकडे येत. खारका व मनुका हे पदार्थ इराणी आखात व आरबस्थानचा किनारा या स्थळांहून एथें

येत. स्पेन देशांतील द्राक्षासव आणि इतर कडक मद्यें युरोपांतून इकडे येत. इमारतीच्या उपयोगी पडणाऱ्या जिनसांपैकीं भक्कम दगडी खांब वसईहून गोव्यास जात. तसेच उत्तम सागवानाचीं ओंडयांचीं ओंडीं गोवें, गुजराथ, व सिंध एथें, आणि कधीं कधीं इराणी आखात व तांबडा समुद्र यांच्या लगत्याला, इकडून जात असत. या प्रांतांत तयार झालेलें कापसाचें कापड; बऱ्हाणपूर व मछलीपट्टण एथून खुषकीनें या प्रांतीं आणिलेलें रंगीत कापड, रेशमी बारीक तजेलेदार कापड (कपरधूळ), व जरतारी मलमल; हे प्रावर्णाचे पदार्थ इकडून मलबार, दिव, इराण, आरबस्थान, व आफ्रिका एथें जात. रेशमी कापड व मलमल हे जिन्नस एथें पुष्कळ तयार होत रेशमी कपडे, किनखाब, व रंगीत रेशमी कापड हे जिन्नस इराणी आखात, तांबडा समुद्र, व केप आफ् गुड् होप या भूशिरास वळसा घालून येण्याचा मार्ग, यांच्या द्वारें इकडे आणीत. ऊर्णा- वस्त्रांपैकीं कांबळीं ठाणें शहरांत तयार होत असत. नमदे वगैरे इतर तऱ्हेचे लोंकरीचे कपडे वर सांगितलेल्या मार्गांनीं इकडे युरोपांतून आ- णीत. पायतणें इकडून बाहेर जात व स्पेनदेशांतले जोडे इकडे येत. हातमोजे, पट्टे, कमरपट्टे, बीव्हर जनावराच्या कातड्याच्या टोप्या, व पिसांचे तुरे हे किरकोळ जिन्नसही इकडे युरोपांतून येत. रत्नें, मोत्यें, गोमेद मण्यांच्या माळा, हे शरीरें भूषविण्याचे जिन्नस चौल एथून आरबस्थानच्या किनाऱ्यावर जात. मोत्यें व नीलमणि इराणी आखाताकडून कोंकणांत येत. आबिसीनियांतून हस्तिदंत इकडे येई व चौल एथें त्याचा मोठा व्यापार चालत असे. पोवळीं युरोपांतून इकडे येत. मसाल्याच्या पदार्थांचाही व्यापार फार चालत असे. सुमात्राबेटांतून व मलबाराहून मिर्चे येत. सिंहल द्वीपांतून दालचिनी येई. बोर्निओ बेटांतून कापूर व मोलुकास एथून लवंगा येत. त्यांपैकीं लवंगा तेथून एक- दम एथें येत किंवा मलबारच्या बंदरांत त्यांची विक्री होऊन तेथून येत. या मसाल्याच्या जिनसांचा, अंशतः एथें या प्रांतांतल्या प्रांतांतच, खप होई. कांहीं माल घाटावर जाई व कांहीं पुनः परत इराण आणि आरबस्थान एथें जाई. औषधी जिनसांपैकीं अफू खानदेशांतील बऱ्हाणपूर शहर व एडन बंदर एथून येत असे. रंगाच्या पदार्थांपैकीं बऱ्हाणपूर एथून

नीळ, आरबस्थानांतून मंजिष्ठ, सोकोत्रा बेटांतून घातुकमृगरक्त, ओर्मुझ, एडन, व युरोप खंड एथून हिंगूळ, व आफ्रिकेंतून कपोतविष्टा आणीत. सुवासिक पदार्थांपैकीं गुलाबपाणी ओर्मुझ व एडन एथून येत असे. धातूंपैकीं आफ्रिकेंतील सोफाला व आबिसीनिया या स्थळांहून सोनें आणि युरोपांतून सोन्याच्या विटा व नाणीं येत. रुपें, तांबें. पितळ, व शिसें हे धातु युरोपांतून येत. ओर्मुझ व एडन एथून, आणि केप आफ् गुड् होप भूशिरास वळसा घालून येण्याच्या मार्गानें युरोपांतून, पारा येत असे. लोखंडी व लांकडी सामानापैकीं उतरतीं मेजें आणि हस्तिदंतखचित शिशव्याचीं सपाट मेजें ठाण्यांत तयार होत असत. नकशीदार पडदे, मोठाले आरसे, पितळेच्या व दगडाच्या भावल्या, खणांच्या पेट्या, तसबिरी, उत्तम उत्तम पाणी सांडण्याचीं तस्तें व ताम्हनें हीं भांडीं, पाणी पिण्याचीं गलासें, दुर्बिणी, जडावाच्या मुठींच्या तरवारी, खोगिरें, शिकार करण्याच्या बंदुका, खेळणीं, चाकू, व सुऱ्या हे पदार्थ युरोपांतून इकडे आणीत. सजीव प्राण्यांपैकीं कुत्रे युरोपांतून, घोडे इराणी आखात व आरबस्थानचा किनारा एथून, व हत्ती सिंहलद्वीपांतून आणीत. यात्रेकरूंना इकडून मक्केस नेत व आबिसीनियांतून गुलाम इकडे आणीत.

या पोर्तुगीज लोकांच्या कारकीर्दींत चिनी व्यापारी नाहींतसे झाले व आरबी आणि तुर्की व्यापारी कमी झाले. तसे च कांहीं अंशीं एथील मुसलमान व्यापारीही कमी झाले. हे मुख्य फेरफार या कारकीर्दींत व्यापाऱ्यांच्या संबंधानें झाले. पोर्तुगीज व्यापारी या प्रांतीं या कारकीर्दींत नवीन आले. इंग्रज, डच, फ्रेंच, व डेन्स, या नवीन आलेल्या परकीय व्यापाऱ्यांची देवघेव उत्तर कोंकण प्रांताबरोबर साक्षात् फारशी चालत नसे तरी तेही कधीं कधीं या प्रांतीं या कारकीर्दींत आढळत. इ. स. च्या १६ व्या शतकाच्या आरंभीं चौल एथें व्यापार करणारे, व चौलपासून मलबार किनाऱ्यापर्यंत व्यापार चालविणारे, ' मर ' जातीचे लोक होते. पूर्वींच्या कारकीर्दींप्रमाणेंच या कारकीर्दींतही हिंदुस्थानापासून फार दूरच्या प्रदेशीं हिंदु लोक व्यापाराकरितां जात. तांबड्या समुद्रांतील एका गलबतावर एक हिंदु नाखवा होता. इराणी आखात, मोचा शहर, आफ्रिका खंडांतील बंदरें,

मलाका देश,व सुमात्रा बेटांतील आचीन शहर,या स्थळीं, पोर्टुगीज व डच लोकांना, हिंदु व्यापारी या कारकीर्दीत आढळत असत.

या कारकीर्दींत गलबतें बांधण्याच्या कामाविषयीं ठाणें जिल्ह्याच्या किनाऱ्यावरील स्थळांची मोठी ख्याति होती. इ स. १५५० व १६०० यांच्या दरम्यान,आगाशी व वसई एथें बांधलेलीं मोठमोठीं तारवें, युरोप खंडांत पुष्कळ सफरी करीत. इ. स. १६३४ त इंग्रजांनीं किनाऱ्यावर व्यापार चालविण्याकरितां दमण एथें दोन व वसई एथें दोन अशीं चार गलबतें बांधविलीं होतीं. जे मचवे या कारकीर्दींत कोंकण-प्रांतांतील बंदरांत बांधीत असत त्यांचें वर्णन पोर्टुगीज इतिहासकार ग्यास्पर कोरिया याच्या इतकें सविस्तर दुसरे कोणीं केलेलें नाहीं. तो म्हणतो कीं, साधारण प्रतीचीं जीं गलबतें [मचवे] एथें बांधीत असत तीं दोन प्रकारचीं असत.तक्ते सुंभानें एकमेकांस जोडून तीं तयार करीत हा एक प्रकार व खिळे मारून तक्ते जोडीत हा दुसरा प्रकार. पहिल्या प्रकारच्या गलबतांना कणा असे व दुसऱ्या प्रकारच्या गलबतांचीं बुडें सपाट असत. या शिवाय या दोन प्रकारच्या गलबतांत दुसरा फरक नसे.या गलबतांच्या बाजूंचे तक्ते आंत भरलेल्या मालाच्या उंची इतके उंच असत. या तक्त्यांवर, माशांचें तेल व खोबरेल हीं दोन तेलें शिलाजितांत मिसळून त्या शिलाजितानें मढविलेलें, तरटाहूनही जाड असें,कापड लावीत व त्याच्यावर मजबूत विणकरीच्या वेताच्या हातऱ्या लावलेल्या असत.त्यामुळें समुद्राचें पाणी झिरपून गलबतांत शिरत नसे.आंतल्या बाजूस माल भरण्याकरितां तक्ते मारून मजले केलेले नसत. तर तक्त्यांच्या योगानें कोठड्या केलेल्या असत त्यांच्यावर वाळलेल्या झांपांची छावणी असे.त्यामुळें पावसाचें पाणी बाहेर जाई व मालाची खराबी होत नसे. या झांपांवर वेताच्या हातऱ्या पसरीत.त्यांवरून खलाशी लोक इकडून तिकडे जात असत. तरी त्यापासून खालच्या मालाची खराबी होत नसे वरच्या बाजूस खलाशी लोकांना रहाण्याकरितां जागा केलेली असे. खालच्या बाजूस माल भरलेला असे तेथें कोणाही मनुष्याला जागा मिळत नसे. गलबताच्या एका बाजूस एक मोठी डोलकाठी व दोन शिडे असत.नाळीकडच्या बाजूस एक दोरखंड असे त्याचा डोलकाठीला मोठा आधार असे. वरामाकडेही दोन दोऱ्या असत त्यांच्या योगानें डोलकाठीला स्थिरता येत

असे. परमानांची दोनतृतीयांश लांबी डोलकाठीच्या मागच्या बाजूला असे. एक तृतीयांश पुढच्या बाजूला असे. अवजार डोलकाठीच्या पुढच्या बाजूला जितकें लांब असे त्याच्या तृतीयांशाइतकें तें मागच्या बाजूस अधिक लांब असे. अवजाराला एकच दमान म्ह० दोरी असे. सरासरी डोलकाठीच्या इतकेंच जाडें एक लांकूड नाळीवर असे त्याला हेरे मारण्याची दोरी घट्ट बांधून तें अवजार तें पुढें करीत. त्यामुळें अवजार वांकडें तिकडें न लागतां नीट लागून जिकडून वारा येत असे त्या तिकडे म्हणजे तोंडच्या वाऱ्याकडे गलबत त्यांना चालवितां येत असे. जिला इंग्रजींत टाप मास्ट म्हणतात त्या प्रकारची डोलकाठी या गलबतांवर नसे व एकच मोठें अवजार असे. या गलबतांवरचीं सुकाणें पातळ फळ्यांचीं केलेलीं असून तीं मोठीं असत व गलबतासभोंवतीं गुंडाळलेल्या दोऱ्यांनीं त्यांना गति देत असत. गलबतांचे नांगर कठीण लांकडाचे करीत व ते पाण्यांत बुडून तळाशीं जावे म्हणून त्यांच्या दांड्याला दगड बांधीत. चौरस व उंच अशा टाक्यांत गलबतवाले आपलें प्यावयाचें पाणी ठेवीत.

गुजराथ प्रांतांत जीं गलबतें बांधीत त्यांपैकीं खोल समुद्रांत सफरी करणारीं साधारण प्रतीचीं तारवें १०० पासून १५० *टन पर्यंत ओझें नेत. याखेरीज १६ व्या शतकांत ६०० पासून १००० टन पर्यंत ओझें नेणारीं मोठीं तारवें ही त्या प्रांतीं होतीं. १७ व्या शतकांत सुरत व मोचा यांच्या दरम्यान यात्रेकरूंना नेण्या आणण्याकरितां यांहूनही मोठीं म्हणजे १४०० पासून १६०० टन पर्यंत ओझें नेणारीं तारवें असत त्यांतून १७००पर्यंत उतारू जात.

गोवें एथेंही गलबतें बांधण्याचें काम फार चालत असे. पोर्तुगीज लोकांच्या गलबतांच्या नमुन्यावर विजापूरच्या राजाच्या सुतारांनीं बांधलेलीं गलबतें इ. स. १५०८त पोर्तुगीज लोकांच्या दृष्टीस गोवें एथें पडलीं होतीं. फ्लोर डी ला मार या तारवाच्या नमुन्याप्रमाणें बांधलेलींही मोठमोठीं बारा तारवें इ. स. १५१० त त्यांचे दृष्टीस तेथें पडलीं होतीं.

---

* ८० तोळ्यांचा एक शेर अशा ४० शेरांचा एक मण व अशा २० मणांची एक खंडी मानिल्यास एक टन म्हणजे अशा प्रकारची सुमारें दीड खंडी होते.

बार्थेमा [ १५०० ] ह्या ग्रंथकाराचा असा लेख आढळतो कीं, कालिकोट एथील गलबतें रुंद असून आकारानें मोठया तीन चारशें पिंपा एवढीं असत. त्यांच्या तक्त्यांची कळाशी मोठया कुशलतेनें बसवीत असल्यामुळें त्यांच्या बांधणींत जुन्या दोऱ्यांच्या काथ्याचा उपयोग करावा लागत नसे. त्यांच्या बाहेरच्या बाजूला राळ लावीत असत व लोखंडाच्या खिळ्यांचा उपयोग तीं बांधण्याच्या कामीं भरपूर होत असे. त्यांजवरचीं अवजारें कापसाच्या कापडाचीं करीत व प्रत्येक अवजाराच्या बुडाशीं दुसरें एक शीड असे त्याच्या योगानें खलाशी वारा धरीत असत. ह्या गलबतांचे नांगर दोन दोरखंडांत धोंडे बांधून तयार केलेले असत. अशा प्रकारच्या कालिकोट एथील गलबतापैकीं एक गलबत फार मोठें होतें. त्याजवर १४० टनपर्यंत ओझें जात असे. त्याच्यावर ९२ खलाशी होते. त्यांपैकीं वीसजणांचें काम गमतींतलें पाणी उसपून टाकण्याचें व गलबताच्या खालच्या बाजूस करावीं लागणारीं इतर कामें उरकण्याचें होतें. आठ असामी सुकाणू धरण्याचें काम करीत. चारजण वरच्या बाजूस परमान वगैरेच्या संबंधाचें काम करीत. वीसजण लहान वयाचे मुलगे होते ते जेवण करीत असत. कालिकोटाहून फार मोठालीं गलबतें कारोमांडेल किनाऱ्याकडे व्यापाराकरितां जात असत.

ठाणें जिल्ह्यांतील बंदरीं परदेशांतून पुष्कळ गलबतें, या कारकीर्दींत, येत असत. सोळाव्या शतकाच्या अखेरीस मस्कत एथें गलबतें बांधण्याचा मोठा कारखाना होता. इ. स. १५१० त आल्बूकर्क याला तेथें, दोन फार मोठीं तारवें व लहानमोठया ३४ तारवांचा एक समूह, समुद्रांत लोटण्यास तयार असलेला, आढळला. सतराव्या शतकाच्या अखेरीस इराणी अखातांतील गलबतें ४० पासून ६० टनपर्यंत ओझें नेण्यापुरतीं मोठीं असून तीं काथ्याच्या दोऱ्यांनीं तक्ते जोडून केलेलीं असत व त्यावर काथ्याचीं दोरखंडें ही असत. त्या ठिकाणीं पोर्टुगीज लोकांचा अंमल बसल्यावर तेथील खलाशांच्या धंद्याला मंदी आली. तेथील गलबतांवर नांगर मात्र लोखंडाचा असे. बाकी दुसऱ्या कोणत्याही कामीं त्या धातूचा उपयोग तीं बांधण्याच्या कामीं केलेला नसे. तांबड्या समुद्राच्या लगत्यास बांधलेलीं तारवें मोठीं व चांगलीं बांधलेलीं असून

तीं मोठ्या चतुराईनें खलाशी लोक चालवीत असत. सोळाव्या शतकाच्या आरंभीं जावा बेट व मलाका देश एथून मोठमोठीं तारवें कारोमांडेल व मलबार या दोन किनाऱ्यांवर येत असत. त्यांतून कांहीं तारवें कधीं कधीं चौलपर्यंतही येत असत.

पोर्तुगाल देशांतील गलबतांच्या धरतीवर या प्रांतीं गलबतें बांधूं लागले हा एथील गलबतांच्या बांधणींत मुख्य फेरफार या कारकीर्दींत झाला. हीं नव्या तऱ्हेचीं गलबतें पाहिल्याबरोबर अंजिदीव (अंजनद्वीप) एथील लोकांना फार आश्चर्य वाटलें. कारण त्यांनीं अशा प्रकारचीं तारवें कधीं पाहिलेलीं नव्हतीं. वास्को डा गामा [ इ. स. १४९७—१५००] याच्याबरोबर जें आरमार प्रथम इकडे आलें त्यांतील गलबतांवर ५० पासून २०० टन पर्यंत ओझें जात असे. पुढें ६०० पासून ७०० टनपर्यंत ओझें जाण्यासारखीं मोठीं तारवें बांधूं लगल्यामुळें बाहेरच्या देशांशीं चालणारा व्यापार एक दोन मुख्य बंदरीं मात्र चालूं लागला. लहान लहान गलबतेंही पोर्तुगीज लोकांजवळ असत. सतराव्या शतकाच्या अखेरीच्या पूर्वींच युरोपांतील लोक मोठमोठीं गलबतें बांधूं लागले होते. १६०० टन ओझें ज्यांत जाईल इतकीं मोठीं गलबतें पोर्तुगीज लोकांजवळ १५९०तच होतीं. १६०२ त डच लोकांजवळ १००० टन ओझें मावण्यासारखीं तारवें होतीं. १६१५त १२९३ टन ओझें मावण्यासारखें एक इंग्लंडांतील शिबाड होतें. या काळच्या गलबतांवर हिंदु तांडेल व हिंदु खलाशी असत, तरी आरब व हबशी हे उत्तम खलाशांत गणले जात. या कारकीर्दींत नौकानयनशास्त्रांत लोक फार हुशार झाले होते. मोझांबिक एथील मुसलमान [ १४९८ ] जिनोआ एथील होके, तुरीय यंत्रें, व समुद्राचे नकाशे, यांचा उपयोग गलबत चालविण्याच्या कामीं करूं लागले होते. मूर जातीचे लोक गलबतें चालविण्याच्या कामांत इतके तरबेज झाले होते कीं, ते पोर्तुगीज लोकांना त्या कामीं हार जात नसत. अजूनही चांचे लोकांपासून व्यापाराला उपद्रव होत असे. तरी ते चांचे पूर्वींच्या १५व्या शतकांतील किंवा पुढील सतराव्या शतकांतील चांच्यांच्या इतके भयंकर नव्हते. पोर्तुगीज लोकांनीं या चांच्यांचा चांगला

बंदोबस्त करण्यापूर्वीं मुंबई, गोवें, व कालिकोट किनाऱ्यावरचें पोर्क
बंदर हीं त्यांचीं केवळ माहेरघरेंच होऊन राहिलेलीं होतीं.
इ. स. १६६४ च्या नवंबर महिन्यांत, मुंबई बेट, पोर्टुगीज लो-
कांच्या हातीं होतें तें, इंग्रजांच्या हातीं आलें. कोंकण प्रांताच्या किना-
ऱ्यावर आपणांस एक स्थल मिळावें अशी इंग्रजांची फार दिवसांपासून
इच्छा होती.इ.स.१६२५त इंग्रजांच्या ईस्ट इंडिया कंपनीच्या डिरेक्टरांनीं
मुंबई घेण्याचा विचार मनांत आणिला,व तदनुरूप,इ.स.१६२६त, 'तुम्ही
व आम्ही मिळून मुंबई एथें ठाणें धरूं या' असें सुरत एथील इंग्रजांच्या
प्रेसिडेंटानें डच लोकांस सुचविलें. परंतु डच लोक तें काम पतकरीतना
ह्मणून तें तसेंच राहिलें. इ. स. १६४० त सुरत एथील कौन्सिलानें,
हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर मुंबई हें उत्तम स्थल आहे असें,
व इ. स. १६५२ त मुंबई व वसई हीं दोन स्थळें पोर्टुगीज
लोकांपासून विकत घ्यावीं असें, वरिष्ठ अधिकाऱ्यांस सूचविलें.
इ. स. १६५४ त कंपनीनें क्रॉमवेल ह्याला एक मानपत्र
दिलें, त्यांत हिंदुस्थानांत मुंबई व वसई हीं दोन स्थळें वसाहात करण्यास
उत्तम आहेत असें, सुचविलें होतें. हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर,
दंडा राजपुरी,मुंबई,किंवा वेसावें,या सोईवार स्थलांपैकीं कोणतें तरी एक
स्थल आपणास देण्याविषयीं पोर्टुगालच्या राजाला विनंति करावी,अशी
सूचना,इ.स.१६५९त,सुरत एथील कौन्सिलानें कंपनीला केली.अखेरीस,
इ. स. १६६१ त, दिसेंबरच्या ७ व्या तारखेस, सुरत एथील प्रेसिडें-
टानें डिरेक्टरांना असें पत्र लिहिलें कीं,ज्याच्या योगानें मोंगल व शिवाजी
राजा यांच्यापासून कंपनीच्या नौकरांना उपद्रव न पोंचेल, व दिमाख
मिरविणाऱ्या डच लोकांवर त्यांना स्वरक्षणार्थ अवलंबून राहावें लागणार नाहीं,
असें एकादें स्थल आपणांस प्राप्त न झालें तर,कंपनीची मालमत्ता व नौकर
लोक यांना संकटावस्थेंत एथें ठेवण्यापेक्षां इंग्लंडांत परत नेणें बरें.मुंबईबेट
मिळाल्याबद्दल इंग्लंडांतून जें पत्र इकडे येण्याकरितां रवाना झालें होतें
त्याची व डिरेक्टरांकडून गेलेल्या वरील पत्राची गांठ बहुधा वाटेंत पडली
असावी.मुंबई हें उत्तम बंदर आहे असें समजून तें त्या वेळचे इंग्रज लोक
प्राप्त होण्याची इच्छा करीत असत असें नाहीं.तर तें स्थल एकीकडे अस.

त्यामुळें त्यांना विशेष प्रिय झालें होतें. या काळीं व पुढेंहीं पुष्कळ वर्षेंपर्यंत मुंबई बंदर हें फारच (फाजील) मोठें आहे असें पुष्कळांना वाटत असे. कारवाड बंदर लहान असल्यामुळें तें पश्चिम किनाऱ्याचें मुख्य स्थल होण्यास योग्य नाहीं, या आक्षेपाचें निरसन करितांना, क्यापटन टेलर यांनीं, इ. स. १८५७त, जुलैच्या २७व्या तारखेच्या आपल्या पत्रांत, असें लिहिलें आहे कीं, मुंबई बंदर नैऋत्येस फार उघडें आहे तें तसें नसतें, व त्याचा विस्तार ईशान्येकडे ८ मैलांइतका मोठा नसता, तर तें उत्तम बंदर मानलें गेलें असतें, असें, इ. स. १८३७ व १८५४ या सालांतील वादळांवरून चांगलें दिसून आलेलें आहे. असो. पोर्टुगाल देशाच्या राजानें आपली बहीण क्याथराइन हिचें इंग्लंडच्या राजाशीं लग्न केलें तेव्हां, तिला जें आंदण दिलें, यांत मुंबईबेट व बंदर हीं त्यानें, १६६१ च्या जून मध्यें, इंग्लिशांस दिलीं. साष्टी व इतर त्या बंदरालगतचीं बेटें यांचा ही या देणगींत समावेश झाला आहे असा इंग्रजांचा त्या वेळीं समज होता. इ. स. १६६२ च्या मार्च महिन्यांत, पांच मन्वारांचें एक आरमार, इंग्लंडाहून मुंबईस येण्याकरितां निघालें. त्या आरमाराचा मुख्य अधिकारी मार्लबरोचा अर्ल होता. त्याच्या बरोबर सर आब्राहाम शिपूमन व ४०० लोक होते. पोर्टुगीज लोकांच्या राजाचा प्रतिनिधिही त्यांच्या बरोबर होता. या आरमारांतील कांहीं तारवें मुंबईस सप्टेंबरांत पोंचलीं व कांहीं आक्टोबरांत पोंचलीं. नंतर 'मुंबई व साष्टी हीं बेटें आमच्या स्वाधीन करा' असें मुंबई एथील पोर्टुगीज गव्हर्नरास त्या इंग्लिश आरमारवाल्यांनीं सांगितलें. तेव्हां तो म्हणाला कीं, फक्त मुंबईबेटमात्र तुम्हांस पोर्टुगालच्या राजानें दिलें आहे. तरी ज्या दस्तैवजाच्या आधारानें तुम्ही तें मजपाशीं मागत आहां त्यांत कांहीं दोष आहे. तो नाहींसा होईपर्यंत हें बेटही मी तुम्हांस देत नाहीं. तसेंच या कामांत मी हात घालीत नाहीं असें पोर्टुगीज लोकांच्या राजाच्या प्रतिनिधीनें त्यांस सांगितलें. त्यामुळें सर आब्राहाम शिपूमन ह्याला प्रथम तापीनदीच्या मुखाजवळ सुवाली एथें, व नंतर कारवाडच्या किनाऱ्याजवळच्या आंजिदीव नांवाच्या लहानशा बेटाजवळ, जाऊन स्वस्थ बसणें भाग पडलें. त्या ठिकाणीं कोंडलें गेल्यामुळें, व जवळ अन्नसामुग्रीचा सांठा बेताचाच असल्यामुळें, तेथें

दोन वर्षेपर्यंत त्या आरमाराला राहावें लागलें. तितक्या मुदतींत त्या आरमाराचा मुख्य अधिकारी व त्यावरील ४००लोकांपैकीं ३००लोक मेले. सर आब्राहाम शिप्मन याच्या जागीं मि. हंफ्री कुक याची नेमणूक झाली होती. त्यानें, बाकी राहिलेल्या लोकांचें रक्षण व्हावें ह्मणून, इ. स. १६६४ च्या नवंबरांत, फक्त मुंबईबेटच स्वीकारण्याचें व त्यांत राहणाऱ्या पोर्टुगीज लोकांना विशेष हक्क देण्याचें, कबूल केलें. नंतर, इ. स. १६६५ च्या फेब्रुवारी महिन्यांत, जेव्हां मुंबईबेट इंग्लिशांच्या स्वाधीन पोर्टुगीज लोकांनीं केलें तेव्हां, फक्त ११९ इंग्रज लोक मात्र शिल्लक राहिले होते ते तारवां-वरून मुंबईबेटांत उतरले. त्यावेळीं ह्या बेटांत लोकवस्ती १०,०००होती व त्याचा वसूल २८,००० रुपये येत होता.

डच लोकांच्या सत्तेच्या वृद्धीला उभयतांनीं एकमतानें प्रतिबंध करावा, हा, मुंबईबेट व त्याच्या लगतचा मुलूख पोर्टुगाल देशानें इंग्लंडास दिला, या कृत्याच्या अनेक हेतूंपैकीं एक हेतु होता. कारण, या दोन देशांमध्यें अति निकट स्नेह असणें, हाच एक उभयतांच्या रक्षणाचा उपाय शिल्लक राहिलेला होता. इ. स. १६५६ त डच लोकांनीं पोर्टुगीज लोकांना सिंहलद्वीपांतून हाकून दिलें होतें. ब्यांटम् एथें इंग्लिश लोकांना व गोवें एथें पोर्टुगीज लोकांना, त्यांनीं वेढा घातला होता, व गोवें एथील पोर्टुगीज लोकांना, बाहेरून दाणापाणी मिळणार नाहीं अशा रीतीनें, त्यांनीं कोंडून टाकिलें होतें. या प्रसंगीं, डच लोकांच्या हातीं गोवें पडलें कीं त्याच्या मागून दीव त्यांच्या हातीं पडावयाचेंच, व दीव हस्तगत झालें कीं इंग्लिशकंपनीला गाशा गुंडाळावा लागावयाचाच, अशी स्थिति येऊन ठेपली होती. युरोपांतील पोर्टुगीज लोक व हिंदुस्थानांतील पोर्टुगीज लोक या उभयतांमधील संबंध शिथिल झालेला असल्यामुळें, मुंबई-बेट पोर्टुगाल देशानें इंग्लंडास ज्या हेतूनें दिलें होतें तो हेतु विफल झाला. पोर्टुगाल देशच्या राजानें मुंबई इंग्रजांस दिली हें एथील पोर्टुगीज लोकांना आवडलें नाहीं. ह्मणून त्यांनीं राजाची आज्ञा मानिली नाहीं. तेव्हां त्याला अतिशय चमत्कार वाटला व वाईटही वाटलें. तरी ते शुद्धीवर आले नाहींत. त्यामुळें मुंबई इंग्लिशांस देण्यापूर्वी पोर्टुगाल व इंग्लंड या उभयतांमध्यें स्पर्धा होती ती तें बेट दिल्यावर नाहींशी होऊन, उभय-

मराठी

त्यांमध्यें स्नेहभाव उत्पन्न व्हावा तो न होतां उलट वैमनस्य उत्पन्न झालें. या बेटाच्या लगतच्या ज्या मुलखापासून अन्नसामुग्री व वसूल यांचा पुरवठा व्हावयाचा, तो न मिळतां, नुसतें बेट मात्र मिळाल्यानें, त्याच्या व्यवस्थेस लागणारा खर्च जबर वाटूं लागला. तसेंच व्यापाराच्या संबंधानें हें बेट जरी फार महत्वाचें होतें, तरी डच लोकांबरोबर लढण्याच्या कामीं त्याच्यापासून इंग्लिशांस कांहीं कुमक होण्यासारखी नव्हती. असो. इंग्लंडच्या राजानें कंपनीची विनंति मान्य करून तिला सदहू मुंबईबेट, व्यापाराच्या उपयोगी पडावें ह्मणून, दिलें. हें बेट आनरेबल कंपनीला दिल्याची सनद, कानस्टांटिनोपल नांवाच्या तारवावरून, सुरत एथें, १६६८ त, सपटंबरच्या पहिल्या तारखेस, येऊन पोंचली. पोर्टुगालच्या राजानें इंग्लंडच्या राजाला हें बेट मोठ्या उदारवृत्तीनें दिलें होतें त्याप्रमाणेंच, इंग्लंडच्या राजानें कंपनीला तें दिलें. कंपनीनें दरसाल राजाला त्याबद्दल पौंड नांवाचीं सोन्याचीं दहा नाणीं देत जावें असें ठरलें होतें. हें बेट देतेसमयीं त्यांत जो धान्याचा वगैरे साठा होता तो, शस्त्रें, व दारूगोळाही, देण्यांत आला होता. या बेटाचें रक्षण करण्याकरितां, व याजवर अंमल चालविण्याकरितां, राजाधिकाराच्या जितक्या अंशाची गरज होती तितका अधिकारही राजानें कंपनीला दिला. मध्यंतरीं गेलेल्या तीन वर्षांच्या मुदतींत [१६६५–१६६८] या बेटाचें उत्पन्न ३०००० हजार रुपयांपासून ६५००० रुपयांपर्यंत वाढलें होतें.

इंग्लिश वखारवाल्यांना प्रथमतः हें नवें प्राप्त झालेलें स्थल इतकें भिकार आहे असें वाटलें कीं, त्यांनीं आपली वखार एथून काढून जंजिऱ्यास न्यावी, असें, १६६८ त, सुरत एथील कौन्सिलास सुचविलें. तथापि, पुढें लवकरच, त्यांच्या लक्षांत या बेटाचें महत्व येऊं लागलें. जिराल्ड आंजियर या शहाण्या पुरुषाच्या हातीं या बेटाची व्यवस्था होती तेव्हां, आठ वर्षांच्या मुदतींत [१६६९–१६७७], या बेटाचें उत्पन्न ६५,००० पासून ९२,६०० रुपयांपर्यंत वाढलें, व लोकसंख्या १०,००० पासून ६०,००० पर्यंत

वाढली. तेथील लढाऊ लोकही ४०० युरोपियन, व जेम्स लायेल तेव्हां लढाईचें काम पतकरणारे १५०० नेटिव, इतक्या संख्येपर्यंत वाढले.

जो लेंचार्फचा सरकारी बंगला (गव्हरमेंट हौस), पोर्टुगीज लोकांच्या कारकीर्दींत, तेथील सुंदर बागेविषयीं मात्र प्रसिद्ध होता, त्यांत तोफा ठेविलेल्या आहेत, व तटबंदीच्या योगानें त्याची मजबुती होऊन, तिजवर मोठ्या दक्षतेनें पहारेकरी आपलें काम करीत आहेत, असें, इ. स १६७४ त, फ्रायर नांवाच्या मुशाफराच्या दृष्टीस पडलें. या सरकारी बंगल्याच्या तटाच्या बाहेरच्या बाजूला इंग्रजांची प्रेतें पुरण्याची जागा होती, व शेतें होतीं तेथें गाईम्हशी चरत असत. कोटापासून जवळच मुंबई शहर होतें, तेथें इंग्रज, पोर्टुगीज, टोपाशी, मूर, व ख्रिस्ती झालेले कोळी, हे राहात. त्यांचीं घरें वेगळीं वेगळीं नसून मिसळलेलीं होतीं. त्या वेळीं या शहराची लांबी एक मैल होती. त्यांतील घरें ठेंगणीं असून तीं झांपांनीं शिवीत असत. त्या घरांपैकीं बहुतेक घरें पोर्टुगीज लोकांनीं सोडून दिलेल्या घरांपैकीं होतीं व कांहीं कंपनीनें बांधिलेलीं होतीं. एथें बराच चांगला बाजार होता. या बाजाराच्या कोटाजवळच्या टोंकाला एक पोर्टुगीज लोकांचा चांगला बंगला व देऊळ होतें आणि या देशांत उत्पन्न होणाऱ्या फळांचे दोन बाग होते.

तेथून पलीकडे, एक मैलाच्या अंतरावर, बंदरावर कोळी लोकांच्या वस्तीचें मोठें शहर होतें. तेथें एक पोर्टुगीज देऊळ व धर्मसंबंधाचें घर होतें. त्याच्या पलीकडे परळ एथें आणखी एक पोर्टुगीज देऊळ असून जेजुइट उपदेशकांचे जमीनजुमले होते. माहीम एथें पोर्टुगीज लोकांचें सर्व साधनांनीं परिपूर्ण असें एक देऊळ व बंगला होता; इंग्रजांची एक मांडवी व पाहरेकऱ्यांची चौकी होती; व मूर लोकांचें थडगें होतें. या बेटाच्या उत्तरेकडच्या व वायव्येकडच्या भागांत माड, फणस, व आंबे हीं झाडें होतीं. मध्यभागीं वर्ली एथें इंग्रजांचा चौकीपाहारा असे. वाळुकेश्वराच्या डोंगरावर दाट रान असून, त्याच्या समुद्राकडच्या उतरणीवर, एका जुन्या मोठ्या हिंदु देवळाचे अवशिष्ट राहिलेले अंश होते. बेटाच्या बाकी राहिलेल्या भागापैकीं ४०,००० एकर जमीन चांगली होण्यासारखी असूनही ती खाजणाच्या दलदलीसारखी पड

पडलेली होती. कामाठीपुऱ्यांत हो ड्यातरण्यापुरतें पाणी असे. यावेळीं, हल्लीं जे भेंडीबाझार आहे. तेथें, भरतीचें खारें पाणी येत असे, व तें मुंबादेवीपर्यंत जात असे. पण्णहीं एकदा भरतीच्या वेळीं मुंबई अनेक बेटांनीं व्यापिलेल्या समुद्रासारखी दिसे, व उधाणाचें पाणी ज्या दिवशीं येई त्या दिवशीं, ओसाड डोंगरांखेरीज बाकीचीं सर्व बेटें पाण्यांत बुडून जात.

इ. स. १६७७पासून दाहा वर्षेपर्यंत मुंबईची भरभराटच होत गेली. परंतु पुढील वीस वर्षांच्या मुदतींत [इ. स. १६८८—१७१०] ती निकृष्ट स्थितीस येऊन पोंचली. नंतर लंडनची कंपनी व इंग्लंडची कंपनी या दोघींचा संयोग झाल्यावर, हळू हळू परंतु चिरस्थायी, अशी मुंबईची भरभराट होऊं लागली. तथापि आणखी ५० वर्षे जात पर्यंत इंग्रजांनीं जास्ती मुलुख घेतला नाहीं, आणि मोंगल, मराठे, सिद्दी, आंग्रे, व पोर्टुगीज यांच्या मध्यें चालू असलेल्या तंटयाबखेड्यांत तें पडले नाहींत. समुद्रावर मात्र त्यांना भांडणांत पडावें लागत असे.

**तिसरा भाग समाप्त.**

[library stamp]

## भाग ४ था

## मराठ्यांची कारकीर्द.

### इ. स. १६७०—१८००

इ. स. १६६६ च्या अखेरीस, दिल्ली एथून सुटल्यावर, शिवाजीनें, ठाणें जिल्ह्याच्या आग्नेय भागांतील बहुतेक मुलखांतून, मोंगलांना हाकून दिलें. तरी कर्नाळा व माहुली हे दोन मोठे डोंगरी किल्ले त्यांनीं सोडिले नव्हते. पुढें उभयतांचें तुंबळ युद्ध होऊन, १६७० त, तेही त्यांच्या हातचे गेले. याच वर्षीं पोर्टुगीज लोकांनीं शिवाजीचा समुद्रावर पराभव केला. तथापि, जमिनीवर तो त्यांच्या मुलखाजवळ इतका येऊन भिडला कीं, तेणेंकरून ते फार घाबरून गेले, व त्यानें ठाणें जिल्ह्याच्या ईशान्य भागांतील पुष्कळ किल्ले घेऊन, साष्टी बेटांतील घोडबंदर गांवावर हल्लाही केला. ही शिवाजीची आपल्या मुलखाकडे झालेली चाल दृष्टीस पडली तेव्हां, इंग्रजांनीं आपला एक वकील त्याच्याकडे पाठविला. त्याच्या मार्फत, त्यांच्याशीं दोस्ती ठेवण्याची व त्यांच्या मुलखास धका न लावण्याची, त्यानें आपली कबुली त्यांस कळविली. इ. स. १६६२ त जंजिऱ्याचा शिद्दी याला मोंगलांनीं आपल्या आरमाराचा नाईक नेमिल्यामुळें, त्याचें प्रस्थ वाढत चाललें. पुढें त्यानें, १६७२ त, करंज्याच्या खाडीच्या नरतांत एक किल्ला बांधून, गलबतें आंत शिरण्याची वाट बंद केली. त्याच वर्षाच्या आक्टोबर महिन्यांत, शिद्दी व मोंगल यांनीं, तारवांतून कांहीं फौज या जिल्ह्यांत पाठविली. ती नागोठण्याच्या खाडीच्या किनाऱ्यावर तारवांतून खालीं जमीनीवर उतरली. नंतर तिनें आसपासचा मुलूख उद्ध्वस्त करून कांहीं लोक गुलाम करून नेले.

इ.स.१६७३च्या फेब्रुआरी महिन्यांत, एक आरमार बरोबर घेऊन, डच लोकांचा गव्हरनर जनरल मुंबईस आला. तेव्हां तेथील इंग्रज लोक फारच घाबरून पोर्टुगीज लोकांच्या मुलखांत पळून गेले. परंतु तेथील गव्हरनर जिराल्ड आंजियर यानें कोटाच्या तटांची चांगली मजबुदी केलेली होती, आणि हवे त्या वेळीं लढाईच्या कामीं उपयोगी पडण्याकरितां तयार

केलेल्या शहरकरी लोकांची संख्या फार वाढविलेली होती, त्या काहीं वेळ मुंबईबंदराच्या तोंडाशीं राहिल्यावर ते डच लोक हल्ला करितां परत गेले. या डच लोकांखेरीज मुंबईच्या लोकांना उपद्रव देणारे शिद्दी लोक होते. इ. स. १६७२ पासून १६८० पर्यंत प्रतिवर्षीं, बरसातीच्या दिवसांत, शिद्दी लोक मुंबईबेटांत येऊन राहात. ते कधीं कधीं परवानगी घेऊन तेथें राहवयास येत व कधीं कधीं परवानगी न घेतां तसेच येत असत. इ. स. १६७४ त, त्या बेटाच्या ईशान्य भागांतील शींव नांवाच्या किल्ल्यांत राहणाऱ्या लोकांना, त्यांनीं फार उपद्रव दिला. तेव्हां इंग्रजांच्या फौजेनें त्यांच्यावर हल्ला केला. नंतर असा करार करण्यांत आला कीं शिद्दी याचे ३०० हून अधिक लोक एकाच वेळीं मुंबईच्या किनाऱ्यावर राहूं नयेत, व तरवारीखेरीज दुसरें शस्त्र त्यांच्यापैकीं कोणापाशीं ही असूं नये. ह्या शिद्दी लोकांच्या संबंधानें इंग्रज लोकांना नेहमीं मोठी पंचाईत पडत असे. त्यांना मुंबई बेटांत राहूं दिलें तर शिवाजीला राग येई व त्याच्या मनांत इंग्रजांविषयीं संशय उत्पन्न होई. बरें शिद्द्यांना मुंबईंत येऊं न दिलें तर मोंगलांची मर्जी खप्पा होई.

कुलाबा जिल्ह्याच्या दक्षिण भागांत महाड ह्मणून शहर आहे. त्याच्या जवळच्या रायगड किल्ल्यांत, इ. स. १६७४ त, शिवाजीला राज्याभिषेक झाला. त्या वेळीं मुंबईसरकारानें एक वकील त्याच्याकडे पाठविला होता. त्याला, शिवाजी इंग्रजांशीं दोस्तीनें वागण्यास तयार आहे, असें आढळून आलें. आपल्या मुलखांतील पाहिजे त्या बंदरीं व्यापार करण्याची त्यानें त्यांस परवानगी दिली. फक्त त्यांनीं दर शेंकडा अडीच टक्के जकात मुलखांत माल आणतांना देत जावी एवढी अट त्यानें ठेविली होती. रत्नागिरि जिल्ह्यांतील राजापूर व दाभोळ या गांवीं, कुलाबा जिल्ह्यांतील चौल या गांवीं, व ठाणें जिल्ह्यांतील कल्याण या गांवीं, वखारी घालण्याचीही परवानगी त्यानें त्यांस दिली. रत्नागिरि जिल्ह्यांतील राजापूर गांव त्यानें लुटलें त्या वेळीं जें त्यांचें नुकसान झालें होतें त्याचा कांहीं हिस्सा भरून देण्याची तजवीजही त्यानें केली. ह्याच वर्षीं [ १६७४ ] मराठ्यांचा सेनापति मोरोपंत यानें कल्याण एथें

। करून पोर्तुगीज लोकांजवळ वसई प्रांताबद्दल चौथाईचें मागणें होतें।

१६८. इ. स. १६७३ पासून १६७५ पर्यंत या प्रांताची जी स्थिति होती तिचें चित्तवेधक वर्णन फ्रायर या मुशाफरानें केलें आहे. तो म्हणतो कीं, जिराल्ड आंजियर या महान् इंग्रज पुरुषाच्या कारकीर्दींत इंग्रज लोक आरमाराची स्थापना करीत होते, मुंबईला तट बांधीत होते, अव्यवस्था मोडून बंदोबस्त करीत होते, व व्यापारी आणि तारवेंवाले यांना आश्रय मिळण्यास तें बेट उपयोगी पडेल असें करीत होते. परंतु तेथें व्यापार थोडा चालत असे व तेथील हवा प्राणहानिकारक होती. साष्टी बेट व वसई प्रांत यांत राहणाऱ्या पोर्तुगीज लोकांनीं धैर्य सोडून बांगड्या भरल्या होत्या. त्यांच्या हातीं असलेल्या जमिनी कोणी हिसकावून घेत नव्हते याचें कारण इतकेंच कीं, ते त्या पोर्तुगीज लोकांपेक्षांही अधिक बलहीन होते. असें होतें तरी साष्टी बेट मातबर होतें. त्यांतील गांवें व छोटेखानी बंगले रमणीय होते. तेथील जमीन स्वभावत:च चांगली होती किंवा शेतकऱ्यांच्या मेहनतीनें ती तशी झाली होती. कोबी, मुळे, फळफळावळ, उत्तम कलिंगणें, व स्वादिष्ट कांदे तींत होत असत. साष्टी बेटांतून अन्नसामुग्रीचा पुरवठा शेजारच्या मुलखांत मात्र होत असे असें नाहीं, तर गोव्यांस सुद्धां, ती एथून जात असे. ठाण्यापासून वसई पर्यंत खाडीच्या कांठावर दर अर्धमैलावर एकेक उत्तम छोटेखानी हवेली होती. वांद्रें एथें जेजुइट पंथाचे लोक एका मोठ्या विद्यालयांत मोठ्या डामडौलानें राहात. सगळ्या साष्टीबेटभर खेडे गांवांतून ख्रिस्ती देवळें पसरलेलीं होतीं व ठाणें आणि वांद्रें हीं बरींच मोठीं शहरें बनलीं होतीं. वसई तर फारच मोठें शहर असून त्यांत साहा ख्रिस्ती देवळें, चार मठ, व दोन विद्यालयें होतीं. खेरीज तेथें मोठ्या भव्य इमारती होत्या त्यांना सज्जे व मोठमोठ्या खिडक्या होत्या. तेथील जमीन सपाट असून तींत ऊंस, तांदूळ, व इतर धान्य पिकत असे. मस्कत एथील आरबांनीं एथील जमीन नुकीच उद्ध्वस्त केलेली होती. ते पोर्तुगीज लोकांचीं गांवें जाळीत, त्यांच्यांतील बऱ्या लोकांना गुलाम करून घेऊन जात, त्यांच्या धर्मोपदेशकांचीं डोकीं कापीत, व त्यांचीं देवळें लुटीत.

तरी पोर्टुगीज लोकांकडून त्यांना यत्किंचितही प्रतिबंध होत नसे. प्रति वर्षी पोर्टुगीज लोक एक जंगी आरमार बंदोबस्ताकरितां समुद्रांत ठेवीत असत. परंतु तें निघून जातांच आरब गलबतांतून जमिनीवर उतरत व मुलखाची नासाडी करीत.

इ. स. १६७५ त, एप्रिल महिन्यांत, फ्रायर हा मुशाफर, पुणें जिल्ह्यांतील जुन्नर गांवीं जात असतांना, कल्याणच्या खाडीच्या दोन्ही बाजूंवर पोर्टुगीज लोकांचीं भव्य गावें व त्यांच्या बडे लोकांच्या हवेल्या त्यास आढळल्या. कल्याणपासून एक मैलपर्यंत मजल झाल्यावर पुढलीं, उजवे कांठावरचीं, गांवें शिवाजीकडे होतीं. त्यांची मात्र इतकी भरभराट नव्हती. कल्याण शहराची नासाडी प्रथमतः पोर्टुगीज लोकांनीं केली होती. नंतर मोंगलांनीं केली. पुढें शिवाजीनें केली. व फ्रायर हा मुशाफरीस निघण्याच्या पूर्वीं पुनरपि मोंगलांनीं नुकतेंच तें शहर जाळून टाकिलें होतें त्याच्या ज्वाला अजून पुऱ्या विझाल्या नव्हत्या. या प्रमाणें त्या शहरावर वारंवार प्रसंग गुदरल्यामुळें त्यांतील घरें भिकार खोंपटांसारखीं होतीं व लोक अगदीं कंगाल झालेले होते. तेथून नापिक व खरखीत जमिनीवरून पूर्वेस सात मैल गेलें ह्मणजे टिटवाळें गांव लागे. त्याचीही कल्याणाप्रमाणेंच नुकतीच जळून राख झालेली होती. मोंगल लोक या प्रांतांत धुमाळी करीत असतांना वाटेंत गांवें, चारा, व दाणा जाळून खाक करीत, गुरें नेत, बायकापोरांना गुलाम करून घेऊन जात, आणि पळपुटे लोकांना लपण्यास आश्रय मिळूं नये ह्मणून रान जाळीत. पुढें कांहीं मजलपर्यंत फ्रायर याला वाटेंत बरा मुलूख लागला. त्यांतील जमीन लागवड करण्यासारखी होती व त्यांतील रानापैकीं कांहीं रानें दोनदोन तीनतीन मैलपर्यंत एकसारखीं जळत होतीं. फ्रायरचा पुढचा मुकाम मुरबाड एथें झाला. तेथील लोकांजवळ खावयाचे पदार्थ मुळींच नव्हते. तेथून पुष्कळ खेडीं दिसत होतीं व लोकांना पैशाचा लोभही होता तरी, फार शोध केल्यावर, मोठ्या खटपटीनें, एक कोंबडें फ्रायर याला मिळालें. तेथील सगळ्या जमिनीची नांगरणी व पेरणी झालेली होती. परंतु शिवाजीनें पीक लुटून नेलें होतें. त्यामुळें शेतकऱ्यांजवळ आपला जीव जगवण्यापुरतें सुद्धां अन्न नव्हतें. मुरबाडापासून पुढचा फ्रायरचा रस्ता डोंगराळ जमिनींतून होता. तो चांगला

होता तरी त्याच्या सभोंवतालचीं कुरणें जळालेलीं होतीं. पुढें कांहीं मैलपर्यंत, जींत उत्तम गवत उगवलेलें होतें, अशा जमिनींतून तो गेला. तींत ओढे व उत्तम गवर खिंडी होतीं. पुढें डोंगराच्या पायथ्याशीं देहीर गांव त्याला लागलें. हें बहुधा धसई गांव असावें. या गांवांत शिवाजीची शिबंदी व उत्तम घोड्यांची एक पागा होती. एथील सर्व लोक हत्यारबंद होते. ते आपल्या नायकांना गांवाबाहेर जाऊं देत नसत. या गांवांत भिकार लोकांची फार दाटी झालेली होती. शिबंदीच्या लोकांचे कपडे फाटके तुटके होते व त्यांचीं हत्यारें पाहिलीं ह्मणजे पाहाणाराला त्यांचें भय न वाटतां उलटें हसूं येत असे.

जुन्नराहून फ्रायर हा नाणेघाटानें मुरबाड व बाफटी या गांवांवरून परत आला [ ता. २४ मे ]. बाफटी हें कल्याणचा ईशान्येस तीन मैलांवर असणारें बार्वी हें गांव असावें. पूर्वीं तो ज्या मार्गानें जुन्नरास गेला त्या मार्गावरील लोकांपेक्षां या मार्गावरील लोक फारच हाल काढीत आहेत असें त्याला आढळलें. त्याच्या मेण्याच्या भोयांना खावयास कांहीं विकत मिळेना. कारण लोक त्रासाच्या योगानें भांबावून गेलेले होते. त्यांचा आपल्या लोकांवर व परक्या लोकांवर इतबार नाहींसा झाला होता. ते कोणी अनोळखी मनुष्य दृष्टीस पडला ह्मणजे रानटी माणसांप्रमाणें झाडींत व डोंगरांवरच्या रानांत जाऊन राहात. बाफटी एथील कुणबी मधाच्या पोळ्यांसारख्या खोपटांत राहात व सागाच्या रुंद पानांचें त्या खोपटांवर आच्छादन घालीत. रानांतल्या हिंस्त्र पशूंपासून आपल्या गुरांचें रक्षण करण्याचें सामर्थ्य त्यांच्या आंगीं नव्हतें. घोडे व बैल त्यांच्या भक्ष्यस्थानीं पडूं नयेत ह्मणून त्यांना निरंतर आगच्या जवळ ठेवाव्या लागत. त्याप्रमाणेंच पहारेकरीही एकसारखे जागत बसत असत. वाघांचें डुरकणें, कोल्ह्यांची कुई, व लांडग्यांचें ओरडणें, यांच्या योगानें त्या पहारेकऱ्यांचें जबाब देणें परस्परांस ऐकूं येण्याची मारामार पडे. फार त्रास पावल्यामुळें कुणब्यांना जमीन नांगरण्याचा धीर होत नसे. कारण आपण पेरलेल्या धान्याचें पीक आपले हातीं लागेलच अशी त्यांस खातरी वाटत नसे. ते आपल्या घरांत न राहतां रानांत व गुहांत लपून राहात. या कुणब्यांचीं दुःखें डोळ्यांपुढें मूर्तिमंत असल्यामुळें फ्रायरचा मेणा

नेणारे भोई, आम्ही इंग्रजी अमलांत मोठे सुखी आहों, असे उद्गार तोंडांतून वारंवार काढीत.

इ. स. १६७३ पासून १६७७ पर्यंत इंग्लिश लोक व पोर्टुगीज लोक यांचीं मनें परस्परांविषयीं शुद्ध नव्हतीं. मलबारचें एक तारूं मुंबई बंदरांत आश्रयास येऊन राहिलें होतें. तें पोर्टुगीज लोकांच्या स्वाधीन करण्याचें तेथील डेप्युटी गव्हर्नरानें नाकबूल केल्यामुळें त्यांना फार राग आला. तेव्हां त्यांचा सेनापति बाराशें लोक बरोबर घेऊन मुंबईवर आला. परंतु ह्या बलाविर्भावाचा कांहीं उपयोग होत नाहीं असें दृष्टीस पडतांच तो परत गेला. नंतर लवकरच कांहीं पोर्टुगीज धर्मोपदेशक, मुंबईतील पोर्टुगीज लोकांना इंग्लिशांवर उठण्याविषयीं भर देत आहेत, असें आढळून आलें. तेव्हां सर्व भटकणाऱ्या पाद्र्यांनीं मुंबई बेटांतून निघून जावें, असा हुकूम फर्माविण्यांत आला. पोर्टुगीज अधिकारी बांदरें एथून विकरी करितां तांदूळ मुंबईस जाऊं देत नसत; व फळफळावळ, भाजीपाला, आणि कोंबडीं यांजवर जबर जकात घेत, त्यामुळें मुंबईतल्या लोकांचा उपासमार होऊं लागला. ठाणें व करंजें या गांवांतून जी सामुग्री मुंबईस जाईल तिजवर शेंकडा दहा टक्के जकात घेण्याचा त्यांनीं यत्न चालविला होता. परंतु इंग्लिशांनीं तो त्यांचा बेत सिद्धीस जाऊं दिला नाहीं.

इ. स. १६७९ त ठाणें जिल्ह्यांतील मोंगलांचीं सर्व ठाणीं शिवाजीनें घेतलीं. नंतर तानसा नदीच्या कांठानें पश्चिमेस जाऊन पोर्टुगीज लोकांच्या सेवान ( सिवान ) गांवासमोर तो किल्ला बांधूं लागला तेव्हां उभयतांमध्यें थोडें वैमनस्य उत्पन्न झालें. तरी किल्ल्याचें काम पुढें चाललेंच होतें. पुढील सालीं, शिवाजीनें सुरत जिल्ह्याच्या दक्षिण भागांतील पारनेरा किल्ल्यांत एक फौज पाठविली, व तो किल्ला नीट करून त्यांत त्यानें शिबंदी ठेविली. मुंबई बंदरांतील मुसलमानांचीं गलबतें जाळून टाकण्याचा यत्न शिवाजीनें, इ. स. १६७८त, केला. तो सिद्धीस न गेल्यामुळें तो कल्याणास परत गेला, आणि खाडी उतरून ठाणें गांवांत जाण्याचा त्यानें यत्न केला. परंतु पोर्टुगीज लोकांच्या तेथें असलेल्या गलबतांनीं त्याला त्या गांवांत येऊं दिलें नाहीं. मुंबईतील

करण्याची कांहीं लोक व शिवाजीचा सेनापति, या उभयतांमध्यें, याच वर्षी, पोठण्याचे खाडींत, थोडी कलागत झाली. सिद्दी याचा हल्ला मुंबईबंदराच्या दक्षिण किनाऱ्यावर न व्हावा ह्मणून, शिवाजीनें इ.स. १६७९ त, आक्टोबर महिन्यांत, त्या बंदराच्या तोंडावरचें खांदेरी उर्फ केनरी नांवाचें खडकाळ बेट घेतलें. हें बेट आपलें आहे असें पोर्टुगीज लोक ह्मणत व इंग्लिश लोकही तें आमचें आहे असें ह्मणत असत. परंतु त्यांत गोडें पाणी नाहीं अशी समजूत असल्यामुळें त्याजकडे दोघांतून एकानेंही द्यावें तितकें लक्ष दिलें नव्हतें. शिवाजीनें हें खांदेरीबेट घेतल्यावर, मराठ्यांना तेथून घालवून देण्याविषयीं, इंग्लिश व शिद्दी या उभयतांनीं यत्न केला. त्या बेटांत जाऊन उतरण्यांत मराठ्यांचा काय हेतु असावा, हे समजून घेण्याकरितां, इंग्लिशांनीं एक म्हातारा तांडेल त्यांजकडे पाठविला असें कोणी ह्मणतात, व कोणी, एक दारूबाज लेफ्टनेंट त्यांनीं पाठविला होता, असें ह्मणतात. त्याला त्या बेटांत गलबतांतून उतरण्याविषयीं मराठ्यांनीं भुलथाप दिली, व तो किनाऱ्यावर जातांच, त्याचें डोकें व त्याच्या बरोबरच्या खलाशांचीं डोकीं त्यांनीं तोडून टाकिलीं. नंतर रिव्हेंज नांवाचें एक चिचोळ्या बरामाचें तारूं, व सात देशी गलबतें, अशीं आठ तारवें, समुद्रांत नांगरून ठेवून, त्या बेटांत कोणाचा रिघाव होणार नाहीं, असा बंदोबस्त इंग्लिशांनीं केला. तेव्हां मराठ्यांनीं त्यांजवर हल्ला करून त्यांची एक गुराब घेतली. त्यामुळें रिव्हेंज शिवाय बाकीच्या तारवांना पळ काढणें भाग पडलें. ह्या रिव्हेंज नांवाच्या छोट्या मन्वारावर क्यापटन् मिंचिन हा मुख्य होता, व वीरवर्य क्यापटन् केग्विन हा त्याच्या हाताखालीं दुय्यम अधिकारी होता. ह्या दोघां अधिकाऱ्यांनीं प्रथमत: मराठ्यांना आपल्या तारवावर हल्ला करण्याकरितां येऊं दिलें आणि नंतर मोठमोठ्या तोफांचा भडिमार शत्रूच्या तारवांच्या मजऱ्यांवर करून शेंकडों लोकांचा नाश केला, व शत्रूचीं चार तारवें बुडविलीं. तेव्हां बाकीच्यांना पळ काढणें भाग पडलें. इतकें इंग्लिशांना यश मिळालें तरी, खांदेरीबेट मराठ्यांच्या ताब्यांतच राहिलें. पुढें लवकरच [ ता ९ जानेवारी १६८० ] मराठ्यांना उपद्रव देण्याच्या हेतूनें, खांदेरीच्या पूर्वेस सुमारें दोन मैलांवर, उंदेरी ऊर्फ हेनरी ह्मणून बेट आहे,

तेथें शिद्दी क़ाशीम यानें तळ दिला. त्याला तेथून हुसकून देऊन उद्धार मराठ्यांनीं यत्न केला. परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. हीं खांदे-रीचीं बेटें शत्रूंच्या, किंवा निदान ज्यांच्या मित्रत्वाविषयीं संशय होता अशा लोकांच्या,हातीं असल्यामुळें मुंबईबेट मोठें धोक्यांत पडल्यासारखें झालें. ह्या शत्रूंना तेथून घालवून देण्याविषयींची डेप्युटी गव्हर्नरानें कोर्ट् आफ् डिरेक्टरांची परवानगी मागितली. तेव्हां त्यांजकडून त्याला असा जबाब मिळाला कीं, कंपनीचीं तारवें घेऊन, त्यांच्या मदतीनें, हीं बेटें शत्रूंच्या हातीं न जाण्याची तजवीज तुम्हीं ठेविली नाहीं, ही तुम्हीं मोठीच चूक केली.आतां पैशाची चणचण व व्यापाराची मंदी असल्यामुळें, हीं बेटें परत घेण्याचा यत्न तुम्ही करूं नये,आणि हिंदुस्थानांतील राज्यकर्ते ज्यालढाया परस्परांशीं करीत असतील,त्यांत तुम्ही हात घालूं नये,असा हुकूम त्यांजकडून डेप्युटी गव्हर्नराला मिळाला. ह्मणून खांदेरी तुमच्या कबजांत असण्याविषयीं आमची संमति आहे असा करार इंग्लिशांनीं शिवाजीशीं केला.

ता. ५ एप्रिल सन १६८० रोजीं शिवाजी मरण पावला. तेव्हां त्याचा पुत्र संभाजी त्याच्या पश्चात् त्याच्या गादीचा मालक झाला. त्यानें, अव-रंगजेब बादशहाचा बंडखोर पुत्र सुलतान अकबर,याला मदत केल्यामुळें, बादशहा त्याजवर फार रागावला. नंतर शिद्दी व मराठे यांमध्यें, ज्या लढाया झाल्या, त्यांत मुंबईबेटाच्या किनाऱ्यांची वारंवार नासाडी होत गेली. त्यामुळें तेथें राहाणाऱ्या इंग्लिश लोकांना निरंतर मोठी धास्ती बाळगावी लागे.कारण खर्च कमी करण्याचा अयोग्य हुकूम मिळाल्यापासून, हत्यारबंद माणसें ज्यावर आहेत असें एक तारूं, व शिबंदीचे शंभर युरोपियन लोक, इतकेंच काय तें लढाईचें साधन त्यांजवळ होतें. इ. स. १६८२ त जुन्नराहून मोंगलांचे कांहीं लोक कल्याणास आले. पन-वेलीजवळचें शाहाबाद . उर्फ बेलापूर हें गांव पोर्टुगीज लोकांच्या हातून या पूर्वींच गेलें होतें असें दिसतें. कारण,या वेळीं बेलापूर एथें,मराठे लोकांच्या उपद्रवापासून त्या गांवाचें रक्षण व्हावें ह्मणून,शिद्दी एक किल्ला बांधीत होता,असा उल्लेख आढळतो.या सालचा पावसाळा गेल्यावर मराठे व शिद्दी यांची पुनः मुंबईबंदरांत लढाई झाली. घारापुरी बेटाची तटबंदी

करण्याची तयारी संभाजी या वेळीं करीत होता, व मुंबईवर हल्ला करण्यां विषयीं, त्यानें आपल्या आरमाराचा मुख्य सरदार दौलतखान यास हुकूम केला होता. हवे त्या वेळीं उपयोगी पडण्याकरितां लढाईचें काम शिकविलेले लोक या वेळीं मुंबईत बरेच होते. खेरीज मुंबईच्या रक्षणाकरितां अवरंगजेबाचे ३००० लोकही कुमक करण्याकरितां माजगांवास येऊन उतरले होते. इ. स. १६८३त मोंगलांनीं कल्याणाची नासाडी केली व पोर्टुगीज आणि मराठे या उभयतांमध्यें चौल एथें लढाई झाली. तींत संभाजीचा पराभव झाला. नंतर त्यानें करंजें बेट घेतलें व वसईच्या उत्तरेकडचीं कांहीं स्थळें लुटलीं. ब्यांटम् हें स्थळ डच् लोकांनीं घेतल्यामुळें, हिंदुस्थानांत मुंबई हें इंग्लिशांचें मुख्य ठिकाण झालें. तेव्हां तेथें ४० गोरे सोजीर अधिक ठेवले व २०० रजपुतांचीं नांवें शिपायांच्या पटांत दाखल केलीं. पगार व हक्क हे एकसारखे कमी होत गेल्यामुळें, मुंबईच्या शिबंदीचा मुख्य अधिकारी, क्याप्टन् केग्विन, हा संतापला. पुढें या वर्षाच्या अखेरीस, कंपनीच्या विरुद्ध त्यानें बंड केलें, तेथील डेप्युटी गव्हर्नराला पकडून कैद केलें, आणि शिबंदी व बेटांतील लोक यांच्या संमतीनें असें प्रकट केलें कीं, मुंबई बेट हें कंपनीच्या ताब्यांत नसून, खुद्द इंग्लंडच्या राजाच्या आश्रयाखालीं आहे. कंपनीचा प्रेसिडेंट मि. चाइल्ड हा या प्रसंगीं सुरतेहून मुंबईस आला परंतु कंपनीला अनुकूल असा लोकांच्या मनाचा कल होत नाहीं असें पाहून तो सुरतेस परत गेला. इ. स. १६८४ च्या आक्टोबर महिन्यापर्यंत हें बंड कायम होतें. नंतर इंग्लंडच्या राजाचा अधिकारी व हिंदुस्थानांतील आरमारावरचा नाईक, सर टॉमस ग्रेहाम, हा इंग्लंडाहून या देशीं येऊन, नवंबर महिन्यांत, मुंबईस दाखल झाला. तो बरोबर कोणी चाकरमाणूस न घेतां एकटाच किनाऱ्यावर उतरला आणि त्यानें मुंबईबेट सोडून देऊन इंग्लंडास परत जाण्याविषयीं केग्विन याचें मन वळविलें. केग्विन यानें या बेटावर मोठ्या प्रामाणिकपणानें अमल चालविला होता व त्या कामीं त्याला यशही आलें होतें. त्यानें संभाजीबरोबर इंग्लिशांस अनुकूल असा तह केला होता, व शिद्दी यानें माजगांवास आपल्या तारवांवर गोडें पाणी भरण्याकरितां मात्र यावें, एरव्हीं येऊं नये, असा त्याजवर त्यानें आपला पगडा बसविला होता. मराठे किंवा मोंगल

यांच्या हातीं मुंबई बेट माइया जोमदार व्यवस्थेमुळें पडलें नाहीं; असें त्याचें ह्मणणें होतें, तें प्राय: वाजवी होतें. इ. स. १६८४ त मोंगलांनीं कल्याणची पुनरपि खराबी केली. पोर्टुगीज लोक व मराठे या उभयतांची पुन: लढाई जुंपली. तेव्हां पोर्टुगीज लोकांनीं, करंजें, कल्याणच्या समोरचें सांटा क्रुज,व अशेरीचा मोठा डोंगरी किल्ला, हीं स्थळें पुन: घेतलीं. संभाजीनें त्याचा वचपा काढण्याकरितां पोर्टुगीज लोकांच्या मुलखाची खराबी केली व वसई शहराला वेढा घातला.

सुरत शहर व बंगालप्रांत यांत व्यापार करण्याविषयीं, मोंगल राजांकडून इंग्लिशांना जे हक्क मिळाले होते, त्यांच्या शाश्वततेविषयीं खातरी कंपनीला वाटत नव्हती. तसेंच डच् लोकांचीं व्यापाराचीं मुख्य ठाणीं स्वतंत्र असून, आपापलें संरक्षण करण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं असे, ही गोष्ट कोर्ट् आफ् डिरेक्टर्स् यांना फार आवडूं लागली होती. खेरीज इंग्लंडच्या राजानेंही कंपनीस मदत करण्याचें पतकरलें होतें. या सर्व गोष्टींचा विचार करून, इ. स. १६८७ त, सर जोसाया चाइल्ड याच्या सांगण्यावरून, कोर्ट् आफ् डिरेक्टर्स् यांनीं निश्चय केला कीं, इत:पर कंपनीनें मोंगलांची ताबेदारी करूं नये; तिचीं हिंदुस्थानांतील व्यापाराचीं मुख्य ठाणीं इंग्लंडच्या राजानें आपल्या ताब्यांतील उपराज्यें मानावीं, एतद्देशीय अधिकाऱ्यांना तीं ठाणीं घेतां येणार नाहींत अशा सैन्यादि लढाईच्या साधनांचें बल त्यांच्या संग्रहीं ठेवावें, व आपल्या समुद्रावरील वर्चस्वाच्या योगानें, अवरंगजेबाकडून आपल्या व्यापारास होणाऱ्या अडथळ्याचें, निवारण करावें. अशा उद्देशानें मुंबई, मद्रास, व चितेगांग एथें स्वतंत्र वसाहती करण्याची योजना झाली. मुंबई बेट हें मनुष्याची करामत व पैका यांच्या मदतीनें होईल तितकें मजबूद करून तें मुख्य स्थान करण्याचें ठरलें. तसेंच साष्टीबेट जबरीनें घेऊन त्यांत शिबंदी ठेवण्याचा विचार ठरला. नंतर सर जोसाया चाइल्ड याचा भाऊ जॉन चाइल्ड, ज्याला ह्या वेळीं 'सर' हा किताब मिळालेला होता, याला कंपनीच्या जमिनीवरील फौजेवर व पाण्यांतील आरमारावर मुख्य अधिकारी नेमिलें. नंतर त्यास असा हुकूम मिळाला कीं, तुह्मी सुरत सोडून देऊन मुंबई हें आपलें मुख्य ठाणें करावें, मराठ्यांबरोबर दोस्ती

करावी, व कंपनीच्या ठाण्यांचें स्वातंत्र्य मोंगल कबूल करीत पर्यंत त्यांचीं सांपडतील तितकीं तारवें पकडावीं. हा उद्देश सिद्धीस नेण्याकरितां पुष्कळ तारवें व माणसें चितेगांग आणि मुंबई एथें पाठविण्यांत आलीं.परंतु हे सर्व बेत व तयाऱ्या निष्फल झाल्या.कारण सगळें सैन्यबल येऊन पोंचण्यापूर्वींच बंगाल्यांत कलह सुरू झाला.त्यामुळें त्यांत इंग्लिशांना फारसें यश मिळालें नाहीं.तेंव्हां पूर्वींप्रमाणेंच मोंगलांचें वर्चस्व कबूल करून त्यांच्याशीं कसाबसा घाईनें त्यांस तह करावा लागला. पश्चिम किनाऱ्यावर तर याहूनही त्यांची दुर्दशा झाली. मि. ह्यारिस व दुसरे वखारींतील प्रमुख लोक हे सुरतेंत होते तोंच, सर जॉन चाइल्ड यानें, मोंगलांचीं गलबतें घेण्याविषयीं, हुकूम फरमाविला,तेंव्हां,ते सुरतेंतील इंग्लिश लोक आयतेच ओलीस मिळाल्यामुळें,आपल्या समुद्रावरील व्यापाराला इंग्लिशांपासून भीति आहे असें वाटून, अवरंगजेब त्यांच्या वसाहतींचें स्वातंत्र्य कबूल करील असा मुळींच संभव नव्हता.याच सुमारास संभाजीला जिंकून आणि विजापूर व गोवळकोंडें एथील राज्यें बुडवून अवरंगजेब मोकळा झाला होता. त्यामुळें त्याजकडून इंग्लिशांस अनुकूल अशी कबुलात जोरानें करून घेण्याचा रंगही दिसेना. अखेरीस पूर्वींचे हक्कच आह्मांस पुन:मिळावे,या शर्तीवर तहाचें बोलणं चालविण्याकरितां,विजापुरास इंग्रजांना अवरंगजेबाकडे वकील पाठवावे लागले.या प्रमाणें निराशा होऊन सर्व यत्न निष्फल झाले होते अशा संधीस, ता.४ फेब्रुवारी इ.स.१६९०रोजीं,सर जॉन चाइल्ड हा मुंबईस मृत्यु पावला.

इ. स. १६९० त,फेब्रुवारीच्या २७ व्या तारखेस, इंग्लिशांस व्यापार करण्याची परवानगी अवरंगजेबानें दिली. त्या समयीं जो हुकूम त्यानें फरमाविला होता त्यांतील कलमें इंग्लिशांना लहानपणा आणणारीं होतीं. या प्रसंगीं इंग्लिशांना आपली चुकी कबूल करून मोंगलांजवळ माफी मागावी लागली, नजर दंड भरावा लागला, पूर्वींप्रमाणें आह्मी फक्त व्यापाऱ्यांच्या नात्यानें एथें वागूं व या सर्व संकटांचें आदिकारण जो चाइल्ड, त्याला चाकरीवरून काढून टाकूं, असें कबूल करावें लागलें. ही माफी बादशहाकडून इंग्लिशांस मिळण्यापूर्वींच, ह्मणजे ता. १४ फेब्रुवारी १६९० रोजीं, शिद्दी याचें आरमार व फौज यांनीं मुंबईवर हल्ला केला, माहीम, माजगांव, व शींव हीं स्थळें घेतलीं, आणि मुंबईतील गव्हर्नर व

शिबंदी यांना शहरांत व कोटांत कोंडून टाकिलें. अवरंगजेबानें इंग्लिशांबरोबर तह केला त्यांत, मुंबईहून निघून जाण्याविषयीं,शिद्दी-याला त्यानें हुकूम केला होता. तथापि, ता. २२ जून १६९० पर्यंत, माजगांव, माहीम, व शींव हीं स्थळें इंग्लिशांच्या हातीं पुनरपि आलीं नाहींत. या प्रसंगीं मुंबईच्या रक्षणाचीं साधनें फार लेंचींफेंचीं होतीं, व धामीच्या योगानें शिबंदींतले लोक फार मेल्यामुळें, फक्त३५ गोरे लोक शिल्लक राहिले होते. त्यामुळें ती शिबंदी इतकी दुबळी झालेली होती कीं, मोंगलांचा सेनापति मुखत्यारखान हा शिद्दी याच्याशीं मत्सरबुद्धीनें न वागता, तर शिद्दी यानें मुंबईबेट घेतलें असतें, असें मि. ह्यारिस याचें मत होतें. कंपनीला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याचा हा,मूर्खपणाचा व अव्यवस्थितपणें चालविलेला ,यत्न,या चाइल्ड नामक दोघ भावांनीं केल्यामुळें,कंपनीला४ १,६०,००० रुपये खर्च आला.संभाजी पकडला जाऊन त्याचा वध झाल्यानंतर,मराठ्यांच्या बलाचा ऱ्हास होऊं लागला, तेव्हां,मोंगलांनीं उत्तरकोंकणाचा बहुतेक प्रदेश पादाक्रांत केला.इ. स. १६८९ त पोर्टुगीज लोकांच्या मुलखांत त्यांनीं अनेक हल्ले केले,लहान लहान गांवें लुटलीं, व वसई घेण्याची दहशत घातली. इ. स. १६९० त काकाजी नांवाचा एक गृहस्थ कांहीं लुटारू बरोबर घेऊन वसईपर्यंत लूट करीत आला व पुढे दोन वर्षांनीं शिद्दी यानें वसईवर हल्ला करून साष्टी घेण्याची दहशत घातली. इ. स. १६९४ त अवरंगजेबानें पोर्टुगीज लोकांबरोबर लढाई करण्याची सुरवात केली. तेव्हां त्याच्या सैन्यानें लोकांस फार उपद्रव दिल्यामुळें, त्यांना वसई व दमण एथील किल्ल्यांत, आश्रयाकरितां, जाऊन राहावें लागलें. मराठ्यांवर हल्ला करण्याकरितां अवरंगजेबाला तोफा हव्या होत्या. त्या देण्याचें पोर्टुगीज लोकांनीं कबूल करतांच, त्यानें त्यांच्या बरोबर त्यांस अनुकूल असा तह केला, हें पोर्टुगीज लोकांचें मोठें भाग्य होय. हा तह झाला तरी, ज्यांना आबादानी फार प्रिय होती, अशा मातबर पोर्टुगीज लोकांना, विश्रांति किंवा सुरक्षितपणा प्राप्त झाला नाहीं. कारण अवरंगजेबाशीं तह झाला नाहीं तोंच, मस्कत एथील आरबांच्या टोळ्या साष्टी बेटांत आल्या. त्यांनीं पोर्टुगीज लोकांचीं खेडीं व देवळें जाळिलीं, पाद्र्यांना

ठार मारिलें, व १४०० लोक गुलाम करून नेले. पुढील वर्षी पोर्टुगीज लोकांनीं समुद्रावर मराठ्यांचा पराभव केला तेव्हां त्यांना थोडा धीर आला. कारण जय मिळविणें ही गोष्ट अलीकडे त्यांना दुष्कर झालेली होती.

या समयीं, म्ह० इ. स. १६९४त, मुंबई बेट अगदीं निकृष्ट स्थितीस आलेलें होतें. कारण व्यापाराची स्थिति फार वाईट झालेली होती. तेथील उत्पन्न पूर्वीं ५२०८० रुपये होतें तें या वेळीं ३४१६० रुपयांपर्यंत कमी होत आलें होतें. तेथील माडांची व्यवस्था बरोबर नव्हती व शिबं-दींत फक्त शंभर गोरे लोक होते. इ. स. १६९६ त पैशाच्या टंचाईमुळें साठ गोरे शिपाई व ३४० एत्तद्देशीय शिपाई कमी करावे लागले. इ. स. १६९७ त तर फक्त २७ गोरे शिपाई शिलक राहिले होते. इ. स. १७०१ त या बेटांतील माहीम व दुसरीं ठाणीं यांची मजबुती करण्यांत आली. तरी खुद्द मुंबईची शिबंदी दुर्बलच होती. मराठे, मूर, आरब, व पोर्टुगीज हे मुंबईवर हल्ला करण्यास एका पायावर तयार होते. ह्मणून कुमक न मिळती तर तें बेट इंग्लिशांच्या हातून गेलें असतें. शिबंदीच्या लोकांकरितां अन्नसामुग्रीचा पुरवठा होऊं देण्यास पोर्टुगीज लोकांनीं हरकत केल्यामुळें, व मराठ्यांना गुप्तपणें त्यांनीं मदत केल्यामुळें, इ. स. १७०२ त मुंबईतील लोकांना मोठी भीति पडली. या सर्व संकटांना भर घालण्याकरितांच जणूं काय त्या बेटांत महामारी उठली व तिच्या योगानें शेंकडों एत्तद्देशीय लोक मेले व ७६ गोरे लोक मात्र शिल्लक राहिले. महामारी येऊन गेल्यावर एक मोठें वादळ झालें. त्याच्या योगानें त्या बेटांतील पिकाचा व बंदरांतील बहुतेक तारवांचा नाश झाला. इ. स. १७०५ तही मुंबईची स्थिति वाईट होती व तेथील शिबंदी दुर्बळ होती. कारण कामगिरी बरोबर न बजावल्यामुळें एतद्देशीय शिपायांना चाकरीवरून दूर केलें होतें. सुरत एथें व्यापार नीट चालत नव्हता. मलबार किनाऱ्यावर व्यापार चालविण्याच्या कामांत कान्होजी आंग्रया किंवा शिवाजी नांवाचा एक मराठा चांच्या हा फार हरकत आणीत असे. मराठे जातीचे चांचे व आरब चांचे यांच्यावर, तुम्ही व आम्ही मिळून हल्ला करण्याचा बेत करण्याकरितां, तुमच्याकडे वकील

पाठविण्याचा आमचा विचार आहे, असें इराणच्या राजानें इंग्लिशांस इ. स. १७०८ त कळविलें तेव्हां, तो विचार तेथील गव्हर्नरास नाका-बूल करावा लागला. कारण यांच्यांवर स्वत: हल्ला करण्याची किंवा या कामीं शहाला तारवांची कुमक करण्याची शक्ति मुंबईतील लोकांच्या अंगीं या वेळीं नव्हती. तेथील लोक महामारीनें खपविले होते त्यामुळें तें बेट ओसाड झालें होतें व त्याची दुर्दशा झालेली होती. आठशें गोऱ्या लोकांपैकीं फक्त ६० शिल्लक राहिले होते. त्यांपैकीं साहा सिव्हिलियन होते,साहा लष्करी अधिकारी होते,व बाकीचे ३८, ह्मणजे ४०हूनही कमी इतके, गोरे सोजीर होते. वर बसून जाण्यासारखा घोडा एकच शिल्लक राहिला होता व गाडीला जुंपण्यासारखी बैलांची जोडीही एकच राहिली होती. जें मुंबईबेट हिंदुस्थानांतील अति रम्य स्थलांपैकीं एक स्थळ पूर्वीं होतें तें या वेळीं अति ओसाड व भयाण झालेलें होतें.

इ. स. १६९४ त पोर्टुगीज लोकांबरोबर अवरंगजेबानें तह केला. तेव्हां पासून इ. स. १७०८ त तो मृत्यु पावे पर्यंत ठाणें जिल्ह्याची समुद्र किनाऱ्याची पट्टी पोर्टुगीज लोकांकडे होती व कल्याण-प्रांत मोंगलांकडे होता.या १४वर्षांच्या मुदतींत ठाणें जिल्ह्यांत फारशा लढाया झाल्या नाहींत व मोंगलांच्या हातीं या जिल्ह्याचा जो भाग होता त्याविषयींची सविस्तर माहितीही उपलब्ध नाहीं. पोर्टुगीज लोकांच्या ताब्यांतील मुलखाविषयीं मात्र अशी माहिती मिळते कीं, जमिनीची जरी पुष्कळ नासाडी झालेली होती तरी,तिची लागवड चांगली होत असे, व अगदीं कनिष्ठ प्रतीचे लोक खेरीज करून बाकीचे लोक खाऊन पिऊन बरे होते. मुसलमान इतिहासकार काफीखान याचा असा लेख आढळतो कीं, या समयीं वसई व दमण हे दोन किल्ले मोठे मजबूत होते, त्यांचे सभोंवतालचीं खेडीं उत्तम स्थितींत होतीं,व त्यांजपासून वसूल पुष्कळ येत असे. पोर्टुगीज लोक डोंगरांचे उतरणींवर उत्तम पिकें उत्पन्न करीत आणि ऊंस, अननस, भात, नारळ, व पानवेली लावीत. इंग्लिशांप्र-माणें ज्या त्या गलबतावर हल्ला न करितां,जे गलबतवाले त्यांचा परवाना घे-ण्याचें नाकबूल करीत,त्यांच्या गलबतांवर मात्र ते हल्ला करीत.सर्व आरबी व मस्कती गलबतांबरोबर मात्र ते निरंतर लढत असत. त्यांच्या मुसलमान किंवा

हिंदु प्रजांपैकीं, ज्यांचीं मुलें त्यांचे मरणसमयीं जाणतीं नसत, त्या नेणत्या मुलांस ते किरिस्तांव करीत, एवढा मात्र त्यांच्या कारकीर्दींत एक मोठा जुलूम होत असे. या खेरीज बाकीचीं त्यांचीं कृत्यें स्तुतीस पात्र होतीं. ते गांवें वसवीत, सर्व गोष्टींचे संबंधानें लोकांशीं ममतेनें वागत, व त्रासदायक कर प्रजेवर बसवीत नसत. मुसलमानांकरितां ते प्रत्येक गांवांत एक वेगळी जागा वगळून ठेवीत असत, आणि, मुसलमानांचीं लग्नें व त्यांजवर बसवायाचे कर यांची व्यवस्था करण्याकरितां, एक काजी नेमीत असत. नमाज पढण्याकरितां येण्याविषयीं जें आमंत्रण मोठ्यानें ओरडून करीत असतात तें मात्र ते करूं देत नसत. त्यांच्या मुलखांतून गरीब मुशाफराला सुखानें प्रवास करितां येत असे. सुखासमाधानानें नमाज पढण्याची सवड मात्र त्याला मिळत नसे. त्यांचीं देवळें फार भव्य असत. त्यांत जीजस व मेरी यांच्या लांकडांच्या व मेणाच्या भपकेदार मूर्ति आणि रंगानें काढलेलीं चित्रें असत व तेथें कापूर जाळीत असत. ते मुशाफराला स्वताला लागण्यापुरता मात्र तंबाकू नेऊं देत. ते लग्नें करीत तेव्हां मुलगीचें आंदणासारखें दान करीत. घरांतील व घराबाहेरील सर्व व्यवस्था ते आपल्या पत्न्यांकडे सोंपवीत. ते लग्नाची एकेकच बायको करीत व कोणालाही राख ठेवूं देत नसत.

इताली देशांतील मुशाफर गेमेली क्यारेरी हा इ. स. १६९५ च्या आरंभीं कांहीं दिवस दमण, वसई, व साष्टी या ठिकाणीं राहिला होता. त्याच्या लेखावरून असें समजतें कीं त्या वेळीं दमण हें इतालींतील शहरांसारखें बरेंच चांगलें शहर होतें. त्यांत तीन रुंद रस्ते होते व त्यांना कापणारे चार आडवे रस्ते होते. प्रत्येक रस्त्याचे बाजूस एकमजली कौलारू घरें ओळीनें होतीं. घरांच्या खिडक्यांना कांचेच्या भिंगांऐवजीं शिंपल्यांचीं भिंगें लाविलेलीं होतीं. प्रत्येक घराजवळ फळझाडांचा एकेक बाग असे. तेथें ख्रिस्तीधर्माचे पुष्कळ चांगले मठ होते व अर्वाचीन पद्धतीप्रमाणें बांधलेले चार बुरूज होते. त्यांची बांधणी चांगली होती तरी त्यांजवर असाव्या तितक्या तोफा नव्हत्या. तेथें एक चांगली शिबंदी होती, एक किल्लेदार होता, व एक वसूल करणारा अधिकारी [फ्याक्टर] होता. पोर्टुगीज, हाफ्क्याष्ट, मुसलमान, व

हिंदु, या चार जातींचे लोक एथें असत. बहुतेक हिंदु लोक जुन्या दमणांत नदीच्या उजव्या तीरावर राहात असत. या जुन्या दमणांतील रस्ते वांकडेतिकडे असून घरें झोंपड्यांसारखीं होतीं. त्या घरांच्या भिंती चिखलाच्या असून तीं झांपांनीं शिवलेलीं असत. एथील पोर्टुगीज लोक मोठ्या डामडौलानें राहात असत. त्यांचेपाशीं दासदासी व मेणे असत. ते घराबाहेर पडले ह्मणजे बैलगाडींतून जात असत. त्यांचे खाण्याचे पदार्थ चांगले नसत. तेथें मिळणारें गाईचें व डुकराचें मांस बेचव असे. ते खाण्याकारितां क्वचितच मेंढरें मारीत असत. कोंबडीं विकत घेण्याचें सामर्थ्य सगळ्यांना नसे. एथें पाव चांगले मिळत. या देशांतील फळफळावळ व विलायती भाजीपाला पुष्कळ मिळत असे. पुरुष आंगांत आंगराखा घालून एक प्रकारची चमत्कारिक विजार नेसत असत. ती बांधली ह्मणजे पायांवर बूटांच्या शेंड्यासारखें कांहीं दिसत असे. कांहीं लोक बंड्या घालीत व रेशमी पायजमे नेसत असत. कांहींचे पायजमे पायाच्या घोंट्यापर्यंत पोंचत असत.

डामिनिकन् व रिकोलेट ऊर्फ फ्रान्सिस्कन् या दोन पंथांच्या लोकांचे पुष्कळ मठ तारापूर एथें होते. वसईच्या किल्ल्याचें काम या वर्षी [ इ. स. १६९५ त ] पुरें झालेलें नव्हतें. एथील मातबर लोक रेशमी व पातळ मलमलीचे कपडे आंगांत घालीत आणि टांचेपर्यंत पोंचतील असे लांब पायजमे नेसत. ते पायमोजे घालीत नसत. जोड्याच्या ऐवजीं ते वाहाणा वापरीत असत. फ्रेंच लोकांच्या पद्धतीप्रमाणें नवऱ्या मुलीला उंची पोषाग घालीत. वसईपासून आगाशीपर्यंत पंधरा मैलांच्या पट्टयांत रमणीय बागांखेरीज दुसरें कांहीं दृष्टीस पडत नसे. या बागांत नारळ अंजीर, आंबे व ऊंस या देशी जिनसांची रेलचेल असे. बागा सदोदित हिरव्या गार असून फळांनीं भरलेल्या असत. बागांतील झाडांना पाणी यंत्रांनीं (राहाटांनीं)लावीत. एथील रम्य व गार रस्त्यांना मोहित होऊन पोर्टुगीज बड्या लोकांनीं आगाशी एथें क्रीडागृहें बांधिलीं होतीं. तेथें ते ऐन उन्हाळ्याचे दिवसांत राहावयास जात. पेंढारी लोक व मस्कती यांचे लोक यांच्या पासून वसई एथील लोकांना उपद्रव होत असे. यांखेरीज एकाएकीं एथील लोकांचे जीव घेणारा असा एक रोग या वे;

ळेच्या( इ. स. १६९९ )सुमारास उद्भवला होता. हा विकार वळासारखा होता.समुद्रकिनाऱ्याच्या उत्तरेकडील भागांत हा रोग कांहीं वर्षेपर्यंत चालू होता.त्याच्या योगानें शहरांचीं शहरें कांहीं घटकांत ओस पडत असत.सुरत दमण, वसई, व ठाणें या सर्व ठिकाणच्या लोकांना या रोगाचा उपद्रव झाला होता.

साष्टीबेटाचा उत्तम भाग या वेळीं जेजुइट लोकांचे ताब्यांत होता. या बेटांत ऊंस,तांदूळ,व फळफळावळ यांची समृद्धि होती. या बेटांतील पुष्कळ गांवांत अगदीं भिकारी असे मूर्तिपूजक, मूर, व ख्रिस्ती लोक राहात असत. त्यांचीं घरें अगदीं भिकार असून त्यांवर काटक्यांचें ओमण असे व तीं गवतानें किंवा झांपांनीं शिवीत असत. खेडे गांवांत राहाणाऱ्या जमीनदारांच्या आश्रितांची जी स्थिति होती तिच्याहून एथील शेतकऱ्यांची स्थिति वाईट होती. जमीनदारांकरितां ते जमिनीची लागवड करीत किंवा मक्त्यानें शेत करीत. गुलामांप्रमाणें ते एका गांवाहून दुसऱ्या गांवीं पळून जात तेव्हां, ज्या जमीनदाराच्या ताब्यांतले ते असत, तो त्यांना बळजबरीनें परत घेऊन येत असे. मोठमोठ्या जमीनदारांपासून जे लोक शेत मक्त्यानें करीत ते मक्ता ऐनजिनशी घालीत व कधीं कधीं त्यांना मक्त्याखेरीज जमीनदाराकडे खपावेंही लागत असे. जे सरकारांतून जमीन लागवडीकरितां घेत त्यांना आपापल्या ऐपतीप्रमाणें सरकारच्या खजीनदाराला दरमहा देणें द्यावें लागत असे.वांद्रें,वेसावें,व ठाणें हीं साष्टीबेटांत मुख्य स्थळें होतीं.ठाणें शहर उघड्या जाग्यावर होतें.हिंदुस्थानांतील शहरांच्या संबंधानें पाहिलें तर हें ठाणें शहर एक उत्तम स्थळ होतें. एथें ख्रिस्ती धर्माचे तीन मठ असून चिटें तयार करण्याचा एक उत्तम कारखाना होता.

नुकतीच होऊन गेलेली लुटालूट व दंगेधोपे यांच्यापासून या प्रांतीं झालेल्या हानीचा व अनर्थाचा उल्लेख करेरीच्या लेखांत नाहीं. तथापि समुद्रावर झालेल्या भयंकर लढायांविषयीं त्यानें लिहिलें आहे.मस्कती व मलबारी चांचे,तसेच, मूर, हिंदु, ज्यू, व ख्रिस्ती, असे अनेक जातींचे चांचे, हे लढाऊ माणसांनीं भरलेलीं पुष्कळ गलबतें घेऊन समुद्रांत फिरत व जो भेटेल त्याच्यावर तुटून पडत. पोर्तुगीज लोकांचा प्राण घेणारा

शत्रु सावजी हा इतका प्रबल झाला होता कीं, तो मोंगल व पोर्टुगीज या दोघांनाही पुरून उरला होता. पन्नास हजार घोडेस्वार व तितकें किंवा त्याहून अधिक इतकें पायदळ घेऊन तो रणांगणांत येत असे. त्याचे शिपाई मोंगलांचे शिपायांहून चांगले असत. एका भाकरीच्या कोरड्या तुकड्यावर ते सारा दिवस आपला निर्वाह करीत. परंतु मोंगल लोक मोठ्या मिजाशीनें हळूहळू कूच करीत व बरोबर बायका, अन्नसामुग्री, आणि तंबू घेत. त्यामुळें ते कूच करीत असले ह्मणजे एक चालतें शहरच आहे कीं काय असा भास होत असे. सावजीचे ताब्यांतील लोक समुद्रावर व जमिनीवर लूट करीत असत. त्यांच्या किनाऱ्याचेजवळून गलबतांत बसून जाणें हें मोठें धोक्याचें होतें. बरोबर संरक्षणाकरितां कांहीं लोक असल्याखेरीज त्यांच्या किनाऱ्याजवळून जलपर्यटन करणें तर अशक्यच असे. एकादें गलबत त्यांच्या किल्ल्यां-जवळून जाऊं लागलें ह्मणजे लढाऊ माणसांनीं भरलेल्या लहान लहान गलबतांत बसून हे सावजीचे लोक किल्ल्यांबाहेर येत व शत्रुमित्र मनांत न आणितां लुटालूट करीत. सावजी आपल्या लोकांना अशाप्रकारची लूट हाच पगार देत असे.

मुंबईबेट इंग्रजांच्या ताब्यांत आल्यावर पहिलीं पन्नास वर्षेंपर्यंत ठाणें जिल्ह्याच्या समुद्रकिनाऱ्यावरील मुंबई खेरीज इतर बंदरांतील व्यापार हळू हळू कमी होत गेला. मुंबई बंदरीं मात्र इ. स. १६६४ पासून १६८४ पर्यंत व्यापाराची चलती असून तो चमत्कार वाटण्यासारखा वाढला होता. पश्चिम हिंदुस्थानचा परदेशाशीं चालणारा व्यापार, प्राचीन काळाप्रमाणें या वेळींही, ठाणें जिल्ह्यांतील समुद्रकिनाऱ्यावरील बंदरीं मात्र होऊं लागून त्याचा कळस झाल्यामुळें, या जिल्ह्यांतील व्यापाराच्या संबंधानें, हा काळ ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. इ. स. १६८४पासून १६८८ पर्यंत इंग्रजांच्या पश्चिम हिंदुस्थानांत चालणाऱ्या व्यापाराचें मुंबई हें अगदीं माहेरघर होऊन गेलें होतें. नंतर मुंबईच्या व्यापारास उतरती कळा लागून कांहीं वर्षें पर्यंत व्यापाराची फार मंदी झाली. पुढें इंग्रजांच्या दोन कंपन्यांचें भांडण जुंपलें आणि अखेरीस इ. स. १७०२ या वर्षी न्यू युनैटेड् (नवी संयुक्त) कंपनी झाली तेव्हां तें मिटलें.

थोडा व्यापार या अठराव्या शतकाच्या आरंभीं ह्यामिल्टन् नांवाच्या बगदाद इणें जिल्ह्याच्या समुद्रकिनाऱ्याच्या नकाशांत दमण, केप सेंट् जॉर्ज, ....लेपूर, वसई, मुंबई व चौल हीं स्थळें दाखल केलीं आहेत. याखेरीज दमण व वसई यांचे दरम्यान डहाणू, तारापूर, केळवें माहीम, व आगाशी बेट हीं होतीं आणि वसई व मुंबई यांचे दरम्यान वेसावें, वांद्रे व माहीम हीं होतीं असें त्यानें लिहिलें आहे. या बंदरांपैकीं दमण हें पूर्वीं चांगलें व्यापाराचें स्थळ असून या वेळीं अगदीं भिकार झालेलें होतें आणि डहाणू, तारापूर, केळवें माहीम, व आगाशी बेट हीं व्यापाराच्या संबंधानें फारशीं महत्वाचीं नव्हतीं. वसईस थोडेसा व्यापार चालत असे. तेथील ख्रिस्ती देवळांच्या भव्यपणावरून मात्र पूर्वीच्या गबरपणाची आठवण होत असे. वेसावें हें लहानसें शहर असून त्यांत वाळलेल्या माशांचा व्यापार चालत असे. वांद्रें हें उत्तम शहर होतें. परंतु तेथील खाडीच्या नस्तांत खडक असल्यामुळें तेथें व्यापार चालत नसे. मुंबईस व्यापाराला उतरती कळा लागलेली होती असें वरती सांगण्यांत आलेंच आहे. मुंबईचा व्यापार इतका मंदावला होता कीं जेथें व्यापाराचा संभव नाहीं अशा मुंबईत, सरकारी बंगल्यांत, राहण्यापेक्षां, जेथें पैशाचा विनियोग करितां येतो अशा सुरत शहरांत, तुरुंगांत राहाणें बरें, असा, इ. स. १६९६त, मुंबईतील गव्हर्नर सर जॉन गेयर यानें आपला अभिप्राय दर्शविला होता, असा ह्यामिल्टन् याचा लेख आढळतो. ठाणें, पनवेल, व कल्याण यांचा ह्यामिल्टनचे ग्रंथांत मुळींच उल्लेख नाहीं. जें चौल पूर्वीं व्यापाराविषयीं प्रख्यात होतें तें या वेळीं अति भिकारी झालेलें होतें.

ह्या वेळच्या मुंबईतील व्यापाराची कच्ची हकीकत कोठें आढळत नाहीं. मुंबईहून निघालेलीं मालाचीं तारवें कधीं कधीं व्यापाराकरितां इंग्लंडास जात व कधीं कधीं एशियांतील व पूर्व आफ्रिकेंतील जितकीं बंदरें त्या वेळीं माहीत होतीं त्या बंदरीं जात असें दिसतें. थोड्याशा वर्षांपूर्वी ज्या व्यापारांत मुंबईची ख्याति होती, व नंतर, कांहीं वर्षें पर्यंत व्यापाराचा बहुतेक नायनाट झाल्यावर, मुंबईचा जो व्यापार फारच

वाढला, त्याचें स्वरूप पुढील संक्षिप्त हकीकतीवरून व पोर्टुगीज येईल. र व तितकें

ठाणें जिल्ह्याच्या किनाऱ्याच्या उत्तरेकडील बंदरांपैकीं सि च्येत असे. ठठ्ठा एथें मोठा व मूल्यवान् पदार्थांचा व्यापार चालत असे. द्वारकेच्या उत्तरेस साहा मैलांवर कच्छनगर [ हें बहुधा कच्छीगड असावें ] एथें व्यापार चाले. मांग्रोळ व पोरमेन एथेंही बराच व्यापार होता. हिंदुस्थानांतील उत्तम शहरांपैकीं दिव हें एक शहर होतें. परंतु त्याचा तीन चतुर्थांश भाग ओसाड होता. गोगो हें चांगलें शहर असून थोडेसा व्यापार तेथें चालत असे. खंबायत हें मोठें शहर असून तेथें चांगला व्यापार होता. भडोच [ भृगुकच्छ ] हें शहर बारीक कापड व कापूस ह्या जिनसांविषयीं प्रख्यात होतें. जरी पुष्कळ दंगेधोपे व उलटापालटी झाल्या होत्या तरी सुरत हें फार मोठें शहर असून तेथें व्यापारही मोठाच होता. नवसरी एथें बारीक व जाडें कापड काढण्याचा कारखाना होता. गणदेवी एथून इमारती व गलबतें बांधण्याच्या उपयोगी पडणारा उत्तम साग बाहेर जात असे.

चौलाचे दक्षिणेस गोव्यापर्यंत किनाऱ्यावरचीं शहरें लहान, भिकार व ओसाड असून त्यांत व्यापार चालत नसे व त्यांचे लोकांपासून ह्या सर्व किनाऱ्याला उपद्रव फार होत असे. खुद्द गोव्यांतही ताडी खेरीज दुसऱ्या कोणत्याही जिनसांचा व्यापार चालत नसे. ताडी मात्र इंग्रज लोक पिण्याचा ‘ पंच ’ नामक पदार्थ तयार करण्याकरितां पुष्कळ घेत असत. गोवें व कन्याकुमारी भूशिर यांचे दरम्यान कारवाड, होनावर व भातकल एथें चांगला व्यापार होता. कानडा प्रांतांत मंगळूर हें व्यापाराचें मोठें पीठ होतें आणि कानानूर, कालिकोट, व कोचीन हीं व्यापाराचीं मोठीं स्थळें होतीं. हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावर फोर्ट सेंट् डेव्हिड् हें स्थान अतिभरभराटीच्या स्थळांपैकीं एक होतें. मद्रास हेंही पुष्कळ लोकांच्या वसाहतीचें स्थळ होतें. तसेंच मच्छलीपट्टण, कलकत्ता व हुगळी हीं व्यापाराचीं मोठीं स्थळें होतीं.

इराणी अखाताच्या पूर्व किनाऱ्यावर गांब्रून एथें इंग्रज व डच् लोकांच्या वखारी असून चांगला व्यापार चालत असे. कांग एथें

थोडा व्यापार होता. बुशायर एथें बराच व्यापार होता. बसोरा व बगदाद हीं शहरें मोठीं होतीं. परंतु रोगाच्या सांतीमुळें व तुर्क लोकांनीं हल्ला करून तीं शहरें जिंकल्यामुळें तेथें व्यापाराची मंदी झालेली होती. त्या अखाताच्या पश्चिम किनाऱ्यावर मस्कत हें मजबूद शहर असून त्यांत व्यापाराच्या जिनसांचा भरपूर पुरवठा असे. आरबस्थानच्या पूर्व किनाऱ्यावर कुरियामुरिया, डोफर, व कासिन ह्या बंदरीं व्यापार थोडा असून तेथील लोकांना परदेशचे लोक आवडत नसत. एडन एथें तर फारच थोडा व्यापार असे. किनाऱ्यापासून दूर आंतील प्रदेशीं सुनन ह्मणून शहर होतें तेथें इंग्रज व डच् यांच्या वखारी होत्या. या शहरांत माल आणण्याचें व शहरांतून माल बाहेर नेण्याचें मोचा ह्मणून बंदर होतें. त्या बंदरीं एडन एथील व्यापार गेला होता. तांबड्या समुद्राच्या लगत्याच्या व्यापाराच्या स्थळांपैकीं त्याच्या पूर्व किनाऱ्यावरील जिड्डा व पश्चिम किनाऱ्यवरील मासुआ हीं स्थळें व्यापाराच्या संबंधानें महत्वाचीं होतीं. आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील मागाडोक्सो, पट्टा, मोंबास, व मोझांबिक यांचा हिंदुस्थानाबरोबर फारच थोडा व्यापार चाले. मोंबासापर्यंतचा ह्या किनाऱ्याचा दक्षिण भाग पोर्टुगीज लोकां· कडून मस्कतच्या इमामाकडे नुक्ताच [इ.स. १६९२–१६९८] गेला होता ह्मणून, व मोझांबिक एथील इंग्रज यांचे लोकांचा उपद्रव या किनाऱ्यास होत असे ह्मणून, एथील व्यापार अगदीं बसला होता. मोंबासाचे दक्षिणेकडील स्थळीं फारसा व्यापार नसे. पोर्टुगीज लोक सेना शहरीं व ब्रिटिश लोक नेटल् प्रांतीं जो थोडा व्यापार करीत तेवढाच काय तो व्यापार तिकडे होता. सिंहलद्वीप बेटांतील जंगी व्यापार इंग्रज व डच् यांचे हातीं सर्वस्वी होता. बंगालच्या उपसागराचे पूर्व किनाऱ्यावर चितेगांग, आराकान, व सिरियान हीं व्यापाराचीं मुख्य स्थळें होतीं. पेगू प्रांतांतील ह्या सिरियान बंदरीं मात्र सर्वांना व्यापार करण्याची मोकळीक होती. सियामदेशाबरोबर लढाई जुंपल्यामुळें व ब्रह्मदेशानें जिंकल्यामुळें या शहराचें वैभव नुकतेंच नष्ट झालेलें होतें. त्याच्या पलीकडे पूर्वेस मेर्गी, टेनासेरिम, व मलाका हीं व्यापाराचीं स्थानें होतीं. पैकीं शेवटचें डच् लोकांचे ताब्यांत असून तेथें व्यापार

फार कमी असे. सुमात्रा बेटांतील आचीन शहर एथें हिंदुस्थानांतील जिनसांचा चांगला खप होत असे. त्याच बेटांतील बेनूकोलिनू शहरांत इंग्रजांची एक वसाहात होती. जावा व बोर्नेओ या बेटांतील मसाल्याचे पदार्थांचा मातबर व्यापार डच लोकांचे हातीं होता. सियाम व कंबोडिया हे देश मातबर असून इंग्रजांबरोबर व्यापार करण्याविषयीं उत्सुक असत. कोचीन चीन एथें व्यापार अगदीं थोडा होता. परंतु टांकिन हें शहर बळकट असून तेथें पुष्कळ व्यापार असे. ज्या ठिकाणीं फार संपत्ति व उत्तम बादशाही अमल होता असा जो चीनीदेश त्यांतील कांटान, आमाय, व सुच्यु या मुख्य स्थळीं व्यापार करण्याची मोकळीक इंग्रजांस होती. अठरावे शतकाचे आरंभीं आमॉय हें इंग्रजांचें मुख्य व्यापारस्थान होतें. परंतु पुढें कांहीं वर्षांनीं बादशाहाचे हुकमावरून तेथें व्यापार करण्याची मनाई झाली. इ. स. १६९१ त जपानचे लोक पोर्टुगीज लोकांवर उठले व त्यांनीं ख्रिस्ती लोकांना ठार मारिलें. पुढें पोर्टुगाल देशाच्या राजकन्येचें लग्न इंग्लंडच्या दुसऱ्या चार्लस राजाबरोबर झालें. ती संधी साधून, इंग्रजांस जपानांत व्यापाराची मनाई करण्याविषयीं, जपानांतील लोकांचे मनांत डच् लोकांनीं भरून दिलें.

मुंबई व ठाणें जिल्ह्यांतील इतर बंदरें यांमध्यें मुख्यत्वेंकरून धान्य, भाजीपाला, फळफळावळ, कोंबडीं, व मेंढरांचें मांस या जिनसांचा व्यापार चालत असे. पैकीं मेंढरांचे मांसाचा खप मुंबईत होत असे. घरें व गलबतें बांधण्याकरितां वसईहून साग बाहेर जात असे. पोर्टुगीज लोकांनीं बसविलेले व मुंबईत बसलेले कर यांचे योगानें या किनाऱ्यावरील स्थळीं चालणाऱ्या व्यापारास फार हरकत येत असे. इंग्रज, पोर्टुगीज, व मराठे यांनीं मालावर बसविलेल्या जकाती व दक्षिणेंतील दंगेधोपे यांच्या योगानें किनाऱ्यापासून दूर असणाऱ्या आंतील प्रदेशांतल्या स्थळींही मोठा व्यापार चालण्यास प्रतिबंध होत असे. गुजराथेंतून मुख्यत्वेंकरून धान्य, कापड, व कापूस बाहेर जात असे. काठेवाडांतून कापूस, धान्य, कापड, डाळ, व लोणी बाहेर जात असे आणि मिरीं, साखर, व सुपारी हे जिन्नस काठेवाडांत येत असत. दक्षिण

कोंकणांतील बंदरांपैकीं जंजिरा एथून गुरें व गोवें एथून ताडी बाहेर जात असे. कानडाप्रांतांतून साग व गलबतें बांधण्याचीं लांकडें बाहेर जात. मलबारांतून तांदूळ, चंदन, मिरीं, सुपारी, लोखंड, व पोलाद, बाहेर जाई. मद्रासच्या पूर्व प्रदेशांतील बंदरांतून हिरे, उत्तम तंबाकू, व सुंदर चिटें बाहेर जात. कलकत्ता व हुगळी एथून सोरा, कापड, रेशीम, व अफीण [ अहिफेन ] बाहेर जाई.

इराणी आखातावरील बंदरीं हिंदुस्थानांतील कापड व इमारतीचीं लांकडें, आणि युरोपांतील कापड व लोखंडी सामान येत असे आणि खजूर, गुलाबपाणी, व वाळलेले मासे हे जिन्नस त्या बंदरांतून बाहेर जात. आरबस्थानाच्या पूर्व भागांतील बंदरीं जाडींभरडीं चिटें येत व बोळ, कवड्या ऊद, धूप, मोत्यें, घोडे,आणि राळ हे जिन्नस तेथून बाहेर व्यापाराकरितां जात. एडन एथून सुरेख व जोमदार घोडे बाहेर जात. ते फार महाग असत. त्यामुळें एका घोड्याची किंमत ९००।६०० रुपये पडली तर ती फार थोडी असें समजत असत. मोखा बंदरातून बुंद,बोळ, व धूप बाहेर जाई. सोकोत्रा बेटांतून बोळ बाहेर जात असे, आणि हबस देशांतील बंदरांतून हलकें सोनें, हस्तिदंत, गुलाम, बुंद, व शहामृगाचीं पिसें हे जिन्नस बाहेर जात. पोर्टुगीज लोक सेना शहराबरोबर थोडेसा सोन्याचा व्यापार करीत व ब्रिटिश लोक नेटल् प्रांतांत हस्तिदंताचा व्यापार करीत. एवढाच काय तो आफ्रिकेच्या पूर्व भागांतील बंदरीं व्यापार होत असे. दालचिनी, पाच, इंद्रनील, शिवधातु, यां विषयीं सिंहलद्वीपाची ख्याति होती. पेगु प्रांतांतील सिरियान शहरीं हिंदुस्थानांतील जिन्नस, युरोपांतील टोप्या, चांदी व शिसें जात असे. हे धातु नाण्यासारखे तेथील बाजारांत चालत. इमारतीचीं लांकडें, हस्तिदंत, लाख, लोखंड, कथील, खडकेल, माणकें व हिरे हे जिन्नस तेथून बाहेर जात. सुमात्रा बेटांतील आचीन व बेनकोलिन या शहरीं हिंदुस्थानांतील जिनसांचा खप होत असे आणि उत्तम सोन्याची माती व हस्तिदंत हे जिन्नस तेथून बाहेर जात. सियामांत इमारतीचें लांकूड व अगरू उत्पन्न होत असे. क्यांबोडिया देशांत हस्तिदंत, लाखेच्या कांड्या,गोंद,व कच्चें रेशीम उत्पन्न होत असे.

टॉंकिन शहरांत सोनें, तांबें, कच्चें रेशीम, रोगणी सामान, व चिनी मातीचीं भांडीं या जिनसांची समृद्धि होती. कच्छ प्रांतांत उत्पन्न होणारा धूप चीन देशांतील बंदरीं खपे आणि तिकडून सोनें तांबें, कच्चें व तयार केलेलें रेशीम, रोगणी सामान, मातीचीं भांडीं, चहा व रेवाचिनी हे जिन्नस बाहेर जात. जपानांत सोन्याची समृद्धि होती. तेथून बाहेर जाणारीं मातीचीं भांडीं, रोगणी सामान, रेशमी कापड, हे जिन्नस चिनांतील जिनसांहून चांगले असत.

इंग्लंडांतून शिशाचे गोळे, डामरानें भरलेलीं पिपें, तरवारींचीं पातीं, चाकू, चष्मे, आरसे, कांचेच्या हंड्या, गुडगुड्या, गुलाबपाण्याच्या वाटच्या, बंदुका, आणि वेलबुटीदार हिरवें, किरमिजी, व पांढरें कापड, हे जिन्नस हिंदुस्थानांत येत. नीळ, मिरीं, बुंद, औषधी द्रव्यें, कच्चा कापूस, कापड, कमावलेला कापूस, बोळ, एलिया बोळ, सोरा, व मलमल हे जिन्नस इकडून तिकडे जात.

मुंबईस व्यापाराकरितां येणाऱ्या लोकांपैकीं कंपनीचे नोकर व इतर खासगी रीतीनें धंदा चालविणारे इंग्रज व्यापारी यांची संख्या पूर्वींपेक्षां वाढली होती. इंग्रजांखेरीज आर्मिनियन, हिंदु, व मुसलमान हे ही मुंबईत व्यापार करीत असत. पूर्वीप्रमाणें या काळींही हिंदु व्यापारी फार दूरदूरच्या स्थळीं व्यापाराकरितां जाऊन राहात असत. मुंबईतील लोकसंख्या वाढविण्याकरितां इ. स. १६६९ त ज्या युक्त्या योजण्यांत आल्या होत्या त्यांपैकीं, इराणी वाणी ह्यांचें या बेटांत राहण्याविषयीं मन वळवावें, ही एक होती. इ. स. १७०० च्या सुमारास बंदर आबास एथें हे इराणी वाणी फार झाले होते व ते फार श्रीमानही होते. त्यामुळें कोणी गुरांचा वध करूं लागला तर त्यास पैका देऊन त्या हिंसेचें निवारण ते करीत असत. कांग, बसोरा, व मोखा एथें ही हें वाणी घरें करून राहिले होते.

इंग्रज लोक या वेळीं जीं गलबतें वापरीत असत त्यांपैकीं कांहीं फारच मोठीं असत. एका प्रसंगीं ह्यामिल्टन् ज्या गलबतावर नाखवा होता त्या गलबताला तरंगण्यास एकवीस फूट खोल पाणी लागत असे. एतद्देशीय व्यापाऱ्यांपाशींही उत्तम तारवांचा मोठा संग्रह असे. दोन- शांपासून आठशें टनापर्यंत ओझें नेणारीं लहानमोठीं वीस तारवें सुर-

तेथ्या एका मुसलमान व्यापाऱ्याजवळ होती. हिंदुस्थानांतील मोंगल व्यापारी इंग्रज लोकांना आपल्या गलबतांवर नाखव्याच्या जागा देत. त्यामुळें ते बरेच दुर्मिळ झाले होते. ते त्या नाखव्यांना चांगला पगार देऊन दुसऱ्या सुखसाधनांची ही सोय करून देत असत.

या काळीं चांचे लोकांपासून समुद्रांत प्रवास करणाऱ्यांना विशेष उपद्रव पोंचत असे असें दिसतें. या चांच्यांपैकीं युरोपियन चांचे फारच भयंकर होते. त्यांत क्यापटन एव्हरी, किड्, व ग्रीन हे तर मोठे विख्यात होते. मादागास्करबेटाजवळ एक, व बंगाल्या [ वंगदेश ] च्या उपसागराच्या पूर्व तीरावर एक, अशीं त्यांचीं दोन माहेरघरें होतीं, असा ह्यामिल्टन याचा लेख आढळतो. मस्कत एथील आरब चांचे हे युरोपियन चांच्यांचे खालोखाल भयंकर होते. हे कधीं कधीं पंधराशें लोक बरोबर घेऊन हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्याला उपद्रव देत असत. खुद्द हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर चांच्यांचीं पुष्कळ स्थानें होतीं. काठेवाडच्या उत्तर किनाऱ्यावरचे संगाणी लोक व दक्षिण किनाऱ्यावरील छाणी एथील वारेल लोक, कोंकणांतील शिद्दी, मराठे, आंग्रे, व सावंत, आणि मलबार किनाऱ्यावरील पोर्का एथील चांचे लोक, हे या हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील चांच्यांत प्रमुख होते.

इंग्लिशकंपनी व लंडनकंपनी या दोघींचा, इ. स. १७०८ त, मिलाफ झाल्यावर मुंबईची निकृष्ट स्थिति जाऊन तिला पूर्वीची चांगली स्थिति येऊं लागली. इ. स. १७१६ वें वर्ष येई तों १६००० पर्यंत तेथील लोकसंख्या वाढली, खाण्यापिण्याचे जिनसांची विपुलता झाली, व एक मजबूद बांध घातल्यामुळें खाजणांतील दलदल वाळून जाऊन हवा रमणीय झाली. थोडेशी खबरदारी घेतल्यानें ही मनोहर हवा इंग्लंडच्या हवे इतकी आरोग्यदायक होत असे. मुंबई-शहरा सभोंवतालची भिंत बांधण्याचें काम इ. स. १७१६ त संपलें. इ. स. १७१५ चे नवंबरांत क्याथिड्रल [ खिस्ती धर्माचें देऊळ ] बांधण्याच्या कामाची सुरवात झाली होती. तें इ. स. १७१८ त संपलें. ठाणे जिल्ह्याच्या इतर सर्व भागांत, औरंगजेबाच्या मरणानंतर, नव्या भांडणांची सुरवात झाल्यामुळें, नुकसानी होऊं लागली. औरंगजेबाच्या मरणानंतर

लवकरच शाहू बंदींतून सुटल्यामुळें मराठयांत दुफळी होऊन मराठी राज्याच्या मुख्य मुख्य मंडळींत कलह सुरू झाला. या संधीस आंग्रया बहुतेक अंशीं स्वतंत्र झाला व त्यानें ठाणें जिल्ह्याच्या दक्षिण भागांत पूर्वेस बोरघाटाजवळच्या राजमाची किल्ल्यापर्यंत आणि उत्तरेस भिवंडीपर्यंत आपला अमल बसविला. या वेळीं आरब चांच्यांपासून या जिल्ह्यांतील किनाऱ्यावरील प्रांताला जितका उपद्रव पोंचला तितका कधींच पोंचला नव्हता. ज्या पोर्टुगीज लोकांच्या आरमाराबरोबर लढाई करणें ते आरब पूर्वी टाळीत असत, त्या आरमाराबरोबरच, त्यांनीं, इ. स. १७१२ पासून इ. स. १७२० पर्यंत, चार वेळा लढाई केली. याच वेळेच्या सुमारास [ इ. स. १७१३ ], बाणकोटाजवळच्या श्रीवर्धन गांवचा, बाळाजी विश्वनाथ नांवाचा, चितपावन ब्राह्मण सातारा एथील मराठे राजांचा मुख्य मंत्री झाला. इ. स. १७२० त मोंगल कोंकणांतून निघून गेले व इ. स. १७३० त सातारा आणि कोल्हापूर एथील राजांमधील तंटे मिटले. त्यामुळें हा बाळाजी विश्वनाथ फार प्रबळ झाला. इ. स. १७१३ पासून १७२७ पर्यंत आंग्र्याच्या प्राबल्याचा कळस झाला. इ. स. १७१७, १७१९, १७२०, व १७२२ या वर्षीं अनेक प्रसंगीं मुंबईतील इंग्रजांनीं कधीं कधीं मदतीशिवाय व कधीं कधीं पोर्टुगीज लोकांच्या मदतीनें विजयदुर्ग, खांदेरी, व कुलाबा या स्थळांवर हल्ला केला. परंतु तीं स्थळें त्यांच्या हातीं लागलीं नाहींत.

इ. स. १७२० च्या सुमारास पोर्टुगीज व इंग्रज यांमध्यें विशेष वैमनस्य आलें. मुंबई बेटांत सुमारें ५०००, ह्मणजे सर्व लोकसंख्येच्या एकतृतीयांश इतके, पोर्टुगीज लोक होते. त्यांना इंग्रजांवर उठण्याविषयीं पोर्टुगीज पाद्री उत्तेजन देत आहेत असें मुंबईसरकारच्या समजण्यांत आलें. तेव्हां असा ठराव करण्यांत आला कीं, यापुढें गोव्या [ गोमंतक ] चा व्हैसराय [ राजप्रतिनिधि ] यानें पाद्र्यांची नेमणूक करूं नये. तर मुंबईतील पोर्टुगीज लोकांनींच तो निवडावा व त्याची निवड ते लोक करतील त्याला मुंबईसरकारानें पाद्री नेमावा. हा फेरफार झालेला पाहून पोर्टुगीज लोकांचा जनरल् आफ् दि नार्थ् हा अधिकारी फार संतापला. नंतर त्यानें मुंबईस खाण्यापिण्याचे जिन्नस

माण्याची बंदी केली आणि माहीमच्या खाडींतील इंग्रजांचीं गलबतें पकडलीं. इ. स. १७२० चे जुलै महिन्याचे ९ वे तारखेस मुंबईचा गव्हर्नर बून यानें असा जाहीरनामा लाविला कीं, जे पोर्टुगीज लोक मुंबईत नसतील त्यांच्या जमिनी जप्त केल्या जातील. या प्रसंगीं पुष्कळ मालमत्ता इंग्रजांकडे आली. तेव्हां जेजुइट पंथाच्या लोकांपासून परळ एथील इमारत घेऊन तिलाच सरकारी बंगला असें नांव ठेविलें. वर सांगितलेला मुंबईसरकारचा जाहीरनामा,वांद्र्यांत प्रकट करण्याकरितां, जे लोक घेऊन गेले होते त्यांना तेथील पोर्टुगीज लोकांनीं पकडलें, आणि हातापायांत बिड्या घालून ठाणें एथें नेऊन त्यांना फांशीं देण्याचे खांबाशीं उभें केलें. पुढें शरीरास कांहीं इजा न होतां ते परत मुंबईस सुखरूप आले. परंतु ते फार शोकाकुल झालेले होते व अतिशय भ्यालेले होते. याप्रमाणें ते परत आल्यावर ब्रिटिश सैन्याची एक लहानशी टोळी माहिमास पाठविण्यांत आली. तेव्हां वांद्रें एथील जेजुइट पंथाच्या देवळाच्या आढ्यावर एक कुलपी गोळा रोखल्याप्रमाणें अचूक जाऊन पडल्यामुळें तेथील पुष्कळ पाद्री ठार मेले व बाकीचे तह करण्यास तयार झाले. पुढें दोन वर्षे गेल्यावर कांहीं पोर्टुगीज लोक केलेला करार न जुमानतां एक किल्ला नीट करीत आहेत असे आढळून आलें. हा किल्ला कुरल्याजवळ असावा असें दिसतें. हा किल्ला नीट करणाऱ्यांवर इंग्रजांनीं हल्ला केला. या हल्लयांत सुमारें १९।३० लोक पडल्यावर ते तेथून निघून गेले.

इ. स. १७२७ त आपल्या सत्तेचा ऱ्हास होण्याच्या क्रियेस कांहीं प्रतिबंध करण्याचा यत्न पोर्टुगीज लोकांनीं केला.तो असा.ठाणें जिल्ह्यांतील मुलखाच्या रक्षणाच्या साधनांची तपासणी करून त्यांत कोणती सुधारणा केली पाहिजे ती सुचविण्याकरितां एक अधिकारी त्यांनीं नेमिला व मुंबईबेट पैका देऊन विकत घेण्याचा त्यांनीं बेत केला. या तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे दृष्टीस पडलें कीं, सर्व कामगार गाफिल व लबाड असून रक्षणाच्या कामीं व्यवस्थितपणा मुळींच नाहीं. हवे त्यावेळीं लढाईच्या कामीं उपयोगी पडण्याकरितां तयार केलेल्या लोकांत मोठा गोंधळ असून ज्याचा पायपोस त्याचे पायांत मुळींच नाहीं. किथेकांना क्यापटन हा हुद्दा होता व कित्येकांना कार्पोरल ह्मणत. परंतु सर्वच प्रमुख गणले

आतं. दमणच्या रिसाल्यांत चाळिसांहून अधिक स्वार नव्हते व वसई-च्या रिसाल्यांत आठांहून अधिक स्वार नव्हते. हे स्वार फार दुराचारी झाले होते व फेरफटक्याची संवय नाहींशी झाल्यामुळें घोडेही रोगी झाले होते. ह्मणून घोडेस्वारांना किल्ल्यांत ठेवून पायदळाला रणांगणांत जावें लागत असे.

वसईच्या किल्ल्यांत नव्वद तोफा होत्या ८० तोळ्यांचा एक शेर अशा पक्क्या दीड शेरापासून बारा शेरांपर्यंत त्यांस दारू लागत असे. तेथें शिबंदीचे ऐंशी लोक होते. त्यांपैकीं बहुतेक एतद्देशीयच होते. ह्या शिबंदीच्या लोकांतून पुष्कळजण आजारी किंवा कामगिरी कर-ण्यास असमर्थ होते. ऐथें बाराजण गोलंदाज होते. त्यांपैकीं पांचजण निरुपयोगी होते. एथील शिपाई लोकांस कायद्याची कदर मुळींच नव्हती. ह्यामुळें अति ऊन किंवा अति पाऊस पडूं लागला ह्मणजे पहा-रेकरी लोक आपली पहारा करण्याची जागा सोडून देऊन शेजारच्या घरीं जाऊन बसत. एथील किल्ल्याचे तट पुष्कळ ठिकाणीं मोडलेले होते. समुद्राकडच्या बाजूस किल्ल्याचे तटा इतका उंच एक वाळवेचा बांध पडला होता. भातशेतांचें रक्षण होण्याकरितां लोकांनीं गडगे घालून भरतीचे पाण्याचा ओघ उत्तरेकडे वळविल्यामुळें तिकडच्या तटाला भरतीच्या पाण्यापासून इजा होत असे. वसई व आगाशी यांचे मधील प्रदेश हिरवागार व सुपीक असून त्यांत झाडें पुष्कळ असल्यामुळें ठाणें जिल्ह्यांत तो अत्युत्तम स्थि-तींतील प्रदेश होता. परंतु ह्या प्रदेशाचें रक्षण ज्या खाडीच्या द्वारें होत असे ती होरून गेली होती. ह्यामुळें पाय न भिजतां कित्येक ठिकाणीं तिला उतार होत असे. सोपाऱ्याच्या पूर्वेस सुमारें दोन मैलांवर जो नीळडोंगरी आहे तिजवर, ज्याला इंजनेरचें काम येत नव्हतें अशा आडाणी मनुष्याचें हातून, बुरूज वगैरे बांधून बंदोबस्त केलेला होता. ते बुरूज इतके लहान होते कीं, पक्क्या दोन शेर दारूची लहान तोफ सुद्धां त्यांवरून उडवितां येत नसे. खुद्द सोपाऱ्यास बोळिंजवळच्या मोठ्या भगदाडाचा बंदोबस्त लांकडी मेढेकोट बांधून केलेला होता. परंतु ह्या मेढेकोटाचें खांब कुजून गेल्यामुळें दोन तोफांचें वजन सुद्धां सहन करण्याची त्यांना शक्ति नव्हती. सेवान एथील ताडामाडाचा मेढेकोट इतका अशक्त

झालेला होता कीं थोड्याशा गोळीबारांनीं तो जमीनदोस्त होण्याचे पंथांत होता. सेवान परगण्यांतील गांवांचें रक्षण करण्याकरितां शिपायांच्या पांच कंपन्या ठेविलेल्या होत्या व त्यांत नांवाचे अडीचशें लोकही होते. परंतु सांप्रतच्या अगदीं निकृष्ट दशेचे प्रसंगीं प्रत्येकींत फार तर दहाबारा माणसें आहेत असें दिसून आलें. हे लोक चोरटे असून त्यांना आपल्या इष्टमित्रांपासून पैसा उपटण्याचें मात्र सामर्थ्य होतें. परंतु शत्रूंच्या समोर उभें राहा- ण्याची त्यांस मुळींच छाती होत नसे. ते कवाईत अगदीं विसरून गेले होते. त्यामुळें त्यांचा व कवाईतींतल्या शब्दांची ओळख सुद्धां नाहींशी झाली होती. कामन मधून सुलभ रीतीनें साष्टींत येण्याला वाट होती. वसई परगणा व गोवें प्रांताचा बराच मोठा भाग ह्यांचा ज्याच्यावर निर्वाह चालत असे तें ७१ गांवांचे मातबर साष्टी [ षटषष्टिद्वीप ] बेट हें असें अगदीं उघडें व निराधार पडलेलें पाहून रडें कोसळत असे. सिद्दी, इंग्लिश लोक, किंवा मराठे लोक यांतून पाहिजे त्याला ह्या बेटावर हल्ला करितां येण्याजोगें तें अगदीं उघडें होतें. ठाणें एथील खाडीला ओहोटीचे वेळीं पायउतार होत असे. ह्या पायउताराचें रक्षण करण्याकरितां दक्षिणचे बाजूस स्याम् पेड्रो व स्याम् जेरोनिमो ह्मणून दोन बुरूज बांधलेले होते. त्यांपैकीं एकावर चार तोफा व चार सोजीर असत आणि दुसऱ्यावर दोन तोफा व दोन सोजीर असत. उत्तरच्या बाजूस डेस् मेगास् ह्मणून एक बुरूज बांधलेला होता. त्याजवर चार सोजीर व चार तोफा होत्या. हे बुरूज अगदीं निरुपयोगी झालेले होते. त्यांच्यापासून गलबतें जाण्यायेण्यास मात्र प्रतिबंध होत असे. परंतु शत्रूस हरकत करण्याची ताकद त्यांच्यामध्यें नव्हती. ह्मणून एक उत्तम किल्ला बांधून ह्या खाडीचें रक्षण करणें जरूर होतें. वेसावें एथील किल्ला लहान, ओबडधोबड, जुना, व मोडकळीस आलेला होता. त्या किल्ल्यांत शिबंदीचे ६० लोक व दहा तोफा होत्या. परंतु त्यांपैकीं दोन तोफा मात्र उपयोगी पडण्यासारख्या होत्या. शहाबाद ऊर्फ बेलापूर एथील किल्ल्यांत शिपायांच्या चार कंपन्या असून त्यांत १८० लोक होते. खेरीज पक्क्या दोन शेरांपासून साहा शेरांपर्यंत दारू लागणाऱ्या चवदा तोफा तेथें होत्या. करंजे बेटांत चारशें लढाऊ लोक होते.

तेथील मैदानांतील किल्ल्यांत पन्नास शिबंदीचे लोक, एक गोलंदाज, व अच्छेरापासून तीन शेर पर्यंत दारू लागणाऱ्या साहा तोफा होत्या.

उत्तरेकडे किल्ला हें नांव शोभणार नाहीं अशी मनोरच्या किल्ल्याची स्थिति होती. त्याच्या तटाची उंची कित्येक स्थळीं साहा फुटांहून अधिक नव्हती. तेथें शिबंदीचे १०४ लोक होते व आठ तोफा होत्या. त्यांपैकीं पांच तोफा अगदीं निरुपयोगी झालेल्या होत्या. तेथील दारूगोळ्याची कोठी वाईट होती व बुरूज मोडकळीस आलेले होते. तेथील किल्लेदार हा लोकांना इमारती लांकडें पुरविण्याचीं कंत्राटें घेत असे व आपल्या योग्य कामाकडे दुर्लक्ष करून आपल्या हाताखालच्या लोकांना लांकडाचे ओंडे ओढावयास लावीत असे. अशेरीच्या किल्ल्यांत १९० लोक होते. परंतु तेही मनोरच्या किल्ल्यांतील लोकांप्रमाणेंच शिपायाचें काम न करितां लांकडांचे ओंडे ओढण्याचें काम करीत असत. याप्रमाणें मुलखाचें रक्षण करणारे सर्व शिपायी लोक आपापल्या कामाकडे लक्ष्य देत नसल्यामुळें त्यांस दिलेला पगार वाया जात होता. या शिपायी लोकां-पैकीं पुष्कळजण म्हातारे व निरुपयोगी झालेले होते.

केळवें माहिमचा किल्ला अव्यवस्थित व अशक्त झालेला होता. तेथील शिबंदींत साठ लोक होते. त्यांपैकीं सात असामी गोरे होते. पक्क्या एक शेरापासून पांच शेरांपर्यंत दारू लागणाऱ्या १५ तोफा तेथें होत्या. परंतु तेथें गोलंदाज मुळींच नव्हते. एथील पुष्कळ शस्त्रें निरुपयोगी झालेलीं होतीं. एथें एक मेढेकोट असून त्याजवर एक किल्लेदार व तीस लोक होते. त्यांपैकीं कल्याणच्या समोरच्या बाजूच्या सांटा क्रूझ किल्ल्यांत १४ असामी पाठविलेले होते. तारापूर एथें साठ लोक होते व दीड शेरापासून साहा शेरांपर्यंत दारू लागणाऱ्या वीस तोफा होत्या. ह्या तारापुरासही गोलंदाज मुळींच नव्हते. एथील साठ लोकांपैकीं तीस असामी सांटा क्रूझ एथें पाठविलेले होते. चौकशी करणाराला हा सर्व अव्यवस्थित कारभार नाहींसा करण्याचें दुर्घट दिसूं लागलें. कारण अव्यवस्थितपणा लोकांचे अंगांत इतका भिनला होता कीं, तो त्यांना स्वाभाविक वाटूं लागला होता. खेरीज पैशाची टंचाई होती. पैसा खर्चून सर्व अव्यवस्था दूर करून सर्व नीटनेटकें केलें तरीही अधिक

गोरे लोक ठेवले नाहींत तर पुनरपि पूर्ववत् अव्यवस्था होण्याची भीति होती. गेल्या वीस वर्षांत पोर्टुगीज लोकांच्या राज्याचा ऱ्हास फार जलद होत आलेला हाता.

पोर्टुगीज लोकांच्या फौजेंत सांप्रत अनेक लहान लहान टोळ्या होत्या. त्यांपैकीं एकीचा मेळ दुसरीला नसे. तीन कंपन्या गोव्याचे फौजेतल्या होत्या, सहा कंपन्या फिरत्या होत्या, दोन कंपन्या मुलखाची व्यवस्था पाहाणाऱ्या अधिकाऱ्यांच्या होत्या, व सात कंपन्या देशी शिपायांच्या होत्या. ह्या खेरीज आलीकडे नऊ नव्या कंपन्या चाकरीस ठेवण्यांत आल्या होत्या. परंतु त्यांतील लोकांना पगार मिळत नसे व त्यांजवरील कपापटन् लोकच त्यांना खावयास घालीत असत. शिपायांच्या आणखी वीस कंपन्या ठेवणें, व्यवस्थित रीतीनें त्यांचे हजिरीपट लिहिणें, पगाराचीं सरटिफिकिटें देणें, व पगार वाढविणें, इतक्या गोष्टी करण्याची अवश्यकता दिसून आली. या वीस कंपन्यांपैकीं निम्मे लोक गोरे असण्याचीही जरूरी होती. मराठे मात्र काय ते भीति बाळगण्यासारखे शत्रु या वेळीं पोर्टुगीज लोकांना होते. ह्यामुळें त्यांच्याशीं दोस्ती करण्याची अवश्यकता होती. गेल्या तेरा वर्षांत दमण एथील हतभागी जमिनीची दुर्दशा ज्या हल्ल्यांच्या योगानें झाली होती त्याचें निवारण, मराठ्यांकडे दर वर्षास नजराणे पाठविल्यानें, होण्यासारखें होतें. अवल वहिवाटी-प्रमाणें पोर्टुगीज लोकांतील बडे लोकांनीं प्रत्येक गांवीं एकेक किल्ला किंवा बुरूज बांधून त्याच्या सभोंवतीं खंदक खणावा व लढाऊ वीस माणसांची एकेक टोळी जवळ बाळगावी असा सक्त हुकूम करण्याचीही अवश्यकता होती.

याप्रमाणें पोर्टुगीज लोकांच्या मुलखांतील अव्यवस्था उघडकीस आल्यामुळें पुष्कळ फायदा झाला. तो असा. त्यांनीं ठाणें एथे एक सुंदर किल्ला बांधण्याचें काम सुरू केलें. इतर ठिकाणचे किल्ले नीट केले व शिबंदीचे लोक वाढवून ते अधिक उपयोगी पडतील अशी व्यवस्था केली. मुंबईबेट विकत घेण्याच्या उद्देशानें पोर्टुगीज व्हाइसराय जोआओ डी साल्डाना डा गामा यानें ता. १८ जानेवारी सन १७२७ रोजीं तें बेट विकत घेण्यास किती खर्च येईल व ती रकम कशी उभी करावयाची याबद्दल पोर्टुगालच्या राजाकडे एक मोठा

रिपोर्ट केला. या संबंधानें इंग्रज लोकांशीं कांहीं बोलणें झालें नव्हतें. तथापि इ. स. १७३९ त पोर्तुगीज लोकांचा मोड होईपर्यंत या संबंधानें चवकशी व हिशेबाठिशेब चाललेच होते.

इ. स. १७३१ त कान्होजी मेल्यावर त्याचे पुत्र एकमेकांशीं भांडूं लागले. यामुळें आंग्रयाचा दरारा कमी झाला. पुढें थोडया वर्षांनीं (इ. स. १७३४) याकूबखान मरून त्याचे वारसांत तंटा लागल्यामुळें शिद्दी याचेंही पारडें हलकें झालें. व इ. स. १७३५ त पेशव्यानें शिद्दी याचे पुष्कळ किल्ले घेतले. या काळीं कोंकणांत कोंकणस्थ ब्राह्मणांचे प्राबल्य फार झालें होतें. पोर्तुगीज लोक ख्रिस्ती व परकी असल्यामुळें त्यांचा हे कोंकणस्थ ब्राह्मण फार द्वेष करीत असत. व पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांतील बंदरें आणि मातबर समुद्रकिनाऱ्यावरचा मुलूख हीं प्राप्त होण्याकरितां ते फार दिवसांपासून लाळ घोंटीत होते. ह्मणून या संधीस या कोंकणस्थ ब्राह्मणांनीं पोर्तुगीज लोकांवर हल्ला केला व मराठयांनीं यांचे मुलखावर फार लगट केली. मराठयांनीं पोर्तुगीज लोकांचा आणखी एक किल्ला घेतला किंवा त्यांच्या ताब्यांतील आणखी एका प्रांताचा वसूल आपलासा केला अशी खबर मुंबईस इंग्रेजांकडे प्रतिवर्षीं येऊं लागली. इ. स. १७३१ त मराठयांनीं ठाणें घेण्याची दहशत घातली. तेव्हां मराठयांस या कामीं यश आल्यास आपल्या मुंबई बेटाला भीति आहे असें वाटून तेथील इंग्रजांनीं ठाण्यास तीनशें शिबंदीचे लोक पाठविले. परंतु पुढें लवकरच हे कुमकेस पाठविलेले लोक यांनीं परत नेले.

पेशव्याचा दोस्त मानाजी आंग्रया याचेवर उठणाऱ्या संभाजी आंग्रयाचा पक्ष पोर्तुगीज लोकांनीं धरल्यामुळें त्यांजवर हल्ला करण्यास मराठयांना निमित्त मिळालें. हा काल मराठयांना मोठा अनुकूल होता. कारण गोव्याला भोंसले उपद्रव या वेळीं देत होते व आंग्रयाचें आरमार पेशव्याचे ताब्यांत होतें. वैतरणानदीच्या नस्ताजवळचा जो अर्नाळा किल्ला त्याजवर मराठयांनीं प्रथम हल्ला केला. त्यांनीं तो किल्ला घेऊन त्यांतील शिबंदीचे लोक व किल्लेकरी यांचा वध केला. पुढें [ एप्रिल १७३७ ] त्यांनीं साष्टीवर हल्ला केला, घोडबंदर घेतलें, व तेथील

शिबंदी मारिली आणि खाडी आपलीशी करून वसईहून ठाण्यास कुमक येण्याची बंदी केली. ठाण्याचा किल्ला बांधण्याचें काम जरी बरेंच झालें होतें तरी तट वगैरे रक्षणाचीं साधनें अजून पुरतीं झालीं नव्हतीं. ठाणें एथील पोर्टुगीज किल्लेदार करंज्यास पळून गेला.तरी तेथील शिबंदीच्या लोकांनीं आपलें रक्षण मोठया शौर्यानें केलें व दोनवेळा हल्ला मागें हटविला. तरी अखेरीस त्यांना शत्रूच्या स्वाधीन होणें भाग पडलें. इंग्रजांनीं दारूगोळा व शिपायांची कुमक पोर्टुगीज लोकांकडे वांद्र्यास पाठविली. परंतु तेथील तट वगैरे रक्षणाचीं साधनें निरुपयोगी असल्यामुळें तें स्थळ त्यांना सोडून द्यावें लागलें.त्यामुळें लढण्याचे श्रम न करितां तें स्थळ मराठयांस मिळालें.पुढें आपल्या हातांतून गेलेला मुलख परत घेण्याकरितां पोर्टुगीज लोकांनीं, इ. स. १७३८ त, कष्टी मेहेनत केली. ती अशी. अशेरी एथें त्यांनीं मराठयांचा पाडाव केला. या प्रसंगीं पोर्टुगीजलोकांच्या जंगी तयारीची खबर इंग्रजांनीं मराठ्यांस दिली नसती व मराठयांचे शिबंदीला दारूगोळयाचा त्यांनीं पुरवठा केला नसता तर पोर्टुगीज लोकांना ठाणें परत घेण्याचे कामींही यश आलें असतें. इ. स. १७३९ चे जानेवारींत पेशव्याचा भाऊ चिमाजी आपा यानें मराठयांचे सैन्याचें आधिपत्य स्वीकारिलें. कातलवाडें, डहाणू, केळवें, शिरगांव, व तारापूर हे उत्तर भागांतील किल्ले पोर्टुगीज लोक निकरानें लढले तरीही त्यानें घेतले. तारापूरच्या तटांवर मराठे शिडया लावून चढले तेव्हांही पोर्टुगीज लोक फार लढले. परंतु शत्रूचे लोक फार असल्यामुळें त्यांना हार सोसावी लागली. नंतर साष्टी बेटांतील वेसावें व धारावी हीं स्थळें मराठयांचे स्वाधीन झालीं. तीं घेतल्यावर मराठयांनीं वसईला वेढा देण्याचे कामाची सुरुवात केली. तेव्हां वसईचा किल्लेदार खंडणी देण्यास तयार झाला. परंतु त्याचें बोलणें मराठयांनीं कबूल केलें नाहीं. त्यामुळें त्यानें इंग्रेजांजवळ मदत मागितली. तेव्हां प्रथमतः त्याचे विनंतीकडे कोणीं लक्षच दिलें नाहीं. परंतु कांहीं वेळानंतर त्यांनीं त्याला १५००० रुपये उसने दिले. इकडे वेढ्याचें काम मराठयांनीं मोठया कुशलतेनें व नेटानें चालविलें आणि आंग्र्याचे आरमारानें कुमक किल्ल्यांत जाण्याचा प्रतिबंध केला. तथापि नुकतेच

युरोपांतून जे पोर्टुगीज लोक आले होते त्यांचे मदतीने किल्ल्यांतील लोक इतक्या शौर्याने लढले कीं तीन महिनेपर्यंत [ ता. १७ फेब्रुवारीपासून ता. १६ मे पर्यंत ] वसई मराठ्यांचे हस्तगत झाली नाहीं. या प्रसंगीं ५००० मराठे ठार मेले. दिव व चौल या स्थळांचे रक्षण पोर्टुगीज लोकांनीं जितक्या शौर्यानें केलें त्या शौर्याचें खालोखाल शौर्य त्यांनीं या प्रसंगीं दाखविलें. या प्रसंगीं मराठे व पोर्टुगीज यांमध्ये जो तह झाला त्याचे योगानें कोणत्याही पक्षाची अप्रतिष्ठा झाली नाहीं. शिबंदीचे लोक मोठ्या शौर्यानें लढल्यामुळें त्यांना अदबीनें किल्ल्यांतून बाहेर जाण्यास परवानगी मिळाली व ज्यांची इच्छा हा मुलूख सोडून जाण्याची होती त्यांना आपल्या मालमत्तेची जमवाजमव करण्याकरितां आठ दिवसांची फुरसत मिळाली. बहुतेक फजीनदार आपापल्या इष्टेटी सोडून गलबतांत बसून गोव्यास चालते झाले. वसईंतील चार ख्रिस्ती देवळें व साष्टींतलें एक देऊळ अशीं पांच देवळें मात्र शाबूद राहूं देण्याचें मराठ्यांचे सेनापतीनें कबूल केलें. परंतु या पांचाखेरीज पोर्टुगीज लोकांच्या अमलाचीं सर्व चिन्हें मराठ्यांनीं नष्ट करून टाकिलीं. पोर्टुगीज लोकांचे धर्मोपदेशक मूर्खपणानें धर्मप्रसारार्थ फाजील खटपट करीत आणि आपल्या मुलखांतील हिंदु व मुसलमान लोकांना पोर्टुगीज लोक फार कडक रीतीनें वागवीत यामुळें त्यांचें या प्रांतांतलें राज्य नष्ट झालें असें, ज्याच्या लेखाचें प्रमाण मोठें आहे अशा, गव्हर्नर डंकन या पुरुषानें, इ. स. १८०८ च्या पहिल्या कायद्यांत, लिहिलें आहे. परंतु पोर्टुगीज लोक आपल्या अमलांतील लोकांशीं ममतेनें वागत असत, आणि सतराव्या शतकाचे शेवटापर्यंत हिंदु व मुसलमान लोक पोर्टुगीज लोकांचे अमलाखालच्या मुलखांत येऊन राहात असत असें काफीखान यानें लिहिलें आहे. यावरून ख्रिस्तीधर्मप्रसारार्थ केलेल्या फाजील खटपटीमुळें त्यांचें राज्य बुडालें असें सिद्ध होत नाहीं. युरोपांतील पोर्टुगीज लोक हिंदुस्थानांतील आपल्या अमलाखालच्या मुलखाविषयीं फारशी काळजी बाळगीत नसत व प्रत्येक किल्ल्यांतील शिबंदीचे लोकांत जितके युरोपियन लोक असावयास पाहिजे होते तितके ते ठेवीत नसत. हिंदुस्थानांतील पोर्टुगीज कामगार आपलीं तळीराम गार करण्याकडे मात्र लक्ष देत व किल्ल्यांच्या बंदि;

स्तीकडे दुर्लक्ष्य करीत. पोर्टगीज धर्मोपदेशक व इतर लोक यांचे अंगचा पूर्वीचा रांकटपणा नाहींसा होऊन त्यांच्या अंगीं मऊपणा व आळस उत्पन्न झाल्यामुळें आपल्या वाडवडिलांच्या नांवलौकिकावर सगळ्यांचा पोकळ भरंवसा असे. परंतु श्रीमंती मिळवून दुर्बल असणें ह्मणजे आपणांवर शत्रूचा हल्ला व अनर्थ ओढून घेणें होय या नियमाकडे ते जाणूनबुजून डोळेझांक करीत असत. या कारणामुळें या प्रांतीं पोर्टुगीज लोकांचा पाडाव झाला.

वसईचा पाडाव झाल्यावर तेथील पोर्टुगीज शिबंदीला घेऊन जाण्याकरितां मुंबईसरकारानें गलबतें पाठविलीं. तेव्हां तेथील किल्लेदाराचें धैर्य व त्याजवर गुदरलेला प्रसंग या गोष्टींकडे पाहून त्या सरकारानें त्यास चांगली मदत केली. पावसाळा संपेपर्यंत त्याचे हाताखालचे कामदार व सुमारें आठशें लोक यांना वसईबेटांत राहाण्याची परवानगी देऊन त्यांच्या खाण्यापिण्याच्या खर्चाकरितां दरमहा चार हजार रुपयांची नेमणूक मुंबईसरकारानें करून दिली. या प्रसंगीं साष्टीबेटांतील बहुतेक मोठमोठे पोर्टुगीज लोक गोव्यास निघून गेले. तरी बरींच कुटुंबें मुंबईस येऊन राहिलीं. ग्रोस [ इ. स. १७५० ] याचा असा लेख आढळतो कीं, बडेबडे पोर्टुगीज लोक एकाएकीं लक्षाधिपतीचे भिक्षाधिपति झाले ही गोष्ट मोठी शोचनीय होय. पोर्टुगीज लोकांना या प्रसंगीं मुंबई एथील सरकाराकडून जी मदत मिळाली तिचे खेरीज तेथील इंग्रज लोकांनीं खासगी रीतीनेंही मोठया उदारपणानें त्यांचा चांगला समाचार घेतला. त्यांत जान डी सौझा फेरास या गृहस्थांवर इंग्रजांनीं फारच दया केली. साष्टीबेटांत त्याची मालमिळकत पुष्कळ होती. तो फार मायाळू व दुसऱ्याचा आदरसत्कार करणारा असल्यामुळें इंग्रजांना तो फारच प्रिय झालेला होता. तो पुष्कळ वर्षेपर्यंत मुंबई बेटांत होता. त्याचेवर इंग्रजांची फार कृपा असे व त्याचेविषयीं त्यांचे मनांत पूज्यबुद्धि असे. आमचा बाकी राहिलेला पगार मिळेपर्यंत आम्ही मुंबईबेट सोडणार नाहीं असें पोर्टुगीज लोकांच्या फौजेंतील लोक पावसाळा गेल्यावर ह्मणूं लागले. तेव्हां मुंबईसरकारानें त्यांचा पगार चुकता करण्याकरितां ९३००० रुपयांची रकम पुढें केली. नंतर ता. २९ सपटंबर रोजीं पोर्टुगीज

लोकांना एतद्देशीय मचव्यांत बसवून व आपले लोक रक्षणासाठीं त्यांचे बरोबर देऊन, मुंबईसरकारानें, चौल एथें पोंचविलें. तेव्हां किल्लेदार व गोव्याचा व्हैसराय ( राजप्रतिनिधि ) या उभयतांनीं आपल्या लोकांवर दया केल्याबद्दल मुंबईच्या गव्हर्नराचे फार फार उपकार मानिले. पोर्टुगीज लोकांचें नष्टचर्य अजूनही संपलें नव्हतें. कारण चौल एथून ते खुषकीचे मार्गानें गोव्यास जात असतां वाटेंत, दोन तासांच्या मजलेवर गोवें राहिलें असतां, ता. १९ नवंबर रोजीं खेम सावतानें त्यांजवर हल्ला करून त्यांचा पराभव केला. त्या समयीं त्या हल्ल्यांत पोर्टुगीज लोकांचे दोनशें उत्तम लोक पडले व बाकी राहिलेले हतभागी लोक गोवें एथें आले. तेव्हां त्यांपैकीं प्रत्येकाचे मुखचर्येवर दुःख व काळजी यांचीं चिन्हें इंग्रजांचे आरमाराचे मुख्याचे दृष्टीस पडलीं. चौल व चौलखाडीच्या दक्षिण किनाऱ्यावरचा कोर्लई किल्ला इतःपर संभाळण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें तीं दोन्हीं स्थळें इंग्रजांस देण्यास पोर्टुगीज लोक तयार झाले. परंतु या दोन ठिकाणीं ठेवण्यास पुरते शिबंदीचे लोक इंग्रजांजवळ नव्हते. तथापि हीं ठिकाणें मराठ्यांस दिलीं असतां त्यांची कृपा आपणांवर होईल, आणि पोर्टुगीज व मराठे यांचें समेटही आपणांस या स्थळांचे योगानें करून देतां येईल असें इंग्रजांस वाटलें. तेव्हां पोर्टुगीज लोकांनीं हें समेट करण्याचें काम इंग्रजांवर सर्वस्वी सोंपविलें. या कामाच्या संबंधानें मराठ्यांशीं बोलणें चालविण्याकरितां इंग्रजांनीं कप्तान् इंचबर्ड यास नेमिलें. तेव्हां चौल, दमण, व गोवें एथील जकातीचा कांहीं अंश मराठे प्रथम मागूं लागले. तरी अखेरीस एकट्या चौलावरच इंचबर्ड यानें त्यांची समजूत केली आणि इ. स. १७४० त, आक्टोबरचे १४ वे तारखेस, तहाच्या कलमबंदीवर सह्या झाल्या.

मुंबई बेट, ईशान्येकडील जंगली प्रदेश, व आग्नेयीकडील प्रदेशांतील आंग्र्याचे गांव, यांखेरीज सर्व ठाणें जिल्हा पेशव्याच्या अमलांत, इ. स. १७४० त, आला. आग्नेयीकडील कोंपऱ्यांतील आंग्र्याच्या गांवांपैकीं पाहिजे ते गांव घेणें हे पेशव्याला सुलभ होतें. याप्रमाणें ठाणें जिल्ह्याचें स्वामित्व पोर्टुगीज लोकांकडून मराठ्यांकडे गेलें. तेव्हां मुंबई बेटांतील

इंग्रज लोकांना अगदीं चैन पडेनासें झालें. म्हणून वसईचा पाडाव झाल्यावर लवकरच मराठ्यांकडे दोन वकील इंग्रजांनीं पाठविले. त्यांपैकीं क्यापूटन् इंचवर्ड हा वसईस चिमणाजी आपाकडे गेला व क्यापूटन् गोर्डन हा साताराचे राजाकडे गेला. वसईच्या किल्ल्यावर मराठ्यांचा ज्या प्रकारचा हल्ला झाला होता त्या प्रकारचा हल्ला सहन करण्यासारखी मुंबई बेटांत तयारी नव्हती. तेथील शहराचा तट अकरा फूट मात्र उंच होता. मोठमोठ्या तोफांच्या योगानें त्या तटाला सहज भोकें पाडतां येण्याचा संभव होता. त्या तटाभोंवतीं खंदक नव्हता आणि तटाच्या पुढचीं घरें व झाडें हीं हल्ला करणाऱ्या शत्रूला आश्रय धरून राहावयास उपयोगी पडण्यासारखीं होतीं. ह्मणून खंदक खणण्याचें काम तावडतोब सुरू करण्यांत आलें. त्याचा खर्च भागण्याकरितां व्यापारी लोकांनीं ३०००० रुपये वर्गणीनें जमा केले. या वेळीं व्यापाराची मंदी असल्यामुळें याहून अधिक वर्गणी जमण्याचा संभव नव्हता. फौजेंतील सर्व काळे लोकांना खंदक खणण्याचें काम आळीपाळीनें करण्याविषयीं सक्त हुकूम देण्यांत आला. लष्करी खात्यांत नसणारे ह्मणजे सिविलियन लोक व इतर सभ्य गृहस्थ यांना शस्त्रें देण्यांत आलीं व त्यांचा उपयोग कसा करावा हें शिकण्याविषयीं त्यांना उत्तेजन देण्यांत आलें. हाफ्क्यास्ट लोकांना पलटणींत दाखल करून त्यांचा पगार चढविला. शिपायांची एक पलटण तयार करावी किंवा नाहीं या विषयाचीही चर्चा करण्यांत आली. शहराचे तटाभोंवता-लच्या बऱ्याच रुंद पट्ट्यावरचीं घरें व झाडें काढून टाकण्याचें फार दिवस लांबणीवर पडलेलें व मोठ्या खर्चाचें काम सुरू करण्यांत आलें. याप्रमाणें चाललेली तयारी ऐकून मराठे लोक मुंबईच्या खंदकाला जरी हंसले, व तो आम्हीं आपल्या खेटरांनीं तेव्हांच बुजवून टाकूं असें जरी त्यांनीं ह्मटलें, तरी या खंदकाच्या योगानेंच हल्ल्यापासून मुंबईचा बचाव झाला.

मराठ्यांकडे गेलेल्या दोन्ही वकिलांनीं आपलें काम मोठ्या चतुराईनें केलें व त्यांत त्यांस यशही आलें. क्यापूटन् इंचबर्ड यानें चिमणाजी आपा बरोबर आपणांस अनुकूल असा तह केला व इंग्रजांचा व्यापार फार उपयुक्त असल्यामुळें मुंबईला धक्का लावण्याचा आमचा इरादा नाहीं

असें दक्षिणेंतील प्रमुख मराठ्यांचें मत आहे असें आश्वासन घेऊन क्याप्टन् गोर्डन परत मुंबईस आला. याप्रमाणें हे दोन वकील यशस्वी होऊन आल्यामुळें मुंबईला जी स्वस्थता प्राप्त झाली होती ती लवकरच नष्ट झाली. कारण मालानें भरलेलीं गलबतें पोंचविण्याकरितां इंग्रजांचे आरमारानें मुंबई सोडली असें समजतांच आंग्र्या इंग्रजांबरोबर फार उद्धटपणानें वागूं लागला व ठाणें एथें मराठ्यांची फौज फार जमली आहे अशी खबर येऊन पोंचली. तेंव्हां सर्व लोक घाबरून गेले. शेंकडों लोक जवळची चीजवस्त जमिनींत पुरून मुंबईहून पळून गेले व कांहींजण बरोबर चीजवस्त घेऊन पळून गेले. अशा प्रसंगीं व्यापाराच्या मालाचें रक्षण करण्याकरितां आरमाराला मुंबईहून दूर जाऊं द्यावें कीं व्यापारावर पाणी सोडून मुंबईचें रक्षण करण्याकरितां आरमार ठेवून घ्यावें हा मोठा विचार येऊन पडला. अशा पंचाईतीच्या वेळीं मुंबईस आरमार ठेवावें असा अखेरीस निश्चय ठरला. परंतु त्यापासून मुंबईबेटाला फायदा झाला नाहीं. कारण ता. ९ नवंबर रोजीं एक भयंकर वादळ झालें तेणेंकरून इंग्रजांच्या तीन उत्कृष्ट गुराबांची खराबी झाली. त्यामुळें त्यांतील शस्त्रें, सामानसुमान, व तीन अनुभाविक मालीम या सर्वांचा नाश झाला. तेंव्हां लागलाच संभाजीआंग्र्या मुंबईबंदरांत आला. आणि चवदा मच्छीमाऱ्या होड्या व त्यांजवरील ८४ खलाशी यांना घेऊन गेला. या समयीं त्याची कानउघाडणी करणें उपयोगाचें नव्हतें व त्याचें शासन करणेंही अशक्यच होतें.

हें येऊन भिडलेलें संकट दूर झालें तरी पुढें सुमारें वीस वर्षेंपर्यंत मुंबईतील लोकांना मराठ्यांची मोठी भीति वाटत असे व त्यांचे नांवाची त्यांना आठवण झाली ह्मणजे ते चळचळ कांपत असत. मुंबईबेट व मराठ्यांचा मुलूख यांचे दरम्यान दोस्तीनें वागणाऱ्या किंवा निदान उपद्रव देण्यास प्रवृत्त न होणाऱ्या पोर्टुगीज लोकांच्या मुलखाचा पट्टा होता तों पर्यंत मुंबईतील लोकांचें मराठ्यांपासून रक्षण होत असे. तो पट्टा नाहींसा झाला ही गोष्ट फार वाईट झाली असा इ. स. १७५० तला मि. ग्रोस याचा लेख आढळतो. हा मधला पट्टा पोर्टुगीज लोकांच्या हातांतून गेल्यामुळें, मुंबईबेटांतील इंग्रज लोक व ठाणें जिल्ह्यावर अमल करणारे

मराठे हे एकमेकांचे शिवशेजारी झाले. ह्या मराठ्यांचें मन इंग्रजांवि- षयीं शुद्ध नव्हतें. मराठ्यांचे सरदार, आम्हांस मुंबईवर घेऊन जा; ह्मणजे आम्ही तेथील भिकार किल्ला जमीनदोस्त करून टाकूं व तेथील बाजार लुटून घेऊं, असें आपल्या सरकाराला नेहमीं आग्रहपुरस्सर सांगत असत. विश्वासघातकपणाविषयीं या मराठ्यांची इतकी ख्याति होती कीं, कोणाला विश्वासघातकी ह्मणावयाचें असल्यास तो पक्का मराठा आहे अशा ह्मणीचा उपयोग करीत असत. तहाच्या कलमबंदीचें बंधन ते मुळींच जुमानीत नसत. इंग्रज इत्यादि युरोपियन लोकांची चाकरी सोडून जे युरोपियन लोक मराठ्यांचे चाकरीस जाऊन राहिले होते, त्यानीं त्यांना किल्ल्यांना वेढा देण्याचें काम कसें चालवावें हें शिक- विल्यामुळें, ते मराठे मोठे भयंकर असे इंग्रजांचे शत्रु बनले होते. ह्मणून, मुंबईचा गव्हर्नर बुर्चियर साहेब यानें ( इ. स. १७५०—१७६० ) आपल्या कारकीर्दींत मराठ्यांना सुप्रसन्न ठेविल्याबद्दल, त्या गव्हर्नराची विशेषें करून मोठी वाहवा झाली. युरोपियन लोकांच्या या देशांतील व्यापारा- पासून आपला फायदा आहे असें मराठे लोक जाणून होते. तथापि ही गोष्ट ते सदोदीत मनांत वागवून इंग्रजांचे वाटेस जाणार नाहींत अशी खातरी नव्हती. मराठ्यांचे दरबारांत एखाद्या नवीन कारभाऱ्याची झालेली नेमणूक, मुंबईभेट लुटण्याविषयींचा फौजेचा आग्रह, फौजेंतील शिपायांच्या मनाची समजूत करण्याकरितां केलेली योजना, यांतून कोणतीही एखादी गोष्ट दोस्तीविषयीं मराठ्यांनीं इंग्रजांस दिलेलीं अभिवचनें मोडण्यास त्यांची प्रवृत्ति करण्यास बस होती. दोस्तीविषयीं आपण दिलेलें अभिवचन मोडलें असतां, आपलें फार नुकसान होईल, असें माहीत असतांनाही, ते मराठे तसें करण्यास मागें पुढें पहाणारे नसल्यामुळें, मराठ्यांनीं मुंबईवर चाल करण्याचें मनांत आणिलें तर, तिचें रक्षण करणें अशक्य आहे, असें मनुष्यबुद्धीनें तरी निदान सर्वांना वाटत असे. तेथील किल्ल्यानें जरी त्यांच्या पुढें टिकाव धरिला तरी ते किल्ल्यापुढें फौजेचा तळ देऊन बसतील व आंत अन्नपाणी जाऊं देणार नाहींत ही भीति मनुष्याच्या मनापुढें उभी रहात असे.

ज्या मराठ्यांनीं ठाणें व वसई हस्तगत करून मुंबईला केवळ आपल्या मुठींत ठेविलें होतें त्या भयंकर मराठ्यांविषयीं ग्रोस ह्यानें माहिती आपल्या ग्रंथांत लिहिली आहे. तो असें ह्मणतो कीं " मराठ्यांपैकीं बहुतेकजण शेतभात करणारे कुणबी होते. काळ्याकूट रंगापासून तांबुस रंगापर्यंत अनेक तऱ्हेचा त्यांचे अंगाचा वर्ण असे. किनाऱ्यावरचे लोकांहून डोंगरी मराठे लोक अधिक उजळ व सडपातळ असत कांहीं जणांचीं शरीरें मजबूद व भक्कम असत. तथापि ते वनस्पतिभोजी असल्यामुळें त्यांचीं शरीरें हलकीं असत. त्यामुळें मांसाहारी मूर लोक व युरोपियन लोक हे त्यांना लढाईंत सहज हटवीत. ते नाकींडोळीं सुरेख असून, क्वचित् नाजूकही असत. ते डोक्याचे मध्यभागीं थोडी शेंडी ठेवीत व कानाजवळ झुलपें ठेवीत. हीं झुलपें शिरस्त्राणाचे बाहेर दिसत. तेणेंकरून त्यांचे तोंडावर नामर्दपणाची कळा दिसत असे. त्यांचा पोषागही भिकार असे. डोक्याला एक जाडें भरडें मुंडासें असे. ढुंगणाभोंवतीं एक पंचा ते गुंडाळीत आणि पासोडी आंगावर घेत असत. तीच पासोडी हांतरून ते तिजवर रात्रीं निजत. शिपायांवरील अधिकाऱ्यांचा पोषाग त्यांच्या हाताखालच्या लोकांच्या पोषागाहून फारसा चांगला नसे. मराठ्यांचे फौजे इतकी दुसरी कोणतीही फौज बाह्यात्कारीं भिकार दिसत नसे. शिपाई लोक भात व कातड्याच्या पिसवींत ठेवलेलें पाणी याचेवर निर्वाह करीत. त्यांच्या वरील अधिकाऱ्यांचेंही खाणेंपिणें त्यांऱ्हेहून फारसें चांगलें नसे. त्यांच्या शिपायांना पगार फार थोडा मिळे. तो रोख न देतां त्याच्या ऐवजीं त्यांना तांदूळ, तंबाकू, मीठ, किंवा कपडे मिळत. त्यांचे घोडे लहान पण राकट असत. ते खडकाळ जमिनींत मजल मारण्याचे कामीं हुशार असून त्यांना फारशी चाऱ्याची गरज नसे. शिपायांजवळ लेंच्यापेंच्या बंदुका असत. त्यांपैकीं बहुतेकींना तोड्याची गरज लागत असे. झाडा झुडपांचे आडून ह्या बंदुकांचे बार ते शत्रूवर करीत व बार करतांच आपल्या सैन्याच्या मुख्य भागांत जलदीनें जाऊन मिसळत. ढालतरवारींचा त्यांना मोठा आधार असे. त्यांच्या तरवारींचें पाणी फार उत्तम असे. ते पट्ट्याचा उपयोग करण्याचे कामांत मोठे वाकबगार असत.

युरोपांत ज्या हंद पात्याच्या तरवारी तयार होतात त्यांची त्यांना भीति वाटत नसे. त्यांच्या ढाला हलक्या व वाटोळ्या असून त्या जाडया होत होत मध्य भागीं अणकुचीदार झालेल्या असत. रोगण देऊन त्या इतक्या गुळगुळीत व कठिण केलेल्या असत कीं पिस्तुलापासून सुटलेली गोळी त्यांजवर येऊन आदळली तर ती सुळकन निसटून जात असे. ह्या मराठ्यांचे आंगची चलाखी पाहून सर्वांना तोंडांत बोटच घालावें लागत असे. हे फार लबाड असत. त्यांच्या बरोबर इंग्रजांच्यानें टिकाव धरण्याचा संभव नव्हता. त्यामुळें पाहिजे त्या दिवशीं मुंबई मराठ्यांना लुटतां येण्यासारखी होती. "

इ. स. १७५७ त आंग्र्याचा मोड झाला व इ. स. १७६१ त पानपत एथें मराठ्यांचा पराभव झाला. या दोन गोष्टी घडून येत-पर्यंत मराठे लोक मुंबईबेटांतील इंग्रजांबरोबर दोस्तीनें वागत होते हें त्या बेटाचें मोठें सुदैव होय. या दोन गोष्टी घडून आल्यावर मुंबई बेटांतील इंग्रजांना पहिल्यापेक्षां बरेंच स्वतंत्रपणें वागतां येऊं लागलें इ. स. १७५५ त इंग्रज व मराठे या दोघांनीं मिळून आंग्र्यावर स्वारी केली. या प्रसंगीं इंग्रजांस आपले दोस्त मराठे यांच्या आंगची दुर्बलता व त्यांच्या दोस्तीची ढिलाई दिसून आली. तथापि इंग्रजांच्या आरमा-राचा मुख्य कमांडोर जेम्स यानें रत्नागिरि जिल्ह्याच्या उत्तरेकडील प्रदेशाच्या किनाऱ्यावरचे सुवर्णदुर्ग व बाणकोट हे किल्ले घेतले. इ. स. १७५७ त आडमिरल वाट्सन् व कर्नल् क्लैव यांच्या मद-तीनें इंग्रजांनीं रत्नागिरि जिल्ह्यांतील किनाऱ्यावरचा विजयदुर्ग किल्ला हल्ला करून घेतला, आंग्र्याचें आरमार जाळून टाकिलें, व त्याचा अगदीं मोड केला. अजूनही इंग्रज लोक मराठ्यांना इतके भीत असत कीं, मुंबईवर आह्मीं हल्ला करणार, अशी पोकळ धमकी मराठ्यांनीं दे-तांच, सुरत एथील फरासखानाबरोबर आपणांस अनुकूल असा होणारा करार इंग्रजांनीं मोडून टाकिला. पुढील वर्षीं इंग्रजांना सुरतेचा किल्ला मिळाला, व त्यामुळें ते मोंगलाच्या आरमाराचे मुख्य झाले. या विजयाच्या योगानें त्यांना इतकें धैर्य आलें कीं, इ. स. १७६० त, मराठ्यांवर स्वारी करण्याकरतां त्यांनीं शिद्दी याचा पक्ष स्वीकारण्याचें धाष्टर्य केलें

व जंजिऱ्यावर आपलें निशाण रोविलें. इ. स. १७६१ त पानपत एथें मराठ्यांचा पराभव झाला, बाळाजी बाजीराव पेशवा मरण पावला, व पेशव्यांच्या गादीवर लहान मुलगा बसला. या तीन गोष्टींमुळें तुर्त इंग्रजांना मराठ्यांचें भय वाटेनासें झालें. ह्मणून तें वर्ष संपण्यापूर्वींच साष्टी व वसई हे प्रांत आपणांस प्राप्त होण्याविषयीं त्यांनीं मराठ्यांशीं बोलणें लाविलें. तेव्हां माधवराव पेशव्याचा कारभार पाहाणारा रघुनाथराव यानें साष्टीप्रांत देण्याचें कबूल केलें नाहीं. तथापि शिद्दी याचें स्वातंत्र्य त्यानें कबूल केलें.ही गोष्ट महत्वाची होय. पुढें, माधवराव पेशव्यानें इ. स.१७६६त मराठ्यांच्या कारभाराची चांगली थावराथावर केल्यामुळें, साष्टीप्रांत व मुंबईबंदराच्या आसपासचीं बेटें यांविषयींचें इंग्रजांचें बोलणें त्यानें मुळींच कबूल केलें नाहीं.

इ. स. १७३९ त वसई घेतल्यावर मराठ्यांनीं त्या प्रांताची व्यवस्था मोठ्या दक्षतेनें चांगली ठेविली. वसईला बाजीपूर असें नांव देऊन तेथें त्यांनीं एक कोंकणचा सरसुभेदार नेमिला.या सरसुभेदाराच्या हाता-खालीं मामलेदार होते. प्रत्येक मामलेदाराच्या ताब्यांतील मुलखाची जमाबंदी प्रायः पांच लाख रुपये होती. जमाबंदीच्या कामाखेरीज दिवाणी, फौजदारी, व पोलीसचें कामही या मामलेदारांकडे असे. मामलेदाराच्या हाताखालीं गांवचे पाटील असत. साष्टीप्रांतांत मरा-ठ्यांनीं जमिनीवरचा धारा वाढविला व दुसरे नवे करही त्यांनीं पुष्कळ बसविले. तथापि, इ. स. १७६१ त बाळाजी बाजीराव मरण पावल्या-नंतर, मामलती मक्त्यानें देण्याची वहिवाट सुरू होईपर्यंत, साष्टीबेटाची स्थिति बरीच चांगली होती. उंच वर्णाच्या हिंदूंनीं येऊन राहावें ह्मणून वसई प्रांतांत ते त्यांना इनाम जमिनी देत असत.खिरिस्तांव झालेल्या लोकांपासून कर घेऊन जें उत्पन्न होई त्याचा त्या लोकांना शुद्ध करण्या-करितां व पुनः हिंदु करण्याकरितां ब्राह्मणभोजन घालण्याकडे खर्च होत असे. इ. स. १७६८ त कल्याण प्रांतांत पेणच्या खाडीपासून वैतरणानदीपर्यंत ७४२ गांव होते व त्यांची जमाबंदी साडेचार लाख रुपये असून खेरीज जकातीचें उत्पन्न अडीच लाख रुपये होतें.

ई. स. १७६० चे अखेरीस, नवंबर व दिसेंबर महिन्यांत, फ्रान्स देशांतील विद्वान गृहस्थ आंक्वेटिल ड्यू पेरान यानें, सुरतेपासून कान्हेरी व घारापुरी या दोन स्थळांपर्यंत, तेथील लेणीं पाहाण्याच्या उद्देशानें, प्रवास केला. या स्थळांकडे येतांना व परत जातांना तो समुद्रकिनाऱ्यावरूनच गेला. हा प्रवास त्यानें मेण्यांत बसून केला. मेणा नेण्याकरितां त्याचे बरोबर आठ भोई होते व खेरीज चार हत्यारबंद शिपाई आणि एक पारशी नौकर त्याचे बरोबर होता. खुद्द त्याचे जवळही एक पिस्तुलांचा जोड व एक तरवार होती. खेरीज मराठ्यांना दाखविण्याकरितां एक व मुसलमानांना दाखविण्याकरितां एक असे दोन परवाने त्याचेजवळ होते. त्या वेळीं त्याला असें दिसून आलें कीं सर्व ठाणें जिल्हाभर व्यवस्था चांगली होती. चांचे लोकांच्या उपद्रवापासून आपल्या मुलखांतील किनाऱ्याचें रक्षण करणें मराठ्यांना कठीण पडे. तथापि जुने किल्ले नीट करण्याचे कामांत व नवे बांधण्याचे कामांत ते गढून गेलेले होते. चोर किंवा सरकारी कामदार यांचेपासून ड्यू पेरान याला जातांना व परत येतांना उपद्रव झाला नाहीं. दमण व साष्टी यांचे मधील प्रदेशाच्या देखाव्याविषयीं त्यानें फारसें लिहिलें नाहीं. नारगोलपासून दक्षिणेकडे मधून मधून मला ताडांचीं बनें लागलीं व आगाशी एथें फळांचे सुंदर बाग माझे दृष्टीस पडले इतकें मात्र त्यानें लिहिलें आहे. जेथें जेथें त्याचा मुक्काम झाला त्या गांवांपैकीं पुष्कळ गांवांत किरिस्तांव होते. त्यांचीं देवळें व इमारती यांपैकीं पुष्कळांची दुरुस्ती केलेली नव्हती व पुष्कळ मोडकळीस आलेलीं होतीं. तथापि कांहीं देवळांची स्थिति चांगली होती. ज्या देशांत ख्रिस्ती राजा आहे तेथील लोक जसे कांहीं हरकत न येतां देवालयांत आपल्या धर्माप्रमाणें ईश्वरभजन करण्यास जातात त्याप्रमाणें आगाशी एथील रस्त्यांत देवळांत जाणाऱ्या किरिस्तांवांचे थवे त्याला आढळले. साष्टीची उत्तम स्थिति पाहून त्याला फार संतोष झाला. या बेटाच्या उत्तम स्थितीमुळें तें घेण्याची इच्छा मराठ्यांना झाली ही गोष्ट साहाजिक होती व इंग्रजांच्या ताब्यांत तें असेल तर पूर्वेकडील वसाहातींतील उत्तम वसाहातींपैकीं मुंबईबेटही एक वसाहात आहे असें मानलें जाईल असें त्याला वाटलें.

चांगली व्यवस्था ठेविली तर या बेटाचें उत्पन्न सालिना चोवीस लाख रुपये येण्याचा संभव होता. ज्यांत राहणारे बहुतेक लोक किरिस्तांव होते अशा गांवांनीं तें बेट भरगच्च भरलेलें होतें. युरोपियन पाद्र्यांनीं सोडून दिलेलीं पुष्कळ देवळें व मठ या बेटात होते. कांहीं देवळें कायम ठेवण्याविषयीं मराठयांनीं किरिस्तांवांस परवानगी दिली होती. त्या ठिकाणीं एतद्देशीय पाद्री व त्यांच्यावरील व्हिकार जनरल नांवाचा एतद्देशीय मुख्य पाद्री हे गोंव्याप्रमाणेंच मोठ्या डौलानें ख्रिस्ती सणवार पाळीत असत. धर्मसंबंधाच्या समारंभांना किरिस्तांव लोकांस काडीइतकीसुद्धां हरकत होत नसे व कांहीं अंशीं अशा समारंभास हिंदुलोकही मान देत असत. डयू पेरान हा ठाणें एथें असतांना ख्रिस्ती धर्माच्या उत्सवाचा एक दिवस आला होता. त्या प्रसंगीं हजारों किरिस्तांव आले होते असें त्याला आढळलें. साष्टीबेटावरचा मराठयांचा अधिकारी त्या बेटांत न राहातां बेटाचे बाहेर, जेथून त्यावर चांगला मारा चालेल अशा, एका किल्ल्यांत रहात असे. या वेळेच्या सुमारास [१७५०] टिफेनथालर या नांवाच्या मुशाफराला ठाणें जिल्ह्याच्या समुद्रकिनाऱ्यापासून दूरच्या प्रदेशांत राहाणारे लोक हे दाट जंगलांत वाढलेले, काळेकूट, व ढुंगणास एक लंगोटी मात्र लावलेले असे आढळले.

इकडे मुंबईबेटाचा विस्तार वाढत चालला होता, त्यांतील लोक श्रीमंत होत होते, व तेथील हवा चांगली होत होती. 'सर्व जगतांत अतिशय भरभराटीचें असें मुंबई शहर असून तेथें आरबस्थान व इराण एथून येणारा माल पुष्कळ असतो' असें इ. स. १७५७ त आइव्ह नांवाच्या ग्रंथकारानें मुंबईचें वर्णन केलेलें आहे. इ. स. १७६४ त, मुंबईची हवा रमणीय आहे, असें नीबर याचे दृष्टोत्पत्तीस आलें. एथील कांहीं तलाव बुजवून टाकल्यामुळें पूर्वीपेक्षां हवा निरोगी झाली होती. तांदूळ नारळ, व मीठ हे जिन्नस एथें होत असत. एथील लोकसंख्याही आलीकडे वाढली होती. जुना कोट फारसा उपयोगी नव्हता. तरी जमिनीकडच्या बाजूस एक उत्तम तट, मोठा खंदक, व तीन दरवाज्यांसमोर बांधलेले बुरूज यांचे योगानें शहराचा बंदोबस्त चांगला झालेला होता. खेरीज माहीम, धारावीच्या उत्तरचें रिवा, शींव, सुरी,

माझगांव, व वर्ळी एथेंही लहान लहान बुरूज होते. सगळ्या मुंबई-बेटांत ३०० एतद्देशीय शिपाई होते व तोफखाना उत्तम होता. एका स्विट्झर्लंड देशांतील मनुष्याच्या कर्तबगारीमुळें हा तोफखाना इतक्या उत्तम स्थितीस आलेला होता. एथील गोदीएवढें मोठें दुसरें कोणतेंही काम नव्हतें. अजूनही मराठे लोक इंग्रजांशीं उद्धटपणानें वागत असत. इ. स. १७६० त मुंबई एथील इंग्रजांचें एक गलबत समुद्रांत फिरत असतां ते घेऊन गेले. त्यामुळें दोघांची लढाई खास जुंपणार असें दिसत होतें. परंतु इंग्रजांनीं कलकत्ता व मद्रास एथें आपल्या लोकांपैकीं पुष्कळ लोक पाठविलेले होते. ह्मणून या प्रसंगी उद्भवलेल्या तंट्याचा निकाल गोडी-गुलाबीनें करणें त्यांस बरें वाटलें असा नीबर याचा लेख आहे. एथील लोकवस्ती या वेळीं साठ हजार होती व लोकरीचे कपडे आणि इतर इंग्लंडांतील जिन्नस यांचा खप चवदा लाख रुपयेपर्यंत होत असे असें दुसरा एक ग्रंथकार ह्मणतो. आणखी तो असेंही ह्मणतो कीं, मुंबईच्या उत्पन्नावर मुंबईचा खर्च अजूनही भागत नसे. मुंबई बेटाच्या बऱ्याच प्रदेशांत भरतीचें पाणी येत असे तरी त्या बेटाची हवा प्रायः निरोगी व आल्हादकारक होती असें फार्बस यास, इ. स. १७६६ त, आढळून आलें. तेथील व्यापारी हिंदुस्थानांतील मुख्य बंदरें व किनाऱ्यापासून दूर असणारीं मुख्य शहरें यांचेबरोबर आणि इराणी आखात, आरबी आखात, आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील स्थलें, मलाका, चीन, व पूर्वेकडील बेटें या सर्वांबरोबर व्यापार करीत असत. खाण्यापिण्याचे पदार्थ मुंबईचे बाजारांत साष्टीबेट व त्याच्या लगतचा प्रांत यांतून येत असत. खेरीज ज्या ठिकाणीं मुंबईबेटांत लागवड होण्यासारखी होती तेथें भात लावीत किंवा माड लावीत असत. या वेळीं मुंबईशहराचा घेर सुमारें दोन मैल होता व त्याचे सभोंवतीं अर्वाचीन पद्धतीप्रमाणें बांधलेला तट होता. एथें तीन उत्तम गोद्या व एक गलबतें बांधण्याची प्रशस्त जागा होती. तींत लहानमोठीं सर्व आकारांचीं सागाच्या लांकडाचीं गलबतें पारशी लोक बांधीत असत. हे पारशी युरोपांतील उत्तम गलबतांच्या नमुन्याप्रमाणें हुबेहुब एथें गलबतें तयार करीत असत. गव्हर्नरचा बंगला, जकात

घेण्याची मांडवी, खलाशांकरितां बांधलेलें घर, बराखी, टांकसाळ, तिजोरीचें घर, नाटकगृह, व तुरुंग इतक्या सार्वजनिक ह्मणजे सरकारी इमारती त्या वेळीं मुंबईंत होत्या. तीन इस्पितळें, एक प्राटेस्टंट पंथाचे लोकांचें देऊळ, व एक धर्मार्थ घातलेली विद्याशाळा एथें होती. एथें राहाणाऱ्या इंग्रजांचीं घरें सुखदायक असून त्यांत सामान हवें तितकें विपुल असे. शेजारच्या खेड्यापाड्यांत बंगले बांधून त्यांत इंग्रज लोक अजून राहूं लागले नव्हते. शहराच्या ज्या भागांत काळे लोक राहात असत तेथील रस्त्यांवर एशियांतील पद्धतीप्रमाणें बांधिलेलीं पुष्कळ चांगलीं घरें होतीं. तीं एथील लोकांचीं व विशेषतः पारशी लोकांचीं होतीं. या वेळीं मुंबई शहर ही पश्चिम प्रतीची उतारपेठ असून व्यापाराचें मुख्य स्थान होतें. एथें सरकारचा अंमल साध्या व व्यवस्थित रीतीनें चालत असल्यामुळें कोठेंही अव्यवस्था आणि अयोग्य वर्तन आढळत नसे. परंतु एथील खर्चापुरतें उत्पन्न एथें होत नसे. खेरीज इ. स. १७६८ त नवीन तट बांधल्यामुळें खर्च तर फारच वाढला होता. त्यामुळें आसपासचा मुलूख हातीं असल्याखेरीज मुंबई ताब्यांत ठेवणें अशक्य आहे याविषयीं कोर्ट आफ् डैरेक्टर्स् व मुंबईसरकार या दोघांचीही खातरी होऊन गेलेली होती. साष्टीबेटांत तांदूळ पिकत आणि भाजीपाला होत असे व वसईंत इमारतीचीं लांकडें होत असत. त्यामुळें मुंबई ताब्यांत ठेवणाऱ्यांना साष्टी व वसई हीं अति सोईवार स्थळें आहेत असें वाटे. यास्तव हीं प्राप्त होण्याची संधी फुकट दवडणें योग्य नव्हतें. ह्मणून, इ. स. १७७१ त, पुणें एथें, तीं प्राप्त करून घेण्याकरितां, इंग्रजांनीं आपला एक वकील पाठविला. परंतु मराठ्यांनीं मुंबईच्या आसपासचा मुलूख देण्याचें कबूल केलें नाहीं व उलटें ठाणें एथील शिबंदींत ६०० लोक अधिक ठेविले. मराठ्यांच्या या नाकबुलीमुळें, आणि पोर्टुगीज लोकांनीं आपल्या मुलखाच्या व्यवस्थेंत मोठ्या झपाट्यानें सुधारणा करून, आपल्या हातून गेलेला मुलूख परत घेण्याकरितां, ब्राझील एथून एक आरमार पाठविलें आहे, असें इंग्रजांच्या कानीं आल्यामुळें, मुंबईसरकारानें साष्टीबेट जबरीनें घेण्याचा निश्चय केला.

इ. स. १७७४त, दिसेंबरचे १२वे तारखेस, १२० गोरे गोलंदाज व २०० काळे गोलंदाज, आणि ५०० गोरे पायदळ व १००० हजार काळे शिपाई बरोबर घेऊन जनरल गोर्डन हा मुंबईहून जलमार्गानें ठाण्यास येण्याकरितां निघाला, आणि ता. २८ रोजीं एकदां मोठें नुकसान होऊन मागें हटल्यावर, त्यानें ठाण्याचा किल्ला घेतला व तेथील शिबंदीच्या लोकांना तरवारीनें कापून टाकिलें. इंग्रजांच्या दुसऱ्या टोळीनें वेसावें घेतलें आणि तिसरीनें करंजें, घारापुरी, व शेर्वेन्हावें हीं घेऊन तेथें तळ दिला. साष्टीबेट व त्याचे आसपासचा मुलूख आणि वसई हीं इ. स. १७७५ तील जानेवारीचे पहिले तारखेपर्यंत इंग्रजांचे ताब्यांत आलीं. नाना फडणिसानें जो मुलगा माजी पेशव्याचा वारस आहे असें प्रकट केलें होतें, त्या मुलाच्या औरसत्वाविषयीं, नाना फडणिसाजवळ रघुनाथराव वाद सांगत असतां, तो पकडला गेल्यामुळें, त्याला गुजराथेकडे निघून जाणें भाग पडलें. पुढें इंग्रजांची आपणास मदत मिळावी ह्मणून, इ. स. १७७५त, मार्चचे ६वे तारखेस, सुरत येथें इंग्रजांबरोबर त्यानें तह केला. त्यांत साष्टी व वसई इंग्रजांस देण्याचें त्यानें कबूल केलें. तरी पुढें लवकरच वसई परत देण्यांत आली. तरी साष्टी, करंजें, शेर्वेन्हावें, व खांदेरी हीं इंग्रजांस मिळालीं तीं मिळालींच. त्या वेळीं त्या स्थळांचा वसूल साडेतीन लाख रुपये होता.

इ. स. १७७५ चे आगष्ट महिन्यांत पार्सन्स् यानें मुंबईचें वर्णन पुढें लिहिल्याप्रमाणें केलें आहे. " हें शहर सुंदर आहे. एथें सभ्य गृहस्थांचीं घरें पुष्कळ असून तीं सुंदर आहेत. एथील रस्ते चांगले शिस्तवार असून जमीन स्वच्छ वाळूची आहे. एथील कोटापुढचें मैदान प्रशस्त असून चेंडूनें खेळण्याच्या मैदानासारखें गुळगुळीत व सपाट आहे. तटाच्या आंत हिरवळीनें आच्छादलेलें एक प्रशस्त मैदान आहे. तेथें पुष्कळ पलटणींचे लोकांना कवाईत करण्यापुरती जागा आहे. एथील किल्ला फार मोठा असून मजबूद आहे. शहराचे आसपासचे व तटांतले बुरूज फार मजबूद असून एकमेकांपासून सोईवार अंतरावर बांधलेले आहेत. कोटाभोंवतालीं एक रुंद व खोल खंदक आहे. त्यामुळें पुरेसे शिबंदीचे लोक व अन्नसामुग्री असल्यास

हा किल्ला कोणालाही दाद देणार नाहीं. एथील कोरडी गोदी इंग्लंडांतील कोरड्या गोद्यांहून चांगली आहे. एथील गलबतांचे तळ साफ करण्याची जागा व दोरखंडें तयार करण्याची जागा या इंग्लंडांतील अशा प्रकारच्या जाग्यांइतक्या चांगल्या आहेत. एथें बांधलेलीं गलबतें युरोपांतील गलबतांइतकीं मजबूद, सुंदर, व चांगलीं सफाईदार असतात. "

या वेळीं साष्टी बेटांत चांगलें पाणी व सुपीक जमीन होती असें त्याचें वर्णन केलेलें आढळतें. एथील जमिनींत मुख्यत्वेंकरून तांदूळ होत असे. ती जमीन पुष्कळ सुधारणा करण्यासारखी असून पूर्वीं गोवें [ गोमंतक ] प्रांताला धान्याचा पुरवठा हीच जमीन करीत असे. करंज्यांस साठ हजार रुपयांचा व घारापुरीस आठ हजारांचा तांदूळ दरसाल पिकत असे. इ. स. १७७४ त फार्बस कान्हेरीचीं लेणीं पाहावयास गेला. तेव्हां त्याला वाटेंत खाजणें, भातशेतें, नारळींचे बाग, जंगलानें आच्छादलेले डोंगर, व सुपीक दऱ्या लागल्या. त्या वेळीं या बेटांत वाघांचा उपद्रव फार असे, व जिकडे तिकडे पोर्टुगीज लोकांनीं बांधिलेलीं देवळें, मठ, व बंगले हे मोडकळीस आलेले दृष्टीस पडत.

साष्टी बेट इंग्रजांस मिळाल्यावर लवकरच [ मे १७७५ ] वसई एथून, ३५०० लोक घेऊन, मराठे त्या बेटावर आले. परंतु त्यांना मागें हटावें लागलें व या प्रसंगीं त्यांचें नुकसान फार झालें. या पूर्वी थोड्या महिन्यांमागें ( दिसेंबर १७७४ ) कमोडोर जॉन मूर यानें रिव्हेंज नांवाचें गलबत व मुंबई एथील एक गुराब यांचे मदतीनें, ज्याचेवर ४६ तोफा होत्या अशा, मराठयांच्या आरमारापैकीं एका मुख्य गलबताचा, रत्नागिरि जिल्ह्यांतील घेरिया(विजयदुर्ग)किल्ल्याजवळ, नाश केला होता. इ.स.१७७६ त, सदाशिवराव भाऊचा तोतया होऊन, त्यानें पुष्कळ लोक मिळवून सगळ्या कोंकणभर धुमाळी चालविली, आणि त्या वर्षाचे आक्टोबर महिन्यांत तो बोरघाटापर्यंत येऊन भिडला. पुढें त्याला दक्षिणेंतून हाकून लाविल्यामुळें तो आंग्र्याकडे आश्रयाकरितां गेला. तेव्हां त्यानें त्यास कैद केलें. त्यामुळें कोंकणांत लवकरच शांतता झाली.

इकडे कलकत्ता एथील गव्हर्नराला प्रमुखत्व नुकतेंच मिळालें होतें. त्यानें रघुनाथरावास इंग्रजांनीं दिलेली मदत नापसंत केली, सुरत एथें त्याचे बरोबर झालेला तह नामंजूर केला, व पेशव्याच्या प्रधानमंडळा बरोबर बोलणें चालविण्याकारितां कर्नल् अप्टन् याला कलकत्याहून पुण्यास पाठविलें. त्यानें इ. सन १७७६ चे मार्चाचे पहिले तारखेस पुण्याजवळच्या पुरंदर किल्ल्यांत तह केला. त्यांत असें ठरलें कीं, इंग्रज व रघुनाथराव यांच्यामध्यें झालेला तह रद्द समजून त्या ऐवजीं इंग्रज व पेशव्याचें प्रधानमंडळ यांमध्यें तह व्हावा. या तहांत साष्टी, करंजें, घारापुरी, व शेवेन्हावें हीं स्थळें इंग्रजांकडे पूर्वी प्रमाणेंच असावीं असें ठरलें. याप्रमाणें तह झाला तरी पुणें एथील कारभारीमंडळाचे मनांत इंग्रजांविषयीं वैरभाव होताच. या मंडळाचा प्रमुख नाना फडणीस हा होता. इंग्रज व फ्रेंच लोक या उभयतांमध्यें लढाई होण्याचा रंग दिसत आहे असें समजतांच, इंग्रजांचें प्राबल्य कमी करण्याकारितां, फ्रेंच लोकांचा उपयोग करण्याचा नानानें निश्चय केला. इ. स. १७७८ चे एप्रिल महिन्यांत सेंट् लुबिन् व दुसरे कांहीं फ्रेंच लोक चौल येथें गलबतांतून जमिनीवर उतरले आणि तेथून पुण्यास पायवाटेनें गेले. तेथें त्यांचा आदरसत्कार उत्तम तऱ्हेचा झाला. नंतर एक उत्तम फ्रेंच लोकांची फौज पुण्यास आणण्याचें सेंट् लुबिन् यानें कबूल केलें आणि नानानें फ्रान्स् देश व मराठी राज्य यांचे मध्ये सख्य असावें व फ्रेंच लोकांस चौल बंदरांत जकातीची माफी असावी असें कबूल केलें. याच वेळीं नानानें इंग्रजांच्या पुणें एथील एजंटाचा फार उपमर्द केला. पुणें एथील बरेच मुत्सद्दी लोक नानाचे विरुद्ध होते व राघोबा दादास पेशवाईचा अधिकार प्राप्त व्हावा अशी त्यांची इच्छा होती. या मुत्सद्दी मंडळींत सखाराम बापू व मोरोबा दादा हे प्रमुख होते. पुरंदरच्या तहापासून इष्ट फल प्राप्त न झाल्यामुळें, आणि, नानाचा पाडाव केल्याखेरीज, पुणें दरबारांत असलेलें फ्रेंचांचें वजन कमी व्हावयाचें नाहीं असें वाटल्यामुळें, गव्हर्नर जनरलानें मुंबई सरकारास कळविलें कीं, तुम्ही सखाराम बापूच्या पक्षाच्या लोकांबरोबर तह करावा. पुणें एथें राघोबा दादास पेशवा करण्याचें कामीं तुम्हांस मदत करण्याकारितां आम्ही इकडून अयोध्या व वऱ्हाड या प्रांतांमधून

आणाऱ्या खुषकीचे मार्गानें सैन्य पाठवितो. तदनुरूप यमुनेचे कांठीं काल्पीसमोर एक फौज तयार झाली. तिचा प्रमुख कर्नल् लेसूली यास असा हुकूम झाला कीं, तुह्मीं खुषकीचे मार्गानें कूच करीत करीत मुंबईस जावें आणि तेथील अधिकारी सांगतील त्याप्रमाणें वागावें. मे महिन्यांत कर्नल् लेसूली हा यमुनानदी उतरून आलीकडे आला. परंतु बुंदेलखंडांतील तंटयाबखेड्यांत पडल्यामुळें, फारशी मजल न मारितां, अखेरीस, इ. स. १७७८ चे आक्टोबरचे ३ रे तारखेस, तो मरण पावला.

याप्रमाणें कलकत्ता एथील मुख्य सरकारचें लिहून आल्यावरून, इ. स. १७७९ तील सुरत एथील तहाच्या अटींवर, राघोबा दादा बरोबर नवा तह करण्याचा मुंबईचे गव्हर्नरानें निश्चय केला. नंतर राघोबा दादास पुणें एथें पेशवाईच्या गादिवर स्थापण्याचें काम इंग्रजांनीं या तहान्वयें हातीं घेतलें. परंतु धाकटा पेशवा, सवाई माधवराव, हा नारायणरावाचा औरस मुलगा नाहीं असें, राघोबा दादानें सिद्ध केलें नाहीं तर, त्यानें सवाई माधवरावाचा प्रतिनिधि या नात्यानें मात्र अधिकार चालवावा, असें त्यांनीं ठरविलें. या मदतीबद्दल वसई, खांदेरी बेट, साष्टींतील आठगावें, व गुजराथेंतील कित्येक परगणे इंग्रजांस देण्याचें राघोबा दादानें कबूल केलें. इंग्रजांचे अनुमतावांचून कोणाही युरोपियनास पेशव्याचे मुलखांत राहाण्याची परवानगी देणार नाहीं असेंही त्यानें कबूल केलें. हा तह मुंबई एथें ता. २४ नवंबर १७७८ रोजीं झाला. पुण्यांतील प्रधानमंडळ राघोबा दादाच्या पुण्याकडे येण्यास हरकत करण्याच्या तजविजींत आहे, असें समजल्यावर, ३९०० लोकांना मुंबईहून निघण्याविषयीं, ता २२ नवंबर रोजीं, हुकूम झाला होता. या फौजेचा लष्करी अधिकारी कर्नल इजर्टन होता. त्या फौजेबरोबर कार्न्याक व मोस्टिन हे दोघे गृहस्थ होते. त्यांजकडे तह वगैरे संबंधानें बोलणें चालविण्याचा अधिकार होता. ह्या फौजेच्या पहिल्या टोळीचा मुख्य क्याप्टन् स्टयुअर्ट् यानें ता. २५ नवंबर रोजीं बोरघाट व खंडाळेंगांव हीं घेतलीं. दुसऱ्या टोळीचा मुख्य इजर्टन ह्यानें बेलापूर घेऊन, ता. २६ नवंबर रोजीं, पनवेल एथें तळ दिला. नंतर सगळी फौज बोरघाटाच्या पायथ्याजवळच्या खोपवली गांवीं, ता. १९ दिसेंबर रोजीं, येऊन पोंचली. पुण्यांतील प्रधानमंडळ आपणांस पुण्यांत येण्यास प्रतिबंध

करण्याकरितां फौज जमवीत आहे असें इंग्रजांनीं ऐकिलें होतें. तरी बोरघाटांतून तोफा वर नेण्याकरितां रस्ता करण्याचे कामांत गुंतल्यामुळें ह्या फौजेचे ता. २३ दिसेंबरपर्यंत खोपवलींतच दिवस गेले. इकडे मराठ्यांच्या घोडेस्वारांच्या टोळ्या खोपवली व पनवेल यांचे दरम्यान फिरून इंग्रजांच्या लष्कराचे तळांतील लोकांना उपद्रव देऊं लागल्या. मि. मोस्टिन याला मात्र पुणें दरबारची चांगली माहिती होती. परंतु आजारी पडल्यामुळें तो मुंबईस परत आला, व पुढें, ता. १ जानेवारी रोजीं, मरण पावला. त्यामुळें इंग्रजांच्या दुःखांत अधिक भर पडली. कर्नल इजर्टनचीही प्रकृत बिघड, त्यामुळें आपल्या हुद्याचा राजीनामा देऊन तोही मुंबईस जाण्याकरितां निघाला. परंतु जिकडे तिकडे मराठ्यांचे घोडेस्वार पसरलेले असल्यामुळें त्याला परत यावें लागलें. परत आल्यावर राजकारणासंबंधीं बोलणें चालविणाऱ्या कमेटीच्या सभासदाचें काम पुनरपि तो करूं लागला. परंतु त्याच्या लष्करी हुद्यावर कर्नल काकबर्नची नेमणूक झाली.

इंग्रजांची फौज दक्षिणेंत पोंचली तेव्हां तिला असें आढळून आलें कीं, सर्व दक्षिणभर शत्रूचे घोडेस्वार पसरलेले आहेत व राघोबा दादाचा पक्ष स्वीकारण्यास कोणताही सरदार तयार नाहीं. ही सर्व स्थिति राघोबा दादानें सांगितलेल्या स्थितीच्या अगदीं उलट होती. खंडाळें व कार्लें यांचे दरम्यान मराठे व इंग्रज यांच्या ज्या झटापटी झाल्या त्यांत कर्नल् के आणि क्यापूटन् स्टयुअर्ट् हे इंग्रजांच्या उत्तम सरदारांपैकीं दोन सरदार पडले ही मोठी दुःखाची गोष्ट झाली. पुण्याच्या पश्चिमेस नऊ कोसांवर तळेगांव ह्मणून एक गांव आहे. तेथें इंग्रज पोंचले तों तें गांव आग लागून जळत होतें व तेथें धान्यादि सामुग्रीचा फारच तोटा होता. ह्मणून या प्रसंगीं काय करावें या गोष्टीचा विचार करण्याकरितां इंग्रजांचे प्रमुखप्रमुख कामगार एके ठिकाणीं जमले. तेव्हां मोठमोठ्या वाकबगार सरदारांचें मत नव्हतें तरी तळेगांवाहून पुढें पुण्यावर न जातां मागें हटण्याचा बेत ठरला. नंतर ह्या विचारान्वयें फौज परत जाऊं लागली तेव्हां मराठ्यांचे घोडेस्वारांनीं तिला लवकरच घेरलें. या फौजेच्या दुसऱ्या टोळीच्या पिच्छाडीवर क्यापूटन् हार्टले हा सरदार होता. त्यानें या प्रसंगीं मोठें धैर्य व चातुर्य दाखविल्यामुळें त्या टोळींतील

बरेच लोक जगले. नंतर खंडाळ्याचे पूर्वेस दहा कोसांवर व तळेगांवच्या पश्चिमेस दोन कोसांवर वडगांव ह्मणून गांव आहे तेथें या प्रसंगीं काय करावें या गोष्टीचा विचार करण्याकरितां पुनरपि इंग्रजांचे सरदार जमले. तेव्हां बहुमतानें असें ठरलें कीं, अशा तऱ्हेच्या घोर युद्धांत आणखी एक दिवस सुद्धां टिकाव धरण्याचें आपल्या फौजेच्या आंगीं सामर्थ्य नसल्यामुळें मराठ्यांबरोबर तह करावा. नंतर ठरल्याप्रमाणे नाना फडणीस व शिंदा यांचेबरोबर ता. १६रोजीं इंग्रजांनीं तहाचेंबोलणें सुरूकेलें. तेव्हां राघोबा दादाला अगोदर आमच्या स्वाधीन केल्याखेरीज कोणत्याही प्रकारचें बोलणेंचालणें करावयाचें नाहीं असा नानानें आग्रह धरिला. परंतु राघोबा दादा शिंद्याचे स्वाधीन अगोदरच झाला होता. ह्मणून आपण होऊन त्याला शत्रूच्या स्वाधीन करण्याचें बेअब्रूचें काम इंग्रजांस करावें लागलें नाहीं. नंतर आपल्या मनासारखी गोष्ट न झाल्यामुळें नानानें इंग्रजांस असें सांगितलें कीं, कर्नल् गॉडर्ड् यास आपल्या फौजेसह बंगाल्यांत परत जाण्याविषयीं हुकूम करा, तुम्हीं आमच्या मुलखाचा जो भाग घेतला आहे तो सर्व परत द्या, व हा मुलख परत होईपर्यंत तुमची फौज वडगांव एथेंच राहूं द्या. या नानाच्या बोलण्यापेक्षां शिंद्याचें बोलणें इंग्रजांस विशेष अनुकूळ होतें. भडोच परगणा इंग्रजांनीं आह्मांस द्यावा व तसें झालें ह्मणजे इंग्रजांची फौज मोकळी व्हावी असें शिंद्याचें ह्मणणें होतें. तदनुरूप इंग्रजांची फौज मुंबईस परत आली. जी मराठ्यांची फौज इंग्रजांच्या फौजेला पाहिल्या बरोबर आजपर्यंत पळ काढीत असे त्याच फौजेनें या प्रसंगीं इंग्रजांची फौज मुंबईस परत येत असतांना तिचें रक्षण केलें. इंग्रजांच्या फौजेच्या मुख्यांनीं ज्या अटी कबूल केल्या होत्या त्या इंग्रजांची मानहानि करणाऱ्या असल्यामुळें फौज मुंबईस परत सुखरूप आल्यापासून होणारा आनंद नाहींसा झाला. नंतर या प्रकरणाचा विचार करण्याकरितां इंग्रजांची कामदारमंडळी मुंबई एथें एकत्र जमली. तेव्हां घडलेल्या प्रकाराबद्दल दुःख प्रदर्शित करणें किंवा दोष देणें या बद्दल एकही शब्द मंडळीचा प्रमुख तोंडांतून बाहेर काढूं देईना. मुंबईचा गव्हर्नर हार्नबी या प्रसंगीं ( ता. २९ जानेवारी रोजीं ) म्हणाला कीं आपल्या कामाची

थावराथावर करणें हें आपलें पहिलें काम होय. तें झाल्यावर मग आपला बेत कां फसला हें पहावयाचें. या प्रसंगी फौजेनें जें धैर्य प्रगट केलें होतें त्याची त्यानें स्तुति केली, तिचे मुख्यांचे वर्तनाबद्दल त्यांना दोष दिला, आणि कर्नल इजर्टन व कर्नल काकूर्बर्न् यांना कांहीं दिवस तुम्ही लष्करी काम करूं नका असें त्यानें सांगितलें. क्यापूटन् हार्टूले यानें मोठ्या धैर्यानें व चतुराईने आपल्या हुद्याचें काम या प्रसंगीं बजाविलें होतें ह्मणून त्याची लेफ्टनेंट् कर्नल् या बढतीच्या हुद्यावर हार्नबीनें नेमणूक केली. कार्न्याक व इजर्टन यांना तह करण्याचा अधिकार नसल्यामुळें मराठ्यांबरोबर वडगांव एथें त्यांनीं केलेला करार इंग्रजांना बांधूं शकत नाहीं असें त्यानें ठरविलें. यापुढें इंग्रजांनीं कोणत्या रीतीनें वागावें या विषयीं मत देतांना तो ह्मणाला [ ता. १९ फेब्रुवारी ] कीं, पुणें दरबारांतील मुख्य अधिकार नानाकडे नाहीं तर शिंद्याकडे आहे. हा शिंदा फ्रेंचांशीं सख्य करण्यास तयार नसून आमच्याशीं मित्रत्वानें वागण्यास तयार असल्यामुळें त्याच्याशीं तह करण्याविषयीं आम्हीं इंग्रजांनीं परिश्रम केले पाहिजेत. राघोबा दादा हा हल्लीं शिंद्याचे हातीं कळसूत्री बाहुलीप्रमाणें असल्यामुळें त्याला पेशवाईचा अधिकार प्राप्त करून देण्याचा यत्न आम्हीं इतःपर करूं नये. पुणें एथील दरबारांत फ्रेंच व नाना यांचें वजन न राहील आणि सांप्रत कंपनीकडे जो मुलूख आहे तो तसाच तिचेकडे कायम राहील असें करणें हें मुख्य आपलें इंग्रजांचें काम आहे. या ठरलेल्या विचाराप्रमाणें नानाला इंग्रजांनीं असें कळविलें कीं, कार्न्याक व इजर्टन यांना आमच्या वतीनें मराठ्यांशीं तह करण्याचा अधिकार नसल्यामुळें, त्यांनीं वडगांव एथें तुह्मांबरोबर केलेला करार आह्मांस कबूल नाहीं. नंतर शिंद्याबरोबर बोलणें चालविण्याचा यत्न सुरू झाला. तेव्हां असें दिसून आलें कीं, शिंदा इंग्रजांशीं जितक्या मित्रत्वानें वागण्यास तयार होता त्याहून विशेष मित्रत्व त्याचे ठायीं इंग्रजांविषयीं आहे असें हार्नबीला वाटलें होतें. वडगांवचा करार अमलांत आला पाहिजे आणि साष्टीबेट व गुजराथेंतील मुलूख आह्मांस परत मिळाला पाहिजे असा मराठ्यांनीं आग्रह धरिला. आणि या आपल्या ह्मणण्याप्रमाणें इंग्रजांस करणें भाग पाडण्याकरितां त्यांनीं

साष्टीवर हल्ला करण्याची तयारी चालविली. परंतु इंग्रजांनीं पूर्वींच बंदोबस्त करून ठेविल्यामुळें, हा साष्टीवर होणारा हल्ला टळला, आणि, ता. २५ फेब्रुवारी रोजीं, कर्नल् गॉडर्ड् सुरत येथें येऊन पोंचल्यामुळें, गुजराथेंतील स्थितीचेंही स्वरूप बदलून गेलें.

ता. ३ आक्टोबर रोजीं कर्नल लुइस मरण पावल्यामुळें त्याच्या हाताखालच्या बुंदेलखंडांतील सैन्यावर गॉडर्ड ह्याची नेमणूक झाली. नंतर त्यानें मोठ्या अडचणी व धोके यांना न जुमानतां आपल्या हाताखालच्या लोकांस भोपाळ व हुशंगाबाद या प्रांतांतून नर्मदेच्या तीरावर, ता. १६ जानेवारी १७७९ रोजीं, आणिलें. मुंबईसरकार सांगेल त्याप्रमाणें वागावें असें कलकत्याच्या गव्हर्नर जनरलाचें त्यास सांगणें होतें व तदनुरूप जुन्नरावर तुम्हीं जावें अशी मुंबईसरकारची पहिली सांगी त्यास होती. पुढें ता. ११ जानेवारी रोजीं लिहिलेलें मि. कान्र्याक याचें पत्र त्याला ता. २४ रोजीं पोंचलें. त्यांत असें लिहिलेलें होतें कीं, पूर्वींची स्थिति बदलल्यामुळें, तुम्हीं आतां जुन्नरा[जीर्ण नगर]वर न जातां मुंबईस किंवा सुरतेस जावें किंवा तसें करणें तुम्हांस अवघड वाटत असेल तर वऱ्हाड ( विदर्भदेश ) प्रांतांतच राहावें. यानंतर कर्नल गॉडर्ड, कूच करण्याचें काम मोठ्या झपाट्यानें चालवून, ता. ३० जानेवारी रोजीं, बऱ्हाणपुराच्या समोरच्या चव्हाँ या गांवीं पोंचला. पुढें ता. २ फेब्रुवारी रोजीं त्याला मि. कान्र्याक व कर्नल इजर्टन या दोघांचें पत्र पोंचलें. तें खोपवलीहून ता. १९ जानेवारी रोजीं पाठविलेलें होतें. त्यांत असें लिहिलेलें होतें कीं, आमच्या ता. १६ जानेवारीच्या पत्रांत लिहिल्याप्रमाणें आपण व्यवस्था ठेवूं नये. कारण, विचारान्तीं आम्हांस असें आढळून आलें आहे कीं, त्या पत्रांत, जो हुकूम आम्हीं आपणांस केला आहे, तो करण्याचा आम्हांस अधिकार नाहीं. तें १६ व्या तारखेचें पत्र गॉडर्ड यास अजून पोंचलें नव्हतें. तथापि मुंबई सरकारच्या फौजेवर कांहीं घोर प्रसंग गुदरला असावा असें अनुमान करून गॉडर्ड यानें सुरतेकडे मोठ्या झपाट्यानें चाल सुरू केली. पुढें ता. ९ फेब्रुवारी रोजीं मि. कान्र्याक याचें, तुम्हीं बंगाल्यांत [ वंगदेश ] परत जावें, अशा मजकुराचें, ता. १६ जानेवारीचें, पत्र त्यास पोंचलें. नंतर गॉडर्ड यानें सुरतेस पोंचण्याकरितां इतक्या आवेशानें मजल

मारण्याची सुरवात केली कीं, एकोणीस दिवसांत, खडकाळ व जंगली मार्गानें ३०० मैल मजल मारून, ता. २५ फेब्रुवारी रोजीं, तो सुरतेस पोंचला.

कर्नल् गाडर्ड् हा सुरतेस सुखरूपपणें पोंचला असें समजल्यावर कलकत्ता एथील मुख्य सरकारानें मराठ्यांबरोबर बोलणें चालविण्याचे कामाकरितां आपल्या वतीनें त्यास नेमिलें. वडगांवच्या कराराच्या आधारावर जे हक्क मराठे मागत होते ते हक्क ते परत घेत असतील, आणि फ्रेंच लोकांची फौज आपल्या राज्यांत न येऊं देण्याचें कबूल करीत असतील, तर पूर्वीं ठरलेला पुरंदरचा तह पुनरपि कायम करावा, असें त्यास मुख्य सरकारानें लिहिलें होतें. पुढें मुंबईसरकारच्या विनंतीवरून कर्नल् गाडर्ड् हा, ता. १५ मार्च १७७९ रोजीं, मुंबईस गेला. नंतर मुख्य सरकाराकडून आणखी पत्र येईपर्यंत कांहींएक करूं नये असा त्याचा व मुंबईसकारचा अभिप्राय पडला. ह्मणून तो सुरतेस आपल्या सैन्यांत परत आला. पुढें ता. २९ मे रोजीं पुणें दरबारास त्यानें पत्रद्वारें कळविलें कीं, तुमच्या बरोबर बोलणें चालविण्याचा हुकूम मला झाला आहे,व तुमच्या बरोबर कायमचा तह करण्याची कलकत्याच्या मुख्य कौंसलची इच्छा आहे.या वेळीं नानाफडणीस व शिंदा हे दोघेजण आपणांस पुणेंदरबारांत वर्चस्व प्राप्त व्हावें ह्मणून परस्परांशीं कलह करीत होते. त्यांत राघोबा दादा आपल्या हस्तगत व्हावा अशी नानाची फार इच्छा होती. या कलहांत कदाचित् नाना यशस्वी होईल असें समजून शिंद्यानें कांहीं लोक बरोबर देऊन राघोबा दादाला बऱ्हाणपुरास रवाना केलें. नंतर आपणांस कदाचित् बंदींत टाकतील असा संशय वाटेंत आल्यामुळें राघोबा दादा फौजेची एक टोळी बरोबर घेऊन गुजराथेंत जाऊन तेथें कर्नल् गाडर्ड् यास शरण गेला. तेव्हां कर्नल् गाडर्ड् यानें त्याचें रक्षण करण्याचें कबूल केल्यामुळें, ता. १२ जून रोजीं, राघोबा दादा इंग्रजांच्या फौजेच्या तळांत येऊन दाखल झाला. पुढें चातुर्मास्य संपेपर्यंत कर्नल् गाडर्ड् व मराठे या उभयतांमध्यें बोलणें चाललें होतें. परंतु साष्टीबेट आम्हांस द्या व राघोबादादास आमचे स्वाधीन करा असें मराठ्यांचें बोलणें पडल्यामुळें त्या

बोलण्यापासून कांहीं फायदा झाला नाहीं. पुढें त्या वर्षाचे अखेरीस जनरल् गाडर्ड् मुंबईस आला. त्या वेळीं गायकवाडाबरोबर सख्य करून इंग्रजांनीं पेशव्याचे मुलखावर हल्ला करावा असें हार्नबीनें सुचविलें. ही सूचना मुख्य सरकारास मान्य झाल्यामुळें,गोरे पायदळाच्या चार कंपन्या व काळ्या शिपायांच्या दोन पलटणी ( ब्याटेलियन ) बरोबर देऊन, कर्नल् हार्ट्ले यास सुरतेस कर्नल् गाडर्ड् याला कुमक करण्याकरितां मुंबई सरकारानें पाठविलें.

ता. १ जानेवारी १७८० रोजीं गाडर्ड् यानें सुरतेहून कूच करून डभई घेतली. नंतर पेशव्याच्या गुजराथेंतील मुलखापैकीं उत्तरेकडील भाग गायकवाडानें घ्यावा आणि दक्षिणेकडील भाग इंग्रजांनीं घ्यावा असा गायकवाडाबरोबर त्यानें करार केला. ता १५ फेब्रुवारी रोजीं अहमदाबाद इंग्रजांचे हस्तगत झाली आणि नंतर शिंद्याच्या फौजेच्या एका भागाचा पराभव त्यांनीं केला.पुढें मुंबई सरकारचे विनंतीवरून ता.८मे रोजीं बडोद्याहून मुंबईस जाण्याविषयीं हार्ट्ले यास हुकूम झाला. ह्या हार्ट्लेच्या कुमकेची कोंकणांत या समयीं फार जरूर होती. मुंबईस खाण्यापिण्याचे पदार्थ येण्यास मराठ्यांनीं हरकत करूं नये म्हणून कोंकणांत निरनिराळ्या ठिकाणीं फौजेच्या लहान लहान टोळ्या इंग्रजांनीं ठेविल्या होत्या.चार गोरे सबाल्टर्न हुद्देदार हे शिपायांच्या दोन कंपन्या बरोबर घेऊन सह्याद्रीच्या एका घाटांत राहिले होते आणि क्यापूटन् रिचर्ड् क्यांपबेल् यानें फौजेची एक टोळी बराबर घेऊन कल्याण घेतलें होतें. कल्याण हातचें गेल्यामुळें नानाफडणिसानें मोठ्या त्वेषानें एक मोठी फौज कोंकणांत रवाना केली.तिनें इंग्रजांचें घाटांतील ठाणें घेऊन कल्याणाजवळ आल्यावर कल्याण आमचे स्वाधीन करा असें क्यापूटन् क्यांपबेल् यास सांगून पाठविलें. तुमचे आंगांत कुवत असेल तर तुम्हीं कल्याण शहर खुशाल घ्यावें असा निरोप त्यानें पेशव्याचे फौजेला पाठवून मोठ्या आवेशानें कल्याणशहराचें रक्षण केलें. ता. २५मे रोजीं मराठ्यांवर हल्ला करण्याचा इंग्रजांनीं बेत केला होता. परंतु कर्नल् हार्ट्ले येऊन दाखल झाल्यामुळें, ता. २४ रोजींच रात्रीं, त्यांच्या फौजेनें मराठ्यांवर छापा घातला. त्या प्रसंगीं मराठ्यांचे पुष्कळ लोक मारिले गेले व जे पळून गेले त्यांचा

दूरपर्यंत इंग्रजांनीं पाठलाग केला.यापुढें पावसाळा सुरू होईपर्यंत कोंकणांत इंग्रजांचे लोकांना उपद्रव झाला नाहीं.कल्याणचें रक्षण इंग्रजांनीं करण्यापूर्वीं मुक्तेच [ ता. २३ एप्रिल ] लेफ्टनेंट् वेल्श् यानें गुजराथ व कोंकण यांचे सरहद्दीवरचे पार्नेरा, बगवाडा, व इंद्रगड हे तीन किल्ले मोठ्या शौर्यानें व चातुर्यानें घेऊन इंग्रजांचें मोठें हित केलें होतें. पुढें पावसाळा सुरू झाल्यावर मराठ्यांच्या फौजेच्या लहान लहान टोळ्यांनीं कोंकणांतील इंग्रजांच्या ठाण्यांवर हल्ला केला. परंतु कल्याण शहरांत शिबंदीचे लोक पुष्कळ असल्यामुळें त्याला मात्र कांहीं उपद्रव झाला नाहीं.

क्याप्टन् पोप्हम् यानें, ता. ३ आगष्ट रोजीं रात्रीस, ग्याल्हेरच्या किल्ल्यावर हल्ला केला. त्याच दिवशीं क्याप्टन् आबिंग्टन् यानें कल्याणाचे दक्षिणेस सुमारें १० मैल कूच करून मलंगगड ऊर्फ बावा मलंग या महत्वाच्या किल्ल्यावर हल्ला केला. तेव्हां त्या डोंगराच्या खालचा भाग त्याचे हातीं आला. परंतु त्यांतील शिबंदीचे लोक वरच्या किल्ल्यांत पूर्वीच गेले होते व त्या किल्ल्याच्या भिंती उभ्या कड्यासारख्या होत्या. ह्मणून त्याच्यावर आणखी हल्ला करणें अशक्य होतें.इकडे मुंबई सरकाराला पैशाची मोठी टंचाई पडली होती. बंगाल्यांतून (बंगदेश) आपणास मदत मिळेल असें त्यासरकाराला प्रथमतःवाटलें होतें परंतु हैदरअल्लीनें मद्रासेवर हल्ला केल्यामुळें, बंगाल प्रांतांचें सर्व बल तिकडे खर्चण्याची आवश्यकता असल्यामुळें, मुंबई सरकाराला स्वप्रयत्नाखेरीज इतर उपाय राहिला नव्हता. यास्तव पावसाळा संपतांच शत्रूचा मुलूख उद्ध्वस्त करण्याखेरीज पैका उभा करण्याचा दुसरा उपाय नसल्यामुळें वसईला वेढा घालण्याविषयीं गाडर्ड् यास हुकूम झाला आणि आक्टोबर महिन्याचे अखेरीस कर्नल् हार्टले याचे स्वाधीन पांच पलटणी (ब्याटालियन) करून त्यास असा हुकूम फरमाविण्यांत आला कीं,साष्टीतील तितकीं शत्रूचीं कोंकणांतील ठाणीं हुसकून द्यावीं व भाताचें पीक आपलेंसें करावें. सह्याद्रि व वसई यांच्या दरम्यानचा मुलूख आपल्या ताब्यांत राहील अशा रीतीनें तुम्हीं आपल्या फौजेची हालचाल करावी,व वसईच्या किल्ल्याची अधिक मजबुती मराठ्यांना करूं देऊं नये,असाही त्यास हुकूम मिळाला

होता. पुढें मलंगगडाहून कल्याणास परत येत असतां मध्यंतरीं मराठ्यांच्या फौजेनें क्याप्टन् आबिंग्टन याला हरकत केली. तिचें ता. १ आक्टोबर रोजीं निवारण करण्याची कामगिरी कर्नल् हार्टूले ह्यानें प्रथम हातीं घेतली. या कामगिरींत त्याला परिपूर्णपणें यश येऊन त्याचें नुकसान फारच अल्प झालें. या प्रसंगीं त्याच्या फौजेनें बोरघाटापर्यंत मराठ्यांना पिटाळून लाविल्यामुळें मुंबई सरकाराला ठाणें प्रांताचा बहुतेक वसूल घेतां आला. नंतर ता. १३ नवंबर रोजीं जनरल् गाडर्ड् हा वसईच्या किल्ल्यासमोर येऊन दाखल झाला. तो किल्ला फार मजबूत असल्यामुळें क्रमाक्रमानें मोर्चेबंदी करून तो घेण्याचा त्यानें निश्चय केला. ता. २८ नवंबर रोजीं पहिला मोर्चा त्यानें तडीस नेला. तेव्हां कोंकण परत घेण्याकरितां, व वसईच्या किल्ल्यांतील आपल्या लोकांना मदत करण्याकरितां, मराठ्यांनीं या प्रसंगीं मोठी शिकस्त केली व मोठमोठ्या फौजेच्या टोळ्या घाटाखालीं फार जलदीनें पाठविल्या. त्यामुळें, एक महिनाभर लढाई केल्यावर, वसईच्या पूर्वेस सुमारें नऊ मैलांवर दुगाड ह्मणून गांव आहे, तेथपर्यंत आपल्या फौजेसुद्धां कर्नल हार्टूले ह्याला मागें हटावें लागलें. पुढें, वसईच्या किल्ल्यांतील आपल्या लोकांना कुमक करण्याचें काम आपले हातून होत नाहीं असें आढळून येतांच, हार्टूलेच्या फौजेचा नाश करून टाकण्याचा मराठ्यांनीं निश्चय केला आणि ता. १० दिसेंबर रोजीं मराठ्यांच्या वीस हजारांहून अधिक लोकांनीं मुंबईसरकारच्या फौजेच्या आघाडीवर व पिच्छाडीवर तीन वेळा हल्ला केला. परंतु प्रत्येक वेळीं त्यांना मागें हटावें लागलें. ह्या प्रसंगीं इंग्रजांचे फारच थोडे लोक पडले. परंतु त्या पडलेल्या लोकांपैकीं दोन असामी सरदार होते. पुढें ता. ११ रोजीं मराठ्यांनीं पुनरपि हल्ला केला. या प्रसंगीं इंग्रजांचे फार लोक पडले. त्यांमध्यें आणखी दोन सरदार होते. नंतर त्या रात्रीस आपल्या सैन्याच्या पार्श्व भागांचें ज्यांच्या योगानें रक्षण होण्यासारखें होतें अशा दोन डोंगरांची हार्टूले ह्यानें मजबुती केली. दुसरे दिवशीं उजाडतांक्षणींच मराठ्यांनीं अकस्मात् इंग्रजांच्या फौजेवर हल्ला केला. तेव्हां त्यांच्यावर इंग्रजांनीं आगीचा जबर भडिमार केल्यामुळें त्यांना मागें हटावें लागलें. ह्या प्रसंगीं

ांच्या सेनेचा नाईक रामचंद्रपंत हा पडला व शिनोर नोरोन्हा या नांवाचा एक पोर्टुगीज सरदार जखमी झाला. ह्या दुगाडच्या लढाईच्या पूर्व दिवशीं वसईचा किल्ला इंग्रजांचे हस्तगत झाल्यामुळे, ता. १२ डिसेंबर रोजीं, म्ह. त्या लढाईच्या दुसरे दिवशीं, गाडर्ड हा हार्टलेच्या फौजेच्या तळांत येऊन दाखल झाला. नंतर वसईचा किल्ला हस्तगत झाला तरी, त्याच्या दक्षिणचा सुमारें दहा मैलांवरचा अर्नाळा नांवाचा जंजिरा किल्ला हातीं येईपर्यंत, सुमारें एक महिनाभर ( ता. १८ जानेवारी १७८१ ), गाडर्ड याला वसईप्रांतीं राहावें लागलें.

हैदर अल्ली मद्रास एथें यशस्वी झाल्यामुळें इकडे मराठ्यांबरोबर तह करण्याविषयीं कलकत्ता एथील मुख्य सरकार फार उतावीळ झालें. तेव्हां आपल्या पक्षाचें बळ दाखविल्यानें तह करण्याविषयीं मराठ्यांचें मन विशेष वळेल अशा समजुतीनें गाडर्ड यानें आपल्या फौजेसह बोरघाटाच्या पायथ्यापर्यंत कूच केला. नंतर त्याच्या फौजेंतील अघाडीच्या लोकांनीं ता. ८ फेब्रुवारी रोजीं रात्रीस घाटांतून जबरीनें जाऊन खंडाळ्यास मुक्काम केला व खुद्द गाडर्ड हा घाटाच्या पायथ्याशीं खोपवली एथें आपल्या फौजेच्या मुख्य टोळीसह राहिला. परंतु गाडर्ड यानें योजिलेली ही शकल फसली. कारण तिच्या योगानें नानाफडणिसाचें मन मुळींच बदललें नाहीं. आमचा दोस्त हैदर अल्ली याचा होणाऱ्या तहांत समावेश होईपर्यंत आम्हीं कोणत्याही प्रकारचें तहाचें बोलणें ऐकणार नाहीं असें त्यानें इंग्रजांस सांगितलें व पनवेलीकडे गाडर्डच्या जाण्यास हरकत करण्याकरितां १२००० लोकांची एक फौज त्यानें पाठविली. पुढें अन्नसामुग्री घेऊन जाणाऱ्या इंग्रजांच्या एका टोळीवर मराठ्यांनीं ता. १५ मार्च रोजीं चौकाजवळ हल्ला केला व इंग्रजांचें फार फार नुकसान केलें. या प्रसंगीं बोरघाटाच्या माथ्यावर एक किल्ला बांधावा अशी गाडर्ड यानें सूचना केली व राजमाची किल्ल्यांत शिबंदी ठेवावी अशी हार्नबी यानें सूचना केली. परंतु या दोहोंपैकीं एकही सूचना तडीस न गेल्यामुळें गाडर्ड यानें मुंबईस परत येण्याची तयारी करण्याचें काम सुरू केलें. इकडे कोंकणांत फौज पाठविण्याचा नानाचा क्रम एकसारखा चालूच होता. त्यामुळें खोपवली व पनवेल यांच्या दरम्यानचे मुल-

त्यांत मराठ्यांचें सैन्य फार जमलें. नंतर एका प्रसंगीं अन्नसामुग्री आणण्याकरितां पनवेलीहून गाडर्ड यानें एक टोळी पाठविली होती तिच्या मदतीला मुंबईच्या शिबंदींतील उबारीस येणारे सर्व शिपाई पाठवावे लागले तेव्हां ती परत आली. या प्रसंगीं मेलेले व जखमी झालेले मिळून १०६ लोक नायां झाले. पुढें ता. १९ एप्रिल रोजीं गाडर्ड यानें बोरघाटाच्या माथ्यावरून आपल्या तोफा व सामानसुमान खालीं आणिलें व पनवेलीकडे जाण्याची तयारी केली. गाडर्ड याच्या फौजेची हालचाल मराठ्यांच्या घोडेस्वारांच्या तीन मोठ्या टोळ्या मोठ्या दक्षतेनें पहात होत्या त्या येणेंप्रमाणें.कुसूरघाटाच्या पायथ्याशीं १५००० स्वार होते, भीमाशंकराजवळ १२००० होते, व बोरघाटाच्या माथ्यावर २५००० होते. ता. २० रोजीं गाडर्ड यानें कूच करण्यास आरंभ करतांच मराठ्यांची घाटाच्या माथ्यावरची टोळी खालीं आली व गाडर्ड याचें बहुत सामानसुमान तिनें घेतलें. ता. २० रोजीं गाडर्ड यानें खालापूर पर्यंत सात मैलांची मजल करून दुसऱ्या दिवशीं चौकपर्यंत आणखी सात मैलांची मजल मारिली. ही मजल मारीत असतांना, मराठे लोक त्याच्या फौजेच्या आघाडीपिच्छाडीवर डोंगरांच्या व झाडींच्या आडून संतत आगीचा भडिमार करीत असल्यामुळें,वाटेंत त्याचे पुष्कळच लोक पडले. ता. २२ रोजीं इंग्रजांच्या लोकांनीं चौक एथें मुकाम केला. ता. २३ रोजीं मोठ्या सकाळीं त्यांनीं सामानसुमान पुढें रवाना केलें व कांहीं मजल मारिली तों शत्रूंनीं त्यांस गांठलें. या प्रसंगीं शत्रूनें फार निकरानें हल्ला केल्यामुळें गाडर्ड यानें तंबू ठोकून मुकाम करण्याचा घाट घातला तेव्हां शत्रू मागें फिरला. अखेरीस ता.२३एप्रिल रोजीं सायं-काळीं आणखी कांहीं उपद्रव न होतां इंग्रजांची फौज पनवेलीस पोंचली. या प्रसंगीं जखमी झालेले व मेलेले मिळून ४६६ लोक इंग्रजांचे पडले. त्यांपैकीं अठरा असामी गोरे सरदार होते. गाडर्ड याला पनवेलीपर्यंत मागें हटविलें हा आपण एक मोठा जयच मिळविला असें या प्रसंगीं मराठ्यांना वाटलें. पनवेल एथून गाडर्ड यानें आपल्या फौजेची एक टोळी मद्रासेस पाठविली, बाकीचे त्याचे लोक कल्याणास गेले व

वरसात संधिपर्यंत तेथेंच राहिले. मराठयांनीं गुजराथेंतील आपल्या शिंद्यांच्या कुमकेकरितां एक मोठी फौज पाठविली.

इ. स. १७८१ च्या वरसातींत ( जून ते नवंबर ) मुंबईसरकाराला पैशाची फारच टंचाई होती. त्यामुळें मराठयांबरोबर जंगी लढाई करण्याचे केलेले अनेक बेत त्या सरकाराला एकीकडे ठेवून द्यावे लागले. पुढें उघाडीचे दिवस आले तेव्हां त्या उघाडीच्या सर्व ऋतुभर त्या सरकारानें कोंकणांत स्वसंरक्षणाकरितां मात्र आवश्यक असणारीं कामें चालू ठेविलीं. तिकडे हैदर अल्ली फारच प्रबल झाल्यामुळें मराठयांबरोबर तह करणें इंग्रजांस फारच जरूर वाटूं लागलें व अखेरीस ता. १७ मे १७८२ रोजीं त्यांच्याबरोबर इंग्रजांनीं सालबाई एथें तह केला. इ. स. १७७५ त पुरंदरचा तह झाल्यापासून मराठयांपासून जीं जीं स्थळें इंग्रजांनीं जिंकून घेतलीं होतीं तीं सर्व त्यांनीं मराठयांस परत द्यावीं हें एक या सालबाईच्या तहांत मुख्य कलम होतें. याप्रमाणें बहुत स्थळें मराठयांना या तहान्वयें परत दिल्यामुळें उत्तर कोंकणांत इंग्रजांच्या ताब्यांत मुंबई व साष्टी हीं दोन मोठीं बेटें, व घारापुरी, करंजें, आणि शेवेंन्हावें हीं तीन लहान बेटें, मात्र राहिलीं. या तहाअन्वयें वसईबेटही द्यावयाचें होतें. तें मराठयांनीं हा तह पुरा करण्याचे कामीं उशीर लाविल्यामुळें इ. स. १७८३ चे एप्रिल महिन्यापर्यंत त्यांचे हातीं गेलें नाहीं. या सालबाईच्या तहांत मराठयांनीं रघुनाथरावाला नेमणूक करून दिली व तो गोदेच्या तीरावरील कोपरगांव ( कूर्परग्राम ) एथें राहावयास गेला. तेथें गेल्यावर तो लवकरच मरण पावला. त्या समयीं त्याचा मुलगा बाजीराव हा नऊ वर्षांचा होता. त्याच्या मरणानंतर चिमणाजीआपा ह्मणून एक मुलगा त्याला झाला. हा सालबाईचा तह झाला त्याच वेळेच्या सुमारास, जो थोडासा मुलूख मराठयांनीं जव्हारच्या राजाकडे राहूं दिला होता, तो त्याचे स्वाधीन कायमपणें त्यांनीं केला.

सालबाईच्या तहाच्या योगानें ज्या बखेड्यांचा शेवट झाला ते चालू असतांना या ठाणें जिल्ह्याला फार हाल भोगावे लागले. इ.स. १७८१ च्या फेब्रुवारींत कल्याणपासून खोपवलीपर्यंत जाणाऱ्या राजमार्गावरील प्रत्येक गांव, खोंपट, व उडवी जाळून टाकली गेल्यामुळें बहुतेक लोक स्वदेश

खांडून पळून गेले. समुद्राच्या किनाऱ्यावरचा मातबर प्रदेशही या काळीं अगदीं भिकारी झाला होता असें दिसतें. कारण ७५ गाड्या व ५४ बैल एका प्रसंगीं गमावल्यामुळें वसईपट्टयांतील लोक अगदीं दीन होऊन गेले असा एके ठिकाणीं उल्लेख आढळतो. मुंबईबेटांत पैशाची टंचाई असल्या मुळें साष्टी ( सासष्टी=षट्षष्टि ) बेटाचा कारभार औदार्यानें चालविणें अशक्य झालें होतें. या बेटांत या वेळीं सुधारणेचीं चिन्हें अति अल्प दृष्टीस पडत. इ. स. १७८३ त मि. फार्बस हा कान्हेरी ( कृष्णगिरि ) चीं लेणीं पाहाण्याकरितां पुन: गेला तेव्हां गेल्या दहा वर्षांत कंपनीच्या ताब्यांत साष्टी बेट असून त्यांत जमिनीची लागवड वाढली नाहीं हें पाहून त्याला फार आश्चर्य वाटलें. या बेटाच्या मध्यभागीं असणारे वेताच्या चढणीचे डोंगर व त्यांमधील वेताच्या उतरणीचीं खोरीं हीं पूर्वींप्रमाणें अजून ही जंगलानें व्यापलेलींच होतीं. म्याकनेल यानें कान्हेरीच्या लेण्यांचे वर्णनांत एक गोष्ट लिहिली आहे, तिजवरून या अस्वस्थतेच्या वेळीं बलवान लोक दुर्बलांना कसे गांजीत असत हें चांगलें दिसून येतें. ती गोष्ट अशी. म्याकनेल हा कान्हेरीस जात असतांना वाटेंत शंभर मुली वाळलेले मासे भरलेल्या पांटया डोकीवर घेऊन बाजारांत जात आहेत असें त्याच्या भोयांच्या दृष्टीस पडलें. नंतर त्याचा मेणा जवळ येतांच त्या मुली पळूं लागल्या. तेव्हां भोई त्यांचे पाठीस लागले व सांपडल्या तितक्यांचे पाटयांतून मूठमूठ मासे त्यांनीं जबरीनें घेतले. तेव्हां असें करण्याची वहिवाटच आहे असें समजल्यामुळें म्याकनेल यानें आपल्या भोयांना शिक्षा केली नाहीं. ह्याप्रमाणें कंपनीच्या ताब्यांतील मुलखाची स्थिति त्या समयीं होती. परंतु मराठ्यांचे ताब्यांतील मुलखांत भिवंडीपासून उत्तरेस सुमारें बारा मैलांवर असणाऱ्या वज्राबाईच्या उन्हाळ्या- पर्यंत जिकडे तिकडे शेतांत भात, द्विदळ धान्य, व थोडाबहुत तंबाकू यांचें पीक दृष्टीस पडे. ह्या पट्टयांत आंब्याचीं झाडें पुष्कळच होतीं. खेरीज वज्राबाईच्या देवळासभोंवतीं थोडेशीं आंबट लिंबाचीं झाडें, केळी,व पेरूचीं झाडें होतीं.ह्या पट्टयांत गवत अति उंच वाढलेलें होतें आणि फुलें व सुगंधी वनस्पतिही पुष्कळ होत्या. एथील लोक आळशी असून जें मिळेल तें खाऊन टाकून मागें

शिल्लक कांहीं ठेवीत नसत. कारण मराठ्यांचे अंगीं उद्योगीपणा हा गुण नसल्यामुळें, व मराठ्यांच्या अमलाची फार शोचनीय स्थिति असून या सर्व प्रदेशांत अव्यवस्था असल्यामुळें, लोकांची अशी स्थिति झाली होती. या नंतर चार वर्षांनीं इ. स. १७८७ त बरसातीच्या दिवसांत [ ता. १५ जागष्ट ते ता. ११ सपटंबर ] पोलंड देशचा मुशाफर हा होवे यानें साष्टीबेट व त्याचे जवळचा मुलूख यांत औषधी वनस्पतींच्या शोधाकरितां अनेक फेऱ्या केल्या. तेव्हां त्याला साष्टीबेटाची स्थिति फारच वाईट दिसून आली. त्यांत लोकवस्ती पातळ असून जमिनीची लागवड चांगली होत नसे. वेसाव्यापासून ठाण्यापर्यंत एकही गांव किंवा लागवडीचें चिन्ह त्याला आढळलें नाहीं. जिकडे तिकडे गगनचुंबी मोठमोठे सागाचे जाडे वृक्ष, किरिस्तांवांचीं मोडकळीस आलेलीं लहानमोठीं देवळें, व मोठमोठ्या इमारती दृष्टीस पडत. ठाणें शहराजवळ ज्यांत भाताचीं शेतें आहेत असें एक गांव त्याला आढळलें. दाढी भाजून त्यांत भात पेरून नंतर त्याचे आंवे शेतांत लावण्याची चाल गुजराथेंतील लोकांपासून ठाणें जिल्ह्यांतील लोकांनीं नुकतीच घेतली होती असें ह्या होवे साहेबाचें मत आहे. या पद्धतीमुळें बीं फार लागत नाहीं व तिप्पट पीक येतें अशी लोकांची समजूत असल्याविषयींही त्यानें आपल्या लेखांत उल्लेख केला आहे. पश्चिमेकडील पट्ट्यांत धारावी एथें भात, ऊंस, व भाजीपाला लोक पिकवीत असत. आग्नेयीकडील प्रदेशांत जुन्या लागवडीचीं चिन्हें व पडक्या विहिरी मात्र होत्या. तरी ऊंस व भात पिकण्या सारखी पुष्कळ सपाट जमीन पडीत होती. साष्टीबेटांतील उत्पन्नावर ठाण्याची शिबंदी व शहर यांचा निर्वाह होत नसे. बेटाबाहेरचा मराठ्यांच्या ताब्यांतला मुलूख तर साष्टीबेटाहूनही उजाड झालेला होता. ठाण्यापासून वज्राबाईपर्यंत एकही नांदतें गांव नव्हतें. खेरीज वाघांच्या उपद्रवामुळें प्रवास करणें हें फार भयंकर काम असे. एका दिवसांत ह्या प्रदेशांत पांच पांच वाघ दृष्टीस पडत. तसेच रेडेही शत्रूप्रमाणेंच युरोपियनांचे मागें लागत. एतद्देशीय लोक तर इतके धर्मवेडे होते कीं, ते युरोपियन लोकांना सर्व

पृथ्वीतील लोकांहून अतिनीच समजत व त्यांचा जीव घेण्यास मागें पुढें पहात नसत.

पुढील वर्षाचे [ इ. स १७८८ ] जानेवारी महिन्यांत सुरतेपासून वसईपर्यंतच्या किनाऱ्यावरील मुलखांत होवे यानें मुशाफरी केली. ह्या वेळीं त्यानें ह्या जिल्ह्याचें असें वर्णन केलें आहे कीं, ह्या जिल्ह्यांत जिकडे तिकडे पाण्याची विपुलता असून जमीन सुपीक होती. ह्या पट्ट्यांतील डोंगरांवर उत्तम साग होत असे व डोंगरांमधील खोऱ्यांत उंच गवत होई. नारगोलाजवळच्या सपाट मैदानांत उफाड्याच्या वाढीचा ऊस होत असे. ह्या पट्ट्याच्या अगदीं उत्तरेकडील भागांतील डोंगरांवर एकसारखें अखंड जंगल होतें व दऱ्याखोऱ्यांत फार उंच गवत होतें. त्यामुळें तो प्रदेश फारच जंगली दिसे. ह्या पट्ट्याच्या दक्षिणेकडच्या डहाणू व उंबरगांव यांमधील भागांत खडकाळपणा नसून किनाऱ्यावरील जमीन सपाट व फार पिकाऊ होती आणि डोंगरांचा रंग पिवळा असून त्यांवर जंगल नसल्यामुळें ते उघडे बोडके होते. डहाणूच्या दक्षिणेस वसईपर्यंत सर्व वाटभर समुद्रकिनाऱ्याची पट्टी सुपीक असून तींत भात, ऊस, व केळीं यांची उत्तम तऱ्हेची लागवड केलेली होती. दिवसास ऊन कडक पडत असल्यामुळें उष्णतामापक यंत्रांत ८९ अंशांहून कमी उंचीवर पारा कधींही नसे.तरी रात्रीस फार गारवा पडत असे. इतका गारवा रात्रीस पडेल असें दिवसाच्या उन्हाचा कडकपणा जो अनुभवी त्याचे मनांत कधींही येत नसे. त्या वर्षी ता.१३ जानेवारी रोजीं रात्रीस अशाप्रकारच्या गारठ्यामुळें मारोलीजवळचीं लहान लहान पाण्याचीं डबकीं गोठून गेलीं होतीं. दऱ्याखोऱ्यांतून झुडपें, गलबतें बांधण्याचे कामीं उपयोगी पडणारीं झाडें, व शेवरीचीं झाडें होतीं. उंबरगांव व डहाणू यांच्या दरम्यान किनाऱ्यावर मोठमोठीं शिंदीचीं वनें होतीं. पलीकडे उत्तरेस मारोलीजवळ सागाचे वृक्ष फारच मोठे होते. त्यांपैकीं कित्येकांची वेढ बारा फुटांहून अधिक असून उंची ऐंशी फुटांहून, ह्म० तेरा पुरुषांहून, कमी नसे. डहाणू आणि वसई यांचे दरम्यानचे किनाऱ्याचे पट्टींत भात, गोराडू, व हळद होत असे. ह्या पट्टींत उंसाचे मोठमोठे फड असत. त्यांत मधून मधून केळी व डाळिंबी लावीत असत. हा ऊस इतका उत्तम होत

असे कीं, त्याच्या कांड्याची उंची पंधरा फूट, ह्मणजे अडीच पुरुष, असून जाडीही त्या मानानेंच असे. उत्तरेकडच्या पट्ट्यांत पुष्कळ वाघ होते. लोकांनीं या वाघापैकीं अनेकांना त्यांच्या दडून राहण्याच्या जाग्यांतून हुसकून लाविलें नाहीं असा एकही दिवस जात नसे. कांहीं गांवांत पाठीला पोंक आलेले व आकारानें लहान असे बैल असत. ते पाहिले ह्मणजे गुजराथेंतील मोठमोठ्या बैलांच्या हे बैल ह्या लहानशा प्रतिमाच आहेत असें वाटे. हे बैल फार स्वस्त असत. त्यामुळें रुपायाला एक बैल या मानानें हवे तितके ते विकत मिळत. ह्या प्रांतीं कांहीं मेंढरें असत त्यांची लोंकर गुजराथेंतील कापसासारखी मऊ व पांढरी शुभ्र असे. समुद्र किनाऱ्यावरील सुपीक पट्ट्याखेरीज या प्रांतांतील इतर प्रदेशांत लोकांची वस्ती फारच कमी असून लागवडही चांगली होत नसे. ह्या प्रांताच्या उत्तर टोंकापासून वसईपर्यंत होबे साहेबाच्या दृष्टीस फक्त तेरा गांव पडले. एथील लोक काळ्या रंगाचे, सडपातळ, चलाख, व दीर्घायु असत. ते बैलाखेरीज इतर सर्व जनावरांचें मांस खात व यथेच्छ ताडीमाडी पीत. हिंवाळ्यांत लोंकरीचे कपडे आंगावर घेत. विशेषतः या प्रदेशांतल्या डोंगरांतील गांवें फार लहान असत. त्यांत बारातेरा घरांहून अधिक घरें नसत. एथील लोक दारिद्री असल्यामुळें त्यांना सुखाचा लेशही प्राप्त होत नसे. हा प्रांत खडकाळ होता तरी किनाऱ्यावरील पट्ट्यांत गाडी जाण्यासारखे रस्ते होते. होबे साहेब ह्या प्रांतांत मुशाफरी करीत असतांना त्याच्या बरोबर एक घोडा व दोन गाड्या होत्या. उंबरगांव व डहाणू यांच्या दरम्यान ताडीनें भरलेले घडे लादून नेण्याकरितां शेंकडों बैलगाड्या वाटेनें जातांना त्याचे दृष्टीस पडल्या.

ह्या प्रांतीं चोरट्यांचा उपद्रव नव्हता असें दिसतें. सगळ्या मार्गभर व विशेषतः उत्तरेकडील प्रदेशांत लोकांचें रक्षण करण्याकरितां घोडेस्वारांचीं ठाणीं ठेविलेलीं होतीं. त्या ठाण्यांतील स्वार लहानें लहान केंबळी घरांत राहात, जमिनीच्या एकेका लहान तुकड्यांत धान्याची लागवड करीत, व लोकांचें रक्षण करण्याकरितां तरवार, भाला, व तोड्याची बंदूक अशीं शस्त्रें बरोबर बाळगीत. शत्रु दृष्टीस पडतांच लोकांना इशारत द्यावी हें त्यांचें एक मुख्य काम असे. ते वाटसरांना मध्येंच

थांबवून, त्यांचे जवळ परवाने नसले तर, प्रांताच्या मुख्य अधिकाऱ्याकडे त्यांना नेत. तेव्हां तो अधिकारी त्यांची चांगली बारीक रीतीनें चवकशी करी प्रत्येक तरीजवळही अशा प्रकारचें एकेक ठाणें असे. त्यामुळें मुख्य ठाणेदाराला पोटभर चिरीमिरी दिल्याखेरीज तर उतरून पलीकडे जाण्याची फार मुश्कील पडत असे. मराठ्यांचे अधिकारी लोकांना उघडपणें लुटीत व पाहिजे तो जिन्नस वाटसरांपासून जबरीनें उपटीत असत. गुजराथ प्रांतांत जिकडे तिकडे चोरटे होते तरी ठाणें जिल्ह्यापेक्षां या प्रांतीं मुशाफर लोकांना खर्च कमी पुरत असे.

इ. स. १७७४ पासून इ. स. १७८३ पर्यंत गेलेल्या नऊ वर्षांच्या मुदतींत मुंबई बेटाची फारच वृद्धि झाली असें इ. स. १७८३ त मि. फार्बस यास आढळून आलें. बेटाबाहेरच्या मुलखांत फार दंगेधोपे होऊं लागल्यामुळें तेथील पुष्कळ लोकांना मुंबईबेटांत येऊन राहाणें भाग पडलें होतें. खेरीज व्यापाराची तेजी असल्यामुळेंही पुष्कळ लोक तेथें येऊन राहिले होते. ह्या बेटांत खाण्यापिण्याचे पदार्थांची समृद्धि होती. परंतु ते फार महाग असल्यामुळें पूर्वींच्या किमतीच्या दुप्पट प्रत्येक जिनसाला किंमत पडत असे. सगळ्या बेटभर जिकडेतिकडे घरें व बागा झाल्या होत्या. सुरत किंवा अहमदाबाद या शहरांसारखें हें शहर लवकरच मोठें होईल असा रंग दिसूं लागला होता. इ. स. १७८० त मुंबईत एक लक्ष लोकवस्ती होती असा आबे रेनल याचा लेख आहे. फ्रयांकलिन यानें इ. स. १७८६ तल्या मुंबईच्या स्थितीचें वर्णन असें केलें आहे कीं, मुंबई शहर हें फार सुंदर असून बेटाच्या विस्ताराच्या मानानें जितकी वस्ती असावी तितकी यांत आहे. विस्ताराच्या मानानें पाहिलें तर पृथ्वींतील दुसऱ्या कोणत्याही बेटांत ह्याचेहून अधिक दाट वस्ती नाहीं. एथें एक भव्य बंदर, एक उत्तम गोदी, व एक गलबतें बांधण्याची जागा असून शहाणे व वाकबगार गलबतें बांधणारे आहेत. इंग्लंड देशांतील उत्तम उत्तम गलबतें बांधणारांहून हे कमी हुशार आहेत असें नाहीं. दक्षिण [ दक्षिणापथ ], मलबार ( मलयद्वार ), कारोमांडेल [ चोलमंडल ] किनारा, व गुजराथ ( गुर्जरराष्ट्र ) या प्रांतांतून व्यापारी येऊन एथें राहिले आहेत. शिपायांच्या आठ पलटणा ( ब्याटालियन )

व एक गोरी पायदळपलटण एथें असून, गोरे गोलंदाज व इंजनेर एथें आहेत. एक मैल लांब व चाळीस फूट रुंद असा एक बांध, या बेटांतील दलदलींतून, लोकांच्या जाण्यायेण्याच्या सोईकरितां, घातलेला आहे. हें एक ध्यानांत ठेवण्यासारखें महत्वाचें काम एथें आहे.

इ. स. १७९० त, पश्चिम हिंदुस्थानच्या इतर भागांत पाऊस न पडल्यामुळें दुष्काळ पडला, त्याप्रमाणें ठाणें जिल्ह्यांतही पडला होता. इ. स. १७९३ त साष्टी बेटाचा पुष्कळ भाग अगदीं ओसाड व पडीत होता. परंतु ऊंस व नीळ हे पदार्थ पिकविण्याचा एथें नुकाच आरंभ चाललेला असून, डाक्टर स्टयूअर्ट या नांवाचा कोणीएक मुंबईचा गृहस्थ, त्या लहान लहान रोप्यांची देखरेख करण्याकरितां, आलेला होता. या नंतर लवकरच साष्टी बेटांतील कांहीं मोठमोठे जमीनजुमले इंग्रजी अमलांतील रयतेला, ह्या प्रांताची सुधारणा करण्याचे उद्देशानें, इनाम देण्यांत आले. इ. स. १८०१ त साष्टी बेटांतील जमीनदारांना 'कायमचा धारा पतकरा' असें सरकाराकडून सांगण्यांत आलें. परंतु हें बोलणें चौघांनीं मात्र कबूल केलें. अठराव्या शतकाच्या शेवटच्या पंधरा वर्षांच्या मुदतींत सर्व प्रकारच्या व्यापाराच्या योगानें, व विशेषतः चिनी कापसाच्या व्यापाराच्या योगानें, मुंबईत पैसा फार आला होता, आणि, मुंबई शहराचा भरभराट व विस्तार वाढल्यामुळें, तेथें शेतचे उत्पन्नाचा चांगला खप होऊं लागला होता. शिव. गांवाजवळच्या दलदलीमधून जाणारा बांध तयार होऊन, त्यावरून लोक जाऊंयेऊं लागल्यामुळें, व मालावरची जकात बंद झाल्या (इ. स. १७९८–१८०३) मुळें, मुंबईतील व्यापाराच्या तेजीपासून साष्टी बेटांतील लोकांना परिपूर्णतेनें फायदा करून घेण्याची विशेष सवड सांपडूं लागली.

पुण्याचे दरबारीं शिंदा, नानाफडणीस, व धाकटा पेशवा बाजीराव या तिघांमध्यें वर्चस्वप्राप्तीविषयीं कलह सुरू होऊन, इ. स. १७९० पासून १८०० पर्यंत, ठाणें जिल्ह्यांतील समुद्रापासून दूर असणाऱ्या आंतील प्रदेशांत अंमल चालविण्याचें काम दुर्बल अधिकाऱ्यांच्या हातीं गेल्यामुळें, मराठ्यांच्या अमलाचा ऱ्हास होऊं लागला. तसेंच दक्षिणेंतील कोळीलोक ह्या प्रांतांतील लोकांना फार उपद्रव देऊं लागले. हे कोळी एक हजाराहून अधिक होते. ते आपल्या लोकांच्या दोनतीन टोळ्या करून,

फावेल तेव्हां गांवें लुटीत, मिळविलेल्या चीजवस्तेची वांटणी करीत, आणि मग आपापल्या घरीं जाऊन स्वस्थ बसत. डोंगरांतून ठिकठिकाणीं रयतेच्या रक्षणाकरितां रक्षकांचीं सरकारी ठाणीं होतीं. परंतु त्यांचे हातून ह्या कोळ्यांचा बंदोबस्त होत नसे.

भाग चवथा समाप्त.

# भाग ६ वा.

## इंग्रजांची कारकीर्द.

### इ. स. १८००–इ. स. १८८१.

———000———

इ. स. १८०२ त, यशवंतराव होळकर यास विजय प्राप्त झाल्यावर, बाजीराव साहेब पेशवा हा, कुलाबा जिल्ह्याच्या दक्षिण भागांतील शहर महाड, एथें गेला. परंतु होळकर ह्याच्या पाठोपाठ तेथें गेल्यामुळें, तो तेथून सुवर्णदुर्ग एथें पळून गेला. तेथें गेल्यावर, सुवर्णदुर्ग किल्ला मोडकळीस आलेला आहे, असें दिसून आल्यामुळें, तो जलमार्गानें चौल एथें आला. पुढें, कांहीं दिवसांनीं, तोंडचा वारा असल्यामुळें, मार्गांत बराच खोळंबा झाल्यावर, साष्टी बेटांतील मनोरी बंदरीं, ता. १६ दिसेंबर रोजीं, गलबतांतून जमिनीवर तो उतरला, आणि, ता. १७ रोजीं, तीस अनुयायांसह वसईस गेला. या वेळीं पुणें एथें इंग्रजांचा एजंट कर्नल क्लोस हा होता. त्याची व बाजीरावाची वसई मुकामीं मुलाकत झाली. बाजीरावसाहेबपेशव्याच्या अधिकाराला इंग्रजांनीं कोणत्या शर्तींवर टेंका द्यावा ह्या गोष्टीचा विचार पूर्वींच झालेला होता. त्याच गोष्टीचा पुनरपि विचार करण्याची सुरवात ता. १८ रोजीं झाली, व ता. ३१ रोजीं ह्याची समाप्ति झाली. ह्या प्रसंगीं झालेल्या तहाला वसईचा तह असें ह्मणतात. ह्या तहाच्या द्वारें उभयतांमध्यें असा करार झाला कीं, इंग्रजांनीं पेशव्याच्या राज्याचें रक्षण सर्व शत्रूंपासून करावें, व पेशव्यानें इंग्रजांखेरीज युरोपांतील दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राशीं संबंध ठेवूं नये काळें पायदळ साहा हजार, आणि, ह्याच्या बरोबर नेहमींच्या वहिवाटी प्रमाणें आवश्यक लागणाऱ्या तोफा, व गोरे गोलंदाज, इतकें सैन्य इंग्रजांनीं, पेशव्याच्या मुलखांत, पेशव्याच्या चाकरीस ठेवावें, आणि, ह्या फौजेच्या खर्चासाठीं, दरसाल सव्वीस लाख रुपये वसूल येईल, इतका मुलूख पेशव्यानें इंग्रजांस द्यावा, असेंही ठरलें होतें. खेरीज पेशव्यानें आपल्या पदरीं ५००० घोडेस्वार, ३००० पायदळ, व त्या मानानें

आवश्यक तितक्या तोफा ठेवाव्या, आणि, इंग्रजांस विचारल्या शिवाय, कोणाबरोबरही तहाचें बोलणें त्यानें चालवूं नये, असाही करार होता. नंतर, पेशव्याचें रक्षण व्हावें ह्मणून, इंग्रजांनीं एक लढाऊ टोळी वसईस पाठविली, व सोपाऱ्याच्या पुलाच्या रक्षणाकरतां, एक मोठा लांकडी मेढेकोट बांधिला. ता. २७ एप्रिल १८०३ पर्यंत पेशवा वसईंतच होता. नंतर तो कल्याणास गेला. तेव्हां इंग्रजांचे २२०० लोक त्याच्या बरोबर, त्याच्या रक्षणाकरितां, होते. त्यांत ७८ वी पलटण, ८४ व्या पलटणीचा कांहीं भाग, व कांहीं गोलंदाज होते. कल्याणास एक आठवडा राहिल्यानंतर बोरघाटानें पेशवा पुण्यास गेला.

इ. स. १८०३ व १८०४ या वर्षीं दुष्काळ पडल्यामुळें ठाणें जिल्ह्यांतील लोकांचे फार हाल झाले. तथापि होळकरापासून या जिल्ह्यांतील लोकांना उपद्रव पोंचलेला नव्हता. ह्मणून घाटावरच्या लोकांइतके येथील लोकांचे, या दुष्काळांत, हाल झाले नाहींत. परंतु, उपासमार झालेले अगणित लोक घाटावरून खालीं आल्यामुळें, पनवेल व इतर स्थळें, येथील मृत मनुष्यांची संख्या फारच वाढली. या नंतर, दाहा वर्षांनीं, ह्म. इ. स. १८११ व १८१२ या वर्षीं, मारवाड [ मरुदेश ], गुजराथ [गुर्जरराष्ट्र,] कच्छ, व काठेवाड, या प्रांतांत दुष्काळ पडल्यामुळें, तेथील लोकांचें अति नुकसान झालें होतें, त्याप्रमाणेंच, ठाणें जिल्ह्याचेंही नुकसान झालें. इ. स १८११ त, मारवाड, व गुजराथचा उत्तरेकडील प्रदेश, यांत, टोळधाडीनें पिकाचें नुकसान झालें होतें, तसें ठाणें जिल्ह्यांत झालें नव्हतें. तरी इ. स. १८१२ त, उत्तरेकडील मुलखाप्रमाणें, ह्या जिल्ह्यांतही अनावृष्टि झाल्यामुळें, व, मारवाड आणि गुजराथ, या प्रांतांतील दुष्काळग्रस्त लोकांच्या झुंडीच्या झुंडी इकडे आल्यामुळें, एथील लोकांचे फार हाल झाले. या प्रसंगीं, मुंबई बेटांत धनधान्याची समृद्धि आहे, असें समजल्यावरून, चोहोंकडून उपासमार झालेल्या लोकांच्या झुंडी येऊं लागल्या. तेव्हां मुंबई बेटांत येण्याच्या तरींवर अतिशय गर्दी होऊं लागली. या वेळीं मुंबईस सुमारें दोन लाख लोकवस्ती होती, व एवढ्या लोकांना पंधरा महिने पुरेशी त्या बेटांत अन्नसामुग्रीही होती. ह्मणून

बेटा बाहेरच्या परकीय लोकांना बेटांत येण्यास, व बेटांतील धान्य बाहेर जाण्यास, हरकत करावी कीं नाहीं, हा विचार उत्पन्न झाला. तेव्हां, पुष्कळ ऊहापोह झाल्यावर, अशा प्रकारची हरकत करूं नये, असा निर्णय ठरला. आपल्या मालाच्या विक्रीला सरकारांतून कांहीं हरकत होत नाहीं, अशी गल्ला विकणाऱ्या व्यापाऱ्यांची खातरी होतांच, त्यांनीं पुष्कळ गल्ला मुंबईस आणिला, व त्यामुळें, मुंबई शहर हें त्या वेळीं पश्चिम हिंदुस्थांतील लोकांच्या गल्ल्याचें कोठारच होऊन गेलें होतें. मुंबईंत धान्याचा भाव फार चढला नाहीं. त्यामुळें उत्तरेकडील प्रांतांतील दुष्काळग्रस्त लोकांची गर्दी मुंबईंत फार झाली. या प्रसंगीं सुमारें २०,००० परके लोक, मुंबईस आले होते, असें अनुमान आहे. मुंबईशहरांतील बंदरांतले धक्के व रस्ते उपासमार झालेल्या भिकारी लोकांनीं भरलेले असत, व, मुंबई शहराचा पूर्वेकडील, ह्म· जमिनीच्या बाजूकडचा भाग, मेलेल्या व मरणोन्मुख झालेल्या लोकांनीं, भरलेला असे. या परक्या लोकांना मदत करण्याकरितां पुष्कळ यत्न करण्यांत आला· इंग्रज व नेटिव लोक यांच्या कमिट्या तांदूळ खरेदी करण्याकरितां नेमण्यांत आल्या होत्या. कोटापासून सुमारें एक मैल अंतरावर एका नारळीबागेंत तांदूळ रांधण्याकरितां मोठमोठीं भांडीं तयार केलीं होतीं, व निरनिराळ्या जातींच्या लोकांच्या सोईकरितां, त्या त्या जातीचे सैपाकी ठेविले होते. दुष्काळाबरोबर महामारीही उठल्यामुळें, कोटाच्या बाहेर रोग्यांकरितां पडव्या बांधल्या होत्या· याप्रसंगीं उपासमार झालेल्या लोकांच्या बचावा करितां इतके उपाय झाले तरी, पूर्वीं दररोज पंधरा माणसें मरत होतीं तीं तीसचाळीस मरूं लागलीं, व कधीं कधीं शंभराहूनही अधिक मरत असत. ब्याक् बेवर दिवसरात्र चितांची ओळच्याओळ सतत जळतांना दृष्टीस पडे, आणि, किनाऱ्यापासून थोड्या अंतरावर, मृत माणसांना जाळण्याकरितां लागणाऱ्या लांकडांनीं भरलेले असंख्य मचवे समुद्रांत दृष्टीस पडत.

पेशव्याच्या मुलखाचें रक्षण करण्याची हमी इंग्रजांनीं घेतल्यामुळें, पुढें पंधरा वर्षेपर्यंत ( इ. स. १८०३–१८१७), सगळ्या ठाणें जिल्ह्यांत शांतता होती, व त्यामुळें, लोकांचें जीवित व वित्त हीं बरींच सुरक्षित होतीं. या पंधरा वर्षांच्या मुदतींत एकदां मात्र पेंढाऱ्यांपासून लोकांना

उपद्रव झाला. इंग्रजांनीं आपल्या मुलखाचें रक्षण करण्याविषयीं दिलेल्या वचनावर भरंसा ठेवून, पेशव्यानें, करारप्रमाणें, आपल्या पदरीं फौज बाळगण्याच्या कामीं हयगय केली, आपल्या मुलखांतील किल्ले नादुरुस्त होऊं दिले, व, द्रव्यसंग्रह करण्याखेरीज, दुसऱ्या कोणत्याही गोष्टीकडे लक्ष दिलें नाहीं. तो मोठमोठीं अधिकाराचीं कामें जमाबंदीचा वसूल करण्याचा मक्ता घेणारांकडे देऊं लागला, व लोकांच्या फिर्यादींकडे मुळींच लक्ष देईनासा झाला. मक्त्यानें अधिकार मिळविणारे कामगार सौम्य रीतीनें वागेनातसे झाले. कारण, आपला आधिकार केव्हां नाहींसा होईल याचा नेम नाहीं, अशी भीति त्यांना नेहमीं असे. दुसरा मनुष्य अधिक रकम देण्यास तयार झाला कीं, पहिल्या मक्तेवाल्या अधिकाऱ्याला दूर व्हावें लागे, आणि, जो शेवटपर्यंत टिके, त्यानें कबूल केलेली रकम दिली नाहीं तर, त्याच्या मिळकतीची जप्ती होऊन, त्याला स्वतः तुरुंगांत पडावें लागे. यामुळें मक्त्यानें अधिकाराचीं कामें पतकरणारे लोक फार क्रूरतेनें वागत असत.

मिलबर्न यानें "पूर्वेकडील देशांशीं पाश्चात्यांचा व्यापार" ह्मणून इ.स. १८०० पासून १८१२ पर्यंतच्या माहितीचें एक पुस्तक छापलें होतें. त्यांत घातलेल्या नकाशांत दमण, डहाणू, शिरगांव, आगाशी, घारापुरी, वसई, वेसावें, मुंबई, करंजें, कुलाबा, व चौल, हीं ठाणें जिल्ह्यांतील बंदरें, त्यानें नमूद केलेलीं आहेत.

एकुणिसाव्या शतकाच्या अवेलीच्या व्यापाराच्या तक्त्यांवरून असें दिसून येतें कीं, मुंबईशहरचा व्यापार जसजसा वाढूं लागला, तसतसें ठाणें जिल्ह्यांतील किनाऱ्यावरच्या इतर बंदरांतील व्यापाराचेंही बरेंच पुनरुज्जीवन होऊं लागलें. इ. स. १८०२ चे तक्त्यांवरून असें दिसून येतें कीं, त्या वर्षी वसई प्रांतांतील बंदरें, आणि मुंबई व सुरत हीं शहरें, यांचे दरम्यान साडेतीन लाखांची घडामोड झाली होती. त्यां पैकीं दोन लाखांचा माल बाहेर गेला, व सुमारें दीड लाखाचा माल या देशांत आला होता. इ. स. १८०५ त ही घडामोड नऊ लाखांपर्यंत वाढली होती. त्यांपैकीं सुमारें साडेचार लाखांचा माल बाहेर गेला व सवाचार लाखांचा आला. परंतु इ. स. १८१.५ त, व्यापाराची मंदी झाल्यामुळें, सातलाखांची मात्र

घडामोड झाली.त्यांपैकीं पावणेचार लाखांचा माल बाहेर गेला व सवातीन लाखांचा माल आला. मिलबर्न याचें असें मत आहे कीं, इ. स. १८०२पासून१८०६पर्यंत गेलेल्या पांच वर्षांच्या मुदतींत, वसई प्रांतांत, दरसाल सरासरीनें नऊ लाखांची घडामोड होत होती. त्यांपैकीं पांच लाखांचा माल बाहेर जाई व चार लाखांचा माल येत असे. कापड, धान्य, लोखंड, साखर, नारळ, खोबरें, सुपारी, खारीक, मिऱ्यें, हळद, व पैका हे जिन्नस बाहेर जात असत, आणि, धान्य, हस्तिदंत, तेल, इमारतीचें लांकूड, ताग, कापड, व सुपारी, हे जिन्नस ठाणें जिल्ह्यांत येत असत,असें, इ. स. १८०५च्या व्यापाराच्या तक्त्यांवरून,दिसून येतें.

एकुणिसाव्या शतकाच्या अवेलीस,मुंबईची हवा निरोगी होती तरी,कधीं कधीं, तिच्यापासून हानि होत असे. मतलईचा वारा आंगाला लागला तर कधीं कधीं ताप येत असे, व ह्याच्या योगानें शरीराचे अवयव निकामी होत असत. इंग्लंडांत सडकेवर खडी टाकण्याची सुरवात होण्यापूर्वीं, बहुत वर्षांपासून, खडी टाकलेले सुंदर रस्ते मुंबई बेटांत होते. एथील कोटाची लांबी सुमारें एक मैल व रुंदी सुमारें पाव मैल होती. कोटाला बुरूज वगैरे पुष्कळ असून, ते चांगल्या रीतीनें बांधलेले होते. समुद्राकडच्या बाजूचे बुरूज मजबूद होते.परंतु जमिनीकडील बुरूज सहज घेतां येण्यासारखे होते.पाहिजे तेव्हां बुजवून टाकतां येण्यासारखा खोल खंदक एथील कोटासभोंवतीं असल्यामुळें, हिंदुस्थानांत कंपनीच्या ताब्यांत जीं स्थळें होतीं, त्या सर्वांत मुंबईबेट फार मजबूद होतें. खुद्द मुंबई शहरच्या कोटाखेरीज मुंबई बेटाच्या इतर भागांतही बुरूज होते. त्यांपैकीं माहीम एथील बुरूज मुख्य होता. या प्रमाणें बंदोबस्त असल्यामुळें, असावी तितकी शिबंदी ठेविल्यास, कितीही शत्रूचें बळ असलें तरी, मुंबईबेट त्याचे हस्तगत होण्याची भीति नव्हती. मुंबईच्या कोटाला पांच वेशी होत्या. त्यांपैकीं दक्षिणेकडच्या दोन वेशींना मरीन गेट्स् (ह्मणजे बंदरावर जाण्याच्या वेशी) ह्मणत. पश्चिमेकडच्या दोन वेशींपैकीं एकीला आपोलो गेट, व दुसरीला चर्चगेट, म्ह० देवळाकडे जाण्याची वेस, ह्मणत. उत्तरेकडील वेशीचें नांव बाजारगेट, म्ह०

बाजारांत जाण्याची वेस, असें होतें. बंदराकडच्या दोन वेशींच्या मध्यें चौकोनी किल्ला होता. तो मजबूद व कठीण अशा दगडांनीं बांधलेला होता. किल्ल्याच्या पश्चिमेस एक गोदी होती. ती चांगली असून तींत सामानाचा सांठा पुष्कळ असे. मुंबईच्या कोरड्या गोदीएवढी गोदी दुसरे कोठेंही नव्हती. एथील दोरखंडें तयार करण्याची इमारत, इंग्लंडांतील मोठमोठ्या दोरखंडें तयार करण्याच्या इमारतीं एवढी मोठी होती. पोर्टस्माउथ एथील दोरखंडे तयार करण्याची इमारत मात्र या मुंबईच्या इमारतीपेक्षां मोठी होती. कोटाच्या मध्यभागीं हिरवळ उगवलेलें एक मोकळें मैदान होतें. तेथें उघाडीच्या दिवसांत कापसाचे गट्ठे व इतर माल ठेवीत असत. या मैदानासभोंवतीं उत्तम तऱ्हेनें बांधलेलीं व सुरेख अशीं पुष्कळ घरें होतीं. चर्चगेट वेशीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्या बाजूस, एकमेकांला लागूनच, ख्रिस्ती लोकांचें देऊळ व सरकारी बंगला, अशा दोन सार्वजनिक इमारती होत्या. ह्या दोन्ही इमारती पश्चिमाभिमुख असून प्रशस्त होत्या, व यांतवारा चांगला खेळत असे. त्या रस्त्याच्या उजव्या बाजूस नाटकगृहाची एक सुरेख इमारत होती, व त्या नाटकगृहाच्या मागें बाजार होता. त्यांत मुख्यत्वेंकरून एतद्देशीय व्यापारी राहात. ह्या बाजारांत दाटी फार असे. त्यांतील कांहीं घरें उंच व प्रशस्त असून, त्यांचे पुढचे बाजूस, लांकडी खांब देऊन काढिलेल्या लांकडी पडव्या असत. इ. स. १८०३ च्या फेब्रुवारी महिन्यांत, आग लागून, तिच्या योगानें तीन चतुर्थांश बाजार जळून खाक झाला. ह्या आगींत बराकी, मांडवी, व दुसऱ्या कांहीं सरकारी इमारती, यांचाही नाश झाला होता. या प्रसंगीं किल्ल्याजवळचीं पुष्कळ घरें तोफांच्या योगानें उडवून दिलीं नसतीं तर, सगळें शहरच्या शहर आगीनें जळून गेलें असतें. या आगीच्या योगानें, लोकांच्या खासगी मिळकतीचें नुकसान ९० लक्षांपर्यंत झालें असावें, असा अजमास आहे. नंतर शहराची पुनरपि बांधणी झाली तेव्हां तींत विशेष सुधारणा करण्यांत आली. इ.स.१८१३त कोटांतील घरांची किंमत एक कोट, पांच लाख, रुपये होती, आणि त्या घरांचें वार्षिक भाडें ९,२७,३६० रुपये होतें, असा अजमास केलेला आढळतो.

कोटाच्या उत्तरेस मैदान होतें त्याची रुंदी ८०० यार्ड होती. इ. स. १८०२ पासून या मैदानांतील झोंपड्यीं काढून टाकून तें मोकळें केलेलें होतें. ह्या मैदानाच्या पलीकडे काळ्या लोकांचें शहर होतें. तें नारळीच्या झाडांत गर्क होऊन गेलेलें होतें. आग लागून गेल्यानंतर, कोट पुन: बांधतेवेळीं, ज्या सुधारणा करण्यांत आल्या होत्या, व कोटापुढच्या मैदानांतील झोंपडी काढून टाकण्याकरितां ज्या तजविजा योजण्यांत आल्या होत्या; त्यांच्या योगानें गरिबगुरिबांना आपापलीं मुळचीं ठिकाणें सोडून जावें लागलें, तेव्हां ते लोक कंपनीच्या भातशेताच्या खारटणांत जाऊन राहिले होते; तें स्थळच हें काळ्या लोकांचें शहर होय. या खारटणांत अजूनही समुद्राचें पाणी शिरत असे. हें खारटण फार ऊंच नसून त्यांत मळई होती. त्यामुळें पावसाच्या दिवसांत त्यांत पाणीतुंबलें म्हणजे एका उथळ तळ्यासारखें तें दिसे. कुलाब्यास एक दीपगृह [दांडी], परगांवाहून मुंबई बंदरीं येणाऱ्या आग-बोटी दिसल्याबरोबर बावटा लावण्याची एक जागा, व बराकी होत्या. तशींच बगीच्यांत बांधलेलीं पुष्कळ सुंदर घरेंही तेथें होतीं. इ. स १८१२ त मुंबईबेटांत सुमारें २०००० घरें व २,३५,००० लोक होते. त्यांपैकीं १,६०,००० कायमचे राहणारे असून ६०,००० येऊनजाऊन राहणारे होते. युरोपियन लोकांनीं, व्यापाराचें कामकाज चालण्याच्या गडबडीच्या ठिकाणापासून दूर, एकीकडे राहण्याकरितां, बंगले व बगिच्यांमधून सुंदर घरें बांधिलीं होतीं. एतद्देशीय मातबर लोक आपल्या मोठमोठ्या खासगी घरांतून राहत असत. त्यांचीं मुलें लग्नें झाल्यावरही आपल्या आईबापांच्या घरांतच एका निराळ्या जागीं राहत. गरिबगुरीब लोक झांपांनीं शिवलेल्या झोंपड्यांत राहत. किंवा हल्लींप्रमाणें चाळींतून राहत. त्या चाळींत इतकी दाटी असे कीं, १०० पासून ३०० पर्यंत माणसें एकेका चाळींत असत.

मुंबई शहरांत त्या वेळीं [ इ. स. १८१२ ] अनेक राष्ट्रांतील लोक असत. युरोपियन लोकांखेरीज एशिया खंडांतील प्रत्येक राष्ट्रांतील लोक तेथें असत. पारशी, मुसलमान, हिंदू, आरब, रोमन कयाथलिक, या सर्व पंथांचे लोक त्या ठिकाणीं होते. इ. स. १८०४ तला म्याकिंटाश याचा या मुंबईत राहाणाऱ्या अनेक जातींविषयीं असा लेख आहे कीं, उत्तर हिंदुस्थान,

उज्जनी, अहमदाबाद, कच्छ, खंबायत ( स्तंभपूर ), काशी, आर्मेनिया, व इटाली, या सर्व ठिकाणचे लोक या शहरीं होते. हिंदुस्थान, मलाया द्विपकल्प, जावाबेट (यवद्वीप), चीन देश, व फिलिपैन बेटें या ठिकाणीं आढळणाऱ्या जाती, पेहेराव, व रीतिभाती मुंबईस दृष्टीस पडल्या नाहींत असें होत नसे. इ. स. १८१२ त मुंबई शहरांत, १,०४००० हिंदु, २८,००० मुसलमान, १३,००० पारशी, ८०० ज्यू [ यहूदी ] आणि १४,५०० एतद्देशीय किरिस्तांव, मिळून एकंदर कायमचे राहणारे १,६०,००० लोक होते. खेरीज १,७०० लशकरी गोरे लोक, ३,००० काळे लोक, आणि ५०,००० जाऊनयेऊन राहाणारे लोक मिळून एकंदर २,१५,००० लोक होते. एजन्सीचें काम करणाऱ्या पांच युरोपियन कंपन्या मुंबईत होत्या. हातांत जीरोकड शिल्लक बाळगावी लागे तिचें व्याज, व कारखान्यांतील नौकरांचा पगार, या दोन बाबतींतच, त्यांना होणारा सर्व फायदा खर्च होत असल्यामुळें, या एजन्सीच्या कंपन्यांना, आपल्या उदरनिर्वाहार्थ, व्यापार करावा लागे. जे लोक या कंपन्यांकडे पैसा ठेवीत त्यांना ते पावणोत्रा व्याज देत. या कंपन्यांचे हातीं पुष्कळ भांडवल असल्यामुळें, त्यांना व्यापारांत फायदा करून घेण्याची प्रत्येक संधी साधतां येत असे. ज्या लढाया नुक्त्याच होऊन गेल्या होत्या ( इ. स. १८००–१८१० ), त्यांच्या योगानें मोठा फायदा करून घेण्याचे विशेष प्रसंग या व्यापाऱ्यांना पुष्कळ येत. विशेषतः तारवांचे मालक अशा प्रसंगीं एकाएकीं अति सधन होत. या लढाया बंद झाल्या ह्मणजे त्या व्यापारी लोकांना पुनः चीन व हिंदुस्थान या देशांशीं व्यापार चालविण्याचें आपलें पूर्वीचे काम स्वीकारावें लागे. एजन्सीच्या पांच कंपन्यांखेरीज, युरोपांतील मद्यें व सामान विकणारे चार युरोपियन व्यापारी होते. चलाख, उद्योगी, व हुशार असून, एथील गोष्टींची विशेष माहिती असणारे पारशी लोक, युरोपियनांचे खालोखाल व्यापाराच्या कामीं वाकबगार होते. हे पारशी कोटांत उत्तरेकडच्या बाजूस राहात. ह्यांचीं घरें, व ते जेथें राहात ते रस्ते, फारसे स्वच्छ नसत. या पारशांपैकीं पुष्कळजण मातबर होते. एजन्सीच्या पांच युरोपियन कंपन्यांपैकीं प्रत्येकीचा, परदेशांतील व्यापाराच्या संबंधानें, एकेका मुख्य पारशी व्यापाऱ्याशीं संबंध

असे ह्मणजे युरोपियन व्यापाऱ्यांचे ते पारशी दलाल असत. पातीनें व्यापार करणाऱ्या पारशी व्यापाऱ्यांचीं एकंदर सोळा दुकानें होतीं. दोन पारशी चीन देशांतील व्यापाऱ्यांचे एजंट होते. व्यापाराच्या कामीं या पारशी लोकांनीं मोठें यश संपादिलें होतें. त्या खेरीज मुंबईच्या गोदीवर त्यांचीच काय ती मालकी होती. ह्या पारशांनीं सगळें मुंबईशहर प्रायः आपलेंसेंच करून सोडलें होतें ह्यामुळें एक फूटभर जमीन, किंवा एकही घर, दुसऱ्या कोणाच्या मालकीचें आढळत नसे. वर सांगितलेल्या पारशांच्या दुकानांखेरीज पातीनें व्यापार करणाऱ्या पोर्तुगीज लोकांचीं तीन, आर्मेनियन लोकांचीं चार, व हिंदुलोकांचीं पंधरा दुकानें होतीं. हीं दुकानें चालविणारे लोक मोठे मातबर व सचोटीचे होते. या खेरीज बोहऱ्यांचीं चार दुकानें होतीं. या दुकानांतील पातीदार लोक गुजराथ, व इतर उत्तरेकडील स्थळें, यांच्याशीं व्यापार करीत. या वेळीं मुंबई शहरांत राहणारे लोक तंटाबखेडा करणारे नव्हते. इ. स. १८०५ पासून १८११ पर्यंतच्या सात वर्षांच्या मुदतींत देहान्त शिक्षा देण्यासारखा एक गुन्हा मात्र झाला होता.

अन्नसामुग्रीच्या महागाईमुळें मुंबईच्या लोकांचे बहुत दिवसपर्यंत हाल होत होते. इ. स. १८०२ त शिव गांवाजवळचा गाडी जाण्याचा बांध गव्हर्नर डंकन् यानें तयार करविला, व मुंबईंत येणाऱ्या मालावरची जकात काढून टाकिली. साष्टी बेट इंग्रजांनीं घेतल्यापासून इतकें होईपर्यंत, मुंबईला अन्नसामुग्रीच्या पुरवठ्याच्या संबंधानें, फारसा फायदा झाला नाहीं. वरील वाक्यांत सांगितलेल्या दोन गोष्टींपासून मुंबईंतील लोकांना अन्नसामुग्री व फळफळावळ पुरविणाऱ्या लोकांची फार सोय झाली. त्यामुळें दाहा सालें झालीं नाहींत तोंच, मुंबईच्या इतकी स्वस्त अन्नसामुग्री व नाना तऱ्हेचा विपुल माल दुसरे कोठेंही मिळत नाहीं, असा हाल् यानें आपल्या लेखांत उल्लेख केलेला आढळतो.

मुंबईंत तयार होणाऱ्या पदार्थांत गलबतें हा मुख्य पदार्थ होता. गलबतें बांधणाऱ्या पारशांचे साहा कारखाने मुंबईस होते. या साहा कारखानेवाल्यांखेरीज एथील गोदींत गलबतें बांधण्याचें काम दुसरा कोणीही करीत नसे. एकुणिसावे शतकाचीं पहिलीं दाहा वर्षेपर्यंत ६०० पासून

१३०० टनपर्यंत ओझें नेणारीं गलबतें, देशी लोकांचे व्यापाराकरितां व ईस्ट इंडिया कंपनीचे व्यापाराकरितां, मुंबईंत बांधण्यांत आलीं होतीं. या गलबतांचा आकार सुंदर असून, त्यांचें बांधकाम अति कुशलतेनें केलेलें असे, व तीं अति टिकाऊ असत. हे तीन गुण या गलबतांत जितक्या अंशानें दिसून येत असत, तितके ते पृथ्वींतील दुसऱ्या कोठल्याही व्यापाऱ्यांच्या गलबतांत दिसून येत नव्हते. युरोप खंडांत मोठमोठीं लढाऊ गलबतें बांधीत असत. परंतु त्या खंडाबाहेर फक्त मुंबईस मात्र पहिलें मोठें लढाऊ तारूं बांधण्यांत आलें होतें. लढाऊ गलबतें बांधण्याचे कामीं कुशलत्व, उत्तम लांकूड, व उत्तम गोदी, या तीन गुणांच्या संबंधानें ग्रेटब्रिटनच्या हिंदुस्थानांतील राज्यांत मुंबई इतकी दुसऱ्या कोणत्याही स्थळाची ख्याति नव्हती.

बाहेर पाठवितां येण्यासारखा कोणताच जिन्नस मुंबईस उत्पन्न होत नसे, व मुंबईंतील लोकांना पुरण्यासारखी अन्नसामुग्रीही मुंबईंत उत्पन्न होत नसे. तरी युरोपांतील व एशियांतील सर्व प्रकारचा जिनस मुंबईंत मिळत असत. इराण, आरबस्थान, व पश्चिम हिंदुस्थान एथून मुंबईस जिन्नस येई. याखेरीज मुंबईचा इंग्लंडाशीं पुष्कळ व्यापार चालत असे. ब्रिटिश सरकारच्या अमला खालच्या इलाख्यांतील लोकांच्या उपयोगा करितां, युरोपांतील व इतर देशांतील ज्या जिन्नसा या देशीं येत त्यांपैकीं मुंबईस फार येत असत. एकुणिसाव्या शतकाच्या अवेलीस मुंबईचा, एशियाखंड व इंग्लंड देश यांच्या दोहोंशीं व्यापार चालत असे. त्यांपैकीं एशिया खंडाशीं चालणारा व्यापार करणारे व्यापारी, व तो ज्या तारवांच्या द्वारें होत असे तीं तारवें, एतद्देशीयच असत. इंग्लंडाशीं चालणारा व्यापार करणाऱ्यांपैकीं कांहीं ईस्ट इंडिया कंपनीचे भागीदार असत, व कांहीं खासगी व्यापारी असत. खासगी व्यापारी जितकी रोकड मुंबईस आणीत तितकीच सुमारानें कंपनी आणीत असे. तसेंच खासगी व्यापारी, देशाबाहेर पाठविलेला व देशांत आणलेला मिळून, जितक्या मालाचा व्यवहार करीत, त्याचे दीडपट मालाचा व्यवहार कंपनी करीत असे. इ. स. १८०६ च्या अखेरीपर्यंतच्या पांच वर्षांच्या व्यापाराची सरासरी काढिली तर, ४१२ लाखांचा माल यादेशांत आला होता व त्यापैकीं

९२ लाख पैका होता असें मान निघतें. तितक्याच मुदतींत ३१८ लाखांचा माल बाहेर गेला. त्यांपैकीं ३६ लाख किंमतीचा पैका होता.

इ. स. १८०५ त ७४१ लाखांचा एकंदर व्यवहार झाला. त्यांपैकीं ४११ लाखांचा माल या देशांत आला व ३३० लाखांचा माल बाहेर गेला. या एकंदर व्यवहारापैकीं ४४३ लाखांचा, ह्मणजे शेंकडा५९.६४ टक्यांचा, व्यापार हिंदुस्थानाशीं, व २५३ लाखांचा, ह्मणजे शेंकडा३४.१४ टक्यांचा एशियांतील दुसरे देश, व पूर्वआफ्रिका खंड, यांच्याशीं झाला. तीन लाखांचा, ह्मणजे दरशेंकडा०.४०टक्यांचा अमेरिकेबरोबर, व ४२ लाखांचा, ह्मणजे दरशेंकडा ५ ६६ टक्यांचा युरोपखंडाबरोबर व्यवहार झाला. ठाणेजिल्ह्यांतील बंदरीं एकंदरीनें ३९ लाखांचा व्यवहार झाला. त्यांपैकीं अठरा लाखांचा माल आला व २१ लाखांचा बाहेर गेला. गुजराथेशीं २०८ लाखांचा व्यवहार झाला. त्यापैकीं १०० लाखांचा माल आला व १०८ लाखांचा माल बाहेर गेला. कच्छ व सिंध या प्रांतांशीं सुमारें ४२ लाखांचा व्यवहार झाला. पैकीं २६ लाखांचा माल आला व १६ लाखांचा बाहेर गेला. दक्षिण कोंकणांत सुमारें ५४ लाखांचा व्यवहार झाला. त्यापैकीं १४ लाखांचा माल आला व ४० लाखांचा बाहेर गेला. मलबारप्रांतीं २५ लाखांचा व्यवहार झाला. त्यापैकीं १८ लाखांचा माल आला व ७ लाखांचा बाहेर गेला. सिंहलद्वीप बेटाशीं १$\frac{१}{४}$ लाखाचा व्यवहार झाला. पैकीं पाऊण लाखाचा माल आला व अर्ध लाखाचा माल बाहेर गेला. कारोमांडेल [ चोलमंडल ] किनाऱ्यावरील स्थलांशीं अडीच लाखांचा व्यवहार झाला. पैकीं २ लाखांचा माल बाहेर गेला व अर्ध लाखाचा आला. बंगाल ( वंग ) प्रांतांत पावणे एकाहात्तर लाखांचा व्यवहार झाला. पैकीं ६८ लाखांचा माल आला व पावणे तीन लाखांचा माल बाहेर गेला.

एशियांतील इतर देश व पूर्व आफ्रिका खंड यांशीं २५३ लाखांचा व्यापार झाला. त्यापैकीं ५० लाखांचा इराणी अखाताच्या लगत्याच्या मुलखाशीं झाला. त्यांत २१ लाखांचा माल बाहेर गेला व २९ लाखांचा आला. आरबी आखाताच्या लगत्याच्या मुलखाशीं, २६ लाखांचा माल आला व १५ लाखांचा बाहेर गेला मिळून एकंदर, ४१

लाखांचा व्यवहार झाला. स्ट्रेट्स् नांवाच्या देशाशीं पांच लाखांचा व्यवहार झाला. त्यापैकीं ४ लाखांचा माल आला व एक लाखाचा बाहेर गेला. चीन देशाशीं १६७ लाखांचा व्यवहार झाला. त्यापैकीं ८५ लाखांचा माल आला व ७२ लाखाचा बाहेर गेला. अमेरिका खंडांतल्या देशांबरोबर तीन लाखांचा व्यवहार झाला. त्यापैकीं दोन लाखांचा माल आला व एक लाखाचा बाहेर गेला. युरोप खंडाबरोबर ४२ लाखांचा व्यवहार झाला. त्यापैकीं साडेचवदा लाखांचा व्यापार लिस्बोन शहराबरोबर झाला. त्यांतून ९ लाखांचा माल आला व साडेपांच लाखांचा बाहेर गेला. मदीराबेटाशीं सवा लाखाचा व्यवहार झाला. त्यांत सर्व माल बाहेरून आला. बाहेर माल मुळींच गेला नाहीं. इंग्लंडदेशाशीं $२६\frac{३}{४}$ लाखांचा व्यवहार झाला, त्यांत १९लाखांचा माल आला व $७\frac{३}{४}$ लाखांचा बाहेर गेला.

मुंबईचा ज्या परदेशांशीं व्यापार चालत असे त्यांत चीन देश मुख्य होता. मुंबईहून मुख्यत्वेंकरून चीन देशांत कापूस जात असे. इ. स. १७७०त चीन देशांत दुष्काळ पडला. तेव्हां तेथील सरकारानें धान्याची लागवड देशांत करण्याविषयीं सक्त हुकूम केल्यामुळे, त्या वर्षापासूनच मुंबईहून चीन देशांत कापूस जाण्याची सुरवात झाली होती. प्रत्येक गठ्ठा ३७५ पौंड ( पक्का अच्छेर ) वजनाचा, असे ८०००० गठ्ठेपर्यंत कधीं कधीं मुंबईहून चीन देशीं कापूस जाई. इ. स. १८०५ त कापसाच्या व्यापाराची तेजी नाहींशी झाली. कारण, मुंबईतील कापसाचा पुरवठा कमी होऊन त्यांत कपटानें भेळ होऊं लागल्यामुळें, मद्रास व बंगाल या इलाख्यांतील लोक कापूस पिकवूं लागले, व चीन देशांतील लोकही आपल्या देशीं कापूस पिकवूं लागले. त्यामुळें या कापसाच्या व्यापारांत जीव नाहींसा झाला. पुढील कोष्टकांत, मुंबईच्या इ. स. १८०५ तल्या सर्व स्थलांशीं होणाऱ्या व्यापाराचें स्वरूप ध्यानांत येण्यासारखे, आंकडे दाखल केले आहेत:—

मुंबईचा व्यापार सन १८०५.

| बंदरांचें नांव. | येणाऱ्या मालाची किंमत लाख. | बाहेर जाणाऱ्या मालाची किंमत लाख. | एकुण लाख. |
|---|---|---|---|
| ठाणें जिल्ह्यांतील बंदरें | १८ | २१ | ३९ |
| गुजराथ | १०० | १०८ | २०८ |
| कच्छ व सिंध | २६ | १६ | ४२ |
| दक्षिण कोंकण | १४ | ४० | ५४ |
| मलबार | ७ | १८ | २५ |
| सिंहलद्वीप | ३/४ | १/२ | १ १/४ |
| कारोमांडेल | २ | १/२ | २ १/२ |
| बंगाल | ६८ | २ ३/४ | ७० ३/४ |
| एकुण (हिंदुस्थानांतील) | २३५ ३/४ | २०६ ३/४ | ४४२ १/२ |
| इराण | २९ | २१ | ५० |
| आरबस्थान व आफ्रिका | २६ | १५ | ४१ |
| स्ट्रेट्स देश | ४ | १ | ५ |
| चीन | ८५ | ७२ | १५७ |
| एकुण (एशियांतील इतर देश) | १४४ | १०९ | २५३ |
| अमेरिका | २ | १ | ३ |
| इंग्लंड | १९ | ७ ३/४ | २६ ३/४ |
| युरोपांतील इतर देश | १० १/४ | ५ १/२ | १५ ३/४ |
| एकुण (सर्व युरोप) | २९ १/४ | १३ १/४ | ४२ १/२ |
| एकंदर खासगी व्यापार | ४११ | ३३० | ७४१ |
| कंपनीचा व्यापार | ३ १/४ | १४ १/४ | १७ १/२ |
| एकुण बेरीज | ४१४ १/४ | ३४४ १/४ | ७५८ १/२ |

या वेळीं रुपयाची किंमत दोन शिलिंग ६ पेन्स होती.

मागील कारकीर्दीप्रमाणें या इंग्रजांच्या कारकीर्दीतही हिंदु लोक व्यापाराकरितां हिंदुस्थानापासून फार दूरदूरचे देशीं जाऊन राहिलेले दृष्टीस पडत. इ. स. १७६३त नीबर यानें येमेन प्रांतांतल्या साना शहरीं १२५ वाणी आढळले. त्या शहरीं राहाण्यास मिळावें म्हणून ते ३०० क्रौन म्हणजे ७५० रुपये कर भरीत असत. मोखा शहरीं ७०० वाणी होते. त्यांपैकीं पुष्कळजण मोठे व्यापारी असून सचोटीचे गृहस्थ होते. खेरीज तेथें रजपूत व इतर जातीचे हिंदु ही होते. यांपैकीं कांहीं सोनार होते, व कांहीं इतर कसबें करणारे होते. पैसा कमावून गबर झाले म्हणजे हे लोक हिंदुस्थानांत परत जात, म्हणून तेथील लोकांना हे परके वाटत असत. त्यांची पुष्कळ प्रसंगीं मानहानि व हाल अपेष्टाही होत असे. मस्कत एथेंही पुष्कळ वाणी होते. ते खाऊन पिऊन बरे होते. ते आपल्या धर्मा-प्रमाणें व शास्त्राप्रमाणें वागत असत. इ स. च्या १९ व्या शतकाच्या आरंभीं ईस्ट इंडिया कंपनीचा मस्कत एथील दलाल हिंदु होता. बैलांचा प्राण रक्षण करण्याविषयीं याची इच्छा उत्कट असे. त्यामुळें गलबतांवर गोमांस चढवून न्यावें लागे. आरबी अखातावरील मोखाशहरीं परदेशाशीं चालणारा मुख्य व्यापार वाण्यांच्या हातीं असे, व त्यांचे पातीदार एडन-शहरीं असत. या वाण्यांबरोबर व्यापार करणें बिनधोक असे. कारण एकाद्याचें दिवाळें निघालें तरी त्याचे पातीदार त्याच्या कर्जाची फेड करीत. तांबड्या समुद्राच्या पश्चिम तीरावरील मसुआ शहरीं मोठी मालमत्ता बाळ-गणारे व सुखी असे वाणी व्यापारी होते. करमचंद हा माल घेत असे, व सर्व मालाचे किंमतीबद्दल आपण जबाबदार होऊन, लहान लहान पतीचे व्यापाऱ्यांना तो माल सोंपीत असे. ते लहान व्यापारी तो माल किनाऱ्या-पासून दूरच्या आंतील प्रांतीं नेत, व तीन महिन्यांचे आंत दुसऱ्या प्रका-रच्या मालाच्या रूपानें त्या मालाची किंमत घेऊन परत येत. जावा (यवद्वीप) बेटांतील बाटेविया शहरीं ही व्यापाराकरितां हिंदु जाऊन राहिलेले होते. इ. स. १७५० त कच्छ प्रांतांतला एक रामसिंग नांवाचा हिंदु हालंड देशांत गेला होता. तेथें नौका चालविण्याचें व गलबतें बांधण्याचें कसब तो उत्तम तऱ्हेनें शिकला होता. इ. स. १७८१ त हिरामण नांवाच्या एका हिंदूला रघुनाथरावानें आपल्या तर्फे

इंग्लंडास पाठविलें होतें. हा चितपावन होता असें कोणी ह्मणतात व परभू होता असेंही कोणी ह्मणतात. अत्युत्तम खलाशी हिंदुस्थानांत मुंबईसारखे दुसरे कोठेंही आढळत नसत. हे खलाशी गुजराथ, काठेवाड, व कच्छ या प्रांतांतले असत. त्यांत कांहीं हिंदु व कांहीं मुसलमान असत. गोगोशहरचे मुसलमान हे फारच प्रख्यात खलाशी होते.

अठरावे शतकांत, आणि, विशेषत: इ. स. १७५९ त, इंग्रजांना मोंगलांच्या आरमाराचें आधिपत्य मिळाल्यानंतर, आरबी समुद्रांत व्यापाराकरितां पर्यटन करणाऱ्या तारवांना सुरक्षितपणा प्राप्त होण्याकरितां, बहुत उपाय योजण्यांत आले होते. तथापि काठेवाड प्रांताचा पश्चिमकिनारा, रत्नागिरी जिल्ह्यांतील मालवण प्रांत, व इराणी आखाताचे तीरावरील मस्कत बंदर, हीं चांचे लोकांचीं अजूनही माहेरघरें होऊन राहिलेलीं होतीं. अखेरीस इ. स. १८१० पासून १८२० पर्यंत च्या मुदतींत चांच्यांपासून होणारा उपद्रव नाहींसा करण्यांत आला. तो असा. इ. स. १८१२ त मालवणचे चांच्यांवर, पश्चिम काठेवाडांतील कच्छ व द्वारका एथील चांच्यावर इ. स. १८१५ त व १८२० त, आणि मस्कत एथील चांच्यांवर इ. स. १८०९ त व १८१९त स्वाऱ्या करून त्यांचा मोड करण्यांत आला.

पेशव्याच्या मुलखाचें संरक्षण करण्याची हमी इंग्रजांनीं घेतल्यावर, इतर प्रांतांप्रमाणेंच ठाणें जिल्ह्याची ही स्थिति, मराठ्यांपासून लोकांना फार उपद्रव होत असे तरी, पुष्कळ सुधारली होती. इ. स. १८१६ वें वर्ष सुरू होई तों पर्यंत पेशव्यानें पांच कोट रुपये आपल्या संग्रहीं केले होते. त्रिंबकजी डेंगळया ह्मणून एक पेशव्याचे अति कृपेतला मनुष्य होता. त्याचे शिकवणीवरून, इंग्रजांचे सख्याचा त्याग करून, आपणांस मराठी संस्थानांचें प्रमुखत्व मिळण्याविषयीं तो बेत करूं लागला. गायकवाडचा वकील गंगाधर शास्त्री, याला ठार मारण्याचे कामांत त्रिंबकजीचें अंग असल्यामुळें, त्याला ठाण्याचे किल्ल्यांत बंदींत ठेविलें होतें. ता. १२ सपटेंबर सन १८१६ रोजीं तेथून तो पळून गेल्यावर त्याला धरण्याविषयीं यत्न न करितां, उलटी पेशव्यानें त्याला मदत दिल्यामुळें,

खानदेश व अहमदनगर, या प्रांतांतील जंगली लोकांना उठविण्याचें नादीं तो लागला. या पुढें साहा महिने पर्यंत मराठे सरदार व पेंढारी यांची मदत आपणांस प्राप्त व्हावी ह्मणून पेशव्यानें सख्त मेहनत केली. तो इंग्रजांशीं वैरभावानें वागूं लागला ही गोष्ट गुप्त राहिली नव्हती. ह्मणून ता. ६ जून १८१७ रोजीं इंग्रजांबरोबर नवा तह करण्याविषयीं त्यांनीं त्याला भाग पाडलें. पुण्याचा तह या नांवानें हा तह प्रसिद्ध आहे. या तहाच्या द्वारें बाजीरावानें गंगाधर शास्त्रयाला मारण्याचे कामीं त्रिंबकजीचें अंग होतें असें कबूल केलें. मी दुसऱ्या संस्थानिकांशीं संबंध ठेवणें तो इंग्रजांच्या मार्फत ठेवीन असेंही त्यानें कबूल केलें. त्यानें ५००० घोडेस्वार व ३००० पायदळ इतकें सैन्य आपल्या पदरीं ठेवावें असा पूर्वींचा करार होता. परंतु त्याप्रमाणें त्याचे हातून झालें नव्हतें. ह्मणून हें माझ्या वांटयाचें सैन्य तुम्हीं इंग्रजांनींच ठेवावें, व त्याचे खर्चाकरितां मी तुम्हांस आणखी मुलूख देतों असेंही त्यानें कबूल केलें. ह्या कबुलातीं अन्वयें इंग्रजांना जो मुलूख मिळाला त्यांत बेलापूर, आटगांव, व कल्याण, हे परगणे आणि गुजराथेपर्यंत उत्तर कोंकणाचा बाकी राहिलेला भाग, इतका मुलूख होता.

पुण्याचा तह होण्याचे पूर्वीं सुमारें चार महिने, म्ह० इ. स. १८१७ चे आरंभीं, कोंकणांत लूट करण्याकरितां पेंढाऱ्यांच्या चार टोळ्या घाटावरून खालीं उतरल्या. त्यां पैकीं साहासातशें लोकांची एक टोळी पनवेल एथें होती. तेथून ही किंवा दुसरी एक टोळी भिवंडीकडे गेली. पुढें खाड्या आडव्या आल्यामुळें वसई व माहीम या समुद्रकिनाऱ्यावरील मातबर मुलखांत त्यांना जातां येईना. ह्मणून ते भिवंडीहून निघाले ते अशेरी व तारापूर यांवरून पोर्टुगीजलोकांच्या सरहद्दीपर्यंत लूट करीत चालले. तेव्हां मातबर गांवांतले लोक रानांत पळून गेले. त्यां पैकीं पुढील वर्षीं कांहीं स्थळीं थोडेसे लोक मात्र परत आपापल्या गांवीं आले. पावसाळा संपल्यावर (नवंबर १८१७) पेशव्यानें, आपला इंग्रजांशीं असलेला संबंध उघडपणें तोडून टाकून, त्यांच्या पुणें एथील सैन्याच्या टोळीचा विध्वंस करण्याचा यत्न केला. तेव्हां त्रिंबकजीनें आपण जमविलेले भील व रामोशी यांना कोंकणांत लूट करण्याकरितां पाठविलें.

यांनीं सह्याद्री पर्वतांतील घाट अडवून कल्याण प्रांतांत प्रवेश केला. तेव्हां तेथील पुष्कळ लोकांना वसई व माहुली एथें जाणें भाग पडलें. या प्रसंगीं पनवेल व खोपवली यांचे दरम्यानचे मुलखांत मुंबईची फौज बंदोबस्ता करितां गेली. परंतु बोरघाट भील लोकांचे ताब्यांत असल्यामुळें, पुण्या-जवळ जनरल स्मिथ होता त्याला, मुंबईचे सेनापतीला पाठवावयाचीं पत्रें, बाणकोटच्या वाटेनें पाठवावीं लागत असत. पुढें दिसेंबर महिन्यांत पेशवा नाणेघाटाजवळ आला तेव्हां त्याचा कोंकणांत प्रवेश न होईल अशी तजवीज इंग्रजांना करावी लागली. त्याला मदत करणाऱ्यांपैकीं बापू-राव लांब्या या नांवाच्या एका मनुष्यानें नेरळच्या पूर्वेस सुमारें साहा कोसांवरचा कोथळीगड नांवाचा किल्ला घेतला. तो ता. ३० दिसेंबर रोजीं क्यापटन ब्रुक्स यानें कांहीं एक नुकसान न होतां परत घेतला. इ. स. १८१८ चे जानेवारी महिन्यांत कर्नल प्रोथर यानें ३८० गोरे लोक, ८०० काळे पायदळ, व तोफखाना यांचे मदतीनें कर्नाळा, राजमाची, व कोयरी हे किल्ले घेतले. क्यापटन ब्यारो ह्यानें कुसुर घाटाजवळ आरब, मुसलमान, व कोळी, यांच्या एका टोळीचा पराभव केला. या कृत्याचे योगानें उत्तर कोंकण जिंकून घेण्याचे कामाची समाप्ति झाली. या नवीन घेतलेल्या मुलखांतील लोक इंग्रजांना अनुकूल असल्यामुळें मुलखांत फार शिबंदी ठेवण्याची आवश्यकता नव्हती. ठाणें एथें लष्कराचें मुख्य ठाणें करून कल्याण, भिंवडी, व वसई एथें एकेक लष्करी लोकांची टोळी ठेवण्यांत आली. किनाऱ्यापासून दूरच्या आंतील प्रदेशांतील किल्ल्यांची पहाणी करण्याक-रितां क्यापटन डिकिनसन याला पाठविलें होतें. त्याचे नजरेस आलें कीं, अशेरी, मलंगगड, व माहुली हे किल्ले मजबूत असून शत्रूला घेतां येण्या-सारखे नाहींत. परंतु ते परस्परांपासून तुटक असल्यामुळें निरुपयोगी आहेत असें त्याचें मत पडलें. सह्याद्रींतील किल्ल्यांपैकीं मुरबाडाजव-ळचा गोरखगड, नेरळाजवळचा कोथळीगड, व गोरखगडाजवळचा सिद्धगड, या तिहींत मात्र थोडे दिवस पर्यंत फौजेच्या टोळ्या ठेविल्या होत्या. बाकी राहिलेल्या किनाऱ्यापासून दूरच्या प्रदेशांतल्या किल्ल्यां-च्या आंतील कामें होतील तितकीं पाडून टाकिलीं. किनाऱ्यावरचे

किल्ल्यांची मात्र स्थिति चांगली राखिली होती. ह्या किनाऱ्यावरील किल्ल्यांत अर्नाळा व तारापूर हे मुख्य होते. ह्या किल्ल्यांच्या योगानें लोकांचे मनांतील यांचे लोकांची भीति नाहींशी होण्याचा संभव असल्यामुळें, यांना धक्का लागूं दिला नाहीं.

इ. स. १८१८ चे पावसाळ्यांत दोन मोठ्या गृहस्थांना उत्तर कोंकणांत कैदेंत ठेविलें होतें. त्यांपैकीं एक पेशव्याचा भाऊ चिमणाजी आपा याला वसईस ठेविलें होतें व दुसरा त्रिंबकजी डेंगळ्या याला ठाण्यास ठेविलें होतें. ठाणें जिल्हा इंग्रजांकडे आला तेव्हां किल्ल्यांसभोंवतालचे मुलखांत कित्येक मैलपर्यंत फारसे रहिवाशी नव्हते, व जे थोडेसे लोक होते त्यांचेजवळ शेतकीचीं आवतें नव्हतीं. अगदीं निकृष्ट प्रतीचे कारागीर लोकही फारसे नव्हते. किल्ल्यांसभोंवतालच्या प्रदेशाखेरीज इतर प्रदेशांतले लोक दरिद्री असून शेंकडों गांवचेगांव ओसाड होते. कोळी, भील, कातकरी, ठाकूर ह्या लुटारू व नीच लोकांच्या ताब्यांत ह्या जिल्ह्यांतील जंगलें होतीं. सर्व जिल्ह्यांत जिकडे तिकडे दारिद्र पसरलेलें होतें. फक्त दोन ठिकाणीं मात्र दारिद्राची वस्ती नव्हती. त्यांपैकीं एक ठिकाण कल्याण परगणा हें होय. या परगण्यांतील गांव मोठे, दाटवस्तीचे, व भरभराटीचे असे होते. दारिद्र्यानें न ग्रासलेलें असें दुसरें ठिकाण वसई होय. येथें लागवड न झालेली अशी एक इंचभर सुद्धां जमीन नव्हती. येथील जमिनींत ऊंस, बागायती उत्पन्न, व तांदूळ होत असे. वैतरणा नदीपासून उत्तरेस दमणगंगेपर्यंत एक उत्तम मार्ग होता. ह्याची लांबी ७३ मैल होती. इतक्या लांबीचा उत्तम रस्ता पृथ्वींत बहुधा त्या वेळीं कोठेंही नसावा. ज्या प्रदेशांतून हा मार्ग जात होता तो प्रदेश पेंढाऱ्यांनीं लुटला होता. साष्टी प्रांत इतके दिवसपर्यंत इंग्रजांच्या ताब्यांत होता तरी, तो व वसईची मातबर बागायती जमीन या दोहोंत जमीनअस्मानाइतकें अंतर होतें. या साष्टीच्या दक्षिण भागांतील दऱ्यांत मात्र लागवड चांगली होत असे. परंतु बाकीचा बराच भाग ओसाड होता व त्यांत बहुतेक ठिकाणीं झाडझुडपांची गर्दी झालेली होती. या प्रांताचा वसूल अडीच लाख रुपये येत होता व लोकसंख्या ५०००० होती. येथील लोक दारू फार पीत.

सरी ते इतके शांत व दंगाधोपा न करणारे होते कीं अवघ्या दोन वर्षांत एकाही मनुष्यावर सेशनांत कमिट करण्यासारख्या गुन्ह्याचा आरोप आलेला नव्हता.

इंग्रजांचा अंमल ठाणें जिल्ह्यांत सुरू झाल्यापासून या जिल्ह्याची जी ऊर्जिततदशा झाली तिची सर्व कच्ची हकीगत ग्याझिटीयर पुस्तकाच्या "व्यापार" व "जमीनधाऱ्याची व्यवस्था" या नांवांच्या दोन भागांत दिली आहे. इ. स. १८१८पासून आजपर्यंत [१८८२] दंगा वगैरे फारसा या जिल्ह्यांत झाला नाहीं. इ. स. १८३० पर्यंत कोळी जातीचे दरवडेखोर लोक दरवडे घालीत असत. इ० स० १८३७ त भिवंडी एथील मुसलमान व हिंदु यांच्यामध्यें तंटा झाला. इ० स० १८५७ त शिपायांच्या बंडामुळें या जिल्ह्यांतील लोक घाबरून जाऊन अस्वस्थ झाले होते. इ० स० १८६० त प्राप्तीवरील कराच्या संबंधानें वसईस दंगा झाला. अलीकडे इ० स० १८७४ व १८७७ ह्या वर्षी दोन मोठे दरवडे पडले. या पांचसाहा गोष्टींखेरीज या जिल्ह्यांतील शांततेला धक्का बसण्यासारखी दुसरी कोणतीही गोष्ट गेल्या ६०।६५ वर्षांत घडली नाहीं. या गोष्टींचें वर्णन अनुक्रमें पुढें केलें आहे.

इंग्रजांकडे हा जिल्हा आल्यावर पहिलीं बारा वर्षे पर्यंत घाटाखालच्या व वरच्या डोंगराळ प्रदेशांत भील व कोळी या जातींच्या दरवडेखोरांचा उपद्रव होत असे. ह्या दरवडेखोरांचें मुख्य ठिकाण घाटावर दक्षिणेंत होतें. तरी ते सर्व ठाणें जिल्हाभर दरवडे घालून लोकांचे मनांत जिकडे तिकडे धास्ती व अस्वस्थता उत्पन्न करीत. ह्या दरवडेखोरांचा नाईक राघोजी भांगऱ्या नांवाचा एक कोळी होता. कांहीं वेळपर्यंत, ह्याचें मन ह्याच्या लुटारूपणाच्या क्रूर उद्योगापासून वळवून, एका तालुक्याच्या पोलिसच्या लोकांवर ह्याची नेमणूक सरकारानें केली होती व तें काम तो मोठ्या हुशारीनें करीत होता. पुढें लोकांपासून तूं देणग्या घेऊं नये असा एकदां ह्याला सरकारानें हुकूम केला. तेव्हां, ह्याचा ह्याला फार राग आल्यामुळें, त्यानें सरकारी चाकरी सोडून दिली. ह्याच वेळेच्या सुमारास दुसऱ्या प्रमुख कोळी कुटुंबांना मिळणारे पगार व नेमणुका कमी करण्यांत आल्या होत्या, आणि किल्ल्यांचे तट व बुरूज पाडून

टाकल्यामुळें, कित्येक कोळी, नोकरी जाऊन, घरीं बसले होते. या प्रमाणें या कोळी लोकांत जिकडे तिकडे असमाधान उत्पन्न झालें होतें. तरी इंग्रजांचे लशकरी लोक मुलखांत असल्यामुळें दंगाधोपा झाला नाहीं. पुढें इ स. १८२७ त येथील कोळयांचे ऐकण्यांत असें आलें कीं, सातारा जिल्ह्यांतील रामोशांनीं, तीन वर्षे पर्यंत बंड करून, त्यांस जें जें पाहिजे होतें तें,व ज्या गोष्टींच्या प्राप्तीकरितां ते लढत होते त्या,सरकाराकडून प्राप्त करून घेतल्या. तें ऐकतांच, आपलें भयंकर स्वरूप प्रगट करणें, हेंच आपली दाद सरकारांत लागण्याचें खातरीचें साधन आहे असें समजून, इ. स. १८२८ च्या अखेरीस, ह्या कोळयांनीं बंड केलें. तेव्हां एक पोलीस लोकांची टोळी बरोबर घेऊन,क्यापटन म्याकिंटाश हा त्यांच्या हालचालीचा तपास करूं लागला.परंतु तो मिळण्याची मोठी पंचाईत पडूं लागली. पुढें, कांहीं काळ गेल्यावर, कांहीं कोळयांना त्यानें वश करून घेतलें, बंडखोरांना मदत करण्यासारख्या सर्व लोकांचीं नांवें समजून घेतलीं, आणि त्यांच्या लपून राहण्याच्या व पाणवठ्याच्या जागांची माहिती मिळविली. नंतर एक मोठी लशकरी लोकांची टोळी त्यानें तयार केली. तींतील कांहीं लोकांना कोंकणांत ठेविलें व कांहींना सह्याद्रीच्या माथ्यावर ठिकठिकाणीं ठेविलें. नंतर कांहीं लहान लहान टोळ्या, निरंतर इकडे तिकडे फिरून, कोळयांच्या लपण्याच्या जागांवर एकदम हल्ले करूं लागल्या. याप्रमाणें त्यांचा पाठलाग जारीनें चालल्यामुळें, बंडखोरांची जूट मोडून त्यांच्या लहान लहान टोळ्या झाल्या. नंतर त्यांच्या सर्व पाणवठ्यांवर चौकीपहारे बसविले. त्यामुळें थोडक्याच महिन्यांत ऐंशी कोळी व त्यांचे दोन नाईक यांना पकडून अहमदनगरास रवाना करण्यात आलें.

भिवंडी येथील मुसलमान व हिंदु यांचेमध्यें फार दिवसांपासून बेबनाव चालत आलेला आहे. इ. स. १८३७ चे एप्रिल महिन्यांत मोहोरम व रामनवमी हे सण एकाच पंधरवड्यांत पडले. तेव्हां, मोहोरमाचे दहा दिवस जात पर्यंत, विठोबाचे मूर्तीची मिरवणूक रस्त्यानें होऊं द्यावयाची नाहीं,असा मुसलमानांनीं निश्चय केला. ता. १४ एप्रिल रोजीं रामजन्म होता व त्या दिवशीं विठोबाची मूर्ति रस्त्यांतून मिरवावयाची होती.

म्हणून मुसलमान लोक विठोबाचे देवळासमोर जमले. तेव्हां दंगा होईल या भीतीनें हिंदु लोक मिरवणुकीचा नाद सोडून आपापले घरीं जाऊन बसले. पुढें, मुसलमानांचा सूड उगवावा या हेतूनें, वाण्यांनीं आपलीं दुकानें बंद केलीं, व आपण मोहोरमचे सणाला कोणत्याही प्रकारें मदत करावयाची नाहीं, असा कुळंबीमाळी वगैरे हलक्या प्रतीच्या हिंदूनीं निश्चय केला. दुसरे दिवशीं, ता १९ एप्रिल रोजीं, खावयाचे पदार्थ दुकानांत मिळतनासे झाल्यामुळें, मुसलमान लोक संतापले. संध्याकाळीं हिंदु गडी ताबूत उचलीतना, आणि महार वाजंत्रीं वाजवीतना व मशाली धरीतना. हें पाहून त्यांचा संताप वाढला. सातआठ ताबुतांपैकीं दोन ताबूत नेण्याला मात्र गडी मिळाले. मुसलमानांचें या संबंधानें असें म्हणणें आहे कीं, ताबूत एका रिकाम्या घराजवळून जात असतां, हिंदूनीं त्याजवर दगडांचा वर्षाव केला. तेव्हां मुसलमानांनीं उघडपणें दंगा करण्यास आरंभ केला. विठोबाचे देवळांत शिरून त्याच्या मूर्तीच्या अंगावरचे दागिने त्यांनीं लुटले, कांहीं नकशीदार लांकडी जाळया व मूर्ति यांचा भंग केला, आणि एका म्हाराला इतकी जबर दुखापत केली कीं, तिच्यामुळें तो लवकरच मेला. या प्रसंगीं ४८ मुसलमान पकडले होते त्यांपैकीं एकवीस जणावर गुन्ह्याची शाबिदी होऊन त्यांस मोठमोठया कैदेच्या शिक्षा झाल्या.

इ. स. १८४० त ठाणें येथील तुरुंगात दंगा झाला. त्याचें निवारण पंधराव्या काळ्या पायदळ पलटणीच्या एका टोळीनें तेव्हांच केलें. इ. स. १८५३त, राजमार्गावर होळीकरितां खळगे खणूं नयेत, असा हुकूम दिल्यामुळें, ठाणें येथील हिंदु व्यापाऱ्यांनीं आपलीं दुकानें बंद केलीं. तेव्हां दुकानावर चौकीपहारे ठेवून दुकानदारांकडून दुकानें सरकारानें उघडविलीं, व पुढें लवकरच दुकानदारांनीं दुकानें न उघडण्याचा आग्रह सोडला.

नानासाहेब हा, करजत जवळच्या वेणगांव या गांवीं, जन्मला होता एवढाच काय तो इ. स. १८५७ च्या बंडाचा ठाणें जिल्ह्याशीं संबंध होता. पुढें नानासाहेबाचा कोणी आप्तविषयी, राघो विश्वनाथ नांवाचा एक गृहस्थ, वेणगांवच्या लोकांना उठवीत आहे, असें आढळून आल्या

वरून, त्याला पकडून टाणें येथील तुरुंगांत कैदेंत ठेविलें, आणि खोट्या बातम्या पसरूं नयेत म्हणून,सरकारच्या परवानगी शिवाय,ठाणें जिल्ह्यातील लटक्या बंडाविषयीं बातमी छापूं नये, असा वर्तमानपत्रकर्त्यांस हुकूम देण्यांत आला. सरकारी हुकमा अन्वयें ह्या जिल्ह्यातील लोकांपासून ९९७ शस्त्रें घेऊन मोडून टाकिलीं, व ५२०४ शस्त्रें नोंदून ठेविलीं. ह्या जिल्ह्यामधून जाणारे जे जे हत्यारबंद लोक आढळले त्यांजपासून त्यांचीं शस्त्रें हिसकून घेतलीं, आणि सोरा, गंधक, व इतर लढाईच्या उपयोगी पडणारें सामान, या जिल्ह्यांत आणण्याचा किंवा या जिल्ह्यांतून बाहेर पाठविण्याचा प्रतिबंध केला. त्या वेळीं ह्या जिल्ह्यांत ज्या परकी लोकांची मुशाफरी करण्याची इच्छा होती त्यांना परवाने दिले व आरब लोकांना या जिल्ह्यांतील बंदरांत गलबतांवरून उतरूं देण्याची बंदी केली.

इ. स. १८६० त प्राप्तीवर कर बसला त्या वेळीं कर वसूल करण्याचे कामास बराच अडथळा झाला. ठाणें, कल्याण, भिवंडी, पनवेल, व शहापूर, येथील लोक जमा होऊन सरकारी मुख्य कामगारां कडे गेले, आणि आपणांस मिळालेले कराच्या आकारणीचे तक्ते त्यांनीं जमिनीवर फेंकून दिले, व ते परत घेण्याविषयीं सरकारी अधिकाऱ्यांनीं त्यांस सांगितलें तेव्हां, ते आम्ही घेत नाहीं असें ते ह्मणूं लागले. या पांच शहरांतील निरनिराळ्या जातींच्या मुख्य मुख्य गृहस्थांना लोकांचें मूर्खपणाचें वर्तन समजून सांगण्यास आलें तेव्हां, त्यांनीं स्वत: आपापले कराचे तक्ते घेतले,व इतरांचें मन ते घेण्याविषयीं वळविण्याचें कबूल केलें. वसई शहरांत मात्र या कामीं सर्व लोकांकडून हरकत झाल्याचें आढळून आलें, व तेथें इतर ठिकाणचे पेक्षां या हरकत करण्याचे कामीं विशेष व्यवस्थितपणा आढळून आला. ता. ४ दिसेंबर रोजीं तेथील सुमारे ४०००लोकांनीं मामलेदार कचेरींत जमून कराच्या आकारणीचे तक्ते व नोटिसा फेंकून दिल्या. मयत सिविल सर्वंट मि. हंटर हे त्या वेळीं प्राप्तीवरील कराच्या संबंधानें मुख्य अधिकारी होते.ते दुसरे दिवशीं स्वत: वसईस गेले तेव्हां, दंगा करण्याचे कामांत जे पुढारी होते, त्यांचे नांवांची याद मामलेदारानें त्यांजकडे पाठविली. हंटर साहेब

रहदारीचे बंगल्यांत उतरले होते तेथें त्या यादींतील इसमांस पाठविण्या विषयीं त्यांनीं मामलेदारास हुकूम केला. त्यावरून ते इसम, आपल्या बरोबर पुष्कळ लोकांचा थवा घेऊन, बंगल्याजवळ गेले, तेव्हां हंटर साहेब यांनीं सर्वांना बसावयास सांगून त्यांच्याशीं भाषण केलें. तें त्यांनीं लक्षपूर्वक शांतपणें ऐकून घेंतलें. तेव्हां त्यांची समजूत झाली असें समजून हंटर साहेबांनीं त्यांतील प्रमुख मंडळीस कराच्या आकारणीचे तक्ते घ्यावयास सांगितलें. तेव्हां त्यांच्यापैकीं गोवर्धनदास नांवाच्या गृहस्थानें, ती गोष्ट नाकबूल करून, फार उद्धटपणाचें वर्तन केल्यामुळें, त्यास पकडण्याविषयीं हंटर साहेबांनीं हुकूम केला तेव्हां तेंथें जमलेले सर्व लोक उच्छृंखल होऊन बंगल्यांत जबरीनें शिरले व त्यांनीं फार गोंगाट केला. तेव्हां हे आतां आपल्या स्वाधीन नाहींत असें समजून, हंटर साहेब आपल्या होडीवर जाण्याकरितां निघाले. बंगल्यापासून होडीवर चढण्याचा धक्का पाऊण मैल होता. या धक्क्याकडे तेजात असतांना, गोवर्धनदास याच्या सांगण्यावरून, लोकांनीं काठ्या व दगड यांचा हंटर साहेबांवर वर्षाव केला. तेव्हां पळत पळत जाऊन त्यांनीं आपली होडी एकदांची गांठली व फारशी इजा न होतां ते होडीवर चढले. परंतु त्यांचे नोकर होडी पाण्यांत लोटूं लागले तेव्हां त्यांजवर लोकांनीं दगडांचा वर्षाव केला. त्यामुळें पाऊण तास पर्यंत तशा संकटाच्या स्थितींत त्यांना राहावें लागलें. अखेरीस हंटर साहेब यांच्या कारकुनानें त्यांस जाऊं देण्याविषयीं लोकांचें मन वळविलें. पुढें या दंग्याचा नाईक गोवर्धनदास याला एक महिना कैद व ४०० रुपये दंड अशी शिक्षा देण्यांत आली.

इ. स. १८७४ त पुणें जिल्ह्यांतील जांबुरी गांवचा कोळी, होन्या बिन भागुजी केंगळया, हा दरवडेखोरांच्या एका मोठ्या टोळीचा नाईक बनला. तेव्हां एक युरोपियन कामगार, बरोबर पोलीस लोकांची एक पार्टी घेऊन, त्याचा पाठलाग करूं लागला. परंतु, तो फार गुप्तपणें व जलदीनें पळत असल्यामुळें, दोन वर्षेंपर्यंत त्याला धरण्याची संधि सांपडली नाहीं. अखेरीस, ता. १५ आगष्ट सन १८७६ रोजीं, कारजत तालुक्यांतील नांदगांव या गांवीं होन्या पकडला गेला व त्याला जन्मठेपेची शिक्षा होऊन काळे पाण्यावर पाठविण्यांत आलें. नंतर ह्या

टोळींतील बहुतेक दरवडेखोर पकडले गेले व त्यांना नवर कैदेच्या शिक्षा देण्यांत आल्या. इ. स. १८७७ त, वासुदेव बळवंत फडके याच्या मदतीनें दरवडे घालणारे दरवडेखोर, पुणें जिल्ह्यांत व घाटावरच्या इतर जिल्ह्यांत दरवडे घालीत होते,त्यांच्या पासून ठाणें जिल्ह्यांतील लोकांनाही उपद्रव झाला. त्यांनीं या जिल्ह्यांत अनेक मोठमोठे दरवडे घातले. पनवेल एथील एका श्रीमंत ब्राह्मणाच्या येथें पडलेला दरवडा त्या सर्वांत मोठा होता. या दरवडेखोरांच्या नायकाला, इ. स.१८७९च्या मे महिन्यांत, सुदैवें करून मेजर एच् डयानियल ह्यानें, अकस्मात्, तो सावध नसतां, पकडलें व पुढें तो मरण पावला. त्यामुळें अव्यवस्था वाढत जाण्याची बंद झाली. अखेरीस, इ. स. १८७९ च्या जुलै महिन्यांत, मेजर एच् डयानियल ह्यानें, कलादगी जिल्ह्यांतील इंडी तालुक्यापैकीं देवें नंदिगी या गांवीं,खुद्द वासुदेव बळवंत यालाही पकडल्यामुळें,पुढें लवकरच जिकडे तिकडे पुनरपि शांतता झाली.

इंग्रज सरकारच्या अमलाखालीं आल्यापासून या जिल्ह्याचा व्यापार फार वाढला. इ. स. १८०५ त ४११ लाखांचा माल आला व ३३० लाखांचा बाहेर गेला, आणि इ. स. १८८१ त २३५७ लाखांचा माल आला व २९२१ लाखांचा बाहेर गेला. यावरून इ. स. १८०५ तील व्यापाराच्या सुमारें सातपट व्यापार इ. स. १८८१ त वाढला होता असें दिसून येतें. जलमार्गानें व खुषकीनें मिळून ठाणें जिल्ह्यांत होणारा हा व्यापार या हिंदुस्थानांतील स्थळांशींच होत असतो. ठाणें जिल्ह्यांतील किनाऱ्यावरील बंदरांच्या,परदेशाशीं होणाऱ्या, व्यापाराचें मुख्य स्थान मुंबई हें आहे. ह्या शतकाच्या आरंभीं मुंबईंत जो व्यापार होत असे त्याच्या साडासातशेंपट व्यापार हल्लीं तेथें होतो. परंतु मुंबईंत वाढलेल्या ह्या व्यापाराच्या योगानें ठाणें जिल्ह्याचा साक्षात् फायदा मुळींच झाला नाहीं. ठाणें जिल्ह्यामधून रेलवेनें मुंबईस माल जातो त्यामुळें, व आगबोटवाल्यांची गलबतवाल्यांबरोबर चढाओढ सुरू झाल्यामुळें, ठाणें जिल्ह्यांतील गाडीवाले व खलाशी यांच्या पोटावर उलटे पाय आले आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं.तथापि ठाणें जिल्ह्याचें परोक्ष रीतीनें हित होत आहे यांत संशय नाहीं. मुंबईतील व्यापारवृद्धीबरोबर तेथील लोकसंख्या व

काम धंदा वाढल्यामुळें,मुख्यत्वेंकरून ठाणें जिल्ह्यांतील लोकांची संपत्ति व भरभराट वाढत आहे. त्या व्यापाराच्या वृद्धीमुळें, ठाणें जिल्ह्यांतील वरच्या प्रतीच्या अनेक लोकांना कारकूनीचे व उदम्याचे धंदे मिळतात, आणि खालच्या प्रतीच्या अनेक लोकांना मोलमजुरीचें व कारागिरीचें काम मिळतें. इ. स. १८२० च्या साहापट हल्लीं मुंबईत चुना, दगड, वाळू, कवलें, व इमारतीचीं लांकडें खपतात. तसेंच मीठ, गवत, दाणागोटा, भाजीपाला, फळफळावळ, पिण्याची दारू, जनावरें (गुरेंढोरें ),आणि लवकर खराब होणाऱ्या किंवा मोठ्या अवजड वस्तु, यांचाही तितकाच खप होतो. ह्या सर्व वस्तु मुंबईस पाठविण्याची जितकी सोय दूरच्या प्रांतांतील लोकांची आहे, तिच्यापेक्षां ठाणें जिल्ह्यांतील लोकांची हे जिन्नस मुंबईस पाठविण्याची विशेष सोय असल्यामुळें, या जिल्ह्याचा फायदा होत आहे.

भाग पांचवा समाप्त.

ठाणें जिल्ह्याचा इतिहास समाप्त.

## परिशिष्ट. १ लें.

---

# जव्हार संस्थानाचा इतिहास.

---

इ. स. १२९४ त मुसलमानांनीं प्रथमतः दक्षिणेंत स्वारी केली. तेथपर्यंत उत्तर कोंकणाचा बराच मोठा भाग कोळी व वारली या जातींच्या रानेरजवाड्यांकडे होता. जव्हार संस्थान हें त्या वेळीं एका वारली राजाकडे होतें. पुढें तें त्याजकडून पुढें लिहिल्याप्रमाणें पापेरा नांवाच्या एका कोळ्याकडे आलें. कोळी लोक अशी कथा सांगत असतात कीं, पापेरा ऊर्फ जयबा याचा, तळघाटाजवळ मुकणें एथें, एक लहानसा चिखलाच्या भिंतीचा किल्ला होता. एकदां तो पिंपरी एथील देवाला जात असतां, पांच कोळीजातीच्या बैराग्यांनीं त्याला आशीर्वाद दिला, व तूं जव्हारचा राजा होशील असें सांगून, त्यांनीं त्याचा आदरसत्कार केला. नंतर पापेरा कांहीं कोळी जमा करून, त्यांना बरोबर घेऊन, उत्तरेकडे गेला. तेव्हां पेंठ व धर्मपूर एथील लोकांनीं त्याला आपला राजा केला. तेथून सुरतेस जाऊन, पुढें उत्तरेकडे तो काठेवाडपर्यंत गेला व तेथें सात वर्षें राहिला. काठेवाडांतून परत आल्यावर, जव्हारच्या वारली जातीच्या राजाकडे जाऊन, एका बैलाच्या कातड्यानें जितकी जमीन आच्छादली जाईल, तितकी मला द्या असें त्यानें त्याला ह्मटलें. ती गोष्ट त्या वारली राजानें कबूल केली. नंतर त्या बैलाच्या कातड्याच्या बारिक बारिक चिरफाळ्या करून, जयबानें जमिनीवर पसरल्या. तेव्हां त्यांच्या योगानें वारली राजाचें सर्व राज्य आच्छादून गेलें. नंतर जव्हारच्या वायव्येस सुमारें साहा कोसांवर असणारा गंभीरगड किल्ला, व त्याच्या सभोंवतालचा मुलूख, एवढा प्रदेश मात्र जयबानें त्या वारली राजास दिला आणि बाकी सगळें राज्य त्यानें आपल्याकडे घेतलें.

दुसरी अशी एक कथा ऐकिवांत आहे कीं, नाशिक व त्रिंबक एथें गौळी राजाचें राज्य होतें. तो गौळी राजा दौलताबादच्या यादववंशीय रामराजाचा भाऊ होता. त्या गौळी राजाच्या पुतण्याचा

अंमल सह्याद्रीच्या खालीं कोंकणपट्टींत चालत होता. त्याचा पराभव करून जयबा कोळयानें सगळें कोंकण घेतलें. पुढें जयबा घाटावर दक्षिणेंत आपला अंमल बसवूं लागला तेंव्हां मुसलमानांनीं त्याला अडथळा केला. देवगिरि उर्फ दौलताबाद एथील यादवराजा रामचंद्र [इ. स. १२८६–१२९२] याचा ठाणें एथें इ. स. १३०० च्या सुमारास प्रतिनिधि होता. इ. स. च्या १४ व्या शतकाचे अखेलीस मुसलमानांचा कोंकणावरचा ताबा फार ढिला झाला होता. इ. स. १३४३ त जयबा कोळयाच्या मुलाचें स्वातंत्र्य मुसलमानांनीं कबूल केलें होतें. या सर्व गोष्टींवरून पहातां जयबा कोळी यानेंच जव्हारच्या राजवंशाची स्थापना केली असें दिसतें, व जयबानें गवळी राजाच्या पुतण्याला जिंकलें ह्मणून वर सांगितलें आहे त्या गोष्टीस बळकटी येते.

नेमशहा व होळकरराव असे दोन पायेराला मुलगे होते. त्यांपैकीं वडील मुलगा नेमशहा हा पायेरा उर्फ जयबा याच्या पश्चात् गादीचा मालक झाला. इ. स. च्या १४ व्या शतकाच्या मध्याचे सुमारास [इ. स. १३४३] दिल्लीच्या बादशहानें त्याला शहा ही पदवी दिली, आणि बावीस किल्ले व नऊ लाख रुपये वसुलाचा मुलूख यांवर त्याची सत्ता कबूल केली. ही गोष्ट जव्हारच्या इतिहासांत फार महत्वाची असल्या-मुळें, ज्या दिवशीं दिल्लीच्या बादशहाकडून नेमशहाला शहा ही पदवी मिळाली, त्या दिवसापासून, ह्मणजे ता. ५ जून इ.स. १३४३ पासून, त्या संस्थानांत एक नवा शक चालू झाला. इ. स. १८८२ त या शकाचें ५४० वें वर्ष चालू होतें. जव्हार संस्थानांत सर्व सरकारी कागदपत्रांत या शकाचा अजूनही उपयोग करीत असतात. इ स. च्या १५ व्या शतकांत, अहमदाबादच्या राजांचें वैभव शिखरास पोंचलें होतें तेंव्हां, त्यांचा अमल नागोठणें व चौल यांच्यापर्यंत पसरला होता, आणि ठाणें जिल्ह्याचा बहुतेक समुद्रकिनारा त्यांच्या ताब्यांत होता. तरी त्यांनीं किनाऱ्यापासून दूर असणाऱ्या जव्हार संस्थानाला धक्का लावला नाहीं. सोळाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास पोर्टुगीज लोकांचा ठाणें जिल्ह्यांत प्रवेश झाल्यामुळें, जव्हारसंस्थानचा विस्तार कांहीं कमी झाला. या पोर्टुगीज-लोकांचे ताब्यांत असेरीचा मजबूत डोंगरी किल्ला होता. खेरीज,

ठाणें जिल्ह्याच्या समुद्रकिनाऱ्यापासून दूर असणाऱ्या उत्तरभागांत, पुष्कळ मेढेकोटही यांनीं बांधिले होते. त्यांचे जव्हारच्या राजांबरोबर निरंतर कलह चालत असत. या कोळीराजांबरोबर त्यांनीं अनेक वेळा तहही केले. कोळी राजांचे अनुयायी मुलखाची फार नासाडी करीत, आणि वानरांसारखे एका झाडावरून दुसऱ्यावर उड्या मारीत, असें पोर्टुगीज लोकांनीं त्यांचे वर्णन केलें आहे. ठाणें जिल्ह्याचा ईशान्येकडील जंगली प्रदेश, दक्षिणेस भिवंडी व माहुलीचा डोंगरी किल्ला यांचेपर्यंत, त्यावेळीं कोळी राजांकडे होता असें दिसतें. याखेरीज तीन मोठीं शहरें कोळ्यांचे ताब्यांत होतीं. दमणाचे उत्तरेस असणारें तावार, वाझें [हें बहुधा वासिंद असावें], व दारिला [हें बहुधा उंबरगांवाजवळचें घेरी हें गांव असावें] हीं तीं तीन शहरें होत. यांपैकीं शेवटचें मोठें होतें, व त्यांतील घरें कौलारू असून दगडांनीं बांधलेलीं होतीं. इ. स. १६०० पासून १६५० पर्यंत पोर्टुगीज लोकांच्या अमलाचा ऱ्हास होत गेला. तेव्हां कोळी लोकांनीं आपलें पूर्वीचें महत्व पुनः मिळविलें. मोंगलांच्या सेनापतींना डोंगराळ प्रदेशांत लढाई करणें आवडत नसल्यामुळें, ते मोठ्या आनंदानें जव्हारच्या कोळ्यांबरोबर सख्य करीत. सतराव्या शतकाच्या अखेरीस (इ स. १६९०), मुसलमानांच्या मदतीनें, जव्हारच्या राजानें ४००० लोकांसह उत्तर कोंकणावर स्वारी केली, आणि पोर्टुगीज लोकांच्या ताब्यांतील गावें व ख्रिस्ती देवळें हीं लुटलीं. अठराव्या शतकाच्या [illegible] सुमारास, समुद्रकिनारा खेरीज करून, बाकीचा वसई पासून दमणपर्यंतचा सगळा उत्तर कोंकणाचा प्रदेश, आणि दक्षिणेकडे भिवंडीपर्यंत कांहीं प्रांत, हे जव्हारच्या राजाकडे होते. त्याच्या राज्यांत दहा किल्ले होते, व मुख्यतः जकातीपासून सालीना साडेतीन लाख रुपयांचें त्याला उत्पन्न होतें.

पुढें अठराव्या शतकांत, पोर्टुगीज लोकांहून अधिक भयंकर शत्रु जे मराठे, त्यांच्याबरोबर जव्हारच्या राजाला सामना करावा लागला. इ. स. १७३९ पासून १७६० पर्यंत, जे विजय मराठ्यांस प्राप्त झाले, त्यांच्यायोगानें मराठ्यांच्या हातीं, पोर्टुगीजलोकांकडे असलेला, समुद्रकिनाऱ्यावरचा मुलूख आला इतकेंच नव्हे, तर जव्हार संस्थानांतील दक्षिणे-

कडील प्रांतांपैकीं बराच मोठा भागही त्यांचे हातीं गेला, व जव्हारचा राजा मराठ्यांचा आश्रित बनला. तेव्हां पेशव्यानें जव्हारच्या राजाच्या मुलखांत निरनिराळ्या बाबती व सरदेशमुखी हे कर बसविले, त्या राजाच्या फौजेचा उपयोग आपल्या कामाकडे केला, कोळ्यांच्या दंग्यांचा बंदोबस्त त्या राजानें न केल्यामुळें त्याचें राज्य अनेक वेळा जप्त केलें, आणि त्याच्यापासून दरसाल एक हजार रुपयांचा नजराणा तो घेऊं लागला. इ. स. १७४२ त, विक्रमशहा वारल्यावर, त्याच्या बायकांपैकीं सई कुवरबाई इला, दत्तक मुलगा घेण्याची परवानगी पेशव्यानें दिली. नंतर लवकरच, विक्रमशहाची दुसरी बायको मोहना कुवरबाई, इनें दत्तक घेतलेल्या मुलाला मारविलें. तेव्हां पेशव्यानें जव्हारच्या राज्याची व्यवस्था आपले हातीं घेतली. पुढें इ. स. १७५८ त पुनः जव्हारचें राज्य जप्त झालें व इ. स. १७६१ त तिसऱ्यादां तें जप्त झालें. इ. स. १७८२ त पेशव्याबरोबर एक करार झाला त्याच्या योगानें पंधरा हजारांपासून वीस हजारांपर्यंत उत्पन्नाचा मुलूख मात्र जव्हारच्या राजाकडे राहिला. इ. स. १७९८ त, दुसरा पतंगशहा वारल्यावर, त्याचा पुत्र तिसरा विक्रमशहा, याला पेशव्यानें त्याच्या बापाच्या गादीवर बसूं दिलें. परंतु त्या वेळीं त्याच्याकडून असा करार करून घेतला कीं, त्यानें पेशवेसरकारच्या आज्ञेत राहून राज्य करावें, गादीवर बसण्याबद्दल तीन हजार रुपयांचा नजराणा द्यावा, आणि त्र्यंबकेश्वर एथील मामलेदाराची देखरेख त्याच्यावर असावी. पुढें इ. स. १८०५ त रामनगराजवळ भील लोकांनीं दंगा केला. तेव्हां त्यांच्यावर पेशव्यानें जी फौज पाठविली तिजवरील अधिकाऱ्यांच्या हाताखालीं असण्याविषयीं जव्हारच्या राजाला त्यानें हुकूम केला. इ. स. १८२१ त तिसरा विक्रमशहा निवर्तला तेव्हां त्याला पुत्र नव्हता. परंतु पुढें लवकरच त्याच्या गरोदर स्त्रीला पुत्र झाला त्याचें नाव पतंगशहा ठेविलें. नंतर मयत राजाच्या दोघां भावांच्या विधवा बायकांनीं गादीवर बसण्याच्या अधिकाराच्या संबंधानें तंटा करण्यास आरंभ केला. तेव्हां, दंगा होऊं नये ह्मणून, उत्तरकोंकणचा कलेक्टर हा स्वतः जव्हारास गेला, व त्यानें विक्रमशहाच्या मरणानंतर जन्मलेल्या मुलास तिसरा पतंगशहा या नांवानें गादीवर बसविलें.

ठाणे.



हा मुलगा लहान होता तोंपर्यंत राज्याचा कारभार पतंगशहाची आई सगुणीबाई इच्याकडे ठेविला होता, व दुसऱ्या दोन विधवा बाया आणि त्यांचे मुलगे यांना सालीना २००० रुपयांची नेमणूक करून दिली होती. गादीवर बसण्याच्या समयीं, इंग्रज सरकाराला जो नजराणा मिळावयाचा, तो यासमयीं मात्र, मेहेरबानीदाखल माफ करण्यांत आला. परंतु, या माफीच्या योगानें पुढील नजराण्यास हरकत होऊं नये, असें ठरविण्यांत आलें होतें. इ. स. १८३९ त जव्हार संस्थानांत ८३ गांव होते, व सालीना १० हजार रुपयांचें उत्पन्न होतें. त्यांपैकीं ६ हजार रुपये जकातीपासून व ४००० जमिनीधाऱ्यापासून उत्पन्न होत. ता. ११ जून इ. स. १८६५ रोजीं तिसरा पतंगशहा मुंबई एथें निवर्तला. त्याला पुत्र नसल्यामुळें, त्याच्या बायकोनें आपला चुलत सासरा माधवराव याचा नातू नारायणराव याला दत्तक घेतलें. या नारायणरावाला चवथा विक्रमशहा ह्मणत. हा इ. स. १८६५त जुलैच्या २३ वे तारखेस मेला. नारायणरावाच्या प्रेताला मूठमाती देण्यापूर्वीं, त्याची तरुण बायको लक्ष्मीबाई इनें, तिची सासू गोपिकाबाई इचे सांगण्यावरून, मल्हारराव याला दत्तक घेतलें. हा हल्लीं गादीवर आहे. याचें वय त्या वेळीं सुमारें १० वर्षांचें होतें. पुढें दिलेल्या वंशावळीवरून असें दिसून येईल कीं, जव्हारचा नववा राजा कृष्णशहा, याचा भाऊ लवजीराव, याचा वंशज माधवराव, याचा हा औरस पुत्र होय.

मल्हाररावास दत्तक घेतलें त्या वेळीं जव्हार संस्थान जप्त असून तें डहाणूच्या मामलेदाराच्या ताब्यांत होतें. पुढें, मल्हाररावास दत्तक घेण्याच्या कामास मंजुरी मिळाल्यावर, राणी गोपिकाबाई इच्या स्वाधीन संस्थानचा कारभार इंग्रज सरकारानें केला. तेव्हां असा करार करण्यांत आला कीं, मल्हाररावास गादीवर बसण्याची परवानगी मिळाल्याबद्दल वीस हजार रुपयांचा नजराणा गोपिकाबाईनें इंग्रजसरकाराला द्यावा, आणि मुलाला इंग्रजी शिकण्याकरितां पुण्याच्या हायस्कुलांत पाठवावें, संस्थानाच्या अर्ध्या उत्पन्नाहून अधिक खर्च करूं नये, कारभार पहाण्याकरितां एक अधिकारी नेमावा, त्याला इंग्रजसरकारचे परवानगीशिवाय कामावरून दूर करूं नये, आणि दिवाणी व फौजदारी खटल्यांच्या निकालाची व्यवस्था

करावी. ह्या अटी कबूल झाल्यावर धाकटा राजा मल्हारराव याला पुणें एथें ता. २९ अकटोबर १८६६ रोजीं, आणि जव्हार एथें ता. २८ मार्च १८६७ रोजीं, गादीवर बसविण्याचा समारंभ झाला. इ. स. १८५९--६० पासून इ. स. १८६४–६५ पर्यंत साहा सालांच्या उत्पन्नाच्या सरासरीवरून सालीना एक लक्ष, एक हजार, दोनशें पन्नास रुपयांचें संस्थानाचें उत्पन्न आहे असें दिसून आलें. ता. २९ एप्रिल सन १८६६ रोजीं १२४७५० रुपये खजीन्यांत शिल्लक आहेत असेंही दिसून आलें. नंतर अर्ध्या उत्पन्नाहून अधिक खर्च होऊं नये ह्मणून खर्च कमी करण्यांत आला. पुढें संस्थानांत शाळा घातल्या, कासतवाडी व धेंग या खिंडींतून मोठ्या सडका, ९५ हजार रुपये खर्चून, बांधल्या, आणि विहिरी खणून पाण्याचा पुरवठा वाढविला.

माजी मि. हावलाक साहेब सी. एस्. यांस इ. स १८६९त चवकशी अंतीं असें दिसून आलें कीं, जव्हारसंस्थानांतील हिशेब बनावट नाहींत असें मानिलें तरी, ते फार अव्यवस्थित रीतीनें आणि निष्काळजीनें ठेविले जातात व त्यांत पुष्कळ गोंधळ असतो. असें दिसून आल्यामुळें, तेव्हां काम करीत असलेला संस्थानचा कारभारी, कुवरजी शापुरजी, याजवर खटला सुरू करून, सरकारानें चवकशी केली. तींत त्याजवर गुन्हा तर शाबीद झाला नाहीं. तरी, तो कारभार चालविण्यास नालायक ठरल्यामुळें, त्याला दूर करून मि. जयसिंग (जयसिंह) राव आंग्रे यांस, इ. स. १८७० च्या मार्च महिन्यांत, कारभारी नेमिलें. मि. जयसिंगरावानंतर मि. शिवराम नीलकंठ यांची नेमणूक कारभाऱ्याचे जागीं झाली. पुढें, इ स. १८७७त राजेसाहेब वयांत येत पर्यंत, शिवराम नीलकंठ हे आपले कामावर होते लहान असतांना राजे साहेब, आपल्या योग्यतेप्रमाणें इतमाम बरोबर घेऊन, पुण्यास गेले व तेथें त्यांनीं एका खासगी शिक्षकाचे मदतीनें अभ्यास केला. इ. स. १८७४ त, नाशिक जिल्ह्यांतल्या इगतपुरी गांवाजवळच्या कालुस्ते गांवांतील महादखानपाटील यांच्या मुलीशीं, राजेसाहेब यांचें लग्न झालें. ता. २० एप्रिल सन १८७४ रोजीं हा लग्नसमारंभ जव्हार एथें झाला. त्या वेळीं मि. जे. डब्ल्यु. राबर्टसन पोलिटिकल एजेंट हे या समारंभास गेले होते ता. २८मार्च१८७५रोजीं राजेसाहेबांची आई राणी गोपिकाबाई यांस

देवाज्ञाझाली.तेव्हां राजेसाहेब लहान असल्यामुळें ठाणें एथील कलेक्टर व पोलिटिकल एजेंट यांनीं संस्थानाचा कारभार आपलेकडे घेतला. पुढें इ. स. १८७५च्या दिसेंबरमहिन्यांत राजेसाहेबांस पुणेंएथील हायस्कूलांतून काढिलें. नंतर, इंग्रज सरकारच्या मुलुखांतील कोडतांत कोणत्या तऱ्हेनें काम चालतें त्याची माहिती होण्याकरितां, ते पुणें एथील जज्ज कोडतांत कांहीं दिवस जात असत. इ. स. १८७६ च्या मे महिन्याचे अखेरीस राजे साहेब थोडथोडें सरकारी काम पाहूं लागले आणि ता. २२ जानुवारी १८७७ रोजीं त्यांना पूर्ण मुकत्यारी मिळाली. राजेसाहेबांचें वय हल्लीं (१८८२) २८ वर्षांचें असून त्यांस एक पुत्र आहे. त्यांना सेकंड क्लासचा अधिकार आहे.ता०५माहे फेब्रुवारी१८७७चा सरकारचा ठराव नंबर ६७० वरून, या अधिकारान्वयें, राजे साहेब यांस आपल्या प्रजेपैकीं कोणालाही देहान्त शिक्षा करण्याचा अधिकार आहे.खेरीज इंग्रजी अमलांतील लोकांनीं त्यांचे अमलांत गुन्हा केला तर, देहान्त शिक्षेशिवाय,कोणत्याही प्रकारची शिक्षा गुन्हेगारास देण्याचा त्यांस अधिकार आहे. जरूर वाटेल तर, पोलिटिकल एजंट यांनीं,अशा गुन्ह्यांच्या संबंधानें शिक्षा देण्याचे कामीं, राजेसाहेबांस सल्लामसलत द्यावी, असाही ठराव आहे. गादीवर बसण्याचे वेळीं द्यावयाच्या नजराण्याखेरीज दुसरी कोणत्याही प्रकारची खंडणी राजेसाहेबांना इंग्रजसरकारास द्यावी लागत नाहीं. राजेसाहेबांचे पदरीं लष्करी लोक मुळींच नाहींत. दत्तक घेण्याचें कारण पडल्यास इंग्रज सरकारचे मंजुरीनें तो घ्यावा असा ठराव आहे. औरस संतती असल्यास वडील मुलानें गादीवर बसावें असा नियम आहे.

आजपर्यंत जव्हार संस्थानांत सोळा राजे झाले. त्यांपैकीं पहिल्या आठांची नांवें (१) पापेरा ऊर्फ जयबा, (२) पहिला नेमशहा ऊर्फ धुळबाराव, (३) भीमशहा, [४] महमदशहा, [५] महमदशहाचा दत्तकपुत्र पहिला कृष्णशहा, (६) दुसरा नेमशहा, (७) पहिला विक्रमशहा, आणि [८] पहिला पतंगशहा हीं होत. बाकीच्या आठ राजांचीं नांवें पुढील वंशावळींत दाखल केलीं आहेत:—

(८) पहिला पतंगशहा.

(९) दुसरा कृष्णशहा (दत्तक). — लवजीराव.

(१०) दुसरा विक्रमशहा — कुडतोजीराव.

(११) तिसरा कृष्णशहा. — लिंबकजीराव.

(१२) दुसरा पतंगशहा (दत्तक) — देववाराव.

माधवराव (जीवंत १८८२ त)

मल्हारराव.

(१३) तिसरा विक्रमशहा, माधवराव यशवंतराव.

(१४) तिसरा पतंगशहा. प्रतापराव.

(१५) नारायणराव ऊर्फ चवथा विक्रमशहा (दत्तक) — नारायणराव.

(१६) मल्हारराव ऊर्फ चवथा पतंगशहा (दत्तक)

**पहिलें परिशिष्ट समाप्त.**

# परिशिष्ट २ रें.

अकरावा शिलाहार राजा चित्रराज याचा, साष्टि तालुक्यांतील भांडूप गांवा जवळच्या नाऊर गांवांतील शेत दान दिल्याबद्दलचा, शक ९४८ तील कोरीव लेख.

ॐ जयश्चाभ्युदयश्च.

लभते सर्वकार्येषु पूजया गणनायकः(?)।विघ्नं निघ्नन् स वः पायादपायाद्गणनायकः॥१॥
स वः पातु शिवो नित्यं यन्मौलौ भाति जान्हवी।सुमेरुशिखरोद्गच्छदच्छचंद्रकलोपमा॥२॥
जीमूतकेतुतनयो नियतं दयालुर्जीमूतवाहन इति त्रिजगत्प्रसिद्धः।
देहं निजं तृणमिवाकलयन् परार्थे यो रक्षति स्म गरुडात् किल शंखचूडम् ॥३॥
तस्यान्वये नरपतिः समभूत् कपर्दी शीलारवंशतिलको रिपुदर्पमर्दी।
तस्मादभूच्च तनयः पुलशक्तिनामा मार्तंडमंडलसमानसमिद्धधामा ॥४॥
जातवानथ लघुः स कपर्दी सूनुरस्य सकलैररिवर्गैः।
यद्भयेन सलिलांजलिरुच्चैर्दीयते स्म निजराज्यसुखाय ॥५॥
तस्मादभूच्च तनयो भुवनैकवीरः श्रीवप्पुवन्न इति संगररंगवीरः।
श्रीझंझ इत्यभवदस्य सुतः सुकीर्तिर्भ्राताथ गोग्गिनृपतिः समभूत् सुमूर्तिः ॥६॥
तस्माद्विस्मयकारिहारिचरितप्रख्यातकीर्तिः सुतः
श्रीमान् वज्जडदेवभूपतिरभूद् भूचक्रचूडामणिः।
दोर्दंडैकबलस्य यस्य सहसा संग्रामरंगांगणे
राज्यश्रीः स्वयमेव वक्षसि रतिं चक्रे मुरारेरिव॥७॥
जयन्त इव वृत्रारेः पुरारेरिव षण्मुखः
ततः श्रीमानभूत् पुत्रः सच्चरित्रोपराजितः॥८॥
कर्णस्त्यागेन यः साक्षात् सत्येन च युधिष्ठिरः
प्रतापादीप्त मार्तण्डः कालो दण्डाच्च यो द्विषाम्॥९॥
तस्मादभूद्वज्जडदेवनामा ततोग्रजः श्रीकेशिदेवश्च (?)
तद्भ्रातृजो वज्जडदेवसूनुः श्रीचित्रराजो नृपतिर्बभूव॥१०॥
शीलारवंशः शिशुनापि येन नीतः परामुन्नतिमुन्नतेन॥

अतः स्वकीयपुण्योदयात् समधिगताशेषपंचमहाशब्दमहासामन्ताधिपतितगरपुरपरमेश्वरशिलाहारनरेन्द्रजीमूतवाहनान्वयप्रसूतसुवर्णगरुडध्वजसहजविद्याधरनागजगज्झम्पिमाण्डलिकशिखामणिशरणागतवज्रपञ्जरप्रभृतिसमस्तराजावलीसमलंकृतमहामण्डलेश्वरश्रीमच्चित्रराजदेवे निजभुजोपार्जितानेकमण्डलसमेतां पुरीप्रमुखचतुर्दशग्रामशतीसमन्वितां समग्रकोंकणभुवं समनुशासति, तच्चैतद्राज्यचिन्ताभारमुद्वहत्सु सर्वाधिकारिश्रीनागणैयसांधि-

विग्रहिकश्रीतीहपैयकर्णाटसांधिविग्रहिकश्रीकपर्दिश्रीकरणादिपंचप्रधानेषु सत्सु, अस्मिन् काले प्रवर्तमाने, स च महामण्डलेश्वरश्रीमाच्चित्रराजदेवः सर्वानेव स्वसंबध्यमानकानन्यानपि समागामिराजपुत्रमन्त्रिपुरोहितामात्यप्रधानाप्रधाननैयोगिकांस्तथा राष्ट्रपतिविषयपतिनगरपतिग्रामपतिनियुक्तानियुक्तराजपुरुषजनपदांस्तथा हंषमननगरपौरत्रिवर्गप्रभृतींश्च प्रणतिपूजासत्कारसमादेशैः संदिशति। अस्तु वः संविदितं—यथा 'चला विभूतिः क्षणभंगि यौवनं कृतान्तदन्तान्तरवर्ति जीवितम्, संसारे सहजजरामरणसाधारणं शरीरकम्। पवनचलितकमलिनीदलगतजललवतरलतरमेव चायुः इति मत्वा द्रढयन्ति दानफलम्। तथाचोक्तं भगवता व्यासेन:—

'अग्नेरपत्यं प्रथमं सुवर्णं भूर्वैष्णवी सूर्यसुताश्च गावः।
लोकत्रयं तेन भवेद्धि दत्तं यः कांचनं गांच महीं च दद्यात्॥

इति धर्माधर्मविचारचारुचिरंतमुनिवचनान्यवधार्य मातापित्रोरात्मनश्च श्रेयोर्थिना मया शकनृपकालातीतसंवत्सरशतेषु नवसु अष्टचत्वारिंशदधिकेषु क्षयसंवत्सरान्तर्गतकार्तिकशुद्धपंचदश्याम् यत्रांकतोपि संवत् ९४८ कार्तिकशुद्ध १५ रवौ संजाते आदित्यग्रहणपर्वणि सुतीर्थे स्नात्वा गगनैकचक्रचूडामणये कमलिनीकामुकाय भगवते सवित्रे नानाविधकुसुमश्लाध्यमर्घ्यं दत्वा सकलसुरासुरगुरुत्रैलोक्यस्वामिनं भगवन्तमुमापतिमभ्यर्च्य यजनयाजनाध्ययनाध्यापनादिषट्कर्मनिरताय क्रतुक्रियाकाण्डशौण्डाय पाराशरगोत्राय च्छन्दोगशाखिने महाब्राह्मणाय आमदेवैयाय विप्रनोडमैयसुताय यजनयाजनाध्ययनाध्यापनादिषट्कर्मकरणाय आगताभ्यागतनित्यनैमित्तिकसंव्यवहारार्थं वलि चरुकवैश्वदेवाग्निहोत्रक्रतुक्रियाद्युपसर्पणार्थं स्वपरिग्रहपोषणार्थं च श्रीस्थानकाभ्यन्तरषट्षष्टिविषयान्तःपाति नोउरग्रामान्तर्वर्ति चोडणिभट्टक्षेत्रम् यस्य चाघाटनानि—पूर्वतः गोवणिमर्यादा, दक्षिणतः गोरपवलीमर्यादा, पश्चिमतो राजपथः, पूर्वोत्तरतो गोवणिमर्यादा, एवं चतुराघाटनोपलक्षितं ससीमापर्यन्तं समस्तोत्पत्तिसंयुक्तं अचाटभटप्रवेश्यं अनादिरुपमनासेध्यं उदकातिसर्गेण नमस्यावृत्या परमया भक्त्या प्रतिपादितम्। तदस्य सान्वयवन्धोरपि भुञ्जतो भोजयतो वा कृषतः कर्षयतो वा न केनापि परिपंथना करणीया। यत उक्तमेव महामुनिभिः—

'बहुभिर्वसुधा भुक्ता राजभिः सगरादिभिः।
यस्य यस्य यदा भूमिस्तस्य तस्य तदा फलं'॥
दत्वा भूमिं भाविनः पार्थिवेन्द्रान् भूयो भूयो याचते रामभद्रः।
सामान्योऽयं धर्मसेतुर्नृपाणां काले काले पालनीयो भवद्भिः॥

इति महर्षिवचनान्यवधार्य सर्वैरपि समागामिभिर्भूपालैः पालनधर्मफललोभ एव कलनीयः। न पुनस्तल्लोपनपापकलंकाग्रेसरेण केनापि भवितव्यम्। यस्त्वेवमभ्यर्थितोऽपि लोभादज्ञानतिमिरपटलावृतमतिराच्छिन्द्यादाच्छिद्यमानमनुमोदेत वा स पंचभिरपि पातकैरुपपातकैश्च लिप्तो रौरवमहारौरवान्धतामिस्रादिनरकांश्चिरमनुभविष्यति। तथा चोक्तं व्यासेनः—

'स्वदत्तां परदत्तां वा यो हरेत वसुंधराम्।
स विष्ठायां कृमिर्भूत्वा कृमिभिः सह पच्यते'॥

यथा चैतदेवं शासनदाता लेखकहस्तेन स्वमतमारोपयति। यथा—मतं मम महामण्डलेश्वरश्रीचित्रराजदेवस्य महामण्डलेश्वरश्रीमद्दुज्जडदेवराजसूनोर्यदत्र शासने लिखितम्। लिखितं चैतन्मया श्रीमद्राजानुज्ञया भाण्डागारसेनजोगपैयेन भाण्डागारसेनमहाकविश्रीनागलैयभ्रातृसुतेन। यदत्रोनाक्षरमधिकाक्षरं वा तत् सर्वं प्रमाणमिति। श्रीर्भवतु।

काव्यमालांतर्गत प्राचीनलेखमाला—लेख १८ पृ. ७४

**दुसरें परिशिष्ट समाप्त.**

---

## परिशिष्ट तिसरें.

---

## ठाणें जिल्ह्याचें वर्णन.

---

उत्तर अक्षांश १८ कला ४२ व उत्तर अक्षांश २० कला २० आणि पूर्वरेखांश ७२ कला ४५ व पूर्वरेखांश ७३ कला ४८ यांचे मध्यें ठाणे जिल्हा आहे. या जिल्ह्याचें क्षेत्रफळ ४२५० चौरस मैल असून नऊ लक्षांवर लोकसंख्या आहे. ह्मणून दर चौरस मैलास २१२ माणसें वसतात. या जिल्ह्यातील जमिनीचें विन हरकत येणारें उत्पन्न १३८१०७० रुपये आहे.

मर्यादा—ठाणें जिल्ह्याची एकंदर लांबी १०५मैल आहे. त्यांपैकीं सुमारें ८० मैलपर्यंत दक्षिणेकडील बाजूस या जिल्ह्याची रुंदी ६५ पासून ३७ मैलपर्यंत कमीजास्त मानानें आहे. दक्षिणेकडील टोंकापासून हे ८० मैल होतपर्यंत सह्याद्रि व समुद्र यांचे मधील सर्व पट्टा या जिल्ह्यांत येतो. ऐशीं मैलांचे पलीकडे सुमारें २५ मैलपर्यंत या जिल्ह्याची एक अरुंदशी पट्टी होते. ती समुद्रकिनाऱ्याचे बाजूस असून तिची रुंदी २५ मैलांपासून कमी होत होत पांच मैलांपर्यंत झालेली आहे. अगदीं उत्तरेकडे सुमारें तेरा मैलपर्यंत ठाणें जिल्हा आणि पोर्टुगीज लोकांचा मुलूख व सुरत जिल्हा यांच्यामध्यें काळू व दमणगंगा या दोन नद्या आहेत. पुढें ही मर्यादरेषा पूर्वेस दमणप्रांत व पश्चिमेस ठाणें जिल्हा यांमधून दक्षिणेस सुमारें अठ्ठावीस मैलपर्यंत जाते. नंतर तेथून पूर्वेस वळून ती रेषा सुमारें अठरा मैल गेल्यावर तेथें धरमपूर व नासिक या प्रांतांस जाऊन भिडते. तेथून आग्नेयी दिशेस तळघाटापर्यंत मजल येई तों सुमारें ४५ मैलपर्यंत,ठाणें व नासिक या जिल्ह्यांच्या मर्यादरेषेवर कांहीं मजलपर्यंत,पर्वतांच्या उंचा रांगेत अंजनेरी,त्र्यंबकेश्वर,व हर्ष हे डोंगर आहेत तींतील कांहीं शिखरें मधून मधून आहेत. पुढें या दोन जिल्ह्यांमध्यें ठळक अशी मर्यादा कांहींच नाहीं.

त्यामुळें मोखाडें पेठ्याचा पूर्वेकडील भाग आणि नासिक जिल्ह्याचा पश्चिमेकडील भाग हे दोन प्रदेश बहुतेक समान सपाटीवरच असल्यासारखे आहेत. तळघाटापासून सुमारें ६० मैलपर्यंत आग्नेयी दिशेस, व तेथून सुमारें ४० मैलपर्यंत नैर्ऋत्य दिशेस, एका बाजूस ठाणें जिल्हा आणि दुसरे बाजूस नासिक, अहमदनगर, व पुणें हे जिल्हे, यांच्या दरम्यान सह्याद्रि आहे. दक्षिणेस ठाणें जिल्हा आणि कुलाबा जिल्ह्यांतील पेणतालुका यांच्या मधील मर्यादरेषा, बोरघाटापासून निघून वायव्येस सुमारें अठरा मैल गेल्यावर, पाताळगंगा नदीला भिडते. तेथून त्या नदीच्या दक्षिणेस दोन पासून चार मैलपर्यंत अंतरावरून पश्चिमेकडे सुमारें दहा मैल गेल्यावर ही मर्यादरेषा समुद्राला मिळते. पश्चिमेस मुंबईबंदराच्या दक्षिणबाजूपासून वसईपर्यंत समुद्रकिनाऱ्याची पट्टी एका मोठ्या अखाताच्या योगानें विभागलेली आहे. हें आखात कुलाबा जिल्ह्यांतील अलिबाग गांवापासून वसईपर्यंत पसरलेलें आहे. याची लांबी तीस मैलांवर असून रुंदी सहापासून पंधरा मैलपर्यंत आहे. उरण, शेवेन्हावें, घारापुरी, मुंबई, व साष्टी हीं बेटें याच आखातांत आहेत. वसईपासून उत्तरेस डहाणूपर्यंत ठाणें जिल्ह्याचा समुद्रकिनारा वैतरणानदीच्या मुखाखेरीज इतर ठिकाणीं विच्छिन्न झालेला नाहीं. पुढें डहाणूपासून दमणगंगेपर्यंतचा समुद्रकिनारा ईशान्येकडे हळु हळु वळलेला आहे. या वर सांगितलेल्या सीमांमधील सर्व जमिनीचा समावेश ठाणें जिल्ह्यांत होतो. तथापि, उत्तरेकडील भागांतील एक सुमारें ५०० चौरस मैलांचा, व एक सुमारें तीस चौरस मैलांचा, असे दोन प्रदेश मिळून जव्हारसंस्थान बनतें, ते दोन प्रदेश मात्र, या ठाणें जिल्ह्यात घ्यावयाचे नाहींत.

तालुके—दिवाणी, फौजदारी, व मुलकी काम यथास्थित चालावें म्हणून या जिल्ह्याचे अकरा* तालुके केले आहेत. प्रत्येक तालुक्यांत सरासरीच्या मानानें ३८० चौरस मैल जमीन, २०० गांवें, व ८१८०० लोकवस्ति आहे. या तालुक्यांची विशेष कच्ची माहिती पुढील कोष्टकावरून समजेल:—

* हें वर्णन लिहिलें तेव्हां पनवेल तालुका ठाणें जिल्ह्यांत होता. पुढें तो इ. स. १८८२ त कुलाबा जिल्ह्याकडे दिला.

## तालुक्यांची कची माहिती इ. स. १८८०.

| नांव. | क्षेत्रफळ. | गांवें: सरकारी: गांवें: वसलेलीं | सरकारी: गांवें: ओसाड | सरकारी: पाडे: वसलेले | सरकारी: पाडे: ओसाड | आपली मालकी सोडून रयतेला सरकारानें दिलेली: गांवें: वसलेलीं | गांवें: ओसाड | पाडे: वसलेले | पाडे: ओसाड | एकूण गांवें: सरकारी | एकूण गांवें: रयतेला दिलेलीं. | एकंदर | सन १८८१ त लोकसंख्या | दरचौरस मैलास लोकसंख्या | जमिनीचे साऱ्याचें उत्पन्न रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| डाहाणू. | ६४३ | २१२ | .. | ६४६ | .. | .. | .. | .. | .. | २१२ | .. | २१२ | १०८६९५ | १६९ | १२६८४० |
| माहीम. | ४१९ | १८५ | ५ | १०५ | .. | ३ | .. | .. | .. | १९० | ३ | १९३ | ७६८८९ | १८३ | ११७६५० |
| वाडें. | ३०९ | १४३ | ११ | ४८ | .. | १३ | .. | ९ | .. | १५४ | १३ | १६७ | ३६४९७ | ११८ | ४८९५० |
| वसई. | २२१ | ८८ | .. | ६६ | .. | ४ | .. | .. | .. | ८८ | ४ | ९२ | ६८६५८ | ३११ | १२६७१० |
| भिवंडी. | २५० | १८५ | ७ | ७९ | .. | ९ | .. | १४ | .. | १९२ | ९ | २०१ | ७५०९२ | ३०० | १३९२५० |
| शहापूर. | ८७० | २६१ | ११ | ४५८ | .. | १० | .. | १७ | .. | २७२ | १० | २८२ | १०७१४० | १२३ | ११९९५० |
| साष्टी. | २४१ | ८५ | १८ | ९० | .. | २८ | ९ | ३९ | .. | १०३ | ३७ | १४० | १०७२१९ | ४४५ | १५३३०० |
| कल्याण | २७८ | २१० | ११ | १५३ | .. | १३ | २ | ६ | .. | २२१ | १५ | २३६ | ७७६५८ | २७९ | १३९०६० |
| मुरबाड | ३५१ | १६९ | १ | १३५ | .. | ३ | .. | ४ | .. | १७० | ३ | १७३ | ६३९३२ | १८२ | ९०६०० |
| पनवेल. | ३०७ | १८६ | ५२ | ११३ | .. | ३१ | ९ | १४ | .. | २३८ | ४० | २७८ | ९८४६६ | ३२१ | १९८१४० |
| करजत. | ३५३ | २५७ | १७ | १७८ | .. | १३ | १ | १६ | .. | २७४ | १४ | २८८ | ८०१०५ | २२७ | १२०६१० |
| एकूण. | ४२४२ | १९८१ | १३३ | २१७१ | .. | १२७ | २१ | १९९ | .. | २११४ | १४८ | २२६२ | ९००२७१ | २१२ | १३८१०७० |

किनारा—किनाऱ्याचा भाग ह्मणचे खालाटीचा पट्टा व किनाऱ्यापासून दूर असणारा भाग ह्मणजे वलाटीचा पट्टा असे दोन विभाग केल्यानें ठाणें जिल्ह्याचें वर्णन करण्यास फारच सोईचार पडेल, ह्मणून तसें

करून वर्णन करितों. तसेंच खालाटीच्या पट्टयाचेही दोन विभाग स्वभावत:च झालेले आहेत. वैतरणा नदीच्या उत्तरेकडचा एक व तिच्या दक्षिणेकडचा एक. कुलाबा जिल्ह्याच्या उत्तर सीमेपासून वसईपर्यंत वैतरणेच्या दक्षिणेकडील खालाटीच्या पट्टयांत जें अखात हल्लीं पसरलेलें आहे तें थोड्या काळापूर्वी हल्लीं पेक्षां अधिक रुंद होतें. हल्लीं ठाण्या जवळची खाडी ज्या दलदलीमधून जाते तेथें, व भिवंडी आणि कल्याण यांचे लगत्याची जी जमीन सांप्रत भरतीचे पाण्यानें अर्धवट भिजते तेथें, पूर्वी समुद्राचें पाणी चांगलें खेळत असे असें दिसतें. यामुळेंच, इद्रिसी या मुशाफरानें, ठाणें गांव एका मोठया आखाताचे कांठावर असून त्या आखातांत गलबतें नांगरतात आणि तेथून तीं हाकारून बाहेर जातात असें इ. स. ११५३ त लिहिलें, तें बहुतेक अंशीं बरोबर असावेंसें दिसतें. अगदीं आलीकडे, ह्मणजे इ. स. १८०८ त, साष्टीबेटांत खुदसाष्टी, तुर्भे, जुहू, वेसावें, मोर्वें, धारावी, व रायमुर्धें अशीं सात वेगळीं बेटें होतीं. हीं पूर्वी बेटें होतीं याबद्दलच्या खाणाखुणा अजूनही लक्षांत येतात. तरी हल्लीं वायव्येकडील धारावी बेटांत जाण्यास मात्र होडीची गरज लागते. बाकीच्या साहांत पायवाटेनें जातां येतें. या प्रमाणेंच सांप्रतच्या मुंबईबेटाच्या बऱ्याच भागांत नुकतीं नुकतीं पुष्कळ लहान लहान बेटें होतीं. तसाच, बिशप हीबरच्या मुशाफरीचे वेळीं, ह्मणजे इ. स. १८२५ त, वसई व तिच्या आसपासचीं वैतरणेकडच्या बाजूचीं दोनतीन मैलांतील गांवें मिळून, एक वसईबेट या नांवानें मोडणारा प्रदेश होता. ज्या जलाशयाच्या योगानें वसईच्या आसपासची ही किनाऱ्याची चिरटी मुख्य जमिनीपासून वेगळी होऊन बेट झालेली होती, तो सांप्रत दक्षिणेकडे वसईच्या रेलवेच्या पुलाच्या पूर्वबाजूपर्यंत पसरलेला आहे. रेलवेच्या पुलाजवळ माणिकपूर स्टेशनपर्यंत ह्या जलाशयांत वीस टन ओझें मावणाऱ्या होडया जातात. ज्या खाडीवर बोळिंज व सोपारें हीं गांवें हल्लीं आहेत, आणि जी खाडी वैतरणा नदीस मिळते, ती खाडी व हा जलाशय हीं पूर्वी एका खोल खाडीनें जोडलेलीं होतीं. ह्या जलाशयाच्या दक्षिणेस व्यापाराचें प्राचीन पीठ सोपारें हें असल्यामुळें, या सर्व जलाशयाला सोपाऱ्याची खाडी हेंच नांव प्राप्त झालेलें आहे. वसईच्या

ईशान्येस दाहा बारा मैलांवर तुंगारचा डोंगर आहे तेथून, व मुंबईच्या बंदरांत उरण गांव आहे तेथून, पाहिलें तर अमावास्यापूर्णिमेच्या सुमारास मोठी भरती येते तेंव्हां, किती मोठया प्रदेशावर समुद्राचें पाणी खेळूं लागतें,व त्या वेळीं समुद्राकिनाऱ्यावरील सगळ्या भातजमिनीच्या पट्टयांत जिकडे तिकडे खाऱ्या पाण्याचे पाट कसे वहात असतात, हें अजूनही दिसून येतें.जमिनीच्या स्वरूपाकडे पाहिलें असतां,पहाणाराची अशी खातरी होऊन जाते कीं, वसईच्या खाडीची जी शाखा पूर्वी भिवंडीपर्यंत गेलेली होती तिच्या योगानें, व सांप्रत कल्याणाकडून जी खाडी येते तिच्या योगानें, ह्या प्रदेशाच्या उत्तरेकडील पट्टयांत पूर्वीं बेटें बनलेलीं होतीं, आणि सांप्रत तुर्भ्यापासून ठाण्यापर्यंत जी खाडी जात आहे, ती पूर्वीं फारच रुंद अशा समुद्राच्या फांट्यासारखी होती. तशीच,दक्षिणेकडे ठाण्याच्या खाडीच्या पूर्वेस जो परसिक नांवाचा डोंगर आहे तो, पनवेली पासून कल्याणपर्यंत जाणाऱ्या लहानशा खाडीच्या योगानें,पूर्वीं जमिनीपासून वेगळा झालेला होता,अशीही खातरी होते.तसेंच हल्लीं तुर्भे व करंजे हीं बेटें आणि मुख्य जमीन यांमध्यें दलदल आहे तेथें पूर्वीं पाणी खेळत होतें असेंही दिसून येतें.जमिनीच्या स्वरूपांत झालेल्या ह्या फेरफारांपैकीं पुष्कळ फेरफार,मनुष्यांनीं कृतीनें सखल जमीन उंच केल्या-मुळें, झालेले आहेत.तथापि,ज्यांत पुष्कळ माती आहे अशा ह्या आखाताच्या पाण्यांतीलगाळ जमिनीवर सतत बसतगेल्यामुळें,मनुष्यांना याप्रमाणें सखल जमीन उंच करतां आली,हीगोष्ट विसरतां कामानये.खालाटीच्या दक्षिणेक-डील प्रदेशांत करंजें,घारापुरी,व तुर्भे हीं डोंगरी बेटें असूनत्यांचे उतरणींवर ताड व झाडझुडपें आहेत आणि त्यांच्या सभोंवतीं तिवरांच्या झुडपांचे पट्टे आहेत.त्यांच्याकडे पाहिल्यानें दलदलीचे प्रदेश,मिठागर,आणि ज्यांत झाड-झाड नाहीं अशीं उघडीं बोडकीं भातशेतें,यांच्यापासून उत्पन्न होणारा वीट नष्ट होतो. खेरीज ह्या डोंगरी बेटांवरून चोहोंकडचा अति रमणीय देखावाही दिसतो. पुढें उत्तरेस ठाण्यापासून वसईकडे जाणारी खाडी झाडांनीं आच्छादिलेल्या खडबडीत डोंगरांमधून वळणावळणांनीं गेलेली आहे. ती सदोदित चित्रविचित्र दिसत असते. सपटेंबर व आकटोबर या दोन महिन्यांत तर हा प्रदेश आपल्या सौंदर्यानें मनुष्याला अतिशय

आश्चर्यभरित करितो. कारण, त्या वेळीं, डोंगरांच्या उतरणींवर पायथ्यापासून शिखरापर्यंत हिरव्या गवताचें आच्छादन असतें; त्यांच्यावरून वहाणाऱ्या ओढ्यांत रुप्यासारखें स्वच्छ पाणी वहात असतें; कुंपणांवरून सुंदर वेली चढलेल्या असतात; आणि झाडांना पुष्कळ चित्रविचित्र पालवी आलेली असते.

वैतरणा नदीचें पात्र रुंद असून अति रम्य आहे. ह्या वैतरणेचे उत्तरेकडील प्रदेशाचा समुद्रकिनारा सपाट आहे. त्यांत चिखलट दलदलींमधून लांबपर्यंत गेलेले वाळवेचे पट्टे आहेत, नद्या ओढ्यां सारख्या लहान आहेत, व खाड्या लहान असून त्यांची लांबी दहा मैलांहून अधिक नाहीं. समुद्राच्या सपाटीहून किंचित् उंच अशा ह्या किनाऱ्यानवळच्या प्रदेशांत मधूनमधून खाऱ्या दलदली असून, तो पूर्वेस डोंगरांच्या पायथ्यापर्यंत पसरलेला आहे. ह्या प्रदेशांत जिकडे तिकडे ताडाचीं झाडें आहेत. ज्या डोंगरांच्या पायथ्यापर्यंत हा प्रदेश पसरलेला आहे ते बरेच उंच असून जवळचअसल्यामुळें, आणि त्यांचा देखावा चित्रविचित्र असल्यामुळें, आसपासच्या सपाट प्रदेशाचा उघडेबोडकेपणा बराच झांकला जातो. सर्व किनाराभर व विशेषतः वसईच्याजवळ असणारीं गांवें समृद्ध व पुष्कळ वस्तीचीं आहेत. पुष्कळ गांवांच्या अजुबाजूस बऱ्याच अंतरावर ओसाड खाऱ्या दलदली आहेत. तसेंच नवीन साध्य केलेले जमिनीचे, विशोभित दिसणारे, तुकडेही आहेत त्यांचे मधून खाऱ्या पाण्याचीं खोल डबकीं आहेत. या सर्वांच्या भोंवतीं निर्वृक्ष व सपाट अशीं मोठमोठीं भातशेतें आहेत, त्यांचे मधून, चिखलाचे सखल बांध असतात. वर्षांतून बरेच महिने पर्यंत ह्या शेतांत नांगर फिरत नाहीं व कांहीं पीकही होत नाहीं. गांवाला अगदीं लागून ताडाचे बाग, उंसाचे मळे, आणि सुपारीचे किंवा फळफळावळीचे बाग असतात आणि त्यांचे सभोंवतीं उंच उंच कुंपणी असतात. खुद्द गांवांत झाडांची छाया चांगली असते. कित्येक गांवांत तळीं आहेत त्यांचे सभोंवतीं मोठमोठीं झाडें आहेत. पावसाळ्यांत व हिंवाळ्यांत ह्या तळ्यांत कमळें असल्यामुळें तीं फारच रमणीय दिसतात.

वलाठीचा पट्टा—या पट्टयांत पाण्याची व वनाची समृद्धि आहे. ईशान्येकडील प्रदेशांत डोंगरांच्या उंचवटयांवर विस्तीर्ण पठारें आहेत. इतर ठिकाणीं या पट्टयांत सलल अशा सपाटीवर भातशेतें जिकडे तिकडे असून, त्यांचे मधून मधून डोंगरांच्या ठळक ठळक रांगा आहेत. या पट्टयां-तील दक्षिणेकडचे तालुक्यांत कांहीं उंच डोंगरांच्या रांगा आहेत, तरी जिकडे तिकडे सपाट जमिनीवर शेतें असून झाडेंझुडपें मुळींच नसल्यामुळें, या जिल्ह्याच्या इतर भागांपेक्षां हा भाग अधिक उघडाबोडका व कमी रमणीय दिसतो. मुरबाड तालुका व कल्याण तालुक्याचा पूर्वभाग यांतील लहान लहान डोंगर आणि मोठमोठया डोंगरांच्या रांगा यांच्या पायथ्याजवळच्या उत्तरणींवर सागाच्या रानाचें उत्तम आच्छादन आहे. तसेंच मलंगगड डोंगराच्या घळींतून निरंतर हिरव्यागार असणाऱ्या झाडांच्या राया आहेत. मुंबई बेटाच्या किनाऱ्यापासून पूर्वेकडे दूर असणाऱ्या या वलाठीच्या पट्टयांत ह्मणजे, साष्टी तालुका व सह्याद्रीच्या लगताचा प्रदेश, यांत शेतजमीन व झाडझुडपांचे प्रदेश यांची मिसळ असल्यामुळें, तो भाग अतिशय मनोहर झालेला आहे. या प्रदेशांत जिकडे तिकडे लहान लहान झुडपें फार दाट व विपुल आहेत. या झुडपांनीं व्याप-लेले प्रदेश जरी फार विस्तृत नाहींत तरी चिंच, करंज, व ताड हीं, या प्रदेशांत सर्वत्र होणारीं झाडें, यांचें सौंदर्य अप्रतिम आहे. या प्रदेशांत जिकडे तिकडे पाण्याचे ओढे पुष्कळ असून, त्यांत हिंवाळा संपेपर्यंत पाणी पुष्कळ असतें. सपाट जमिनीवर मधून मधून जे डोंगर आहेत ते सर्वत्र भव्य असून, त्यांच्यावर झाडांचें उत्तम आच्छादन असतें. जेथें, डोंगराचा काळ्या दगडाचा कड्या भिंतीसारखा उभा अस-ल्यामुळें, माती धरत नाहीं तेथें मात्र झाडें नसतात. पावसाळ्यांत सह्याद्रीच्या पायथ्याजवळचा प्रदेश विशेष रम्य दिसतो. या प्रदेशांत उभें राहून पाहाणाऱ्याला आसपास जिकडे तिकडे निवडुंगाच्या झाडां-मधून कळलावीनामक झाडाच्या सुंदर फांद्या दिसतात. पलीकडे फारच हिरवींगार अशीं भातशेतें असून, मधून मधून पाण्याचीं डबकीं किंवा काळा कातळ असतो. त्याच्या पलीकडे शेतें, झाडें, किंवा गवतानें आच्छादलेले उंचवटे असतात. आणि सर्वांच्या मागें जे

डोंगर दिसतात त्यांजवर पाण्यानें भरलेले व त्यामुळें जड झालेले ढग, किंवा सोन्यासारखी पिंवळी व चमकणारी चार दृष्टीस पडते.

वाडे तालुक्याचा आग्नेय भाग, भिवंडी तालुक्याचा वायव्य भाग, माहीम तालुक्याचा मधला भाग, आणि वसई तालुक्याचा कांहीं भाग, यांत सुपीक भात जमीन असून झाडीही चांगली आहे. या शेत जमिनीची लागवड कुणबी लोक करितात. हे शेतकरी उत्तम रीतीनें बांधलेल्या आपापल्या घरांत मोठ्या सुखानें दिवस घालवितात. या प्रदेशाखेरीज साष्टी तालुक्याच्या उत्तरेकडचा, व बडोदा रेलवेच्या पूर्वेकडचा, प्रांत यांत प्राय: अखंड अरण्य आहे. मधून मधून मात्र रान तोडून लागवड करण्याकरितां जमिनीचे तुकडे तयार केलेले असतात. या प्रदेशांतले डोंगर, व त्यांमधील खिंडी, यांत दाट झुडुपें व लहान लहान झाडें यांचें रान आहे. झाडी तोडून लागवड करण्याकरितां तयार केलेल्या जमिनीच्या बहुतेक भागांत कनिष्ठ प्रतीचीं धान्यें मात्र होतात. तांदूळ पिकण्यास योग्य अशी जमीन फारच थोडी. या प्रदेशांत सडका नाहींत. एथील लोक मुख्यत्वेंकरून अर्धवट रानटी आहेत. ते परस्परांपासून दूर असलेल्या पाड्यांत राहातात. त्यांच्यांत स्थायिकपणा नाहीं. या जिल्ह्याच्या या पट्ट्याच्या उत्तरेकडच्या टोंकाकडील दहा मैलांच्या पट्ट्यांतील जमीन अधिक सपाट आहे, व तेथें माती जमिनीच्या पृष्ठभागापासून अधिक खोलपर्यंत असून, जमीन कमी खडकाळ आहे. एथें इमारतीच्या उपयोगीं पडणारीं झाडें फार उत्तम असून, मोहाचीं झाडेंही फार आहेत. दक्षिणेकडच्या प्रदेशांतील रानटी लोकांसारखेच एथील रानटी लोक स्थायिकपणाच्या मानानें असून, त्यांची जमिनीची लागवड करण्याची व संसाराची पद्धत ही दक्षिणेकडील रानटी लोकांप्रमाणेंच आहे. या जिल्ह्याच्या ईशान्येकडील डोंगरपठारांवर, जव्हारसंस्थानाचा पुष्कळ प्रदेश, सगळा मोखाडें पेटा, व पेंठसंस्थान, इतके प्रांत आहेत. पेंठसंस्थान जरी सरकारी कामाच्यासंबंधानें नासिक जिल्ह्यांत आहे तरी, भूगोलाच्या स्वभावसिद्ध विभागांकडे पाहिलें तर, त्याचा समावेश ठाणें जिल्ह्यांतच होतो. समुद्राचे सपाटीपासून ह्या डोंगरपठाराची उंची १५०० फूट आहे. येथील जमीन भिकारी आहे. मधून मधून दाट झाडीनें आच्छादिलेल्या खिंडी

आहेत त्यांमधून सह्याद्रींत उत्पन्न होणाऱ्या नद्या पश्चिमेकडे मोठ्या जोरानें वाहातात. कोंकणांतले सखल प्रदेश व घाटावरचे उंच प्रदेश यांचेमध्यें हीं पठारें शिडीच्या खालच्या व वरच्या अशा दोन पायऱ्यांमधील पायरीसारखीं आहेत. या पठारांवरची हवा थोडीशी अधिक ताजी व कमी ओलसर आहे; याशिवाय हीं पठारें व या जिल्ह्यांतील इतर प्रदेश यांत फारसा फरक नाहीं.

पर्वत—तळघाटापासून ठाणेजिल्ह्याचे दक्षिणेकडील टोंकापर्यंत सह्याद्रि हा ठाणेजिल्ह्याची एक अखंड मर्यादा झालेला आहे. हा पर्वत चित्रविचित्र व नतोन्नत असून ठाणेजिल्ह्याचें मुख्य भूषण आहे. या पर्वताचा पायथा कोंकणांत असून शिखरें घाटावरील मुलखांत ह्मणजे दक्षिणेंत आहेत. तळघाटाचे उत्तरेस ठाणें व नासिक या दोन जिल्ह्यांच्या सीमेवर पर्वतासारखा चांगला ध्यानांत राहाण्याजोगा पदार्थ नाहीं. मोखाडें पेठ्याच्या समोर दोन उंच डोंगर आहेत. त्यांपैकीं एकाचें नांव वाटवद असें आहे. दुसरा त्याच्यापासून सुमारें एक मैलावर दक्षिणेस आहे त्याचें नांव वासगड असें आहे. अंजनेरी व त्र्यंबकेश्वर हे डोंगर ज्या ओळींत आहेत तिचे पश्चिमेकडील टोंकाला हा वासगड आहे. सदर्हू अंजनेरी व त्र्यंबकेश्वर या डोंगरांच्या रांगेपासून पश्चिमेस डोंगराचा एक फांटा गेला आहे. दमणगंगा व वैतरणा यांचेमधील पाणलोट हा याच डोंगराच्या योगानें बनलेला आहे. वासगडाच्या उत्तरेस त्र्यंबकेश्वरास जाण्याचा आंबोलीचा घाट आहे, आणि दक्षिणेस दोन मैलांवर चंद्र्याची मेट व हुंबाची मेट असे दोन घाट आहेत. पुढें मोखाडें पेट्यातील खोडाळ्यासमोर शिरघाट आहे. पुढें वैतरणेच्या खिंडीमुळें या डोंगराच्या ओळीला खंड पडली आहे. या खिंडीच्या मागें वालविहीर नांवाचा उंच डोंगर इगतपुरीजवळ आहे. वैतरणेच्या दक्षिणेस, व तळघाटाच्या रिव्हालिंग स्टेशनाच्या उत्तरेस, बळवंतगड ह्मणून किल्ला आहे. या बळवंतगडापासून ठाणेजिल्ह्याच्या दक्षिण टोंकापर्यंत पूर्वेकडील सीमेवर वाकड्या रेषेनें सह्याद्रि असून त्याचेपासून मधून मधून अरुंद व वांकडे तिकडे असे फांटे फार दूरपर्यंत कोंकणांतील सपाट प्रदेशांत गेलेले आहेत.

बळवंतगडापासून सुमारें चाळीस मैलपर्यंत हा सह्याद्रि आग्नेयीकडे गेलेला आहे. आणि तेथून सुमारें साठ मैलपर्यंत नैर्ऋत्य दिशेकडे वळला आहे. सह्याद्रि हा एका मोठ्या भक्कम भिंतीसारखा असून त्याची उंची २००० पासून ३००० फुटींपर्यंत आहे. या पर्वताच्या उभ्या व काळ्या सुळक्यांचे मधून मधून गवत व रान यांनीं आच्छादिलेलीं अरुंद पटांगणें आहेत. कित्येक ठिकाणीं या पर्वताचीं शिखरें माथ्याचे सपाटीपासून १००० पासून १५०० फुटींपर्यंत उंच आहेत. तळघाटाचे पायथ्याशीं कासारें ह्मणून गांव आहे. तेथून आग्नेयी दिशेस वाघाचें पठार ह्मणून सपाट माथ्याचा एक मोठा डोंगर आहे. या पठारावर नरसाळ्यासारखें एक शिखर आहे. त्याला 'कळसूबाई' ह्मणतात. त्याचे दक्षिणेस अलंग व कुलंग ह्मणून दोन डोंगर आहेत. ते कळसूबाई इतके अणकुचीदार नाहींत. या डोंगरांवर जाण्याला पुष्कळ घाट आहेत. वाघाच्या पठाराच्या किंचित् उत्तरेस पिंपरीचा घाट आहे. त्या घाटांतून पिंपरी येथील सद्रुद्दीन नांवाच्या पिराला येण्याची वाट आहे. त्याचे दक्षिणेस मांढ्यांचा व चोंढ्याचा असे दोन घाट आहेत त्यांतून कळसूबाई आणि अलंग व कुलंग या डोंगरांकडे जाण्याच्या वाटा आहेत. कांहींसें ठेंगणें व शंकूच्या आकाराचे जें एक या पर्वताचें चमत्कारिक शिखर आहे त्याला 'भवानी' असें ह्मणतात. भवानीच्या पलीकडे जेथें शहापूर व मुरबाड हे तालुके एकमेकांस भिडतात तेथें अजापर्वत ह्मणून एक मोठा डोंगर आहे. कासाऱ्यापासून हें शिखर अतिदूर आहे. एथपर्यंत सह्याद्रीच्या रेखेचा कल किंचित् आग्नेयीकडे आहे. अजापर्वतापासून हरिश्चंद्रगड व माळशेजघाट यांचे पावेतों जाईपर्यंत सह्याद्रीचा कल आग्नेयीकडे विशेष आहे. माळशेजघाटापासून नाणेघाटापर्यंत सह्याद्रीचा कल पश्चिमेकडे आहे. नाणेघाट हा भैरवगडाच्या दक्षिणेस व जीवधनगडाच्या उत्तरेस आहे. नाणेघाटापासून पालूगांवीं जाण्याच्या आंबोली घाटापर्यंत पांच मैल पावेतों सह्याद्रीची रेखा दक्षिणेस जाते. या आंबोलीघाटापासून नैर्ऋत्येस सुमारें दोन मैल अंतरावर, सुमारें तिसरा हिस्सा चढण झाली ह्मणजे,

एक कोरीव लेणें लागतें त्याला गणपतिगड असें ह्मणतात. या गणपतिगडापासून पुणें जिल्ह्यांतील जुन्नरपर्यंत जाण्याकरितां भुयारांतून वाट आहे असे लोक ह्मणतात. या लेण्याच्या दक्षिणेस सुमारें दोन मैलांवर एका खोल खिंडींत खोपवलीघाट ऊर्फ डोणघाट ह्मणून आहे. या घाटानें गुरांना जातां येत नाहीं. याच्याच जवळ त्रिगदरा घाट ह्मणून आहे त्यांतून बिन ओझ्याच्या माणसांना मात्र जातां येतें. एथून सह्याद्रीची रेखा, मच्छिंद्रनाथ, गोरखनाथ, व नेमिनाथ, या नांवांच्या तीन चमत्कारिक शंकूच्या आकाराच्या डोंगरांपर्यंत, किंचित् नैर्ऋत्येस जाते. या तिहींपैकीं मधला डोंगर गोरखनाथ उर्फ गोरखगड याची तट बांधून मजबुती केलेली आहे. या गडावर सुमारें चवदा जलाशय व एक कोरीव लेणें आहे. या लेण्यांत जाण्याकरितां पायऱ्या बांधिलेल्या आहेत त्या उभ्या सुळासारख्या असून हल्लीं झडलेल्या आहेत. याच्या उत्तरेस मच्छिंद्रनाथ डोंगर आहे त्यावर चढतां येत नाहीं. पलीकडे दक्षिणेस आवपाघाट व शितगड आहे. हा शितगड तट बांधून मजबूद केलेला असून तो एका उंचशा पठारावर आहे, त्याच्या जवळच एक पायवाट आहे. ह्या वाटेनें दक्षिणेस पांच मैल गेलें ह्मणजे भीमाशंकराचा डोंगर लागतो. पुढें मुरबाड व करजत यांचे मधील डोंगराच्या पलीकडे रणशील ह्मणून दुसरा घाट आहे. त्यांतनही भीमाशंकरास जाण्याची वाट आहे. ह्याच्या जवळच कोंकणांत जाणाऱ्या एका डोंगराच्या फांट्यावर एक चमत्कारिक शिखर आहे त्याला तुंगी असें ह्मणतात. चिंचवली जवळून आगगाडींतून जातांना या शिखराचें अग्र दिसतें. त्याचे दक्षिणेस सावळ्याचा घाट व कुसुरघाट हे आहेत. सावळ्याजवळ सह्याद्रीची रेखा विच्छिन्न झालेली आहे, तेथें कोथळीगड ह्मणून एक किल्ला आहे. हा नेरळ किंवा चिंचवली एथून दिसतो. ह्या किल्ल्याच्या दक्षिणेस करजतच्या रेलवे स्टेशनाजवळ ढाक ह्मणून एक अर्धवट बांधलेला किल्ला आहे. सह्याद्रीची मुख्य रांग व हा किल्ला यांचेमध्यें थोडासा खळगा आहे. त्यांचे मध्यें जी मोठी खिंड आहे तिला कातळदरा ह्मणतात. ढाक व खंडाळें यांचे मध्यें जी मोठी खिंड आहे तिला कातळदरा ह्मणतात. ह्या कातळदऱ्याजवळच कोंडाण्याचीं कोरीव लेणीं व

कोंकणदरवाजा नांवाचा घाट डोंगरांत आहे. ह्या मोठ्या खिंडीच्या पलीकडे दुहेरी तटाचा, राजमाची नांवाचा, डोंगरी किल्ला आहे. त्याचे दक्षिणेस ह्या जिल्ह्याचे अगदीं टोंकाला नागफणी नांवाचा डोंगर आहे त्याला युरोपियन लोक ड्यूकाचें नाक ह्मणत असतात.

सह्याद्रीची मुख्य रांग व त्याचे पश्चिमेकडे जाणारे फांटे यांखेरीज सर्व ठाणें जिल्हाभर अरण्यानें आच्छादलेल्या डोंगरांच्या रांगा, व मधून मधून एकेकटे असणाऱ्या डोंगरांचीं रमणीय शिखरें, आढळतात. त्यांपैकीं डोंगरांच्या रांगांचे आंस ह्मणजे हे उत्तरदक्षिण आहेत. ज्या स्वभावसिद्ध शक्तीनें ह्या जिल्ह्याचा इतर भाग सपाट केला, तिचें ज्या बसाल्ट नामक खडकांचे खडकाच्या चिवटपणापुढें कांहीं एक चाललें नाहीं, त्या खडकांचे अवशिष्ट राहिलेले भाग ते ह्या डोंगरांच्या रांगा होत असें दिसतें. भिवंडीच्या वरच्या बाजूस जे डोंगर आहेत त्यांचीही उत्पत्ति अशीच झालेली आहे. सह्याद्रीपासून दूर असणारे हे फांटे व डोंगरांच्या रांगा यांपैकीं ह्यांपैकीं कोणाची ही उंची खुद्द सह्याद्रीहून अधिक नाहीं. या पश्चिमेकडील टकपक [ २६१६ फूट ] व तुंगार [ २३०० ] या नांवाचे डोंगर; दक्षिणेकडील माथेरान [ २५०० फट ] चा डोंगर, व उत्तरेकडील गंभीरगड [२२७०फूट] हे चार डोंगर बाकीच्यांहून उंच आहेत. या जिल्ह्यांतील डोंगरांच्या उंच शिखरांपैकीं बहुतेकांची पूर्वीं तट बांधून मजबुती केलेली होती आणि त्यांपैकीं कांहीं फार मजबूद स्थळें ह्मणून प्रसिद्धही होतीं. परंतु सांप्रत त्यांची तटबंदी मोडकळीस आलेली असल्यामुळें तीं निरुपयोगी झालेलीं आहेत. तथापि ह्या तटबंदीच्या योगानें या डोंगरांचा रमणीयपणा व चित्रविचित्रपणा यांना भर पडलेली आहे. पुष्कळ ठेंगण्या डोंगरांवरही जुने किल्ले आढळतात. तथापि दक्षिण कोंकणाइतके डोंगरी किल्ले या जिल्ह्यांत आढळत नाहींत. याचें कारण असें आहे कीं, डोंगरी किल्ले बांधण्यांत प्रमुख जे मराठे त्यांना रत्नागिरि जिल्ह्याइतका ठाणें जिल्हा हवासा वाटत नसे.

अति खडबडीत असा एक जमिनीचा पट्टा या जिल्ह्यांत आहे. निरनिराळ्या पुष्कळ डोंगरांच्या योगानें या पट्ट्याला इतका खडबडीतपणा आलेला आहे. ह्या पट्ट्याची रुंदी दहापासून वीस मैलपर्यंत असून समुद्र किना-

त्यापासून तीस मैल अंतरावर हा पट्टा दक्षिणोत्तर आहे. ह्या पट्ट्याच्या दक्षिणेक-डील भागांत साष्टीचे डोंगर आहेत आणि ह्या पट्ट्याच्या वसई तालुक्यांतील भागांत कामनदुर्ग ह्मणून [ २१६० फूट ] एक अति उंच डोंगर आहे. ठाणें एथून खाडींतून जलमार्गानें वसईस येऊं लागलें असतां हा कामन-दुर्ग फारच रम्य दिसतो. कामनदुर्गाच्या उत्तरेस तुंगारचा डोंगर आहे. ह्याचा माथा सपाट असून जांभे दगड त्याचेवर फार आहेत. ह्याच्या बाजूंवर झाडी चांगली आहे, परंतु माथ्यावर फारशी नाहीं. निरभ्र दिवशीं ह्या डोंगरावर उभें राहून चोहींकडे नजर दिली तर पश्चिमेकडे समुद्राचे बाजूस फार भव्य देखावा दिसतो, उत्तरेकडे वैतरणानदी दिसते, व दक्षि-णेस वसईची खाडी दिसते. तुंगारचे उत्तरेस डोंगरांचा एक समुदाय आहे. त्यांतील डोंगरांच्या शिखरांत बारोंडा, जीवधन, व निलेमोरा हीं मुख्य आहेत. टकमक डोंगराच्या एका फांद्यावर, तानसानदीच्या पूर्वेस, काला व धामणी हीं दोन डोंगरांचीं शिखरें आहेत. तानसानदीच्या पलीकडे ईशान्य दिशेस उभ्या सुळासारखा काळ्या रंगाचा टकमक [ २६१६ फूट ] डोंगराचा माथा आहे. ह्या डोंगराला दोन शिंगें आहेत. तीं बसाल्ट जातीच्या दगडाचीं असून बारिक अणकुचीदार आहेत. टकमक डोंगर फार उंच असून त्याचीं शिखरें चित्रविचित्र आहेत. तरी, दुसरे डोंगर आड आल्यामुळें, दोन स्थळें खेरीज करून, बाकीचे ठिकाणची या डोंगराची शोभा झांकून गेलेली आहे ह्या पश्चिमेकडील प्रदेशांतील डोंगरांच्या ओळीपासून पूर्वेकडे आठ दहा मैलांचे अंतरावर एक डोंगरांची ओळ उत्तरदक्षिण अशी आहे. हिचा आरंभ भिवंडी एथें होतो व तानसानदीच्या योगानें हिचे दोन विभाग होतात. ही रांग उत्तरेस मनोरपर्यंत गेलेली आहे. भिवंडीच्या उत्तरेस सुमारें आठ मैलांवर वाहारी ह्मणून एक ह्या रांगेंत डोंगर आहे त्याची पश्चिमेकडची चढण सोपी आहे. पुढें एका सखल टेंकाडाचे पलीकडे गोतारा [१८०० फूट] ह्मणून वज्राबाईदेवीच्या वरच्या बाजूस एक मराठ्यांचा जुना किल्ला आहे. त्याचे शिखर अणकुचीदार असून तानसा नदीपर्यंत त्याची उतरण गेलेली आहे ती फारच कठीण आहे. पुढें दहा मैलांवर तानसेच्या पलीकडे मदाली ऊर्फ केल्तान ह्मणून डोंगर आहे. त्याची आकृति व उंची गोताऱ्या इतकीच आहे. टक-

मकचा डोंगर व हा डोंगर यांमध्यें एक अरुंद दरी आहे. ह्या सगळ्या डोंगरांच्या रांगा दक्षिणोत्तर आहेत. ह्यांचे उत्तरेचे टोकाला जोगमंदी ह्मणून एक डोंगराचें शिखर आहे. ह्या डोंगरांच्या रांगांच्या योगानें हरकत आल्यामुळें, वैतरणा नदीचा प्रवाह, पुष्कळ मैलपर्यंत, अधिक उत्तरेकडून गेलेला आहे. रेलवे लाइन व सूर्यानदी यांचेमध्यें पश्चिमेकडचे बाजूस डोंगरांची एक अखंड ओळ उत्तरदक्षिण असून तिची लांबी सुमारें १६ मैल आहे. ह्या रांगेंत कालदुर्ग [ १५५० फूट ] हें मुख्य शिखर आहे. तसेंच ह्या रांगेंत तीन डोंगरी किल्ले आहेत. त्यांपैकीं ह्या रांगेचे दक्षिण टोकाला तांदूळवाडी [१६००फूट] म्हणून एक किल्ला आहे, पालघर रेलवे स्टेशनासमोर कालदुर्ग म्हणून दुसरा किल्ला आहे, आणि बोइसराजवळ आसावें ह्मणून तिसरा किल्ला आहे. ह्यांपैकीं प्रत्येकांत जलाशय असून जुन्या तटबंदीचे अवशेष आहेत. माहीम तालुक्याचे नैर्ऋत्य कोनास पोफळीचा डोंगर आहे त्याला मेघराजाचें घर असें लोक म्हणतात. समुद्राचे किनाऱ्याजवळची डोंगरांची ओळ डहाणू तालुक्यांत वरोळीच्या दक्षिणेस वास्यांपर्यंत गेलेली आहे. ह्या रांगेंत बरड ( १७१६ फूट) ह्मणून एक अति उंच डोंगर आहे. पश्चिमेकडचे बाजूला ह्याची चढण सोपी आहे. परंतु पूर्वेकडील बाजूस ती फार कठीण आहे. ह्या कठीण उतरणीवर मधून मधून पाण्याचीं टांकीं खोदलेलीं आहेत. एथें पूर्वीं लोक रहात होते ह्याची टांकीं हीच काय ती अवशिष्ट राहिलेली खूण आहे. वरोळीच्या उत्तरेस डोंगरांची रांग मुळींच नाहीं. एकेकटे कांहीं डोंगर मात्र आहेत. ते फारसे उंच नाहींत. त्यांपैकीं अगदीं उत्तरेकडचा जो इंद्रगड त्याची उंची ४०५ फूट आहे. डहाणूच्या पूर्वेकडील भागांत मोखाडें व जव्हार ह्यांचे सीमेवर बऱ्याच उंचीचे थोडेसे डोंगर आहेत. त्यांत महालक्ष्मी ऊर्फ मुळगड ( १५४०फूट ),सावें, व गंभीरगड ( २२७०फूट ) हे मुख्य असून ते शंकूसारखे असल्यामुळें चमत्कारिक दिसतात. आणखी पूर्वेकडे गेलें असतां, मनोरच्या ईशान्येस, अर्धवर्तुलाकार पोळें नांवाचीं डोंगराचीं चमत्कारिक शिखरें आहेत. त्यांपैकीं एकाला आडकिल्ला म्हणजे बालेकिल्ला म्हणतात. पलीकडे उत्तरेस एक सपाट माथ्याचा डोंगर आहे त्यावर

असेरीचा प्रसिद्ध किल्ला आहे. मनोरच्या दक्षिणेस सुमारें आठ मैलांवर, आणि कल्याण व टकमक या डोंगरांपासून पाहिलें तर वैतरणेचे पलीकडे दिसणारा, कोहोज ( १९०६ फूट ) नांवाचा एकटाच तटबंदी केलेला डोंगरी किल्ला आहे. मैदानाचे मध्यभागीं हा सुळक्यासारखा उंच गेलेला असल्यामुळें, व ह्याचे माथ्यावर काळ्याथरी खडकांचे दोन घुमट असल्यामुळें, हा कित्येक मैल अंतरावरून फारच चमत्कारिक दिसतो.

वर वर्णन केलेला खडबडीत भाग व सह्याद्रि ह्याचे मधील मुलूख बराच सपाट असून यांत मधून मधून मात्र थोडेसे मोठे डोंगर आहेत. ह्या डोंगरांपैकीं अतिशय पश्चिमेकडे, व वडे तालुक्याच्या दक्षिण प्रदेशांत, दाभोण्याचा डोंगर ह्मणून एक आहे ह्या डोंगराचा खालचा भाग सुळक्यासारखा उभा आहे व वरचा बेताच्या चढणीचा आहे हा पुष्कळ मैल अंतरावरून दिसतो. हा डोंगर व ह्याचे दोन फांटे मिळून एकंदर तीन शिखरें ह्या डोंगरांची दिसतात. वडे तालुक्यांतील लहान डोंगरांपैकीं काहीं पूर्वेकडील प्रदेशांच्या कापरी गांवाजवळ आहेत; व पश्चिमेकडच्या प्रदेशांत इंदगांवचे डोंगर आहेत; आणि आग्नेयीकडील सीमेवर इकूना व डोमकावळा हे डोंगर आहेत. शहापूर स्टेशनच्या वायव्येस महुलीचा डोंगर ह्मणून आहे, तो दाभोण्याचे डोंगराहून अधिक भव्य दिसतो. ह्याचा माथा सपाट असून उंची २००० फूट आहे. मैदानांत एक भक्कम दगडी भिंत बांधल्यासारखा हा डोंगर दिसतो. ह्या डोंगराच्या बाजूंवर झाडी पुष्कळ आहे, परंतु ह्याच्या नामे दगडांच्या माथ्यावर विशेषतः जीं हिरड्यांचीं झाडें आहेत तीं खुरटलेलीं व अगदीं भिकारी आहेत. ह्या डोंगराच्या उत्तरेस भोपटगड ह्मणून एकटाच बराच मोठा डोंगर आहे. ह्या डोंगरावर किल्ला आहे. ह्या किल्ल्यांतून पिंजाळ नदीच्या उत्तरेकडचें कुडूस गांव दिसतें. आसपासच्या उंचवटयाच्या प्रदेशाहून याची उंची ५०० फूट अधिक आहे. पूर्वेकडच्या बाजूस याची चढण पांचशें फूट आहे. परंतु पश्चिमेकडील बाजूकडे याची चढण निदान १५०० फूट तरी असली पाहिजे. कारण भोखाड्याचे पठारापासूनच या बाजूचे चढणीला आरंभ होतो.

वर वर्णिलेल्या सपाट पट्ट्याच्या दक्षिणेकडील प्रदेशांत डोंगर आहेत. पनवेल तालुका डोंगरांनीं अगदीं वेढलेला आहे. ह्या तालुक्याचे पश्चिमेस पारीक डोंगर आहे तो उत्तरेकडे कल्याणचे खाडीपर्यंत गेलेला आहे. पूर्वेकडे व उत्तरेकडे प्रबळ ह्मणून एक डोंगर आहे. हा मोठा भक्कम असून ह्याचा माथा सपाट आहे. एथें पूर्वी एक किल्ला होता. खेरीज पनवेलच्या पूर्वेस व उत्तरेस चंदेरी डोंगरांची वांकडी ओळ आहे. माथेरानच्या लांब व सपाट माथ्यापासून तळवळी व बावा मलंग ऊर्फ मलंग गड ( २४०० फूट ) ह्या चमत्कारिक आकाराच्या डोंगरांपर्यंत ती चंदेरीचे डोंगरांची रांग पसरलेली आहे. आग्नेयी दिशेस सुमारें आठ मैलांवर कल्याण तालुक्यांतील तानसा नदीच्या पलीकडे बदलापुराजवळ मुळडोंगरी ह्मणून डोंगर आहे त्यावर खंडोबाचें देऊळ आहे. पनवेल तालुक्याच्या दक्षिणेकडील प्रदेशांत लांब लांब डोंगराचें फांटे आहेत. ह्या डोंगरांवरून माणिकगड ( १८०० फूट ) किल्ल्यांत जाण्याची वाट आहे. हा माणिकगड सुळ्यासारखा उभा असून ह्याची तटबंदीनें मजबुदी केलेली आहे. दक्षिणेकडचे बाजूनें मात्र या किल्ल्यावर जातां येतें. पाताळगंगेचे पलीकडे करनाळा ह्मणून डोंगर आहे ह्याचें बसाल्ट जातीच्या खडकाचें शिखर खांबासारखें दिसत असल्यामुळें, मुंबईशहरांत सांप्रत हा नरसाळ्याचे आकृतीचा डोंगर, या नांवानें प्रसिद्ध आहे. ह्या डोंगरांच्या चौरस व सपाट अशा माथ्याचे मध्य प्रदेशांत पांडवांचे किल्ले ह्मणून जीं शिखरें आहेत त्यांपैकींच नरसाळ्याचा डोंगर हें एक होय. करजत तालुक्याच्या उत्तरेकडील प्रदेशांत सह्याद्रीपासून पश्चिमेकडे फार दूरपर्यंत लांब लांब डोंगरांच्या ओळी गेलेल्या आहेत. करजत तालुक्याच्या दक्षिणेकडील प्रदेशातल्या खालापूर पेट्यांत मंडप नांवाच्या डोंगरांची ओळ, माणिकगडाचे फांटे, व दुसरे अनेक बऱ्याच उंचीचे डोंगर आहेत.

नद्या—ठाणें जिल्ह्यांतील नद्यांचा उगम सह्याद्रीच्या पश्चिमेकडच्या उतरणीवर होतो. ही उतरण अगदीं उत्तरेस समुद्रापासून ६०

मैलांहून अधिक दूर नाहीं. यामुळें नद्यांचे प्रवाहांना वाहण्यास फार संकुचित प्रदेश मिळाल्या कारणानें, त्यांचीं पात्रें फार मोठीं झालेलीं नाहींत. सगळ्यांच्या प्रवाहांत सारखेपणा फार आहे. सह्याद्रीच्या काळवथरी कड्यांवरून मोठ्या जोरानें त्यांचें पाणी निघतें तें डोंगरांच्या पायथ्याजवळच्या रानांत एके ठिकाणीं जमतें. नंतर खोल व खड-काळ जमिनींतून जाणाऱ्या पात्रांतून तें डोंगरांमधून जातें. सपाट जमिनीवर येऊन पोंचल्यावर त्यांचा प्रवाह पश्चिमाभिमुख होतो. त्यांचे पात्रांचीं तीरें सुळ्यासारखीं उभीं असून त्यांची उंची दहापासून तीस फुटींपर्यंत असते. सपाट जमिनीवरून जातांना मधून मधून खडकाळ प्रदेश व काळवथरी दगडांचा प्रदेश यांवरून त्यांना जावें लागतें. मध्यें डोंगर आड आला तर मात्र, प्रवाहाचें पश्चिमाभिमुखत्व नाहींसें होतें. पावसाळ्यांत ह्या नद्यांत पुष्कळ पाणी असतें, परंतु उन्हाळ्याचे दिवसांत ह्या नद्यांचे प्रवाहांना खंड पडतो तेव्हां मधून मधून मात्र पात्रांत पाण्याचीं डबकीं असतात. समुद्रापासून तीस मैलपर्यंत अंतरावर भरतीच्या पाण्याची व यांचे प्रवाहांची गांठ पडते. तेथून तिवर झाडांनीं आच्छा-दलेल्या खाजणांतून यांचे प्रवाह वळणावळणांनीं चिखलट पात्रांतून जातात. कोठें कोठें ह्या पात्रांतून खडक असतात ते ओहोटीच्या वेळीं पुष्कळ ठिकाणीं उघडे पडतात. भरतीच्यावेळीं ह्या नद्यांतून पांच पासून साठ टन पर्यंत ओझें नेणाऱ्या होड्या तरतात. भरतीच्या पाण्याचा संयोग झाल्यावर ह्या नद्यांच्या स्वरूपांत फारच फरक पडत असल्यामुळें बहुतेक नद्यांच्या गोड्या प्रवाहांना व खाऱ्या प्रवाहांना ह्मणजे खाड्यांना वेगळालीं नांवें असतात.

वैतरणा—वैतरणा नदीच्या योगानें उत्पन्न होणारी खाडी वसई तालुक्याचे उत्तर सीमेवर आहे व उल्हास नदीची खाडी त्या तालुक्याचे दक्षिण सीमेवर आहे. या जिल्ह्याच्या उत्तरेकडील व दक्षिणेकडील प्रदेशांत जे लहान प्रवाह आहेत ते एकीकडे ठेविले तर, या सर्व जिल्ह्यांतील डोंगराचें पाणी वर सांगितलेल्या वैतरणा व उल्हास या दोन नद्यांच्या थड्यांकडे वाहतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ठाणे जिल्ह्यांतील सर्व नद्यांत वैतरणा ही अति मोठी आहे. गोदावरी नदीचा जेथे उगम होतो त्याचे समोर

त्र्यंबकेश्वरचें डोंगरांत नाशकाजवळ इचा उगम आहे. तेथून निघाल्यानंतर कासाऱ्याजवळ विहीगांव म्हणून आहे तेथें हिचा ठाणें जिल्ह्यांत प्रवेश होतो. नंतर तेथून सुमारें सोळा मैलपर्यंत ही नदी दोन उंच डोंगरांच्या मधील खोल घळींतून पश्चिमाभिमुख वहाते. पुढें वाडे तालुक्याच्या पूर्व सीमेवरील कळंभे गांवापासून सुमारें वीस मैलपर्यंत ही बऱ्याच सपाट प्रदेशांतून पश्चिमाभिमुख वहात जाते ती गोऱ्हें गांवच्या प्राचीन वस्तीजवळ पोंचल्यावर टकमक नामक डोंगराच्या ओळीच्या फांट्याचे योगानें मनोर गांवापर्यंत तिचा प्रवाह उत्तरेस सुमारें दहा मैल जातो. मनोरपासून दोन मैल होण्यापूर्वींच भरतीचे पाण्याशीं व इच्या प्रवाहाची गांठ पडते. शंभर खंडीचीं गलबतें मनोरपर्यंत येतात. मनोर गांवाजवळ टकमक डोंगराच्या अगदीं उत्तरेकडच्या फांट्याला वळसा घालून सुमारें सहा मैलपर्यंत ही नैऋत्येस जाते. पुढें सुमारें आठ मैलपर्यंत दक्षिणेस जाऊन नंतर एकदम उत्तरेकडे वळते आणि अखेरीस सात आठ मैल पश्चिमाभिमुख होऊन आगाशीजवळ समुद्राला मिळते. शेवटचे वीस मैलपर्यंत फारच रमणीय प्रदेशांतून वैतरणेचा प्रवाह जातो. या प्रदेशांत तिचें पात्र रुंद असून पुष्कळ ठिकाणीं तें फार खोलही आहे.

वैतरणेला मिळणाऱ्या मुख्य नद्यांपैकीं उत्तरेकडून येणारी ऊं पिंजाळ ही येते. मोखाडे पेट्यांतील नाशेरगांवाजवळ हिचा उगम असून वाडे तालुक्यांतील अलमानगांवाजवळ ही वैतरणेला मिळते. जव्हारसंस्थान व ठाणें जिल्हा यांचेमधील सीमेवर हिच्या ओघाचा पुष्कळ भाग आहे. वैतरणेकडे जात असतां वाटेत अलमानच्या ईशान्येस सुमारें दहा मैलांवर येणाऱ्या डावीकडून येऊन लोहाणी नदी मिळते. ही लोहाणी नदी उवळें व सेंद या गांवांजवळून जाते. पश्चिमेस सुमारें बारा मैलांवर काजगांवाजवळ मनोर गांवाच्या वरच्या बाजूस आग्नेयी दिशेस देहेर्जा नदी, जव्हारपासून सुमारें २९ मैलपर्यंत नैऋत्येस वहात गेल्यावर, वैतरणेला मिळते. पुढें आठ मैलांवर खामलोळीगांवाजवळ, गंभीरगडापासून सुमारें ३० मैलपर्यंत जव्हार संस्थान, डहाणू तालुका, व माहिमतालुक्यांतील शिरपेटा या मधून वहात गेल्यावर, सूर्यानदी वैतरणेला मिळते. चिंचोरें गांवाजवळ

उजवेकडचे बाजूस उत्तरेकडून येणारी सुसारीनदी सूर्यानदीला मिळते. डावेकडचे बाजूस तानसा ही एकटीच नदी वैतरणेला मिळते. हिचे पात्रांत उन्हाळीं, ह्मणजे ऊन पाण्याचे झरे, आहेत ते सर्व प्रसिद्ध आहेत. हिचा उगम शहापूर तालुक्यांतील खर्डीगांवाजवळ आहे. माहुली नांवाच्या मोठ्या डोंगराच्या उत्तरेकडील बाजू जवळून ही वहाते. भिवंडी तालुक्याचे उत्तर सीमेवरही हिचा ओघ आहे. वज्राबाई देवीच्या प्रसिद्ध स्थानाजवळून वहात गेल्यावर, ती वसईतालुक्यांत शिरते. नंतर नऊ मैलपर्यंत या तालुक्यांतून वहात गेल्यावर, समुद्राचे अलीकडे आठ मैलांचे सुमारास, चिमणेगांवाजवळ ही वैतरणेला मिळते. ही तानसानदी फार मोठी व महत्वाची आहे. पुष्कळ मैलपर्यंत हींत भरतीचें पाणी जातें व सुमारें आठ मैलपर्यंत तारवें तरतात. या नदीच्या तीरावरील उसगांव, खानिवडें, भाताणें, व चिमणें या गांवीं, माल गलबतावर चढविण्याचे ठिकाणीं, ९ खंडींचीं तारवें तरण्या इतकें पाणी या नदींत असतें.

गोदावरी नामक पवित्र नदीच्या उगमाजवळ वैतरणा नदीचा उगम असल्यामुळें, समुद्र व घाटावरील मुलखाचा उत्तरभाग यांचे दरम्यान चालणाऱ्या व्यापाराचा अति प्राचीन मार्ग हिच्या थडींतून असल्यामुळें, आणि खालचा, ह्मणजे समुद्राजवळचा, इचा प्रवाह फार रमणीय असल्यामुळें, आर्य लोकांमधील वसाहत करणाऱ्या पहिल्या लोकांतील कांहीं लोक या वैतरणेच्या तीरावर येऊन राहिले होते. नारद, वसिष्ठ, आदिकरून ऋषि व इंद्र हे इच्या तीरावर येत असत. यक्ष, गंधर्व, व किन्नर हे हिच्या तीरावर यज्ञ व स्नान करण्याकरितां येत. चार पवित्र नद्यांपैकीं ही एक आहे असें महाभारतांत हिचें वर्णन केलेलें आहे. विष्णूचा साहवा अवतार जो परशुराम त्यानें हिला आणिलें असेंही वर्णन आहे. मनोर गांवाच्या वरच्या बाजूस सुमारें आठ मैलांवर उजवे-कडील तीरावर गोन्हेंनामक प्राचीन वसाहात असल्यामुळें, टालमी नांवाच्या ईजिप्त (मिसर) देशांतील पंडिताला, गोयारीस या नावानें ही नदी माहीत होती असें दिसतें. टालमीच्या वेळीं, ह्मणजे इ. स. १५० च्या सुमारास, गोन्ह्यांपर्यंतच हींत तारवें तरत असतील असें वाटतें.

अर्वाचीन काळचे हिंदुलोक वैतरणेला फार पवित्र व पापहारिणी अशी मानतात. वैतरणासिंधुसंगमीं जो स्नानदान करितो त्याला यमयातना होत नाहींत अशीही त्यांची समजूत आहे. प्रतिवर्षीं कार्तिक वद्य ११ चे दिवशीं वैतरणेवर यात्रा भरत असते. प्रति साठ वर्षांनीं, कपिला षष्ठीचे दिवशीं, वैतरणेच्या तीर्थाचे महात्म्य फार असतें.

उल्हास नदी—ठाणें जिल्ह्यांतील दुसरी मोठी नदी उल्हास हिचा उगम बोरघाटाचे उत्तरेस एका घळींत आहे. हिचा प्रवाह वायव्य दिशेस सुमारें ऐशी मैलपर्यंत गेल्यावर, ही वसईजवळ समुद्राला मिळते. बोरघाटाजवळच्या डोंगरांतून निघाल्यावर, उल्हास नदी कोंडाण्याच्या लेण्याजवळून व माथेरान डोंगराच्या पूर्वेकडील पायथ्या जवळून वहात जातां जातां, सुमारें चाळीस मैलपर्यंत वायव्येस गेल्यावर, कल्याण नांवाच्या प्राचीन शहरीं पोंचते. कर्जत तालुक्यांत ही उत्तराभिमुख वाहत असतां, उजवे बाजूस पूर्वेकडून येणारी चिल्हार नदी हिला मिळते. पुढें उत्तरेस सात मैल गेल्यावर पोसरी नदी हिला मिळते. ह्या पोसरी नदीला पूर्वेकडून येणारी धावरी नदी मिळाल्यावर, मग ही वर सांगितल्याप्रमाणें उल्हास नदीला मिळते. कल्याण तालुक्यांतून सुमारें बारा मैल गेल्यावर, मोघाडी व मुरबाडी या नद्यांच्या संगमापासून उत्पन्न होणारी बारवी नदी उजवेकडचे बाजूस उल्हास नदीला मिळते. कल्याण शहराच्या वरचे बाजूस थोड्या मैलांच्या अंतरावर, भातसा व काळू या नद्यांचे संगमापासून उत्पन्न झालेली नदी, उजवे बाजूकडून येऊन, उल्हास नदीला मिळते. तळघाटांतून निघणारी कासारी नदी व मांढे घाटांतून निघणारी कोर्ली नदी या दोघींचा, खडींगावाचे दक्षिणेस सुमारें पांच मैलांचे अंतरावर पाल्हेरी एथें, संगम झाल्यावर पुढें जो एक नैर्ऋत्याभिमुख प्रवाह जातो, त्याला भातसा असें नांव प्राप्त होतें. ह्या भातसा नदीच्या ओघाची लांबी सुमारें ४५ मैल आहे. काळूनदी ही माळशेज घाटापासून निघते. हिच्या पश्चिमाभिमुख ओघाची लांबी सुमारें पन्नास मैल आहे. कल्याणचे वरचे बाजूस सुमारें नऊ मैल अंतरावरच्या पिशे बंदरापर्यंत काळू नदींत चाळीस खंडींचे मचवे जातात. कल्याणपर्यंत २०० खंडींचीं तारवें अजूनही जातात. कल्याणच्या खालच्या

बाजूस उल्हासनदी फार रुंद होऊन तिची खाडी बनली आहे. एथून पुढें सात मैलपर्यंत ही नदी दलदलीमधून वळणावळणांनीं गेलेली आहे. दाट झाडीचे चित्रविचित्र व रमणीय डोंगर बाजूस असल्यामुळें, दोहों बाजूंच्या दलदलींपासून मनुष्याला उत्पन्न होणारा त्रास नाहींसा होतो. पुढें ह्या खाडीची रुंदी अर्धमैलापासून एक मैलापर्यंत वाढून, डावे बाजूस असणाऱ्या साष्टीचे डोंगराजवळून ही उत्तरेस जाऊं लागल्यावर, उजव्या बाजूकडून येणारी कामवाडी नदी, ऊर्फ भिवंडीची खाडी, इला मिळते. नंतर पश्चिमेकडे वळून तेरा मैलपर्यंत, अति चित्रविचित्र व रमणीय डोंगर व अरण्य यांमधून वहात गेल्यावर, व सुमारें दोन मैलपर्यंत हिचें पात्र रुंद झाल्यावर, मग ही वसई जवळ समुद्राला मिळते. टालमीचे ग्रंथांत उल्हास नदीला बिंड नदी ह्मटलेलें आहे तें बहुतकरून भिवंडी गांवाचे नांवावरून ह्मटलें असावें असें दिसतें. कारण त्या वेळीं कल्याण एथें व्यापाराची वृद्धी झालेली नव्हती व कामवाडी खाडी त्या वेळीं हल्लींपेक्षां मोठी होती असें दिसतें.

लहान नद्यांपैकीं उत्तरेकडील प्रदेशांत वरोली नदी आहे. डहाणू तालुक्याचे पूर्वभागांत हिचा उगम आहे. सुमारें २९ मैल पर्यंत वायव्याभिमुख गेल्यावर ही उंबरगांवाजवळ समुद्राला मिळते. पुढें उत्तरेस बारा मैलांवर ठाणें जिल्ह्याचे अगदीं उत्तरेकडील प्रदेशांत कालई ह्मणून नदी आहे. ती सुमारें तीस मैलपर्यंत उत्तराभिमुख वहात गेल्यावर समुद्राला मिळते. माहीम तालुक्याच्या उत्तर प्रदेशांत गंगा ह्मणून एक नदी आहे. पनवेल तालुक्यांत माथेरान डोंगराच्या पश्चिमेकडील उतरणीवर पुष्कळ ओढे उत्पन्न होऊन ते पांच पासून दहा मैलपर्यंत वहात गेल्यावर, त्यांपासून काळुंद्री ह्मणून एक नदी उत्पन्न होते. समुद्राचे अलीकडे सुमारें नऊ मैलांवर पनवेल गांवाजवळ ह्या नदीची व भरतीचे पाण्याची गांठ पडते. एथून पुढें समुद्राला मिळेपर्यंत भरतीच्या वेळीं ह्या नदींत १२० खंडींचीं गलबतें तरतात. पूर्वी ह्या खाडीचे द्वारें पनवेलीस व्यापाराचा पुष्कळ माल जात असे. हा जात नसता तर ह्या काळुंद्री नदीचें नांव एथें सांगण्याची अवश्यकता वाटली नसती. इतकी ही नदी क्षुल्लक आहे. या जिल्ह्याचे अगदीं दक्षिण

टोंकाला पाताळगंगा नदी आहे. हिचा उगम बोरघाटांत आहे. सुमारें तीस मैल पर्यंत पश्चिमाभिमुख वळणावळणांनीं वहात गेल्यावर मुंबई बंदराच्या आग्नेयी कोंन्यास ही समुद्राला मिळते. मुखापासून सुमारें साहा मैलांचे अंतरावर असणाऱ्या साई गांवापर्यंत शंभर खंडींचीं तारवें पाताळगंगेंत तरतात. साईच्या वरचे बाजूस आठ मैलांचे अंतरावर आपटें गांव आहे तेथपर्यंत सुमारें ४८ खंडींचीं गलबतें जातात.

खाडया---या जिल्ह्यांत सर्व समुद्र किनाऱ्याभर लहान लहान खाडया पुष्कळ आहेत. उदाहरणार्थ साष्टीतालुक्यांतील वेसाव्याची खाडी,व मनोरची खाडी. तशाच भिवंडी, चिचणी, व डहाणू एथील खाडया. ठाण्याची किंवा वसईची खाडी ही खरोखरी खाडी नाहीं.तर मुंबईच्या बंदरांत भरती लागली ह्मणजे तिचे योगानें या बंदरापासून वसईपर्यंत पसरणाऱ्या भरतीच्या पाण्याचा तो एक आशय आहे. या आशयाचा ह्मणजे खाडीचा अति उथळ भाग ठाणें शहराचे दक्षिणेस जवळच आहे. तेथें खडक असल्यामुळें पेनिनूशुला रेलवेच्या पुलाचा पाया बांधण्यास तो मोठा सोईचा झालेला आहे. ठाण्याचे उत्तरेस दोन मैलांवर उल्हास नदीची, ह्मणजे कल्याणची, खाडी या खाडीला मिळते. नंतर भिवंडीची खाडी व लाखिवलीची खाडी या मिळतात. या खाडयांना येऊन मिळणाऱ्या नद्यांचें पाणी उत्तरेस वसईकडे जातें. कारण ठाण्याजवळचा,ठाण्याचे खाडींतला,खडक त्या पाण्याला मुंबईबंदराकडे येऊं देत नाहीं. ठाण्याच्या खाडींत मात्र सर्व ठिकाणीं तारवें तरतात. बाकीच्या खाड्या मुखाजवळ रुंद व खोल आहेत तरी, किनाऱ्यापासून दहा मैलांच्या आंतच त्या अगदीं उथळ व अरुंद होतात.

बेटें---या जिल्ह्याचा किनारा फार सखल असल्यामुळें, व किनाऱ्यापासून फार दूरपर्यंत उथळ पाण्याचे प्रवाह गेलेले असल्यामुळें,याजिल्ह्याच्या किनाऱ्याच्या लगत्यास पुष्कळ बेटें आहेत, ही गोष्ट स्वाभाविक असल्यामुळें, मनुष्याचे मनांत आश्चर्य उत्पन्न करण्याइतकी चमत्कारिक नव्हे. या बेटांपैकीं मुंबईबेट हें अति विख्यात होय. तसेंच साष्टीबेट हें या सर्व बेटांत अति मोठें होय. या बेटाचा पश्चिमेकडील किनारा हल्लीं अखंड

आहे. परंतु पूर्वी ते विछिन्न झालेला असल्यामुळें,अनेक लहान लहान बेटें त्या ठिकाणीं होतीं. जुन्या इतिहासकारांनी वसईला बेट ही संज्ञा दिलेली आढळते.सोपाऱ्याची खाडी ह्मणून एक लहानशी खाडी आहे ती अजूनही या बेटाला मुख्य अखंड जमिनीपासून वेगळें करते.या लहानशा खाडीवरून रेलवेची सडक जाते. बोळिंज व गोखिवें एथें इच्यावर पूल बांधलेले आहेत. मुंबईबंदरांत करंजें म्हणून बेट आहे तें पूर्वी पोर्टुगीज लोकांचे हातीं होतें. शेर्वेन्हावें म्हणून त्या बंदरांत बेट आहे तेथें हैड्रालिक शिपलिफ्ट म्हणून एक यंत्र आहे. तसेंच घारापुरी म्हणून जें या बंदरांत बेट आहे त्यांत सुप्रसिद्ध कोरींव लेणीं आहे. वसई तालुक्यांत आगाशीपासून थोड्या अंतरावर अर्नाळा ह्मणून बेट आहे. त्यांत एक चांगल्या स्थितींत असलेला किल्ला आहे.त्या किल्ल्याचें नांव सिंधुदुर्ग असून त्यांत मुसलमानी इमारतींचे अवशिष्ट राहिलेले कांहीं अंश आहेत. पूर्वेकडील दरवाज्यावर एक बालबोध लिपींत लिहिलेला कोरींव लेख आहे. तसेंच या किल्ल्यांत एक हिंदुलोकांचें देवालयही आहे.

तलाव—स्वभावसिद्ध तलाव या जिल्ह्यांत मुळींच नाहींत. तथापि साष्टी-
तालुक्याच्या मध्य भागांतील डोंगरांत मनुष्यकृतीनें केलेले दोन तलाव
आहेत. त्यांपैकीं एकाचें नांव व्याहाडचा तलाव व दुसऱ्याचें तुळशीचा
तलाव असें असून, या दोन तलावांपासून मुंबईशहरांतील लोकांना
पाण्याचा पुरवठा होतो. व्याहाडचा तलाव मुंबईपासून सुमारें पंधरा
मैलांवर आहे. गोपार नांवाच्या नदीला बंधारा बांधून हा तलाव
केलेला आहे.ही नदी पूर्वी शिवच्या खाडीला मिळत असे व दोनशें वर्षांपूर्वी
कधीं कधीं मुंबईबेटाचा उत्तरभाग पुराच्या पाण्यानें ती जलमय करून
टाकीत असे. या तलावाचा बंधारा बांधण्याचें काम इ. स. १८६०
त संपले. मुंबईत त्याच वर्षापासून या तलावांतील पाणी सोडूं लागले.
या तलावाचें क्षेत्र १४०० एकरांचें आहे. ज्या ठिकाणीं पाणी
उभें आहे तें क्षेत्र खेरीज करून सुमारें२५५०एकरांच्या क्षेत्रांतून पाणी या
तलावांत येत असतें. या तलावाला एकंदर तीन बंधारे आहेत. जो मुख्य
बंधारा बांधिला होता त्याचेपेक्षां या नदीच्या पात्राच्या कांठावरील
उंचवटे टेंगणे असल्यामुळें, त्यांवरून पाणी वाहून जाऊं नये ह्मणून,

दुसरे दोन बंधारे बांधावे लागले. प्रति दिवशीं या तलावापासून मुंबईच्या लोकांना ऐंशी लक्ष ग्यालन* पाणी मिळतें. ह्मणजे हल्लीं ( इ. स. १८८१ ) मुंबईंत जितकीं माणसें आहेत त्यांपैकीं प्रत्येकाला सुमारें दहा ग्यालनांहून थोडें अधिक पाणी मिळतें. डोंगरांच्या ज्या उतरणींवरून पाणी वाहून या तलावांत येतें त्यांवर लागवड करण्याचा प्रतिबंध आहे. तसेंच या तलावांत होड्या चालविण्याची परवानगी नाहीं. या तलावाच्या सभोंवतालचे प्रदेशांत जंगल असल्यामुळें तलावाचें पाणी खराब होत नाहीं. बहुत वर्षेंपर्यंत या तलावाचें पाणी स्वच्छ होतें. परंतु अलीकडे त्यांत रान उगवल्यामुळें पाण्याला किंचित् वैगुण्य आलें आहे. हा तलाव रिकामा करून साफ करण्याचीं, किंवा पाणी गाळून स्वच्छ करण्याचीं, साधनें सांप्रत नाहींत. तथापि पाणी सुधारून नीट करण्याविषयीं मुंबईची म्युनिसिपालिटी अनेक युक्तींचा विचार करीत आहे. व्याहाडचा तलाव तयार करून नळानें मुंबईंत पाणी आणण्यास ३७ लक्ष ३६ हजार ९०० रुपये खर्च लागला. व्याहाडच्या तलावांत जमणारें पाणी मुंबईच्या लोकांना पुरणार नाहीं अशी भीति पडल्यामुळें, याच्याच लगत इ. स. १८७४ त तुळशीचा तलाव बांधण्यांत आला. या कामाला साडेचार लाख रुपये लागले. या तलावांतलें पाणी व्याहाडच्या तलावांत जरूर वाटेल तेव्हां सोडून देण्याची तजवीज करून ठेवलेली आहे. इ. स. १८७७ त ३३ लक्ष रुपये खर्चून तुळशीचे तलावांतून मुंबईबेटांतील वालुकेश्वरचे डोंगरावर पाणी निराळ्या मोठ्या नळानें आणण्याचें काम म्युनिसिपालिटीनें हातीं घेतलें. या तजविजीच्या योगानें सगळ्या मुंबईबेटांतील लोकांना दरमाणशीं साहा ग्यालन पाणी अधिक मिळतें व ज्या उंच जागीं व्याहाडच्या नळाचें पाणी चढत नाहीं तेथील लोकांना पाणी मिळण्याची सोय झाली आहे.

व्याहाड व तुळशी या दोन तलावांखेरीज आणखी २४ तलावांचा व जलाशयांचा विचार एथें केला पाहिजे. या २४ तलावांपैकीं डहाणू, माहीम, वाडे, शहापूर, मुरबाड, व भिंवडी या साहा तालुक्यांत एकेक तलाव

* एक ग्यालन ह्मणजे पक्के पांच शेर.

आहे; वसई, कल्याण, व करजत या तिहींत दोन दोन आहेत; चार
पनवेल तालुक्यांत आहेत; आणि आठ साष्टी तालुक्यांत आहेत. डहाणू
तालुक्यांतील देहरी गांवीं जो गांवतलाव म्हणून आहे त्याची लांबी
१३८६ फूट व रुंदी ६९३ फूट असून त्याची अतिमोठी खोली १९
फूट म्हणजे अडीच पुरुष आहे. हा तलाव चौफेर दगडांनीं बांधलेला
आहे. ह्या तलावाचें पाणी सर्व वर्षभर पुरतें. ह्या तलावापासून पाट
काढून नेऊन जमिनींत लाविलेल्या झाडांस पाणी लावितात. वजीरजी
फ्रामजी नांवाचे एका मनुष्यानें हा तलाव बांधिला व त्याला त्याबद्दल
जमीन इनाम मिळाली. माहीम तालुक्यांत केळवेमाहीम या गांवीं बा-
जारतलाव म्हणून जो तलाव आहे तो ऐंशी फूट हमचौरस असून चौफेर
दगडांनीं बांधिलेला आहे. आंत उतरण्याकरितां दगडी पायऱ्या आहेत.
याची अतिमोठी खोली वीस फूट आहे. ह्या तलावाचेंही पाणी वर्ष-
भर पुरतें. वाडें तालुक्यांत वाडें एथें जो मोठा तलाव म्हणून आहे
त्याची लांबी १६९० फूट व रुंदी ११९९ फूट असून अतिमोठी खोली
१२ फूट आहे. ह्याचें पाणी सर्व वर्षभर पुरतें. शहापूर तालुक्यांत खर्डी
एथें जें तळें आहे त्याची लांबी ३९६ फूट व रुंदी ३६३ फूट आहे.
सुमारें ३९ वर्षांपूर्वीं मुंबईंत आग्र्यास जाण्याचा रस्ता बांधीत होते
तेव्हां हा तलाव सरकारानें खुदला. हा चौफेर दगडांनीं बांधलेला
असून आंत उतरण्याकरितां दगडी पायऱ्या बांधलेल्या आहेत. ह्याची
अतिमोठी खोली १९ फूट आहे. ह्यांतील पाणी कधीं आटत नाहीं.
ह्यांतील पाणी पाटानें नेऊन मळ्यांस लावीत नाहींत. वसई तालुक्यांत
निर्मळचा तलाव व मालोंडे एथील धावणीतीर्थ नांवाचा तलाव असे दोन
आहेत. निर्मळच्या तलावाची लांबी ४४८८ फूट व रुंदी १९९१ फूट
आहे. ह्यांत सुमारें अकरा महिने पाणी असतें व ह्याची अतिमोठी
खोली दहा फूट आहे. अशी कथा लोक सांगतात कीं, हा तलाव
जेथें आहे तेथें एक राक्षस मारला होता त्याच्या रक्ताच्या योगानें जमि-
नीला खळगा पडून मग तो पाण्यानें भरला. ह्या तलावाजवळ एक
हिंदु देवळ आहे तेथें दरवर्षास यात्रा भरत असते. धावणीतीर्थ या
तलावाची लांबी ८०० फूट व रुंदी २७९ फूट असून अतिमोठी खोली

१५ फूट आहे. यांतलें पाणी वर्षभर टिकतें. हा चौफेर दगडांनीं बांधलेला नाहीं. आंत उतरण्याकरितां दगडी पायऱ्या मात्र बांधलेल्या आहेत. भिवंडी तालुक्यांतील कामतघर या गांवीं एक तळें आहे त्याची लांबी ५१६४ फूट व रुंदी २८२१ फूट असून तें चौफेर दगडांनीं बांधलेलें आहे व आंत उतरण्याकरितां दगडी पायऱ्या बांधलेल्या आहेत. ह्याची अतिमोठी खोली २१ फूट असून ह्यांतील पाणी वर्षभर टिकतें. ह्या तळ्याविषयीं अशी कथा सांगतात कीं, हें जेव्हां बांधलें तेव्हां ह्यांत पाणी मुळींच नव्हतें. पुढें एका गावांतील मनुष्याला स्वप्नांत असा दृष्टांत झाला कीं, भूमीला एका दंपत्याचा बळी दिला तर हें तळें पाण्यानें भरेल. नंतर एक जोडपें रात्रीस तळ्याचे मध्यभागीं गेलें व त्यानें तेथल्या एका मोठ्या दगडाला हात लाविला तेव्हां लागलेंच तें तळें पाण्यानें भरलें व तीं दोघें दादलाबायलें त्यांत बुडून मेलीं. भिवंडी शहराला पाण्याचा पुरवठा करण्याकरितां हें तळें बांधिलें असें म्हणतात. अलीकडे म्युनिसिपालिटीनें ह्या तळ्याची दुरुस्ती करून तेथून भिवंडीस नळानें पाणी आणिलें आहे.

साष्टी तालुक्यांतील आठ तळ्यांपैकीं, मासुंदें, अटाळें, घोसाळें, हर्याळें, मखमाली, व सिद्धेश्वर हीं साहा ठाणें शहरांत, काम.दिगो नांवाचें तळें मुलुंद एथें आहे व मोठें तळें वांद्र्यांस आहे. मासुंदें तळ्याची लांबी १२०० फूट व रुंदी १०१६ फूट असून त्याची अति मोठी खोली सोळा फूट आहे. ह्यांतील पाणी वर्षभर टिकतें. ह्या तळ्यांतून उतरण्या करितां दगडी पायऱ्या आहेत. परंतु हें चौफेर दगडांनीं बांधलेलें नाहीं. मधून मधून मात्र दगडांनीं बांधलेलें आहे. अटाळें तळ्याची लांबी ४६२ फूट व रुंदी ४५४ फूट असून त्याची अति मोठी खोली १२ फूट आहे. वर्षभर ह्यांतील पाणी टिकतें. हें चौफेर दगडांनीं बांधलेलें असून आंत उतरण्याकरितां दगडी पायऱ्या बांधलेल्या आहेत. मळ्यांतील झाडांना ह्या तळ्याचें पाणी पाजीत असतात. हर्याळें तळ्याची लांबी ५६९ फूट व रुंदी ३६३ फूट असून त्याची अति मोठी खोली १२ फूट आहे. एका बाजूला मात्र हें दगडांनीं बांधलेलें आहे. आंत उतरण्याकरितां ठिकठिकाणीं दगडी पायऱ्या बांधलेल्या आहेत. ह्यांत पाणी दाहा

महिनेपर्यंत असतें. मखमाली तळ्याची लांबी ३०० फूट व रुंदी २४७ फूट असून अतिमोठी खोली १६ फूट आहे. हर्याळ्याप्रमाणेंच दाहा महिनेपर्यंत याचें पाणी टिकतें. ह्यांतील पाण्याचा उपयोग मळ्यांतील झाडांना पाणी लावण्याचे कामीं होतो. सिद्धेश्वरतळ्याची लांबी ६५२ फूट व रुंदी ६२७ फूट असून अतिमोठी खोली २० फूट आहे. दाहा महिनेपर्यंत यांत पाणी असतें. त्याचा उपयोग मळ्यांतील झाडांना पाणी पाजण्याचे कामीं होत असतो. दिगें तळें ह्याची लांबी १०८९ फूट व रुंदी ४५४ फूट असून अतिमोठी खोली १३ फूट आहे. ह्याचें पाणी कधींही आटत नाहीं. मोठें तळें ह्याची लांबी १०४८ फूट व रुंदी ५१६ फूट असून अतिमोठी खोली १३ फूट आहे. हें चौफेर दगडांनीं बांधलेलें असून आंत उतरण्याकरितां ठिकाठिकाणीं दगडी पायऱ्या आहेत. ह्यांतील पाणी कधींही आटत नाहीं.

कल्याण तालुक्यांतील दोन्ही तळीं कल्याण शहरांतच आहेत. त्यांपैकीं एकाचें नांव शेणाळें व दुसऱ्याचें राजाळें असें आहे. शेणाळ्याची लांबी १२१२ फूट व रुंदी ८८५ फूट आहे. हें चौफेर दगडांनीं बांधलेलें असून आंत उतरण्यास ठिकाठिकाणीं दगडी पायऱ्या आहेत. विजापूरचा राजा युसफ आदिलशहा यानें हें तळें इ. स. १५०८ म्हणजे हिजरी सन ९१४ या वर्षीं बांधिलें असें ह्मणतात. ह्याची अतिमोठी खोली १५ फूट
ह्यांतील पाणी कधीं आटत नाहीं.
आहे. राजाळें तळें ह्याची लांबी २६४० फूट व रुंदी १३२० फूट
असून अतिमोठी खोली १० फूट आहे. ह्यांतील पाणी कधींही
मुरबाड तालुक्यापैकीं मुरबाड या गांवीं मोठें तळें
असारखा त्याचा आकार
आहे. ह्याची लांबी ४१४ फूट व रुंदी ४१४ फूट
पदार्थांपासून उत्पन्न झालेला
असून यांतील पाणी कधींही
काचेची पांढऱ्या, किंवा किंचित् अकरा फूट
तींत कांहीं दगड कणमय
जे स्फटिकासारखे दगड आहेत त्यांपैकीं वडाळें, कृष्णाळें, व इस्लाली
कांतासारखे आहेत. त्यांची उत्पत्तिमाळें हें उरण एथें आहे. वडा-
रसापासून झालेली आहे. हें १६५० फूट असून अतिमोठी

खोली ११ फूट आहे. हें चौफेर दगडांनीं बांधलेलें असून आंत उतरण्याकरितां ठिकाठिकाणीं दगडी पायऱ्या आहेत. ह्याचें पाणी आटत नाहीं. मळे शिंपण्याचे कामीं ह्याचे पाण्याचा उपयोग होतो. ह्या तळ्याची दुरुस्ती करण्याकरितां भाऊशिंग शुक्लशिंग नांवाच्या एका मनुष्याला कांहीं जमीन दिलेली आहे. कृष्णाळ्याची लांबी ११२२ फूट व रुंदी ९२४फूट आहे. हें चौफेर दगडांनीं बांधलेले असून आंत उतरण्याकरितां ठिकाठिकाणीं दगडी पायऱ्या आहेत. बापट उपनांवाच्या एका गृहस्थानें हें खणून तयार केलें. ह्यांतलें पाणी कधींही आटत नाहीं. ह्याची अतिमोठी खोली ९ फूट आहे. इस्लाली तळ्याची लांबी ६६० फूट व रुंदी ३९६ फूट आहे. हें चौफेर दगडांनीं बांधलेलें असून आंत उतरण्याकरितां ठिकाठिकाणीं दगडी पायऱ्या आहेत. ह्याचें पाणी कधीं आटत नाहीं. सुमारें वीस वर्षांपूर्वी करमसी हंसराज या नांवाच्या गृहस्थानें ८०००० रुपये खर्च करून हें तळें बांधलें. भीमाळें तळ्याची लांबी ४५० फूट व रुंदी ४४० फूट असून अतिमोठी खोली दाहा फूट आहे. दाहा महिने मात्र यांत पाणी असतें. मन्वेल डी सोझा या नांवाच्या एका गृहस्थानें हें बांधिलें.

कर्जत तालुक्यांतील दोन तळ्यांपैकीं हुमगाव एथें मित्रपुरी तळें आहे व खोपवली एथें नाना फडणविसाचें तळें आहे. पुण्यास जावयाचे रस्त्यावरील कुसूर घाटाचे पायथ्याशीं मित्रपुरी तळें आहे. ह्याची लांबी २९८ फूट व रुंदी २३६ फूट आहे. हें चौफेर दगडांनीं बांधलेलें असून आंत उतरण्याकरितां ठिकाठिकाणीं दगडी पायऱ्या आहेत. ह्याची अतिमोठी खोली २० फूट आ... १२फूट आहे. आटत नाहीं. सदाशिव चिमणाजी पे...नीं बांधलेलें असून आंत हिनें पाऊण लाख रुपये खर्चून हें तळें आहेत. मळ्यांतील झाडांना पासून इ. स. १८०० पर्यंत नाना फड...ळें तळ्याची लांबी ५६९ फूट होते. त्यांनीं खोपवली एथील तळें ...ोठी खोली १२ फूट आहे. चौरस असून त्याची अतिमोठी खोली ...लें आहे. आंत उतरण्याक... कधींही आटत नाहीं. मळ्यांतील ...ऱ्या आहेत. ह्यांत पाणी दाहा

पाण्याचा उपयोग होतो. इ. स. १८७९।८० तील तक्त्यावरून असें समजतें कीं, ह्या वर सांगितलेल्या तळ्यांखेरीज ह्या जिल्ह्यांत ११९६३ विहिरी आहेत. त्यांपैकीं ९६२ विहिरींना पायऱ्या आहेत व बाकीच्या १०६०१ विहिरींना पायऱ्या नाहींत.

भूरचना—ज्या दऱ्यांतून मळई नद्यांत वाहात येते त्या दऱ्यांखेरीज, ह्या जिल्ह्यांतील इतर सर्व ठिकाणीं, घाटावरील मुलखांत आढळणारा, काळवथरी दगड व तज्जातीय दुसरे दगड आढळतात. मुंबई बेटांत जमिनींत फार खोल निरनिराळ्या जातीचे काळवथरी दगड असून, त्यांचेवरचे बाजूस जमिनीच्या पृष्ठभागाखालीं, खडकाचे थर ह्या बेटाचे पुष्कळ भागांत आहेत. त्यांची जाडी कित्येक ठिकाणीं फार थोडे फूट आहे व कित्येक ठिकाणीं सत्तर फुटींपर्यंतही ती आहे. समुद्रांतही हे खडकांचे थर आहेत. ह्या बेटाच्या पूर्वेकडील व पश्चिमेकडील भागांत कांहीं स्थळीं ह्या खडकांवर बसाल्ट नांवाच्या दगडाचा थर आहे. त्याची जाडी कित्येक ठिकाणीं थोडे फूट आहे व कित्येक स्थळीं वीस फुटींपर्यंत आहे. मुंबईच्या उत्तरेस वांद्र्यांपासून उत्तरेकडे समुद्राच्या किनाऱ्याच्या बाजूनें बसाल्ट नामक खडकाची ओळच्याओळ सरळरेषेनें गेलेली आहे. वेसावें एथें ह्या खडकाचे कांहीं तुकडे खांबासारखे दिसतात. ह्या ठिकाणीं ह्या खडकाचें अंग काळें आहे तरी, त्याची जमिनीकडची बाजू अत्युत्तम पांढऱ्या हिरव्या रंगाची आहे. तींत आगाइट (augite) नामक दगडाचे खडे आढळतात. समुद्राकडची बाजू किंचित् करड्या रंगानें मिश्र अशा शुभ्र रंगाची असल्यामुळें करळासारखा तो खडक दिसतो. त्याच्यावर एकादा पदार्थ मारला तर ओतींव लोखंडासारखा त्याचा आवाज होतो. त्यावरून हा खडक ज्वालामुखींतील पदार्थांपासून उत्पन्न झालेला आहे अशी खातरी होते. ह्या खडकाची जो जात आहे, त्याची पांढऱ्या, किंवा किंचित् पिंवळट पांढऱ्या रंगाची पांढऱ्या, किंवा किंचित् पिंवळट आहेत व कांहीं स्फटिकांसारखे आहेत. तींत कांहीं दगड कणमय आहेत व कांहीं स्फटिकांसारखे गुळगुळीत असून चंद्रकांतासारखे आहेत. जे स्फटिकांसारखे दगड आहेत ते कांचेसारखे गुळगुळीत असून चंद्रकांतासारखे आहेत. त्यांची उत्पत्ति ज्वालामुखींतून वाहणाऱ्या लाव्हानामक रसापासून झालेली आहे. जे दगड स्फटिकांसारखे गुळगुळीत

नसून कणमय आहेत त्यांना फुंकनळीच्या साहाय्यानें आंच दिली तरीही ते लवकर वितुळत नाहींत व पांढऱ्या उत्तम कणदार करळा सारखी त्यांची घटना असते. वसईच्या समोर साष्टी तालुक्यांतील डोंगरीवर, आणि कल्याणचे जुन्या किल्ल्याचे खालचे बाजूस जो डोंगर आहे त्यावर, बसाल्ट दगडाचे खांब आहेत. घारापुरीच्या लेण्यांतील ह्या जातीचा खडक हळूहळू करड्या पार्फिरी ( Porphyry ) नामक दगडासारखा होत गेलेला आहे व त्यांत पिंगट रंगाचे स्फटिक आहेत असें क्याप्टन् न्यूबोल्ट ह्याचे दृष्टोत्पत्तीस आलें. ह्या घारापुरी बेटांत व मुंबई, साष्टी, आणि करंजे ह्या बेटांत बसाल्ट नामक खडकांत निरनिराळ्या जातींचे फिकट रंगाचे पार्फिरी नामक दगडाचे पुष्कळ प्रकार आढळतात.

वसईच्या उत्तरेकडील प्रांतांत खडकांची उंची व विस्तार अतिशय कमी झालेला आहे आणि निरनिराळ्या कालावधींत जमीन पुनः पुनः उत्पन्न झालेली आहे. त्या प्रांतांतील भूरचनेंत हीच गोष्ट मुख्यत्वें करून चांगली ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ह्या प्रांतांत खडकांचे उघडे थर कोठें कोठें दृष्टीस पडतात. ह्या थरांवर सेंद्रिय पदार्थांचे जे अवशिष्ट राहिलेले अंश आढळतात, त्यांच्या जातीवरून मात्र त्या थरांच्या उत्पत्तीच्या कालाचें अनुमान करितां येतें. मुंबईतील करळाच्या थरांसारखे जेथें थर आढळतात असें त्या प्रांतांतील स्थान केळवें माहीम हें होय. तेथें दाहावारा फूट उंचीचें एक ठेंगणें टेंकाड आहे. त्यांतील खडकांचे थर क्षितिजाशीं समांतर असे आडवे आहेत. तेथून समुद्राकडे येतांना मध्यंतरी कांहीं मळईदार जमीन असल्यामुळें तिचे खालीं कोणत्या प्रकारचा खडक आहे हें कळत नाहीं. ती टाकून पुढें गेल्यावर किनाऱ्याजवळचा शिरगांवचा किल्ला व सरकारी बंगला यांचे खालीं त्याच प्रकारच्या खडकाचे थर आढळतात. ह्या ठिकाणच्या सर्व जमिनीचा नाश होऊन गेल्यामुळें एथील बंगल्याखालचें टेंकाड हें मनुष्याचें मन विशेष वेधून टाकतें. भरतीच्या पाण्याच्या साधारण सपाटीपासून या टेंकाडाची उंची सरासरी वीस फूट आहे. ह्या टेंकाडाच्या वरच्या पांच फुटांत मळईदार माती आहे व खालच्या पंधरा फुटांत कमजास्त मानानें तयार झालेले कर-

ळाचे आडवे थर आहेत. शिरगांवच्या किल्ल्यापासून प्राय: लंबरेषेनें समुद्राकडे गेलेली एक जमिनीची चिरटी आहे तींत वरील वाक्यांत वर्णिलेलेच थर आहेत. किल्ल्याच्या उत्तरेस सुमारें पांच मैलांवर समुद्राकडून पूर्वेकडे जाणारी जमिनीची चिरटी व ही चिरटी ह्या पूर्वी एकमेकींस लागलेल्या होत्या. जेथें हल्लीं खाडी आहे त्या सर्व ठिकाणीं पूर्वी कोरडी जमीन होती असें ह्मणतात. मुसलमानांचीं प्रेतें गाडण्याच्या जमिनींत कांहीं माणसांची हाडें उघडीं पडलीं होतीं, तेथपर्यंत समुद्राचें पाणी इ.स.१८३६ त वाढल्यावर, पुढें तें वाढण्याचें बंद झालें असें दिसतें. पुढें आणखी उत्तरेस गेलें असतां तारापूर, डहाणू, व झाई बोर्डी ह्या प्रांतांतील रस्त्यानें जाणाऱ्या मनुष्याच्या दृष्टीस, वरील प्रकारच्या खडकाचे, काळवथरी खडकावर असलेले, आडवे थर पडतात. ह्या प्रांतांतले जे लहान लहान डोंगर सह्याद्रीच्या टोकापलीकडेही उत्तरेस गेलेले आहेत त्यांतही काळवथरी दगड आढळतो. घाटावरील मुलखांत काळवथरी दगड उघडा असल्यामुळें, हवा व पाणी यांच्या योगानें जी कळा त्याला येते, तीच कळा ह्या प्रांतांतील कांहीं खाड्यांचे कांठच्या उघड्या काळवथरी खडकाला आलेली दृष्टीस पडते.

उन्हाळीं किंवा ऊन पाण्याचे झरे—माहीम, वाडें, भिवंडी, व वसई या चार तालुक्यांत उन्हाळीं आहेत. माहीम तालुक्यांतील उन्हाळ्यां खेरीज बाकीचीं बहुतेक उन्हाळीं तानसा नदीच्या पात्रांत किंवा तिच्या पात्राजवळ आहेत.

माहीम तालुक्यांत चार गांवीं उन्हाळीं आहेत. गारगांवापासून सुमारें ८०० पावलांवर एक उन्हाळें सूर्यानदीच्या पात्रांतील खडकांत आहे. ह्याचें पाणी साधारण ऊन असून खारट आहे. कुजकट मातीचा वास ह्या पाण्याला येतो. कोंकनेर गांवापासून सुमारें ५०० यार्डांवर सूर्यानदीच्या पात्राच्या वरचे बाजूस चारपांच फूट अंतरावर दोन टांकीं आहेत. त्यांत तेथून सुमारें अठरा फुटींवर असलेल्या उन्हाळ्याचें पाणी पन्हळीनें आणून सोडलेलें आहे. आंत हात बुडवितां येण्यासारखें ह्याचें पाणी ऊन असून तें खारट आहे. इ. स. १८९६ च्या

फेब्रुवारी महिन्यांत ह्या उन्हाळ्याच्या पाण्याचें डाक्टर हेन्स यानें पृथक्करण केलें तेव्हां ह्या पाण्याच्या दहाहजार भागांत ८०.६ ( ऐंशी पूर्णांक साहा दशांश ) भाग घनद्रव्यें आहेत असें त्याला आढळून आलें. तसेंच ह्या पाण्याचें उष्णतामान साठ अंश असतांना त्याचें विशिष्ट गुरुत्व १००६.४ होतें. साटिवली गांवापासून सुमारें एका मैलावर एका नदीजवळ चार उन्हाळीं आहेत. त्यांतलें पाणी इतकें ऊन आहे कीं, त्यांत हात घालववत नाहीं व त्याला गंधकाचा वास येतो. एथील जमिनींत प्रथम काळवथरी खडकाचा थर असून त्यावर काळी भुसभुशीत माती आहे. वैतरणेच पूर्वेस सुमारें ९० पावलांवर हालोळी गांवाजवळ एका उन्हाळ्यासभोंवतीं एक टांकें बांधलेलें आहे. ह्याचें पाणी सोमाळें असून त्याला गंधकाचा वास येतो. ह्याचे जवळच नदीच्या किनाऱ्यावर भरतीचें पाणी जेथपर्यंत चढतें त्या जागेजवळच ऊन पाण्याचा एक झरा आहे.

वाडें तालुक्यांतील तीन गांवांत उन्हाळीं आहेत. पिंपळासपासून सुमारें दीड मैलावर वैतरणा व पिंजाळ यांच्या संगमाजवळ नदीच्या पात्रांत दोन उन्हाळीं आहेत. पावसाळ्यांत नदीला पाणी पुष्कळ असतें तेव्हां हीं उन्हाळीं पाण्यांत बुडून गेल्यामुळें दिसत नाहींत. आंत हात घालतां येण्यासारखें ह्या उन्हाळ्यांचें पाणी ऊन आहे व त्याला गंधकाचा वास येतो. निंबवली गांवाजवळ तानसानदीच्या पात्रांत साहा उन्हाळीं आहेत. त्यांपैकीं दोन गांवापासून सुमारें पावणे दोनशें पावलांवर आहेत व त्यांचे सभोंवतीं दगडी टांकीं बांधलेलीं आहेत. बाकीचीं चार उन्हाळीं सुमारें २०० पावलांवर आहेत. ह्या उन्हाळ्यांचें पाणी अति ऊन नाहीं व अति थंड नाहीं आणि त्याला गंधकाचा वास येतो. ह्या उन्हाळ्यांजवळची जमीन रेताड आहे. वज्राबाईदेवीच्या उत्तरेस तीन मैलांवर, नांदणी गायगोठें या गावीं, बाणगंगा नांवाचें उन्हाळें आहे. ह्या ऊन पाण्याच्या झऱ्यांतून सदोदित विपुल व स्वच्छ पाणी वाहात असतें आणि त्याला किंचित् गंधकाचा वास येतो.

भिवंडी तालुक्यांत वज्राबाईदेवीजवळ आंकळोली व गणेशपुरी या गांवीं पुष्कळ उन्हाळीं आहेत. त्यांपैकीं कांहीं तानसा नदीच्या

पात्रांत आहेत व कांहीं तिच्या पात्राजवळ आहेत. ह्या झऱ्यांच्या पाण्याच्या उष्णतेचें मान १५० अंशांपासून १३६ अंशांपर्यंत आहे. ह्या पाण्यावर जे ग्यासाचे ( वायूचे ) बुडबुडे येतात त्यांना गंधकाचा उग्र वास येतो. आंकलोली एथील उन्हाळ्यांपैकीं सूर्यकुंड नांवाच्या उन्हाळ्यांत एका सेकंडाहून अधिक वेळ हात घालवत नाहीं. इतकें त्यांचें पाणी कढत आहे. एथील श्रीरामेश्वराचे देवळाजवळच्या चार उन्हाळ्यांसभोंवतीं कुंडें बांधलेलीं आहेत. ह्या गांवचे लोक व दूरदूरचे लोक अर्धांग वायु आदिकरून व्याधि दूर व्हाव्या म्हणून ह्या कुंडांत स्नान करितात. गणेशपुरी एथें श्रीरामेश्वराचे देवळा-जवळ तानसा नदीच्या पात्रांत तीन उन्हाळीं आहेत. त्यांचे सभोंवतीं मोठालीं कुंडें बांधलेलीं आहेत. ह्यां पैकीं गोरखमच्छिंद्र नांवाच्या कुंडांतील पाण्यांत हात घालवत नाहीं इतकें तें कढत आहे. ह्या सर्व उन्हाळ्यांतील पाण्याच्या उष्णतेचें मान वर्षभर सारखेंच असतें. इ. स. १८९३ त जानेवारी महिन्यांत डाक्टर जिराड याने ह्या उन्हाळ्यांपैकीं ज्यांतून विपुल पाणी येत असतें त्याच्या पाण्याचें पृथक्करण केलें तेव्हां १०००० भाग पाण्यात २२.४३ भाग घन द्रव्य आहे असें त्याचे नजरेस आलें. साठ अंश उष्णतामान असतांना ह्या पाण्याचें विशिष्ट गुरुत्व १.००२० होतें. ह्या झऱ्यांतून दर मिनिटास सुमारें बारा ग्यालन पाणी त्या वेळीं येत होतें.

वसई तालुक्यांत कलभोण गांवाजवळ एका शेतांत तानसेपासून सुमारें १० पावलांवर एक उन्हाळें आहे. त्याचें पाणी मध्यम कढत असून त्याला गंधकाचा वास येतो. एथील जमीन तांबूस रंगाची आहे. ह्या खेरीज दुसरें उन्हाळें तालुक्यांत नाहीं.

भूकंप.—२६ डिसेंबर १८४९ रोजीं एक व १८७७ तील डिसेंबरांतील असे दोन धरणीकंपाचे धक्के ठाणें जिल्ह्यांत बसल्याचे आढळतो. इ. स. १८७७ तील धक्का बसण्यापूर्वी रस्त्यांतून [illegible] ओढीत नेल्यासारखा आवाज ऐकूं आला होता.

हवा.—कोंकणांतील इतर जिल्ह्यांप्रमाणें ह्या जिल्ह्यांतील हवा ही [illegible] महिने पर्यंत अतिशय ओलसर असते. या जिल्ह्यांत पाऊस

पुष्कळ पडतो व पुष्कळ प्रसंगीं मे महिन्यातच वरसातीची सुरवात होते. दक्षिण ( नैर्ऋत्येकडील ) वारा प्राय: जून महिन्याचे अखेरीस सुटतो व त्याचे बरोबर सुरू होणारा पाऊस सपटंबरच्या अखेरीपर्यंत पडत असतो. इ. स. १८८० पर्यंत तीस वर्षांच्या मुदतींत जो पाऊस प्रतिवर्षी पडला त्याची नोंद ठाणें एथील सिव्हिल हास्पिटलांत आहे. तिची सरा. सरी काढिली तर ती ९९ इंच व ९८ दोकडे येते. ह्या तीस वर्षांच्या अवधींत इ. स. १८५१ त अतिशय पाऊस पडला होता तो १५६.२५ इंच होता. त्याचे खालोखाल इ. स. १८७८ त पडला तो १५२.७६ इंच होता. इ. स. १८७१ त अतिथोडा पाऊस पडला तो ६४.७८ इंच होता. ठाणें शहरांत पडलेल्या पावसाच्या मानाची सरासरी जिल्हाभर पडणाऱ्या पावसाच्या मानाच्या सरासरीहून थोडी कमी येते. ज्या ठिकाणीं पाऊस मोजण्याचीं यंत्रें ठेविलेलीं आहेत अशा ठिकाणीं इ. स. १८८० पर्यंत २१ वर्षांच्या मुदतींत दर वर्षीं किती पाऊस पडला हें पुढील तक्त्यांत दिलें आहे. त्यावरून सर्व जिल्ह्यांत पडणाऱ्या एकंदर पावसाच्या मानाची सरासरी १०२.०७ इंच येते.

---



# पावसाचा तक्ता इ. स. १८६० ते १८८०

| गांव. | १८६० | १८६१ | १८६२ | १८६३ | १८६४ | १८६५ | १८६६ | १८६७ | १८६८ | १८६९ | १८७० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | इंच | इंच | इंच | इंच | इंच | इंच | इंच | इंच | इंच | इंच | इंच |
| उंबरगांव | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | ३४.०७ | ५३.७४ | ५०.७८ |
| डहाणू | ६५.४३ | १०३.५० | ६२.४५ | ७५.५३ | ५८.५६ | ७०.५१ | ७१.२१ | ६५.४२ | ४१.२१ | ५८.८३ | ६८.१७ |
| माहीम | ५४.४४ | ९६.३० | ७१.९१ | ८१.२४ | ४४.७६ | ६८.१२ | ७४.८० | ६३.३० | ५८.८० | ८०.३३ | ५३.१० |
| वसई | ६८.३१ | १७८.९० | ५९.८३ | ६५.६६ | ५३.९६ | ७२.१७ | ६५.९० | ५४.७९ | ५३.५९ | ७७.१४ | ५४.५७ |
| ठाणें | ८०.११ | १२८.३६ | ८५.२२ | ९८.४० | ७६.० | ९६.३८ | ९६.२९ | १०८.७७ | ९२.८५ | १०६.५६ | ९६.६३ |
| वाडे | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | ८५.४८ | ८३.७० | ८२.८७ | ८६.६१ |
| भिवंडी | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | ८८.६७ | ९०.९६ | ९४.८० | ७८.४० |
| पनवेल | ८८.९७ | १३७.२७ | ९०.५८ | १०६.४१ | ९१.२७ | ११४.१३ | १२४.५५ | १००.४१ | ९३.११ | ९१.१४ | १००.६६ |
| कल्याण | .. | .. | .. | .. | .. | ९२.४७ | ८५.२८ | ८३.९० | ६९.७० | ८१.७० | ७०.७० |
| करजें | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | ६८.३६ | १०२.३० | ९६.०९ |
| मोखाडे | ८२.०७ | ८८.१९ | ७४.२१ | १००.५३ | ७८.६० | ९४.५१ | ९७.५२ | ९६.८४ | ८३.५६ | ८१.३८ | ८९.८८ |
| शहापूर | ७९.९२ | ८७.३० | ११२.६८ | १०५.३९ | १५०.५० | १०१.४४ | ११३.८३ | १०१.१० | १०२.९५ | ७९.०२ | ८३.०३ |
| मुरबाड | ८१.८६ | ७९.८४ | ६५.० | ७५.४७ | ७२.९२ | ९७.३५ | ७४.९१ | ८१.८० | ८९.८२ | ७५.१४ | ८३.० |
| माथेरान | १९६.६६ | ३६५.२३ | २४७.१९ | ३१४.०९ | २३७.०४ | २९५.१६ | ३३९.२६ | ३९०.८१ | ४६७.४५ | २६५.८७ | ३१०.०६ |
| करजत | १०२.७८ | १५०.२७ | ९४.३३ | १२७.३३ | ६९.०८ | ११०.९८ | १०७.४३ | ११५.१८ | १२३.०७ | ८५.५८ | १०८.६३ |
| खालापूर | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | ९३.३८ | ९५.३६ | १२२.७८ |
| सरासरी | ९०.०५ | १४१.५२ | ९६.३४ | ११५.०१ | ९८.१८ | ११०.२९ | ११३.७२ | ११०.४९ | १०३.५३ | १००.७० | ९७.२६ |

| गांव. | १८७१ | १८७२ | १८७३ | १८७४ | १८७५ | १८७६ | १८७७ | ૧૮૭૮ | ૧૮૭૯ | १८८० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | इंच | इंच | इंच | इंच | इंच | इंच | इंच | इंच | इंच | इंच |
| उंबरगांव | २७.१६ | ६५.९२ | ६०.१८ | ७६.८० | ९५.६३ | ३७ ९१ | ३०.६९ | ૧૧૬.૪૪ | ૬૫.૪૦ | ६३.२२ |
| डहाणू | ३०.९९ | ६४.१९ | ४९.७८ | ८३.४४ | ८०.५६ | ४७.८९ | ३६ २७ | ૧૧૯ ૯૮ | ૬૪.૭૪ | ६१.११ |
| माहिम | ३१.१८ | ६६.४२ | ६३.६४ | ८४.०६ | ८५ ३६ | ४५ ५९ | ४१.३८ | ૧૦૫.૭૩ | ૬૨.૨૩ | ५४.५२ |
| वसई | २९.२८ | ५९.५७ | ५६.४० | १००.७५ | ८५.६८ | ५५.३० | ६४.० | ૧૧૨.૨૮ | ૭૩ ૮૩ | ८१.६१ |
| ठाणें | ६४.७८ | ८६.०६ | ९५.९७ | १३०.६० | ११४.६२ | ८८.३० | ६६ ५९ | ૧૪૨.૭૬ | ૧૦૦ ૧૬ | ८६ १६ |
| वाडें | ७४.७८ | ८९.२२ | ८६.२२ | १२९.९५ | ११७.५९ | ८२.६० | ४८.५३ | ૧૩૫.૪૩ | ૯૦.૬૭ | ९१.२३ |
| भिवंडी | ६०.२७ | ८६.३५ | ७५.७१ | १२४.५६ | १११.९० | ८६ ७१ | ५८.९६ | ૧૪૨.૮૨ | ૮૭.૬૨ | ९७.७१ |
| पनवेल | ९७.५७ | १२२.९५ | १०६ १७ | १३६.७९ | ११८.०९ | ८२ ७० | ८४.५० | ૧૫૪.૦૪ | ૯૩ ૧૪ | ९७ ५० |
| कल्याण | ४७.४० | ६३.७० | ७३.० | ११०.४० | १०२.५२ | ८०.३४ | ५७.५६ | ૧૩૨ ૭૯ | ૯૨.૭૨ | ९४.०३ |
| करजें | ४७.१९ | ९६.९९ | ९३.४७ | १२४ १२ | ११६.३७ | ६७.१८ | ७१ ५४ | ૧૪૧.૧૦ | ૮૦.૮૬ | ८७.३९ |
| मोखाडें | ७५.२२ | ९८.९९ | ८५.९७ | १०१.०५ | ११३.४० | ७७ ९५ | ५५.४६ | ૧૨૭.૮૨ | ૧૧૦.૫૯ | ९६.५० |
| शाहापूर | ८१.५४ | १०१.५७ | ७९.२१ | १०७ ५६ | १२३.५७ | ८७.८३ | ६७.६२ | ૧૫૬.૯૧ | ૧૧૩.૭૫ | १०५ २६ |
| मुरबाड | ६२.४१ | ८७.९८ | ८५.३४ | १०९.४६ | १२३.९५ | ८५.६९ | ४५.८६ | ૧૧૬.૧૧ | ૧૦૮.૦૩ | ८२.९४ |
| माथेरान | १५६.५३ | १७८.७५ | १७९.८६ | २१५.५० | २१३ ३९ | १९१.४९ | १३५ २३ | ૨૭૩.૧૨ | ૧૩૩.૦૭ | १९३.३१ |
| करजत | ७८.७९ | १२२.८९ | ८८.६२ | १४२.४० | १६२ ६४ | १२५ ५७ | ८३.०३ | ૧૬૬.૮૯ | ૧૨૩.૫૯ | ११६.८४ |
| खालापूर | ९६.२९ | १२०.२५ | १०१.५० | १४५.०३ | १३१ ५२ | ९४.८४ | ७४.६८ | ૧૫૩.૫૫ | ૧૦૯.૬૪ | ११६.५१ |
| सरासरी | ६५.२१ | ९४.५१ | ८६.३१ | १२०.१४ | ११८.५१ | ८३.६१ | ६३.८६ | ૧૪૪.૮૬ | ૯૮.૧૫ | ९५ ३६ |

सर्व सरासऱ्यांची सरासरी १०२.०७

ठाणें शहरचा पावसाचा तक्ता इ. स. १८५१ ते ~~१८७०~~ १८८०

| वर्ष. | इंच. | दाकडे. | वर्ष. | इंच. | दाकडे. | वर्ष. | इंच. | दोकडे. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८५१ | १५६ | २५ | १८६१ | १२८ | ३६ | १८७१ | ६४ | ७८ |
| १८५२ | ११४ | ४ | १८६२ | ८५ | २२ | १८७२ | ८६ | २ |
| १८५३ | ८८ | ४७ | १८६३ | ९८ | ४० | १८७३ | ९५ | ९७ |
| १८५४ | ११८ | ७४ | १८६४ | ७६ | .. | १८७४ | १३० | ६० |
| १८५५ | ७९ | २४ | १८६५ | ९६ | ३८ | १८७५ | ११४ | २ |
| १८५६ | .. | .. | १८६६ | ९६ | २९ | १८७६ | ८८ | ३० |
| १८५७ | .. | .. | १८६७ | १०८ | ७७ | १८७७ | ६६ | ६९ |
| १८५८ | ७९ | ४४ | १८६८ | ९२ | ८५ | १८७८ | १५२ | ७६ |
| १८५९ | ९६ | ५२ | १८६९ | १०६ | ५६ | १८७९ | १०० | १६ |
| १८६० | ८० | ११ | १८७० | ९४ | ६३ | १८८० | ८६ | १६ |

समुद्र किनाऱ्यावरील मुलखापेक्षां किनाऱ्यापासून दूरच्या मुलखांत पावसाच्या सरासरीचें मान अधिक असतें. तसेंच दक्षिणेकडील पट्ट्यापेक्षां उत्तरेकडील पट्ट्यांत पावसाचें मान कमी असतें. इ. स. १८८० पर्यंत वीस वर्षांच्या मुदतींत माथेरान एथें पडलेल्यापावसाची २६३ इंचसरासरी निघते. मुंबईइलाख्यांत इतकें पावसाचें मान इतर कोठेंही नाहीं. मार्च व एप्रिल महिन्यांत किनाऱ्या पासून दूरच्या मुलखांत कढत वारा येत असतो. परंतु किनाऱ्या वरील मुलखांत असा कढत वारा कधींच येत नाहीं. हा कढत वारा कोणत्याही ठिकाणीं फार संध्याकाळ होईतों राहात नाहीं. आक्टोबर महिन्यांत येणारी सुंदर व स्वच्छ हवा इचे बरोबर कर्दमोत्थविष [म्यालेरिया] येत असल्यामुळें किनाऱ्यावरील प्रदेशांखेरीज इतर ठिकाणीं अतिशय तापाची सांत येते ही दुर्दैवाची गोष्ट आहे. दाट जंगली प्रदेशांत ताप फार घातक असतो व तो थंडीचे दिवस येऊन बराच काळ जाईपर्यंत टिकतो. गुजराथ किंवा दक्षिण या प्रांतांतील थंडीची मुदत जितकी असते तिचेहून या जिल्ह्यांत ती कमी असून त्या प्रांताइतकी शक्तिवर्धकही नसते. दिसेंबर महिन्याचे पूर्वीं प्रायः थंडी पडूं लागत नाहीं. थंडीचे दिवसांत रात्रीस मनाला आनंद होण्यासारखा गारवा असतो तरी किनाऱ्यापासून दूरच्या मुलखांत दिवसास प्रायः नेहमी कडक ऊन पडतें. एकंदरीनें आरोग्याचे संबंधानें ठाणे जिल्ह्याचा लौकिक नाहीं व तसा असण्याचीही योग्यता या जिल्ह्याचे हवेंत नाहीं.

वर्षाच्या निरनिराळ्या ऋतूंत उष्णतेच्या मानांत फार न्यूनाधिक्य होतें. कधीं कधीं समुद्रावरून येणाऱ्या खाऱ्या वाऱ्यानें व विशेषतः दक्षिण [ नैर्ऋत्य ] वारा सुटला ह्मणजे त्याचे योगानें हवेंत गारवा येतो. आणि कधीं कधीं मार्च व एप्रिल महिन्यांत डोंगरावरून येणारे वारे व जमिनीवरून येणारी मतलय यांचे योगानें हवेंत उष्णता येते. उष्णतेचें वार्षिक मध्यम मान ७९ अंश ९८ दोकडे आहे. जानुवारी महिन्यांत उष्णतामानाची सरासरी अति कमी असते व मे महिन्यांत उष्णतामानाची सरासरी अति मोठी असते.

## तालुके.

—— ००० ——

**डहाणू**—हा तालुका जिल्ह्याच्या उत्तर टोंकाला आहे. ह्या तालुक्यांत उंबरगांव पेटा व जव्हार संस्थानचा कांहीं भाग येतो. ह्याचे उत्तरेस सुरत जिल्हा व दमण प्रांत आहे. पूर्वेस दमण प्रांत, मोखाडे पेटा व जव्हार संस्थान हीं आहेत. दक्षिणेस जव्हार संस्थान व माहीम तालुका आहे आणि पश्चिमेस समुद्र आहे. ह्याचें क्षेत्रफळ ६४३ चौरस मैल आहे. इ. स. १८८१ त ह्यांत १,०९,३२२ लोक होते. त्यावरून दर चौरस मैलास १७० लोक पडतात. इ. स. १८८० त ह्या तालुक्याचा जमिनीच्या साऱ्याचा वसूल १,२६,८४० रुपये होता.

**देखावा**—ह्या तालुक्यांतील जमीन उंच सखल अशी क्रमाक्रमानें होत गेलेली असल्यामुळें तिच्या ठायीं वैचित्र्य आलेलें आहे. समुद्रापासून दूर असणाऱ्या बहुतेक भागांत रानानें आच्छादिलेले डोंगर आहेत. ते परस्परांपासून तुटक असून त्यांची उंचीही कमजास्ती आहे. समुद्रकिनाऱ्या जवळच्या प्रदेशांत विस्तीर्ण अशीं सपाट मैदानें आहेत. त्यांची सपाटी समुद्राचे सपाटीहून फारशी उंच नाहीं व त्यांत ज्या खाड्या आहेत त्यांचे पाण्याला भरती ओहोटी लागते.

**हवा**—समुद्रकिनाऱ्यावरील गांवांची हवा रमणीय असून फार फेरफार न होणारी अशी आहे; तरी पावसाचे दिवस गेल्यावर दोनतीन महिने पर्यंत ती ताप उत्पन्न करते. किनाऱ्यापासून दूर असणाऱ्या गांवांची हवा उन्हाळ्याखेरीज इतर ऋतूंत फार रोगकारक असते. इ. सन. १८८१

| वर्ष. | जानेवारी | | फेब्रुवारी | | मार्च | | एप्रिल | | मे | | जून | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अति लहान मान | अति मोठें मान | अति लहान मान | अति मोठें मान | अति लहान मान | अति मोठें मान | अति लहान मान | अति मोठें मान | अति लहान मान | अति मोठें मान | अति लहान मान | अति मोठें मान |
| १८७१ | ६५.९ | ८९.४ | ६६.६ | ९०.८ | ६२.० | ९१.७ | ६३.० | ९१. | ६३.० | ९३.० | ६३.० | ९०.० |
| १८७२ | ५७.१ | ८२.४ | ६३.२ | ९२.६ | ७३.१ | ९४.६ | ८२.५ | ९५ | ८२.५ | ९४.५ | ८१.५ | ८७.८ |
| १८७३ | ६१.२ | ८६.७ | ६४.२ | ८९.३ | ७१.६ | ९०.३ | ८१.५ | ९१. | ८३.५ | ९४.७ | ८०.९ | ८७.८ |
| १८७४ | | | | | | | | | ८१.२ | ९३.९ | ७८.८ | ८६.४ |
| १८७५ | ५०.८ | ८४.५ | ६१.२ | ८९.१ | ६८.८ | ९५.६ | ७६.० | ९७.० | ७६.० | ९६.० | ८५.० | ८७.० |
| १८७६ | ६३.६ | ८०.२ | ६७.० | ८९.० | ७६.८ | ९३.६ | ८३.० | ९७.१ | ८३.० | ९४.० | ८०.० | ९०.० |
| १८७७ | ६३.६ | ८०.८ | ६७.१ | ८९.७ | ७६.८ | ९३.३ | ७७.३ | ९७.१ | ८३.० | ९४.० | ८०.० | ९०.० |
| १८७८ | ६२.५ | ८३.० | ६५.८ | ९१.१ | ७०.९ | ९३.३ | ७५.५ | ८९.५ | ७५.९ | ९६.६ | ८१.७ | ८९.० |
| १८७९ | ६३.० | ८४.० | ६६.८ | ८५.० | ७२.० | ९४.३ | ७८.५ | ९८.४ | ८२.२ | ९७.० | ८०.३ | ९०.५ |
| १८८० | ६३.२ | ८८.० | ५८.७ | ८५.७ | ६८.२ | ९८.५ | ८६.० | ९९.७ | ८८.० | ९९.० | ८३.६ | ९५.० |
| सरासरी { अति मोठी | .. | ८९.१ | ... | ८८.७ | .. | ९३.४ | ... | ९५.२ | ... | .. | .. | ८९.३ |
| सरासरी { अतिलहान | ६१.८ | ... | ६६.३ | ... | ७०.८ | ... | ७८.४ | .. | ७९.९ | ९५.० | ७९.२ | ... |
| फेरफारांची सरासरी | २३.३ | | २२.४ | | २२.६ | | १६.८ | | १५.१ | | १०.१ | |
| उष्णता मानाचें मध्यम प्रमाण | ७३.४ | | ७७.५ | | ८२.१ | | ८६.८ | | ८७.४ | | ८४.२ | |

| वर्ष | जुलै | | आगष्ट | | सप्टंबर | | आक्टोबर | | नवंबर | | दिसबरें | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अति लहान मान | अति मोठें मान | अति लहान मान | अति मोठें मान | अति लहान मान | अति मोठें मान | अति लहान मान | अति मोठें मान | अति लहान मान | अति मोठें मान | अति लहान मान | अति मोठें मान |
| १८७१ | ६२.७ | ८७.४ | ६८.० | ९१.० | ६३.० | ९१.० | ६३.० | ९१.० | ६९.९ | ९१.० | ६६.० | ९१.२ |
| १८७२ | ७७.९ | ८४.१ | ७४.७ | ८३.९ | ७५.६ | ८८.६ | ७२.० | ८८.६ | ६८.६ | ९१.२ | ७०.० | ८८.२ |
| १८७३ | ६१.२ | ८६.७ | ६४.२ | ८३.३ | ७०.६ | ९०.३ | ८१.५ | ९१.५ | ८१.५ | ९४.१ | ८०.१ | ८७.८ |
| १८७४ | ६०.० | ८२.० | ६३.६ | ८६.१ | ६८.० | ९०.० | ८१.२ | ९१.६ | ८१.२ | ९३.९ | ७८.८ | ८६.४ |
| १८७५ | ५७.८ | ८४.५ | ६१.२ | ८९.१ | ६८.८ | ९०.६ | ७६.७ | ९७.० | ७६.० | ९६.० | ८५.० | ८७.० |
| १८७६ | ७४.० | ८१.० | ७६.० | ८३.० | ६७.० | ८२.० | ७१.२ | ८४.३ | ६९.० | ८७.० | ६६.० | ८६.० |
| १८७७ | ७४.० | ८१.० | ७२.० | ८३.० | ६७.० | ८२.० | ६१.२ | ८५.९ | ६९.० | ८७.३ | ६६.० | ८६.० |
| १८७८ | ७७.२ | ८४.० | ७८.२ | ८०.९ | ६६.५ | ७१.५ | ७४.९ | ८८.७ | ७०.७ | ८८.५ | ६२.१ | ८४.१ |
| १८७९ | ७९.६ | ८३.७ | ७७.५ | ८०.९ | ७६.० | ८२.५ | ७५.६ | ८५.३ | ६५.२ | ८६.० | ६२.५ | ८४.७ |
| १८८० | ७६.४ | ८२.४ | ७७.४ | ८६.६ | ७४.५ | ८२.१ | ७५.३ | ८८.० | ७४.७ | ८७.७ | ६६.० | ८८.२ |
| सरासरी अति मोठीं | ... | ३८.८ | ... | २ ८८ | ... | ८३.९ | ... | ८६.८ | .. | ८८.४ | ... | ८६.९ |
| सरासरी अति लहान | ७०.७ | ... | ७४.१ | ... | ७०.९ | .. | ७०.७ | ... | ६८.५ | ... | ६४.७ | ... |
| फेरफारांची सरासरी | ९१ | | ९७ | | १३.० | | १६.१ | | १९.९ | | २२.२ | |
| उष्णता मानाचें मध्यम प्रमाण | ७९.२ | | ७८.७ | | ७७.४ | | ७८.५ | | ७८.४ | | ७५.८ | |

पर्यंतच्या दहा वर्षांच्या मुदतींत पडलेल्या पावसाची सरासरी ६३ इंच निघते.

**पाणी**— ह्या तालुक्यांत चार नद्या मुख्य आहेत. त्यांपैकीं दमणगंगा उत्तर भागांत, काळू पूर्व भागांत, सूर्या दक्षिण भागांत व वाकुली पश्चिमभागांत आहे. विशेषतः समुद्रकिनाऱ्याजवळच्या गांवांत पाण्याचा पुरवठा मध्यम प्रतीचा आहे. इ. स. १८८१–८२ त नद्यांना बांधलेलीं ४ धरणें, १५७ तळीं, ६८५ विहिरी [ पैकीं ८ पायऱ्यांच्या व ६७७ बिनपायऱ्यांच्या ], व २१७ नद्या, नाले, व झरे ह्या तालुक्यांत होते.

**जमीन**—ह्या तालुक्यांतील जमीन बागायतीचे योग्य आहे असें म्हणतात तरी बागायती उत्पन्न फारसें यांत होत नाहीं. तांदूळ हें मुख्य पीक असून समुद्रकिनाऱ्यापासून दूरच्या भागांत नाचणी होते. उत्तरेकडील भागांत एरंडी होते.

**पीक**—भात, कोद्रू, नाचणी ऊर्फ रागी, (हरीक) वरी, गहूं, ज्वारी, हरभरा, मूग, तूर, उडीद, वाटाणा, तीळ, आंबाडी व ऊंस हे जिन्नस ह्या तालुक्यांत पिकतात.

**लोक**—मुसलमान, पारशी, किरिस्तांव, व हिंदु ह्या चार जातींचे लोक ह्या तालुक्यांत आहेत. हिंदूंमध्यें ब्राह्मण, कायस्थ परभु, वाणी, जैन, लोहाणे, तांबोळी, भाट्ये, लिंगायत, कुणबी, कामळी, माळी, वणजारी, आगरी, चोखार, चारण, हेटकरी, कामाठी, तेली, कोष्टी, सणगर, सुतार, कुंभार, लोहार, सोनार, शिंपी, पाथरवट, बेलदार, कांसार, तांबट, गुरव, भोरपी, भाट, न्हावी, परीट, गवळी, धनगर, कानडे, मच्छी, मांगेले, खारवी, भोई, भंडारी, परदेशी, खाटीक, बुरुड, दुबळे, वारली, कोंकणी, धोंडपे, कातकरी, ठाकूर, भील, चांभार, म्हार, भंगी, गोसावी, बैरागी, बराडी, जंगम, जोगी, कोल्हाटी, व कापडी अशा पोट जाती आहेत.

**माहीम**—हा तालुका ह्या जिल्ह्याचे पश्चिम भागांत आहे. ह्याचे उत्तरेस डहाणू तालुका, पूर्वेस जव्हार संस्थान व वाडें तालुका, दक्षिणेस वैतरणा नदी व वसई तालुका, आणि पश्चिमेस समुद्र आहे. ह्या तालु-

क्याचें क्षेत्रफळ ४१९ मैल असून लोकसंख्या ७७,३६० असल्यामुळें दर चौरस मैलास १८४ लोक वसतात. ह्या तालुक्यांत जमीन बाबीचें उत्पन्न १,१७,६९० रुपये आहे.

देखावा--ह्या तालुक्याचे मधोमध उत्तरदक्षिण जाणाऱ्या व रानानें आच्छादिलेल्या उंच डोंगरांच्या एका रांगेचे योगानें ह्या तालुक्याचे दोन भाग झालेले आहेत. इ. स १८८१ त ह्या डोंगराचे मध्यभागीं चाहाड खिंडींतून सडकेचा रस्ता करण्यांत आला. तो होण्यापूर्वीं पूर्वेकडील भागां तून पश्चिमेकडील भागांत जाण्यास महागांवाचे उत्तरेस दोन मैलांवर असलेल्या वाटेखेरीज दुसरी वाट गाड्या जाण्यासारखी नव्हती. ह्या डोंगरांच्या रांगेच्या पूर्वेस सूर्यानदी आहे. ती वैतरणेला मिळेपर्यंत तिचा ओघ ह्या डोंगरांच्या रांगेशीं समांतर असा आहे. ह्या तालुक्याच्या ईशान्य कोप ऱ्यांत उंच डोंगर पुष्कळ असून त्यांचे शिखरांना करकोचे पडलेले आहेत. ह्या शिखरांत अशेरी हें मुख्य शिखर आहे. तसेंच ह्या तालुक्याचे आग्नेय भागांत टकमक शिखर आहे त्याची समुद्राचे सपा टीपासून उंची २००० फूट आहे. समुद्रकिनाऱ्यापासून दूर असणारा बाकीचा ह्या तालुक्याचा भाग उंचसखल असा क्रमाक्रमानें झालेला आहे व त्याची सपाटी नद्यांच्या सपाटीहून फारच थोडी उंच आहे; ह्या तालुक्याच्या मधोमध असणाऱ्या डोंगरांच्या पश्चिमेकडील भागांतील जमीन सखल व सपाट असून तींत मधून मधून दलदली व भरती ओहोटीचें पाणी आंत शिरण्यासारख्या लहान लहान खाड्या आहेत.

हवा—ह्या तालुक्यातील समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेशांतील हवेंत फार फेरफार होत नसून ती रमणीय असते. परंतु समुद्रकिनाऱ्यापासून दूर असलेल्या प्रदेशांत उन्हाळ्याचे दिवसांत उष्णता अतिशय असते; विशेषतः पावसाळ्यांत व पावसाळ्यानंतर ह्या तालुक्यांतील समुद्रकिनाऱ्या वरील प्रदेशांत व समुद्रकिनाऱ्यापासून दूरच्या प्रदेशांत हवा रोगकारक व ज्वरोत्पादक असते. इ. स. १८८१ अखेर पर्यंत १० वर्षांचे मुदतींत पडलेल्या पावसाची सरासरी ६४ इंच येते.

पाणी----समुद्राचे भरतीचें पाणी जेथपर्यंत पोंचतें त्याचे पलीकडचे भागांत वैतरणा व सूर्या ह्या दोन नद्यांपासून या तालुक्यांतील लोकांना सर्व

वर्षभर गोडे पाण्याचा पुरवठा होतो. ह्या दोन नद्या जेथें नाहींत अशा ह्या तालुक्यांतील प्रदेशांतही पाण्याचा पुरवठा बराच आहे. वैतरणा नदीचा उगम सह्याद्रींत असून, ती ह्या तालुक्याच्या पूर्वसीमेवर येऊन मिळल्यावर आठ मैलपर्यंत उत्तराभिमुख होत्साती या तालुक्याचे पूर्व सीमेवरून वहात जाते. टेन्हें गावाजवळ देहेरजा नदी तिला मिळाल्यावर ती या तालुक्यांत शिरते. टेन्ह्यांजवळ ती एकदम वळून नैर्ऋत्याभिमुख वहू लागते ती सुर्या नदीला मिळेपर्यंत आठ मैल होत तों तशीच वहाते. सूर्या नदी तिला मिळाल्यावर सुमारें बारा मैलपर्यंत ती दक्षिण वाहिनी झालेली आहे. पुढें पश्चिमवाहिनी होऊन ह्या तालुक्याचे सीमेवरून समुद्रापर्यंत ती जाते. तिच्या मुखापासून पंचवीस मैलांवर मनोरगांव आहे तेथपर्यंत १०० खंडींचीं देशी तारवें तरण्यासारखें पाणी तींत असतें. वैतरणेच्या वर सांगितलेल्या वळणांत, रानानें आच्छादिलेल्या डोंगरांच्या रांगांमधील घळींत, एक ओढा घळीच्या आरंभापासून अखेरपर्यंत वहात असतो. ह्या ओढ्याच्या कांठावर साटिवली एथें एक उन्हाळें आहे. मनोरच्या जवळच वैतरणेचे कांठीं सायें गांवाजवळ दुसरें एक उन्हाळें आहे. इ. स. १८८१-८२ त ह्या तालुक्यांत २७० तळीं व १२८४ विहिरी होत्या. त्यापैकीं ९ विहिरींना आंत उतरण्यास पायऱ्या होत्या व बाकीच्या १२७५ रांना पायऱ्या नव्हत्या. तशीच नद्या, ओढे, व झरे यांची एकंदर संख्या त्या वर्षीं १५४ होती.

**जमीन**—या तालुक्यांतील जमीन कोठें तांबडी, कोठें काळी, व कोठें वाळवेसारखी काळी आहे. मुख्य पीक भाताचें होतें. ज्या जमिनींत भात पिकतें तिचेहून कडदण पिकणारी व वरकस जिराइत होणारी जमीन ह्या तालुक्यांत अधिक आहे. नाचणी व तूर आदिकरून द्विदळ धान्यें वरीच होतात. समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेशांत पानवेल व केळी हीं बागायती पिकें फार होतात. ताडाचीं झाडें ह्या तालुक्यांत सर्व ठिकाणीं पुष्कळ आहेत.

**लोक**—हिंदु, मुसलमान, पारशी, व ख्रिस्ती या चार जातींचे लोक या तालुक्यांत आहेत.

**वाडें**—पूर्वीं ज्याला कोळवण म्हणत व हल्लीं ज्याला शहापूर तालुका म्हणतात त्यांत वाडें हा एक पेटा इ. स. १८६६ पर्यंत होता. ह्या

तालुक्याचे उत्तरेस जव्हार संस्थान व देहरजा नदी आहे. ही नदी हा तालुका व वसई तालुक्याचा कांहीं भाग ह्यांचेमधील सीमेवर आहे. ह्या तालुक्याचे पूर्वेस शहापूर तालुका आहे, दक्षिणेस तानसा नदी आहे; ती हा तालुका व भिवंडी तालुका यांचे मधील सीमेवर आहे. पश्चिमेस वैतरणा नदी व तिच्या दक्षिण तीरावरील डोंगराळ प्रदेश आहे. तो हा तालुका आणि वसई व माहीम हे दोन तालुके यांच्या दरम्यानचे सीमेवर आहे. ह्या तालुक्याचें क्षेत्रफळ ३०९ चौरस मैल आहे. इ. स. १८८१ त ह्या तालुक्यांत ३६,४९७ लोक होते. त्यावरून दर चौरस मैलास ११८ लोक वसतात. इ. स. १८८० त ह्या तालुक्याचें जमिनबाबीचें उत्पन्न ४८,९५० रुपये होतें.

देखावा----ह्या तालुक्यांत उत्तर टोकापासून दक्षिण टोकापर्यंत वैतरणा नदी आहे. तिच्या थडीवरील प्रदेशांत गांवें बरींच असून जमिनीची लागवडही चांगली होते. ह्या तालुक्याचा बाकीचा प्रदेश व विशेषतः वायव्य आणि पूर्व या दिशांकडील प्रदेश फार डोंगराळ असून त्यांत लोकवस्ति फारच थोडी आहे. ह्या तालुक्यांत सडका बांधलेल्या नाहींत; व जे इतर रस्ते आहेत ते पावसाळ्यांत बंद पडतात.

हवा—आक्टोबरपासून फेब्रुवारीपर्यंत या तालुक्यांतील हवा अतिशय रोगकारक असते व प्रत्येक गावांत ताप जारीनें चालू असतो. झाडी पुष्कळ असल्यामुळें ठाणें जिल्ह्यांतील कांहीं इतर तालुक्यांपेक्षां या तालुक्यांतील हवा उन्हाळ्यांत कमी वाईट असते. इ. स. १८८१ पर्यंत दहा वर्षांच्या मुदतींत पडलेल्या पावसाची सरासरी ९४ इंच येते.

पाणी—समुद्रकिनाऱ्यापासून दूर असणाऱ्या ह्या तालुक्यांतील प्रदेशांत वैतरणा व वेह्मा ह्या दोन नद्यांपासून पाण्याचा पुरवठा निरंतर बराच होतो. इतर भागांत जेथें विहिरींचें पाणी काढावें लागतें तेथें तें वाईट असून सदोदित पुरतें असेंही नाहीं. वेह्मा नदीचा उगम मोखाडें पेठ्यांतील डोंगरांत होऊन ती नैर्ऋत्यवाहिनी होत्साती सुमारें ५० मैलांवर वहात गेल्यानंतर वाड्याजवळ वैतरणेला मिळते. पुढें दोघींना ही वैतरणा हेंच नांव प्राप्त होऊन त्या समुद्राला मिळतात. ह्या नद्यांच्या

पात्रांत जेथें गोडें पाणी असतें तेथें तारवें तरण्या इतकें तें कोणत्याही स्थळीं खोल नाहीं. ह्या तालुक्यांत इ. १८८१-८२ त ११ तळीं व २४९ विहिरी होत्या. त्यां पैकीं बारांना आंत उतरण्यास पायऱ्या होत्या व बाकीच्या २३७ ना पायऱ्या नव्हत्या. तसेंच त्यावर्षी ह्या तालुक्यांत नद्या, ओढे व झरे मिळून १४३ होते.

**जमीन**--ह्या तालुक्यांत मुख्य पीक भाताचें होतें. तथापि नाचणी, तूर, व वरी यांची लागवडही बरीच होत असते. वैतरणेच्या कांठावर धान्य फार पिकतें. ह्या सगळ्या तालुक्यांत झाडी फार असून कित्येक स्थळीं कित्येक मैल पर्यंत एक सारखें रान पसरलेलें असतें. रानांत साग, ऐन, मोह, व खैर हीं झाडें मुख्यत्वें करून असतात.

**जिन्नस**—भात, नाचणी ऊर्फ रागी, चणा, गहूं, तूर, हरभरा, मूग, वाटाणा, उडीद, ज्यांपासून तेल निघतें अशीं धान्यें ह्म. राई (मोहरी) तीळ इ. आंबाडी, सण, फळ फळावळ व माळवें हे जिन्नस ह्या तालुक्यांत होतात.

**लोक**—हिंदु, मुसलमान, किरिस्ताव, व पारशी या चार जातींचे लोक ह्या तालुक्यांत आहेत. वसई तालुका—हा तालुका ह्या जिल्ह्याचे पश्चिमेकडील भागांत आहे. ह्याचे उत्तरेस वैतरणा नदी, व माहीम तालुका, पूर्वेस वाडे व भिवडी, हे तालुके, दक्षिणेस ठाण्याची ह्म. वसईची खाडी, आणि पश्चिमेस समुद्र आहे. ह्या तालुक्याचें क्षेत्रफळ २२१ चौरस मैल असून लोक वस्ती इ. १८८१ त ६८९९७ असल्यामुळें दर चौरस मैलास ३१२ लोक वसतात. इ. स १८८० त ह्या तालुक्याचें जमीन बाबीचें उत्पन्न १२६७१० रुपये होतें.

**देखावा**—ह्या तालुक्याचे मध्यभागीं तुंगारचा डोंगर आहे. ह्या डोंगरापासून दक्षिणेकडे जी एक डोंगराची रांग जाते तींत कामनदुर्ग ह्मणून एक प्रसिद्ध डोंगर आहे. व तो वसई, व भिवडी या तालुक्यांचे सीमेवर आहे. तुंगारच्या वायव्येस लहान लहान पुष्कळ डोंगर आहेत. त्यांत निली मोरा, करोडों, व जीवधन हे मुख्य आहेत. १९०० पासून २००० फुटी पर्यंत ह्या डोंगरांची उंची आहे. तुंगारच्या पश्चिमेकडील व पूर्वेकडील प्रदेश समुद्राचे सपाटी इतकाच प्राय उंच आहे.

व त्या डोंगराच्या दोहीं बाजूंस ह्या प्रदेशांत मधून मधून खाड्या आहेत. त्यांत मोठमोठीं तारवें तरण्यासारखें खोल पाणी असतें. समुद्र किनाऱ्याच्या ह्या तालुक्यांतील प्रदेशांत पुष्कळ मातबर गांवें असून वस्ती दाट आहे.

**हवा**—समुद्र किनाऱ्यावरील प्रदेशांतील हवा प्रायः रमणीय व सदोदित सारखी असते तरी कधीं मधीं तींत अतिशय उष्णता येते. किनाऱ्यापासून दूरच्या प्रदेशांत उन्हाळ्याचे दिवसांत उष्णता फार असते व थंडीचे दिवसांत दिवसाचे व रात्रीचे उष्णता मानांत फारच फेर असतो. पावसाळ्याचे दिवसांत ह्या प्रदेशांतील हवा रोगोत्पादक व ज्वरोत्पादक असते आणि उन्हाळ्याचे अखेरीस नेहमीं महामारीचा उपद्रव उद्भवतो. इ. स. १८८१ पर्यंत दहा वर्षांचे मुदतींत पडलेल्या पावसाची सरासरी ७१-८७ इंच येते.

**पाणी**—गोड्या पाण्याच्या नद्या व ओढे ह्मणण्यासारखे ह्या तालुक्यांत नाहींत. तसेंच तळीं व विहिरी यांचे पासून होणारा पाण्याचा पुरवठाही जितक्यास तितकाच आहे. इ. स. १८८१-८२ त ह्या तालुक्यांत १२१ तळीं व २६२४ विहिरी होत्या. त्यां पैकीं २५ नां पायऱ्या होत्या व इतरांना नव्हत्या. तसेंच नद्या, ओढे, व झरे मिळून त्या सालीं ह्या तालुक्यांत ४० होते. ह्या तालुक्यांतील बहुतेक विहिरी जमीनींत खणलेल्या खळग्यां सारख्याच असून कित्येकांची खोली एका फुटाहून अधिक नसते.

**जमीन**—ह्या तालुक्यांतील जमीन कोठें लाल, कोठें काळी, आहे. समुद्र किनाऱ्यावरील प्रदेशांत सुमारें तीन मैल लांबीचा एक चिंचोळा प्रांत आहे तेथील जमीन मातबर मळईची असून तींत थोडें जमीनींत खणलें ह्मणजे उत्तम पाणी विपुल सांपडतें. एथील जमीनीला राहाटाचे योगानें पाणी दिलें ह्मणजे तींत केळीं, उंस, नारळ, इत्यादि बागायती उत्पन्न होते. ह्या तालुक्याचे इतर भागांत भात व नाचणी हीं मुख्य पिकें असून किनाऱ्यावरील कांहीं गांवांत तूर व हरभऱ्या खेरीज इतर रबीचे जिन्नस उत्पन्न होण्यासारखे जमीनीचे सुपीक प्रदेश आहेत.

**जिन्नस**—भात, नाचणी, चेणा, कोद्रु, हरभरा, तूर, मूग, उडीद,

तीळ आदिकरून तेलांचीं बियें, आंबाडी, ऊंस, फळफळावळ, भाजीपाला व माळवें हे जिन्नस ह्या तालुक्यांत होतात.

**लोक**—हिंदु, मुसलमान, किरिस्तांव व पारशी या चार मुख्य जातींचे लोक ह्या तालुक्यांत आहेत.

**भिवंडी तालुका**—ह्या तालुक्याच्या उत्तरेस तानसा नदी आहे. ती वाडे तालुका आणि हा तालुका ह्यांचे दरम्यान आहे. ह्या तालुक्याचे पूर्वेस शहापूर तालुका, दक्षिणेस भातसा व उल्लास ह्या नद्या, पश्चिमेस डोंगर व ठाण्याची ह्मणजे कल्याणची खाडी आहे. ह्या तालुक्याचें क्षेत्रफळ २५० चौरस मैल असून त्यांत ७५,२६२ लोक असल्यामुळें दर चौरस मैलास ३०१ लोक वसतात. ह्या तालुक्याचा जमीन बाबीचा वसूल १,२९,२५० रुपये आहे.

**देखावा**—ह्या तालुक्याच्या मध्यभागांत वस्ती असून जमिनीची लागवड ही पुष्कळ होते. दक्षिणेकडील भाग खेरीजकरून बाकीचा ह्या तालुक्याचा सगळा भाग डोंगरांनीं वेष्टिलेला आहे. ह्या तालुक्यांत उत्तर दक्षिण वाहणारी नदी कामवाडी हिचा पाणलोट ह्या डोंगरांतच आहे. ह्या तालुक्याचा पश्चिम भाग डोंगराळ असून त्यांत वस्तीही पातळ आहे. पूर्व भागांत भातसा नदीच्या कांठावर एक सखल प्रदेश आहे त्यांत जमिनीची लागवड चांगली होते. आग्र्यास जाणारा रस्ता व त्याची एक लहानशी शाखा यांचे खेरीज दुसरे रस्ते सडक बांधून तयार केलेले नसल्यामुळें पावसाळ्यांत व्यापाराचा माल जाण्यास मोठी अडचण येते.

**हवा**—पावसाळा गेल्यावर पश्चिमेकडील भागांतील हवा ताप उत्पन्न करणारी आहे. ह्या तालुक्याच्या इतर भागांतील हवा प्रायः निरोगी असून ठाणें शहराचे हवेपेक्षां ती कमी ग्लानि उत्पन्न करणारी आहे. उन्हाळ्याचे दिवसांत हवा ओलसर व कुंद असते. तथापि समुद्राच्या लगत्याच्या भागांत समुद्रापासून दूर असणाऱ्या भागांपेक्षां हवा अधिक रमणीय असते. इ. स. १८८१ पर्यंत दाहा वर्षांच्या मुदतींत भिवंडी शहरांत जो पाऊस पडला त्याची सरासरी ९४ इंच येते. ह्या तालुक्याच्या वायव्य भागांत डोंगर पुष्कळ व उंच असल्यामुळें तेथें इतर भागांपेक्षां अधिक पाऊस पडतो.

**पाणी**—ह्या तालुक्यांत पाण्याचा पुरवठा बराच विपुल आहे. उत्तरेकडील भागांत तानसा नदीपासून तिच्या कांठापासून सर्व वर्षभर पाण्याचा पुरवठा होतो. इतर भागांत तळीं व विहिरी ह्यांचे पासून पाणी मिळतें. परंतु तें निरोगी नसतें. तानसा, कामवाडी, संतनू, व कर्मगी, ह्या तालुक्यांत मुख्य नद्या आहेत. कामवाडी नदी फार उथळ आहे. उधानाच वेळीं मात्र तींत भिवंडीपर्यंत लहान लहान होड्या तरतात. उन्हाळ्यांत ही नदी अगदीं आटून जाते. इ. स. १८८१।८२ त ह्या तालुक्यांत ९० तळीं नद्यांचीं धरणें, १२ उकऱ्या व ९११ विहिरी होत्या. त्यांपैकीं ७० विहिरीनां आंत उतरण्याकरितां पायऱ्या होत्या व बाकीच्यांना पायऱ्या नव्हत्या. त्याप्रमाणेंच ह्या वर्षीं नद्या ओढे व झरे मिळून १४७ होते.

**जमीन**—ह्या तालुक्यांत भाताचें पीक मुख्य आहे. तरी ह्या तालुक्यांतील जाडी भरडी व काळी जमीन ह्या पिकास फार योग्य नाहीं. नाचणी व वरी ही होते. आणि रबीचें पीकही होतें. ह्या तालुक्यांतील डोंगर व विशेषतः पश्चिमेकडील भागांतील डोंगर ह्यांचे वर झाडी चांगली असून तींत साग, शिसू, आरन, व ताडाच्या निरनिराळ्या जाति हे वृक्ष आहेत. भिवंडी शहाराजवळचे गांवांत विहिरीचें पाणी लावून द्विदळ धान्यें व भाजीपाला हें दुसरें पीक करीत असतात. ह्या तालुक्यांत भात पिकणारें लहानसें एक खारटण आहे.

**जिन्नस**—भात, नाचणी, चेणा, हरभरा, तूर, मूग, उडीद, कुळीद, तीळ आदिकरून तेलाचीं बियें, आंबाडी, सण, ऊंस, मिरची, फळफळावळ, भाजीपाला, व माळवें हे जिन्नस ह्या तालुक्यांत होतात.

**लोक**—हिंदु, मुसलमान, किरिस्तांव, व पारशी ह्या मुख्य चार जातींचे लोक ह्या तालुक्यांत आहेत.

√ **शहापूरतालुका**—ह्या तालुक्यांत मोखाडेंपेटा आहे. पूर्वीं ह्या तालुक्याला कोळवण म्हणत असत. हा तालुका म्हणजे जमिनीची एक चिरटी आहे. हिची लांबी पन्नास मैल व रुंदी पांचपासून तीस मैलपर्यंत असून ही ठाणें जिल्ह्याचे पूर्वभागांत सह्याद्रीचे पायथ्याशीं आहे. ह्या तालुक्याचे उत्तरेस दमण प्रांत, धरमपूर प्रांत, व नाशीक जिल्ह्यांतील पेंठ

संस्थान हीं आहेत. ईशान्येस सह्याद्रि आहे तो नाशीक जिल्हा व अह-
मदनगर आणि हा तालुका ह्याचे सीमेवर आहे. ह्या तालुक्याच्या
दक्षिणेस काळू व शाई ह्या नद्या आहेत. ह्या नद्या मुरबाड तालुका व
हा तालुका ह्यांचे सीमेवर आहेत. ह्या तालुक्याचे पश्चिमेस जव्हार
संस्थान. आणि डाहाणू, वाडें, भिवंडी, व कल्याण हे तालुके आहेत.
ह्या तालुक्याचें क्षेत्रफळ ८७० चौरसमैल असून इ. स. १८८१ त
ह्या तालुक्यांत १,०७,१२९ लोक होते. त्यामुळें दर चौरस मैलास १२३
लोक वसतात. ह्या तालुक्याचें जमीन बाबीचें उत्पन्न १,१९,२९० रुपये
आहे.

**देखावा**—शहापूर तालुका फार जंगली आहे. त्यांत जिकडे तिकडे
डोंगर असून मोठमोठीं जंगलेंही आहेत. ह्या तालुक्याचे दक्षिणे कडील
प्रदेशांत जंगल व डोंगर नसून खुले भाग आहेत, तसे दुसऱ्या कोणत्याही
या तालुक्याच्या प्रदेशांत खुले भाग नाहींत. पाउलवाटा, किनपट्टी, व
आगेरी या नांवाच्या प्रदेशांत हे खुले भाग असून त्यांत उत्तम भातशेतें
मोठ मोठीं आहेत. कोने पट्टीच्या उत्तरेस व वैतरणेच्या पलीकडे ह्या
तालुक्याचा प्रदेश हळूहळू उंच होत जातो. रस्ते किंवा वाटा दुर्गम
होतात, व घळी फार कठीण उत्तरणीच्या असतात. मोखाड्याचे बाजू-
कडे मोठमोठ्या भात शेतांचे ऐवजीं विस्तीर्ण असे क्रमानें उंच सखल अस-
णारे उंचवट्याचे प्रदेश आहेत. व त्यांत मधून मधून फार कठीण उतर-
णीच्या आणि खडकाळ अशा घळी आहेत. ह्या प्रदेशांतून वाहणाऱ्या
ओढ्याच्या पात्रांत एकमेकां पासून दूर दूर लहान लहान चोंढ्यांत मात्र
भात पिकतें. त्याच्याही पलीकडे उत्तरेस असणाऱ्या प्रदेशांत पायवाटे
खेरीज रस्ते नाहींत आणि तेथें भाताचे ऐवजीं वरकस धान्यें मात्र होतात.
सह्याद्री जवळचा ह्या तालुक्याचा पूर्वेकडील भाग व जव्हार संस्थान
जवळचा पश्चिमेकडील भाग उंचसखल असून त्यांत फारसें भात होत
नाहीं. नैर्ऋत्य दिशेकडून ईशान्येकडे जाणारा आग्र्याचा रस्ता एकच
सडकेचा मार्ग या तालुक्यांत असून तो पेनिनशुलारेल्वेच्या रस्त्या लगतच
आहे.

**हवा**—पावसाळया खेरीज इतर ऋतूंत या तालुक्याची हवा वाईट

असते. पावसाळ्यांत मात्र ती प्रायः निरोगी असते. पावसाळा संपल्यावर चार महिने पर्यंत या तालुक्यांत तापाची सांत असते आणि मार्च पासून जून पर्यंत उष्णता अतिप्रखर व फार त्रासकारक असते. या तालुक्यांतील कांहीं प्रदेशांतील हवा विशेषें करून यूरोपियन लोकांना अपकारक असते. मोखाडें पेटा समुद्राचे सपाटीपासून पुष्कळ उंच असल्यामुळें तेथील हवा माथेरानच्या हवेहून फारच थोडी कमी रमणीय आहे. इ. स. १८८१ पर्यंत दहा वर्षांच्या मुदतींत या तालुक्यांत पडलेल्या पावसाची सरासरी १०२ इंच येते.

**पाणी**--या तालुक्याचे उत्तरेकडील प्रदेशांतील गांवांनां वैतरणा नदीपासून, मध्य प्रदेशांतील गांवांनां भातसा नदीपासून, व दक्षिणेकडील गांवांनां काळू नदीपासून सर्व वर्षभर पाण्याचा पुरवठा होतो. या प्रदेशांतील लोकांना विहिरी व तळीं यांपासून पाण्याचा पुरवठा होतो. या विहिरींचें व तळ्यांचें पाणी प्रायः चांगलें असतें तरी तें उन्हाळ्याचे अखेरीस आटतें. इ. स. १८८१-८२ त ४२ तळीं व ४ नद्यांचीं धरणें होतीं. त्या चार धरणां पैकीं एक तूर्तातूर्तचें व तीन कायमचीं होतीं. तशाच त्या वर्षी या तालुक्यांत ६१२ विहिरी होत्या. त्यां पैकीं ९१ विहिरींना आंत उतरण्यास पायऱ्या होत्या व बाकीच्यांना पायऱ्या नव्हत्या. तसेंच त्या वर्षी नद्या, ओढे, व झरे मिळून ह्या तालुक्यांत ३६ होते.

**जमीन**--ह्या तालुक्यांतील जमीन प्रायः तांबडी व दगडाळ आहे. भात, नाचणी, वरी, तीळ खुरासनी हे मुख्य जिन्नस पिकतात. झाडें पुष्कळ होतात. त्यांत साग, ऐन, आंबा व मोह हीं मुख्य आहेत.

**जिन्नस**-भात, नाचणी उर्फ रागी, चेणा, हरभरा, तूर, कुळीथ, उडीद, तीळ आदिकरून तेलांचीं बियें सण, आंबाडी, मालवें, फळफळावळ, व भाजीपाला हे सर्व जिन्नस या तालुक्यांत होतात.

**लोक**--हिंदू, मुसलमान, किरिस्ताव, पारशी, व ज्यु या जातींचे लोक या तालुक्यांत आहेत.

**साष्टी**-तालुका साष्टीबेट या नावानें जो सर्वांस माहीत आहे तो साष्टी तालुका ठाणे जिल्ह्याचे नैर्ऋत्य भागांत आहे. ह्याच्या उत्तरेस

व ईशान्येस ठाण[illegible] ह्मणजे वसईची खाडी आहे. पूर्वेस ठाण्याची खाडी, [illegible] कल्याण [illegible]का, व पनवेल तालुका आहे. दक्षिणेस मुंबईबंदर व पश्चिमेस [illegible] [illegible]हे. या तालुक्याचें क्षेत्रफळ २४१ चौरस मैल असून यांत इ. स १८८१ त १०८१४९ लोक होते. त्यामुळें दर चौरसमैलास ४४८ लोक वसतांत. ह्या तालुक्याचे जमीन बाबीचें उत्पन्न १९३२०० रुपये आहे.

**देखावा**–साष्टी बेटाच्या मध्यभागीं उत्तर दक्षिण जाणारा असा एक डोंगरी प्रदेश आहे. ह्याची उंची दक्षिणेकडील बाजूस कमी होत होत अखेरीस कुर्ल्याजवळ अगदीं नाहींशी झालेली आहे. पुढें थोडा खंड-पडल्या नंतर तुर्भे बेटाच्या अगदीं दक्षिणेकडील टोंकाला ह्या डोंगरी पट्ट्याचा पुनः उद्भव होतो. ह्या तालुक्याच्या पूर्वेकडील डोंगरांच्या पायथ्याच्या लगत्यास असणारी व जंगलानें आच्छादिलेली उंच सखल जमीन आणि खाड्या व खाजणें यांचे मध्यें भातशेतांचा एकपट्टा आहे. त्यांत बरीच झाडी असून तळ्यांपासून पाण्याचा पुरवठाही चांगला होतो. मध्य-भागीं असणाऱ्या डोंगरी पट्ट्यापासून पश्चिमेस समुद्राकडे डोंगरांचे लहान लहान फांटे गेलेले आहेत. हे डोंगरी फांटे व समुद्र यांच्यामध्यें एक रुंद मैदान आहे. त्यांत मधून मधून एकेकटीं टेंकाडें मात्र आहेत. ह्या तालुक्याचे सखल प्रदेशांत भरतीचें पाणी आंत शिरणाऱ्या खाड्या फार आहेत. त्यामुळें साष्टी तालुक्याच्या वायव्येकडील प्रदेशांत समुद्राच्या लगत्यास पुष्कळ लहान लहान बेटें उत्पन्न झालेलीं आहेत.

**हवा**–साष्टी तालुक्याचा जो भाग पश्चिम समुद्राचे किनाऱ्यावर आहे त्या भागांतील हवा रम्य व निरंतर एकसारखी असते. खुद्द ठाणें शहरांत थंडीचे दिवसांतील हवा रम्य असते परंतु उन्हाळा व पावसाळा ह्या ऋतूंतील हवा फार त्रासदायक असते. इ. स. १८८१ पर्यंत दहा वर्षांच्या मुदतींत पडलेल्या पावसाची सरासरी ९८ इंच येते.

**पाणी**–ज्यां पासून गोडें पाणी मिळेल अशा मोठ्या नद्या ह्या तालुक्यांत नाहींत. या तालुक्यांत जे मोठे ओढे आहेत त्यां पैकीं एका ओढ्याच्या द्वारें व्याहाडच्या तळ्याचें फुकट जाणारें व मुरणारें पाणी दक्षिणेकडे माहीमच्या खाडींत जातें. ह्या ओढ्याचे खालोखाल असणाऱ्या

ओढ्याचा उगम कान्हेरीच्या लेण्यांत होऊन तो वायव्यदिशेकडे वाहत जातां जातां मंडपेश्वराजवळून जाऊन अखेरीस वेसाव्याच्या खाडीस मिळतो. विहिरींपासून ह्या तालुक्यांतील लोकांना मिळणारे पाणी गुणानें बरें असून त्याचा पुरवठाही बराच खळ न पडतां होतो. इ. स. १८८१-८२ त ह्या तालुक्यांत २२४ तळीं, एक नदीचें धरण, व २०८० विहिरी होत्या. त्यांपैकीं ४६ ना आंत उतरण्यास पायऱ्या होत्या व बाकीच्यांना पायऱ्या नव्हत्या. त्या वर्षी ह्या तालुक्यांत ओढे, व झरे मिळून ९६ होते.

**जमीन**-ह्या तालुक्यांतील जमीनीचा रंग तांबडा, काळा, व ह्या सारखा काळा आहे. मुख्यत्वेंकरून ह्या तालुक्यांत भात पिकतें. व हा थोड्या भागांत नाचणी ही होते. वरकस जमीनांत धान्य पिकवीत नाहीत, तर मुंबईच्या बाजारांत नेऊन विकण्याकरतां तींत गवत होऊं देतात. ह्या तालुक्याच्या समुद्रकिनाऱ्यावरील भागांत माड फारच होतात व ताड ह्या साष्टीबेटाच्या बहुतेक भागांत विपुल होतात.

**जिन्नस**-भात, नाचणी, चेणा, उडीद, आंबाडी, मिरची, भाजीपाला फळफळावळ व माके हे जिन्नस या तालुक्यांत होतात. तीळ आदि-करून तेलाचीं बियें पिकवीत नाहींत.

**लोक**-हिंदु, मुसलमान, किरिस्तांव, पार्शी, व ज्यू ह्या पांच जातींचे लोक या तालुक्यांत आहेत.

**कल्याणतालुका**—ह्या तालुक्याच्या उत्तरेस उल्हास व तानसा ह्या नद्या आहेत. ह्या नद्या भिवंडी व शहापूर हे तालुके आणि कर्जत तालुका ह्यांच्या सीमेवर आहेत, ह्या तालुक्याचे पूर्वेस शहापूर व ठाण्याची हे तालुके आहत. दक्षिणेस कर्जत व पनवेल हे तालुके असून पारसिक व पारसिक नांवाच्या डोंगराची ओळ आहे. ह्या तालुक्याचें क्षेत्रफळ २७८ चौरस मैल असून इ. स. १८८१ त ७७९८८ लोक ह्या तालुक्यांत होते. त्यामुळें दर चौरस मैलास २८० लोक बसतात. इ. स. १८८० त ह्या तालुक्याचें जमीन बाबीचें उत्पन्न १२९००० रुपये होतें.

**डहाणा**—हा तालुका त्रिकोणाकृति असून त्याचा अति चिंचोळा ह्मणजे शिरकोणाकडचा भाग उत्तरेकडे आहे. ह्या तालुक्याच्या पूर्वे-

डील व दक्षिणकडील भागांत डोंगरांच्या रांगा आहेत त्या त्या दिशां-
डील सीमांशीं समांतर असून त्या डोंगरांच्या रांगांपासून ह्या तालु-
क्याच्या मध्यभागीं डोंगरांचे फांटे गेलेले आहेत. ह्या तालुक्यांत उत्पन्न
होणारे जिन्नस बाहेर पाठविण्याकरतां उल्हास नदीच्या योगानें झालेली
मोठी खाडी आणि ईशान्येकडे तळघांटापर्यंत जाणारा एक व नैर्ऋत्येस
बोरघांटापर्यंत जाणारा एक असे पेनिनसुलारेल्वेचे दोन फांटे असल्यामुळें
लोकांची फार सोय झालेली आहे.

वि वा—एप्रिल व मे या महिन्यांत उन्हाळ्याचे ऊष्णतेमुळें पूर्वेकडून
हो दायक वारे येतात. व हिंवाळ्यांत तापाची सांत येते. या दोन अव-
नद्य खेरीज करून ह्या तालुक्याची हवा बरीच निरोगी व सुखकारक
. ह्या तालुक्यांत पडणाऱ्या पावसांत सारखेपणा असतो. इ. स. १८८१
राव दहावर्षांच्या मुदतींत ह्या तालुक्यांत जो पाऊस पडला त्याची
तालुआणी ८६ इंच येते.
ह्या तालुक्यांत तीन नद्या आहेत. उत्तरेकडील प्रदेशांत काळू
भातसाहेणी—ह्या तालुक्यांत पूर्वकडून पश्चिमेकडे वाहते. उल्हास नदी तालुक्याच्या
आहे. ती दक्षिणेकडून उत्तरेस जाते. तिसरी नदी भातसा ही
तीळ,र्मा आहे. ती असून ह्या तालुक्याच्या उत्तर सीमेवर नैर्ऋत्येकडे जाते.
हे जि डी म्हणजे वसईची खाडी हिच्या आरंभाजवळच भातसा नदीला
लाडीहें ह्या नद्या येऊन मिळतात. ह्या नद्यांच्या पात्रांत वर्षभर पाण्याचीं
क्यांत त्या तालुक्याच्या इतर भागांत उन्हाळ्याचे दिव-
पन दस तात.. परंतु ह्या तालुक्याच्या इतर भागांत उन्हाळ्याचे दिव-
तालुका च्या संबंधानें लोकांचे फार हाल होतात. कल्याण शहराच्या
रेस कल्याण बाजूस सुमारें नऊ मैलांवर पिसें बंदर ह्मणून आहे तेथपर्यंत काळू
पेण — ४० खंडींचे मचवे जातात. व कल्याण शहरापासून दहा मैलां-
त वासुंदें गांव आहे तेथपर्यंत भातसा नदींत लहान लहान होड्या
जातात. इ. स. १८८१ त ह्या तालुक्यांत १०७ तळीं व ९८३
विहिरी होत्या. त्यांपैकीं ७६ ना आंत उतरण्यास पायऱ्या होत्या व
बाकीच्यांना पायऱ्या नव्हत्या. त्या वर्षी ह्या तालुक्यांत नद्या, ओढे,
व झरे मिळून १९७ होते.

जमीन—ह्या तालुक्यांतील जमीनीच्या मुख्य भागाचा रंग काळा आहे

आणि पूर्वेकडील प्रदेश जरी खडकाळ आहे तरी तेथील जमीनींत गुरें चरण्यास गवत उत्तम होतें. कल्याण शहराजवळ एक भूप्रदेश आहे त्यांत पावसाळ्यांत भात होतें. व उन्हाळीचे दिवसांत कांदे, भाजीपाला, व इतर माळवें यांचें दुसरें पीक विहिरी व तळीं यांचे पाण्यावर होतें.

**जिन्नस**–भात, नाचणी, हरभरा, तूर, मूग, उडीद, तीळ, आंबाडी, फळफळावळ, भाजीपाला व इतर माळवें हे सर्व जिन्नस या तालुक्यांत होतात.

**लोक**–हिंदू, मुसलमान, पारशी, किरिस्तांव, व ज्यू ह्या पांच जातींचे लोक या तालुक्यांत आहेत.

✓ **मुरबाड तालुका**–ह्या तालुका ठाणें जिल्ह्याच्या पूर्वभागांत आहे. ह्या तालुक्याच्या उत्तरेस काळू व शाऊ ह्या नद्या आहेत. ह्या नद्या हा तालुका व शहापूर तालुका यांचे दरम्यान सीमेवर आहेत. ह्या तालुक्याच्या पूर्वेस सह्याद्रि, अहमदनगर जिल्हा, व पुणे जिल्हा आहे. दक्षिणेस करजत तालुका व पुणें जिल्हा आहे. पश्चिमेस कल्याण तालुका आहे. ह्या तालुक्याचें क्षेत्रफळ ३५१ चौरस मैल आहे. इ. स. १८८१ त ह्या तालुक्यांत ६३९३२ लोक होते त्यामुळें दर चौरस मैलास १८२ लोक बसतात. इ. स. १८८० त ह्या तालुक्याचें जमिनीच्या सर्वाचें उत्पन्न ९०६०० रुपये होतें.

**देखावा**–ह्या तालुक्याचा बहुतेक भाग डोंगराळ असून त्यांत झाडी बरीच आहे तरी तींत मोठमोठीं झाडें नाहींत. सह्याद्रीचे पायथ्याशीं पूर्वेकडिल प्रदेशांत एक सपाट जमीनीचा प्रदेश आहे त्या खेरीज ह्या सपाट प्रदेश या तालुक्यांत नाहीं. ह्या तालुक्यांत जाण्यायेण्याचे रस्ते चांगले नसल्यामुळें या तालुक्यांत उत्पन्न होणारे जिन्नस बाहेर पाठविण्याची मोठी गैर सोय आहे. ह्या तालुक्यांतील बहुतेक लोक ठाकूर कोळी, व मराठे आहेत. ठाकूर व कोळी हे पूर्वेकडील भागांत सह्याद्रीचे पायथ्याशीं आढळतात व मराठे पश्चिमेकडील भागांत आढळतात.

**हवा**–उन्हाळ्यांत ह्या तालुक्यांतील हवा रोगोत्पादक नसते तरी ती फार त्रासदायक असते. पावसाळा गेल्यावर उन्हाळीचे दिवसांत व हिंवाळ्याचे दिवसांत ह्या तालुक्यांतील हवा फार ताप उत्पन्न करिते. सह्याद्रीच्या लगत्याच्या गांवांत पाऊस फार पडतो, तरी पश्चिम भागांत खुद्द

मुरबाड शहरांत इ. स. १८८१ पर्यंत दहा वर्षांच्या मुद्दतींत पडलेल्या पावसाची सरासरी ९० इंच येते.

**पाणी**–ह्या तालुक्यांत पाणी विपुल नाहीं. ह्या तालुक्यांत दोन मुख्य नद्या आहेत. त्यां पैकीं काळू नदी उत्तरेकडील प्रदेशांत आहे. व मुरबाडी नदी तालुक्याचे मध्यभागीं आहे. उन्हाळा सुरू झाल्यावर लवकरच ह्या नद्या व विहिरी आटतात. विहिरींचें पाणी गुणानें बरें असतें. इ. स. १८८१–८२ त ह्या तालुक्यांत ४३ तळीं व ५६९ विहिरी होत्या. या विहिरीं पैकीं ९९ ना आंत उतरण्यास पायऱ्या होत्या व व बाकीच्यांनां पायऱ्या नव्हत्या. त्या वर्षी ह्या तालुक्यांत नद्या, ओढे, व झरे मिळून २२९ होते.

**जमीन**–ह्या तालुक्यांतलि जमीन भिकारी आहे. वरकस जमीनींत राब व कवळकाठी या खेरीज दुसरें कांहीं फारसें होत नाहीं. ह्या तालुक्यांत उत्पन्न होणारें गवत खाण्यास जागा नाहीं. मुख्य उत्पन्न भाताचें आहे तरी नाचणी, वरी, व तीळ हे जिन्नसही थोड थोडे होतात.

**जिन्नस**-भात, नाचणी चेणा, हरभरा, तूर, कुळीथ, उडीद, वाटाणा, तीळ, सण, आंबाडी, मिरची, भाजीपाला, फळफळावळ, व इतर माळवें हे जिन्नस ह्या तालुक्यांत होतात.

**लोक**–हिंदु, मुसलमान, व पारशी या तीन जातींचे लोक ह्या तालुक्यांत आहेत.

**पनवेल तालुका**-ह्या तालुक्यांत उरण ह्मणून एक पेटा आहे. हा तालुका ठाणें जिल्ह्याच्या नैऋत्य भागांत आहे. ह्या तालुक्याच्या उत्तरेस कल्याण तालुका, पूर्वेस कर्जत तालुका, दक्षिणेस कुलाबा जिल्ह्यांतील पेण तालुका व पश्चिमेस मुंबई बंदर आणि साष्टी तालुका आहे. ह्या तालुक्याचें क्षेत्रफळ ३०७ चौरस मैल आहे. व इ. स. १८८१ त ह्या तालुक्यांत १०११८१ लोक होते त्यामुळें दर चौरस मैलास ३१९ लोक बसतात इ. स. १८८० त ह्या तालुक्याचें जमीन बाबीचें उत्पन्न १९८१४० रुपये होतें.

**देखावा**–पनवेल तालुक्याच्या पूर्व सीमेवर बावामलंग, माथेरान व प्रबळ नांवाच्या डोंगरांच्या उंच रांगा आहेत. आणि आग्नेय दिशेस

माणिकगड नांवाची डोंगरांची रांग आहे. उत्तरेस उळव्यांपासून दक्षिणेस साईपर्यंत जाणारी कर्नाळा नांवाची एक डोंगरांची रांग ह्या तालुक्याचे मध्यावर आहे. तिचेवर झाडी व रान प्रायः मुळींच नाहीं. उरण पेटा व पनवेल तालुका ह्यांचे सीमेवर असणाऱ्या खाडीच्या दोन्हीं बाजूंस समुद्रापासून साध्य केलेलीं भाताचीं विस्तीर्ण खारटणें व मोठमोठाले मिठागर आहेत. उरण पेट्यांत एक डोंगरांची ओळ आहे तिची उंचा कर्नाळ्याचे उंचीहून कमी आहे.

पनवेल तालुक्यांत दळण वळणाच्या स्वतः सिद्ध सोई फार आहेत. ह्या तालुक्याच्या समुद्र किनाऱ्यापासून मुंबईस जलमार्गानें जाण्याची सोय असून खेरीज ह्या तालुक्याचे अंशतः सीमेवर असणाऱ्या काळुंद्री व पाताळ गंगा ह्या नद्या आणि दुसऱ्या पुष्कळ होड्या तरण्यासारख्या लहान लहान नद्या व मिठागरांमधून जाणाऱ्या खाड्या यांचे योगानेंही जलमार्गानें जाण्याची सोय उत्तम आहे. मुंबई पासून पुण्यापर्यंत जाणाऱ्या सडकेच्या योगानें खुषकीचे मार्गाची सोयही उत्तम आहे.

**हवा**–ह्या तालुक्याची हवा सर्द असून युरोपियन लोकांना जरी मानवत नाहीं तरी ती समशीतोष्ण असते. उन्हाळ्याचे दिवसांत मात्र अतिशय उकाडा होतो. उन्हाळ्यांत व पावसाळ्यांत कधीं कधीं महामारीचा रोग उद्भवतो. हिंवाळ्यांत लोकांना ताप फार लागतो. ह्या तालुक्यांत पाऊस पुष्कळ व नियमानें पडतो. इ. स. १८८१ पर्यंतच्या दहा वर्षांच्या मुदतींत पडलेल्या पावसाची सरासरी १०७ इंच येते.

**पाणी**–माथेरान डोंगराच्या पश्चिमेकडील उतरणीवरून पुष्कळ ओढे वहात जाऊन काळुंद्री नदींत एकवटतात. समुद्रापासून नऊ मैल अंतरावर पनवेल शहर आहे. तेथपर्यंत काळुंद्री नदींत भरतीचें पाणी येतें. पनवेलीपर्यंत भरतीच्या वेळीं १२० खंडीचीं तारवें येतात. ह्या तालुक्याच्या दक्षिण टोंकाला पाताळ गंगा नदी आहे. ती पश्चिमेकडे वळणांवळणांनीं वाहात जाऊन मुंबई बंदराच्या आग्नेय कोंपऱ्यास समुद्राला मिळते. हिच्या मुखापासून सहा मैलांवर साई ह्मणून गांव आहे तेथपर्यंत शंभर खंडींचीं गलबतें जातात. आणि साईचे वरचे बाजूस आठ मैलांवर आपटें आहे तेथपर्यंत ४८ खंडींचे मचवे जातात. पनवेल

घोटें, पाळें, गुळसुंदें, व विधाणें ह्या गांवांना तेथील नद्यांपासून पाणी मिळतें. परंतु उन्हाळ्याचे दिवसांत गुळसुंद्यां खेरीज इतर गांवच्या नद्या आटतात. गुळसुंद्याचे नदीला मात्र विपुल पाणी असतें. ह्या तालुक्यांतील बहुतेक विहिरींचें व तळ्यांचेंही पाणी उन्हाळ्याचे अखेरीस आटतें. इ. स. १८८१-८२ त या तालुक्यांत १९५ तळीं, ४ नद्यांचीं धरणें, व ८९८ विहिरी होत्या. त्या विहिरीं पैकीं ९३ ना आंत उतरण्यास पायऱ्या होत्या. ८०५ ना पायऱ्या नव्हत्या. त्याशिवाय ह्या तालुक्यांत नद्या, ओढे, व झरे मिळून १७९ होते.

**जमीन**--ह्या तालुक्यांतील जमीन तांबडी, व थोडी दगडाळ असून तिचा पिकाऊपणा मध्यम आहे. मुख्य पीक भाताचें येतें तरी नाचणी वरीही होते. पश्चिम भागांत खारटणांत पुष्कळ तांदुळ पिकतो. ह्या तालुक्यांत खारी दोन प्रकारच्या आहेत. डोंगरांच्या जवळच्या खारींची जमीन ... असते. व समुद्र किनारा आणि खाडी कांठ यांचे लग- ... ळ खारी आहेत त्यांची काळी असते.

जिन्नस-भात, नाचणी, वरी, हरभरा, तूर, मूग, उडीद, तीळ, ... ऊंस, फळफळावळ, भाजीपाला, व माळवें हे जिन्नस या तालु- क होतात.

लोक-हिंदु, मुसलमान, किरिस्ताव, व पारशी ह्या चार जातींचे लोक ... यलुक्यांत आहेत.

**कर्जत तालुका**--हा तालुका ठाणे जिल्ह्याच्या आग्नेय प्रदेशांत आहे. ह्या तालुक्याच्या उत्तरेस कल्याण व मुरबाड हे तालुके आहेत. पूर्वेस सह्याद्रि आहे तो पुणें जिल्ह्यांतील मावळ तालुका व हा तालुका ह्यांचे सीमे- आहे. ह्या तालुक्याच्या दक्षिणेस कुलाबा जिल्ह्यांतील पेण तालुका ... पश्चिमेस माथेरानचा डोंगर व पनवेल तालुका आहे. ह्या ... क्याचें क्षेत्रफळ ३५३ चौरस मैल आहे. इ. स. १८८१ त ... तालुक्यांत ८२०६३ लोक होते त्यामुळें दर चौरस मैलास २३२ ... बसतात. इ. स. १८८० त ह्या तालुक्याचें जमीन बाबीचें उत्पन्न ...०६१० रुपये होतें.

**देखावा**- सह्याद्रि व माथेरान ह्यांच्या मध्यें असल्यामुळें करजत

तालुका डोंगराळ आहे. उत्तरेकडील वाजूस डोंगर व खिंडी ... योगानें ह्या तालुक्यांतील प्रदेशाला चित्रविचित्र व सुरेखपणा आला आहे. तिकडील सखल प्रदेशांत ... व ... प्रदेशांत साग, ऐन, आणि इतर रानांत होणारीं ... कांहीं ...सव्याचीं झाडेंही आहेत. ह्या तालुक्याच्या पूर्वेकडील ... सह्याद्रीच लागल्याचा प्रदेश अतिशय डोंगराळ असून तेथें झाडी ... ल्यामुळें तेथें मोठमोठीं रानें बनलीं आहेत. व सखल जमीन ... असणारीं भात शेतें तेथें मुळींच नाहींत.

**हवा**-निरनिराळ्या ऋतूंत ह्या तालुक्यांतील हवेंत फार फेरफार होतात. जानेवारी व फेब्रुवारी महिन्यांत कधीं कधीं रात्रीस व सकाळीं अतिशय थंडी पडते. आणि उन्हाळ्याचे दिवसांत डोंगरांच्या उतरणी खेरीज इतर ठिकाणीं अतिशय त्रास होण्यासारखा उन्हाळा होतो. इ. स. १८८... पर्यंत दहा वर्षांच्या मुदतींत पडलेल्या पावसाची सरासरी १२१ इंच येते.

**पाणी**-उल्हास नदी व तिला मिळणाऱ्या चावरी, चिलार, पोसरी इत्यादि नद्या ह्यांचा आणि पाताळगंगा नदी हिचा उगम सह्याद्रींत ... घाटा जवळ झालेला आहे. उल्हास नदी उत्तरेकडे व पाताळ... नदी वायव्येकडे वहाते. उन्हाळ्यांत ह्या नद्या आटतात. तेव्हां ... मधून डबक्यांत मात्र पाणी असतें. ...ण्यापेक्षां येथें पाऊस प्रायः ... पडतो तरी तो पुरेसा बहुशः असतो. त्यामुळें भाताचे पिकास धक्का क... तच असतो. परंतु पाणी सांठवण्याचीं साधनें कमी असल्यामुळें उन्हा... ळ्यांत पिण्याच्या पाण्याचा फार तोटा येतो. इ. स. १८८१-८२ ह्या तालुक्यांत ८६ तळीं, ३ नद्यांचीं धरणें, व ६४२ विहिरी होत... त्या विहिरीं पैकीं ७९ ना आंत उतरण्यास पायऱ्या होत्या व बा... च्यांना पायऱ्या नव्हत्या. तसेंच त्या वर्षी ह्या तालुक्यांत नद्या, ओ... व झरे मिळुन ३०२ होते.

**जमीन**-ह्या तालुक्यांतील भात जमीन काळी व चिकट असून ठा... जिल्ह्यांतील पनवेल तालुक्या खेरीज इतर बहुतेक तालुक्यांतील जमीनीह... ती अधिक पिकाऊ आहे. भात, नाचणी, व वरी हीं ह्या तालुक्यांती... मुख्य पिकें आहेत.